दिशा प्रगतिशील



मा. दत्तोपंत ठेंगडी ह्यांच्या
'THIRD WAY' या पुस्तकाचा
मराठी अनुसर्जन-रूपबंध
- बाप केंदरकर

तिसऱ्या पर्यायाकडे

मा. दत्तोपंत ठेंगडी यांच्या
THIRD WAY या ग्रंथाचा
मराठी अनुसर्जन - रूपबंध

अनुसर्जक
बापू केंदूरकर

नोटप्रा
प्रकाशन
'संपदा' शास्त्रीनगर, डोंबिवली (प)

प्रकाशक / मुद्रक
दिलीप महाजन
मोरया प्रकाशन
'संपदा' शास्त्रीनगर,
नगरपालिका दवाखान्याजवळ,
डोंबिवली (प) ४२१ २०२

पुणे शाखा
अनुश्री सोसायटी,
४० / १० एरंडवणा,
इंदिरा हाईटस्जवळ,
पुणे : ४११ ०३८

© डॉ.म.पु. तथा बापू केंदूरकर

(THIRD WAY मूळ ग्रंथाचे प्रकाशक
जानकी प्रकाशन, नवी दिल्ली.)

प्रथमावृत्ती
एप्रिल १९९८

मुखपृष्ठ
रविमुकुल

अक्षरजुळणी
अभिषेक टाईपसेटर्स,
१२४३, सदाशिव पेठ,
पुणे : ४११ ०३०

मुद्रणस्थळ
श्रीवेदविद्या मुद्रणालय
४१, बुधवार पेठ,
पुणे : ४११ ००२

मूल्य रु. १५० /-

लक्षावधी व्यक्तींना

मातृभूमीसाठी जगण्याची व मरण्याचीही संकल्पदृष्टी ज्यांनी दिली

त्या श्री गुरुजींच्या (राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक)

चरण-कमलांशी समर्पित

(At the lotus-feet of

Shri Guruji M.S.Golwalkar

Second Sarsanghchalak of R.S.S.

who gave vision to millions to live and die

*for our motherland)**

* Third Way या पुस्तकाची अर्पणपत्रिका.

ऋणनिर्देश

मा. दत्तोपंत ठेंगडी यांच्या *Third Way* या ग्रंथाचा हा मराठी रूपबंध सिद्ध करण्यास अनेक व्यक्तींचे प्रत्यक्षाप्रत्यक्ष साहाय्य लाभले आहे. त्या सर्वांचा मी ऋणी आहे.

सर्वप्रथम आपला ग्रंथ अशा प्रकारच्या स्वरूपात मराठीमध्ये आणण्यास मला अनुमती दिल्याबद्दल मा. दत्तोपंत ठेंगडी यांच्या ऋणाचा उल्लेख करावयाचा आहे. हे ऋण कधीच फेडता येणार नाही; पण हे असे ऋण आहे की जे फेडण्यापेक्षा बरोबर वागविण्यातच धन्यता वाटावी.

त्यानंतर आवर्जून उल्लेख करावयाचा आहे तो, माझी पत्नी सौ. शशिकला हिचा. माझे लिखाण सुबोध करण्याच्या दृष्टीने आवश्यक ते सर्व संस्कार करण्याची सर्व जबाबदारी स्वीकारणारी तिची तत्पर साथ असल्यामुळेच हे काम मी करू शकलो. या पुस्तकाच्या संदर्भातील जे काय कर्तृत्व (!) असेल ते माझे एकट्याचे नाही हे प्रांजळ नम्रतेने वाचकांपुढे ठेवण्यासाठीच केवळ हा उल्लेख करीत आहे.

स्वदेशी जागरण मंचाचे अखिल भारतीय सहनिमंत्रक श्री. रवींद्र महाजन यांनी या लिखाणाबद्दल अतिशय मार्मिक सूचना करून ते अधिक नेटके करण्यास मदत केली. माझे पूर्वीचे सहकारी व आर्थिक विषयातील अधिकारी प्राध्यापक मित्र डॉ. अशोक धोपेश्वरकर यांनी विशेषत: 'विकास संकल्पनेच्या अनुषंगाने' या विषयाच्या संदर्भात केलेल्या मौलिक सूचनांमुळे मला अनाकलनीय वा अस्पष्ट असलेल्या अर्थशास्त्रीय संकल्पना स्पष्ट होण्यास साहाय्य झाले. ठाण्याचे एक संघकार्यकर्ते श्री. सुधीर बर्वे यांनी भाषांतराच्या दृष्टीने सुचविलेल्या काही शब्दयोजनांचा मला उपयोग झाला. मोरया प्रकाशनाचे श्री. दिलीप महाजन यांनी पुस्तक अतिशय नेटक्या, सुबक स्वरूपात तयार करून मला अपेक्षित अशा वेळात प्रकाशित करण्याची जबाबदारी पार पाडली. त्याचप्रमाणे या साहित्यावरील प्राथमिक संगणकीय प्रक्रियेमध्ये, ठाणे येथील श्री. मंदार कोळी याने सर्व प्रकारचे साहाय्य मनापासून केले. याशिवाय श्री. अरुण करमरकर, प्रा. म. मो. पेंडसे अशांसारख्या अनेक ज्येष्ठ-कनिष्ट संबंधियांनी वेळोवेळी माझ्या कामाबद्दल आस्था दाखवून छोटेमोठे साहाय्य केले आहे.

अशा सर्व सुहृदांचा मी आभारी आहे.

दिल्लीच्या जानकी प्रकाशनाचे श्री. रामदास पांडे यांनी मला *Third Way* च्या मराठी रूपांतराला अनुमती दिली त्याबद्दल मी आभारी आहे.

बापू केंदूरकर

अनुक्रमणिका

१) कारण की.. ६
(Third Way या मूळ इंग्रजी पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेचे भाषांतर.)

२) या अनुसर्जनाविषयी थोडेसे ८

३) माझे दोन शब्द १७

४) हिंदू दिशावेध १९

५) संदर्भ चौकट – हिंदू जीवनदृष्टी ४६

६) भौतिक विकास संकल्पनेच्या अनुषंगाने ५९

७) देशी संविधानात्मक व्यवस्थेकडे ११२

८) तिसऱ्या पर्यायाचा अटळ वेध २८०

९) परम वैभवाप्रत २९२

१०) परिशिष्ट १ ३००

११) परिशिष्ट २ ३०१

कारण की...*

राष्ट्रीय पुनर्रचनेच्या संबंधातील विविध विषयांवरील श्री. दत्तोपंत ठेंगडी यांच्या लेखांच्या आणि भाषणांच्या या संग्रहाच्या प्रकाशनाशी माझा संबंध येणे ही माझ्या दृष्टीने अत्यंत सुखद घटना आहे. आपल्या घटनासमितीच्या विद्वान सदस्यांना कल्पनाही येऊ शकली नसती अशा प्रकारच्या सध्याच्या अत्यंत व्यामिश्र समस्यांची समाधानकारक उकल करण्यासाठी प्रस्थापित घटनात्मक चौकट ही पुरेशी समर्थ नाही हे आता स्पष्ट झाले आहे. त्यामुळेच सर्वसाधारणपणे असे जाणवत आहे की नवीन घटनासमितीचे गठण होणे ही काळाची गरज आहे. भारतीय राज्यघटना सिद्ध करणाऱ्या प्रज्ञावंत दिग्गजांच्या क्षमतेचे मोल कमी लेखण्याचा हेतू नाही. पण जेफरसन म्हणतो त्याप्रमाणे प्रत्येक पिढीला तिच्या तिच्या धारणेप्रमाणे तिच्या सुखाला प्रेरक ठरू शकेल, अशा प्रकारची शासनव्यवस्था निवडण्याचा अधिकार आहे. अर्थातच शासनव्यवस्था म्हणत असताना त्याला संपूर्ण समाजव्यवस्था अभिप्रेत होती.

श्री. ठेंगडींना कुठल्याही निश्चित आराखड्याच्या (Blue Print) परिभाषेत विचार करणे हे इष्ट व शक्यही वाटत नाही. मानवेंद्रनाथ रॉय, पं. दीनदयाळ उपाध्याय, स्वातंत्र्यवीर सावरकर, मार्क्स वा लेनिन यांच्यासारख्या व्यवहारवादी विचारवंतांचा, कुठलाही परिपूर्ण आकृतिबंध (Utopia) सादर करण्याला विरोध होता. कारण त्यांच्या मते असा आकृतिबंध मांडणे हा निरर्थक व्यापार आहे.

असा आराखडा ही मूलभूत तत्त्वप्रणालीच्या मार्गदर्शक सिद्धांताच्या प्रकाशात होणाऱ्या प्रत्यक्ष कार्यवाहीतून उलगडत जाणारी गोष्ट आहे व त्यातूनही ती प्रायोगिक अनुभवांतून सुधारत सुधारत सिद्ध होणारी अशी बाब आहे. त्यामुळे प्रत्यक्ष कार्यवाहीच्या अवस्थेपूर्वी नव्या सामाजिक-आर्थिक व्यवस्थांची केवळ मार्गदर्शक स्थूलरेखाच देणे शक्य व इष्टही असते आणि अशा स्थूलरेखा तर प्रत्येक विचारप्रणालीने दिलेल्या असतातच.

साम्यवादाच्या अपयशानंतर व भांडवलशाहीचीही त्याच मार्गावरील अधोगती वेगवान झाल्यावर आता अमेरिकेसह सर्व देशांमध्ये 'तिसऱ्या पर्याया'चा शोध सुरू झाला आहे. पीटर ड्रकर, सॅम्युअलसन इ. विचारवंतांची प्रकट वक्तव्ये जरी सावध असली तरी त्यांना भांडवलशाहीच्या अटळ विनाशाची खाई दिसू लागली आहे.

---

* *Third Way* या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीचे संपादक श्री भानुप्रताप शुक्ल यांनी लिहिलेली 'Why ?' ही प्रस्तावना.

अर्थातच श्री. ठेंगडीजी बजावतात की असे असले तरी ज्यांनी या दोन विचारप्रणालींवर आजवर कित्येक वर्षे टीका केली त्यांनी मात्र हुरळून जाण्याचे काहीच कारण नाही. कुठलाही नवीन नमुना विकसित करण्याचा प्रयत्न करताना, या संदर्भातील पुरेशी पूर्वतयारी अत्यावश्यक असते असे त्यांचे म्हणणे आहे.

त्यामुळेच भावी सामाजिक रचनेच्या समस्येबद्दल आपल्यापैकी प्रत्येकाने गंभीर विचार करणे आवश्यक आहे, अशी श्री. ठेंगडीजींची अपेक्षा आहे. व्यापक राष्ट्रीय परिचर्चेतून काहीसा राष्ट्रीय सर्वाभिप्राय विकसित व्हावा असा त्यांचा प्रयत्न आहे. अशा सर्जनशील विचारप्रकियेला साहाय्यभूत व्हावे असा या प्रकाशनाचा हेतू आहे.

भावी काळात आकाराला येणाऱ्या रचनेवरील अशा प्रकारच्या अत्यावश्यक परिचर्चेचा प्रारंभ करून देण्याचे कार्य जर या प्रकाशनाच्या द्वारा झाले तर 'जानकी प्रकाशनाला'ला हे प्रयत्न सार्थकी लागले असे समाधान मिळेल.

अर्थात हा ग्रंथ म्हणजे समग्र प्रबंध नव्हे तर विविध निमित्तांनी दिलेल्या व्याख्यानांचा व लिहिलेल्या लेखांचा संग्रह असल्याने त्यात काही अटळ पुनरुक्ती आहे हे समजून घेतले पाहिजे. अशाप्रकारच्या पुस्तकाच्या प्रकाशनाला अनुमती देण्यास श्री. ठेंगडीजी अतिशयच अनुत्सुक होते. माझ्या सतत आग्रहामुळेच त्यांनी या गोष्टीला संमती दिली हा मी माझा सन्मानच समजतो. माझ्याबद्दलच्या आत्मीयतेचे हे द्योतक आहे.

या पुस्तकासाठी सर्व साहित्य उपलब्ध करून दिल्याबद्दल श्री. रामदास पांडे यांचा मी ऋणी आहे. त्याचप्रमाणे सियाराम प्रिंटर्सचे श्री. योगेंद्र पहवा यांनी मुद्रणाची जबाबदारी घेतल्याबद्दल व श्री. अतुल रावत यांनी मुद्रिते तपासल्याबद्दल मी दोघांचाही ऋणी आहे.

वर्ष प्रतिपदा
विक्रत संवत २०५२
१ एप्रिल १९९५.

भानुप्रताप शुक्ल

या अनुसर्जनाविषयी थोडेसे

राष्ट्रीय पुनर्निर्माणाच्या अनुषंगाने माननीय श्री. दत्तोपंत ठेंगडी यांच्या सतत सुरू असलेल्या चिंतनातील, त्यांच्या *'Third Way'* या ग्रंथात व्यक्त झालेला आशय या ठिकाणी मराठीत सादर करताना मला आनंद होत आहे.

मूळ ग्रंथाच्या पहिल्या आवृत्तीचे देशातील, पूर्वग्रहविरहित बौद्धिक सचोटी असणाऱ्या विचारवंतांच्या वर्तुळात चांगल्या प्रमाणात स्वागत झाले व आता त्याची दुसरी आवृत्तीही काहीशा सुधारित स्वरूपात प्रकाशित होण्याच्या मार्गावर आहे.

मूळ ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे, साम्यवादाच्या अपयशानंतर व भांडवलशाहीचीही त्याच मार्गावरील अधोगती वेगवान झाल्यावर गेल्या काही दशकांत एकूणच जगात 'तिसऱ्या पर्याया'चा शोध जारी आहे. अशावेळी या अतिप्राचीन हिंदू समाजाने अनादी कालापासून विकसित केलेल्या आपल्या कालजयी संस्कृतीच्या चिरसनातन चैतन्याच्या प्रकाशातच, आज सांस्कृतिक अराजकाच्या अवस्थेत भोवंडत राहिलेल्या संत्रस्त मानवतेला हा तिसरा- खरे तर एकमेव- पर्याय गवसू शकेल अशी श्री. दत्तोपंत ठेंगडींची अढळ श्रद्धा आहे. त्यानुसारच त्यांनी अनेक निमित्तांनी आपल्या राष्ट्रीय पुनर्निर्माणाचा युगानुकूल दिशावेध वेळोवेळी मांडला आहे. *Third Way* हा ग्रंथ म्हणजे अशाच काही निमित्तांनी लिहिल्या गेलेल्या लेखांतून व दिल्या गेलेल्या भाषणांतून व्यक्त झालेल्या शाश्वत, वैश्विक सूत्रांचा संग्रह आहे.

रा. स्व. संघाचे प्रचारक, भारतीय मजदूर संघाचे संस्थापक असे श्री. दत्तोपंत ठेंगडी यांचे नाव आज संघाच्या बाहेरील वर्तुळातही फारसे अपरिचित राहिलेले नाही. कोणत्याही सेंद्रिय जीवमान संघटनेच्या विकसनाबरोबर तिच्या कार्याला नवे नवे धुमारे अटळपणे फुटत असतातच. संघकार्याबाबतीतही हाच अनुभव येतो. एकापरी मूळ बीजरूप संकल्पनेचेचं हे प्रगत उन्मीलन आहे. (Progressive unfoldment) अशा विकसनातून संघकार्याचे आज एक बहुआयामी विराट रूप या समाजात विविध यंत्रणांच्या द्वारा कार्यरत आहे. अशा अनेक मितींच्या यंत्रणांचे संस्थारूप गठण, प्रकटीकरण व त्यांच्या राबवणुकीसाठी आवश्यक ते सुकाणूरूप सिद्धांतन करण्यात श्री. ठेंगडीजींचा फार मोठा वाटा आहे. पौगंडावस्थेनंतरच्याच अवस्थेपासून आजतागायत प्रत्यक्ष तलस्पर्शी कार्यक्षेत्रात अखंड क्रियाशील राहिल्याने त्यांच्या मर्मग्राही तत्त्वचिंतनाला प्रत्यक्ष सामाजिक वास्तवाचे अटळ भान आहे. त्यामुळेच 'पाय जमिनीवर असलेले आदर्शवादी' म्हणूनच ते संघ वर्तुळात व बाहेरही आज मानले जातात. त्यामुळेच

त्यांचा सत्याचा शोध म्हणजे केवळ 'कालोचित ठाम समर्थनीयतेचाच'* शोध आहे हे लक्षात घेतले पाहिजे. सदैव विस्तारत जाणाऱ्या सत्यप्रतीतीच्या क्षितिजांची जाणीव असल्यामुळे आपला शब्द हा अखेरचा शब्द आहे असा कोणाही तत्त्वचिंतकाचा दावा असू नये. एकतर तत्त्व - चिंतनाच्या क्षेत्रात 'अखेरचा शब्द' असे काही तत्त्वत:च असू शकत नाही, याची त्याला जाणीव असते व एकूण मानवी जीवनातील विचारविश्वाची अथांगता व अनंत, कधी न संपणारी अंगभूत अशी सत्यशोधनाची भूक व क्षमता यांचीही त्याला जाणीव असते. त्यामुळे आपल्याला गवसलेले तेच अंतिम सत्य आहे, अशा प्रकारचा दावा त्याच्या विनम्र वृत्तीला मानवत नाही. येथेही असा दावा नाही. शिवाय श्री. दत्तोपंत ठेंगडींचा अशा प्रकारच्या कोणत्याही पूर्वसिद्ध अशा आराखड्याच्या ** संकल्पनेलाच विरोध आहे. त्यामुळेच येथे मांडलेले सत्य हे केवळ 'कालोचित ठाम समर्थनीयते'च्या स्वरूपातीलच आहे.

त्या दृष्टीने प्रस्तुत लिखाणामुळे राष्ट्रीय पुनर्निर्माणाच्या दृष्टीने सामाजिक जीवनाच्या विविध क्षेत्रांतील युगानुकूल प्रमेय-बांधणी व कार्यवाहीरूप प्रात्यक्षिक यांच्यासंबंधी राष्ट्रीय परिचर्चा सुरू व्हावी व या कार्यवाहीच्या व्यवस्थांचे, यंत्रणांचे तत्त्वशील अशा काही विषयांवरील परिचर्चेतून सिद्ध व्हावेच एवढीच अपेक्षा आहे. मा. ठेंगडीजींच्या चिंतनातून व्यक्त होणाऱ्या हिंदू जीवनदर्शनाचे एक निष्ठावान अभ्यासक आणि त्यामुळेच त्यांच्या बऱ्याच ग्रंथांच्या संपादनाचे श्रेय ज्यांच्या गाठी आहे असे *Third Way* या मूळ ग्रंथाचे मान्यवर संपादक श्री. भानुप्रताप शुक्ल यांनी मूळ ग्रंथाच्या प्रस्तावनेत एवढीच अपेक्षा व्यक्त केली आहे. या दृष्टीने गेल्या दोन वर्षांत विविध पातळींवर व विविध निमित्तांनी या पुस्तकातील काही विषयांवर सर्जनशील चिंतन सुरूही झाले आहे.

श्री. भानुप्रताप शुक्ल यांनी प्रस्तावनेत स्पष्ट केल्याप्रमाणे मूळ ग्रंथ हा काही एकात्म ग्रंथ नाही. त्यामध्ये अनेक निमित्तांनी दिलेल्या भाषणांचा व लिहिलेल्या लेखांचा संग्रह आहे आणि या भाषणांचा व लेखांचा एकूण कालखंडही साधारणत: १९७६ ते १९९५ असा प्रदीर्घ पल्ल्याचा आहे. निमित्तेही विविध आहेत. त्यामुळे अशा सर्व लिखाणाचा 'Third Way' 'तिसरा पर्याय' या सूत्राखाली एकात्म ग्रंथ सिद्ध करणे ही मुळात अवघडच गोष्ट होती. श्री. दत्तोपंत ठेंगडीही अशा ग्रंथाच्या प्रकाशनाला संमती देण्याला अतिशयच अनुत्सुक होते, हेही संपादकांनी आपल्या प्रस्तावनेत स्पष्ट केले आहे.

श्री. ठेंगडीजींची परवानगी घेऊन मूळ ग्रंथाचे मराठीकरण करण्याच्या दृष्टीने मी पुन्हा वाचायला प्रारंभ केल्यानंतर मलाही ही गोष्ट पुन्हा पुन्हा प्रकर्षाने जाणवत

---

* पहा - तिसऱ्या पर्यायाची संदर्भ चौकट. हिंदू जीवनसृष्टी. पृ. ५१-५२.

** पहा- हिंदू दिशावेध. पृ. ४२-४३.

राहिली व या संदर्भात प्रत्यक्षात झालेल्या बोलण्यात श्री. ठेंगडीजींनी हे स्पष्ट केले की केवळ श्री. भानुप्रताप शुक्ल व श्री. ब्रजकिशोर शर्मा यांच्या सातत्याच्या अतीव आग्रहामुळेच त्यांनी नाइलाजाने या प्रकारच्या संग्रहाच्या निर्मितीला संमती दिली.

श्री. दत्तोपंत ठेंगडींच्या नेहमीच्या चिंतनातील विषयच विविध निमित्तांनी येथे व्यक्त झालेले असल्यामुळे मूळ पुस्तक वाचताना त्यात अटळ पुनरुक्ती जाणवत राहते. ही पुनरुक्ती केवळ मुद्यांचीच आहे असे नाही तर काही अवतरणे व संदर्भ हेही विभिन्न निमित्तांनी पुन्हा पुन्हा आले आहेत. त्यामुळेच 'तिसरा पर्याय' या शीर्षकाखाली या सर्व लिखाणाचे सरळ, थेट भाषांतर करावे ही कल्पना मला भावली नाही. कारण या सूत्राच्या अनुषंगाने आहे त्या स्वरूपात या ग्रंथातील एकूण विचारधनाचे एकात्म स्वरूप पुरेशा प्रमाणात सिद्ध होणे शक्य नव्हते व पुस्तकाच्या मूळ हेतूच्या दृष्टीने पुरेसे फलदायीही होण्याची शक्यता नव्हती असे वाटले. त्यामुळे भाषांतराच्या शिस्तीत या लिखाणाचे थेट भाषांतर न करता, व्यक्त झालेल्या विचारधनाचे विषयवारीने सलग संकलन करून शीर्षकाच्या सूत्रात या सर्व आशयाची पुनर्मांडणी करावी व हा सर्व विचारव्यूह एक विविधांगी पण एकात्म ग्रंथ म्हणून मराठी वाचकांसमोर ठेवावा अशी कल्पना मनात आली.

हे काम अर्थातच सोपे तर नव्हतेच, पण अत्यंत जिकिरीचे, वेळखाऊ व शिवाय फार मोठ्या जोखमीचेही होते, याची मला कल्पना होती. कारण मा. दत्तोपंतांसारख्या विचारवंतांचे विचार कुठलाही विपर्यास होऊ न देता मुळाबरहुकुम मराठी वाचकांपर्यंत पोचविणे ही फार मोठी जबाबदारी होती. एवढ्या मोठ्या कामाला माझ्यासारख्याने हात घालणे हे अतिरिक्त व कदाचित अवास्तव महत्त्वाकांक्षेचे तर ठरणार नाही ना हीही शंका मनाला त्रास देत होती.

पण याहीपेक्षा मानसिक संकोचाची दुसरीच बाब मनाला अधिक जाचू लागली. ती म्हणजे माझी कल्पना श्री. दत्तोपंतांना कितपत योग्य वाटेल ?

सुदैवाने, त्यांच्याशी झालेल्या या संबंधीच्या बोलण्यात त्यांनी मूळ ग्रंथाच्या निर्मितीची, वर स्पष्ट केलेली पार्श्वभूमी सांगितली. त्यामुळे या पुस्तकातील एकूण विचाराच्या एकात्म मांडणीच्या कल्पनेचे त्यांनी मोकळेपणाने स्वागत केले.

या त्यांच्या अत्यंत प्रोत्साहक प्रतिक्रियेमुळे माझ्या मनातील कल्पनेबद्दलचे सर्व संदेह दूर झाले व मी कामाला लागलो.

या ग्रंथातील सर्व साहित्यातून प्रामुख्याने दोन विषय आलेले आहेत.

१) पश्चिमी इहवादी विकास संकल्पना व आनुषंगिक आर्थिक चिंतन आणि त्यानुसार व्यवस्थात्मक रचना व नीती आणि या पार्श्वभूमीवर हिंदू जीवनदृष्टीला अभिप्रेत असलेली एकात्म विकास संकल्पना व आनुषंगिक आर्थिक नीती व रचना यांच्या युगानुकूल वेधलक्ष्यी मांडणीकडे केलेला अंगुली निर्देश आणि या सर्व संदर्भांच्या कक्षेत समाविष्ट होऊ शकणारे, अनेक निमित्तांनी मांडले गेलेले सर्व विषय.

२) राज्यघटना, शासनव्यवस्था, कायदा व न्यायव्यवस्था- पश्चिमी लोकशाहीपद्धती व तिच्या अनुषंगाने पक्षीय रचना व या सर्व पैलूंचा संकल्पनात्मक व व्यवस्थात्मक विचार आणि त्या पार्श्वभूमीवर हिंदू जीवनदृष्टीला अभिप्रेत असलेले या संबंधातील चिंतन, युगानुकूल व्यवस्था- रचनांचे संभाव्य संकेत व विशेषत: जागतिक व्यवस्थेची हिंदू संकल्पना.

या दोन सूत्रांमध्ये संपूर्ण ग्रंथातील वेगवेगळ्या निमित्तांनी व वेगवेगळ्या काळात लिहिल्या वा बोलल्या गेलेल्या विषयांचे संकलन करताना हे जाणवू लागले की या समग्र विचारव्यूहाला हिंदू जीवनदृष्टीची आधारभूत अशी अटळ संदर्भ चौकट आहे व हिंदू जीवनप्रणालीतील अनेक संकल्पनात्मक, मूल्यविषयक, व्यवस्थाविषयक सूत्रे त्या त्या विषयाच्या संदर्भात व्यक्त झालेली आहेत. त्यामुळे या ग्रंथातील संपूर्ण चिंतन एकात्म स्वरूपात सिद्ध करावयाचे तर अशा अनेक संदर्भांत विखुरलेल्या स्वरूपात व्यक्त झालेल्या हिंदू जीवनदृष्टीच्या या सूत्रांचे संकलन प्रथम संदर्भचौकट म्हणून मांडणे उचित व आवश्यक ठरेल असे वाटले. अर्थात हिंदू जीवनदृष्टीविषयीचे हे समग्र चिंतन नाही, तर प्रस्तुत विषयापुरतेच सार्थ ठरणारे एवढेच हे दिग्दर्शन आहे ही त्याची मर्यादा! पण अशा प्रकारची संदर्भ चौकट जर विवेचनाला प्रथम लाभली तर पुढील मांडणीला एक सुनिश्चित परिप्रेक्ष्य प्राप्त होईल ही या मागील कल्पना होती. म्हणून अशी सर्व सूत्रे 'संदर्भ चौकट-हिंदू जीवनदृष्टी' या शीर्षकाखाली एकत्र केली आहेत.

त्याचप्रमाणे विकाससंकल्पना व संविधानात्मक व्यवस्था या दोन्ही सूत्रांच्या आधारे संकलन करताना हे लक्षात आले की आजच्या जागतिक वातावरणात भारताच्या विचारसंचितातून मिळणारे तिसऱ्या - म्हणजे खरे तर जवळ जवळ एकमेव वा 'केवल' पर्यायाचे आश्वासक संकेत आजच्या अनेक हिंदू व पश्चिमी विचारवंतांना अटळतेने जाणवत आहेत. मूळ ग्रंथातील अशा प्रकारच्या विखुरलेल्या उल्लेखांच्या संकलनाने या संपूर्ण विचारव्यूहाच्या मांडणीला एक सुनिश्चित टोक प्राप्त होईल. म्हणून शेवटच्या भागात हे संकलन 'तिसऱ्या पर्यायाचा अटळ वेध' या नावाने केले आहे.

मूळ पुस्तकात प्रत्यक्ष या सर्व विषयांचे उद्घाटनच एका अर्थाने 'The Hindu Approach' या पहिल्या भागात व विषयाचा उपसंहार 'Reach for Param Vaibhavam' या शेवटच्या भागात आलेला असल्यामुळे हे दोन भाग सर्व संकलनाच्या आदिअंती आहेत त्या स्थितीतच ठेवावेत असे ठरवून त्यांचे मात्र थेट भाषांतर करण्याचा प्रयत्न केला आहे.

(मूळ पुस्तकात नसलेले पण मा. ठेंगडीजींनी तोंडी सांगितलेले दोन भाग विषयसूत्राच्या संगतीत बसविले आहेत. १) ब्रिटिशांच्या राजकीय संविधानात्मक सत्त्वाचा विकासक्रम व २) पंडित नेहरूंनी प्रतिपादिलेले भौतिक विकासप्रक्रियेतील धर्ममूल्याचे महत्त्व.

त्यामुळे मूळ ग्रंथाचे हे मराठी पूर्णरूप येथे एकूण ६ भागांत सिद्ध झालेले आहे.

(या सूत्राशी संबंध नसलेले मूळ ग्रंथातील तीन भाग On Revolution, Anti Communalism X rayed व A Hindu Ideologue' हे पूर्णत: गाळले आहेत.)

या सर्व संकलनाच्या विशिष्ट सूत्रात बसविता न येण्यासारख्या अशा त्या त्या लेखातील व भाषणातील काही नैमित्तिक व अन्यही उल्लेखांचे भाषांतर स्वतंत्रपणे परिशिष्ट २ मध्ये दिले आहे.

मूळ आशयाला धक्का न लावता, मूळ भाषेचे आणि अभिव्यक्तीचे वळण व रोख आणि वजन व पोत कायम ठेवून सिद्ध झालेले हे रूप आहे. अर्थातच हे करीत असताना या संपूर्ण विचारव्यूहातील अनेक निमित्तांनी व वेगवेगळ्या वेळी व्यक्त झालेले विषय एकात्मतेने, सुसंगत रीतीने जोडण्यासाठी, त्यात आवश्यक ती सुसूत्रता आणण्यासाठी व वैचारिक सूत्राचा तर्कशुद्ध क्रमविकास स्पष्ट होण्यासाठी काही शब्द, काही वाक्यार्ध वा वाक्ये, वा काही ओळींचे छोटे परिच्छेद त्यात समाविष्ट करावे लागले आहेत. त्याचप्रमाणे ग्रंथाच्या हेतूशी सुसंगत असा, मूळ ग्रंथातील विचारांचा क्रम ठेवण्यासाठीही काही बदल करावे लागले आहेत.

मात्र ही प्रक्रिया साधताना, एखाद्या भरजरी पैठणीला एखाद्या जुनेऱ्याचे ठिगळ जोडले आहे असे वाटू नये असा माझ्या परीने मी कसोशीने प्रयत्न केला आहे.

अर्थात मूळ ग्रंथातील प्रत्यक्ष विषयसूत्रांच्या अनुषंगाने आलेले सर्व विचार जसेच्या तसेच भाषांतरित केलेले आहेत. त्याठिकाणी रूढ अर्थाच्या भाषांतराची शिस्त सर्वतोपरी पाळण्याचा कसोशीने प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे या सर्व मराठी रूपबंधात माझे म्हणून जे काही आहे ते केवळ वर उल्लेखलेले असे काही फुटकळ सांधेजोडीच्या स्वरूपातील आहे तेवढेच आहे. बाकी सर्व मुळातील विचारधन जसेच्या तसे मराठी वाचकांपर्यंत पोचविण्याचा नैष्ठिक प्रयत्न या ठिकाणी केलेला आहे.

त्या दृष्टीने पाहता प्रारंभी म्हटल्याप्रमाणे रूढ अर्थाने हे भाषांतर नाहीच पण स्वैर रूपांतर वा अनुवाद या सारख्या पारंपरिक शब्दांनी व्यक्त होणारी अशीही ही प्रक्रिया नाही. मराठीकरणाच्या या विशिष्ट प्रक्रियेमुळे या प्रकाराला नाव काय द्यावे असा प्रश्न माझ्यापुढे होता. कारण हे केवळ भाषांतर वा अनुवाद नाही, स्वैर रूपांतरही नाही. प्रचलित कोणत्याही प्रकारात बसणारी ही प्रक्रिया नाही अशी कोणी कदाचित टीका केली तर त्यात वावगे काहीच नाही. पण प्रस्तुत पुस्तकाच्या रूपबंधाची माझी कल्पना ऐकल्यावर श्री. ठेंगडीजींनी इंग्रजीत नव्याने प्रचलित होऊ पाहणाऱ्या, 'Trans-Creation' अशा शब्दाचा उल्लेख केला होता. तो मनात धरून मी मराठीकरणाच्या या प्रकाराला 'अनुसर्जन' अशा नावाने संबोधत आहे.

भाषांतर-अनुवादाच्या प्रक्रियेत नेहमीच जाणवणारी एक अडचण म्हणजे काही शब्द, संज्ञा यांचे नेटके भाषांतर होऊ शकत नाही. कारण शब्द वा संज्ञा या विशिष्ट अनुभवातून सिद्ध होतात व त्या अनुभवाला त्या त्या भाषिक समाजाच्या

सांस्कृतिक पर्यावरणाची पार्श्वभूमी असते. उदाहरणार्थ El-Dorado ही संज्ञा विशिष्ट सांस्कृतिक, ऐतिहासिक संदर्भातून आलेली आहे. अशा संज्ञांचे स्थूल अर्थ विषयाच्या अंगात वर्णनरूपाने देऊन संदर्भ-टीपांमध्ये त्यांचे स्पष्टीकरण दिलेले आहे. अशा प्रकारचे लिखाण वाचायला प्रवृत्त होणाऱ्या वाचकांना सर्व साधारणपणे अशा बऱ्याच संज्ञांचा परिचय असू शकेल पण कदाचित कोणाला तो नसला तर अर्थ व संदर्भ पुरेसा स्पष्ट व्हावा असा या टीपांमागील हेतू आहे.

त्याचप्रमाणे काही इंग्रजी संज्ञांचे भाषांतर क्वचित फार प्रचलित न झालेल्या मराठी शब्दांमध्ये दिले आहे. हे मराठी शब्द मराठी वाचकांनाच अपरिचित असण्याची शक्यता गृहीत धरून नाईलाजाने मूळ इंग्रजी संज्ञा लगोलग कंसात दिल्या आहेत. आपल्या समाजावरील इंग्रजी भाषेच्या अटळ प्रभावातून निर्माण झालेल्या वास्तवाशी केलेली ही तडजोड आहे. कारण कोणत्याही विवेचनाचा हेतू हा, मांडावयाचा विषय वाचकांपर्यंत पोचविणे हाच असतो. त्यामुळे या ठिकाणच्या मराठीकरणाच्या प्रयोगातही मराठीचा अवास्तव आग्रह धरलेला नाही.

मूळातील इंग्रजी अवतरणाचे शब्दशः भाषांतर देण्याचा प्रयत्न आहेत; पण अधिक जिज्ञासू वाचकाला आवश्यक वाटल्यास मूळ इंग्रजी अवतरणही उपलब्ध असावे म्हणून प्रत्येक अवतरणाच्या मराठी भाषांतराच्या पाठोपाठ कंसात मूळ इंग्रजी अवतरणही दिले आहे.

या पुस्तकात अनेक संस्था, संघटना, योजना, करार इ. च्या नावांची लघुरूपे आलेली आहेत. त्यांचे आवश्यक असे थोडे स्पष्टीकरण देऊन पूर्ण नावे परिशिष्ट १ मध्ये दिलेली आहेत.

याही व्यतिरिक्त काही आवश्यक स्पष्टीकरणे व संदर्भ जरूर तेथे तळटीपेतही दिलेले आहेत.

अशा प्रकारचे लिखाण वाचायला प्रवृत्त होणाऱ्या वाचकाच्या ठिकाणी अशा तात्त्विक वाचनाची एक कमीत कमी पार्श्वभूमी गृहीत धरावी लागते. विषय बऱ्याच प्रमाणात तत्त्वचिंतनात्मक असल्याने, सिद्धान्तनाला योग्य अशी तात्त्विक शब्दप्रणाली व मांडणी काही ठिकाणी तरी अटळ असते. श्री. दत्तोपंतांची भाषाही काही प्रमाणात अशीच आहे. येथे मूळ पुस्तकातील आशयाचे मराठी रूप सिद्ध करणे हा सर्वतोपरी प्रयत्न असल्याचे मूळ शब्दप्रणालीचे व अभिव्यक्तीचे वजन व पोत कायम ठेवण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न केला आहे असे वर म्हटले आहे. परंतु इंग्रजी व मराठी भाषांमधील अभिव्यक्तिप्रक्रियेतील मूलभूत स्वाभाविक फरकामुळे भाषांतर केवळ रोकड्या तांत्रिक पद्धतीने करणे योग्य ठरले नसतेच. त्याचप्रमाणे अशा विशिष्ट परिभाषेशी फारशा परिचित नसलेल्या मराठी वाचकांपर्यंतही हा विषय शक्यतो पोचावा ही अपेक्षा असल्याने मूळ लिखाणाच्या हेतूला व आशयाला धक्का न लावता, पण मराठीच्या प्रकृतीचे भान ठेवून विषय जास्तीत जास्त सुलभतेने समजेल अशा पद्धतीने

येथे प्रयत्न केलेला आहे.

विविध नैमित्तिक भाषणे व लेख यांचा संग्रह हे मूळ ग्रंथाचे स्वरूप आधी स्पष्ट केलेले आहेच. त्याचबरोबर आपल्याला गवसलेले सत्य हाच तत्त्वचिंतनातील 'अखेरचा शब्द' अशी कोणाही तत्त्वचिंतकाची भूमिका नसते याचाही उल्लेख पूर्वी केलेला आहे. आपल्या ऋषीमुनींनी सांगितलेले सच्च्या, शुद्ध बुद्धिवादाचे 'बुद्धे फलं अनाग्रहः।' - झापडबंद पोथीनिष्ठेचा अभाव - असे जे लक्षण सांगितले आहे त्याचा उल्लेख श्री. दत्तोपंत ठेंगडी यांनी, *The Hindu Economics* या ग्रंथाचे लेखक डॉ. बोकरे यांच्या संदर्भात त्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत केलेला आहे. श्री. दत्तोपंत ठेंगडी स्वतःही याच बौद्धिक सचोटीतून नव्या नव्या सत्यप्रतीतीच्या संदर्भात स्वागतशील असतात. म्हणून, उदाहरणार्थ ख्रिस्ती व मुस्लिम समाजांतील आधुनिक अर्थवेत्त्यांनी चालविलेले ख्रिस्ती अर्थशास्त्र व मुस्लिम अर्थशास्त्र विकसित करण्याचे प्रयत्न, युगोस्लाव्हियात झालेला आर्थिक नीतीचा अनोखा प्रयोग यांचा ते काहीसा गौरव करतात. विशेषतः इस्लामी अर्थशास्त्रातील व्याजरहित अर्थव्यवस्थेचा आपल्याकडे सखोल अभ्यास झाला पाहिजे असे ते मोकळेपणाने सहज म्हणू शकतात.

एका बाजूला सर्व जगातील विचारवंतांचा व मनमोकळ्या बौद्धिक सचोटीने नव्या विचारांचे स्वागत करणाऱ्या तत्त्वचिंतकांचा - हिंदुत्वाबद्दलचे नवे कुतुहल, नवी आस्था येथपासून ते हिंदुत्वाच्या विचारसरणीचा स्वीकार, पुरस्कार, अनुसर, निश्चयात्मक धारणा, श्रद्धायुक्त बुद्धिनिष्ठा येथपर्यंत प्रवास सुरू झालेला दिसतो. दुसरीकडे आपल्या देशातील, स्वतःला पुरोगामी विचारवंत म्हणविणाऱ्या तथाकथित बुद्धिवंतांच्या पोथीनिष्ठेला मात्र अजूनही जाग येऊ शकत नाही, त्याचप्रमाणे स्वतःला राष्ट्रवादी म्हणविणाऱ्या सत्तावादी राजकीय नेतृत्वाची तळी उचलणाऱ्या विचारवंतांमध्येही या पश्चिमाळलेल्या बुद्धिवंतांची री ओढण्याची संमोहित वृत्ती दिसून येत आहे. त्यांना मानवतेसमोरील २१ व्या शतकातील भीषण निर्वाणीच्या अवस्थेबद्दल व त्यातून उद्भवणाऱ्या भारताच्या घनदाट धूसर भवितव्याबद्दल पुरेशी गंभीर जाणीव दिसत नाही. त्यामुळेच अशा स्वकीय विचारवंतांना व नेतृत्वालाही सतर्क करण्याची प्राथमिक आवश्यकता आहे असेच कोणीही सच्च्या देशहितैषी तत्त्वचिंतकाला जाणवत राहणे स्वाभाविक आहे. कारण अशावेळी परिवर्तनाची आपल्या घरापासूनच सुरुवात करावी लागते. आमचीच विचारशक्ती क्षीण झाली, क्रियाशील इच्छाशक्ती पांगळी झाली तर आम्ही जगाला कोणताही विचार देऊ शकणार नाही. मूळ पुस्तकातील अनेक निमित्तांनी व्यक्त झालेले विचार प्राधान्याने स्वकीयांसाठीच आहेत. कारण वैचारिक परिवर्तनासाठी प्रारंभिक लक्ष्यगट तोच आहे. पण अशांपैकी बऱ्याच जणांच्या परभृत वृत्तीबद्दल सात्त्विक उद्वेगाचा भाव कोणाही देशहितैषी तत्त्वचिंतकाच्या मनात उभा राहणेही स्वाभाविक आहे. आपल्या पारंपरिक शाश्वत जीवनमूल्यांबद्दलच्या सश्रद्ध निश्चयात्मक बुद्धीमुळे श्री. ठेंगडीजींसारख्या अनाग्रही बुद्धिनिष्ठाच्या वैखरीलाही

अशाच सात्त्विक उद्‌वेगाच्या भावनेतून क्वचित काहीसा विखार प्राप्त होतो. कोमल हृदयी, ऋजुस्वभावी कविवृत्तीच्या तत्त्वचिंतक गुरुदेव टागोरांनी, स्वकीयांच्या सुस्त परभृत वृत्तीचा ज्या तीव्रतेने निषेध केला आहे*, त्याच प्रकारची ही तीव्रता आहे. अशा परभृत वृत्तीला जाग आणण्यासाठी अशी तिखट जीभ काही प्रमाणात आवश्यक असतेच. त्यातही मूळ पुस्तकातील बहुतेक साहित्य हे नैमित्तिक भाषणांच्या व क्वचित वृत्तपत्रीय लिखाणाच्या स्वरूपातील असल्यामुळे असे होणे थोडेफार स्वाभाविकही होते. प्रस्तुत मराठी एकात्म रूपात या बाबतीतील तीव्रता काही प्रमाणात तरी कमी करण्याचा प्रयत्न मी केला आहे. तरीही अशा प्रकारच्या तत्त्वचिंतनात्मक लिखाणामधील असा काही तीव्र सूर काही वाचकांना अयोग्य वाटण्याची शक्यता आहे. पण ज्यांच्या संबंधात असा सूर उमटलेला आहे त्या, झोपेचे केवळ सोंग घेतलेल्यांसाठी यापेक्षा दुसरी कोणती शब्दप्रणाली उपयोगी ठरावी ?

वर हे स्पष्ट केले आहे की मूळ ग्रंथातील लिखाण नैमित्तिक व संकीर्ण असल्यामुळे व श्री. ठेंगडीजींची भूमिकाही समग्र पूर्वसिद्ध आराखडा मांडण्याची नसल्यामुळे मूळ ग्रंथातील विवेचनाला 'कालोचित ठाम समर्थनीयते'चेच स्वरूप असणे अटळ होते. मूळ पुस्तकातील पहिल्या भागाच्या - 'दिशावेध प्रारूपा'च्या (Approach Paper) शेवटच्या भागातही हाच ध्वनी आहे. १९२५ सालीच समोर उभ्या राहिलेल्या ध्येयदर्शनाची विविध अंगे साकार करण्याची आवश्यकता आहे असे तेथे म्हटले आहे. ग्रंथाचा हेतूही केवळ या विषयांवरील राष्ट्रीय परिचर्चा सुरू व्हावी एवढाच मर्यादित होता हेही पूर्वी स्पष्ट केले आहे.

वस्तुस्थितीच्या या सर्व मर्यादेमुळे क्वचित असे मात्र जाणवते की मूळ ग्रंथातील विवेचनाला, आहे त्या स्वरूपात, नेमके अग्र प्राप्त होत नाही. केवळ दिशादर्शन किंवा अंतिक सत्याच्या प्रतीतीकडे केवळ अंगुलीनिर्देश असे त्याचे स्वरूप आहे. त्यामुळेच ग्रंथाच्या, 'Third Way' या केवळ शीर्षकामुळेच कोणा सामान्य वाचकाच्या वा विचारवंत म्हणून गणल्या गेलेल्या प्रतिष्ठित वाचकाच्याही मनात, 'या ग्रंथात तर निश्चित असे काहीच सांगितलेले नाही' किंवा 'हा केवळ नसता उपद्‌व्याप केला आहे.' असा विचार मनात आला तर तो त्याच्या या ग्रंथासंबंधी अकारण निर्माण झालेल्या अतिरिक्त अपेक्षांचाच केवळ परिणाम आहे येवढेच म्हणता येईल. या ग्रंथातील विवेचनाच्या स्वरूपाबद्दलची ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन प्रस्तुत 'अनुसर्जना'ला, 'तिसऱ्या पर्यायाकडे' हे शीर्षक दिले आहे.

कोणत्याही ग्रंथाची फलनिष्पत्ती ही त्याच्या प्रयोजनविषयक भूमिकेच्या निकषावर तोलावी लागते. त्यादृष्टीने हिंदू जीवनदृष्टीच्या सार्थतेबद्दल व युगानुकूल उपयुक्ततेबद्दल

---

* पहा - 'भौतिक विकास संकल्पनेच्या अनुषंगाने' - या भागातील रवींद्रनाथ टागोरांचे अवतरण पृ. ७८.

देशात विचारमंथन प्रवर्तित करणे हे या विवेचनाचे प्रयोजन पूर्वीच पाहिले आहे. तसे विचारमंथन सुरू होण्यास बाध्य करण्यासारखी तथ्ये या कालजयी जीवनदृष्टीत आहेत ही धारणा या विवेचनामागे आहे. त्यामुळे येवढी जाणीव निर्माण करणे आणि 'तुझे आहे तुजपाशी' या भानापासून तुटलेल्या स्वकीय समाजात एक आत्मसन्मानाची, आत्मविश्वासाची चेतना निर्माण करणे हे या विवेचनाचे अपेक्षित फळ आहे. येवढे कार्य प्रांथमिक स्वरूपात या ग्रंथाने निश्चितच साध्य होईल ही किमान अपेक्षा आहे.

त्या दृष्टीने मूळ ग्रंथातील विचारव्यूहाचा मराठी वाचकाला जेवढा जास्तीत जास्त थेट, समग्र व एकात्म परिचय करून देता येईल तेवढा करून देण्याचा नम्र प्रयत्न येथे केलेला आहे.

हा हेतू सफल झाला की नाही ते वाचकांनीच ठरवावयाचे आहे.

चंद्रविजय,
मुलुंड पूर्व,
मुंबई - ४०००८१.

बापू केंदूरकर

डॉ. मधुकर पुरूषोत्तम (बापू) केंदूरकर
एम्. ए. पीएच्. डी.
निवृत्त प्राध्यापक

'श्री. म. माटे, व्यक्ती आणि वाङ्मय' या विषयावर पीएच्. डी.
बालपणापासून संघस्वयंसेवक
अ. भा विद्यार्थी परिषदेमध्ये २५ वर्षे विविध जबाबदाऱ्या.
सामाजिक समरसता मंच, स्वदेशी जागरण मंच अशा संस्थांमध्ये सहभाग.
सामाजिक, सांस्कृतिक विषयांवर फुटकळ लेखन.

माझे दोन शब्द

Third Way या पुस्तकाचा हा मराठी रूपबंध आज प्रकाशित होत आहे याचा मला अतिशय आनंद होत आहे.

साम्यवाद व भांडवलवाद या दोन्हींच्या दारुण अपयशाची वाढती चिन्हे गेल्या काही दशकांत दिसू लागलीच होती व तेव्हापासूनच संभ्रमाच्या धूसरतेत जगातील सर्वच समाज नव्या मार्गासाठी चाचपडत आहेत. अशावेळी हिंदूंच्या कालजयी संस्कृतीचा शाश्वत असा अंतस्थ प्रकाशस्रोतच हताश मानवतेला तिसरा मार्ग दाखविणार आहे हा आमचा विश्वास आहे.

Third Way मधील साहित्य प्रथम प्रकाशित झाले त्यावेळेपेक्षाही अधिक प्रमाणात हा विश्वास येथील समाजात दृढ होणे ही काळाची निकड आहे. त्यादृष्टीने हे पुस्तक मराठी भाषेत रूपांतरित होणे ही गोष्ट अतिशय समयोचित ठरते.

कारण पुष्कळदा विषयाची मांडणी इंग्रजीत असल्याने विषय आवश्यक त्या पद्धतीने सर्वदूर पोचत नाही. त्या दृष्टीने विषय प्रादेशिक भाषेत व्यक्त होणे आवश्यक असते. लेखकाला दरवेळी ते जमतेच असे नाही. त्यातही *Third Way* या पुस्तकातील अनेक लेख इंग्रजी नियतकालिकांसाठी लिहिलेले आहेत. त्यात आलेली व्याख्यानेही विविध संघटनांच्या विशिष्ट कार्यकर्ता-समुदायांसमोर वा श्रोतृवर्गांसमोर दिली गेल्याने त्या त्या वेळच्या आवश्यकतेनुसार विषय इंग्रजीतच मांडले गेले आहेत; पण एकूण सर्वच विषय राष्ट्रीय पुनर्रचनेच्या दृष्टीने सार्वत्रिक व सार्वकालीन महत्त्वाचे आहेत म्हणून ते मराठी वाचकांनाही उपलब्ध होणे आवश्यक होते.

सुदैवाने हे काम करण्याची जबाबदारी स्वत:हून श्री. बापू केंदूरकर यांनी उचलली. हे करीत असताना मूळ पुस्तकातील, अनेक निमित्तांनी व विविध प्रकारच्या श्रोत्यांना व वाचकांना अनुलक्षून व्यक्त झालेले विचार त्यांनी अपार प्रयत्न करून मर्मग्राही योजकतेने एकात्म सूत्रात मांडण्याचा यशस्वी प्रयोग केला आहे.

अनुसर्जन (trans-creation) हे कार्य सरळ भाषांतरपेक्षा कितीतरी कठीण आहे. श्री. केंदूरकरांनी केलेल्या अनुसर्जनामुळे मूळ प्रतिपादनाची स्पष्टता, सुगमता व रचनासौंदर्य यात लक्षणीय वृद्धी झाली आहे., त्यामुळे मूळ विषयाचे सुसूत्र आकलन होण्यास मदत होईल असा विश्वास वाटतो. त्यांनी या दृष्टीने योजलेल्या 'अनुसर्जना'च्या पद्धतीमुळे भाषांतराच्या क्षेत्रातील एक अभिनव प्रयोग सिद्ध झाला असे म्हणण्यास हरकत नाही.

श्री. बापू केंदूरकर यांच्या या अभिनंदनीय प्रयासाबद्दल व्यक्तिश: मी व संस्था या दृष्टीने 'जानकी प्रकाशन', त्यांचे मन:पूर्वक आभारी आहोत.

दत्ता ठेंगडी

माननीय श्री दत्तोपंत ठेंगडी

माननीय श्री दत्तोपंत ठेंगडी (दत्तात्रय बापूराव ठेंगडी) हे नाव आज भारतामध्ये हिंदू जीवनदर्शनाच्या क्षेत्रात फारसे अपरिचित राहिलेले नाही.

भारतीय कालगणनेप्रमाणे दीपावलीच्या दिवशीच (१० नोव्हें. १९२० रोजी) विदर्भातील आर्वी या गावी त्यांचा जन्म झाला. भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या वातावरणात शालेय जीवनात वानरसेनेचे कार्य, महाविद्यालयीन जीवनात सोशॅलिस्ट रिपब्लिकन पार्टीचे स्थानिक नेतृत्व अशा स्वरूपात ते सार्वजनिक कार्यात सहभागी झाले.

त्याचवेळी रा. स्व. संघाच्या संपर्कात येऊन १९४१ मध्ये वकिलीच्या परीक्षेनंतर संघाचे प्रचारक म्हणून आज ५७ वर्षे अव्याहतपणे संघकार्याच्या विविध क्षेत्रांत कार्यरत आहेत.

संघाच्या स्वाभाविक विकासक्रमातील विविध यंत्रणांचे गठण, त्या मागच्या संस्थात्मक व संघटनात्मक रचना व त्यांच्या प्रत्यक्ष कार्यासाठी आवश्यक ते सुकाणूरूप सिद्धान्तन करण्यात श्री. दत्तोपंत ठेंगडींनी बहुमोल वाटा उचलला आहे.

महाविद्यालयीन कालापासूनच साम्यवादी - समाजवादी संघटनांतील कार्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतानाच या देशाच्या सांस्कृतिक सत्त्वातून निर्माण झालेल्या कामगार संघटनेची आवश्यकता त्यांना जाणवत राहिली होती व त्यातूनच आज देशात प्रथम क्रमांकावर असलेल्या भारतीय मजदूर संघाची १९५५ साली स्थापना झाली.

दोन वेळा राज्यसभा सदस्य, संसदीय मंडळांचे सदस्य या नात्याने त्यांनी केलेल्या परदेशातील कामगार संघटनांच्या निरीक्षणातून देशी कामगार संघटना अधिक सक्षम व हेतूपूर्ण होऊ शकली.

या प्रमुख जबाबदारी व्यतिरिक्त सामाजिक समरसता मंच, भारतीय किसान संघ, स्वदेशी जागरण मंच, स्वदेशी सायन्स मूव्हमेंट इ. विविध संस्थांच्या प्रत्यक्ष गठणामध्ये व नित्याच्या कार्यामध्ये मा. दत्तोपंतांचे अधिकांश मार्गदर्शन होत असते.

आणि तरीही येवढ्या दैनंदिन कार्याच्या दबडग्यातही त्यांचे विविध विषयांचे अध्ययन, चिंतन, चालूच असते. त्यामुळेच हिंदू जीवनदृष्टीच्या विविध क्षेत्रांतील प्रात्यक्षिकरूप कार्यवाहीच्या आवश्यक अशा अनेक मितींचे दिशादर्शन त्यांच्या लिखाणातून व व्याख्यानांतून होत रहाते.

□ □ □

हिंदू दिशावेध *

भाग १

अशा 'दिशावेध प्रारूपा'च्या पूर्वअटी

कोणतेही एखादे 'दिशावेध प्रारूप' कोणत्याही काळी व कोणत्याही परिस्थितीत पुरेशा उपयुक्ततेने मांडता येते अशी फारशी शक्यता नसते. त्यासाठी आधीची वैचारिक धूसरता स्वच्छ करणे आवश्यक असते. ज्याप्रमाणे पाणी स्वच्छ, शांत व स्थिर झाल्याशिवाय चंद्रताऱ्यांचे प्रतिबिंब स्पष्ट दिसत नाही, त्याप्रमाणेच समाज मनातील आधीच्या गैरसमजांची वैचारिक, मानसिक जळमटे काढून टाकल्याशिवाय समाजमन अशा प्रकारच्या दिशावेध प्रारूपाच्या स्वागतासाठी तयार होऊ शकत नाही. सामान्य माणसाजवळ तर कोणत्याही तत्त्वप्रणालीच्या वैचारिक आशयाचे सखोल परिशीलन करण्याएवढी उसंत व अनुकूल मानसिकता नसते. त्यामुळे तो घोषणा, वाक्प्रयोग, परिभाषा, झपाटणाऱ्या संज्ञा यांवरच समाधान मानतो व बहुधा त्यामध्ये तो स्वखुषीने वहावूनही जातो.

आणखी एक गोष्ट म्हणजे आपल्या पूर्वीच्या परकीय राज्यकर्त्यांनी व त्यांच्या देशी शागीर्दांनी समाजमानसाच्या अहिंदूकरणाच्या हेतूने, खोडसाळपणाने, पद्धतशीरपणे अनेक मिथ्ये आणि कपोलकल्पित गोष्टी आपल्या समाजमनावर बिंबविण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यापैकी एकेकाचा परिणाम क्षुल्लक असेल, पण सर्वांनी मिळून मात्र हिंदुमानसात अतिशय घातक, गोंधळलेली अवस्था निर्माण करण्यात यश मिळविले आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या सर्व खोट्या प्रणालींवर आघात करून त्या समूळ नाहीशा करणे हे असे 'हिंदू दिशावेध प्रारूप' प्रस्तुत करण्यापूर्वी आवश्यक आहे. कारण अशा मिथ्यांच्या व कल्पितांच्या आहारी गेलेल्यांना कोषगत अर्थही समजणे कठीण आहे. मग त्यातील अभिप्रेत आशय लक्षात येणे तर दूरच!

---

* हे दिशावेध प्रारूप ऑक्टो. १९९२ मध्ये चर्चेसाठी बुद्धिवंतांमध्ये प्रसृत केलेले होते.

उदा. आर्यांच्या तथाकथित आक्रमणाविषयीच्या प्रणालीतील मिथ्याचा दंभस्फोट करणे ही अनिवार्य गोष्ट आहे. पण अर्थातच हे कार्य अशा प्रारूपावरच सोपविणे शक्य नाही. कारण ही गोष्ट अशा कोणत्याही प्रारूपाच्या विहित मर्यादेतील नाही. अशा कार्यासाठी खास करून सिद्ध झालेल्या संस्थांचे ते व्रत ठरते. या दृष्टीने, उदाहरणादाखल, 'बाबासाहेब आपटे इतिहास संकलन समिती' यासारख्या, या दिशेने वेगाने गती घेत असलेल्या संस्थेचा उल्लेख करता येईल.

त्याचप्रमाणे अशा प्रकारच्या कोणत्याही हेतुपूर्ण संवादासाठी अथवा वादासाठी त्यात भाग घेणाऱ्या सर्वजणांच्या मनात, वापरावयाच्या शब्दांच्या अर्थाबद्दल एकच एक निश्चित धारणा असणे आवश्यक असते. जर एकच संज्ञा, वेगवेगळ्या वैचारिक संदर्भांच्या अनुषंगाने कार्यरत असलेल्या वेगवेगळ्या व्यक्तींच्या मनांत वेगवेगळी मानसचित्रे उभी करीत असेल तर हा संवाद अथवा वादचर्चा म्हणजे वैचारिक गोंधळ निर्माण करणारा वेळेचा व शक्तीचा केवळ अपव्ययच ठरतो. व्हॉल्टेअरने म्हटले आहे, 'माझ्याशी बोलण्यापूर्वी प्रथम तुमच्या संज्ञांची व्याख्या करा.' म्हणून सुयोग्य अशा संज्ञांबद्दल समाजाचे लोकशिक्षण करणे ही अशा चर्चेची आवश्यक अशी प्राथमिक पूर्वअट आहे. हे तर खरेच की ही वेळ खाणारी गोष्ट आहे, पण तरीसुद्धा यावर वेळ घालवणेही समर्थनीय ठरते.* भरपूर वेळ व कष्ट घेऊनसुद्धा करण्याची ती अनिवार्य गोष्ट आहे. कारण तिच्याशिवाय अशा विचारप्रक्रियेत एक पाऊलही पुढे जाणे शक्य आणि इष्टही नाही.

तीन देशांचे अपवाद सोडता जागतिक साम्यवाद हा वस्तुत: कोसळलेलाच आहे. पण त्यामुळे फार हुरळून जाण्याची गरज नाही. त्याच्या स्वत:च्याच अंतर्विरोधाच्या ओझ्याव्यतिरिक्त इतर अनेक भर टाकणारे घटक साम्यवादाच्या विलयाला कारणीभूत झालेले आहेत, त्यांची अजून पुरेशी योग्य चिकित्सा झालेली नाही. भांडवलशाहीचाही ऱ्हास होतो आहे, परंतु तिचा पूर्ण विलय लांबणीवर टाकला जात आहे. बहुश्रुतांच्या गोटात तिसऱ्या पर्यायाचा शोध सुरू झाला आहे. पण अत्यल्प प्रमाणातही त्यांच्या प्रयत्नांना यश का आलेले नाही याचीही चिकित्सा होणे प्रथम आवश्यक आहे.

साम्यवादाच्या विलयाची चिन्हे दिसू लागण्यापूर्वीच इस्लामी जगतातील विद्वानांनी पर्यायी व्यवस्था म्हणून इस्लामी अर्थशास्त्र विकसित करण्याचा पद्धतशीर प्रयत्न सुरू केला होता. त्या दृष्टीने सौदी अरेबियातील जेडाह, इस्लामाबाद, लिस्टर (Leicester) आणि दिल्ली अशी त्यांची काही प्रमुख विचारकेंद्रे आहेत. सध्याच्या परिस्थितीत उपस्थित झालेल्या आव्हानाला ते पूर्ण व समग्र उत्तर देऊ शकत नाहीत, हे स्पष्टच आहे. पण तरीही काही नवीन व्यवस्था निर्माण करायला निघालेल्या सर्वांनी त्यांच्या काही मूल्यांचा-विशेषत: व्याजरहित अर्थव्यवस्थेचा कसून अभ्यास करणे आवश्यक

---

* The game is worth the candle.

आहे. त्यांच्या साहित्याची आपल्या देशात योग्य ती दखल अजून घेतली जात नाही वा त्या मूल्यांबद्दल फारशी सार्वजनिक परिचर्चाही आजवर झालेली नाही.

खिस्ती जीवनसरणीही गेली अनेक दशके साम्यवादाशी संघर्ष करीत आहे. पण त्याचबरोबर बऱ्याचदा तडजोडीही करीत आहे. या प्रक्रियेत खिस्ती धर्माला सर्वसमावेशक वळणाची अशी विचारपद्धती अवलंबावी लागली आहे. त्यातूनच खिस्ती विज्ञान, खिस्ती कला इ. प्रकार उद्भवले. अगदी खिस्ती अर्थशास्त्र जरी नाही तरी खिस्ती आर्थिक विचारप्रक्रिया विकसित करण्याचा प्रयत्नही झालेला आहे. अर्थातच त्यातून निष्पन्न होणारा अशाप्रकारचा कोणताही अर्थशास्त्रीय विचार म्हणजे शेवटी हिंदू अर्थशास्त्राचाच भाग असेल. पण या दिशेने चाललेल्या पोपसत्तेच्या प्रयत्नांची पुरेशी कल्पना आपल्या देशात नाही.

आपल्याकडे मात्र असे दिशावेध प्रारूप मांडण्याची वा त्याचे स्वागत करण्याची ऊर्मीच नव्हती. अशा प्रकारची गरज आज ६५ वर्षांच्या काळानंतर जीवनाच्या अनेक क्षेत्रांत जाणवत आहे. याचा अर्थ अशा हिंदू प्रारूपाची वेळ आली आहे. व्हिक्टर ह्यूगोने म्हटले आहे,

'जिची वेळ आली आहे अशा कल्पनेच्या जन्माएवढी रुद्रादभुत गोष्ट नाही.'

(There is nothing so terrible as the birth of an idea whose time has come)

अशा या प्रकल्पाचे अग्रदूत हे मानसिक दृष्ट्या अतिशय सज्ज असणे आवश्यक आहे. हे प्रारूप प्रसृत केल्यानंतर अनेक संशयात्मे अथवा व्यर्थतावादी, 'ही योजना काही शास्त्रीय व तार्किक कारणांमुळे अव्यवहार्य ठरेल' असा युक्तिवाद करतील हे अपेक्षितच आहे. 'हे एंजिन रुळांवरून जाऊ शकणार नाही व जाणे योग्यही होणार नाही.' असा, शास्त्रीय तर्कवादाच्या काटेकोर प्रमेयांद्वारा युक्तिवाद करणाऱ्यांना स्टीफन्सनने उत्तर दिले आहे,

'हे एंजिन प्रत्यक्ष चालण्यामुळेच तुमची (सर्व तार्किक) समस्या सुटेल.'

(Your difficulty is solved by its moving)

ज्ञात हिंदू राष्ट्रवाद्यांव्यतिरिक्त अशा प्रकारच्या दिशावेध प्रारूपाची निर्मिती करण्यात स्वारस्य असणाऱ्या अनेक समविचारी व्यक्ती, गट, संस्था या देशात व परदेशांत आहेत. त्यांच्याशी या कामी पूर्व सल्लामसलत ही उपयोगी ठरेल.

आज स्वयंघोषित धंदेवाईक विचारवंत पश्चिमी कल्पना, विचार छुप्या तस्करीच्या मार्गाने आयात करून स्वत:च्या छापाने व नावाने या देशात खपविण्याचा धंदा उजळ माथ्याने करीत आहेत. आपल्या विविध आघाड्यांवरील वाढत्या वैचारिक उपक्रमांच्या द्वारा, विचारप्रणालींच्या संघर्षाच्या अंतिम टप्प्यापूर्वीच आपण त्यांना जाणवून दिले पाहिजे की त्यांचा हा खेळ संपलेला आहे आणि पूर्वापार पोसलेल्या बेमुर्वत उद्धटपणाचा हा त्यांचा धंदा आता किफायतशीर राहिलेला नाही.

हे दिशावेध प्रारूप प्रसृत करणे हा या वैचारिक संघर्षाच्या अंतिम अवस्थेचा प्रारंभ ठरेल. हिंदुमानसाचा बुद्धिभेद करणाऱ्या प्रस्थापित मिथ्यांच्या व कपोलकल्पित भाकडकथांच्या मुळावरच घाव घालणारा हा उपक्रम आहे.

प्रारंभिक गोष्टी पहिल्यांदा !

अशा दिशावेध प्रारूपाने सामाजिक, आर्थिक व्यवस्थेचा आणि तिच्या संस्थात्मक आकृतिबंधाचा, घटनेचा विचार करणे अपेक्षित आहेच. पण सर्वात महत्त्वाची गोष्ट ही समाजाच्या मानसिकतेची आहे. डॉ. आंबेडकरांच्या लक्षात आले की ब्रिटनमधील लोकशाही व्यवस्थेची शाश्वती ही घटनेपेक्षाही लोकांच्या घटनात्मक नैतिकतेच्या निग्रहावर अधिक निर्भर आहे. त्यामुळेच पुढे अल्पसंख्यांच्या हक्करक्षणाच्या समस्येचा विचार करताना डॉ. आंबेडकरांनी म्हटले आहे,

'हक्क हे कायद्याने नव्हे, तर समाजाच्या सामाजिक व नैतिक सदसद्विवेकबुद्धीमुळे जपले जातात. कायद्याने अंमल करण्यासारखे हक्क मान्य करण्याची सामाजिक विवेकबुद्धी जर असेल तरच ते हक्क सुरक्षित राहतील. पण जर मूलभूत हक्कांना समाजाचाच विरोध असेल तर कोणताही कायदा, कोणतीही संसद वा न्यायपालिका ही खऱ्या अर्थाने त्यांची हमी देऊ शकणार नाही.'

(Rights are protected not by law, but by the social and moral conscience of society. If social conscience is such that it is prepared to recognise the rights which law chooses to enact, rights will be safe and secure. But if the fundamental rights are opposed by the community, no law, no parliament, no judiciary can guarantee them in the real sense of the word.)

याच संदर्भात अब्राहम लिंकनने म्हटले आहे,

'सामाजिक भावनेचे बळ असेल तर कोणतीही गोष्ट अपयशी ठरणार नाही. त्याच्या अभावी मात्र कोणत्याही गोष्टीत यश येणार नाही. परिणामत: जो अशा सामाजिक भावनेला दिशा देतो तो केवळ घटनेच्या कलमांची अंमलबजावणी करणाऱ्यापेक्षा वा केवळ निर्णय घोषित करणाऱ्यापेक्षा (जनमानसात) अधिक खोलवर जाऊन बसतो व त्याच्यामुळेच घटनेची कलमे वा निर्णय अंमलात आणणे शक्य वा अशक्य होते.'

(With public sentiment, nothing can fail; without it, nothing can succeed. Consequently, he who moulds public sentiment goes deeper than he who enacts statutes or pronounces decisions. He makes statutes and decisions possible or impossible to be executed.)

आणि यूनोचा अनुभव असा आहे-

'---- हे सगळे खरे असले तरीही मानवी हक्कांचे रक्षण, नागरी मुक्तितत्त्वे व मूलभूत स्वातंत्र्ये यांची खरी हमी ही सामान्य माणसाच्या जाणिवेच्या पातळीवर व आंतरराष्ट्रीय सामंजस्याच्या भक्कम पायावरील समाजासमाजातील नात्यावर अवलंबून आहे असे सर्वसाधारणपणे जाणवलेले आहे.'

(---- Inspite of all these, it is generally realised that a real guarantee for the preservation of human rights, civil liberties and fundamental freedoms, lies in the level of consciousness of the common man, and in people-to-people relationship on the sound basis of international understanding.)

जॉन क्लिनिग (John Kleinig) या, मानवी हक्कांसंबंधीच्या अधिकारी विचारवंताचे म्हणणे असे आहे की -

'मानवी हक्कांच्या जाणिवेविषयी असलेल्या मान्यतेबरोबरच, व्यक्ती म्हणून दुसऱ्याबद्दलची प्रेमभावना, कदर आणि आस्था नसेल तर आंतरराष्ट्रीय नातेसंबंधांत नैतिक उणीव राहणारच. दुसऱ्याला देणे क्रमप्राप्तच आहे म्हणूनच केवळ त्याच्यासाठी काहीतरी करणे यात काहीशी नैतिक उणीव आहेच. केवळ दुसऱ्याच्या हक्काच्या जाणिवेतून घडलेल्या कृती या निर्मम वा व्यक्तिनिरपेक्ष असतात. पण त्याच जर प्रेम, कदर, आस्था यांनी प्रेरित झालेल्या असतील तर त्यांचे लक्ष दुसऱ्याच्या व्यक्तित्वविशेषावर केंद्रित झालेले असते आणि या दुसऱ्या प्रकारची नातीच खऱ्या अर्थाने नैतिकतेने परिपूर्ण असतात. कारण ती व्यक्तिसंबद्ध असतात तर हक्क हे समूहसंबद्ध असतात.'

(Unless there is love, care and concern for others as individuals, in addition to the recognition of rights, there remains a moral lack in international relationships. There is something morally inadequate in doing something for another, because it is the other's due. Actions motivated simply by the rights of others, remain anonymous or impersonal, whereas if motivated by love, care and concern for the other, their focus is on other's particularity. Only relations of the latter kind are morally adequate. They are person-specific, where as rights are species-specific.)

या प्रमाणे कोणत्याही देशाच्या घटनेच्या यशस्वी अंमलबजावणीची हमी ही संस्थात्मक रचनेत नसते वा देशाच्या कायद्यातही नसते. तर ती असते सामान्य व्यक्तीच्या (समाजाभिमुख) जाणिवेच्या पातळीवर अवलंबून !

इतिहासकार विल् दुरांटने (Will Durrant) म्हटले आहे. -

'शेवटी माणसाच्या स्वभावात परिवर्तन न घडविताच संस्थात्मक बदल घडविण्याचा

कोणी प्रयत्न केला तर माणसांचे ते न बदललेले मानस पूर्वीच्या निरुपयोगी कालबाह्य संस्थांचे पुनरुज्जीवन करते.'

(After all, when one tries to change institutions without having changed the nature of men, that unchanged nature will soon resurrect those institutions.)

त्यादृष्टीने विचार केला तर, परंपरागत मूल्यांचा लय, आधुनिक व पुरातन अंधश्रद्धांचा प्रभाव, हिंदुत्वापासून दूर गेलेल्या उच्चभ्रूंचे समाजापासूनचे तुटलेपण, राष्ट्रीय जाणिवेचा अभाव, स्वदेशी भावनेचा अथवा राष्ट्रीय आत्मनिर्भरतेच्या दृढ संकल्पाचा अभाव, धार्मिक स्वातंत्र्याचा अस्त अशांसारखे अनेक घटक हिंदू समाजाला या सामाजिक जाणिवेपासून वंचित ठेवतात.

त्यामुळेच अशा घटकांपासून समाजाला मुक्त करून उन्नत राष्ट्रीय जाणीव उत्पन्न करणे हीच प्राथमिक गरजेची गोष्ट आहे.

ही उन्नत राष्ट्रीय जाणिवेची बाब आपल्याला सध्याच्या पश्चिमी मूल्यांपेक्षा भिन्न व श्रेष्ठ अशा आपल्या पारंपरिक भारतीय जीवनमूल्यांची आठवण करून देते. भौतिक व अभौतिक या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत आणि केवळ भौतिक पैलूवरच एकांगी भर दिल्याने व्यक्तिगत व सामाजिक जीवनात असंतुलन निर्माण होते हे पटवून देऊन माणसाच्या आंतरविश्वात क्रांती घडवून आणण्याची क्षमता त्या जीवनमूल्यांमध्ये होती. म्हणूनच हिंदू संस्कृती व धर्म यांच्या पुनरुज्जीवनाची केवळ आपल्या राष्ट्रीय पुनर्रचनेच्या प्रक्रियेला गती देण्यासाठीच नव्हे तर संत्रस्त मानवतेला शांतता, सुमेळ आणि आनंद मिळवून देण्यासाठीही आवश्यकता आहे. सर्वसाधारण मानवतेची व विशेषकरून भारताची दुखणी ही केवळ हिंदू संस्कृतीच्या सामर्थ्यानेच दूर होऊ शकतील.

इहवादी पश्चिमी जगात असे मानले गेले होते की इंद्रियगोचर जड वस्तुमान हेच मूलभूत आहे व मन हा त्यावरील केवळ इमला आहे. परिणामत: सामाजिक-आर्थिक व्यवस्था हीच मूलभूत मानली गेली. एकदा अशी साजेशी व्यवस्था प्रस्थापित झाली की तिला आनुषंगिक मानसिक बदल समाजमनात आपोआप घडून येतातच असेही मानले गेले. पण हा समज चुकीचा होता हे आता निरपवादपणे सिद्ध झाले आहे. पश्चिमी जीवनात व्यक्तिस्वातंत्र्य आणि सामाजिक अनुशासन यांचे योग्य समायोजन शक्य झाले आहे का? इहवादी पश्चिमी जीवनात व्यक्तिस्वातंत्र्याचे बघता बघता मन:पूत स्वैराचारात रूपांतर होते आणि अनुशासनाला बराकीकरणाचे स्वरूप येते. एकता म्हणजे एकसारखेपणा अशा चुकीच्या धारणेमुळे पश्चिमेला, वरवर दिसणाऱ्या विविधतेतील सेंद्रिय एकात्मतेची कल्पनाही करणे अशक्य होते. त्याचप्रमाणे भारतीय स्थिरता म्हणजे कुंठितता आणि स्वत:चा साहसवाद म्हणजे मात्र प्रगमनशीलता अशा चुकीच्या धारणांमुळे पश्चिमी समाजाला आमच्या सामाजिक-आर्थिक संरचनेची गुणवत्ता

कधीच भावली नाही. प्रशासकीय अधिकारांच्या जास्तीत जास्त विकेंद्रीकरणाबरोबरच समांतरतेनेच अस्तित्वात असलेल्या केंद्रानुवर्ती शासनसंस्थेची कोणीही पश्चिमी विचारवंत कल्पनाही करू शकला नाही. कारण प्रादेशिक, औद्योगिक व नागरी स्वायत्त शासनांबरोबरीनेच गुण्यागोविंदाने कारभार करणारी, सहअस्तित्वात असलेली केंद्रीय शासनव्यवस्था हा भारतीय समाजरचनेचा विशेष होता ही गोष्ट त्यांच्या समाजशक्तीच्या बाहेरची बाब होती. पश्चिमेमध्ये राष्ट्रीय आत्मनिर्भरता ही आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या तत्त्वाशी न जुळणारी गोष्ट मानली जाते. त्यामुळेच राष्ट्रवादातून साम्राज्यवादाची विकृती निर्माण होते आणि आंतरराष्ट्रवादातून स्वत:च्या राष्ट्राशी बेइमानी करण्याची प्रवृत्ती निर्माण होते.

भारतीय एकात्म मानव दर्शनाने कप्प्याकप्प्यांच्या पश्चिमी विचारव्यूहातील सारी अपूर्णता, एकांगीपणा, असंतुलन आणि व्यर्थता ही उघड केली आहे. या एकात्मतेच्या प्रणालीमुळेच इहवादासह सर्व धर्मांच्या गुणवत्तेने वर्धिष्णू बनलेल्या मानवधर्माच्या विकसनाची कल्पना आम्ही करू शकतो आणि विविध राष्ट्रांच्या संस्कृतींमधून भर पडल्यामुळे समृद्ध बनलेल्या विश्वसत्तेच्या उदयाचे चित्र आम्ही आमच्या डोळ्यांसमोर उभे करू शकतो.

व्यक्तिगत विकासाला प्रेरक ठरणारी भौतिक व अभौतिक मूल्यांची समन्वयात्मक व्यवस्था भारतीय संस्कृतीने विकसित केली. हे तर सर्वज्ञातच आहे की अर्थ व काम ही भौतिक मूल्ये, धर्म आणि मोक्ष या अभौतिक मूल्यांशी सहजसूक्ष्मतेने जुळवून दिली आहेत. भौतिकतेचा गौरवही केला नाही वा ती नगण्यही मानली नाही.

परिणामत: प्रेरणाही दोन प्रकारच्या होत्या- भौतिक व अभौतिक! भौतिक लाभ व सुखोपभोग आणि अभौतिक मूल्यांवर आधारलेली सामाजिक मान्यता व प्रतिष्ठा! प्रत्येकाला दोन्हीपैकी कोणत्याही प्रेरणेचा पाठपुरावा करता येत होता. शर्त एकच होती की सुखोपभोग व सामाजिक प्रतिष्ठा यांचे प्रमाण मात्र व्यस्त राहील. सामाजिक प्रतिष्ठा मोठी असेल तर उपभोगाची कक्षा आकुंचित असेल आणि उपभोगाचा परिघ विशाल असेल तेव्हा सामाजिक प्रतिष्ठा निम्नतर पातळीवर असेल. एका अर्थाने समाजात परिपूर्ण समता होती. म्हणजे सामाजिक प्रतिष्ठा आणि उपभोग यांचा दोन्ही मिळून प्रत्येकाच्या वाट्याला येणारा भाग सारखाच असेल. केवळ त्यातील भौतिक सुखोपभोग व सामाजिक प्रतिष्ठा या घटकांचे प्रमाण मात्र प्रत्येकाच्या स्वेच्छेच्या निवडीप्रमाणे कमी अधिक असेल.

म्हणून पूर्वी उल्लेखलेली प्रारंभिक महत्त्वाची सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी हिंदू संस्कृतीचा विशेष आशय आणि महत्त्व सर्वांच्या लक्षात आणून देणे हे राष्ट्रीय पुनर्रचनेच्या कार्यातील पहिले पाऊल आहे. बाह्य क्रांतीच्या आधी आंतरिक क्रांती होणे आवश्यक आहे हेच आपण विसरलो आणि त्यामुळे आजवर आपण घोड्यापुढे गाडी ठेवण्याचा प्रकार केला. आपण समित्या, औपचारिक नियोजन, कार्यक्रम,

योजना, संस्था, रचनात्मक कार्य, चर्चासत्रे, परिसंवाद, प्रारूप इ. नी प्रारंभ केला आहे. पण या सर्व जंजाळात अग्रक्रमाची गोष्ट प्रथम करण्याची काळजी घेतली नाही. ही गोष्ट म्हणजे मुळातून रचनाकाराचीच-माणसाचीच-जडणघडण करणे ही होय. श्री गुरुजी या संबंधात म्हणतात -

'---म्हणूनच आपल्या राष्ट्रीय पुनर्निर्माणाचा प्रारंभ माणसाच्याच घडणीपासून होणे आवश्यक आहे. सर्व मानवी मालिन्यावर मात करण्याचे सामर्थ्य त्याच्यात निर्माण करून प्रेम, आत्मसंयमन, त्याग, सेवा, चारित्र्य या सर्व पारंपरिक गुणवत्तेच्या हिंदू व्यक्तित्वाचे एक प्रकाशमान प्रतिक म्हणून त्याला उभे करणे आवश्यक आहे. आपण, हे आपल्या राष्ट्रीयतेचे गौरवशाली सार, हे दर्शन, न चुकता आपल्या समोर ठेवावे म्हणजे आपल्या प्राचीन कालच्या जगद्गुरूच्या स्थानावर आपण पुन्हा विराजमान होऊ शकू.'

(Our real national regeneration should, therefore, start with the moulding of 'men', instilling in him the strength to overcome human frailties and stand up as a shining symbol of Hindu manhood embodying within himself all our traditional virtues of love, self restraint, sacrifice, service and character. We should unfailingly keep this vision, this real essence of our glorious nationhood before our eyes, so that we can again rise to our original pedestal of world preceptor')

म्हणून आपण आपले अग्रक्रम बदलले पाहिजेत. व्यक्तिमत्त्व घडणीला सर्वाधिक प्राधान्य दिले पाहिजे. अशा प्रकारचे संस्कारित कार्यकर्ते उपलब्ध असतील त्या प्रमाणातच नेहमीच्या औपचारिक रचनात्मक कामांना प्रारंभ करून त्यांच्यात वाढ करावी लागेल. लसलसणाऱ्या घाईपासून परावृत्त झाले पाहिजे आणि श्री गुरुजींच्या 'घाई करा, पण सावकाश !' या सूत्राचा अवलंब केला पाहिजे.

'वाद' का नको ? (Why ismlessness ?)

जे कोणता ना कोणता 'वाद' (ism) अनुसरतात त्यांना अशा प्रकारचे दिशावेध प्रारूप तयार करणे सोपे असते.

आपण कोणत्याही 'वादाचा' अवलंब का करीत नाहीत ?

सामान्य माणूस नेहमी कोणत्या ना कोणत्या वादाचा पाठपुरावा करतो कारण त्यामुळे त्याला एक प्रकारची निश्चिंतता लाभते. उलट शंका येत राहणे हा मात्र फार मोठा मानसिक जाच असतो.

थोर विचारवंतांना नेहमीच स्थलकालाने सापेक्ष असणाऱ्या ज्ञानाची अशमनीय तहान असते. त्यांना वाटते की शंका येणे ही काही मोठी स्पृहणीय गोष्ट नाही हे खरे आहे. पण निश्चिंतता ही मात्र अतिशय उपहासास्पद स्थिती आहे. त्यामुळेच

स्वभावत:च बंदिस्त पोथीच्या रूपात असणाऱ्या कोणत्याही वादाचे ते पुरस्कर्ते होऊ शकत नाहीत.

व्हॉल्टेअरने अशाच एका चांगल्या ब्राह्मणाची कथा सांगितली आहे -

ब्राह्मण म्हणतो, 'मी जन्मालाच आलो नसतो तर फार बरे झाले असते.'

'का बरे ?' मी विचारले.

'गेली ४० वर्षे मी व्यासंग करतो आहे आणि माझ्या लक्षात येते आहे की हा सारा निष्फळ कालापव्यय झाला आहे. मला हे माहित आहे की माझी जडापासून निर्मिती झाली आहे. पण विचार कशापासून निर्माण होतो हे मात्र मला समाधानकारक रीतीने समजून घेता आलेले नाही. माझी समजशक्ती ही माझ्या चालण्याच्या वा पचनाच्या शक्तीसारखीच एखादी शक्ती आहे का ? किंवा ज्याप्रमाणे एखादी गोष्ट मी माझ्या हातात पकडतो त्याप्रमाणेच मी माझ्या डोक्याने विचार करतो का ? अशा साऱ्या साध्या बाबतींतही मी पूर्ण अज्ञानी आहे. मी पुष्कळ बडबडतो आणि बोलणे संपल्यावर मात्र आपण हे काय बोललो म्हणून माझ्या मनात गोंधळ उडतो व मला लाजही वाटते.'

व्हॉल्टेअर पुढे सांगतो -

'त्याच दिवशी त्या ब्राह्मणाच्या शेजारी राहणाऱ्या एका म्हातारीशी माझे बोलणे झाले. मी तिला विचारले की आत्मा कशाचा बनला आहे हे न समजल्याने तिला कधी दु:ख झाले आहे का ? पण अशा प्रकारच्या ज्या काही प्रश्नांचा त्या थोर ब्राह्मणाला जाच होत होता, त्यांच्याबद्दल त्या म्हातारीने तिच्या एवढ्या आयुष्यात निमिषमात्रही विचार केलेला नव्हता. स्वत:च्या अंत:करणाच्या गाभ्यातूनच तिचा विष्णूच्या एका पाठोपाठ आलेल्या विविध अवतारांवर पूर्ण विश्वास होता आणि केवळ गंगेच्या पवित्र तीर्थात शुचिर्भूत होता आले तर तिच्यासारखी भाग्यवान तीच अशी तिची धारणा होती. त्या पामर जीवाच्या त्या आनंदामुळे हेलावून जाऊन मी त्या तत्त्वज्ञ ब्राह्मणाकडे परतलो आणि त्याला विचारले -

'तुझ्यापासून अवघ्या पन्नास पावलांवरच, तुला पडलेल्या प्रश्नांसारखा काहीही विचार न करता अत्यंत समाधानी वृत्तीने जगणारी एक असंज्ञ व्यक्ती राहत असताना तुला स्वत:ची अशी दयनीय अवस्था करून घेण्याबद्दल लाज कशी वाटत नाही ?'

तो ब्राह्मण म्हणाला, 'तुमचे बरोबर आहे. मीही अनेक वेळा स्वत:शी म्हणालो आहे की जर त्या शेजारच्या वृद्धेप्रमाणेच मी अज्ञानी असतो तर मीही किती आनंदी झालो असतो ! पण काय करू ? अशाप्रकारच्या आनंदाची मला इच्छाच नाही !'

व्हॉल्टेअर शेवटी सांगतो, 'त्या थोर ब्राह्मणाच्या या उत्तराने, आत्तापर्यंत ऐकलेल्या दुसऱ्या कोणत्याही गोष्टीपेक्षा फार मोठा परिणाम माझ्यावर झाला.'

सर्व वादांचे अनुयायी हे या कथेतील वृद्धेप्रमाणेच आनंदी, आत्मतृप्त (की अहंमन्य ?) व आत्मविश्वासपूर्ण असतात.

भाग २

प्रारंभ बिंदू

मग आपल्या राष्ट्रीय पुनर्रचनेच्या प्रक्रियेविषयीच्या विचाराचा प्रारंभ बिंदू कोणता ?

आपण असे पाहिले आहे की भौतिक व अभौतिक अशा दोन्ही प्रकारच्या मूल्यांच्या द्वारा व्यक्तिगत विकास साधणारी समन्वयात्मक व्यवस्था भारतीय संस्कृतीने विकसित केली आहे आणि म्हणून हिंदू संस्कृतीच्या वैशिष्ट्यांचा आशय व सार्थता ही सर्वांच्या मनावर बिंबवून, त्यांचा विकास करणे हे जरी आमच्या राष्ट्रीय पुनर्रचनेच्या दृष्टीने पहिले पाऊल असले तरी त्याबरोबरच नाण्याच्या दुसऱ्या बाजूचा-भौतिक घटकांचा विशेषत: सामाजिक-आर्थिक घटकांचा विचारही तितक्याच गंभीरपणे करणे आवश्यकच आहे. त्या दृष्टीने विचाराला प्रारंभ केला की लक्षात येते की आपल्यात जसे निसर्गधर्मासाठी पाण्याचा वापर करावयाचा असतो हेही माहित नसलेले अशिक्षित वनवासी आहेत, तसेच थोड्या प्रमाणात का होईना पण अंधश्रद्धेपोटी अत्यंत निंद्य अशी नरबळींची प्रथा पाळणारेही आहेत. सार्वजनिक आरोग्य व सर्वसाधारण स्वच्छता यांच्याबद्दल आपल्या खेडुतांमध्ये जाणीव नसते. नागरी जीवनातही स्वच्छतेची जाणीव व सवयी यांचा अभाव दिसतो. डासांची निपज करणाऱ्या जागा नष्ट करण्याची काळजी घेतली जात नाही. अनेक स्थानिक स्वराज्य संस्था, गटारे, सार्वजनिक स्वच्छतागृहे व मलनि:सारण प्रकिया यांच्यासंबंधीच्या कार्यक्षमतेबद्दल दावा करू शकणार नाहीत.

नागरी जाणीव ही शहर भागातही दिसत नाही. सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, निरुपयोगी गोष्टी घराबाहेर फेकणे हे तर सार्वत्रिकच दिसते. वाहतुक नियमांचे स्वेच्छेने पालन, एखाद्या अडकून पडलेल्या प्रवाशाला मदत करणे; एखाद्या खोलीतून अथवा गाडीतून बाहेर पडताना पंखे वा दिवे मालवणे, सार्वजनिक संपत्तीचा नाश करण्यापासून स्वत: परावृत्त होणे व इतरांनाही परावृत्त करणे यातील नैतिकता; उपहारगृहे, विश्रामधाम, सभागृहे, सार्वजनिक वाहतुक व्यवस्था, ग्रंथालये, उद्याने, क्रीडांगणे, दहन वा दफन भूमी यांचा सामाजिक जबाबदारीच्या जाणिवेने वापर करणे; वृद्ध व अपंगाला रस्ता ओलांडण्याला मदत करणे, वाहनाखाली चिरडल्या जाणाऱ्या एखाद्या मुलाला वाचविणे, चढावर असताना, माणसाने ओढण्याच्या रिक्षेतून खाली उतरणे; नफार कुंडूच्या[१] आवेशात, गुंडांपासून अथवा अपघातापासून सोडविण्यासाठी धावून जाणे - अशा सर्व गोष्टींची आपल्याकडे एकूण वानवाच आहे.

दुसऱ्या बाजूला सर्वच तिसऱ्या जगातील देशांना भेडसावणारे, महापूर, दुष्काळ, रोगांच्या साथी, अन्नोत्पादनातील घट, भूकंप आणि इतर नैसर्गिक आपत्ती यासारखे

काही प्रश्न आहेत. प्रगत आणि विकसनशील दोन्ही प्रकारच्या देशांच्या संदर्भातीलही काही प्रश्न आहेत. जसे, लोकसंख्येचा विस्फोट, जगात सार्वत्रिकतेने अनुभवाला येणारे शहरीकरण, पर्यावरणात्मक प्रदूषण, तंत्रज्ञानातून निर्माण झालेली बेकारी, दुसरीकडे चंगळवाद, फुरसतीच्या वेळेचा गैरवापर, करमणुकीचे व्यापारीकरण, जीवनातील कंटाळवाणेपणा, विद्यार्थी-असंतोष, कामगारांची आंदोलने, वाढती गुन्हेगारी, टोकापर्यंत गेलेल्या अमर्याद वाढीतून निर्माण झालेल्या कमी अधिक प्रमाणातील समस्या, आर्थिक मंदी, कुंठितता आणि चलनवाढ, (stagflation) निकामी वस्तूंचे आणि अण्वस्त्रे, रासायनिक व जैविक अस्त्रे यांचे ढीग !

आत्ता आत्तापर्यंत आपण लॅटिन अमेरिकी देशांतील युद्धे, क्रांत्या, दहशतवाद व अस्थिरता अशा रोगांपासून मुक्त होतो; पण गेल्या काही दशकांत आपल्याकडेही दहशतवाद, कौटुंबिक वैमनस्य, हुंडाबळी, जातिजातीतील संघर्ष, भाषिक, प्रादेशिक मारामाऱ्या, जातीय दंगे अशा गोष्टींना ऊत आला आहे.

आपल्या सामाजिक-आर्थिक आघाड्यांवरील अपयशामुळे सामान्य माणूस तर खचला आहे.

शतकापेक्षा अधिक काळ आपण पश्चिमी औद्योगीकरणाच्या पद्धतीचा पाठपुरावा केला. पश्चिमी जगताप्रमाणेच आपल्याही देशात शहरांकडे लोकांचे लोंढे येत राहिले. शहरीकरणाच्या ओझ्याखाली, कुटुंबसंस्थेचे व ग्रामपंचायतीचे विघटन, औद्योगिक वसाहतींमधील परिपूर्ण सामाजिक जीवनाचा अभाव, अपुरी व वाईट घरे, झोपडपट्टी, औद्योगिक अपघात, निरक्षरता, खेड्यांमधून शहरांकडे आलेल्या व्यक्तींच्या मनातील स्वत:बद्दलच निर्माण झालेले परकेपण (self-alienation), स्वत:च्या स्वाभाविक, सामाजिक पर्यावरणातून मानसिक दृष्ट्या उखडल्या गेलेल्या खेडुतांमधील सामाजिक व नैतिक मूल्यांचा अभाव, औद्योगिक जीवनातील स्वत:पुरते पाहण्याची प्रवृत्ती, भौतिक व अभौतिक विकासातील असंतुलन, पश्चिमी संस्कृतीच्या भाराखालील नव्या जीवनशैलीच्या ताणतणावांशी जुळवून घेण्यातील असमर्थता, परिणामत: शहर जेवढे मोठे तितके गुन्हेगारीचे व्यक्तिगणिक मोठे प्रमाण अशाप्रकारे सर्व दृष्टींनी आपल्या इतिहासात अभूतपूर्व अशी परिस्थिती निर्माण होत गेली. या सर्व घटकांमुळे आपल्या राष्ट्रीय सर्जनशीलतेला जबरदस्त आव्हान मिळालेले आहे.

अर्थातच आपल्या समाजाला भेडसावणाऱ्या काही प्रश्नांच्या आर्थिक स्वरूपापेक्षा त्यांचे सामाजिक संदर्भच अधिक चिंतेचे आहेत. भरकटलेले, उडाणटप्पू, विकृत, भोगवादी, मनोरुग्ण ही अशांची उदाहरणे आहेत. त्याचप्रमाणे बालगुन्हेगारी, उनाडक्या, शाळेतून दांडी मारणे असे प्रकारही आर्थिक घटकांपेक्षाही सामाजिक परिस्थितीचे परिणाम आहेत. मनाचा तोल जाऊन निर्माण होणाऱ्या व्यक्तिगत सैरभैरतेच्या अथवा व्यक्तिमत्त्वाच्या विघटनाच्या, मानसिक संभ्रमाच्या वा घसरणाऱ्या अवस्थेच्या प्रश्नांचे प्रचंडपण अजमावण्याचा अद्याप आपण प्रयत्न केलेला नाही. अशा आत्यंतिक

टोकाला गेलेल्या मनोवस्थेचे पर्यवसान बऱ्याचदा आत्मघातात होते. आत्महत्त्येच्या वाढीचे प्रमाण तर प्रत्यक्षात आज लोकसंख्येच्या वाढीच्या प्रमाणाच्या दुप्पट आहे. मानसोपचार तज्ञांची व रुग्णालयांची संख्या ही या प्रश्नाला पुरे पडण्याच्या दृष्टीने अगदीच अपुरी आहे ही क्लेषकारक स्थिती आहे. लोकसंख्येच्या वाढीच्या प्रमाणावर मात करणारी गुन्हेगारीची वाढ ही याच मानसिकतेची निपज आहे.

आपण अजून राष्ट्रीय-सामाजिक धोरणाची निश्चिती केलेली नाही. त्यासाठी आवश्यक तपशील व आकडेवारी आपल्याजवळ नाही. आपल्याजवळ अजूनही महाभयानक कुष्ठरोगाच्या अथवा गुप्त रोगाच्या प्रमाणाचा पुरेसा तपशील नाही. अपंग, अधू, बहिरे, मुके, आंधळे यांची नेमकी संख्या कळण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर कोणतेही सामाजिक सर्वेक्षण झालेले नाही. त्याचप्रमाणे गुन्हेगार, निराश्रित, कामचुकार आणि भिकारी व भिक्षेचा व्यवसाय करणाऱ्या गुंडांकडून पळविली गेलेली व अवयव विच्छिन्न केलेली मुले यांच्यासंबंधी कोणताही तपशील उपलब्ध नाही. विवाहविच्छेदाचे, परित्यक्तांचे आणि घटस्फोटित पालकांच्या अपत्यांचे प्रमाण याबद्दल आपण शास्त्रीय दृष्टिकोण अवलंबिलेला नाही. मद्यपान, अमली पदार्थांचे सेवन, पांढरपेशांमधील गुन्हेगारी व न्यायालयीन चौकशीसाठी तुरुंगात खितपत पडलेले कैदी याबाबत पद्धतशीर विचार केलेला नाही. वेठबिगारी मजूर, बाल कामगार, भूमिहीन शेतमजूर, छोटे आणि एकेकटे शेतकरी, हंगामी रोजगारावरील कामगार, उमेदवारी करणारे, स्त्री कामगार, असंरक्षित कामगार, नोकरी करणाऱ्या गृहिणी, सेवानिवृत्त व्यक्ती, माजी सैनिक अशा विविध वर्गांच्या वर्गविशिष्ट समस्यांकडेही आपले लक्ष गेलेले नाही. वनवासी, भटके विमुक्त आणि इतर भटक्या जमाती, त्याचप्रमाणे देवदासी आणि वेश्याव्यवसायात बळजबरीने आणलेल्या स्त्रिया अशा काही सामाजिक वर्गांकडेही आपले दुर्लक्ष झालेले आहे. परदेशातून आलेल्या किंवा स्वत:च्याच देशात निर्वासित झालेल्यांबद्दल, विस्थापितांबद्दल, पुनर्वसनापासून वंचित राहिलेल्या वर्गांबद्दल अत्यंत बेपर्वा वृत्ती दिसून येते. एवढेच नव्हे तर सामान्य उपभोक्त्यालाही अपेक्षित न्याय्य गोष्टी मिळत नाहीत.

अर्थातच देशापुढे उभ्या असलेल्या निकडीच्या समस्या म्हणजे दारिद्र्य, बेरोजगारी वा तुटपुंजी रोजगारी, सामूहिक निरक्षरता याच आहेत.

आणि धार्मिक व शैक्षणिक संस्थांचा ऱ्हास, अस्तित्वात असलेल्या सध्याच्या सामाजिक संस्थांची निरुपयोगी अवस्था, त्यामुळे जुन्यांची जागा घेणाऱ्या नव्या मूल्यांची निर्मिती न होताच झालेला जुन्या मूल्यांचा ऱ्हास अशा अनेक घटकांमुळे वर उल्लेखलेल्या सर्व घटकांचे परिणाम हे अधिक तीव्र झाले आहेत.

म्हणून या अभौतिक बाजूमधील आमच्या समाजाच्या अवनतीची किंमत भौतिक बाजूच्या संदर्भात-सामाजिक, आर्थिक बाबतीत अटळपणाने मोजावी लागत आहे.

सार्वजनिक क्षेत्रातील याबाबतीतील सर्वात उद्विग्न करणारी बाब म्हणजे सतत

वाढत असलेला भ्रष्टाचार! विशेषत: 'भ्रष्टाचार हा एक जागतिक पातळीवरील मामला आहे आणि देशातील पैसा काही भ्रष्टाचारामुळे बाहेर जात नाही,' असे पं. नेहरूंनीच जाहीर केल्यामुळे साहजिकच भ्रष्टाचाराची ही विषवल्ली प्रमाणाबाहेर फोफावली.

व्यापक अर्थाने पाहिले तर स्वत:च्या शासकीय सेवेतील विशेष स्थानापोटी निर्माण होणाऱ्या सत्तेचा वा प्रभावाचा गैरवापर हा भ्रष्टाचारातच मोडतो. रॉबर्ट सी. ब्रूक यांनी म्हटल्याप्रमाणे,

'काही व्यक्तिगत लाभासाठी, स्वत:चे विशेष कर्तव्य पार पाडण्यामध्ये हेतुत: ढिलाई ठेवणे हा राजकीय भ्रष्टाचाराचा प्रकार आहे. त्याच्या बदल्यात मिळणाऱ्या काही दृश्य वा छुप्या लाभासाठी साहजिकच केलेली बेकायदेशीर कृत्येही अर्थातच भ्रष्टाचारातच मोडतात.'

(Political corruption is a wilful failure to perform a specified duty in order to receive some personal gain; such corruption involves an unlawful act performed for some tangible or intangible *quid pro quo*)

इलियट आणि एफ्. इ. मेरिल यांनी म्हटले आहे -

'भ्रष्ट व्यावसायिक पद्धती, राजकीय भ्रष्टाचार व संघटित गुन्हेगारी मिळून एक भयानक, परस्परसंबद्ध अशी सामूहिक विघटनाची संचालकीय व्यवस्था निर्माण होते. कष्टाविना फळ हेच सर्वांचे लक्ष्य असते.'

(...corrupt business practice, corruption in politics and organised crime constitute a formidable interlocking of Directorate of Community Disorganisation. All are interested in the same goal-reward without effort.)

भ्रष्टाचार निर्मूलनासाठी नेमलेल्या 'संथानम समितीचे' निरीक्षण आहे की भ्रष्टाचार हा दुसऱ्या महायुद्धानंतर आणि विशेषत: स्वातंत्र्य प्राप्तीनंतर वाढला. अनेक कायदे, बंधने, परवाने, योग्यायोग्यतेचा निर्णय करण्याचे अधिकार यांच्या साहाय्याने शासकीय अधिकाराची व्याप्ती वाढली. लोकशाही शासनाच्या द्वारा जणू लुटीची व्यवस्था सिद्ध झाली. उद्योग व्यापारातील वर्ग व राज्यकर्ते आणि गुन्हेगार व राज्यकर्ते यांच्यांतील अशुभ युती, या गोष्टी प्रस्थापित झाल्या. आता आपण व्यापक प्रमाणातील राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाच्या पर्वात प्रवेश करीत आहोत. अलिकडच्या काळात कर चुकविणे, सट्टेदलाली, समभागांच्या व्यापारातील व व्यावसायिक संस्थांच्या व्यवस्थापनातील गैरव्यवहार, बांधकामाच्या व मालाच्या पुरवठ्यासंबंधीच्या करारांची ठरलेल्या निकषांच्या खालच्या दर्जाची कार्यवाही अशा पद्धतीच्या अनेक आर्थिक गुन्ह्यांमध्ये प्रचंड वाढ झालेली आहे. सामूहिक गुन्हेगारीला तर राजकीय दबावामुळे मुक्तद्वार मिळाले आहे. जबरदस्तीने लूट करण्याचा कट, उपहारगृहातील बेकायदा वेश्याव्यवसाय, बंदी असलेल्या परिसरात दारूचा पुरवठा, चोऱ्या, दरवडे, जुगार, अपहरण, राजकीय खून अशांसारखे सारे प्रकार वाढलेले दिसतात.

अशांसारख्या छोट्या मोठ्या गुन्हेगारांव्यतिरिक्त राज्यकर्ते हेच सर्वात मोठे आर्थिक गुन्हेगार असल्याचे जाणवत आहे. त्यामुळेच दारिद्र्य, बेरोजगारी वा रोजगारीतील अनियमितता, पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष, सार्वत्रिक निरक्षरता अशांसारखे पूर्वी उल्लेखलेले प्रश्न तीव्रतेने जाणवत आहेत. शिवाय देशाचे आर्थिक स्वातंत्र्य गहाण टाकण्यास वा विकून टाकण्यासही हे राज्यकर्ते तयार आहेत असे म्हणण्यास जागा आहे. त्यामुळे राष्ट्रीय आत्मसन्मानाला धक्का बसतो व राष्ट्रीय सार्वभौमत्वाशीही तडजोड केली जाते आणि परकीय आर्थिक साम्राज्यवादाचे जोखड मानेवर येते. लक्षावधी गरीबांशी राज्यकर्त्यांनी जणू जिहाद पुकारला आहे व आमच्या आर्थिक स्वातंत्र्याची ही निश्चितच मृत्युघंटा आहे.

कदाचित राष्ट्रीय कर्जाची थकबाकी, परराष्ट्रविषयक धोरण, केंद्र-राज्य संबंध अथवा महासत्तेचे स्थान अशा प्रकारच्या अधिक गंभीर प्रश्नांनी जे व्यग्र आहेत त्यांना वरील स्वरूपाचे निवेदन बाष्कळ वाटण्याची शक्यता आहे. पण खरे म्हणजे आपल्या राष्ट्रीय पुनरर्चनेच्या हरक्युलसच्या[२] प्रयत्नांप्रमाणे विराट प्रयत्नांचा हा लौकिक प्रारंभबिंदू आहे.

हे सारे खरे असले तरीही आतापर्यंत विस्ताराने उल्लेखलेल्या आपल्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, शासकीय, सांस्कृतिक अशा सर्व आधिव्याधींचे मूळ कारण उन्नत राष्ट्रीय-सामाजिक जाणिवेचा अभाव हेच आहे. त्यामुळे मागच्या भागात म्हटल्याप्रमाणे ती राष्ट्रीय जाणीव निर्माण करणे व त्यासाठी हिंदू संस्कृतीच्या व धर्माच्या पुनरुज्जीवनाची प्रक्रिया सुरू करणे हाच आमच्या राष्ट्रीय पुनर्रचनेचा प्रारंभबिंदू असू शकतो.

भौतिक जगातील विकास हा त्या आधीच्या योग्य अशा मानवी मनाच्या विकासानुरूपच होत असतो, त्याचप्रमाणे बाह्य जगातील वस्तुनिष्ठ क्रांती ही निरपवादपणे मानवी मनातील आत्मनिष्ठ क्रांतीनंतरच होत असते ही हिंदू जीवनदृष्टीची धारणा आहे.

अर्थात आपल्याला हेही माहित आहेच की आपल्या राष्ट्रीय आत्मसन्मानाची पुनःस्थापना करण्यासाठी पहिले पाऊल म्हणजे अयोध्या, काशी व मथुरा मुक्त करणे हे आहे.

त्याशिवाय पंजाब, ३७० कलम, पाकिस्तानी कारवाया, समान नागरी कायदा, आसाम, तामिळी वाघ, मिशनरी उपद्रव, घुसखोरी, नक्षलवाद, फुटीरता, खोटा निधर्मीवाद, गोरक्षण, शासनातील नोकरशाहीची एकाधिकारशाही इ. गोष्टींकडे लक्ष पुरविण्याचीही आमची प्रतिज्ञा आहे.

आमच्या प्रमुख धारणा

१) पश्चिमी नमुना हाच प्रगतीचा आणि विकासाचा वैश्विक नमुना आहे या

दृष्टिकोणाला आमची मान्यता नाही. आधुनिकीकरण म्हणजे पश्चिमीकरण हे सूत्र आम्हाला मान्य नाही.

२) युरोपीय समाज, विकासाच्या ज्या ज्या अवस्थांमधून गेले त्याच अवस्थांचा अनुभव जगातील प्रत्येक समाजाला घ्यावा लागतो अथवा घ्यावा लागेलच असे युरोपीय विचारवंतांनी व त्यांच्या एतद्देशीय शागीर्दांनी गृहीतच धरले आहे. युरोपीय समाजांची ऐतिहासिक प्रगती ही विकासाची वैश्विक क्रमप्रक्रिया मानली गेली आहे. पण सत्य वेगळेच आहे. आपापल्या परंपरा, भूतकाळातील वारसा व वर्तमानातील विशिष्ट परिस्थिती यांच्या अनुषंगाने भिन्न भिन्न समाजांनी भिन्न भिन्न अशी विकासाची वाटचाल केली आहे व पुढेही ते करीत राहतील. त्यामुळेच पश्चिमी देशांतील दुखणी कदाचित परिणामकारक रीतीने बरी करणारे उपाय हे सारख्याच प्रमाणाच उर्वरित जगातील देशांनाही उपयोगी पडतील हे गृहीत धरणे चुकीचे ठरेल. त्यातूनही समाजवादासारखी एखादी योजना युरोपीय आर्थिक समस्या सोडविण्यास तरी कितपत यशस्वी झाली आहे याबद्दल शंकाच आहे. तथाकथित प्रगत देशांचे आंधळें अनुकरण करण्याचा काहीच उपयोग नाही. गुरुदेव टागोर म्हणत की देवाने वेगवेगळ्या देशांना वेगवेगळ्या प्रश्नपत्रिका दिलेल्या आहेत.

३) हे तर सर्वज्ञातच आहे की पश्चिमी तत्त्वचिंतकांनी व समाजवैज्ञानिकांनी उत्पादन, उत्पादकता आणि समृद्धी ही प्रथम भांडवलशाहीवर सोपवली आणि भांडवलशाहीने स्वत:ची इतिहासदत्त भूमिका पूर्ण केली, तरच समाजवादाची संकल्पना सिद्ध होऊ शकते अशी त्यांची धारणा होती. समाजवादी चळवळीच्या अग्रदूतांनी समाजवादाचे आगमन हे दरिद्री देशांमध्ये अपेक्षिलेच नव्हते. जे देश समृद्ध नाहीत त्या देशांत समाजवादाची चर्चा करणे अगदीच अप्रस्तुत आहे हे मार्क्सनेही आवर्जून स्पष्ट केले होते. तिसऱ्या जगातील सर्व देश याच वर्गात मोडतात. त्यामुळे या देशांत समाजवाद म्हणजे गरिबीचे समान वाटप होय. हे ध्यानात घेतले पाहिजे की आम्ही समाजवादी प्रणेत्यांच्या या दृष्टिकोणाशी सहमत नाही. आमचे असे स्पष्ट मत आहे की तिसऱ्या जगात अस्तित्वात असलेल्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीत व युरोपीय देशांतील या अथवा गेल्या शतकातील परिस्थितीत यत्किंचितही साम्य वा समांतरता नाही आणि त्यामुळेच या देशांना त्यांच्या त्यांच्या स्वत:च्या परंपरा, परिस्थिती व आवश्यकता यांच्या अनुषंगानेच स्वत:च्या समृद्धीचा मार्ग चोखाळावा लागेल.

४) शिवाय एखाद्या परकीय तात्त्विक संज्ञेची आयात केली की संलग्न असे सर्व मानसिक संदर्भ तिच्या बरोबर येतातच हे एक मानसशास्त्रीय सत्य आहे. अशा प्रकारेच समाजवाद या परकीय संज्ञेशी संलग्न असे संदर्भ हे आल्हाददायीही नाहीत व आपल्या समाजाच्या दृष्टीने उपयुक्तही नाहीत. सामाजिक सुमेळ आणि एकात्मता यांची बीजे रुजविण्याऐवजी सामाजिक तणाव व विघटनालाच हे मानसिक संदर्भ

कारणीभूत होण्याची शक्यताच अधिक !

विषमतेला व शोषणाला विरोध करण्याचाच जर प्रश्न असेल तर तो आमच्याही सांस्कृतिक संचिताचा भाग आहेच आणि आमच्या परंपरागत अशा भावात्मक (positive) एकात्मतेच्या भावनेच्या आधारे हा विरोधाचा नकारात्मक आशय सामावून घेता येतो आणि आपल्या परंपरेतील पारिभाषिक संज्ञांच्या द्वारा तो व्यवस्थितपणे व्यक्तही करता येतो.

५) पण केवळ पश्चिमी आहे म्हणूनच एखाद्या गोष्टीचा अवलंब करावा असे असू नये असे म्हणत असताना केवळ पश्चिमी आहे म्हणूनच तिचा धिक्कार करावा हेही बरोबर नाही हे आमच्या ध्यानात येते. ज्ञान व सत्य हे स्वभावतःच वैश्विक असते. सत्यामध्ये वर्गीय, जातिनिविष्ट, वा राष्ट्रसापेक्ष असे काहीही नसते. त्यामुळे जगातील सर्व समाजांकडून ज्ञान आत्मसात करण्याकडे आमचा कल आहे. अर्थात त्या ज्ञानाची आमच्या भूतकाळातून आलेल्या परंपरा व वर्तमानातील आमच्या आवश्यकता यांच्या संदर्भात चिकित्सा करणे आवश्यक आहे व त्यातील काय वगळावयाचे, कशाशी जुळवून घ्यावयाचे, काय संपूर्ण आत्मसात करावयाचे हे ठरविले पाहिजे. विशेषतः पश्चिमी विज्ञान व तंत्रज्ञानाबाबत हे आवश्यक आहे. ते तसेच्या तसे घाऊक रीतीने आमच्या देशात रुजविण्याचा प्रयत्न करण्याला आम्ही अनुकूल नाही. कारण पश्चिमी देशांतही पश्चिमेचे विज्ञान व तंत्रज्ञान हे निर्भेळ वरदान ठरलेले नाही.

६) त्याचप्रमाणे पश्चिमी राष्ट्रे ही नवजात राष्ट्रे असल्यामुळे त्यांची विचारप्रक्रिया व दिशा ही अप्रगल्भ आहे. त्यामुळे तत्त्वज्ञान व विचारप्रणालीच्या क्षेत्रात तर या पश्चिमी देशांचे अनुभव फारसे उपयोगाचे नाहीतच. त्यामुळे जे विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विवेकी स्वीकाराबाबत खरे आहे तेच तत्त्वज्ञान, धर्म, नीती व विचारप्रणाली यांच्याही बाबतीत खरे आहे असे मान्य करता येणार नाही. कारण या क्षेत्रांमध्ये पश्चिमी राष्ट्रे फारच अल्पवयी आहेत. चिनी राष्ट्रही आमच्याएवढे प्राचीन नाही आणि चीनचे राष्ट्रीय व्यक्तिमत्त्व साम्राज्यवादी राज्यसत्तेच्या स्वरूपाचे आहे तर भारताचे व्यक्तिमत्त्व संस्कृती आहे हे खरे आहे. पण तरीही एकवेळ आमचा भावी वाटचालीचा मार्ग ठरविण्यामध्ये चीनच्या ऐतिहासिक अनुभवाचा उपयोग करून घ्यावा असे म्हणणे काहीसे समर्थनीय ठरेल.

अशा स्थितीत पश्चिमेचे आंधळे अनुकरण हे तर केवळ आमच्या अंगभूत प्रतिभेची दिवाळखोरी वा परकोटीचा न्यूनगंडच व्यक्त करेल.

७) वेगवेगळ्या परिघातील मानवतेच्या समस्या सोडविण्यामधील आमच्या संस्कृतीच्या क्षमतेबद्दल आमच्या मनात प्रगाढ विश्वास आहे. हिंदू संस्कृती सर्वच मानवी दुःखांवर उपाय ठरू शकेल असा दावा मांडणे आज कदाचित हास्यास्पद वाटू शकेल. पण योग्य त्या विनयाने हा दावा नक्कीच करता येतो की राष्ट्रीय

आपदांचा परिहार करण्याची क्षमता या संस्कृतीत आहेच. (त्याचबरोबर अगदी नजिकच्याच भविष्यात जगातील सर्व राष्ट्रे आपल्या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने मार्गदर्शनासाठी सनातन धर्म आणि हिंदू संस्कृती यांच्याकडेच वळतील ही शक्यता नाकारता येत नाही.)

८) 'एकात्म मानववाद' ही संज्ञा निर्माण करून व तिच्या अनुषंगाने ही संकल्पना स्पष्ट करून पं. दीनदयाळ उपाध्यायांनी मानवतेची विशेष सेवा केली आहे. वस्तुत: ते 'वाद' 'ism' या संज्ञांबाबत फारसे अनुकूल नव्हते. कारण वाद म्हणजे झापडबंद विचारग्रंथ होय. 'मानवतावाद', humanism या शब्दालाही त्यांची हरकत होती. कारण या शब्दाला पश्चिमी जगतात मानवपेशीकेंद्री (Homocentric) आणि ईश्वर नाकारणारा असा एक अर्थ चिकटला आहे. तरी पश्चिमी विचारवंतांच्या सध्याच्या समजशक्तीच्या पातळीशी तडजोड म्हणून त्यांनी 'एकात्म मानववाद' ही संज्ञा स्वीकारली. पण खरे म्हणजे या संज्ञेचा अर्थ, कोणत्याही प्रणालीचा अभाव, वाद या संकल्पनेलाच नकार (ismlessness) असाच आहे! वस्तुत: ही संज्ञा हे सनातन धर्माचे आधुनिक रूपच होय. त्याचा वर्तमान राष्ट्रीय संदर्भातील सर्व अभिप्रेत आशय सिद्ध करावा लागेल. पण त्या द्वारा आमच्या सर्व सामाजिक-आर्थिक आवश्यकतांचा निर्वाह आम्ही करू शकू. त्यासाठी आवश्यक अशा प्रकारची आर्थिक-सामाजिक व्यवस्था विकसित करू शकणाऱ्या आमच्या राष्ट्रीय प्रतिभेच्या क्षमतेवर आमची पूर्ण श्रद्धा आहे. त्यासाठी आम्हाला पश्चिमेच्या प्रेषितांकडून धडे घेण्याची आवश्यकता वाटत नाही.

९) भारतासारख्या समृद्ध सांस्कृतिक वारसा असलेल्या देशाने आपल्या राष्ट्रीय उद्दिष्टांचे वर्णन करण्यासाठी पश्चिमेकडून परभाषेची उसनवारी करणे हे लज्जास्पद आहे. संस्कृतसह आमच्या सर्व भाषा कोणताही आशय व्यक्त करण्यासाठी पुरेशा समृद्ध व सक्षम आहेत. आपल्याला या कामासाठी पश्चिमेच्या संज्ञांची उसनवारी करायला लागणे म्हणजे आमच्या राष्ट्रीय भाषांचे दारिद्र्य मान्य करण्यासारखे आहे.

या सर्व दृढ धारणा केवळ आमच्या राष्ट्रीय वारशाबद्दलच्या वास्तव जाणिवेतच रुजल्या आहेत असे नाही, तर त्यांना विकसनशील देशांतील प्रयोगांच्या अद्यावत माहितीचाही आधार आहे. हा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी अशा प्रकारचे एकच उदाहरण पुरेसे आहे.

प्रत्येक संस्कृतीचा स्वत:चा असा एक नमुना असतो. दुसऱ्या कोणत्याही सांस्कृतिक संदर्भातील विकासाचा नमुना आयात करणे अथवा परकीय हितसंबंधांतून लादला जाणे ही भयानक अनर्थकारी घातक बाब आहे.

Towards A History of Need, De-Schooling Society, Medical Nemesis, Tools of Conviviality इ. ग्रंथांचा प्रसिद्ध लेखक इव्हॅन इलिच याने आपला मेक्सिकोमधील 'विकासाचे मिथ्य' हा अनुभव सांगितला आहे. या विकासाचा

मेक्सिकोच्या दृष्टीने काय अन्वय असू शकतो हे त्याने सांगितले आहे. जेथे नियोजनाचे आराखडे बनविले जातात, कार्यवाहीचे मूल्यमापन केले जाते त्या शिखरावरून हे त्याने सांगितलेंले नाही किंवा नियोजनाची प्रमाणे म्हणून नोकरशहा व तंत्रज्ञ यांनी पुढे मांडलेल्या तात्त्विक व सांख्यिकी निष्कर्षांवरून तो हे म्हणत नाही तर समाजाचे अगदी तळावरून निरीक्षण करून त्याने हा अन्वय सांगितला आहे.

खेड्यांतील गरीब जनता आणि झोपडपट्यांतील लोक यांच्यावर या तथाकथित विकासाचे काय परिणाम झाले आहेत हेही त्याने स्पष्ट केले आहे. पारंपरिक कौशल्ये व उपजीविकेच्या अन्य साधनांचा लय, आपल्या समाजाशी असलेल्या प्रगाढ एकात्मतेचा, आत्मनिर्भरतेचा व आत्मप्रतिष्ठेच्या भावनेचा ऱ्हास, निसर्गाची लूट, आपल्या पारंपरिक परंपरेतून उखडले जाणे, बेरोजगारी, पारंपरिक आत्मनिर्भर समाजगट भुईसपाट करून त्याचे नगदी अर्थव्यवस्थेवर अवलंबून राहणाऱ्या समाजात सक्तीने रूपांतर करणे, सांस्कृतिक मुळे तोडून टाकणे आणि राजकारणातील भ्रष्टाचार - हेच ते सारे विदारक परिणाम आहेत. 'प्रगती, विकास म्हणतात तो हाच का?' असा प्रश्न तो विचारतो. या प्रगतीचा लाभार्थी असलेला समाज म्हणून ज्याच्याबद्दल दावा केला जातो त्याला या तथाकथित विकासाची किंमत मोजावी लागते कारण त्या समाजाच्या साफल्य कल्पनेशी व प्रत्यक्ष रोकड्या वास्तव परिस्थितीशी या विकासकल्पनेचा काडीमात्रही संबंध नसतो. मोठ्या उपरोधाने तो म्हणतो -

'घरबांधणीची योजना, एखाद्या विचाराची तार्किक संगती, लहान मुलाच्या मनाची जागृती, अथवा पौगंडावस्थेतील एखाद्या बालिकेची उमलती वक्षे - अशा सर्वच गोष्टींसाठी 'विकास' ही एकच अघळपघळ संज्ञा आज वापरली जाते. पण 'विकास' या संज्ञेने एक अर्थ निश्चित व्यक्त होतो. अतिशय संदिग्ध, अनुच्चारणीय, अप्रतिष्ठित अशा 'अविकसित' (Sub-desarollo) अवस्थेपासून मुक्त होण्याची माणसाची क्षमता! ही पराकोटीची दयनीय अविकसित अवस्था व्यक्त करणाऱ्या Sub-desarollo या संज्ञेचा प्रथम उच्चार १० जाने. १९४९ रोजी हॅरी ट्रुमनने केला.

उच्चारला जाताच जगभर मान्यता पावलेला या शब्दासारखा दुसरा शब्द क्वचितच असेल. पण त्याचा गैरफायदा घेणाऱ्या अनियंत्रणीय चिवट अशा नोकरशाहीची पिलावळ निर्माण करणारी ही संज्ञा ठरली हे खरे!'

पुढे तो म्हणतो - 'विकास म्हणजे दुसऱ्यांनी चोखाळलेल्या, दुसऱ्यांनी गाठलेल्या लक्ष्यापर्यंत पोचणाऱ्या मार्गावरील आपल्या वाटचालीचा प्रारंभ, एकेरी मार्गावरील घोडदौड! विकास म्हणजे सतत बदलत राहणाऱ्या तज्ञांच्या उपदेशापुढे दिलेला, पर्यावरणाचा, एकात्मतेचा, पारंपरिक अन्वयांचा आणि रीतीरिवाजांचा बळी! विकास ही कल्पना समृद्धीचे आश्वासन देते आणि बहुसंख्य समाजासाठी मात्र विकास म्हणजे दारिद्र्याचे उत्तरोत्तर वाढत जाणारे आधुनिकीकरण ठरते.'

म्हणून सारांशरूपाने तो म्हणतो -

'मेक्सिकोमधील निर्वाणीच्या समस्येमुळे 'विकास' हे लक्ष्य भुईसपाट करणे आम्हाला शक्य झाले आहे. मेक्सिकोमधील ज्या लोकांमध्ये मी राहतो त्यांना धोका निर्माण करणारा असा हा विकासाचा पाठपुरावा म्हणजे अत्यंत जीवघेणे मिथ्य आहे हे ओळखण्याची वेळ आली आहे.'

भाग ३

धर्म - आमची संदर्भचौकट

कोणत्याही अर्थपूर्ण चर्चेसाठी उचित असा संदर्भबिंदू आवश्यक असतो. सध्याच्या या चर्चेसाठी 'धर्म' हा संदर्भबिंदू असणे अपरिहार्य आहे.

केवळ काही लोक उपासनापंथ म्हणजे धर्म मानतात व त्यामुळे निधार्मिकतेला तो विरोधी मानतात. पण म्हणून आपण 'धर्म' हा संदर्भबिंदू म्हणून स्वीकारण्याची आपली सुयोग्य परंपरा सोडता कामा नये.

'धर्म' ही संकल्पना ही एक वैशिष्ट्यपूर्ण अशी खास भारतीय घटना आहे. अलिकडच्या काळात विचारवंतांना हळुहळू 'धर्म' आणि उपासनापंथ (Religion) यांच्यांतील फरक लक्षात यावयाला लागला आहे. भावनात्मकता व नैतिकता यांनी भारावलेला असा, कोणत्यातरी अदृश्य नियंत्रक सत्तेवरील विश्वास हा उपासनापंथ या कल्पनेत अभिप्रेत आहे. त्याचबरोबर अशा सत्तेबद्दल जागृत झालेल्या संवेदनेच्या आणि श्रद्धेच्या अनुषंगाने तिच्या उपासनेचे कोणतेतरी उपचार वा कोणतीतरी व्यवस्था हीही उपासनापंथ या संकल्पनेतच मोडते.

Legal and Constitutional History of India या ग्रंथात न्या. मू. एम्. रामा जॉयस् यांनी म्हटले आहे -

'धर्म ही संस्कृत भाषेतील अतिशय व्यापक अर्थवत्तेची एक संज्ञा आहे. तिला समानार्थी शब्द अन्य कोणत्याही भाषेत नाही. या संज्ञेची व्याख्या करणे निरर्थक आहे. तिचे केवळ स्पष्टीकरण करता येईल. तिच्यात विविध अशा व्यापक अर्थच्छटा आहेत. तिच्या अर्थाची व्यापकता केवळ काही नमुन्यांवरूनही ध्यानात येईल. उदा. धर्म म्हणजे न्याय, विशिष्ट परिस्थितीतील योग्य बाब, नैतिक, धार्मिक, (Religious) सद्हेतुपूर्ण सात्त्विक वर्तणूक, दान करणे, एखाद्या जीवाचे वा वस्तूचे नैसर्गिक गुणधर्म, कायद्याची प्रतिष्ठा असलेली रूढी वा प्रथा, शिवाय विहित असे राज्यशासन ! महाभारतात भीष्मांनी म्हटले आहे की धर्माची व्याख्या करणे कठीण आहे. जीवाच्या उन्नतीसाठी साहाय्यकारी होणारे ते सर्व म्हणजे धर्म असेही त्याचे स्पष्टीकरण केले गेलेले आहे. जीवांच्या कल्याणाची शाश्वती देणारे ते सर्व धर्मच आहे. म्हणूनच द्रष्ट्या ऋषींनी 'धारणा करणारा तो धर्म' असे म्हटले आहे.'

(*Dharma* is a Sanskrit expression of the widest import. There is no corresponding word in any other language. It would be also futile to attempt to give any definition of that word. It can only be explained. It has wide varities of meanings. A few of them would enable us to understand the width of that expression. For instance, the word '*Dharma*' is used to mean justice (*Nyaya*); what is right in a given circumstance; moral, religious, pious or righteous conduct; being helpful to living beings, giving charity or alms; natural qualities or characteristics or properties of living beings and things; duty, law and usage or custom having the force of law; and also a valid *Raja-Shasana*(Royal edict). In Mahabharat, Bhishma says, 'It is most difficult to define *Dharma*' *Dharma* has been explained to be that, which helps the upliftment of living beings. Therefore, that which ensures welfare (of beings) is surely *Dharma*. The learned rishis have declared that, 'that which sustains is *Dharma*')

पुढे त्यांनी असे म्हटले आहे की जेव्हा धर्म हा शब्द राजाची कर्तव्ये व अधिकार यांच्या संदर्भात वापरला जातो तेव्हा तो 'राजधर्म' होय आणि ज्यावेळी लोकांच्या शांतता - समृद्धीसाठी, समताधिष्ठित समाजरचनेसाठी 'धर्मराज्या'ची आवश्यकता आहे असे म्हटले जाते तेव्हा राज्य शब्दाच्या संदर्भात धर्म या शब्दाचा केवळ कायदा असाच अर्थ असतो. आणि धर्मराज्य म्हणजे कायद्याचे राज्य ! कोणत्याही उपासनापंथाशी (Religion) जोडलेले ईश्वरसत्ताक राज्य नव्हे !

न्या. मू. गजेंद्रगडकरांनी म्हटले आहे -

'हिंदू धर्म, जगातील इतर धर्माप्रमाणे कोणत्याही एकाच प्रेषिताचा दावा मांडत नाही, कोणाही एकाच देवतेची उपासना करीत नाही, कोणत्याही एकाच तत्त्वप्रणालीचा पुरस्कार करीत नाही, कोणत्याही एका प्रकारच्याच धार्मिक विधीचा वा उपचाराचा अवलंब करीत नाही, खरे म्हणजे कोणत्याही धर्माच्या वा उपासनापंथाच्या संकुचित पारंपरिक पैलूंचा प्रत्यय त्यात येत नाही, असे त्याचे वर्णन करावे लागेल. सत्याला अनेक पैलू असतात या जाणिवेतून आलेल्या अंतिम सत्याच्या निरंतर शोधातून प्रस्फुरित झालेला असा हा हिंदू धर्माचा विकास आहे, हे भारतीय तत्त्वविचाराच्या इतिहासाने अतिशय प्रभावीपणे दाखविले आहे. सत्य एकच आहे पण ज्ञानी लोक ते वेगवेगळ्या परिभाषेत मांडतात.'

(Unlike other religions in the world, the Hindu religion does not claim any one prophet. It does not worship any one God. It does not subscribe to any one philosophic concept, it does not follow any one set of religious rites or performances; in fact it does not appear

to satisfy the narrow traditional features of any religion or creed. It may be described as a way of life and nothing more. The history of Indian thought emphatically brings out the fact that the development of Hindu Religion has always been inspired by an endless quest of the mind for Truth, based on the consciousness that truth has many facets. Truth is one, but wise men describe it differently.)

आपल्या *Acquitted by History* या ग्रंथात सी. के. एन्. राजा यांनी म्हटले आहे की प्राचीन भारतीय न्यायशास्त्राप्रमाणे 'धर्म' म्हणजे केवळ इंग्रजी 'लॉ' या शब्दाला समानार्थी शब्द म्हणून गणला जाऊ शकणार नाही. कारण 'धर्म' या शब्दाचा अर्थ व त्याचा प्रयोग अतिशय व्यापक स्वरूपाचा आहे. केवळ इंग्रजी भाषेतील नेमक्या समानार्थी शब्दाच्या अभावी 'कायदा' हा शब्द 'धर्म' या शब्दाला त्यातल्या त्यात जवळ येणारा शब्द म्हणूनच मान्य करता येईल.

Dharma in ancient Indian jurisprudence cannot be considered a synonym for the Anglican word 'law' since the former has a wide connotation and application. However, in the absence of an exact equivalent for the word in English, 'Law' can be accepted as coming close to *Dharma*

म्हणून 'धर्म' या शब्दाने येथे 'कायदा' हा अर्थच व्यक्त होतो. उपासनापंथ (Religion) हा अर्थ व्यक्त होत नाही. भारताची भावी संस्थात्मक आकृतिबंधाची निश्चिती करताना धर्माची वैश्विक तत्त्वे हाच अटळ संदर्भ असणे आवश्यक आहे.

हे मात्र मनात नक्कीच केले पाहिजे की भारतातील, भविष्यातील संस्थात्मक रचनेचे विकसन कोणत्याही उपासनापंथाच्या प्रभावापासून मुक्त असले पाहिजे व ते सनातन धर्माच्या वैश्विक नियमांच्या प्रकाशातच झाले पाहिजे. डॉ. आंबेडकर म्हणतात त्याप्रमाणे उपासना (Religion) ही केवळ व्यक्तिगत बाब असते पण धर्म (Dharma) हा मात्र सामाजिक असतो.

अलिकडच्या काळात पं. दीनदयाळ उपाध्याय हे या सनातन धर्माचे एक मोठे समर्थ भाष्यकार होऊन गेले.

आतापर्यंतचे सर्व पश्चिमी विचारप्रवाह व एतद्देशीय विचारप्रणाली पूर्णत: आत्मसात करून व दुसऱ्या औद्योगिक क्रांतीनंतरच्या काळाच्या गरज लक्षात घेऊन पं. दीनदयाळ उपाध्यायांनी सनातन धर्माचेच युगसंगत रूप सिद्ध केले. ते रूप म्हणजेच त्यांनी मांडलेला एकात्म मानववाद होय. यत्किंचितही यथास्थितिवादी नसलेली भारतीय विचारप्रणाली पंडितजींनी सादर केली. जुनी व्यवस्था बदलली पाहिजे असे त्यांचे ठाम मत होते. नव्या व्यवस्थेचा त्यांच्या विचारातील आशय त्यांच्या खालील उल्लेखावरून स्पष्ट होतो.

'पण एक गोष्ट नक्की की अनेक जुन्या संस्था या नव्यांना जागा करून देतील. जुन्या संस्थांत हितसंबंध गुंतून राहिलेल्यांना ते अडचणीचे होईल. स्वभावत:च बदलाला अनुत्सुक असलेल्यांनाही हे परिवर्तन मानवणार नाही. पण व्याधींवर औषधी उपाय झालेच पाहिजेत. त्यामुळे यथास्थितिवादी मानसिकतेचा त्याग करून आपल्याला नवीन पर्व सुरू केले पाहिजे. आपल्या भूतकाळातील वारसाबद्दलच्या पूर्वग्रहांनी वा अनादराने आपल्या पुनर्रचनेचे हे प्रयत्न डागाळता कामा नयेत. त्याचप्रमाणे आज निरुपयोगी झालेल्या कालबाह्य संस्था व परंपरा यांना कवटाळून बसण्याचीही आपल्याला गरज नाही.'

(But one thing is clear, that many institutions will yield place to new ones. This will adversely affect those who have vested interests in the old institutions. Some others who are by nature averse to change will also suffer by efforts of reconstruction. But diseases must be treated with medicine. Therefore, we shall have to discard the status-quo mentality and usher in a new era. Indeed, our efforts of reconstruction need not be clouded by prejudice against or disregard for, all that is inherited from our past. On the other hand, there is no need to cling to past institutions and traditions which have outlived their utility.''

'एकात्मता' हा पंडितजींच्या मानववादाचा एक वैशिष्ट्पूर्ण भाग आहे. मानवी सुखसाधनेच्या कोणत्याही आराखड्यासाठी सुयोग्य अशा सामाजिक-आर्थिक व्यवस्थेची उपयुक्तता जरी त्यांना महत्त्वाची वाटत होती तरी त्यांचा भर मानवी जाणिवेच्या घडणीवर व विकासावर अधिक होता. कारण अशा कोणत्याही सामाजिक व्यवस्थेमध्ये कितीही मौलिक गुणवत्ता असली तरी अशा मानवी जाणिवेशिवाय ती इच्छित साध्य प्राप्त करू शकणार नाही.

व्यवहारत: धर्म या संकल्पनेत अपरिवर्तनीय, शाश्वत, वैश्विक नियम आणि त्याच्या प्रकाशात नित्य परिवर्तनशील अशा प्रकारची सामाजिक, आर्थिक व्यवस्था या दोन्हींचा समावेश आहे. उदा. स्त्री-पुरुषांच्या नात्यातील नैतिकता हा वैश्विक नियम आहे. पण ही नैतिकता टिकविण्यासाठी व वाढविण्यासाठी प्रस्थापित झालेल्या संस्थात्मक व्यवस्था (कुटुंब, विवाहसंस्था या सारख्या) कधीही शाश्वत वा वैश्विक असणार नाहीत. त्या वेगवेगळ्या काळात व वेगवेगळ्या पर्यावरणात वेगवेगळ्या असणार. आपल्या देशातही काळानुसार बदलत्या अशा अनेक व्यवस्था राहत आल्या आहेत. खिस्ती धर्मपीठाच्या काही जाचक बंधनांच्या विरुद्धची प्रतिक्रिया म्हणून मार्क्ससकट काही युरोपीय विचारवंतांनी विवाह व कुटुंबसंस्था यांचा धिक्कार केला आहे. त्यामुळे खऱ्या साम्यवादी कार्यकर्त्याला नैतिकतेची आवश्यकता नाही अशा प्रकारचा गैरसमज, साम्यबादी वर्तुळामध्ये पसरला व त्यांनी 'इंक-पॉट' प्रणालीचा[३]

पुरस्कार केला. पण लेनिन आणि ट्रॉटस्की यांच्यासारख्या जबाबदार नेत्यांनी या प्रणालीचा धिक्कार केला. कारण त्यांच्या मते जो स्वत:च्या खाजगी जीवनात विश्वासाने विसंबण्यासारखा नसेल तो सार्वजनिक आयुष्यातही विश्वसनीय असूच शकणार नाही. तेव्हा वेळोवेळीच्या बदलत्या सामाजिक जीवनाशी संगती राखून त्या अनुषंगाने विवाहसंस्थेतही बदल होत जातात. (पण स्त्री-पुरुष संबंधातील नैष्ठिक नैतिकता हा मात्र विश्वात्मक, सार्वकालीन संकेत आहे.)

पश्चिमी नमुन्याच्या अपयशामुळे आणि ऐतिहासिक घडामोडींमधील लक्षणीय फरकामुळे आपल्या राष्ट्रोत्थान प्रयासासाठी काही नवीन लक्ष्य वा साध्य पुढे ठेवणे आवश्यक आहे.

आपल्या भूतकाळातील परंपरा, वर्तमान आवश्यकता व भविष्यातील आकांक्षा यांच्या अनुषंगाने आपल्या संस्कृतीच्या प्रकाशात आपण प्रगती व विकासाचा स्वत:चा असा नमुना साकारला पाहिजे. आपण पश्चिमी नमुन्याचा सखोल अभ्यास केला पाहिजे, पण आपल्या भविष्यासाठी आंधळेपणाने तो आपला विकासाचा नमुना म्हणून जसाच्या तसा स्वीकारता कामा नये.

पं. दीनदयाळ उपाध्याय यांनी मांडलेले सनातन धर्माचे युगसंगत असे व्यवहार्य स्वरूप लक्षात घेऊन आपल्याला भारताच्या भावी संस्थात्मक आकृतिबंधाचा विचार करावा लागेल. आमच्या राष्ट्रीय पुनर्रचनेच्या दृष्टीने तोच संदर्भबिंदू होणे आवश्यक आहे. याठिकाणी मांडलेली सर्व सूत्रे म्हणजे केवळ त्याच मध्यवर्ती संकल्पनेतून तार्किक अपरिहार्यतेने अवतरलेली प्रमेये आहेत.

भाग ४

गंतव्य कोणते ?

हा प्रवास आरंभण्यासाठी, मार्ग निश्चित करणे आवश्यक आहे.

'Ideology as a Cultural System' या ग्रंथात क्लिफोर्ड गीट्झने (Clifford Geertz) म्हटले आहे की -

'तत्त्वप्रणाली म्हणजे लोकांना अपेक्षित राजकीय गंतव्याकडे नेणारे मार्गदर्शक नकाशे असतात.'

(Ideologies function as road maps guiding people to desired political end.)

तत्त्वप्रणाली या अधिक राष्ट्रीय पुनर्निर्माणाच्या दृष्टीनेही मार्गदर्शन करीत असतात.

पण तत्त्व प्रणाली ! परिपूर्णतेचे कल्पनारम्य आदर्श संकल्पन (Utopia)[४] नव्हे !

* * * * *

पण कल्पनारम्य आदर्शवादात रमणाऱ्या सर्वांना आराखड्याची असोशी असते.

अभियांत्रिकी योजनेची अखेरची अवस्था दाखवणाऱ्या निळ्या छायाचित्रात्मक प्रतिमेप्रमाणे हा आराखडा (Blue Print) म्हणजे पार पाडावयाच्या कार्याची तपशीलवार योजना असते. सर्व काल्पनिक आदर्शवाद्यांना त्यांच्या स्वप्नभूमीच्या (El - Doradao)[५] आराखड्याची ओढ असते.

अलिकडेच पश्चिमेमध्ये भविष्यातील संभाव्य घडामोडींचा वेध घेणारे नवे शास्त्र (Futurology) विकसित होत आहे. विशेषत: वर्तमानातील सामाजिक प्रवाहांच्या आधारावर शास्त्रशुद्धतेने भविष्याची उकल करण्याचा हा प्रयत्न आहे (Futurology हा शब्द जर्मन इतिहासकार ऑसिप फ्लेक्थीम [Ossip Flechtheim] याने १९४९ मध्ये बनविला.)

पण हे भविष्यशास्त्र स्वप्नरंजनात्मक आदर्शवादापेक्षा वेगळ्या भूमिकेवर उभे आहे.

भविष्यशास्त्रवेत्ते हे 'आराखड्या'च्या मागे नाहीत तर त्यांना भविष्याचा वेध घेण्यात स्वारस्य आहे.

तत्त्वप्रणाली या मार्गदर्शक नकाशे देतात. हिंदू राष्ट्रवादी हे अशा नकाशांनी सज्ज आहेत. पण गेली काही दशके 'ब्लू प्रिंट' या कल्पनेचे, साम्यवादी विचारवंतांनी व विशेषत: महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये काम करणाऱ्यांनी हेतुत: स्तोम माजविलेले दिसते.

म्हणून या मुद्यावर थोडे स्पष्टीकरण आवश्यक वाटते.

कार्ल मार्क्सचे ब्लू प्रिंटबद्दल काय म्हणणे होते ?

आदर्श साम्यवादी समाजाची व त्या आदर्श स्थितीकडे नेणाऱ्या वेगवेगळ्या अवस्थांची समग्र कल्पना देण्याची विनंती जेव्हा त्याला करण्यात आली तेव्हा त्याची प्रतिक्रिया काय होती ?

Three Faces of Marxism मध्ये हे स्पष्ट केले गेले आहे.

'व्यक्तिगत अशा व्यावहारिक प्रश्नांच्या उकलीच्या अनुषंगाने विचारल्या गेलेल्या या अवस्थांच्या व उपायांच्या तपशीलवार विकसनाबद्दल मार्क्स व एंजल्स यांनी चर्चा नाकारली आहे. कारण त्यांच्या मते अशी चर्चा म्हणजे केवळ आदर्शात्मक अंदाजच (Utopion speculations) असतो. मार्क्सने तर घोषित केले की कामगारवर्गासमोर सज्ज अशी कोणतीच आदर्श प्रणाली नाही व केवळ जुन्या कोसळणाऱ्या प्रतिगामी समाजाच्या पोटात असलेली नव्या समाजाची तत्त्वे मुक्त करण्यावाचून दुसरा कोणताही आदर्श त्याच्यापुढे नसतो. भावी समाजाच्या घडणीची, आदर्शात्मक संकल्पनचित्रातील व्यवस्था, पुढे ठेवणे हे साम्यवाद्यांचे कार्यच नाही. तपशीलाचा प्रश्न तर दूरच राहिला. भावी समाजातील अन्न आणि निवारा अशा गोष्टींच्या वाटपाचे अंदाज करणे ही गोष्ट थेट अशा आदर्श संकल्पनाचित्रापर्यंत जाऊन पोचते. भविष्यात त्यांनी काय काय करावे याबद्दलच्या आपल्या आजच्या धारणांना, भविष्यातील साम्यवादी समाजातील लोक कवडीची किंमत देणार नाहीत.'

As for the detailed development of these phases and the solutions that would have to be found for individual practical questions, Marx and Engels declined all discussion, since they regarded this as Utopian speculation.' The working class (has) ---no readymade Utompias to introduce *'par de'cret people.'*, Marx declared, they have no ideals to realise but to set free the elements of new society with which the old collapsing bourgeois society already is pregnant.' It is not the task of Communists to create Utopian systems for the organisation of future society least of all in questions of details. To speculate on how a future society might organize the distribution of food and dwellings heads directly to Utopia. The people of the Communist Society of the future will not care a rap about what we to-day think they should do.)

भारतीय जनसंघाच्या आराखड्याबद्दल काही महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी पं. दीनदयाळ उपाध्यायांना विचारले असता पं. दीनदयाळ उपाध्यायांनी प्रतिप्रश्न केला,

'भविष्यातील पिढ्यांचे हात तुम्ही बांधून ठेवू इच्छित आहात काय ?'

गांधीजींच्या मनातही अशा आकर्षणाच्या मानसिकतेबद्दल हीच नाराजी होती. म्हणूनच गांधी सेवा संघाच्या ढाका येथील अ. भा. अधिवेशनात २० फेब्रु. १९४० रोजी त्यांनी 'गांधीवाद' ही संज्ञा प्रचारात येऊ नये याबद्दलची आपली उत्कट, प्रामाणिक इच्छा व्यक्त केली.

साम्यवादी रशियाच्या ब्लू प्रिंटबद्दलच्या स्वा. वी. सावरकरांनी प्रश्न केला असता लेनिन नुसता हसला व म्हणाला, 'कार्यवाहीची अवस्था प्राप्त झाल्यानंतरच ब्लू प्रिंट आकाराला येऊ लागतो. तोपर्यंत मार्क्सने दिलेल्या स्थूल मार्गदर्शक सूत्रांच्या आधारानेच क्रांतिकारकांना आपले कार्यक्रम राबवावे लागतात.' दुसऱ्या एका प्रसंगी लेनिनने हे स्पष्ट केले आहे की, मार्क्सने समाजवादाच्या अर्थशास्त्राबद्दल अक्षरही लिहिलेले नाही.

जे. बी. वाडिया या त्यांच्या निकटतम सहकाऱ्याने मानवेंद्रनाथ रॉय यांची या विषयातील भूमिका स्पष्ट केली आहे –

'आदर्शात्मक अवस्थेची शेवटची परिणती असलेल्या समाजव्यवस्थेची रॉय कल्पना करू शकत नव्हते. कारण अशी आदर्शात्मक अवस्था शेवटच्या अर्थाने परिपूर्णताच होय. आणि अशी पूर्णता म्हणजे कुंठितता. म्हणजे जीवशास्त्रदृष्ट्या मृत्यूच ! म्हणून त्यांच्या मते जरी मानवाने युटोपिआ साध्य केला तरीही जर पुढील अत्यंत उत्तेजक अशा जीवनाच्या साहसाचा शोध घेण्याची एक पायरी म्हणून ही आदर्शात्मक अवस्था उपयोगी पडणार नसेल तर मग ही अवस्था म्हणजे तिच्या जीवितहेतूचा पराभव ठरेल. रॉयना यादृष्टीने अजिबात घाई नव्हती.'

(He [i. e. M. N. Roy] did not conceive of a state of society which would become the last word in Utopia. Because Utopia in its final analysis is perfection. Perfection implies stagnation, and stagnation is death, biologically speaking. Hence he maintained that even when man attains Utopia, it will defeat its purpose if it does not become a stepping stone to still futher explorations in the exciting adventure of life. Roy was not a man in a hurry.)

* * * * *

कुठल्याही आदर्शांशी न बांधलेले लोक जगात शहाणे ठरतात. ते जगातील सुखी लोक असतात.

त्यापुढील शहाणी माणसे म्हणजे ज्यांना आपल्या लक्ष्याची कल्पना आहे पण तरींही हिंदुस्थानला पोचण्याचे निश्चित करूनही प्रत्यक्षात मात्र अमेरिकेला पोचले तरी त्यामुळे ते फारसे अस्वस्थ होत नाहीत.

शेवटी ते कुठेतरी पोचलेले असतात.

अशा लोकांबद्दल अलेक्झांडर पोपने म्हटले आहे

'(हे लोक) संपूर्ण विश्वासाठी जन्मलेले पण मन संकुचित केलेले (असतात.) - अवघ्या मानवजातीसाठी जे होते ते त्यांनी छोट्या गटाला दिले.'

(Born for the Universe, narrowed his mind and to party gave up what was meant for mankind.)

सिसितफस सारखे[६] लोक हे खरं आदर्शवादी !

ते प्रचंड दगड ढकलित टेकाडावर नेण्याचा प्रयत्न करतात आणि तो खाली गडगडल्यावर पुन्हा पायथ्यापासून प्रारंभ करतात.

ते महामूर्ख असतात.

पण तेच 'कुठे जायचे आहे ?' (ध्येय, लक्ष्य, काय असू शकते ?) या प्रश्नावर विचार करायला खरे समर्थ असतात. इतरांनी आपला अमोल वेळ व शक्ती या व्यापारावर फुकट खर्ची घालू नये.

* * * * *

आपले 'गंतव्य स्थान' मात्र १९२५ च्या विजयादशमीच्या मुहूर्तावरच मनश्चक्षूंसमोर स्पष्ट झाले होते.

हिंदू राष्ट्राचे परमवैभव हेच ते गंतव्य होय –

आणि काही जीवनश्रद्धांशी बांधिलकी हा त्या प्रवसाचा प्रारंभ बिंदू होय –

एक समाज (जन) म्हणजे हिंदू समाज

एक संस्कृती म्हणजे हिंदू संस्कृती
एक राष्ट्र म्हणजे हिंदू राष्ट्र
एक देश म्हणजे अखंड भारत
एक व्यवस्था म्हणजे धर्मराज्य

आम्हाला आमच्या गंतव्याचा पुन्हा शोध घेण्याची गरज नाही. जर काही करावयाचे असेल तर ते म्हणजे या 'परम वैभवा'चा सर्व अभिप्रेत आशय स्पष्ट करावयाचा आहे.

संदर्भ टीपा

१. नफार कुंडू प्रवृत्ती (Nafar Kundu spirit) – गटाराच्या मोरीच्या तोंडातून आत पडलेल्या व सांडपाण्याने वेढल्या गेलेल्या लहान मुलाला वाचविण्यासाठी स्वत:च्या जिवाची कुर्बानी करणारा कलकत्त्याचा एक सामान्य कामगार – नफार कुंडू – जिवावर उदार होऊन सेवा करण्याच्या त्याच्या या प्रवृत्तीचा उल्लेख.

२. हरक्युलसप्रमाणे - (Herculean) - ग्रीक पुराणातील Herakles (इंग्रजी - Hercules)- झीअस व अल्क्मेनी यांचा मुलगा. प्रचंड आकाराचा व ताकदीचा नमुना - याच्यासारखा विराट प्रयत्न.

३. इंक - पॉट प्रणाली - (Ink pot Theory)-स्त्री - पुरुषांच्या विवाहबाह्य, स्वैर, सर्वसंमत संबंधांचा उल्लेख करणारी प्रणाली - दौतीची प्रतिमा ही याच अर्थाने वापरली आहे. सच्च्या साम्यवादी कार्यकर्त्याच्या दृष्टीने स्त्री - पुरुषसंबंधांत कोणत्याही प्रकारचा नैतिक विधिनिषेध पाळण्याची गरज नाही अशाप्रकारच्या चुकीच्या धारणेतून निमाण झालेली प्रणाली.

४. युटोपिया (Utopia)- परिपूर्णतेचे कल्पनारम्य आदर्श संकल्पन - सर थॉमस मूर या इंग्लिश लेखकाच्या Utopia याच नावाच्या राजकीय रम्याद्भुत विडंबनात्मक अशा लॅटिन कलाकृतीतील कायदा, न्यायव्यवस्था, राजकीय व्यवस्था इ. बाबतीतील आदर्श असे काल्पनिक राज्य – त्यावरून कोणतीही कल्पनारम्य अशी परिपूर्णतेची स्थिती हा सामान्य अर्थ या शब्दाला प्राप्त झाला.

५. एल् - डोरॅडो - (El - Dorado) प्रारंभीच्या दर्यावर्दी स्पॅनिश शोधकांचे लक्ष्य असलेले दक्षिण अमेरिकेतील एक काल्पनिक समृद्ध शहर - मूळ स्पॅनिश शब्दसंहती - पुढे ही संज्ञा केवळ स्वप्नरम्य ध्येयाचा उल्लेख करण्यासाठी पश्चिमी परिभाषेत वापरली जाऊ लागली.

६. सिसिफस - ग्रीक - कोरिन्थ (Corinth) चा राजा - प्रचंड शिळा टेकडीवर ढकलत नेण्याची शिक्षा, टारटॅरस (Tartarus) येथे त्याला देण्यात आली होती. ही शिळा वर नेताना शिखराच्या अगदी जवळ आल्यावर खाली गडगडत असे व तो पुन्हा ती वर नेत असे. असे निरंतर चालले होते.

□ □ □

संदर्भ चौकट – हिंदू जीवनदृष्टी

आजच्या संभ्रमित व संत्रस्त मानवतेला भविष्यातील मार्गक्रमणाचा 'तिसरा मार्ग' आपल्या राष्ट्रीय पुनर्निर्माणातून उपलब्ध करून देण्याचा संकल्प 'दिशावेध प्रारूपात' पाहिला. हा संकल्प सिद्ध होण्यासाठी, अशा राष्ट्रीय पुनर्निर्माणाचा आधार, म्हणजे अतिशय प्रगल्भ व उन्नत राष्ट्रीय जाणीव निर्माण करणे आवश्यक आहे हेही आपण पाहिले.

'दिशावेध प्रारूपा'तील 'धर्म' या भागात स्पष्ट केल्याप्रमाणे आपल्याला अभिप्रेत असलेला विकासाचा भावी नमुना - तिसरा मार्ग - भूतकाळाच्या आधारावर, वर्तमानाच्या आवश्यकतेचे भान ठेवून आणि भविष्यातील आकांक्षांकडे लक्ष देऊन साकारणे आवश्यक आहे. कारण नित्य, अपरिवर्तनीय, वैश्विक सूत्रांच्या प्रकाशातील सतत बदलणाऱ्या सामाजिक, आर्थिक व्यवस्थांची संकल्पना हा हिंदू जीवनदृष्टीला अभिप्रेत असणाऱ्या परिवर्तनाच्या प्रक्रियेचा गाभा आहे. त्यामुळेच वर प्रारंभी उल्लेखिलेली उन्नत राष्ट्रीय जाणिवेच्या निर्माणाची आवश्यकता ही आपले लक्ष आपल्या परंपरापूत हिंदू जीवनमूल्यांकडे वेधून घेते. समाजाच्या सांस्कृतिक सत्त्वाशी मेळ नसलेल्या अशा विकासाच्या कोणत्याही पर्यायाचे कलम समाजाला लाभदायक होत नाही.

त्यादृष्टीने तिसऱ्या पर्यायाच्या, पुढील सर्व विचाराला अधिष्ठानरूप अथवा पृष्ठभूमी म्हणून, हिंदू जीवनदृष्टीची ठळक वैशिष्ट्ये पहाणे उपयुक्त ठरेल. अर्थात ही वैशिष्ट्ये प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने आवश्यक तेवढीच मर्यादित स्वरूपात पहावयाची आहेत. समग्र हिंदू जीवनपद्धतीचे विवरण या ठिकाणी अभिप्रेत नाही.

परिपूर्ण आनंद हेच लक्ष्य

यादृष्टीने हिंदू जीवनपद्धतीचे मूलभूत विशेष पहायला प्रारंभ केला की लक्षात येते की परिपूर्ण, सधन, शाश्वत आणि अखंड आनंद हे आयुष्याचे ध्येय मानले गेले आहे. हा आनंद परिपूर्ण असण्यासाठी तो शारीरिक, मानसिक, बौद्धिक व आत्मिक अशा सर्व स्तरांना सामावून घेणारा असला पाहिजे.

भौतिक व अभौतिक यांचे सुसूत्रीकरण

'दिशावेध प्रारूपा'त म्हटल्याप्रमाणे हिंदू जीवनदृष्टीने भौतिक व अभौतिक ही जीवनाची दोन अटळ अंगे मानली आहेत व ती म्हणजे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्यांतील कोणत्याही एकाचाच पाठपुरावा म्हणजे व्यक्ती आणि समाज यांच्या जीवनात असंतुलन निर्माण होणे असाच अनुभव आहे. त्यामुळे भौतिक व अभौतिक या दोन्ही अंगांचे समग्र सुसूत्रीकरण करण्यासाठीच चार पुरुषार्थांची संकल्पना ही हिंदू जीवनपद्धतीने विकसित केली आहे. अर्थ व काम हे भौतिक पुरुषार्थ आणि धर्म व मोक्ष हे अभौतिक पुरुषार्थ मानले आहेत. पण त्यातही क्रमाचा (धर्म - अर्थ - काम - मोक्ष) विचार केला तर त्यातूनही या जीवनदृष्टीचे सूत्र स्पष्ट होते. धर्माच्या म्हणजेच सामाजिक नैतिकतेच्या अधिष्ठनावर अर्थ व काम यांच्याद्वारा भौतिक साफल्याचा लाभ आणि त्यातून पुढे आध्यात्मिक साफल्य म्हणजे मोक्ष असा क्रम मानला आहे. म्हणजेच अर्थ व काम या भौतिक पुरुषार्थांना दोन्ही बाजूंनी धर्म व मोक्ष या अभौतिक पुरुषार्थांचे नियंत्रण प्राप्त झाले आहे. व्यक्तीचा आनंद समुच्चयाने शारीरिक, मानसिक, बौद्धिक व आध्यात्मिक असण्याचा हा मार्ग आहे. त्यामुळेच भौतिक हे केवळ भौतिक नाही व अभौतिक हेही केवळ अभौतिक नाही.

आत्मनो मोक्षार्थं जगत् हिताय च।

अशाप्रकारच्या, मानवी व्यक्तिमत्त्वाच्या परिपूर्ण व सर्वांगीण विकासासाठी, त्याच्या सर्व गुणवत्ता व क्षमता यांच्या पूर्ण विकसाला वाव देणारी सामाजिक, आर्थिक व्यवस्था ही अशा साफल्याची पूर्वअट मानली आहे. त्यामुळे या सामाजिक, आर्थिक संदर्भातून हा केवळ व्यक्तिगत साफल्याचा मामला रहात नाही. उलट या बरोबरीनेच मानवी सौख्य आणि आत्म्याचे उन्नयन व मुक्ती यावर आधारलेले जगत्कल्याण हे आपल्या ऋषींनी जीवनाचे लक्ष्य सांगितले आहे. (आत्मनो मोक्षार्थम् जगत् हितायच।)

याप्रमाणे व्यक्तीच्या सुखसाधनेचे वैयक्तिक - सामाजिक त्याचप्रमाणे भौतिक - अभौतिक असे चतुर्विध संदर्भ हे हिंदू जीवनदृष्टीचे वैशिष्ट्य आहे.

हिंदू राष्ट्राचे एक प्रणेते बिपिनचंद्र पाल यांनी म्हटले आहे -

'स्वाधीनता व स्वातंत्र्य या आमच्या संकल्पनांचे मूल्य आणि व्यवच्छेदकता ही 'स्व' या शब्दाच्या अर्थाच्या भव्यतेत सामावलेली आहे. हा 'स्व' वैयक्तिक आत्मा आणि त्याचबरोबर विश्वात्माही आहे आणि दोन्ही एकच आहे. ज्या प्रमाणात विश्वात्म्याशी असलेल्या आपल्या एकात्मतेची मनाची जाणीव विस्तारत जाईल, त्या प्रमाणात मनाच्या खऱ्या मुक्तीची व स्वाधीनतेची संकल्पना विस्तारत जाईल.

केवळ शारीरिक व भौतिकच नव्हे तर नैतिक व आध्यात्मिक पैलूंबाबतची मानवाची परिपूर्णता ही संस्कृतीची परिणती आहे. एवढेच नव्हे तर संपूर्ण सामाजिक एकात्मतेचा एक अवयव किंवा इंद्रिय या नात्याने एक सामाजिक घटक म्हणून माणसाची परिपूर्तता

हाही सांस्कृतिक ध्येयाचा एक भाग आहे.

The peculiar value and distinction of our concept of *Swadhinata* (Self - depedence) and *Swatantrya* (Self - subjection) lies in the grandeur of the connotation of the word (*swa*) or self. This *swa* is both the individual self and Universal Self; and the two are really one. And *mana's* range of real freedom or self-depedence, as we would call it, expands in proportion as he is able to realise his unity with Universal Self.

The ideal end of. civilisation is perfection of man, not merely in his physical and material, but equally also, in his moral and spiritual aspects. It is more, it is the perfection of a man as a social unit, as a limb and organ of the social whole.)

याप्रमाणे व्यक्तिगततेपासून विश्वात्मकतेपर्यंत होणारा मानवी जाणिवेचा विकास म्हणजे हिंदुत्व !

एकात्म दृष्टिकोण हाच महत्त्वपूर्ण विशेष

अशाप्रकारचा एकात्म दृष्टिकोण हा हिंदू जीवनदृष्टीचा महत्त्वपूर्ण विशेष आहे.

त्यामुळेच अनेकतेमध्ये एकता पहाणे, 'अविभक्तं विभक्तेषु।' हा सनातन धर्माचा शाश्वत संदर्भ आहे.

पश्चिमी जीवनदृष्टीत वस्तुमात्र हा पाया व मानवी मन हा त्यावरील इमला मानला आहे. त्यामुळे समाजधारणेच्या विचारात आधी सामाजिक - आर्थिक रचना व त्यातून व्यक्ति - समाजमनातील बदल हा क्रम मानला आहे. हिंदू ऋषींनी वस्तुजात व मन हे दोन्ही महत्त्वाचे मानले आहेत. पण ज्याअर्थी निसर्गाने मानवाला निर्णयशक्ती दिली आहे त्याअर्थी मन हे अधिक मूलभूत आहे, असे मानले आहे.

प्रथम सुसंगत आत्मगत परिवर्तन

त्यामुळेच सर्वसाधारणपणे हे मान्य झाले आहे की सुसंगत आत्मगत मानसिक परिवर्तनाशिवाय कोणताही भौतिक बदल यशस्वी होऊ शकत नाही.

त्यातल्या त्यात संस्थात्मक चौकटीतील बदल तुलनेने सोपे असतात. पण तेही जोडीने समाज - व्यक्तिमनातील बदलाशिवाय अपेक्षेप्रमाणे पुरेसे फलदायी होऊ शकत नाहीत. जोपर्यंत सुसंगत, आत्मगत क्रांती होत नाही तोवर बाह्य वस्तुगत क्रांती कधीही यशस्वी होऊ शकणार नाही. अशा आत्मगत क्रांतीचे स्वरूप काय असते? न्या. रानडे यांनी ते स्पष्ट केले आहे –

'आपणा सर्वांना अपेक्षित असलेला बदल म्हणजे बंधनापासून स्वातंत्र्याकडे, भोळसटपणाकडून श्रद्धेकडे, अधिकारवादापासून विवेकाकडे, असंघटितपणाकडून

परस्परसहिष्णुतेकडे, आंधळ्या नियतिवादाकडून मानवी प्रतिष्ठेच्या भावाकडे नेणारा असावा. हीच या देशातील व्यक्तिव्यक्तीसाठी व समाजासाठीही सामाजिक क्रांती आहे असे मी समजतो.'

(The change which we should all seek is thus a change from constraint to freedom, from credulity to faith, from status to contract, from authority to reason, from unorganised to organised life, from bigotry to toleration, from blind fatalism to sense of human dignity. This is what I understand by social revolution both for individuals and societies in this country.)

'दिशावेध प्रारूपात' विल् दुरांटचे जे अवतरण दिलेले आहे त्यावरूनही हे स्पष्ट होते की मानवाच्या प्रवृत्तीत बदल न करताच जर संस्थात्मक बदल करण्याचा प्रयत्न केला तर ते न बदललेले मानवी मन जुन्या निरुपयोगी, कालबाह्य संस्था पुनरुज्जीवित करण्याचा प्रयत्न करते.

धर्म म्हणजे काय

अशा प्रकारच्या कोणत्याही परिवर्तनासाठी आपल्या संस्कृतीत धर्म हाच संदर्भबिंदू मानला आहे हे पूर्वी स्पष्ट केले आहे. यादृष्टीने पाहिले तर धर्म म्हणजे धार्मिक (Religious), नैतिक, सामाजिक, राजकीय, न्यायव्यवस्थात्मक आणि रूढिवजा असे, समाजाची सेंद्रिय एकात्मतेने धारण करणारे तत्त्व आहे. धर्माच्या संकल्पनेत स्वत:च्या वैशिष्ट्यपूर्ण नमुन्याबरहुकूम स्वत:चे साफल्य प्राप्त करून घेणे अपेक्षित आहे. असे साफल्य प्राप्त करून घेणाऱ्या प्रत्येक गटाचे, एकात्म जगातील संवादी, परस्परपूरक अशा नातेसंबंधांच्या समान चौकटीमध्ये होणारे सात्म्य अपेक्षित आहे आणि त्याचद्वाराच अशा एकात्म जगात प्रत्येक गटाने संपूर्ण मानवतेच्या सामूहिक शहाणपणात स्वत:ची वैशिष्ट्यपूर्ण भर घालावी व ते समृद्ध करण्याचा प्रयत्न करावा हे सारे गृहीत धरले आहे.

हिंदू जीवनदृष्टीने विकसित केलेल्या 'धर्म' या संकल्पनेचे काही विश्लेषण 'दिशावेध प्रारूपा'त काही महनीय विचारवंतांच्या अवतरणांच्या आधारे मांडले आहे. योग्य त्या संदर्भात पुढेही 'धर्म' या संकल्पनेची चर्चा येईलच.

हिंदूंची परिवर्तनपद्धती

मानवी व्यक्तिमत्त्वाच्या पूर्ण विकासाला वाव देऊन माणसाला शाश्वत आनंदाची प्राप्ती करून देणारी सामाजिक - आर्थिक व्यवस्था प्रस्थापित करणे ही जीवितसाफल्याची पूर्वअट आहे, हे आताच पाहिले. अशा प्रकारची व्यवस्था निर्माण करण्याची व तिच्यात वेळोवेळी आवश्यक ते बदल घडवून आणण्याची हिंदूंची कोणती पद्धती

राहिली आहे ?

प्रारंभी यासंबंधीचे सूत्र मांडले आहे. सनातन धर्माच्या शाश्वत वैश्विक सिद्धातांच्या प्रकाशातील सतत परिवर्तनीय सामाजिक-आर्थिक व्यवस्था ही आमची कार्यपद्धती राहिली आहे. संदर्भ बिंदू-धर्म - हे मार्गदर्शक तत्त्व अपरिवर्तनीय परंतु त्या त्या देशकालपरिस्थितीप्रमाणे आवश्यक त्या गरजा लक्षात घेऊन या सनातन धर्माचा युगानुकूलतेने सिद्ध केलेला अन्वय म्हणजे युगधर्म होय.

म्हणूनच अशा धर्माच्या प्रकाशात नव्या आव्हानांना तोंड देणाऱ्या सामाजिक - आर्थिक व्यवस्थांची प्रस्थापना करणाऱ्या विविध स्मृती !

म्हणूनच योगी अरविंदांनी म्हटल्याप्रमाणे भारतातील सामाजिक - आर्थिक, राजकीय विचारवंतांनी, धर्मशास्त्र व अर्थशास्त्र (समाज - शासनशास्त्र) यांच्या अभ्यासकांनी समाज व शासन यांच्यासंबंधी अमूर्त बौद्धिक असे आदर्श आणि व्यवस्था बनविण्याचा उद्योग कधी केला नाही, तर समाजमनाने आणि समाजजीवनाने आधीच अवलंबलेल्या, विकसित केलेल्या संस्था आणि सामूहिक जीवनाचे मार्ग हे स्वत:च्या व्यावहारिक विवेकाने समजून घेण्याचा व नियंत्रित करण्याचा प्रयत्न केला आणि मूळ तत्त्वांना धक्का न लावता त्यांचा विकास करून त्यांची निश्चिती करून, त्यांच्यांत सुसंवाद घडवून आणला.

असे असल्यामुळेच कोणत्याही व्यवस्थेच्या रचनेसाठी वा प्रस्थापनेसाठी कोणत्याही बाह्य प्रणालीची जरूरी आमच्या समाजाला भासली नाही !

कारण कोणतीही प्रणाली म्हणजे खास करून वास्तव आणि वैशिष्ट्यपूर्ण घटिते यांच्या निरपेक्ष अशी काही गृहीतके वा कल्पना यांची जुळणी असते. स्पष्टीकरण करणारे, अंदाज बांधणारे (विशेषत: कल्पनारम्य) अथवा अमूर्त ज्ञान अथवा अनुमित विचारप्रक्रियेच्या स्वरूपाच्या, एखाद्या शास्त्राचे उद्घाटन करणारे असे ते क्षेत्र आहे.

पण प्रणाली या साधनरूपच असतात. बर्ट्रांड रसेलने *'Science and Values'* या आपल्या .ग्रंथात डिवे (Deway)या विचारवंतांचे म्हणणे उद्धृत केले आहे. शास्त्रप्रणाली या वेळोवेळी बदलत असतात आणि कोणत्याही प्रणालीच्या सार्थ तथ्यतेचा निकष जर कोणता असेल तर तो म्हणजे, ती प्रणाली प्रत्यक्ष कृतीत येण्याजोगी असणे, हा होय. जेव्हा नव्या वैशिष्ट्यपूर्ण घटितांबद्दल ती प्रणाली कृतिशील ठरू शकत नाही तेव्हा ती रद्द केली जाते. म्हणूनच डिवेचा निष्कर्ष असा आहे की कोणत्याही इतर साधनांप्रमाणेच प्रणाली याही साधनरूपच आहेत. या साधनांमुळे कच्च्या मालाचा हवा तसा उपयोग करता येतो. अशाप्रकारच्या उपयोग करून घेण्याच्या क्षमतेवरच कोणत्याही इतर साधनांप्रमाणेच एखादी प्रणाली चांगली वा वाईट ठरत असते. एकच प्रणाली एखाद्या वेळी चांगली ठरते तर दुसऱ्यावेळी वाईट ठरते. ज्यावेळी ती चांगली ठरते त्यावेळी तिला 'खरीही' म्हणता येते. पण सत्य - खरी या शब्दांचा नेहमीचा अर्थ येथे घेऊन चालणार नाही. म्हणूनच डिवे

'सत्य' या शब्दाऐवजी 'कालोचित ठाम समर्थनीयता' (warranted assertibility) असा शब्द योजतो.

आव्हानांच्या व निर्वाणीच्या प्रसंगी आपण धर्माचा आधार घेत असू. अशाप्रकारच्या शाश्वत मार्गदर्शकाचा फायदा पाश्चिमात्यांना मिळाला नाही वा त्यांनी तो घेतलाही नाही. त्यामुळेच युरोपीयनांना कोणत्यातरी कुबड्या, परवलीचा शब्द आणि घोषणा यांचा आधार घ्यावा लागला. म्हणून त्यांच्याकडे प्रणाली, सिद्धांत 'वाद' इ. इ. चे येवढे प्रस्थ!

आपल्याकडे तत्त्वज्ञानात्मक, आध्यात्मिक, धार्मिक आणि अशांसारख्या अनुमानाला वाव असणाऱ्या बाबींच्या संदर्भात विविध प्रणाली होत्या. पण व्यावहारिक, सामाजिक, आर्थिक व्यवस्थांबाबतच्या समस्यांसाठी अथवा परिवर्तनासाठी कोणतेही बंधनकारक सिद्धांतन नव्हते. केवळ वेळेवरची सुयोग्य कृती अथवा रचना होती. तिचेच शब्दांकन 'स्मृती'च्या स्वरूपात होत असे.

ब्रिटिशांच्या राज्याच्या आक्रमापूर्वी आपल्याकडे पश्चिमी नमुन्याच्या सामाजिक, आर्थिक अशा प्रणाली (theories), सिद्धान्तन अथवा वाद नव्हते.

सिद्धान्तन म्हणजे संकल्पनांचे शास्त्र होय. दार्शनिक अनुमिते, एखाद्या विवक्षित वर्गाची वा व्यक्तीची विचार करण्याची पद्धती, विवक्षित आर्थिक वा राजकीय प्रणालीच्या वा रचनेच्या मुळाशी असलेली संकल्पना म्हणजे हे सिद्धान्तन होय. भारताला अशा प्रकारच्या कुबड्यांची भूतकाळात आवश्यकता नव्हती. ब्रिटिशांच्या अंमलाखाली ही पद्धती अनुकरणीय ठूम ठरली. इतकी की सामान्य माणसाच्या आकलनाच्या पातळीशी तडजोड करून पं. दीनदयाळजींना आपले, एकात्म मानव 'दर्शन' हे एकात्म मानव 'वाद' या नावाने सादर करावे लागले. वस्तुतः 'हिंदू दिशावेध'मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, त्यांचे दर्शन हे इतर कोणत्याही दर्शनाइतकेच 'वादरहित' (ismless)' आहे. संकल्पनासुद्धा खपवाव्या लागतात याचे हे उदाहरण आहे. आपल्या समाजावरील पश्चिमी प्रभावाचे हे लक्षण आहे.

'प्रणाली' या संकल्पनेची आयात

आमच्या देशातील, पाश्चिमात्यांबद्दल जुजबी ज्ञान असलेल्या व स्वत:च्या भूतकाळाबद्दल पूर्ण अज्ञानी असलेल्या अशा पश्चिमाळलेल्या बुद्धिवंतांनी 'प्रणाली' या संकल्पनेची आयात केली. आपल्या परंपरागत विचारप्रकियेची विस्मृती झाल्यामुळे ते बुद्धिवादी 'इझम' च्या कल्पनेला भुलले आहेत. आणि ब्रिटिशपूर्वकाळातील आपल्या समग्र हिंदू वाङ्मयात कोणताही 'इझम' न आढळल्याने आपले वाडवडिल हे वैचारिकदृष्ट्या फारच मागासलेले, अप्रबुद्ध होते अशा निष्कर्षाप्रत ते सहज आले.

हे सरळ सरळ दोन दृष्टिकोण आहेत. प्रथम रचना, मग तिचे वर्णन व संहितीकरण आणि प्रथम वर्णन, सिद्धान्तन आणि मग त्याबरहुकूम रचनेची अंमलबजावणी!

सर्व सामाजिक - आर्थिक घडामोंडींना एखाद्या चिरंतन मार्गदर्शक तत्त्वाचे प्रमाण लावण्याचा फायदा पश्चिमेजवळ नसल्याने प्रथम सिद्धान्तन (hypothesis) अटळ ठरले. पण या दिशावेधाच्या मर्यादा लक्षात घेतल्या गेल्या नाहीत.

या संकल्पनेच्या मर्यादा

असे म्हटले जाते की तत्त्वप्रणाली म्हणजे रस्त्यांचे नकाशे असतात. असे म्हणताना रस्त्यांचे पूर्व - अस्तित्व गृहीत धरले जाते. जर रस्तेच अस्तित्वात नसतील तर रस्त्यांचे नकाशे ही कल्पनाच अप्रस्तुत ठरेल.

जर तत्त्वप्रणाली म्हणजे अंमलात आणावयाच्या एखाद्या राजकीय वा आर्थिक सिद्धान्ताच्या वा व्यवस्थेच्या मुळाशी असलेल्या कल्पना असे म्हटले तर मग 'रस्त्यांचे नकाशे' ही उपमा निरर्थक ठरते. अशी उपमा केवळ धर्माच्याच संदर्भात सार्थतेने योजता येईल.

प्रत्येक विचारप्रणाली ही काही गृहीतकांवर आधारलेली असते. गृहीतके ही परांचीसारखी (scafolding) असतात. परांची म्हणजे बांबूंची वा नळ्यांची तात्पुरती उभारणी असते व त्यामुळे कामगारांना इमारतीच्या बांधकामासाठी अथवा दुरुस्तीसाठी आवश्यक तो आधार मिळत असतो. सर्व प्रकारच्या बांधकामात, मग ते रहाण्यासाठी घर असो वा ती एक सामाजिक रचना असो, अशा प्रकारच्या परांच्या आवश्यक असतातच. पण अशा परांच्या उभारण्यासाठी इमारत वा काही आधारभूत पाया असणे हे गृहीत आहे. अशा कोणत्याही पूर्व- आधाराशिवाय परांची उभारण्याची कल्पनाच संभवत नाही.

अतिउत्साही असे 'प्रणाली' या कल्पनेचे प्रवर्तक कधी कधी तर पार टोकाला जातात. ते आपल्या परांच्या हवेतच बांधतात. त्यामुळे गृहीतके पुरस्कारिली जातात. पण त्यावर आधारलेल्या रचनेचा मात्र मागमूसही नसतो.

आजकाल 'प्रणाली' संकल्पनेच्या प्रभावामुळे लोकशाही रचनेत 'विचारा'ची पीछेहाट झाली आहे व राजकीय जीवनात जो उरला आहे तो केवळ प्रचार! लोकशिक्षण करून सत्याचा शोध करणे नव्हे तर केवळ प्रचार! त्यामुळे लोकांना प्रचाराचीच सवय झाली आहे. 'विचार' हा केवळ सत्याचा शोध असतो. आणि 'सत्य' हे त्याच्या सार्थतेसाठी प्रचारावर अवलंबून रहात नाही. त्याला व्यापक जनसमर्थन मिळाले तर भलेच. पण बहुमताने जरी ते नाकारले तरी सत्य स्वत:च्या पायावर ठाम उभे असते. बहुमतावर त्याची सार्थता अवलंबून नसते. म. गांधींचे एक सुंदर वचन मला या संदर्भात आठवते. ते एकदा म्हणाले होते, 'लोक म्हणतात की परमेश्वर हेच सत्य आहे. मी म्हणतो 'सत्य हाच परमेश्वर आहे.' सत्याच्या निरपवादपणाबद्दल त्यांची अशी श्रद्धायुक्त दृढ धारणा होती. सत्यशोधन करणारा वस्तुनिष्ठ वृत्तीचा, निर्विकार, कोणताही पूर्वग्रह, विशिष्ट कल, संकोच यापासून मुक्त

आणि वैज्ञानिक दृष्टिकोण असलेला असतो. त्याला दुसऱ्या कशाचाही नाही, केवळ सत्याचाच ध्यास असतो. आणि सत्याप्रत पोचणे हेच त्याच्या सर्व प्रयत्नांचे फळ असते. इतर कोणत्याही मान्यतेसाठी तो थांबत नाही. एकदा रवींद्रनाथ टागोर पाँडिचरीच्या आश्रमात गेले. योगी अरविंदांशी त्यांची चर्चा झाली. शेवटी रवींद्रनाथांनी विचारले की जगाला संदेश देण्यासाठी तुम्ही बाहेर का पडत नाही? अरविंदांनी उत्तर दिले, 'सत्याला कुठेही जाण्याची आवश्यकता नाही.' सत्यशोधकाच्या आत्मविश्वासाचा कस येथे दिसून येतो.

प्राचीन भारतातील परिवर्तन प्रक्रिया

भारतात अशा निरपवाद, स्वयंसिद्ध चिरंतन वास्तव तथ्यांवर आधारून रचना आकाराला येत. त्यामुळे कोणत्याही विशिष्ट अनुमित, अमूर्त, शैक्षिक (academic) प्रणालीच्या आंधळ्या प्रचाराला व अनुसरणाला वाव नसे.

त्यामुळे भारतात बहुतेक सुनिश्चितपणे पण क्वचित चुकतमाकतही परिवर्तने झाली आहेत. पण ही परिवर्तने नेहमीच निरपवादपणे अपरिवर्तनीय, वैश्विक सिद्धान्तांच्या प्रकाशात झाली आहेत. म्हणूनच रचनेसाठी कोणत्याही प्रणालीची जरूरी नव्हती. प्रत्येक वेळी प्रश्न सनातन धर्माच्या पुनरान्वयाचा व प्रात्यक्षिकाचा होता.

एखादे नवीन तत्त्व वा कल्पना आवश्यक असेल म्हणूनच - केवळ क्रांतिकारक अथवा जुन्याचा उच्छेद करणारी म्हणून नव्हे - सामावली गेली अथवा बाह्य आवरणाच्या रूपात वा मुळामध्येही थोडाफार फेरफार करून अवलंबिली गेली.

आपल्या सामाजिक - आर्थिक परिवर्तनाच्या या पारंपरिक अशा पद्धतीबद्दल महर्षी अरविंदांनी म्हटले आहे की 'समाजातील बदल हा वरून लादला जात नसे तर कुटुंबांना व समाजघटकांना त्यांचे त्यांचे आचारधर्म आपोआप विकसित करण्याचे, बदलण्याचे स्वातंत्र्य देऊन, स्वभावत:च आतून होत असे.'

या संबंधात उपयुक्त असे पुष्कळसे साहित्य *Modernity Of Tradition* या रुडॉल्फच्या ग्रंथाच्या पानांमध्ये आढळते. भारतीय पारंपरिक रचना व संकेत हे नवीन नवीन कार्यकक्षांना तोंड देण्याच्या गरजेला पुरे पडण्यासाठी कशा प्रकारे अवलंबिले अथवा परिवर्तित केले जात असतात हे दाखवण्याचा वसा त्याने घेतला आहे.

नूतनीकरणाला विरोध नाही.

जे. सी. हीस्टरमन या, भारतीय जीवनाच्या डच भाष्यकाराने म्हटले आहे –

'आपल्या पारंपरिक संघर्षाच्या आधुनिक पुनरावर्ती अवताराला तोंड देण्यासाठी संस्थात्मक चौकट निर्माण करण्यामध्ये भारताला उल्लेखनीय यश मिळाले आहे.'

(India has been remarkably successful in setting up the institutional frame-work for dealing with the traditional conflict in its modern

reincarnation.)

*The Secred Thread*या ग्रंथात जे. एल्. ब्रॉकिंग्टन यांनी हेच मत व्यक्त केले आहे. ते म्हणतात,

'हिंदूंच्या दृष्टीने परंपरा ही नेहेमी भावते, तशी नसतेच. तर बदलती परिस्थिती आणि नवी जाण सामावून घेण्यासाठी सतत पुररान्वय लावत रहाणारी अशीच ती परंपरा आहे.

त्या दृष्टीनेच हिंदू जीवनदृष्टीत नूतनीकरण हा परंपरेचा शत्रू नाही. उलट परंपरेची प्रस्तुतता-समयबद्धता टिकवणारी ती बाब आहे. नव्यासाठी जुन्याचा त्याग, हिंदुत्व कधीही करीत नाही. पारंपरिक भाषेत दुविधा व्यक्त करीत आणि प्रस्थापित दृष्टिकोणांमध्ये नवीन जाण सामावून घेत, दोन्हींचा मिलाफ ते घडवून आणते. ही बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता हे, सर्व ऐतिहासिक कालखंडात हिंदुत्वाचे एक लक्षण राहिले आहे. आणि भिन्न पदर एकत्र आणणारा घटक म्हणजे अशी परंपरा व नवता यांची अद्वितीय वीण साधणारा हिंदूचा समान इतिहास आहे. हिंदुत्व तेच आहे तरीही ते भिन्न आहे.'

(Tradition [for Hindus] is not always just what it seems, but has constantly been undergoing reinterpretation to accommodate new understanding and changed circumstances. Innovation is not the enemy of tradition but that by which it maintains its relevance. Hinduism does not reject the old in favour of the new, but blends the two, expressing new dilemmas in traditional language and accommodating fresh insights to established view points. The ability to adapt itself to changing circumstances has been a mark of Hinduism throughout its history and the unifying factor bringing together its many diverse threads lies in their common history with this unique weaving together of tradition and innovation. Hinduism is ever the same, yet different.)

युगानुकूलतेचे रहस्य

निरंतर नव्या परिस्थितीशी जुळवून घेण्याच्या हिंदूंच्या या प्रवृत्तीचे रहस्य काय आहे ?

पू. गुरुजींच्या खालील शब्दांत ते मोठे सविस्तरपणाने स्पष्ट झाले आहे.

'एकदा का एकात्मतेचा चैतन्यप्रवाह आमच्या समाजजीवनाच्या धमन्यांमधून मोकळेपणाने वाहू लागला की आमच्या संपूर्ण एकात्म राष्ट्रजीवनाच्या कल्याणासाठी त्याची सर्व अंगे आपोआपच कार्यक्षमतेने व परस्पर मेळाने आपापले काम करू लगातील. अशा प्रकारचा जीवमान व विकसनशील समाज आपल्या अगणित प्राचीन

व्यवस्था आणि रचनांमधून स्वत:ची प्रगत आगेकूच करू लागेल व त्यासाठी म्हणून जे जे प्रोत्साहक व अत्यावश्यक असेल ते ते टिकवून धरेल, उपयुक्तता संपलेल्या गोष्टी टाकून देईल आणि त्यांच्या जागी नवीन व्यवस्थांचा विकास करील. जुन्या व्यवस्थांचा लय होत आहे म्हणून अश्रू ढाळण्याची गरज नाही वा नवीन रचना स्वीकारण्याला बिचकण्याचेही कारण नाही. हा सर्वच जीवमान, विकसनशील व्यक्तिसंघातांचा धर्मच आहे. वृक्ष वाढतो तशी जीर्ण पाने आणि शुष्क झालेल्या डहाळ्या गळून पडतात आणि नव्या धुमाऱ्यांना जागा करून देतात. लक्षात घेण्याची एकच महत्त्वाची गोष्ट म्हणजे - आमच्या सामाजिक घटितांमधील सर्व भागांमध्ये एकत्वाचे आत्मतत्त्व भरून राहिले आहे ना? या एकाच गोष्टींची मात्र काळजी घेतली पाहिजे. या आत्मतत्त्वाचे पोषण होत आहे की नाही या एकाच निकषावर प्रत्येक रचना वा व्यवस्था ही टिकेल किंवा बदलेल वा पूर्णत: दिसेनाशी होइल.'

(Once the life stream of unity begins to flow freely in all the veins of our body - politic the various limbs of our national life will automatically start functioning actively and harmoniously for the welfare of the Nation as a whole. Such a living and growing society will preserve, out of its multitude of old systems and patterns, whatever is essential and conducive to its progressive march, throw off those as have outlived their utility and evolve new systems in their place. No one need shed tears at the passing of the old orders, nor shirk to welcome the new order of things. That is the nature of all living and growing organisms. As a tree grows, old leaves and dry twigs fall off making way for fresh growth. The main thing to bear in mind is to see that the spirit of oneness permeates all parts of our social set up. Every system or pattern will live or change or even entirely disappear according as it nourishes that spirit or not.)

भारतीय विचारव्यूह हा स्थितीवादी नाही हे स्पष्ट करताना पं. दीनदयाळजींनी मांडलेला विचार 'दिशावेध प्रारूपा'त आला आहे. पू. गुरुजींच्या या अवतरणात आलेल्या आमच्या परिवर्तनाच्या कल्पनेचे पडसादच त्यात उमटलेले आपल्याला आढळतात.

हिंदू संस्कृतीचा प्रवाहीपणा

नूतनीकरणातून सतत स्वत:चे नवे रूप सिद्ध करणे ही वैभवशाली जीवमानतेची किंमत आहे, हे हिंदूंना जाणवले होते. अपरिवर्तनीय वैश्विक सिद्धांतांच्या प्रकाशातील सतत बदलणारी अशी समाजव्यवस्था ११ व्या शतकापर्यंत हिंदूंमध्ये होती. नैतिक नेत्यांनी रचलेल्या विविध स्मृतींच्या द्वारा जुनी व्यवस्था वेळोवेळी बदलत जाऊन

तिने संश्लेषणाच्या प्रक्रियेतून नव्या व्यवस्थांना जागा करून दिली होती. त्यांच्या मनाच्या उमदेपणामुळे विविध व्यवस्थांच्या शांततामय सहअस्तित्वाची येथे निश्चिती होती. व्हॅलेंटिन चिरोलने हिंदुत्व हे व्यवच्छेदकतेने कसे प्रवाही राहिले आहे हे सांगून पुढे म्हटले आहे –

'त्याने (हिंदुत्वाने) आत्यंतिक वैविध्यपूर्ण विचारव्यूहांना आधार दिला आहे. ते (विचारव्यूह) कधी कधी शुद्ध निरपेक्ष आस्तिकवादात शिरणारे पण बहुतेकवेळा सर्वात्मक देवतावादाकडे वळणारे असतात.'

(It lends itself to the most divergent schools of thought, sometimes verging on pure thesism; but more often resolving themselves into universal pantheism.)

तेव्हा परिवर्तनाला आमचा विरोध नाहीच. पण परिवर्तन कशाप्रकारचे ? भूतकाळाच्या वारशाची चिकित्सा करून जे कालबाह्य, निरुपयोगी ठरले असेल ते टाकून देणे आवश्यक आहे. त्यातील काही चिरसनातन, वैश्विक स्वरूपाचे असेल ते जतन करून ठेवले पाहिजे. या नूतनीकरणाच्या व परिवर्तनाच्या प्रक्रियेत कधीही आम्ही आपले व परके असा भेद केला नाही हे लक्षात घेऊन इतर संस्कृतींमधूनही अत्युतम काय आहे, काय नाही हे जोखून घेतले पाहिजे आणि जे उत्तम आहे ते स्वीकारायला आपली हरकत असता कामा नये. पण हा स्वीकार म्हणजे आंधळे अनुकरण असता कामा नये तर त्याचा आपल्या संस्कृतीशी मिलाफ घडवून आणणे आवश्यक असते. कारण अनुकरण म्हणजे केवळ कलम करणे, तर मिलाफ म्हणजे चिकित्सक स्वीकारातून सेंद्रिय एकात्मतेने सामावून घेणे होय.

डॉ. राधाकृष्णन् यांनी म्हटल्याप्रमाणे भारताचा जीवितहेतूच अनेकतेमध्ये एकत्व पहाणे हा आहे. अर्थातच भेद पुसून नव्हे तर भेद राखून पण एकात्म बनवून अनेकांतील एकता अनुभवणे व ती अनुभूती प्रत्यक्षात आणणे हे भारताचे मूलभूत उद्दिष्ट आहे.

म्हणजेच विविधता भुइसपाटही करणे नाही वा तिचे चोचले पुरवणेही नाही.

अशाप्रकारे विविधतेत एकता पहाण्याच्या मानसिकतेमुळे कोणत्याही दिशेने येणाऱ्या नव्या कल्पना व रचना आत्मसात करणे आणि स्वत:च्या समाजजीवनात पचवून टाकणे ही हिंदूंच्या बाबतीत नित्याचीच बाब आहे. भूतकाळात आम्ही नेहमीच परकीय संस्कृतीतील रचना व व्यवस्था यांच्यातील जे चांगले असेल ते स्वीकारून व आत्मसात करून आमचे राष्ट्रीय व्यक्तिमत्त्व आणि सांस्कृतिक अस्मिता समृद्ध केली आहे.

हिंदूंचा राष्ट्रवाद हा अलगतावाद नव्हे.

त्यामुळेच पश्चिमी दृष्टिकोणातून आज ज्याची विशेष चर्चा होत राहिलेली आहे

तो हिंदूंचा राष्ट्रवाद हा अलगतावादही नव्हे वा एकाकीवादही नव्हे. विशेषत: एकात्म मानव दर्शनाच्या नावाने विकसित झालेल्या ज्या आमच्या परंपरेचे आम्ही वारसदार आहोत, तिच्यात राष्ट्रवाद व आंतरराष्ट्रवाद यात विजोडता नाहीच. ते एकाच मानवी जाणिवेच्या विकासाचे टप्पे आहेत. या विकासात राष्ट्रवाद हा टोळीवाद आणि मानवतावाद यांच्यांतील पूल आहे आणि मानवतावाद म्हणजे विश्ववादाच्या दिशेने टाकलेले एक दीर्घ पाऊल आहे.

आम्हाला अंत:प्रवृत्तीतूनच जाणवले आहे की आमचे वारसारूप सांस्कृतिक संचित सर्व मानवजातीसाठी आहे. त्यामुळे आपल्या अद्वितीय संस्कृतीतील जे जे उत्तम आहे ते ते बाह्य जगाला देणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे व इतरांचे जे जे उत्तम असेल ते आत्मसात करणे हा भारताचा अधिकार मानला आहे.

इतर समाजांशी होणाऱ्या अशा विपुल सांस्कृतिक देवीघेवीमध्ये (cultural interaction) आपण सततच रमलेले आहोत आणि एका संस्कृतीचा दुसरीशी असलेला ताळमेळ पाहून समानतेचा शोध घेत राहिलेले आहोत.

आपण कधीही अलगतावादी नव्हतो. अनादिकालापासून अत्यंत घनिष्ट संबंधातून विविध समाजांमध्ये सामंजस्याचे व मैत्रीचे बंध निर्माण करण्याचा आपला प्रयत्न राहिला आहे. कारण आम्हाला अंतर्मनाच्या प्रेरणेतूनच वाटत आले आहे की कोणत्याही एका ठिकाणचे मानवी दु:ख हे सर्वच ठिकाणच्या मानवतेला धोका निर्माण करणारे असते. त्यामुळे अगदी अलिकडच्या काळतही भारताने आपले संत, अभ्यासक, सैनिक, शास्त्रज्ञ, तंत्रवैज्ञानिक, कलाकार, कारागीर, व्यावसायिक, व्यापारी, उद्योजक आणि मजूरही बाहेर पाठविले आहेत. आणि ते आमच्या देशाचे अनधिकृत राजदूत म्हणून हाच सहेतुक दृष्टीने कार्य करीत आहेत.

'वसुधैव कुटुंबकम्' हाच व्यवहार

त्यादृष्टीने पाहिले तर खरेखुरे जागतिकीकरण हा हिंदुवारशाचा एक भागच आहे. प्राचीन काळी आम्ही स्वत:ला नेहेमीच अखिल मानव्याचा एक भागच मानीत असू. स्वत:साठी स्वतंत्र असे रूप सिद्ध करण्याचा आम्ही कधीही प्रयत्न केला नाही. आम्ही संपूर्ण मानव्याशी एकरूप झालो होतो. 'वसुधैव कुटुम्बकम्' हेच आमचे घोषवाक्यही होते. त्यामुळेच 'हिंदू' या संज्ञेलाही पुरातनत्व नाही.आमच्या प्राचीन वाङ्मयात म्हणूनच हा शब्दही सापडत नाही.

भारतीयच का म्हणावयाचे ?

स्वाभाविकपणेच कोणीही विचारेल की मग या सर्व विचारव्यूहाला भारतीय - हिंदू का म्हणावयाचे ? कारण सत्याला तर जात, प्रदेश, धर्म नसतो. ज्ञान हे वैश्विकच असते. मग याला भारतीयच का म्हणावयाचे ? आतापर्यंत स्पष्ट केलेल्या हिंदू

जीवनदृष्टीच्या मोजक्या आशयवैशिष्ट्यांतूनही हे लक्षात येते की संस्कृती, राष्ट्रीय प्रवृत्ती, परंपरा या सर्वच दृष्टींनी भारतीय हे इतर समाजांपेक्षा गुणात्मकतेनेच भिन्न आहेत. आपल्या राष्ट्रीयत्वाचा कस व विशेष वेगळेच आहेत. आपले 'दर्शन'च वेगळे आहे. मानवी जाणिवेच्या विकासावर आमचा विश्वास आहे. लहान मुलाला जन्मतः केवळ स्वतःचीच जाणीव असते. पण जाणिवेच्या विकासाबरोबर प्रथम आई, मग कुटुम्ब, जमात, समाज, राष्ट्र, मानवता येथपर्यंत माणसाची एकात्म जाणीव विकसित होते. - वसुधैव कुटुम्बकम्!

आणि आपल्या संस्कृतीत तर त्याच्याही पुढे सर्व चराचर सृष्टीसह संपूर्ण विश्वाशी एकात्मता निर्माण होते - 'स्वदेशो भुवनत्रयम्!' ही अनुभूतीच यावी ही अपेक्षा आहे.

आणि म्हणूनच ही अनुभूती देणारा विचारव्यूह आणि त्याचे प्रात्यक्षिक रूप सिद्ध करणारी युगानुकूल माध्यमरूप संस्थात्मक रचना हिला भारतीय - हिंदू म्हणण्यात आम्हाला सार्थ अभिमान असण्यात गैर काहीच नाही.

□ □ □

भौतिक विकास संकल्पनेच्या अनुषंगाने

मूळ पुस्तकातील, प्राधान्याने खालील भागांवरून या विषयाचे संकलन केले आहे.

Part 1

1) Global Economic System – A Hindu View.
(दि. ६ व ८ ऑगस्ट, १९९३ ला वॉशिग्टन येथे, World Vision - 2000 या कार्यक्रमात दिलेले भाषण)

2) Economics.
(ऑक्टोबर, १९९२ मध्ये बुद्धिवंतांमध्ये चर्चेसाठी प्रसृत केलेले प्रारूप)

3) Technology.
(ऑक्टोबर १९९२ मध्ये बुद्धिवंतांमध्ये चर्चेसाठी प्रसृत केलेले प्रारूप)

4) Environment.
(ऑक्टोबर १९९२ मध्ये बुद्धिवंतांमध्ये चर्चेसाठी प्रसृत केलेले प्रारूप)

5) Quo Vadis
(जानकी प्रकाशन, दिल्ली यांनी प्रकाशित केलेल्या डॉ.एम्.जी. बोकरे यांच्या *The Hindu Economics*या ग्रंथाला लिहिलेली प्रस्तावना)

6) Humanism : Western and Integral

Part 3

1) Swadeshi - The Practical Manifestation of Patriotism

2) Dharma Kshetre
(स्वदेशी जागरण मंच, दिल्ली यांच्याद्वारा प्रकाशित (१९९४) श्री दयाकृष्ण यांच्या *Swadeshi View of Globalisation*या पुस्तकाची प्रस्तावना)

3) Modernisation without Westernisation
(दिल्ली येथे भारत विकास परिषदेसमोर दिलेले भाषण - १३ ऑगस्ट १९८३)

Part 4

1) South - South Cooperation.
(दि. ६ मार्च १९९४ रोजी साप्ताहिक ऑर्गनायझरमध्ये प्रसिद्ध झालेला लेख)

2) Bharatiya Vichar.
(दि. ७ ऑक्टोबर १९८२ रोजी तिरुअनंतपुरम येथे भारतीय विचार केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी केलेले भाषण)

3) Then and Now ! (1893 : 1993)

भौतिक विकास संकल्पनेच्या अनुषंगाने

विकाससंकल्पनेला आर्थिक संदर्भाचेच सुकाणू

साम्यवादाचा विलय आणि भांडवलवादी समाजातील वाढत्या गतीची विघटनशीलता यामुळे जगात तिसऱ्या पर्यायाचा शोध सुरू झाल्याचा 'दिशावेध प्रारूपा'त उल्लेख केला आहे. या तिसऱ्या पर्यायाच्या शोधात जीवनातील विकास व प्रगती या प्रक्रियांना कळीचे स्थान प्राप्त झाले आहे. अर्थातच पश्चिमी जीवनाचा एकूणच दृष्टिकोण प्राधान्याने इहवादी आहे, त्यामुळे या संदर्भातील पश्चिमी प्रयत्नांत विकास व प्रगती या प्रक्रियांना भौतिक श्रेयप्राप्तीच्या दृष्टीने आर्थिक संदर्भाचेच सुकाणू प्राप्त झाले आहे. हिंदू जीवनप्रणालीतही या आर्थिक पैलूच्या विचाराला कमी महत्त्वाचे स्थान नाही. पण मानवी जीवनाच्या भवितव्याचा भविष्यवेधी विचार हा मात्र अशा एखाद्याच विशिष्ट अंगाने अलगपणे करणे हे हिंदूंच्या विचारव्यूहात बसत नाही. यापूर्वी स्पष्ट केल्याप्रमाणे हिंदू जीवनदृष्टी ही समग्र जीवनाच्या एकात्मतेच्या जाणिवेवर आधारलेली आहे आणि विशिष्ट परंपरेने विकसित केलेल्या प्रत्येक समाजाच्या सत्त्वाच्या - अंगभूत चैतन्यतत्त्वाच्या आधारेच अशाप्रकारचा भविष्यवेधी विचार होणे आवश्यक असते. गुरुदेव टागोरांचे पूर्वोल्लेखित अवतरण या दृष्टीने लक्षात घेणे आवश्यक आहे. दुसऱ्या देशांच्या प्रश्नपत्रिकेची उत्तरे आपल्याला उपयोगी पडणार नाहीत.

हिंदू जीवनदृष्टीचा अटळ संदर्भ

त्यामुळेच विकास व प्रगती यांच्या अनुषंगाने तिसऱ्या पर्यायाचा विचार हा समग्र हिंदू जीवनदृष्टीच्या रूपबंधाच्या परिप्रेक्ष्यातच पहाणे आवश्यक आहे. अर्थातच हा विचार वर्तमानाचा संदर्भ व आवश्यकता आणि भविष्यातील अपेक्षा लक्षात घेऊन युगानुकूलतेने करणे आवश्यक आहे. व्यक्तीचा परिपूर्ण, सघन, शाश्वत आणि अखंड आनंद हे हिंदू जीवनदृष्टीचे ध्येय मानले असले तरी एकूणच जीवनाच्या एकात्म अनुभूतीतून, व्यक्तीच्या सुखसाधनेला वैयक्तिक - सामाजिक त्याचप्रमाणे भौतिक व आत्मिक असा चतुर्विध संदर्भ प्राप्त होतो हे पूर्वी स्पष्ट केले आहे.

अशाप्रकारचा एकात्म दृष्टिकोण हा हिंदू विचारप्रक्रियेचा विशेष आहे. हिंदूंना त्यामुळेच सतत जाणवले आहे की इतर अनेक गोष्टींबरोबरच शिक्षण, पर्यावरणशास्त्र, अर्थशास्त्र व नीतिशास्त्र या सर्वांचा एकात्मतेने विचार होणे आवश्यक आहे.

अर्थात यातील प्रत्येक ज्ञानशाखेवर स्वत:ची अशी विशिष्ट जबाबदारी आहेच व स्वत:ची ती विशिष्ट जबाबदारी पार पाडण्यासाठी सुयोग्य उप्रकमांची योजना करावी लागतेच. पण अशी योजना करताना इतर अनेक विद्याशाखांनी युक्त अशा संपूर्ण जीवनाचा एकात्म, सर्वसमावेशक विचार व्हावा अशीही अपेक्षा आहे. विचारप्रक्रियेची संकीर्णता ही सर्वांच्याच प्रगतीला बाधक ठरते.

इहवादी पश्चिमी विचारानुसार मात्र मानव हा मूलत: आर्थिक प्राणी आहे. कप्प्याकप्प्यांनी विचार करण्याच्या पद्धतीमुळे पाश्चात्यांनी अर्थशास्त्र हा स्वत:ची पृथगात्मता असलेला स्वतंत्र अभ्यास विषय मानला. त्यामुळे या विचार प्रक्रियेचा स्वाभाविक परिपाक म्हणजे या सीमित भू-गोलावरील अपरिमित वाढीचा पश्चिमी हव्यास!

हे अशाप्रकारचे गृहीतक हे हिंदूंच्या एकात्म विचारसरणीच्या विरुद्ध जाणारे आहे. त्यादृष्टीने पहाता हिंदू आर्थिक चिंतन म्हणजे पं. दीनदयाळ उपाध्यायांनी स्पष्ट केलेल्या हिंदू जीवनदृष्टीचा-एकात्म मानव दर्शनाचा-प्रात्यक्षिकतेच्या दृष्टीने लावलेला आर्थिक क्षेत्रातील अन्वय होय असे म्हणता येईल.

हिंदू दार्शनिकांनी 'अर्थ' हे स्वतंत्र अलग मूल्य न मानता चतुर्विध पुरुषार्थाचा म्हणजेच साधनचतुष्ट्याचा एकात्म भागच मानला होता. पण केवळ अर्थशास्त्राचाच विचार केला तरीही त्याचे विशिष्ट उद्दिष्ट महर्षी अरविंदांनी सांगितल्याप्रमाणे –

'..... स्पर्धात्मक अथवा सहकारी तत्त्वावरील निर्मिती करणारे एक विराट यंत्र सिद्ध करणे हे नव्हे तर एकट्या दुकट्या नव्हे, सर्वच मानवांना जास्तीत जास्त प्रमाणात स्वत:च्या स्वभावाप्रमाणे कार्य करण्याचा आनंद देणे, आंतरिक प्रगतीसाठी आवश्यक ती फुरसद देणे आणि साधे, समृद्ध व सुंदर असे जीवनमान प्राप्त करून देणे,' हे आहे.

(..... The aim of its economics would be not to create a huge engine of production, whether of the competitive or cooperative kind, but to give to men, not only to some but to all men, each in his highest possible measure, the joy of work according to their own nature and free leisure, to grow inwardly, as well as a simple, rich and beautiful life for all.)

भौतिक विकास संकल्पनेच्या अनुषंगाने करावयाच्या तिसऱ्या पर्यायाच्या विचारात अशा रीतीने प्रथम हिंदू जीवनदृष्टीतील या सूत्राकडे अगुंलीनिर्देश करणे आवश्यकच होते. कारण शाश्वत, अपरिवर्तनीय, वैश्विक सूत्रांच्या प्रकाशातच सतत बदलणाऱ्या

सामाजिक - आर्थिक व्यवस्था ही हिंदू जीवनदृष्टीची समाजपरिवर्तनाची प्रक्रिया आहे.

विवेकी वस्तुनिष्ठेसाठी वर्तमान वास्तवाचा विचार

त्याच बरोबर हेही खरे आहे की अशा प्रकारच्या विचारात विवेकी वस्तुनिष्ठा येण्यासाठी प्रारंभी, वर्तमान वास्तवाचा विचारही अटळ असतो. कारण 'जे उद्या साधावयाचे आहे' ते, 'आज काय आहे' याच्याशी सयुक्तिकपणे जोडले नाही तर पुढील सर्व चिंतन हे केवळ आदर्शात्मक (Utopian) आणि म्हणूनच निष्फळ ठरण्याची शक्यता असते.

ऐतिहासिक पार्श्वभूमीची जाणही आवश्यक

त्या दृष्टीने आपल्या देशातील आर्थिक क्षेत्रातील आजच्या घडामोडींना असलेला आंतरराष्ट्रीय संदर्भ, त्यांना जन्म देणारे आर्थिक तत्त्वज्ञान, त्यांना आकार देणाऱ्या विविध घटना व प्रभाव, या सर्वांची ऐतिहासिक पार्श्वभूमी यांची सम्यक कल्पना असणे आवश्यक आहे.

वसाहतवादाची कूटनीती

इतिहासाने अनेक साम्राज्यांचे उदयास्त पाहिले. प्रत्येक साम्राज्याची संस्कृती त्याच्या मांडलिकांनी आदर्श मानली होती. साम्राज्याच्या अस्तानंतर त्याच्या संस्कृतीचे आकर्षण हे काही शतकांतच ओसरले. पश्चिमी साम्राज्यांच्या विलयाचे वैशिष्ट्य असे की –

१) त्यांनी आपल्या पूर्वीच्या वसाहतींच्या बौद्धिक व तात्त्विक विश्वावरची पकड कायम ठेवली. साम्राज्याच्या काळातच साम्राज्यवादी सत्तांनी वसाहती समाजांचा मेंदू मथविण्याचा जो प्रयत्न केला त्याचा हा स्वाभाविक परिपाक होता.

२) वसाहती समाजांमधील आपल्या साम्राज्यवादी अर्थव्यवस्थेवरील पकड राखण्यासाठी व अधिक घट्ट करण्यासाठी, त्यांनी निर्धारपूर्वक प्रयत्न केले. भारतामध्ये, 'युरोपीय संस्कृती हीच आदर्श संस्कृती आहे आणि जे जे भारतीय ते ते निकृष्ट, जे जे पश्चिमी ते ते उत्कृष्ट' हा भाव निर्माण करून हिंदू समाजात न्यूनगंडाची भावना निर्माण करण्यात १८३४ पासूनची मेकॉलेची मोहिम यशस्वी झाली व त्यासाठी पुढे हिंदू बुद्धिवंतांना 'गोऱ्या माणसाचे ओझे'[१] ही कल्पना विकण्यात आली. केवळ युरोपीय इतिहासामध्येच दिसून आलेल्या विशिष्ट स्थित्यंतरांच्या क्रमातून जगामधील प्रत्येक समाजाला वा मानवी समूहाला अटळपणे जावेच लागत आहे असे आम्हाला सांगण्यात आले. भारतातील कोणतीही घडामोड युरोपीय प्रमाणावर पडताळून पाहिली पाहिजे, कारण आम्हाला सांगण्यात आले की पश्चिमी नमुना हाच विकासाचा व प्रगतीचा वैश्विक नमुना आहे. विशेषत: औद्योगिक क्रांतीनंतरच्या काळातील पश्चिमेच्या भौतिक प्रगतीमुळे आमचेही डोळे दिपून गेले. पण वस्तुत: औद्योगिक क्रांतीचा

प्रारंभ आकस्मिक, अपघातवजा असाच होता, योजनापूर्वक झालेला नव्हता, हे मात्र आमच्या लक्षात येऊ शकले नाही.

हिंदू समाजाचा जीवनमरणाचा संघर्ष

आता हे खरे आहे की पश्चिमेचा आक्रम हा प्राचीन विद्येच्या द्वारा सुरू झालेल्या प्रबोधन पर्वातून (Renaissance) व त्यातून पुढे झालेल्या औद्योगिक क्रांतीनंतरच सुरू झाला आणि त्या दरम्यानच्या मध्यंतरीच्या काळात आपण मात्र विकासाचा सामान्य वेगही गाठू शकलो नाही. याचे साधे कारण म्हणजे नेमके याच सर्व काळात राष्ट्रीय पातळीवर आम्ही जीवनमरणाच्या संघर्षामध्ये गुंतलेले होतो आणि अशा संघर्षाच्या काळात कोणत्याही देशात विकास होणे शक्य नसते. पण आपल्याला हे माहित आहे की युरोपीय अंधकारयुगाच्या नंतरच्या प्रबोधन पर्वाच्या कालखंडापूर्वीच हिंदू शास्त्रे व हिंदू कला या अरेबिया आणि पर्शिया यांच्या द्वारा ग्रीसपर्यंत जाऊन पोचल्या होत्या ही निर्विवाद गोष्ट आहे. न्यूटनने एकदा म्हटले होते –

'मी इतरांपेक्षा पुढचे पाहू शकलो कारण मी प्रचंड अतिमानवाच्या खांद्यावर उभा राहिलो'

जे व्यक्तीच्या बाबतीत तेच राष्ट्राच्याही बाबतीत खरे आहे. आज आपण प्रचंड पश्चिमी अतिमानवाच्या खांद्यावर उभे रहाण्याची आकांक्षा बाळगून आहोत. पण पश्चिम असे प्रचंड मानव उभे करू शकली कारण विद्येच्या पुनरुज्जीवनाच्या काळाच्या दरम्यान, संपूर्ण युरोपीय बुद्धिजीवी जग हे हिंदू अतिमानवांच्या खांद्यावर उभे होते.

बाहेरील जगाकडे दुर्लक्ष

पण पश्चिमेचा आक्रमाचा काळ आणि आमच्या अस्तित्वाच्या संघर्षाचा काळ हे अशा तऱ्हेने जुळून आले की बाहेरच्या जगात काय चालले आहे हे जाणून घेण्यासाठी आम्हाला उसंत नव्हती. तशी आमची मानसिकता अथवा ताकदही उरली नव्हती आणि त्यामुळे आम्ही पश्चिमी भौतिक प्रगतीची दखल घेऊ शकलो नाही. आमच्या विचारवंतांनीही या गोष्टीकडे दुर्लक्ष केले आणि पश्चिमेच्या तुलनेत आपण निकृष्ट आहोत, राष्ट्र म्हणून पश्चिमी राष्ट्रे ही अधिकोत्तम आहेत असे आमचे मानस बनविण्यात व पराभूत, न्यूनगंडाची भावना निर्माण करण्यात आमच्या विचारवंतांनी फार मोठा वाटा उचलला. आमच्या विद्वानांबद्दल मेकॉलेची जी अपेक्षा होती ती या दृष्टीने सफळ झाली.

साधारणत: सर्वच तिसऱ्या जगातील देशांची हीच स्थिती होती.

त्यामुळेच १९४५ नंतरची आंतरराष्ट्रीय रचना तिसऱ्या जगातील देशांच्या विकासाला अत्यंत अन्यायकारक रीतीने बाधक ठरली आहे व त्याची कारणे आपल्याला या शतकाच्या प्रारंभापासून प्रस्थापित झालेल्या जागतिक रचनेमध्ये दिसतात.

शतकारंभीची जागतिक रचना

कोणत्याही कालखंडात विभिन्न व्यावसायिक वर्गीय गट, वांशिक गट, अन्यान्य राष्ट्रे, स्त्रीपुरुष वर्ग आणि अन्य कोणत्या ना कोणत्या प्रकारचे मानवी समूह यांच्यामधील संबंध हे लोकसंख्या, पर्यावरण, तत्त्वप्रणाली आणि संस्कृती यांच्यांतील बदलाबरोबर पालटत असतात. या शतकाच्या आरंभी राष्ट्रे आणि राज्ये हे मानवी संघटनेचे मूलभूत व महत्त्वाचे घटक मानले गेले. स्वातंत्र्य व सार्वभौमत्व ही अशा राष्ट्र-राज्यांची स्वाभाविक वैशिष्ट्ये असतात. अर्थात प्रथम लीग ऑफ नेशन्स व नंतर यूनो यांनी निर्माण केलेल्या आंतरराष्ट्रीय संस्थांचा राष्ट्र-राज्य या संकल्पनेच्या प्रतिष्ठेवर फारसा प्रभाव पडू शकला नाही. आणि संभ्रमित यूनोलाही राष्ट्र-राज्य या संकल्पनांमध्ये फरक करता आला नाही ही आणखीच खेदाची गोष्ट आहे. त्यामानाने पर्यावरण, मानवी हक्क, नागरी स्वातंत्र्य, पर्यटन, शस्त्रकपात, मजुरांचे प्रश्न, अशा काही प्रश्नांचा पाठपुरावा करणाऱ्या जागतिक स्वयंसेवी संघटनांचा प्रभाव तुलनेने अधिक होता.

राष्ट्रांच्या तौलनिक सामर्थ्याचे निकष कायमच

अर्थात मानवी गटांचे गटबंधन कशाही स्वरूपाचे राहिले व कदाचित आजच्या राष्ट्र - राज्यांपेक्षा अधिक समावेशक अशा घटकामध्ये सत्तांतर झाले तरीही त्यांच्या सत्तांचे तौलनिक सामर्थ्य आणि त्या अनुषंगाने त्यांचे आंतरराष्ट्रीय संबंधातील महत्त्व यांचे, 'आर्थिक समृद्धी व सैनिकी बळ' हे आताचे निकष मात्र कायमच रहाणार आहेत. *Rise and Fall of The Great Powers'* या ग्रंथामध्ये पॉल केनेडीने अमेरिकी ऱ्हासाचे स्पष्टीकरण करताना याच निकषावर भर दिला आहे.

पण आता ज्ञानशक्तीचे वर्चस्व

१९४५ पूर्वीच्या साम्राज्यवादी सत्तांनी मात्र आपल्या राजकीय सत्तेच्या ऱ्हासानंतर आता ज्ञानशक्तीच्या जोरावर आपले वर्चस्व कायम ठेवण्याचा प्रयत्न चालविला आहे. विशेषत: तेलाच्या किंमती १९७९ मध्ये अकस्मात कडाडल्यावर भांडवलशाही व्यवस्थेतील अंतर्विरोध उफाळून आले. आधीपासूनच अधोगतीला लागलेल्या पश्चिमी व्यवस्थेला हा तथाकथित, 'दुसरा तेलाच्या किंमतीचा धक्का' पचविणे अवघड जाऊ लागले. साम्यवादाच्या ऱ्हासानंतरसुद्धा विकसित देशांची अर्थव्यवस्था खचतच चालली. त्यामुळेच त्यांनी स्वत:ची आर्थिक रचना सुरक्षित राखण्यासाठी दक्षिणी देशांना चिरडून टाकणारी अशी स्वत:ची पद्धतशीर व्यूहरचना सिद्ध केली. डंकेल* प्रस्ताव म्हणजे, भांडवलशाही, ही स्वत:च्या ताकदीवर फार काळ तगू शकणार नाही याची सरळ सरळ कबुलीच आहे. तरीही अशा प्रकारच्या आर्थिक आघाडीवरील परागतीच्या

---

* परिशिष्ट १ पहा.

अवस्थेतही परंपरागत आत्मतुष्टी आणि औध्दत्य यांना ते चिकटूनच आहेत. कारण त्यांना माहित आहे की जगाच्या व्यवहारातील सर्वात महत्त्वाचे आणि निर्णायक असे हुकूमाचे पान त्यांच्या हाती आहे. ते म्हणजे ज्ञानशक्ती!

त्यामुळे तौलनिक राजकीय सत्तेच्या कायमचा निकष 'आर्थिक समृद्धी आणि सैनिकी बळ' हाच असला तरी गेल्या काही वर्षांत सत्तेचे स्वरूप मात्र बदलले आहे.

सत्तेचे बदलते स्वरूप

तंत्रविज्ञान आणि विज्ञानाचा सुसाट आक्रम - लेझर्स, संगणक, महासंगणक, स्मरणचिपा, संगणकावर वा माणसावर आघात करणारे विषाणू, जैविक तंत्रविज्ञान, यंत्रमानवतंत्र, कृत्रिम बुद्धी, अतिबौद्धिक इलेक्ट्रॉनिक जाळे, आणि प्रत्यक्ष प्रसिद्धी माध्यमे व त्यांचे पूर्वस्वरूप, उपलब्ध माहिती, संवेदनात्मक प्रणाली, दृक्साहित्य, उपग्रह व दूरसंचार, प्रगत प्रवहन, अर्ध-प्रवहन, शिक्षणप्रणाली, विज्ञान व कला, प्रतिकात्मता, माहितीतंत्र, संभ्रमित धूसर तर्कशास्त्र (Fuzzy logic) मज्जाजीवशास्त्र, व्यवसाय, लघुविद्युत, परमाणुशास्त्र, अचूकता साधणे, मानवी बाँब, क्षेपणास्त्रे, अणु-रासायनिक जंतुप्रवण अस्त्रे, अशा सर्व ज्ञानप्रवण तंत्रज्ञानातून सिद्ध झालेल्या गोष्टींमधील वाढते स्वारस्य या सर्व गोष्टी आज मध्यवर्ती स्थान प्राप्त झालेल्या ज्ञानशक्तीतून निर्माण झालेल्या आहेत. त्यामुळेच अर्थशास्त्राला व युद्धशास्त्राला सुद्धा उत्तरोत्तर वाढत्या प्रमाणात या नव्या शक्तींवर अवलंबून रहावे लागत आहे.

आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे संपूर्ण ज्ञानपरिघामध्येच (info - sphere) होणारी क्रांती मार्गी लागलेली आहे.

आणि या नव्याने सिद्ध झालेल्या ज्ञानशक्तीच्या संदर्भात सध्यातरी पश्चिमी राष्ट्रांचे प्रभुत्व आव्हानापलीकडे आहे. कारण आज विकसनशील देशांमध्ये अंगभूत संशोधन प्रतिभा असली तरी सामग्री आणि अर्थपुरवठा याबाबतीतील त्यांची कमतरता ही केवळ प्रतिभेने भरून काढता येणे शक्य नाही. आणि म्हणूनच पश्चिमी देशांची समर्थनीय आत्मतुष्टी!

राष्ट्रीय सार्वभौमत्वाला नवी आव्हाने

पण त्याच बरोबर इतर काही शक्तीही या बंदिस्त, सुरक्षित अशा राष्ट्र - राज्य कल्पनेला धक्का देऊ लागल्या आहेत, त्या अशा –

१) जागतिक मूलतत्त्ववाद

२) राष्ट्रबाह्य दहशतवाद

३) आर्थिक व्यवहार व निधी, प्रदूषण आणि लोकसमुदाय यांच्याबाबत राष्ट्रीय सीमांपलीकडे जाऊनही कारवाई करू शकणाऱ्या आंतरराष्ट्रीय वित्तसंस्था, व्यापारविषयक

नियंत्रण संस्था आणि आर्थिक स्वायत्त संस्था.

४) अंमली पदार्थांची आंतरराष्ट्रीय भूमिगत साम्राज्ये.

यापैकी काहींनी तर अनेक देशांमध्ये अफाट संपत्ती, मोठमोठ्या सेना, मोठ्या गुप्तहेर संघटना, आंतरराष्ट्रीय नातेसंबंधाच्या व्यवहारांत शासकीय सेवांवर परिणामकारक प्रभाव अशा सर्व गोष्टी प्राप्त करून घेतल्या आहेत.

या सर्व घटकांमुळे राष्ट्रीय सार्वभौमत्वाच्या संकल्पनेलाच हादरा बसला आहे. दुसरी आव्हानात्मक घटना म्हणजे युरोपीय संघाची ऊर्ध्वकेंद्री रचना. तिच्यामुळे दोन महत्त्वाचे प्रश्न उपस्थित होतात.

१) या रचनेमागील मानसिकतेचा प्रभाव अन्य प्रदेशांवर पडेल की काय? उदा. उत्तर अमेरिका, स्लावप्रदेश, अरब जगत, नव-कन्फ्युशियन समाज, शिंटो परिसर वगैरे.

२) आणि अशा प्रकारच्या ऊर्ध्वकेंद्री, प्रादेशिक रचनांमुळे चलनव्यवस्था, केंद्रीभूत बँकिंग, शैक्षणिक निकष, पर्यावरण, शेती, राष्ट्रीय अंदाजपत्रक अशा सर्व घटकांवर राष्ट्रबाह्य बंधने लादली गेल्यामुळे आताची राष्ट्र - राज्ये ही केवळ प्रांतांच्या पातळीवर येऊन बसतील की काय?

त्यामुळेच या संघर्षमय परिस्थितीत राष्ट्र - राज्य कल्पनेचा मूलाधार असे जे राष्ट्राचे सार्वभौमत्व तेच ओलिस धरले जात आहे. सार्वभौमत्वाशिवाय राष्ट्रीय हितसंबंधाची जपणूक अशक्य आहे. प्रत्येक राष्ट्राला त्याच्या सर्व घडामोडींबद्दल निर्णय घेण्याचा पूर्ण अधिकार व स्वातंत्र्य असणे आवश्यक आहे.

भाडोत्री लढवय्यांची योजना

पण अनेक राष्ट्र - राज्यांना आज मात्र एका नवीनच प्रश्नाला तोंड द्यावे लागत आहे. दहशतवादी, मूलतत्त्ववादी, गुन्हेगार, युद्धखोर, आणि मादक द्रव्याने संहार करणारे, यांना एकवेळ कसेही अलग काढून दूर ठेवता येईल. पण या प्रश्नापेक्षाही, राष्ट्र - राज्यांची सत्ता ही जागतिक भाडोत्री लढवय्यांकडे सोपविण्याची कारस्थाने पश्चिमी राष्ट्रांकडून चालू आहेत, त्यांचा मुकाबला कसा करावयाचा हा नवा प्रश्न आहे आणि सध्या गॅट (GAAT*) करार किंवा जागतिक व्यापारी संघटना (W.T.O*) यांच्या माध्यमांतून सर्वच तिसऱ्या जगातील देशांच्या सार्वभौमत्वाचा गळा घोटणारे बहुराष्ट्रीय उद्योगांचे गट हे यातील जबरदस्त जागतिक भाडोत्री लढवय्ये आहेत.

मेकॉलेच्या कूटनीतीचा नवा अध्याय

आणि यासाठी पश्चिमी राष्ट्रांनी मेकॉलेच्या वसाहतवादी कूटनीतीचा नवा अध्याय

---

* परिशिष्ट १ पहा.

सुरू केला. तसा तर राष्ट्रभक्ती म्हणजे एकाकीवाद अशा पद्धतीने मांडणी करण्याचा साम्राज्यवादी सत्तांचा खेळ पूर्वीपासूनच चालत आलेला आहे. उदा. दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय परिस्थितीच्या दडपणाखाली आपल्याला वसाहतींना स्वातंत्र्य द्यावे लागेल हे जेव्हा साम्राज्यवाद्यांना स्पष्ट झाले, तेव्हा बदलत्या परिस्थितीत आपले हितसंबंध वसाहतींमध्ये जास्तीत जास्त सुरक्षित ठेवण्यासाठी त्यांनी 'बचाव मोहिम' जारी केली.

भारतामध्ये राजप्रतिनिधीच्या कार्यकारी मंडळातील सदस्य हे त्यांचे दलाल बनले. 'संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी म्हणजे एकाकीवाद आहे' अशा प्रकारचे विपरीत भाष्य करून सर सी. पी. आर्. अय्यर यांनी, 'आंतरराष्ट्रवादाच्या या नव्या जमान्यात आपले ध्येय हे स्वातंत्र्य नसून परास्परावलंबन असले पाहिजे,' असे ठाम मत पुरस्कारले. उदारीकरण आणि जागतिकीकरण यांचे डॉ. मनमोहनसिंग यांचे समर्थन म्हणजे सर अय्यर यांच्या परस्परावलंबनाचेच एक अत्याधुनिक रूप आहे.

पश्चिमीकरणाचा आग्रह

आणि परस्परावलंबनाचा या मंडळींचा अर्थ पश्चिमीकरणाचा अवलंब करणे असा आहे. आपल्या प्रस्तुत विचाराच्या स्पष्टतेसाठी या गृहीतकृत्याची सार्थताही सर्व अंगांनी तपासून पहाणे आवश्यक आहे. म्हणजे मग परस्परावलंबनाच्या त्यांच्या कल्पनेतील व त्या अनुषंगानेच येणाऱ्या त्यांच्या, 'पश्चिमीकरण म्हणजेच आधुनिकीकरण' याही प्रमेयातील मिथ्य स्पष्ट होईल. आधुनिकीकरण आणि पश्चिमीकरण या दोन संकल्पना समीकरणात्मक नाहीत हे स्पष्ट होईल.

संज्ञांच्या व्याख्या आवश्यक

पण या चर्चेकडे वळण्यापूर्वी 'आधुनिकीकरण' आणि 'पश्चिमीकरण' या संज्ञांच्या नेटक्या व्याख्या करणे आवश्यक आहे. मागे उल्लेखिल्याप्रमाणे, 'माझ्याशी बोलायचे असेल तर प्रथम तुमच्या संज्ञांची व्याख्या करा.' असे व्हॉल्टेअर म्हणत असे.

विशेषत: विषय ज्यावेळी तांत्रिक असतो तेव्हा अर्थपूर्ण संवादासाठी हे अत्यावश्यक असते. शिवाय लोकांना ढोबळ अर्थाने शब्द वापरायची सवय असते. त्यामुळेच अचूक विचार प्रक्रियेसाठी अनेकदा सैलपणे वापरल्या जाणाऱ्या प्रचारातील शब्दांच्या जाचातून स्वत:ला मोकळे करून घ्यावे लागते. नाहीतर परस्पर समजुतींमध्ये गोंधळ निर्माण होतो. रिलिजन (Religion) या शब्दाचे भाषांतर भारतीय भाषांमध्ये 'धर्म' असे केल्यामुळे झालेले गोंधळ हे त्याचे अतिशय ठळक उदाहरण आहे. कम्युनिझम (Communism) चे भाषांतर 'साम्यवाद' या शब्दाने केले जाते. वस्तुत: साम्यवादात कम्यून (Commune)[२] नाही आणि कम्युनिझममध्ये साम्य नाही. आस्तिक व नास्तिक यांची भाषांतरे थिइस्ट (Thiest) आणि एथिइस्ट (Atheist) या शब्दांनी केली जातात. वस्तुत: मुळात आस्तिक व नास्तिक हे शब्द केवळ श्रुतींवर विश्वास वा

अविश्वास असणाऱ्यांबद्दल वापरले गेलेले आहेत. ते देवासंबंधीच्या विश्वासाशी वा अविश्वासाशी जोडलेले नाहीत. कारण ज्या देवाचा पश्चिमी नास्तिक निषेध करतात तो देव वेगळा आणि भारतातील आस्तिक ज्याची पूजा करतात तो देव वेगळाच आहे. त्यांचा देव व्यक्तिगत आहे. आपला देव व्यक्तिनिर्विशेष आहे. आपल्या देवाला नावही नाही व रूपही नाही. निराकार आणि म्हणूनच प्रत्येक व्यक्तीच्या समजशक्तीच्या पातळीप्रमाणे आणि मानसिक पार्श्वभूमीप्रमाणे, गरजेप्रमाणे, आणि मानसिक कल असेल त्याप्रमाणे, रुचीप्रमाणे तो कोणताही आकार धारण करणारा वा कदाचित न करणाराही, असा आहे.

तेव्हा, देवत्वाच्या संकल्पनेवरील पश्चिमी नास्तिकांच्या आघातामुळे अस्वस्थ होण्याचे काहीच कारण नाही. उलट आस्तिक व नास्तिक यांच्यांमधील तंटा हा प्रत्यक्षात आता सार्थता गमावलेल्या पोकळ संज्ञांवरून होणारा तंटा तर नाही ना, अशी शंका येते.

माया व मिथ्या या शब्दांचे इल्यूजन (Illusion) असे चुकीचे भाषांतर हे याच प्रकारचे उदाहरण आहे. काही दिवसांतच हे आपल्या लक्षात येईल की 'हिंदुत्व' चे भाषांतर हिंदुइझम (Hinduism) करणे बरोबर नाही. अचूक समानार्थी इंग्लिश शब्द हिंदुनेस (Hinduness) हाच आहे. उर्दू शब्द 'कौम' याचे पूर्णतः वेगवेगळे अर्थ, नुकतेच 'पंजाब'वरील एका जाहीर परिचर्चेत देण्यात आले.

सेक्युलर (Secular) हा सध्या भारतात वापरला जाणारा शब्द हे आणखी एक उदाहरण आहे. सेक्युलर म्हणजे –

'या जगातील घडामोडीसंबंधीचे जे जे आहे, ते ते, - म्हणजे ऐहिक, म्हणजेच, जे 'पवित्र नाही, मठासंदर्भातील नाही, पारलौकिक नाही' असे, लौकिक आणि अश्रद्धही.' –

त्याची समाजशास्त्राच्या विश्वकोशात व्याख्या दिलेली आहे. ती अशी –

'तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात सेक्युलॅरिझम म्हणजे देवत्वाच्या विरोधातील बंड मानता येईल आणि त्यामुळे साहजिकच आध्यात्मिकतेतील निरपवादता आणि विश्वात्मकता यांच्या विरोधातील प्रणालीही मानता येईल. राजकीय क्षेत्रात मात्र या शब्दांतून 'भौतिक क्षेत्रातील सत्ताधीश हा स्वतःच्याच अधिकाराने (मठाधिपतीच्या आदेशाप्रमाणे नव्हे) सत्ता राबवू शकत होता.' असा अर्थ व्यक्त होतो.

(Secularism in philosophical sphere may be interpreted as revolt against theological and eventually against metaphysical absolutes and universals. In the political sphere, it came to mean that a temporal rular was entilted to exercise power in his own right.)

दुसऱ्या शब्दांत, 'देवाचे देवाला द्या व सीझरचे सीझरला द्या,' या येशूने मांडलेल्या सूत्रामागील तत्त्वाचाच बोध या शब्दाने होत होता.

म्हणजे पंडित नेहरूंनी सेक्युलर राज्याच्या संकल्पनेत मांडलेला व रूढ झालेला सेक्युलर या शब्दाचा अर्थ हा या मूळ अर्थापेक्षा फारच वेगळा आहे. नेहरूवादी सेक्युलर राज्याच्या संकल्पनेच्या जवळात जवळ जाणारा समानार्थी शब्द हा 'निधर्मी राज्य' असा असू शकतो. अर्थात इतर कोणत्याही नेमक्या संज्ञेच्या अभावी मी हा शब्द वापरीत आहे.

'शब्द हे मारक असतात.' प्रभू येशूने म्हटले आहे आणि मुख्य संज्ञांची जर नेमकेपणाने व्याख्या केली नसेल तर तांत्रिक विषयावरील कोणतीही सार्वजनिक चर्चा ही फारच भयानक गोंधळ निर्माण करणारच!

आधुनिकीकरण म्हणजे काय?

या दृष्टीने पाहता मग 'आधुनिकीकरण' या कल्पनेची व्याख्या आपण करू शकतो काय? आधुनिक म्हणजे 'वर्तमान व नजिकच्या काळासंबंधीचे' अथवा 'वर्तमान व नजिकच्या काळाची वैशिष्ट्ये!'

आधुनिकीकरणाच्या रूढ अर्थामध्ये आधुनिक दृष्टिकोण वा पद्धती अवलंबिणे हा प्राथमिक अर्थ आहे. शिवाय, आधुनिक विचार, आधुनिक संज्ञा वा आधुनिक आविष्कार यांचा परंपरेशी सुमेळ घालताना, उपासनेविषयीच्या श्रद्धेच्या बाबींच्या संदर्भात परंपरेला गौणता देण्याची प्रवृत्ती म्हणजेही आधुनिकीकरण! वेगळ्या शब्दांत सांगायचे तर आधुनिकीकरण म्हणजे आधुनिक उपयोजन, अभिव्यक्ती वा प्रवृत्ती, आधुनिक भाव अथवा वैशिष्ट्ये; श्रद्धेय असे खिश्चन सिद्धांत हे विज्ञान आणि मीमांसा यांच्या उपलब्धींशी जुळवून घेण्याची प्रवृत्ती; आधुनिकीकरण म्हणजे वर्तमान काळाशी, परिस्थितीशी, गरजांशी, भाषेशी अथवा शब्दरचनेशी जुळवून घेणे; आधुनिक मार्गांचा अवलंब करणे!

साहजिकच दिसते की हा अर्थ म्हणजे युरोपातील विशिष्ट ऐतिहासिक पार्श्वभूमीचा स्वाभाविक परिणाम आहे. ज्या देशात एकच एक धर्मपीठ नव्हते, संघटित अशा धर्मगुरूंची व्यवस्था नव्हती, धार्मिक छळ नव्हता आणि विज्ञान व धर्म यांत संघर्ष नव्हता त्या आपल्या देशात आधुनिकीकरणाचा हा अर्थ अप्रस्तुत ठरतो.

त्यामुळेच भविष्यातील सर्वांगीण विकासाची खात्री निर्माण करण्यासाठी आधुनिक काळातील समस्या सोडविण्याची जी आव्हाने पुढे असतात त्यांना पुरे पडण्याच्या दृष्टीने आवश्यक ती सुसज्जता असाच व एवढाच आधुनिकीकरणाचा अर्थ अयुरोपीय देशांच्या बाबतीत सार्थ ठरतो.

पश्चिमीकरणाचा अर्थ

आणि पश्चिमीकरण म्हणजे काय? स्थूलमानाने 'पौर्वात्य समाजाला वा देशाला पश्चिमी कल्पना, उद्दिष्टे, संस्था, व्यवस्था, रचना, जीवनमान आणि जीवनमूल्ये

अवलंबायला लावणे', असा त्याचा अर्थ होतो.

पण नेमके पश्चिमी म्हणजे काय हे निश्चित करणे इतके सोपे नाही. सतत व्यापक होत जाणाऱ्या मानवी ज्ञानाच्या सीमा पाहिल्या म्हणजे लक्षात घ्यावे लागते की सत्याला पक्ष नसतो, वर्ग नसतो, जात नसते, समाज नसतो की राष्ट्रही नसते. ते निरपवादपणे वैश्विक असते. कदाचित एखादे सत्य प्रतीत होणारी पहिली व्यक्ती ही एखाद्या देशाची, एखाद्या वर्गाची वा एखाद्या प्रदेशाची असेल; पण त्यामुळे ते सत्य पश्चिमी वा पौर्वात्य ठरते असे नाही. उदा. खालील गोष्टी पश्चिमी की पौर्वात्य हे कोणी सांगू शकेल का ?

१) अलेक्झांड्रियाचा राजा क्लेमंट याने ज्याचा उल्लेख ब्राह्मणाचा शिष्य असा केला त्या पायथागोरसचा प्रसिद्ध सिद्धांत.

२) कणादाच्या परमाणुवादाने हजारो वर्षांपूर्वीच अनुमानलेली आजची पश्चिमी अणुविषयक प्रणाली.

३) कपिल मुनींच्या चिंतनात प्रथम आलेला व सिद्धान्तन केला गेलेला, हेगेल आणि मार्क्स यांचा द्वंद्वात्मक विरोध विकासवाद.

४) कोपरनिकसने सिद्ध करण्यापूर्वी हजार वर्षपिक्षाही आधी आर्य भट्टाने सिद्ध केलेले, 'पृथ्वी सूर्याभोवती फिरते, सूर्य पृथ्वीभोवती फिरत नाही' हे सत्य.

५) 'असतो सत् अजायत' हे डेमॉक्रेटसच्या भौतिकवादाचे त्याच्यापूर्वीच कित्येक शतके आधी बृहस्पतीने लिहिलेले पहिले सूत्र.

६) हिसेनबर्ग (Heisenberg) ने आधुनिक शास्त्राला प्रथम दिलेली आणि पतंजलीने हिंदूंना त्यापूर्वीच दिलेली भौतिक वस्तूची शास्त्रीय व्याख्या.

७) दिशा व काल यांची सापेक्षता वा सलगता, विश्वाची एकात्मता वगैरेसंबंधीच्या आइनस्टाइनने स्पष्ट केलेल्या आणि वेदान्ती तत्त्वज्ञांनी फार पूर्वीच मांडलेल्या शास्त्रीय कल्पना.

८) परमेष्ठी प्रजापतीने नासदीय सूक्तात सुरू केलेली आणि आइनस्टाइनने विकसित केलेली शास्त्रीय तत्त्वज्ञानविषयक विचारप्रक्रिया.

या संदर्भात एच्. जी. चेर्निशेवस्की (H. G. Chernyshevsky) ने म्हटले आहे.

'आधुनिक शास्त्रांकडून स्पष्ट आणि सिद्ध केलेली तत्त्वे ही वस्तुत: ग्रीक तत्त्वज्ञांनी आधीच शोधलेली व मान्य केलेली अशी होती आणि भारतीय विचारवंतांनी तर ती त्याही पूर्वी केव्हाच शोधून मान्य केलेली होती.'

(The principles explained and proved by the present day sciences were already found and taken to be true by the Greek philosophers and much earlier, by the Indian thinkers.)

सारांश-

सर्व ज्ञान हे वैश्विक असते, ते पश्चिमीही नसते व पौर्वात्यही नसते. हेच सर्व

शास्त्रे व तंत्रविज्ञान यांच्याबद्दलही खरे आहे.

उलट मानवी जाणीव म्हणजे भौतिकतेचा आत्यंतिक उन्नत असा विकास आहे, या इहवादी तत्त्वज्ञानाच्या घोषणेने आणि विशेषत: आधुनिक विज्ञानाच्या आक्रमामुळे भौतिक व अभौतिक यांच्यांमधील सीमारेषा जवळ जवळ नाहीशीच झाली आहे. *The New Soviet Psychic Discoveries* या हेन्री ग्रीस आणि विल्यम डिक यांच्या पुस्तकाने हेच तथ्य सांगितले आहे. मूलत: शुद्ध भौतिक निसर्गापासून सुरू झालेला पण पुढे वासना, अंत:प्रेरणा, आवेग यांना व्यापणाऱ्या जीवशास्त्रीय उत्क्रांतीमधून मेंदू, बुद्धी, विवेक आणि विवेकवाद, अतिसंवेद्य जाणिवा यांच्यापर्यंत पोचलेला (अनुमित), संकल्पनात्मक प्रवास हा खरा असेल वा नसेल, पण हे खरे आहे की वस्तुमात्र आणि ऊर्जा यांची परस्पर-परिवर्तनीयता सिद्ध झाल्यावर वस्तुमानाने आपले मूलभूत वैशिष्ट्य गमावले आहे आणि ते सतत विस्तारणाऱ्या ब्रह्माच्या आक्रमासमोर उघडे पडले आहे.

तेव्हा बऱ्याचदा अभिनिवेशाने अधोरेखित केलेला हा फरक आता विवेकाच्या चिकित्सेपुढे टिकू शकत नाही. वासना, आवेग, इच्छा, बुद्धी, प्रवृत्ती, भावना, अंत:प्रेरणाही मूलत: मानवी असतात. त्यावर पश्चिमी वा पौर्वात्य असा शिक्का मारता येत नाही.

सांस्कृतिक वैशिष्ट्यपूर्णतेची मीमांसा

मग नेमके पश्चिमी म्हणजे काय ?

जरी मानवी मन हे मूलत: सर्वत्र सारखेच असले तरीही हे नाकारणे वस्तुस्थितीला सोडून होईल की वेगवेगळे समाज हे वेगवेगळ्या परिस्थितीतून आणि वेगवेगळ्या ऐतिहासिक घटनाक्रमातून गेलेले आहेत आणि त्यामुळे त्यांच्या सामूहिक मनावर त्याचा परिणाम नंतरही राहून गेलेला आहे. भूगोल व इतिहास हे अशा फरकाला कारण होणारे मुख्य घटक आहेत.

उदा. भारताबद्दल व्हिन्सेंट स्मिथने म्हटले आहे -

'भारताला समुद्र आणि पर्वत यांनी वेढलेले असल्याने तो निर्विवादपणे एक स्वतंत्र भौगोलिक घटक आहे आणि त्याप्रमाणे एकाच नावाने तो ओळखला जाणे हे योग्यच आहे. जगातील इतर सर्व प्रदेशांपेक्षा भारताला वेगळे करणारी अशी कितीतरी वैशिष्ट्ये त्याच्या संस्कृतीच्या प्रकारातही आहेत. मानवी ऐतिहासिक विकासक्रमातील भारताचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान या वैशिष्ट्यांमुळेच सिद्ध होते. ही वैशिष्ट्ये संपूर्ण देशाला पुरेशा प्रमाणात समानतेने लागू होतात. त्यामुळेच मानवतेच्या सामाजिक, धार्मिक व बौद्धिक विकासाच्या इतिहासातील एक वेगळा एकात्म घटक म्हणून भारताचे स्थान पूर्णपणे समर्थनीय ठरते.'

(India, circled as she is by means of seas and mountains, is

indisputably a geographical unit and as such rightly designated by one name. The type of civilization too has many features which differentiate it from all other regions of the world; while they are common to the whole country in a degree sufficient to justify its treatment as a unit in the history of the social, religious and intellectual development of mankind.)

इतर अनेक घटकांबरोबरच राजकीय-भौगोलिक घटक हे अशा फरकामध्ये पुष्कळच भर टाकतात.

असे सर्व वैशिष्ट्यपूर्ण घटक हे विविध संस्कृतींना जन्म देतात. 'संस्कृती' या शब्दाने एका बाजूला एखाद्या समाजाच्या, स्वत:च्या म्हणून खास वैशिष्ट्यपूर्ण असलेल्या त्याच्या मनावरील संस्कारांचा प्रवाह व्यक्त होतो आणि दुसऱ्या बाजूला इतिहासक्रमातील त्याच्या स्वत:च्या वासना, भावना, विचार, उक्ती व कृती यांचा तो एक साकल्याचा परिपाकही असतो. त्यामुळेच उदा. अरबस्थानची वाळवंटे आणि गंगेचे खोरे, सपाट खुल्या मैदानावरील छावणीसारखा जर्मनी हा देश, इटली अथवा अलग पडलेले ग्रेट ब्रिटन, तरुण अमेरिका अथवा प्राचीन भारत अशा विविध समाजांच्या बाबतीत हा संस्कारांचा प्रवाह समान असणे शक्य नाही.

पश्चिमी संस्कृतीची स्वत:ची वैशिष्ट्ये–

इहवाद

त्यादृष्टीने आधुनिक पश्चिमी जगाची स्वत:ची अशी काही वैशिष्ट्ये आहेत हे लक्षात येते. उदा. प्राधान्याने इहवादी असल्याने त्याने उपभोक्तावादाची मूल्यव्यवस्था हा कळीचा मुद्दा बनविला आहे आणि स्वैराचार हा त्याचा स्वाभाविक परिपाक आहे.

(अत्याधुनिक वैज्ञानिक-शास्त्रज्ञ सोडले तर बाकी) पश्चिमी जगत हे अजूनही न्यूटनच्या विज्ञानाच्या प्रभावाखालीच असल्यामुळेच, ते 'मन हा वस्तुमात्रावरील एक इमला आहे' या मिथ्याला चिकटून आहे. त्यामुळेच, 'सामाजिक, आर्थिक रचना हीच आपले व्यवधान खेचून घेणारी मूलभूत गोष्ट असते. धर्म, संस्कृती, नीती, साहित्य इ. या सर्व गोष्टी म्हणजे बाहेरचा इमला आहे आणि एकदा सामाजिक, आर्थिक, व्यवस्था सुसज्जतेने बदलली की या साऱ्यांमध्येही आवश्यक ते बदल घडतातच. मनाकडे मुद्दाम लक्ष द्यावयाची गरज नाही, संस्कार अनावश्यक आहेत.' अशी तिकडील धारणा आहे. आधुनिक पश्चिमी जगताच्या विचारव्यवस्थेचा एकमेव स्वारस्याचा विषय म्हणजे सुसंगत सामाजिक-आर्थिक परिवर्तन हा आहे. त्यांना मानसिक बदलाच्या विषयात लक्ष घालण्यास वेळ नाही. त्यांच्या मते नवीन सामाजिक व्यवस्था प्रस्थापित झाल्यावर मानसिक बदल आपोआप होईलच.

मानवपेशीकेंद्री मानवतावाद (Homocentric Humanism)

एककेंद्रवाद हा पश्चिमेचा आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण भाग आहे! 'मनुष्य हाच सगळ्याचा निकष आहे.' अशी प्रोटॅगोरसने घोषणा केली. मार्क्सने म्हटले आहे, 'मानव हेच मानव जातीचे मूळ आहे.' हे सारे विचार प्रशंसनीय आहेतच.

पण पश्चिमी एककेंद्रवाद केवळ अशा स्वरूपाचाच आहे असे नाही. मॅक्झिम गॉर्कीच्या *The Lower Depths* या नाटकातील एका पात्राच्या तोंडून हा एककेंद्रवाद वास्तविकरीतीने व्यक्त होतो. 'सर्व गोष्टी मानवाचाच भाग आहेत.' 'सर्व गोष्टी माणसासाठीच आहेत.' 'मानव हेच एकमेव सत्य आहे.' हे खरे आहे की या धारणांमुळे मानवाचे मानवाकडून शोषण केले जाणार नाही; पण या संपूर्ण अस्तित्वाचाच केंद्रबिंदू मानवी जीवपेशीच आहे असे मानल्यावर अस्तित्वरूप अन्य घटक, अमानवी जीवपेशी आणि इतर साऱ्या गोष्टी यांच्यावर अन्याय होतो आणि मानवाकडून होणाऱ्या मानवेतर प्राण्यांच्या शोषणाला उत्तेजनसुद्धा दिले जाते.

या एककेंद्रवादाचे व्यावहारिक अभिप्रेत अर्थ आपल्या देशात अजून पूर्णपणे लक्षात घेतलेलेच नाहीत, याचे कारण आवश्यक अशा आनुषंगिक गोष्टींचे अज्ञान!

उदा. कितीजणांनी या गोष्टीची दखल घेतली आहे की केवळ औषधी संशोधनासाठीच नव्हे तर प्रसाधनांसाठी होणाऱ्या प्रयोगांसाठीही ससे, गिनिपिग, कुत्री, बेडूक, उंदीर, माकडे इ. ना अत्यंत क्लेशकारी अमानुष पद्धतीने जगविले अथवा मारले जाते? कितीजणांना जाणीव आहे की जनावरांना केवळ प्रदर्शनासाठी, खेळांसाठी, चित्रीकरणासाठी वा उत्सवांसाठी क्रूरपणे वागविले जाते? डुकरे, केसाळ प्राणी, उंट आणि शेळ्या मेंढ्या यांची दुरावस्था कितीजणांना माहीत आहे? देवमासे हे सौम्य, संवेदनशील व अनाक्रमक असतात; पण तरीही प्रत्येक दहाव्या मिनिटाला एखादा विराट देवमासा वर्णनापलीकडील अतीव वेदनांनी कुठे ना कुठे मरतो आहे. डॉल्फिन हे अतिशय बुद्धिमान मासे केवळ प्रदर्शनासाठी कलाकार म्हणून राबविले जातात. हेच भवितव्य अस्वले, माकडे, कुत्री, साप, मुंगुसे, कोंबडे आणि पोपट यांच्या भाळीही असते. अतिशय मृदू आणि डौलदार काळवीट हे त्याच्या कातड्यासाठी व शिंगांसाठी सापळ्यात पकडले जातात. हस्तिदंताच्या अवांछनीय लोभासाठी हत्ती मारले जातात. प्रेमपक्षी म्हणून गणले जाणारे बडग्रीगर्स पक्षी, त्यांच्या सुंदर असण्याच्या गुन्ह्यासाठीच जणू जन्माचे बंदी होऊन पडतात. कुत्र्याची पिल्ले नकोशी झाली की अमानुषरीतीने मारली जातात. सौंदर्य, मोहकता, प्रतिष्ठेचा सोस आणि कला यांच्या नावाखाली पशूंचा अनावश्यक छळ आणि हिंसा होत असते.

शांपू, ओष्ठशलाका, दंतमंजन आणि साबण यांत जनावरांची, विशेषत: गोमांसाची चरबी असू शकते. अतिउच्च प्रकारच्या सुगंधी द्रव्यात विविध जनावरांच्या जनन ग्रंथीतील स्राव असू शकतो. स्टिअरेटस्, स्टिअरिक ॲसिड, ओलिक ॲसिड, ग्लिसरिन, ग्लिसरॉल, जिलेटिन, इस्ट्रोजेन, मस्क, अँबर ग्रीज यांपैकी प्रत्येक द्रव्य हे जनावरांच्या

चरबीपासून काढले जाते. जनावरांच्या चरबीतून प्राप्त होणाऱ्या द्रव्यांऐवजी वनस्पतिजन्य खाद्येतर तेलाचा वापर होऊ शकतो आणि आपला सौंदर्यवर्धनाचा हव्यास हा केवळ प्राणिजन्य साहित्यानेच पुरविण्याची गरज नाही हे आपल्या अद्यावत स्त्रियांना माहित आहे का? सामान्य माणसाला गुरे, हरणे, मासे, मांजरे, रेशिमकिडे, लहान, मोठी कासवे, खारी, आइस्टर, चित्ते, शहामृग, पाली, लिंक्स, लांडगे, गर्भवती घोड्या, कांगारू आणि बीव्हर यांच्यावर कसे अत्याचार होत असतात हे माहित नसते.

पश्चिमी मानवतावादाचे स्वरूप

पश्चिमी मानवतावाद हा निरीश्वरवादी व एककेंद्री आहे. हे खरे आहे की मानवतावाद हा आत्मकेंद्रित व्यक्तिवादापेक्षा केव्हाही चांगलाच! पण या मानवतावादाची काही पार्श्वभूमी आहे.

मुळात ख्रिश्चन मानवतावाद हा देवकेंद्रित मानवतावाद आहे असे म्हटले तरी येशूच्या मूळ आदेशांवर तो आधारलेला नसून सेंट पॉलच्या धर्मपीठप्रणीत धर्मप्रणालीवर आधारलेला चर्चकेंद्रित मानवतावाद आहे.

त्यामुळेच आजच्या पश्चिमी मानवतावाद्यांनी ईश्वरसत्ताकता आणि धर्मपीठाचा जुलूम यांना विरोध करण्याच्या अतिउत्साही भूमिकेतून परमेश्वराचे अस्तित्वच नाकारले आहे. निरीश्वरवाद हेच एकापरीने मानवतावादाचे स्वरूप म्हणून आज पुढे आले आहे, असे इटीन बोर्नने (Etienne Borne) म्हटले आहे. फ्यूरबॅशच्या (Feuerbach) मते पश्चिमी मानवतावादाने हे गृहीत धरले की 'मानव' हाच सर्वेसर्वा होण्यासाठी देव कल्पनेचा लय करणे आवश्यक आहे. वर म्हटल्याप्रमाणे प्रोटॅगोरसच्या मते, मानव हाचं सर्व गोष्टींचे प्रमाण आहे. पश्चिमी मानवतावाद्यांच्या, मानवावरील या प्रकारच्या व्यावर्तक व एकांगी भरामुळे एकीकडे ते ईश्वरविरोधी बनले व दुसरीकडे एककेंद्रवादी बनले. १९ व्या शतकाच्या मध्यातील युरोपीय मानवतावाद्यांच्या मानसिकतेबद्दल डॉमर (Daumer) चा अभिप्राय लक्षात घेण्यासारखा आहे.

'माणसाचे क्रूर आणि जुलमी हात दुर्दैवी प्राण्यांचा भयानक छळ करतात असे म्हणणे म्हणजे या रानटी लोकांच्या (प्रस्तुत एककेंद्री मानवतावाद्यांच्या) दृष्टीने, 'कोणी दखल घेऊ नये' अशा प्रकारचा निरर्थक बाष्कळपणा आहे!'

(The frightful tortures that unfortunate beasts suffer at the tyrannous and curel hand of man, are for these barbarians, 'rubbish' that nobody should bother about.)

*True Humanism*मध्ये मॅरिटेनने म्हटले आहे -

'मानवपेशीकेंद्री असा कोणताही मानवतावाद हा अंतिम अर्थाने अमानुष मानवतावादच असतो.'

(Any form of anthropocentric humanism is an inhuman humanism.)

आणि दुसरीकडे मानवी सुसंवादात वाढ करण्यासाठी आवश्यक असे प्रोत्साहक वातावरणही हा पश्चिमी देवविरोधी एककेंद्री मानवतावाद, निर्माण करू शकला नाही. हे खरे आहे की 'मानवी अधिकारांचे जागतिक घोषणापत्र' अशा प्रकारचा काही दस्तऐवज कोण्या काळी तयार होईल अशी दुसऱ्या महायुद्धापूर्वी कोणी कल्पनाही केली नव्हती. यूनो आणि मानवाधिकाराच्या संदर्भातील विविध आंतरराष्ट्रीय यंत्रणा यांचे विविध करार आणि प्रस्ताव म्हणजे आंतरराष्ट्रीय कायद्याचा पाया होय हेही खरे आहे. पण मानवाधिकारांच्या अनुषंगाने निर्माण झालेला आंतरराष्ट्रीय कायदा हा काटेकोरपणे खऱ्या अर्थाने कायदेशीर नाहीच तर तो बव्हंशी केवळ नैतिकच आहे.

तसे तर 'आध्यात्मिकदृष्ट्या मुक्त झालेल्या नीतिवान माणसांच्या सामूहिक प्रयत्नांतून संपूर्ण जगाची पुनर्रचना करावी व बंधुतेतून समान हितसंबंधांवर आधारलेल्या मुक्त मानवांच्या लोकसंघांच्या रूपात ती रचना सिद्ध व्हावी' असे मानवेंद्रनाथ रॉय यांनीही पुरस्कारिले होते.

पण मागे उल्लेख केल्याप्रमाणे अशा प्रकारचे मानवाधिकार, नागरी स्वातंत्र्ये, मूलभूत स्वातंत्र्ये यांचे रक्षण हे सामान्य माणसाच्या जाणिवेच्या पातळीवर व समाजासमाजातील नात्यांवर आणि आंतरराष्ट्रीय सामंजस्याच्या भक्कम पायावर अवलंबून असतात. केवळ हक्कप्रवण संबंधांमधील नैतिकतेचा अपुरेपणा जॉन क्लिनिग यांच्या अवतरणातून स्पष्ट झालेला आहे. त्याचप्रमाणे व्यक्तीच्या हक्कांच्या जपणुकीसाठी आवश्यक अशा सामाजिक, नैतिक, मानसिकतेबद्दल डॉ. आंबेडकर व विल् दुरांट यांची पूर्वोल्लेखित मतेही या दृष्टीने महत्त्वाची ठरतात*.

हक्कप्रवणता व कप्प्याकप्प्याची विचारप्रक्रिया

पण अशाप्रकारे केवळ हक्कावर भर देणारी हक्कप्रवण मूल्यव्यवस्था हा पश्चिमी जीवनदृष्टीचा आणखी एक खास वैशिष्ट्याचा भाग आहे.

शिवाय पश्चिमी विचारप्रक्रिया ही नेहमीच कप्प्याकप्प्यांची राहत आली आहे. याचाही मागे उल्लेख केला आहे आणि तिचा दृष्टिकोणही संकीर्ण आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीच प्रथम पश्चिमी शास्त्रज्ञांना आंतरज्ञानशाखीय दृष्टिकोणाची उपयुक्तता जाणवू लागली. तोपर्यंत सर्वच घटितांचे परस्परसंबद्ध आणि परस्परावलंबी स्वरूप त्यांना उमगू शकले नव्हते. वस्तुतः जागतिक पातळीवर परस्परसंबद्ध असलेल्या या जीवनात भौतिक, जीवशास्त्रीय, मानसिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक अथवा पर्यावरणात्मक अशी सर्वच घटिते ही परस्परावलंबी असतात. मानव जातीला संत्रस्त करणाऱ्या समस्या पुष्कळ आणि विविध प्रकारच्या आहेत; पण त्या म्हणजे एका मूलभूत समस्येचीच विविध अंगे आहेत. एका विद्वान लेखकाने म्हटल्याप्रमाणे

---

* पहा – हिंदू दिशावेध - पृ. २२ - २४

आपण कर्करोग, गुन्हेगारी, प्रदूषण, अणुशक्ती, चलनवाढ किंवा ऊर्जेचा तुटवडा यांपैकी कोणत्याही बाबतीत बोलत असलो तरी त्या सर्व समस्यांच्या मुळातील गतिशास्त्र एकच आहे.

अर्थव्यवहारावरील परिणाम

पाश्चिमात्यांना अजूनही ही मूलभूत वस्तुस्थिती जाणवावी तशी जाणवलेली नाही. उदा. पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे त्यांच्या मते अर्थशास्त्र हा एक साकल्याच्या विचारापासून अलग असलेला स्वायत्त, स्वतंत्र असा विषय आहे; पण त्यामुळेच आपल्या एकूण आर्थिक विनिमयातील, पर्यावरणात्मक, सामाजिक व मानसशास्त्रीय मिती समजून घेण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठरणाऱ्या गुणात्मक घटकांचा ते आपल्या संख्यात्मक आर्थिक विश्लेषणाशी मेळ घालू शकले नाहीत. त्याचप्रमाणे मिळकतदार, उपभोक्ते, गुंतवणुकदार अशा विविध भूमिकांमधील लोकांच्या वागणुकीविषयीच्या अलिकडील मानसशास्त्रीय संशोधनातील तथ्यांचाही स्वतःच्या संख्यात्मक आर्थिक विश्लेषणाच्या आधारे ते अन्वय लावू शकलेले नाहीत. त्यांनी स्वतःच्या विकासकल्पनेची सार्थता, विकासाच्या संदर्भातील इतर विविध नमुन्यांच्या प्रकाशात पडताळून पाहिलेली नाही. ती अशी पडताळून पाहण्यापूर्वीच आपल्या विकास नमुन्याप्रमाणे विकास घडवून आणावयाचे अविवेकी व्यसन त्यांना जडले.

त्यामुळे सर्व पश्चिमी अर्थप्रणाली या अवास्तव व त्यामुळे अप्रस्तुत ठरलेल्या आहेत. जेव्हा डॉ. शूमाकर यांनी पूर्णतः वेगळी मूल्ये व उद्दिष्टे असलेल्या दोन अर्थव्यवस्थांची तुलना समोर मांडली व अर्थशास्त्राचे मूल्याधिष्ठित स्वरूप स्पष्ट केले तेव्हा या अर्थतज्ञांना धक्काच बसला असेल. एक पश्चिमी इहवादी व्यवस्था - त्यामध्ये उत्पादनाच्या आराखड्यानिशी जास्तीत जास्त उपभोग साधण्याचा प्रयत्न आहे. त्याचप्रमाणे जीवनमान हे वार्षिक वापराच्या प्रमाणावर मोजले जाते. दुसरी बुद्धमतातील अर्थव्यवस्था - तीमध्ये अधिकाधिक उत्पादनाच्या सूत्रानिशी अधिकाधिक मानवी स्वास्थ्य साधण्याचा प्रयत्न करण्याचे उद्दिष्ट आहे आणि 'योग्य जीवनमान' आणि 'मध्यम मार्ग'[३] या कल्पनांवर ते आधारलेले आहे. पश्चिमेने विविध भौतिक घटकांच्या संदर्भातील निकष निश्चित केले असले तरी तिला मानवी समाधानाचे आणि इतर सामाजिक व मानसिक घटकांचे निकष ठरविता येतील काय ?

ही वैशिष्ट्ये केवळ नमुन्यादाखल

वर उल्लेखिलेले मुद्दे केवळ नमुन्यादाखल आहेत, समग्र नाहीत. पण पश्चिमेलाही स्वतःची अशी वेगळी वैशिष्ट्ये आहेत हे दाखविण्यासाठी ते पुरेसे आहेत. मग पश्चिमीकरण म्हणजे अशा सर्व वैशिष्ट्यपूर्ण गोष्टींचे आंधळे अनुकरण करणे आहे का ?

आंधळे अनुकरण व्यवहार्य आहे का ?

आणि जरी आपण जास्तीत जास्त आस्थेने अशा प्रकारचे आंधळे अनुकरण करण्याचे ठरविले तरीही ते व्यवहार्य आहे का ? गुरुदेव ठाकूरांनी म्हटले होते की -

'आपले स्वत:चे आहे त्याकडे दुर्लक्ष करणे व परकीयांची भीक मागणे म्हणजे निव्वळ सुस्त भिकारीपणा आहे.'

(It is idle mendicancy to discard our own and beg for the foreign.)

भारताने केलेल्या पश्चिमेच्या अनुकरणाचा धिक्कार करून ते म्हणतात की हे अनुकरण म्हणजे आपल्या हाडांचा सांगाडा हा दुसऱ्याच्या कातड्याने झाकण्यासारखे आहे आणि हाडे व चामडे यांच्यांत प्रत्येक क्षणाला तणातणी वाढविण्यासारखे आहे.

हे अव्यवहार्य तर आहेच पण असह्यही आहे.

यथास्थितिवादाचा व अलगतावादाचा निरर्थक आरोप

अशा प्रकारची मते व्यक्त केल्याबरोबर हितसंबंधी गटांकडून यथास्थितिवादाचा आरोप केला जातो. हे लक्षात घेतले जात नाही की पश्चिमेची नक्कल न करताही प्रगती शक्य आहे. या दोन भिन्न प्रक्रिया आहेत. क्वचित त्या एक दुसऱ्यात मिसळलेल्या असतात. उदा. इस्लामच्या मक्का-मदिनाच्या पवित्र स्थळांचे रक्षणकर्ते सौदी अरेबियाचे राजे फाहद ७ जून १९८३ रोजी म्हणाले होते की काळानुसार इस्लामी नियम बदलले पाहिजेत. इस्लामी धर्मवेत्त्यांच्या मक्का येथील आंतरराष्ट्रीय परिषदेसमोर त्यांनी मांडलेले हे मत म्हणजे आमूलाग्र परिवर्तनवादच होता; पण त्यांनी काही या परिषदेपुढे अफगाणिस्थानचे राजे अमानुल्लाखान, इराणचे शहा, तुर्कस्थानचा गाझी मुस्ताफा केमालपाशा यांची उदाहरणे ठेवली नाहीत.

आपल्याकडील उदाहरणे पाहिली तर असे दिसते की राष्ट्रभक्त असलेल्या आपल्या बहुतांश समाजसुधारकांचा पश्चिमेकडे अजिबात कल नव्हता. आर्यसमाज, ब्रह्मोसमाज, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज, हरिजन सेवक संघ, भारतीय आदिम जातिसंघ, द्रविड कळघम, नॅशनल चर्च मूव्हमेंट, शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन, अथवा मुस्लिम सत्यशोधक समाज ही सुद्धा 'पश्चिमीकरणाशिवाय परिवर्तनवाद शक्य आहे' या प्रमेयाचीच देदिप्यमान उदाहरणे आहेत.

या संदर्भात गुन्नर मिर्डालने आपल्या *Asian Drama* या ग्रंथात स्पष्ट केल्याप्रमाणे, 'स्वातंत्र्यानंतर पूर्वीच्या सत्ताधीश देशांशी असलेले वसाहती समाजांचे घनिष्ट नाते जपले गेले एवढेच नव्हे तर क्वचित काही बाबतीत ते अधिक गहिरे केले गेले.' अशी वस्तुस्थिती असल्याने स्वाभाविकपणेच आता या देशांनी पूर्वीच्या साम्राज्यवादी देशांचे अनुकरण करण्याला दिलेला नकार हा आक्षेपार्ह मानला जाऊन गैरसमजाला निमंत्रण देतो आणि हा नकार म्हणजे शहामृगी थाटाचा एकाकीवाद अथवा पश्चिमेबद्दलचा

अविवेकी पूर्वग्रह असल्याचा गैरसमज होण्याची शक्यता त्यामुळेच अधिक असते. पण खरे पाहता अशा गैरसमजाला काही आधार नाही. पश्चिमी समाजांचे आम्ही काही शत्रू नाही. उलट अतिशय उत्कट कृतज्ञतेच्या भावनेने ॲनी बेझंट, भगिनी निवेदिता, रोमा रोलाँ, अरविंदाश्रमाच्या श्री. माँ, मीरा बेन, फेन्नर ब्रॉकवे, अरुंडेल, अर्नोल्ड टॉयन्बी, ल्यूई फिशर, गार्ब, अल्बर्ट श्वाइट्झर, मॅक्समूलर, शौपेन हॉवर, विंटरनिट्झ आणि इतर अनेकांचे आम्ही स्मरण करतो. कारण त्यांचे भारताबद्दलचे आणि भारतीय संस्कृतीबद्दलचे प्रेम आम्हाला आमच्या कसोटीच्या, आपत्तीच्या काळात सदैव स्फूर्तीचा स्रोत ठरत आले आहे. त्याचप्रमाणे जोमो केन्याटा, सीझर शावेझ, मार्टिन ल्यूथर किंग, अलिकडे सिसलीचे गांधी म्हणून प्रसिद्धीला आलेले डॅलिनो डोल्सी, फिलिपिन्सचे ॲक्विनो आणि बेनिनो निनॉय (Benigno Ninoy) असे पददलितांचे काही मान्यवर नेते हेही त्यांच्या गांधीवादी आदर्शाच्या आणि पद्धतीच्या अनुसरणामुळे भारतीय समाजाला सदैव प्रिय ठरले आहेत. तेव्हा ही बाब अगदीच वेगळी आहे. पश्चिमेची आंधळी नक्कल करण्याच्या रुग्णाइत मनोधारणेचा तिच्याशी कोणत्याही प्रकारचा संबंध नाही.

ज्या हिंदूंचा देश, मार्क्सच्या मते, युरोपीय भाषा आणि युरोपीय उपासनापंथ यांचे उगमस्थान ठरला आहे आणि ज्या देशाचे वैचारिक-धुरीण 'इस्लामी शरीरातील हिंदू आत्मा' अशी भाषा बोलू शकतात अथवा पश्चिमी वस्तुजात आणि हिंदू आत्मा यांच्या संश्लेषणाची कल्पना मांडू शकतात, त्या हिंदूंना पश्चिमेकडील कोणत्याही चांगल्या गोष्टीचे उपयोजन करण्यात भय कसले ?

पश्चिमीकरण या संज्ञेचा ऐतिहासिक संदर्भ

पण मग 'पश्चिमीकरण' या संज्ञेने अशा प्रकारचे अनुकरण सूचित होते का? की तिला काही वेगळा अर्थ आहे? काही वेळा एखाद्या संज्ञेला तिच्या विशिष्ट संदर्भामुळे वा पार्श्वभूमीमुळे अर्थ प्राप्त होतो.

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या आंतरराष्ट्रीय घटना आणि विकसित व विकसनशील राष्ट्रांच्या नात्यांमधून निर्माण झालेल्या समस्या यामुळे 'पश्चिमीकरण' या संज्ञेला एक विशिष्ट रंग व अर्थ दिला गेला आहे. ती केवळ ज्ञानात्मक, शैक्षिक संज्ञा राहिलेली नाही. तिचे तत्काळ होणारे व्यावहारिक परिणाम आहेत. जेव्हा 'पश्चिमीवाद' ही संज्ञा वापरली जाते तेव्हा पश्चिमी संस्कृती आणि पश्चिमी नमुना हे अभिप्रेत असतात आणि म्हणून पश्चिमीकरण याचा 'पश्चिमी नमुना हाच विकासाचा वैश्विक नमुना म्हणून स्वीकारणे' असाच अर्थ होतो आणि आपण जेव्हा आधुनिकीकरणाबद्दल बोलतो, पश्चिमीकरणासह वा विरहित, तेव्हा खरे म्हणजे आपण हा प्रश्न उपस्थित करीत असतो की पश्चिमी नमुना हा विकासाचा एकमेव वैश्विक नमुना म्हणून आपण स्वीकारावा का ?

पश्चिमीकरण म्हणजे आधुनिकीकरण हे मिथ्य

Homo Faber मधील भाषेत बोलायचे तर आपण आधुनिकतेचे आदर्श आणि आधुनिकीकरणाची प्रक्रिया आणि क्रम हा केवळ पश्चिमी देशांच्या अनुभवापुरताच सीमित करावयाचा काय? विस्तीर्ण आणि विविध समाज आपण एकाच ऐतिहासिक नमुन्याच्या एकाधिकारशाहीच्या दावणीला बांधावयाचे काय? इतिहास हा भूतकाळाच्या नमुन्याप्रमाणे रचना येईल हे खरे पण तो केवळ पश्चिमी देशांच्या भूतकाळाप्रमाणेच रचावा असे म्हणण्यासाठी काही खास कारण आहे का? अगदी अधिक हितकर अशा शास्त्राच्या हेतूच्या दृष्टीनेही पाहिले तरीही सामाजिक आणि समाजशास्त्रीय कल्पनाशक्तीलाकोणतीही मर्यादा न घालणे हे सर्वोत्तम नाही का?

या संदर्भात इनायतुल्ला या पंडिताचा *'Towards a Non-Western Model of Development'* या ग्रंथातील उल्लेख लक्षणीय आहे.

'सर्व इतिहास जणू कठोरपणे एकाच भवितव्याकडे, एकाच प्रकारच्या उद्दिष्टांकडे आणि एका प्रकारच्या मूल्यश्रेणींकडे निघाला आहे, अशी पश्चिमेने स्वत:ची धारणा करून घेतली आहे. पश्चिमेने केवळ स्वत:च्या भरभराटीच्या काळातील पुराव्यांचे रचनाबद्ध प्रदर्शन मांडले व या काळापूर्वी पारंपरिक समाजांनी गाठलेल्या आणि पश्चिमेला प्रदान केलेल्या तंत्रवैज्ञानिक विकासाकडे पश्चिमेने सोयीस्कररीतीने पूर्ण दुर्लक्ष केलेले आहे. अशी भौतिक व तंत्रवैज्ञानिक प्रगती ही जागतिकीकरण, कार्यविषयक सुनिश्चितता, लक्ष्यप्रवणता आणि परिणामकारक तटस्थता या सर्व घटकांच्या मेळाचीच परिणती होती असे नाही हेही पश्चिमेने घ्यावे तसे लक्षात घेतले नाही.'

(The West presumed that all history is inexorably moving toward the same destiny, same goals and the same value systems as Western man has ....Marshalling evidence from the period of ascendancy of western society and conveniently ignoring the vast span of technological development before this period which the traditional societies had developed and transmitted to the western societies, it ignores the fact that technological and material development before this period was not always the product of a combination of universalism, functional specificity, achievement-orientation and effective neutrality')

(Communication and Change in the Developing Countries)

शिवाय आधुनिक पश्चिमी तंत्रविज्ञान आणि अर्थव्यवहार यांचा शिरकाव म्हणजे पश्चिमेतर देशांच्या भूमीवरील, त्यांच्या संस्कृतींना विपरीत अशा प्रकारच्या एका पूर्णत: नव्या संस्कृतीचे बीजारोपणच ठरते.

केवळ पश्चिमी म्हणून नकार वा स्वीकार नाही

पण केवळ पश्चिमी म्हणूनच पत्करणे वा नाकारणे हे आमच्या राष्ट्रीय मानसात बसत नाही, हे पूर्वीच स्पष्ट केले आहे. परकीय संस्कृती, रचना, व्यवस्था यांतील सर्व चांगल्या गोष्टींचा आम्ही सतत स्वीकार करीत आलो आहोत, हेही 'हिंदू जीवनदृष्टी'च्या अनुषंगाने पाहिले आहे; पण दरवेळी ही प्रक्रिया आत्मसात करण्याची होती. 'पश्चिमीकरण' या प्रचलित कल्पनेत मात्र आमची सांस्कृतिक अस्मिता व राष्ट्रीय व्यक्तिमत्त्व यांचा लय गृहीत धरलेला आहे. त्यामध्ये परकीय संस्कृतीने आम्हाला शोषून घेणे व आमचे त्या संस्कृतीत विलीनीकरण होणे हे गृहीत धरलेले आहे; पण जरी पश्चिमेकडे आपल्याला विकण्यासारखे काही चांगले असले तरी आपण आपल्या व्यक्तिमत्त्वाची किंमत देऊन ते विकत घ्यावे का? प्रभू येशूने विचारले आहे.

'जर आपल्याला पृथ्वीचे राज्य मिळाले व या विनिमयात आपण आपला आत्मा गमावला तर यात कोणता फायदा असेल ?'

(Of what profit whould it be, if you gain the kingdom of earth and in the process, lose your soul ?)

हा प्रश्न आजच्याही संदर्भात तितकाच प्रस्तुत आहे.

तेव्हा सात्म्यच ! अस्मितेचा लय नव्हेच नव्हे !!

ही सारी चर्चाच अनावश्यक ?

काही लोकांच्या दृष्टीने ही सबंध चर्चाच अनावश्यक आहे. कारण हिंदूंच्या या देशात त्यांच्या पूर्वजांनी सर्व दिशांनी येणाऱ्या उत्तम विचारांचे स्वागतच केले आहे आणि त्यांनी घोषित केले, 'पृथिव्यै समुद्रपर्यंताया एक राष्ट्र।' भारताने सदैव आंतरराष्ट्रवादाचा पुरस्कार केला आहे. खरे तर वैश्विकता हा हिंदू संस्कृतीचा एक अद्वितीय गुण आहे.

याठिकाणी रवींद्रनाथांच्या *'The Emigrant'*या कवितेची आठवण होणे स्वाभाविक आहे. या कवितेत ते म्हणतात -

'माझे घर सर्वत्र आहे, मी त्याच्या शोधात आहे.

माझा देश सर्व देशांमध्ये आहे, तो मिळविण्यासाठी मी झगडेन.'

(My home is everywhere, I am in search of it.

My country is in all countries, I will struggle to attain it.)

या उलट आधुनिक जगात प्रचलित आंतरराष्ट्रवादाचे नेमके स्वरूप लक्षात येणे उत्तरोत्तर कठीण जाऊ लागले आहे. कारण राष्ट्रीय सीमांच्या पलीकडे जाणारे सांप्रदायिक व जातीय असे विविध प्रकार आज आंतरराष्ट्रवादाच्या मुखवट्याखाली जगाच्या व्यासपीठावर येऊ लागले आहेत.

वर्तमान वैश्विकतेचे मिथ्य

वस्तुत: सध्याचा वैश्विकतेच्या मिथ्याचा प्रसार म्हणजे राजकीय साम्राज्याच्या लयानंतरही आर्थिक व तत्त्वप्रणालींचा साम्राज्यवाद टिकवून ठेवण्याची, विकसित देशांची एक अतिशय सूक्ष्म, कावेबाज अशी खेळी आहे अशी शंका येण्यास भरपूर जागा आहे हे आतापर्यंतच्या विवेचनावरून स्पष्ट व्हावे. दुर्दैवाने तिसऱ्या जगातील देशांमध्ये युरोपीय देशांच्या इतिहासाची जशीच्या तशी पुनरावृत्ती होणार नाही. औद्योगिक क्रांतीच्या प्रारंभी पर्यवसित झालेले काही प्रशंसनीय योगायोग, विमानयुगाच्या पूर्वीच्या समुद्रमार्गांचे नव्याने वाढलेले भू-राजकीय महत्त्व, विपुल कच्चा माल आणि बाजारीकरणाची क्षमता असलेल्या सत्तांची देशांतर्गत व्यस्तता, नाविकशक्तीच्या आधारावर साम्राज्ये प्रस्थापित करण्याला अनुकूल परिस्थिती, वसाहतींच्या शोषणाच्या जोरावर अंतर्गत अर्थव्यवस्था टिकवून धरण्यातील व्यवहार्यता या सर्व घडामोडींची तिसऱ्या जगातील राष्ट्रांमध्ये लाभदायक पुनरावृत्ती होणार नाही. गोऱ्या राष्ट्रांची समृद्धी ज्या पायावर उभी राहिली तो पाया गौरेतर देशांना उपलब्ध नाही. म्हणून पश्चिमेच्या उदाहरणाचे अनुकरण करणे आणि पश्चिमी नमुना हा आदर्श मानणे हे निरर्थक आहे.

पश्चिमी आर्थिक साम्राज्यवादाची माध्यमे

आणि म्हणूनच प्रारंभी उल्लेखिलेल्या पश्चिमी-विशेषत: अमेरिकी-आर्थिक साम्राज्यवाद्यांच्या कूटनीतीबद्दल कोणाही राष्ट्रभक्ताने सतर्क राहिले पाहिजे. आधुनिक पश्चिमी विकाससंकल्पना व तिच्या अनुषंगाने प्रस्थापित झालेल्या अर्थनीतीमुळे पश्चिमी आर्थिक साम्राज्यवाद हा पूर्वोल्लेखित गॅट करार आणि जागतिक व्यापारी संघटना या भाडोत्री लढवय्यांच्या द्वारा विकसनशील देशांच्या सार्वभौमत्वाचा बळी घ्यावयाला निघाला आहे.

आणि असे असल्यामुळेच मुक्त व्यापार आणि तथाकथित उदारीकरण याबाबत अमेरिकेचा आग्रह आहे.

आणि प्रचारतंत्रामध्ये अमेरिकी तज्ञ डॉ. गोबेल्सच्याही पुढे गेले आहेत. 'असत्य शंभरवेळा सांगा ते सत्यच बनते' असे गोबेल्स म्हणत असे. हिटलर त्याच्याही पुढे एक पाऊल गेला. 'जर असत्य पसरवायचे असेल तर साधे असत्य विधान पुरेसे नाही. भली मोठी थाप मारा, इतकी मोठी की तिच्या प्रचंडपणामुळेच, ही बातमी खोटी असेल अशी शंकाही लोकांच्या मनात येणार नाही.'

अमेरिकी प्रचारतंत्रामुळे गेल्या दोन दशकांत आर्थिक उदारीकरणाचे तत्त्व हे फारच लोकप्रिय झाले. निर्नियंत्रण आणि खाजगीकरण यांना प्रतिष्ठा आणि सार्थता प्राप्त झाली.

या माध्यमांची पार्श्वभूमी व चिकित्सा

त्यामुळेच अमेरिकी संस्कृतीच्या आहारी गेलेल्या भारतीयांच्या मते सर्व देशांकडून मान्यता मिळालेले व अवलंबिले जाणारे अतिशय पवित्र व विश्वसंमत असे हे मुक्त व्यापाराचे तत्त्व आहे.

आणि म्हणूनच आपल्या प्रस्तुत विचाराच्या स्पष्टतेसाठी, हे मुक्त व्यापाराचे तत्त्व व आंतरराष्ट्रीय व्यापारक्षेत्रातील त्याचे स्थान आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी बारकाईने तपासून पाहिली पाहिजे.

मुक्त व्यापाराच्या तत्त्वाचा जरी ॲडॅम स्मिथने पूर्वी पुरस्कार केला होता, तरी मुक्त व्यापाराच्या तत्त्वाला निरपवाद समर्थनीयता ही रिकार्डोच्या *Principles of Political Economy* या १८१७ साली प्रसिद्ध झालेल्या ग्रंथानंतरच मिळाली व 'तुलनात्मक लाभा'च्या प्रणालीच्या बौद्धिक पायाला भक्कमपणा प्राप्त झाला. व्यापारी व्यूहाचा जास्तीत जास्त लाभ मिळविण्यासाठी अशा बाजारी प्रेरणांचा अप्रतिहत प्रयोग हाच सर्वोत्तम उपाय आहे, असेच मूलतः या प्रणालीने घोषित केले. रिकार्डोच्या 'तुलनात्मक फायद्या'च्या नमुन्याच्या व हेक्शर-ओलिन (Hecksher-Ohlin) यांच्या प्रणालीच्या आधारावर उभ्या असलेल्या या प्रणालीचा दावा आहे की मुक्त व्यापारामुळे प्रत्येक देशाला आपल्या उत्पादनात विशेषता प्राप्त होते आणि उपलब्ध अशा तुटपुंज्या सामग्रीचा अधिकाधिक उपयोग करता येतो. देशादेशातील विभिन्नतेचा फायदा घेऊन प्रत्येक देश फायदेशीरपणे व्यापार करतो या तत्त्वावर आधारलेल्या 'तुलनात्मक फायदेशीरपणा'च्या संकल्पनेचा प्रभाव १९ व्या शतकाच्या सुरुवातीपासून ते २० व्या शतकाच्या सातव्या दशकापर्यंत आंतरराष्ट्रीय व्यापारप्रणालीवर होता. परिपूर्ण स्पर्धा व प्रमाणित फायदा यामुळेच साऱ्या अर्थव्यवस्थांची वैशिष्ट्ये लक्षात घेतली जात होती. फरक केवळ अभिरुची, तंत्रविज्ञान वा विशिष्ट घटकाची उपलब्धी यामुळे पडत होता. उदा. रिकार्डोच्या नमुन्याचा भर तंत्रवैज्ञानिक फरकावर होता तर हेक्शर-ओलिन-सॅम्युअलसन (Hecksher- Ohlien- Samuelson) नमुन्याचा भर विशिष्ट घटकाच्या उपलब्धतेवर होता. तरीही २० व्या शतकाच्या ७ व्या दशकापर्यंत 'तुलनात्मक फायद्या'च्या प्रणालीला प्रामाण्य होते. अमेरिका, ब्रिटन व नेदरलँडस् या देशांनी शासकीय व्यापारनीतीचे तत्त्व म्हणून ही प्रणाली स्वीकारली होती. (फ्रांस, इटली व फेडरल रिपब्लिक ऑफ जर्मनी या देशांनी मात्र ही मुक्त व्यापाराची प्रणाली अधिकृती व्यापारनीतीचे तत्त्व म्हणून मान्य केली नाही.)

या साऱ्या घडामोडींची परिणती म्हणून गॅट करार ही मुक्त प्रणालीची मूर्तीच बनली. साहजिकच हे म्हणणे बरोबरच आहे की मुक्त व्यापाराचे तत्त्वज्ञान हे गॅट कराराच्या बांधणीचे चिरे आहेत.

तरीही, या शतकाच्या ६ व्या दशकापासूनच या मुक्त व्यापाराच्या प्रणालीच्या सर्वंकष सार्थतेबद्दल शंका व्यक्त होऊ लागल्या. 'तौलनिक फायद्या'ची प्रणाली

ही आंतरराष्ट्रीय व्यापारातील आधुनिक घडामोडींचे पूर्ण स्पष्टीकरण देऊ शकते का या प्रश्नाने १९७० पासूनच मुक्त व्यापार प्रणालीबद्दलची साशंकता वाढत्या प्रमाणात गडद होत गेली. 'तुलनात्मक फायद्या'ची प्रणाली ही परिपूर्ण स्पर्धात्मक बाजार आणि मोबदल्याचे सातत्य यांच्या गृहीतकांवर आधारलेली होती. पण क्रुगमनने (Crugman) म्हटल्याप्रमाणे आंतरराष्ट्रीय बाजार हे पूर्णत: स्पर्धात्मक नसतात तर विषमतेने स्पर्धात्मक असतात हे लक्षात आले. वाढती आवक हीच बाजाराच्या व्यवहाराची गुरुकिल्ली राहिली आणि तिचा फायदा केवळ प्रभावी व्यापारी संस्थाच उठवू शकल्या. अशाप्रकारचे एकदा प्राप्त झालेले फायदे हे बाजारातील पुढील फायद्याचे आधार बनले. विन्फ्रेड रिग्रोकसारख्या (Winfried Ruigrok) तज्ञांच्या मते मुक्त व्यापाराच्या प्रणालीद्वारा 'परकीय थेट गुंतवणुकी'च्या मार्गे येणाऱ्या आंतरराष्ट्रीय भांडवली पुरवठ्याचा निश्चित हिशेब लागू शकत नव्हता. उत्पादनप्रक्रियेचेही योग्य पृथक्करण केले गेले नाही. तंत्रवैज्ञानिक विकास हा पारदर्शक व सर्वांना उपलब्ध असेल असे गृहीत धरले गेले. पण प्रमाणित अर्थव्यवस्था वा थेट परकीय गुंतवणुकीतील जलद वाढ यांचा या मुक्त व्यापार प्रणालीने अन्वय लावता येत नव्हता. उपलब्ध सामग्रीचे कार्यक्षम नियोजन हा याबाबत कधीच विचारार्ह मुद्दा नव्हता. रिग्रोक एक प्रश्न पुढे ठेवतो - विविध शासने मुक्त व्यापाराच्या प्रणालीच्या निकषांना बांधून घेण्याला कधीकधी नकार का देतात? या प्रश्नाच्या उत्तरातच मुक्त व्यापार प्रणालीतील गृहीतकांमधील मूलभूत त्रुटी स्पष्ट होते. मुक्त व्यापार प्रणालीमध्ये तुटपुंज्या सामग्रीचे कार्यक्षम, तत्पर असे नियोजन हा मुद्दा शासकीय नीतीचा एकमेव विचाराचा मुद्दा म्हणून कधीही अपेक्षित नव्हता आणि तो तसा असणारही नाही.

शासकीय नीती ही राजकीय, सामाजिक, आर्थिक व लष्करी (संरक्षणविषयक) धारणांच्या तारतम्यावर आधारलेली असते. कार्यक्षमता पराकोटीला नेण्यापेक्षा राष्ट्रीय सुरक्षा व अंतर्गत सुव्यवस्था हाच कोणत्याही शासनाचा महत्त्वाचा, जिव्हाळ्याचा विषय रहात आला आहे आणि तो तसाच राहील.

शिवाय अंतर्गत व्यापारी संस्थांच्या फायद्यासाठी परकीय उद्योगांविरुद्ध धोरण लागू करणाऱ्या योजनाबद्ध शासकीय हस्तक्षेपालाही उत्तरोत्तर वाढता पाठिंबा मिळू लागला आहे. परकीय प्रतिस्पर्ध्यांशी जागतिक बाजारपेठेत स्पर्धा करणाऱ्या अंतर्गत उद्योगांची स्थिती भक्कम करण्यासाठी अनुदान देण्याची कल्पना ब्रँडरने सुचविली आह. स्पेन्सरनेही अशीच अनुदानाची कल्पना सुचविली आहे. काही विशिष्ट परिस्थितीत आयातीवरील बंधने व निर्यातीला प्रोत्साहक अनुदाने ही राष्ट्रीय हितासाठी आवश्यक आहते अशी वाढती जाणीव होऊ लागली आहे.जपानने तांदूळ पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना ७०० टक्के अनुदान आणि परकीय तांदुळावर बसविलेला ७०० टक्के आयात कर, हे उदाहरण हा मुद्दा स्पष्ट करणारे आहे. अर्थातच शासने नेहेमीच राष्ट्रीय हितसंबंधाच्या अनुषंगाने वागतात असेही नाही, तर कधीकधी ती अंतर्गत दबाव गटाच्या प्रभावाखालीही

कृती करतात.

२० व्या शतकाच्या ९ व्या दशकाच्या उत्तरार्धात मुक्त व्यापाराच्या प्रणालीच्या पुरस्कर्त्यांना त्यांच्या मूलभूत युक्तिवादाला गंभीर शह बसत असल्याचे ध्यानात आले. शासकीय हस्तक्षेपामुळे एका देशाकडून दुसऱ्या देशाकडे फायद्याचा भर जाऊ शकतो, अशा परिस्थितीत पारंपरिकरीतीने मुक्त व्यापाराचे नियम पाळणाऱ्या देशांची संपत्ती त्यांच्या व्यापारातील भागीदार देशांकडे अटळपणे जाऊ लागली आणि 'स्पर्धात्मक फायदा' हे तत्त्व 'तौलनिक फायदा' या तत्त्वापेक्षा अधिक स्वीकारणीय ठरू लागले. ९व्या दशकात जपानने युरोपीय संघ व अमेरिका यांच्याकडे केलेल्या निर्यातीच्या यशस्वी मोहिमेमुळे स्पर्धात्मक फायद्याचे तत्त्व कसे साकार होते ते दाखवून दिले.

२० व्या शतकाच्या ८ व्या व ९व्या दशकात मुक्त व्यापाराचा नमुना पवित्र मानणाऱ्यांची संख्या वाढत होती, पण पॉल क्रुगमन म्हणतो की 'मुक्त व्यापार या संकल्पनेने आपली निरागसता मात्र कायमची गमावली आहे.' या काळात पारंपरिक अशा आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या नमुन्यांना पूरक, कधीकधी पर्यायीही अशा नमुन्यांची वीण निर्माण झाली. हे नवे नमुने प्रमाणित अर्थव्यवस्था, वाढती आवक व अपूर्ण, विषम स्पर्धा यांच्यावर भर देणारे होते. (प्रगमनशील प्रमाणित अर्थव्यवस्था या नेहेमीच गुंतवणुकीचे ज्ञान आणि संशोधन व विकास यांच्याशी संलग्न असतात.)

सध्या, 'तौलनिक फायद्या'चे तत्त्व हे व्यापारातील अपूर्ण तत्त्व आहे असे मानण्याकडे कल आहे आणि तरीही त्याचबरोबर मुक्त व्यापार हेच आदर्श धोरण मानण्याचीही प्रवृत्ती आहे. क्रुगमनच्या म्हणण्याप्रमाणे आज बहुतेक व्यापारविषयक तज्ञांनी ही भूमिका घेतली आहे. म्हणून मुक्त व्यापार आज कालबाह्य नाही. पण एके काळी ज्या स्वरूपात तो होता त्या स्वरूपात मात्र तो आज नाही. मुक्त व्यापाराची बाजू, १८१७ मध्ये रिकार्डोचा *Principles of Political Economy* हा ग्रंथ प्रसिद्ध झाल्यापासूनच्या कोणत्याही कालखंडात नव्हती इतकी संशयास्पद झाली आहे.

त्यामुळेच मुक्त व्यापाराच्या बाजूने भरपूर बोलबाला असूनही रिग्रोकच्या मते जागतिक व्यापाराचा आकृतिबंध खालीलप्रमाणे दिसतो –

--साधारणत: २५% - जागतिक उद्योगसमूहांच्या अंतर्गत.

--साधारणत: २५% - द्विपक्षीय पातळीवरील व्यापारांतर्गत (प्राधान्य कराराप्रमाणे)

--साधारणत: २५% - देवाणघेवाणीच्या तत्त्वावर

--साधारणत: २५% केवळ - गॅट कराराच्या नियमांनुसार मुक्त व्यापाराच्या तत्त्वाप्रमाणे.

(हा तपशील त्याने विज्ञान आणि तंत्रविज्ञान यांसंबंधी अंदाज बांधणाऱ्या व मूल्यमापन करणाऱ्या 'फास्ट' *[Forecasting and Assessment in Science and Technology]*मधून उद्धृत केला आहे.)

(तरीही युरुग्वे वाटाघाटीच्या फेरीत मुक्त व्यापाराच्या चौकटीला निरपवाद पाठिंबा

मिळविण्याचा प्रयत्न झाला आणि त्याचबरोबर अमेरिकेने मात्र आपली व्यापारी नीती ठरविताना, संरक्षक तत्त्वांत वाढ व भागीदार देशांच्या बाजारपेठांत आपल्या निर्यातीला अधिक शिरकाव मिळावा म्हणून हस्तक्षेपाचा धाक दाखविणे अशा काही बाबी अवलंबिल्या आहेत.)

अमेरिकेचा दुटप्पीपणा

१९५६ साली अमेरिकी राष्ट्राध्यक्षांना शेतकीविषयक कायद्याच्या अंतर्गत कापड व तज्जन्य कपडे यांच्या आयातीवर मर्यादा घालण्यासाठी वाटाघाटी करण्याचे अधिकार दिले गेले तेव्हापासूनच अमेरिका वस्त्रोद्योगांच्या संदर्भात संरक्षक तत्त्वाचे धोरण अवलंबित आहे. वस्त्रोद्योगाप्रमाणेच, जपानकडून होत असलेल्या स्पर्धेच्या धोक्यापासून आपला स्वयंचलित वाहनांचा उद्योग बचावण्यासाठी ९व्या दशकात अमेरिकी शासनाने आयातीच्या संदर्भात आयातदरपत्रकाबाहेरील बंधने घातली. दुसरीकडे मात्र अमेरिका मुक्त व्यापाराच्या तत्त्वाचा पुरस्कार करते.

(जेम्स डनने स्पष्ट केल्याप्रमाणे मोटारीच्या क्षेत्रातील युद्धोत्तर आंतरराष्ट्रीय व्यापारात उदारीकरण व संरक्षक तत्त्व यांचे सदैव मिश्रण रहात आले आहे.)

जपानी व्यापारी नीती

बऱ्याच बाबतीत, स्वतः निर्यात करीत असलेल्या कोणत्याही उत्पादनाची आयात न करणारा, एकतर्फी व्यापार करणारा असा जपान हा देश आहे. जपानी परकीय गुंतवणुकीतील असंतुलनाबाबतही हेच खरे आहे. ३१ मार्च १९९० ची स्थिती पहाता जपानमध्ये झालेल्या परकीय भांडवली गुंतवणुकीच्या १७ पट गुंतवणूक जपानने बाहेरील देशांमध्ये केलेली होती. औद्योगिक उत्पादनांबाबत युरोपीय संघ व अमेरिका यांचा जपानशी संघर्ष असण्याचे कारण म्हणजे जपानची स्पर्धात्मकता आणि व्यापार व गुंतवणूक यांमधील त्याचे प्रचंड असंतुलन हेच आहे असे तज्ञांचे मत आहे. जपानच्या 'टोयोटावादा'मुळे अमेरिकेच्या 'फोर्डवादा' वर आणि युरोपीय संघाच्या उद्योगांवर जपानला फार मोठा फायदा मिळाला आहे. एकच उदाहरण द्यावयाचे झाले तर, ७ व्या व ८ व्या दशकांत युरोपीय संघाचा जहाजबांधणी उद्योग हा जपानी जहाजबांधणी उद्योगाच्या आक्रमक बाजारनीतीपुढे टिकाव धरू शकला नाही.

युरोपीय संघातील व अमेरिकेतील, जपानच्या सध्याच्या वाढत्या 'परकीय थेट गुंतवणुकी' मुळे या देशांतील उद्योग हे अधिक व्यापारी बंधने व वाढते संरक्षण यांची मागणी करीत आहेत. हा मोठा कुतूहलाचा विषय आहे की जसजसे युरोपीय संघातील देश व अमेरिका यांना अनेक उद्योगांमध्ये अतिशय तीव्र अशा वाढत्या स्पर्धेला तोंड द्यावे लागत आहे तसतशी मुक्त व्यापाराच्या तत्त्वावर होणाऱ्या टीकेलाही अधिकाधिक जागा मिळू लागली आहे. मुक्त व्यापाराचे पूर्वाश्रमीचे अनेक पुरस्कर्ते

आता त्याचे टीकाकार बनले आहेत.

याबाबतीतील मतलबी संधीसाधूपणा हा काही नवीन प्रकार नाही. जेव्हा ब्रिटिश बाजारात जर्मनीच्या उत्पादनांचा प्रभाव होता तेव्हा ब्रिटन हे मुक्त व्यापारातत्त्वाचे कठोर टिकाकार होते. औद्योगिक क्रांतीनंतर समीकरण बदलले आणि ब्रिटन हे मुक्त व्यापार तत्त्वाचे कट्टर पुरस्कर्ते बनले.

'व्यापारातील शुचिता' या सध्याच्या अमेरिकी संकल्पनेमुळे श्री. विश्वजित धार यांना, १०० वर्षापूर्वी समान परिस्थितीत ग्लॅडस्टनने काढलेले उद्‌गार आठवतात.

'व्यापारातील शुचिता' या कल्पनेचे आमच्या 'संरक्षण' या जुन्या मित्राशी संशयास्पद साम्य जाणवते.'

(It [fairness in trade] bears suspicious likeness to our old friend 'protection')

अमेरिकी नीतीतील मतलबीपणा

अमेरिकेच्या आर्थिक सामर्थ्याचा ऱ्हास १९६० पासूनच सुरू झाला. तिच्या वर्चस्वाच्या स्थानाचा लय होण्याची प्रक्रिया १९७३ मध्ये सुरू झाली. १९८० च्या सुमारास 'वाढत्या गतीने अधोगामी होणारी आर्थिक सत्ता' ही तिच्याविषयीची प्रतिमा प्रस्थापित होऊ लागली. आंतरराष्ट्रीय आर्थिक रचनेतील अमेरिकेचे वर्चस्वाचे स्थान हे पुढील शतकाच्या आरंभीच संपेल असे अनुमान लिंडर आणि इतर काहींनी वर्तविले आहे. माग़े पडणाऱ्या प्रत्येक पावलाबरोबर अमेरिका ही मुक्त व्यापाराच्या तत्त्वांपासून वाढत्या प्रमाणात दूर जात आहे आणि आतापर्यंत, एकाकाळी पवित्र गणल्या गेलेल्या तत्त्वाचा तिने पूर्ण त्याग केलेला आहे. श्री. विश्वजित धार यांनी आपल्या, *The Decline of Free Trade and U.S. Trade Policy Today* या ग्रंथात अमेरिकेच्या व्यापारव्यूहातील अलिकडच्या काळातील घडामोडी व मार्गच्युती यांचे मार्मिक विवरण केले आहे.

विशेषत: गेल्या दोन दशकांतील अमेरिकी व्यापार - प्रशासनाने अवलंबिलेल्या सक्रियतेच्या व्यापारी धोरणामुळे, धोरणात्मक पातळीवर हस्तक्षेप न करण्याच्या शासकीय नीतीचा लयच झाल्याचे स्पष्टपणे जाणवते. प्रारंभीच्या काळता जर 'संरक्षक तत्त्वा'चा वाढता घुटका हा शासकीय हस्तक्षेपाचा गाभा ठरला असेल तर भागीदार देशांना सक्तीने धोरणात्मक बदल करायला लावून व अधिक खुलेपणा अवलंबायला लावून आपल्या उत्पादनांना त्यांच्या बाजारपेठांत अधिकाधिक वाव मिळवून देणे हे आताचे शासकीय सूत्र बनले आहे. अलिकडच्या काळात 'संरक्षक तत्त्व' हा आता धोरणात्मक पुढाकाराचा एकमेव रोख राहिला आहे.

१९७४ पासूनचा अमेरिकेचा व्यापारी कायदा हाच कल दाखवितो. सर्वसंग्राहक असा १९८८ चा, व्यापार आणि स्पर्धात्मकतेचा कायदा - विशेषत: त्यातील सुपर

३०१ व स्पेशल ३०१ या दोन नव्या तरतुदी नीतिनिर्धारण करणाऱ्यांचे हेतू पूर्णतः स्पष्ट करतात.

गॅट करारावर आधारित युद्धोत्तर व्यापारव्यवस्थेतील हस्तक्षेप - नकाराचे तत्त्व हे अमेरिकेच्या संरक्षक उपायांमुळे रद्दच होते. गॅटचे नियम धाब्यावर बसवून पद्धतशीरपणे विशिष्ट व्यापारी बंधने उभी केली आहेत. यामुळे बहुपदरी व्यापारपद्धतीचे मोठ्या प्रमाणात अवमूल्यन झाले आहे. निर्यात करणाऱ्या जपान व इतर काही नव्या देशांकडून निर्माण झालेल्या स्पर्धात्मक धोक्याला उत्तर म्हणून आयातदरपत्रकाबाहेरील बंधने उभी करून व वाढत्या प्रमाणात संरक्षक तत्त्वाचा अवलंब करून अमेरिकेने आयातीत कपात केली आहे आणि अमेरिकी राष्ट्राध्यक्षांनी १९७४ व १९८८ च्या व्यापारी कायद्यांमुळे मिळालेल्या व्यापारविषयक प्रत्याघाताच्या अधिकाराच्या साहाय्याने परकीय बाराजपेठा मोकळ्या करून निर्यात वाढविली. पहिल्या टप्प्यात परकीय आयातीपासून अंतर्गत उत्पादकांना संरक्षण मिळाले. अमेरिकेकडे निर्यात करण्याच्या वाट्याचे प्रमाण लादले गेले. अनेक देशांवर अमेरिकी व्यापारी - प्रशासनाने 'ऐच्छिक निर्यात बंधने' आणि 'बाजार पेठांची सुविहित व्यवस्था' या दोन गोष्टी लादल्या. पोलास, मोटारउद्योग, वस्त्रोद्योग, यंत्रे व अवजारे आणि अर्धप्रवाहके अशा अधिक महत्त्वाच्या उद्योगांसाठी आयातीच्या संरक्षक तत्त्वाची तरतूद करण्यात आली. अमेरिकी उत्पादनांना स्वतःच्या बाजारपेठेत मुक्त वाव न देणाऱ्या परकीय शासनांसाठी १९७४ च्या कायद्याचे कलम ३०१ लागू करण्यात आले. १९८५ मध्ये कोरियातील विमा उद्योग हे अशा हेतूने लक्ष्य बनविण्यात आले. ३०१ कलमाखाली कारवाई करण्यात आली. १९८५ व १९८८ च्या दरम्यान जेव्हा 'सर्वसंग्राहक व्यापार व स्पर्धात्मकता'यांचा कायदा पारित झाला, तेव्हा अमेरिकेत निर्माण झालेल्या बौद्धिक मालमत्तेसाठी असलेल्या अपुऱ्या संरक्षणाशी निगडित अशा प्रकरणांबाबत कारवाई करण्यासाठी ३०१ कलम निर्माण केले गेले.

विशिष्ट उद्योगांच्या संदर्भात उल्लंघन करणाऱ्या अथवा एखाद्या संपूर्ण विभागाविरुद्ध प्रत्याघात करण्याची धोरणे अवलंबिणाऱ्या भागीदारांच्या संपूर्ण व्यापाराच्या व्याप्तीविरुद्ध आणि व्यापारनीतीविरुद्ध कारवाई ही कलम सुपर ३०१ च्या द्वारा करता येत होती. दुसऱ्या शब्दांत, व्यापारी विभागांमध्ये थेट परस्परच प्रत्याघाताची तरतूद करणारे हे सुपर ३०१ कलम होते.

अमेरिकी निर्यातीला प्रतिबंध करणारे देश निश्चित करणे व व्यापारक्षेत्रात विपर्यस्त वर्तन करणारे देश म्हणून निश्चिती करणे या संबंधी निर्णय करण्याचे अधिकार अमेरिकेने स्वतःकडेच ठेवले आहेत व यासंबंधीच्या कालावधीची व कारवाईची निश्चितीही अमेरिकेच्याच मताप्रमाणे व्हावी यासाठी सुपर ३०१ चा अवलंब सुरू झाला. सुपर ३०१ खालील प्रकरणांबाबत १९८९-९० मध्ये कारवाई सुरू होणार होती आणि एखाद्या देशाचे विपर्यस्त वर्तन प्रत्याघाताला योग्य आहे असे प्रस्थापित

केल्यापासून १८० दिवसांत, उल्लंघन करणाऱ्या नेमक्या देशांविरुद्ध प्रत्याघाताची कारवाई करण्यात येणार होती. मूळ अमेरिकी स्वरूपाच्या बौध्दिक मालमत्तेच्या हक्कांबाबत उल्लंघन करून अमेरिकी निर्यातीत विपर्यस्तता निर्माण करणारी प्रकरणे स्पेशल ३०१ खाली येतात. अमेरिकी प्रशासनाला योग्य वाटेल अशा बौद्धिक मालमत्तेच्या रक्षणाच्या समुचित पद्धतीद्वारा अमेरिकी हितसंबंधांना अन्य देशांनी त्यांच्या त्यांच्या देशात भक्कम मक्तेदारी बहाल करावी अशी सक्ती करून अमेरिकी निर्यात वाढविण्याची खात्रीपूर्वक तरतूद करून घेणे हा स्पेशल ३०१ चा हेतू होता.

स्पेशल ३०१ कलमाच्या तरतुदीत नुकसान सिद्ध करण्याची जबाबदारी नुकसानीबद्दल तक्रार करणाऱ्यावर ठेवलेली नाही. ३३७ व्या कलमात आहे त्याप्रमाणे अमेरिकी आंतरराष्ट्रीय व्यापार मंडळाने केवळ तक्रारीची चौकशी करून तक्रार नोंदविल्यापासून २० दिवसांच्या आत संरक्षण देण्याची तरतूद होती. मे १९८९ मध्ये अमेरिकी व्यापार मंडळाने भारत, जपान व ब्राझील या तीन देशांची दखल घेऊन त्यांच्यावर सुपर ३०१ खाली कारवाई करण्यासाठी त्यांची नोंद अग्रक्रमाच्या सूचीवर घेतली. या देशांच्या, व्यापार विपर्यस्त करणाऱ्या सहा अग्रक्रमाच्या पद्धती निश्चित केल्या गेल्या. भारताने अमेरिकी निर्यातीला खालील दोन अग्रक्रमाच्या पद्धतींनी स्वत:च्या बाजारपेठांमध्ये प्रवेश करण्यास काही बंधने घातल्याचे आढळून आले.

१) परकीय गुंतवणूक करणाऱ्यांनी स्वत:च्या उत्पादनांपैकी काही हिस्सा निर्यात करणे बाध्य करण्यात आले आणि उत्पादनांत देशांतर्गत तयार झालेले उत्पादित साहित्य वापरण्याची सक्ती करण्यात आली. त्यामुळे (अमेरिकेच्यादृष्टीने) व्यापारात विपर्यस्तता आली.

२) अमेरिकी सेवा उद्योगांना भारतीय बाजारपेठांत स्पर्धा करण्याला प्रतिबंध करण्यात आला. भारताची बाजारपेठ परकीय विमा उद्योगांना पूर्ण बंद ठेवण्यात आली.

एप्रिल १९९० मध्ये सुपर ३०१ खाली अग्रक्रमाच्या पद्धतींची नवी सूची प्रसारित करण्यात आली तीमध्ये दोन प्रकारांचा समावेश होता व दोन्हीही भारताला लागू होणारे होते. १९८९ मधील भारताच्या अग्रक्रमांच्या पद्धतींचा समावेशही पुन्हा १९९० मधील सूचीमध्ये करण्यात आला होता. जपान व ब्राझील यांना मात्र बाळगण्यात आले होते. विमा व गुंतवणूक यांच्यावरील भारतातील बंधने (अमेरिकेला) विशेष जाचक ठरत होती.

१९८९ - ९० मध्ये भारत, चीन, थायलंड व ब्राझील हे चार देश हे निरीक्षणाच्या अग्रक्रम सूचीवर ठेवण्यात आले. एप्रिल १९९१ मध्ये अमेरिकी व्यापार मंडळाने स्पेशल ३०१ कलमाखाली कारवाई सुरू करण्याचे ठरविले. भारत, चीन व थायलंड हे स्पेशल ३०१ खालील कारवाईसाठी अग्रक्रमाचे देश म्हणून ठरविण्यात आले.

या साऱ्या कारवायांमधून अमेरिकेचा दुटप्पीपणा व्यक्त होतो. एकतर तिसऱ्या

जगातील कर्जबाजारी देशांवर पुढील कर्जासाठी अट म्हणून आर्थिक उदारीकरणाचे धोरण लादण्याचा प्रयत्न आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँक या संस्था करीत आहेत आणि त्याद्वारा उदारीकरणाचे धोरण खपविण्याची पराकाष्ठा करीत आहेत. त्यातच गॅट करार व अमेरिका यांच्याद्वारा 'मुक्त व्यापाराचे तत्व म्हणजे पवित्र प्रमाणग्रंथातील निरपवाद सत्य' अशा तऱ्हेचा पुरस्कार होत आहे. दुसरीकडे मात्र अमेरिका स्वत:च या पवित्र तत्त्वाचे उल्लंघन करीत आहे. आंतरराष्ट्रीय प्रमाणीकरण संस्थेने निर्धारित केलेली प्रमाणेही अमेरिका धाब्यावर बसवित आहे. अमेरिकेचे सार्वजनिक खरेदीचे धोरणही गॅटच्या शासकीय खरेदीच्या नियमात बसणारे नाही. 'अमेरिकी बना, अमेरिकी माल खरेदी करा' या घोषणेची व्याप्ती मोठ्या क्षेत्राची आहे. उत्पादन, खाणकाम, शेतकी आणि मत्स्योद्योग या चार मोठ्या क्षेत्रांना धरून असलेल्या विशेष प्रकारणांची संख्या ३१ च्यावर आहे. इतरही काही सेवांना संरक्षण दिले जात आहे. इतर देशांनी शेतीविषयक अनुदाने बंद करावीत असे म्हणत असतानाच अमेरिका मात्र शेतकी व्यवसायाला भरघोस अनुदान देत आहे. औषधोत्पादन क्षेत्रातही अशाच प्रकारंचे दुटप्पी धोरण अवलंबिण्यात येत आहे.

या सरळ सरळ तत्त्वशून्य अशा धाकदपटशाच्या कारवाया आहेत. या गुन्ह्यामागील खरे गुन्हेगार हे अमेरिकी राज्यकर्ते आणि बडे भांडवलदार आहेत. सामान्य समाज नव्हे ! त्याला तर आर्थिक आघाडीवरील घडामोडींबद्दल पूर्ण अंधारात ठेवले जाते.

विकसित राष्ट्रांनाही अमेरिकेचा जाच

या धाकदपटशाच्या कारवाया केवळ विकसनशील देशांच्या संदर्भातच केल्या जात आहेत असे नाही तर युरोपीय समाजाविरुद्ध आणि उत्तर अमेरिकी समाजांविरुद्धही केल्या जात आहेत. अलिकडेच झालेली फ्रेंच शेतकऱ्यांची लढावू प्रतिक्रिया आणि इतर युरोपीय देशांतील शेतकऱ्यांनी त्यांच्या या आविर्भावाला दिलेला भक्कम पाठिंबा, 'उत्तर अमेरिकी मुक्त व्यापारी करारा' विरुद्ध (NAFTA*) कष्टकरी जनतेने चालविलेले आंदोलन, याच कुप्रसिद्ध करारावर सही करणाऱ्या राज्यकर्त्या पक्षाविरुद्ध कॅनडातील मतदारांनी नोंदविलेला परिणामकारक निषेध, कारगीलच्या कार्यवाहीच्या पद्धतीविरुद्ध केवळ अमेरिकी अशा मानवतावादी व पर्यावरणवादी १२ संघटनांनी अलिकडेच केलेली निदर्शने - या साऱ्या घडामोंडीवरून हे स्पष्ट होते की अमेरिकी राज्यकर्ते आणि बडे भांडवलदार यांच्यातील अशुभ युती ही केवळ तिसऱ्या जगातील देशांविरुद्धच आहे असे नाही तर इतर विकसित गोऱ्या देशांविरुद्ध आणि स्वत:च्याच देशातील तुटपुंजे अधिकार असलेल्या अशा काही सर्वसाधारण समाजघटकांविरुद्धही कार्यरत आहे.

---

* परिशिष्ट १ पहा.

आणि हे गुन्हेगार मुक्त व्यापाराचे, उदारीकरणाचे आणि जागतिकीकरणाचे कैवारी आहेत. - 'भुताहाती भागवत' असण्याचेच हे उदाहरण !

जागतिकीकरणातील धक्कादायक प्रकार

परकीय हितसंबंधियांनी चालविलेल्या बेबंध प्रचाराने वहावून जाणाऱ्या आपल्या अनेक बुद्धिवाद्यांना दयाकृष्ण यांच्या *Swadeshi View of Globalisation* या पुस्तकातील यासंबंधीच्या चर्चेतील प्रमेये धक्कादायक वाटतील. अर्थात नंतर त्यांना जाणवेल की त्या प्रमेयांची सार्थता निरपवाद आहे. काही मोजक्याच प्रमेयांचा उल्लेख करावयाचा तर –

१) गॅट कराराच्या द्वारा दारिद्र्य नाहीसे होईल असे कधीच म्हटले नव्हते. गॅट कराराचे घोषित साध्य हे बहुराष्ट्रीय उद्योगसमूहांचे वर्चस्व असलेल्या व्यापाराची वृद्धी हेच आहे.

२) १९९२ पर्यंतच्या मागील ४७ वर्षांमध्ये जागतिक उत्पन्नातील, गरीब देशांचा हिस्सा १२ टक्क्यांपासून ५ टक्क्यांपर्यंत घसरला तर त्याच काळात श्रीमंत देशांचा हिस्सा ६६ टक्क्यांपासून ७९ टक्क्यांपर्यंत वाढला.

३) शोषणावर आधारलेली कोणतीही आर्थिक व्यवस्था चिरकाल टिकू शकत नाही. प्रदीर्घ काळपर्यंत चाललेल्या गरीब देशांच्या शोषणाचे परिणाम हे श्रीमंत देशांमध्येही दोन प्रकारे व्यक्त होतात.

अ) बेरोजगारीतील वाढ

ब) निर्यातवाढीच्या प्रमाणात लक्षणीय उताराने घट

४) आधुनिक तंत्रविज्ञानामुळेच केवळ निर्माण होणाऱ्या व्यापक बेरोजगारीने श्रीमंत देशांतच व्यक्त होऊ शकणारे तद्देशीय स्थानीय (endemic) स्वरूप गाठले आहे.

५) (आधुनिक पश्चिमी) तंत्रविज्ञानामुळे संपत्तीचे केन्द्रीकरण होते हे सर्वज्ञातच आहे. त्यामुळे गरीब व श्रीमंत यांच्यातील दरी रुंदावते आणि सामाजिक असंतोष, उलथापालथ आणि गुन्हेगारी यांमध्ये त्या सर्वांची परिणती होते.

गॅटसंबंधीच्या वाटाघाटीच्या युरुग्वे फेरीमध्ये विकसित राष्ट्रांनी अवलंबिलेल्या धोरणाची अचूक मीमांसा दयाकृष्णांनी केली आहे. उदा. नवी चार क्षेत्रे - शेतकी, ट्रिप्स (TRIPS)*, ट्रिप्स (Trims)* आणि सेवा गॅटच्या नियंत्रणाखाली आणण्यामागील कारणे !

दयाकृष्णांच्या मते १९८५ हे वर्ष म्हणजे गरीब राष्ट्रांसाठी एका पर्वाचा प्रारंभ ठरले. त्यांची कर्जव्यवहाराच्या सेवांची (व्याज इ.) आकारणी ही नवीन कर्जापेक्षांही अधिक होऊ लागली. त्याचबरोबर विकसित देशांसाठीही हे वर्ष म्हणजे त्यांच्या

---

* परिशिष्ट १ पहा.

निर्यातीच्या भवितव्याबद्दलच्या धूसर आणि अनिश्चित कालखंडाचा प्रारंभ ठरले. कारण गरीब देशांना दिलेले कर्ज हे कर्जव्यवहाराच्या सेवेसंबधीच्या शर्ती पूर्ण करण्यासाठीच खर्ची पडत होते. त्यामुळेच गरीब देशांकडून श्रीमंत देशांकडे उत्पन्नाचा बराचसा अतिरिक्त ओघ येत राहील याची काळजी घेण्याची निकड निर्माण झाली. यासंबंधीचे सर्व विवेचन पूर्वग्रहरहित दृष्टीने वाचल्यास ते जी - ७* देशांच्या आणि बहुराष्ट्रीय उद्योगसमूहांच्या विश्वसनीयतेबद्दल व प्रामाणिकपणाबद्दल अतीव श्रद्धा असणाऱ्या आमच्या वाट चुकलेल्या देशभक्तांच्या डोळ्यांत अंजन घालणारे ठरेल.

सारांश, त्याच्या सध्याच्या स्वरूपात –

-गॅटचे व अमेरिकेचे उदारीकरण म्हणजे सरळ सरळ फसंवणूक आहे.

-डॉ. मनमोहनसिंग यांचे उदारीकरण म्हणजे केवळ भाबडा भोळसटपणा आहे.

-आमच्या वातानुकूलित पुरोगाम्यांचे उदारीकरण म्हणजे अज्ञान तरी आहे किंवा दांभिकपणा तरी आहे.

-सर्व अमेरिकेतर देशांमधील राष्ट्रभक्तांना हे उदारीकरण म्हणजे एक गंभीर आव्हान आहे.

अर्थव्यवस्था व नीती यांची फारकत

या सर्व घडामोडींचा आलेख पाहिल्यानंतर लक्षात येते की त्यांच्या कप्प्याकप्प्याने विचार करण्याच्या पद्धतीमुळे आधुनिक पश्चिमी अर्थतज्ञ नीती आणि आर्थिक व्यवहार यांच्यातील आंतरिक नाते समजवून घेण्यात अपयशी ठरले आहेत. जीवनाची नैतिक मूल्ये शिकविणे हे अर्थशास्त्रीय प्रणालीच्या कक्षेत येत नाही असे लॉर्ड लिओनेल रॉबिन्स यांचे म्हणणे आहे, तर व्यासांच्या मते गुणवत्तेचा व प्रतिष्ठेचा निर्देशांक म्हणून भौतिक यशाला मान्यता मिळू लागणे हे कलियुगाचा प्रारंभ सूचित करते.

याचे व्यावहारिक परिणाम

अभिजात अर्थशास्त्राच्या कक्षेत नफेबाज भांडवलदार व वेतन मिळविणारे मजूर येवढ्यांचाच विचार येतो. या दोन्ही गटांना जास्त ऐहिक लाभ होणे हेच सर्व जीवन व्यवहाराचे साध्य वाटते. अभिजात अर्थशास्त्राच्या दृष्टीने समाजाचे अन्य घटक अस्तित्वातच नसतात.

याच विचारसूत्राची अटळ परिणती म्हणजे आजचे पश्चिमी चिंतन व त्यानुसार सिद्ध झालेली आर्थिक रचना होय. आणि म्हणून या विचारसूत्राच्या विकासाचा ऐतिहासिक आलेख पहाणे उद्‌बोधक ठरेल.

हे खरे आहे की गेल्या शतकातील बहुतेक सर्व युरोपीय अर्थशास्त्रज्ञांना, 'धर्महीन

---

* परिशिष्ट १ पहा.

अर्थशास्त्रामुळे समाजाचा ऱ्हास होईल' याची चाहूल लागली होती. त्यांना हे जाणवत होते की माणसाच्या आर्थिक प्रवृती आणि प्रेरणा या त्याच्या जीवनातील आर्थिक व्यवहारांच्या संदर्भातील विवेकी वर्तणुकीच्या अनुषंगानेच समजवून घेता येतील. पण धर्माची ऊब नसेल तर असा माणूस चुकीच्या मार्गानिच जाईल हे लक्षात घेतले पाहिजे. स्मिथ आणि मार्शल यांनी माणसाच्या आर्थिक जीवनाच्या संदर्भात धर्माविषयी विशेष उल्लेख केले आहेत. आणि तरीही स्मिथ आणि मार्शल यांना या शतकात मात्र आर्थिक मानवाने हुलकावणी दिली आहे.

अर्थव्यवहाराच्या क्षेत्रातून नीतीची हकालपट्टी करण्याचा प्रारंभ फार मोठ्या प्रमाणात जे. बेन्थॅमच्या उपयुक्ततावादाने केला. उपयुक्तता म्हणजे एखादी वस्तू वापरणाऱ्याला समाधान देणारा त्या वस्तूचा गुणधर्म होय. उपयुक्ततेला उपयोगमूल्य आहे तर किंमतीला विनिमयमूल्य आहे. किंमत (विनिमयमूल्य) ही उपयुक्ततेसाठी (उपयोगमूल्यासाठी) असते. परिणामतः विचाराची दिशा हलकेच विरुद्ध बाजूच्या मोजमापाच्या अंगाने बदलली. ज्याला बाजरात किंमत असते अशा कोणत्याही व्यवहाराला उपयुक्तता असते असे मानले जाऊ लागले. प्रा. डेव्हनपोर्ट यांनी हा सिद्धान्त पुरस्कारला. वेश्याव्यवसाय हा अर्थशास्त्रीय अभ्यासाचा विषय आहे कारण त्याला बाजारी किंमत आहे आणि (म्हणून) तो उपयुक्ततही आहे. अशा मूल्यरहित उपुयक्तवादी अर्थशास्त्रातील दुष्परिणाम समजणे ही गोष्ट अवघड आहे का? कर्तव्यपरायणता व नीती यांचा कोणताही अंकुश नसलेली, कर्तव्यरहित, नीतिरहित अशी उपयुक्ततेची संकल्पना समाजविघातक प्रवृत्तींना प्रोत्साहन देईल, गुन्ह्यांचे प्रमाण वाढवील, कायदा व सुव्यवस्थेची समस्या जटिल करून टाकेल आणि सर्वसाधारणपणे सामाजिक विघटनाच्या प्रक्रियेला गती देईल हे निश्चित!

कर्तव्यसंकेत ही बाब केवळ सामाजिक, नैतिक वा धार्मिक आहे का? की तिचा आर्थिक प्रश्नांवरही काही प्रभाव असतो? उदा. राष्ट्रीय उत्पन्न अजमावण्याची प्रक्रिया घ्या–

राष्ट्रीय उत्पन्नाचा अभ्यास करण्याच्या एकूण तीन पद्धती आहेत. त्यापैकी या अभ्यासासाठी सध्या खर्चाच्या मोजदादीच्या पद्धतीचा अवलंब केला जातो. कुटुंबातील एकूण वापराच्या खर्चाचा आणि बचतीचा हा अभ्यास असतो. अशा अभ्यासातून चोर, तस्कर, अथवा फसवणूक करणारे यांच्या कुटुंबांना वगळलेले नसते. चोरीच्या मार्गाने पैसा मिळवून कौटुंबिक खर्चासाठी तो वापरणाऱ्यांचाही समावेश एकूण राष्ट्रीय उत्पन्नात केलेला असतो. ते उत्पन्न कोणत्या मार्गाने मिळविले याचे कोणाला सोयरसुतक नसते. समाजातील गुन्ह्याचे प्रमाण अधिक असेल तर पोलिसखाते, न्यायखाते व तुरुंग यांच्यातील शासकीय नोकरांचे प्रमाण अधिक असेल. त्यांचे वेतनही एकूण राष्ट्रीय उत्पन्नात समाविष्ट केले जाईल. दुसऱ्या शब्दांत असे म्हणता येईल की समाजात गुन्ह्यांचे प्रमाण जास्त असेल तर राष्ट्रीय उत्पन्न अधिक असेल.

आणि दुसऱ्याही दृष्टीने ही पद्धती सदोष आहे. प्रा. पिंगू यांनी गमतीने पुढील उदाहरण दिले आहे.

मोलकरणींना वेतन दिले जाते आणि ते वेतन राष्ट्रीय उत्पन्नात धरले जाते. जर त्या मोलकरणींशी त्यांच्या मालकांनी विवाह केला तर ते वेतन लुप्त होईल आणि त्या प्रमाणात राष्ट्रीय उत्पन्नात घट येईल. आपल्या देशात माता, भगिनी आणि पत्नी स्वयंपाक करतात आणि आपण तो सेवन करतो. अन्नाला उपयुक्तता आहे व आपली भूक ते शमविते. माता, भगिनी, पत्नी यांची श्रमशक्ती ही उपयुक्तता निर्माण करते पण विनावेतन ! म्हणजे येथे उपयोगमूल्य आहे पण किंमत (विनिमयमूल्य) नाही. म्हणून ही उपयुक्तता राष्ट्रीय उत्पन्न ठरविताना लक्षात घेतली जात नाही. पण आपण उपहारगृहात जाऊन त्याच अन्नाची किंमत मोजली तर मात्र आर्थिक क्षेत्रातील एक उद्योग म्हणून उपहारगृहात निर्माण झालेली उपयुक्तता व तिची किंमत (विनिमयमूल्य) ही राष्ट्रीय उत्पन्न ठरविताना गणली जाते. अर्थशास्त्राला इतर सर्व ज्ञानशाखांपासून अलग काढून कप्प्याकप्प्यांनी विचार करण्याच्या पद्धतीचे हे एक ठळठळीत उदाहरण आहे.

स्वत:चाच घात करणारी अर्थनीती

*On Ethics and Economics*या ग्रंथात डॉ. अमर्त्य सेन यांनी या विषयातील निष्कर्ष सांगितले आहेत. उपासनापंथ हे मूल्यनिष्ठ जीवनाची व त्याच्या अर्थशास्त्राची शिकवण देतात. यालाच कर्तव्यसंकेत म्हटले जाते. कर्तव्यशास्त्राचे संज्ञासंचित हे उपासनापंथात असते. मूल्यनिष्ठ अर्थशास्त्राच्या ऐवजी मूल्यहीन अर्थशास्त्रामुळेच राष्ट्रीय उत्पन्नाच्या मोजमापात फरक पडतो. गुन्हेगार आणि समाजविघातक घटकांच्या कौटुंबिक खर्चाचा समावेश करून ठरविलेले मूल्यहीन अर्थनीतीतील राष्ट्रीय उत्पन्न हे मूल्यनिष्ठ अर्थनीतीतील राष्ट्रीय उत्पन्नाच्या कितीतरी पट अधिक असेल. एकात्म दृष्टिकोणाच्या अभावी, एका दृष्टीने गुन्हे आणि समाजविघातक प्रवृत्ती यांना प्रोत्साहन देण्याचा कार्यक्रम जारी आहे. परिणामत: समाजविघातक घटकांशी मुकाबला करणारी शासकीय व्यवस्था ठेवण्यासाठी व ती मजबूत करण्यासाठी सरकारी तिजोरीवर वाढते ओझे पडत आहे. मूल्यहीन अर्थनीती ही अशाप्रकारे स्वत:चाच घात करणारी अर्थनीती आहे.

पश्चिमी आर्थिक चिंतनाचा विकास

हे खरे आहे की पश्चिमी आर्थिक चिंतनाचा आलेख पाहिल्यावर लक्षात येते की ॲडॅम स्मिथपासून सॅम्युअलसनपर्यंत पश्चिमी आर्थिक विचारप्रक्रियेने फार मोठा पल्ला आक्रमिला आहे. पश्चिमी जगातील आर्थिक चिंतन हे प्रगमनशील, गतिमान, आणि पुढेच जाणारे आहे. पण अर्थातच विकासाच्या केवळ भौतिक संकल्पनेमुळे त्याला प्रगतीच्या दिशेची फारशी फिकिर नसते. स्वत:च्या आर्थिक विचारप्रक्रियेत

प्रगमनशीलता आणण्यासाठी वेळोवेळी अगणित संकल्पना व सिद्धान्त सिद्ध करून प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नांनी भांडवली आर्थिक चिंतनाचा इतिहास भरलेला आहे.

आधुनिक काळात लॉर्ड लिओनेल रॉबिन्सने 'गरजा अमर्याद असतात व साधने मर्यादित असतात', हे लक्षात घेऊन अर्थशास्त्राची व्याख्या करताना या दोन्हींमध्ये योग्य निवड निश्चित करण्याची कल्पना मांडली आहे. 'काय असावे' यापेक्षा 'काय आहे' यांच्याशी संबंधित अशा 'भावात्मक' अर्थशास्त्राचा* मार्ग त्याने मोकळा केला. त्याच्या मते केवळ शोध घेणे, शक्यता अजमावणे आणि अन्वय लावणे येवढे अर्थशास्त्राचे काम आहे. एखाद्या गोष्टीचा पाठपुरावा करणे वा धिक्कार करणे अथवा सल्ला देणे याच्याशी अर्थशास्त्राला काही कर्तव्य नाही. या त्याच्या आग्रही मतामुळे 'भावात्मक अर्थशास्त्र' या संकल्पनेचा उदय झाला. त्यामुळे अर्थशास्त्राचा 'आदेशात्मक' आशय हिरावून घेतला गेला आणि मागे पाहिल्याप्रमाणे अर्थशास्त्र हे नीति - अनीतीच्या पलीकडील शास्त्र ठरले. स्वत:च्या सैद्धान्तिक तत्त्वप्रणालीचा पाया भक्कम करण्यासाठी २० व्या शतकातील भांडवलवादाने लॉर्ड रॉबिन्सच्या या संकल्पनेवर अधिकाधिक भर दिला. त्याच्या 'भावात्मक अर्थशास्त्र' या संकल्पनेमुळे अनेक सिद्धांत जन्माला आले. उदाहरणार्थ– 'Indifference Curve' ही हिक्सची संकल्पना, न्यूमन - मार्गेन्स्टिन (Neuman - Morgenstein) यांचे उपभोग्यतेचे आलेख (Utility Curves), विवेकी निवड आणि उपभोक्त्याची वर्तणूक यांचे विश्लेषण करण्यासाठी व्यापक प्रमाणावर गणिती आणि विद्युत्परमाणुजन्य साधने व पद्धती यांचा उपयोग करणारी सॅम्युअलसनची पद्धती, त्याचप्रमाणे त्याचा 'Revealed Preference' हा सिद्धान्त !

या शतकाच्या ४ थ्या दशकात भांडवलवादी समाजरचनेतील निर्वाणीच्या समस्येमुळे केन्सचे अतिव्याप्त पातळीचे अर्थशास्त्र (Macro - Economics) पुढे आले आणि भांडवलशाहीचा इमला कायम राखण्यासाठी (दुसऱ्या राष्ट्रांमध्ये) ढवळाढवळ करण्याच्या धोरणाला त्याने आवश्यक ती सैद्धान्तिक चौकट प्राप्त करून दिली. केन्सच्या नंतरच्या काळातील हॅरॉड व डोमर यांच्या विकासनमुन्यांचे नियोजनाच्या आराखड्यात रूपांतर झाले व त्यांमध्ये अंगभूत असलेल्या भांडवलवादी रचनेवर भर असूनसुद्धा तिसऱ्या जगातील देशांकडून ते स्वीकारले गेले.

अशाच तऱ्हेचे आणखी काही नमुनेदार प्रयत्न म्हणजे पॅसिनेटी, जोन रॉबिन्सन, फाय रॅनिस, स्वान, सॉलो, आर्थर ल्युईस, फिल्डमन, यांनी मांडलेले वर्धिष्णुतेचे नमुने (Growth Models) आणि हर्शमन, रोझेन्स्टिन रोडन, नर्कसी, गुन्नर मिर्डाल, ल्युईस, लिबेन्स्टिन अशांसारख्यांनी पुरस्कारिलेल्या प्रणाली !

अर्थशास्त्र हे केवळ शोध आणि अन्वय यापुरते मर्यादित शास्त्र नसून, त्याचे

---

* Positive Science आणि Normative Science यांच्यामधील फरकाचा संदर्भ.

सल्ला देणे वा दोष दिग्दर्शन करणे हे ही कर्तव्य आहे हे पी. जे. थॉमस यांचे मत कट्टर भांडवलवादी विचारवंतांना मान्य नव्हते. तरीही वेळोवेळी येणाऱ्या भांडवलवादी समस्यांमुळे समाजकल्याणाच्या संदर्भातही भांडवलवादी नमुन्यांचे समर्थन करण्याच्या दृष्टीने विचारमंथनाची आवश्यकता वाटू लागली. उदा. प्रा. पिगूची कल्याणकारी अर्थनीती आणि लॉर्ड बीव्हरिजने पुरस्कारलेली संपूर्ण रोजगाराची कल्पना आणि 'पाळण्यापासून ते स्मशानापर्यंत'च्या* सामाजिक विम्याची कल्पना अशा बाबी म्हणजे भांडवलशाही धोरणांमध्ये सामाजिक आशय भिनविण्याचा केलेला प्रयत्न होता. याचदृष्टीने व्यावहारिक पातळीवर मार्शल यांचे Consumer's surplus चे तत्त्व हे लोकोपयोगी सुविधांच्या किंमती ठरविताना परवलीचा शब्द बनले.

भांडवलाचा दुसरा काळजीचा विषय म्हणजे पैशाचा पुरवठा आणि त्याचा किंमतींवर होणारा परिणाम! पैशाची मागणी व चलनवाढ यांबद्दलच्या अनेक प्रणाली सुचविल्या गेल्या. त्यापैकी मिल्टन फ्रीडमन, जेम्स टॉबिन, बॉमोल व ब्रॉन्फेन्ब्रेनर यांच्या भांडवली प्रणाली व्यापक प्रमाणात उल्लेखिल्या गेल्या. 'नियम विरुध्द अधिकार' आणि 'वित्तवादी विरुध्द रचनावादी' यांच्याबद्दलच्या वादावरील परिचर्चा या अधिक परिचित आहेत व त्या आकलन, कार्यकारणभाव आणि आदेश यांच्या दिग्दर्शनाच्या दृष्टीने उपयोगी ठरतात.

भांडवलवादाची अंगभूतच दुखणी ठरलेली व्यापारी आवर्तने आणि उद्योग आवर्तने यासंबंधीच्या प्रणालींबद्दलही हे खरे आहे. मिचेल आर. सी. ओ. मॅथ्यूस, हिक्स आणि इतर विचारवंत यांनी विविध संकल्पनात्मक चौकटीवर आधारलेल्या वेगवेगळ्या प्रणाली पुरस्कृत केल्या आहेत.

या सर्व आलेखावरून लक्षात येते की भांडवलवाद हा स्वत:च्या नित्य नूतन दुखण्यांवर नित्य नवे उपाय शोधण्याच्या प्रयत्नात होता व आर्थिक निर्वाणीच्या नव्या नव्या आव्हानांना तोंड देण्यासाठी वेळोवेळी नवीन आर्थिक प्रणाली सिद्ध करण्याचा प्रयत्न करीत होता.

भारताला अनुसरण्यासारखे पैलू

तरीही वस्तुत: या पश्चिमी आर्थिक चिंतनापैकी अनेक मुद्यांचा स्वतंत्र भारताच्या आर्थिक रचनेच्या दृष्टीने मर्यादित का होईना उपयोग झाला असता. उदा. मार्शलचे Consumer's surplus हे तत्त्व. उपभोक्ता देण्यास तयार असलेली किंमत आणि तो प्रत्यक्ष देत असलेली किंमत यातील फरकावर आधारलेली ही संकल्पना, कर आकारणीबाबत व सार्वजनिक उपयोगाच्या किंमती ठरविण्यासाठी अतिशय उपयोगाची आहे. कल्याणकारी अर्थशास्त्राचा प्रणेता प्रा. पिगू आणि नंतरचे लेखक यांनी विकसित

---

* दुसरीकडे याचाच उल्लेख 'गर्भसंभवापासून पिंडदानापर्यंत' (from womb to tomb)असा केलेला आहे.

केलेले अर्थशास्त्र आणि सार्वजनिक कल्याणाविषयी लॉर्ड बीव्हरिज यांनी पुरस्कारिलेले सर्वंकष विम्याचे धोरण हे सार्वजनिक कल्याणाच्या विवरणाच्या दृष्टीने अधिक उपयोगाचे ठरते. बचत - गुंतवणूक - नफा मिळवून देणाऱ्या प्रक्रियेच्या विवरणासाठी केन्सचा नमुना अधिक प्रस्तुत ठरू शकतो. हॅरॉड - डोमर यांचा नमुना हा नियोजनाच्या नमुन्यांच्या आंकलनाचा प्रारंभबिंदू ठरू शकतो. पण भारतीय संदर्भात विशेषकरून फाय रेनीस अथवा ल्युईस यांचा श्रमशक्तीच्या अमर्याद पुरवठ्याचा नमुना संपूर्णत: अभ्यसनीय होता. गुन्नर मिर्डालने मांडलेला 'ओहोटीचा सिद्धान्त' व आणखी काही कल्पना आपल्या दृष्टीने आस्थेने लक्षात घेण्यासारख्या आहेत. –

-काही उद्योगांचा वा परिसराचा विकास हा इतर उद्योगांच्या वाढीला अथवा सभोवतालच्या भागाच्या विकासाला हातभार लावतो. अशा संलग्नतेतून विकासाचे अनुकूल परिणाम आजुबाजूच्या परिसरात घडून येतात. ही झाली 'प्रसरण कल्पना'.

-त्याच्या इतर कल्पना अशा –

- 'पुरस्सर संलग्नता - दुसऱ्या उद्योगांच्या निर्मितिप्रक्रियेतील मध्यंतरीच्या अवस्थेतील घटक म्हणून काही घटकांची निर्मिती होत असते. (Spare parts तयार करून देणे). या शिवाय, अन्य उद्योगांमध्ये कच्च्या मालासारखे उपयोगात आणले जाणारे घटक म्हणूनही काही निर्मिती होत असते. अशा दोन्ही प्रकारचे घटक बनविणाऱ्या अलग अलग उद्योगांच्या विकासाच्या प्रक्रियेला 'वाढीची पुरस्सरता' म्हणतात.

-प्रतिसर संलग्नता - त्याचप्रमाणे संबंधित उद्योगात कच्चा माल म्हणून उपयोगी पडू शकणारे घटक निर्माण करणाऱ्या अन्य उद्योगांच्या (उदा. रबर उद्योग - मोटार टायर्स) विकासाच्या प्रक्रियेला प्रतिसर संलग्नता म्हणतात.

-ज्या उद्योगांना मोठ्या प्रमाणावर पुरस्सर संलग्नता व प्रतिसर संलग्नता असते त्यांच्या 'वाढीची पुरस्सरता' निश्चितच अधिक असते.

म्हणून मिर्डालच्या मते, ज्या उद्योगांना पुरस्सर व प्रतिसर अशा दोन्ही प्रकारच्या संलग्नतेच्या परिणामी 'वाढीची पुरस्सरता' मोठ्या प्रमाणावर असू शकते अशाच उद्योगांना औद्योगीकरणाचे नियोजन करताना महत्त्व दिले पाहिजे. (पुरस्सर संलग्नता, प्रतिसर संलग्नता या कल्पना हँस सिंगरनेही Unbalanced Growth Strategy स्पष्ट करताना मांडल्या आहेत.)

अशाप्रकारच्या अनेक नमुन्यांचा व प्रमेयांचा भारताच्या नियोजनात उपयोग होऊ शकला असता.

भारतीय अर्थनीतीतील वास्तवतेचा अभाव

पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या आमच्या नेतृत्वाने मात्र पश्चिमी आर्थिक चिंतनशील उपयुक्त अशा मुद्यांचा विचार व उपयोजन न करता प्रथम मिश्र अर्थव्यवस्थेत साम्यवादी शासकीय नियोजनाचा अवलंब केला आणि आता अलिकडच्या काळात भांडवली

प्रणालीतील मुक्त अर्थव्यवस्थेचा आंधळा अवलंब चालवला आहे. त्यातून आजची आर्थिक अनवस्था निर्माण झाली आहे. अनेक गमकांवरून लक्षात येते की आर्थिक धोरणाची दिशा साधारणपणे निराशाजनक आहे. येऊ पहाणाऱ्या सर्वनाशाची चाहूल देणाऱ्या वस्तुस्थितीतील काही मोजक्या घडामोडींची दखल, भावी आर्थिक धोरण ठरविण्यासाठी आवश्यक आहे.

वस्तुस्थितीचा ढोबळ आढावा

अर्थात वस्तुस्थितीचा हा आढावा केवळ नमुन्यादाखल आहे. सर्वांगीण नाही.

स्वर्गीय लालबहादूर शास्त्रींच्या निधनानंतर या देशाच्या शासकीय नीतीमध्ये बेलगाम उधळण, भ्रष्टाचार, व्यक्तिगत लाभासाठी बेजबाबदार स्पर्धा या गोष्टींना ऊत आला. केवळ गेल्या दशकातील काही आकडेवारी पाहिली तरी त्यामुळे परिस्थितीचे गांभीर्य लक्षात येते. गेल्या दशकात देशांतर्गत कर्ज १९८० - ८१ मधील रु. ४८४५१ कोटींपासून १९९० - ९१ मधील रु. २७९५२८ कोटीपर्यंत म्हणजे सहापट वाढले आहे. या अंतर्गत कर्जाचे (G.D.P.) शी असलेले १९८० - ८१ मधील ३५.६% हे प्रमाण १९९० - ९१ मध्ये ५४.४% पर्यंत गेले आहे. १९८९ मध्ये भारताचे परकीय कर्ज ६२५०९ कोटी डॉलर्स होते ते आताच्या (हा १९९२ सालचा उल्लेख आहे.) विनिमय दराप्रमाणे १५६५७२ कोटी रुपयांच्याही थोडे पुढेच जाईल. परकीय कर्जाचा सरकारी आकडा जरी रु. १२०००० कोटी सांगितला जात असला तरी ही रक्कम १९९० मधील देणी जमेस धरता रु. १७०००० कोटींच्या घरात जाईल.

भांडवली गुंतवणूक आणि उभी केलेली कर्जे धरून केन्द्र शासनाची १९८० - ८१ मधील रु. ५९६७० कोटीची जमा ही १९९० - ९१ मध्ये रु २३६६१९ कोटीपर्यंत गेली आहे. त्याचबरोबर १९८० - ८१ मधील रु. ६५००० कोटींचे खर्चाचे प्रमाण आता रु. ४५०००० कोटींपर्यंत गेले आहे.

त्याच्या जोडीलाच व्यापारातील घटत्या शिलकीमुळे खर्चात सुमारे रु. ७७९३९ कोटींची भर पडते. अमेरिकी डॉलर्सच्या प्रमाणात ही रक्कम ६४२१ दशकोटींपर्यंत जाते. रुपयाच्या अवमूल्यनानंतर हा सर्व आकडा रु. १६०००० कोटीपर्यंत जातो.

या ढोबळ आकडेवारीप्रमाणेच परकीय चलनाच्या साठ्यातील घट, देय रकमेच्या. बाकीच्या (B.o.P.) समस्येवर मात करण्यासाठी आवश्यक ते परकीय कर्ज तात्काळ उपलब्ध करून घेण्यासाठी परदेशात सोने गहाण टाकण्यातील सरकारची असोशी, रुपयाची वाढती घसरण, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या आदेशाबरहुकूम परकीय भांडवलाला निलाजरेपणाने शरण जाणारे जुलै १९९१ मध्ये लोकसभेत सादर केलेले वार्षिक अंदाजपत्रक आणि नवे औद्योगिक धोरण, अशाही, काही घटना आपले लक्ष वेधून घेतात.

परिस्थितीच्या गांभीर्याची अधिक सम्यक कल्पना येण्यासाठी नमुन्यादाखल आणखी

काही मोजक्याच गोष्टींचा उल्लेख करावयाचा तर –

अग्रक्रमाच्या ३४ उद्योगांमध्ये ५१% परकीय समभाग भांडवलाला नव्या औद्योगिक धोरणाने बिनशर्त मान्यता दिली आहे. सार्वजनिक क्षेत्रासाठी राखून ठेवलेले ८उद्योग, परवानापद्धतीची सक्ती असलेले १८ उद्योग आणि लघुउद्योग क्षेत्रासाठी राखून ठेवलेली ८०० उत्पादने या साऱ्यांव्यतिरिक्त इतर परवानामुक्त क्षेत्रात ५१% समभागांची परवानगी परकीय उद्योगांना द्यावयाला सरकारची हरकत रहाणार नाही. ५१% परकीय समभाग असलेल्या कोणत्याही उद्योगाला आता भारतीय उद्योगांच्या बरोबरीचे स्थान मिळू शकते. त्यामुळे आता लघुउद्योगांसाठी राखून ठेवलेली उत्पादने मोठे उद्योगही तयार करू शकतील. अर्थात त्यांच्या समभाग भांडवलाची गुंतवणूक केवळ २४% पर्यंतच मर्यादित असेल. लघुउद्योग क्षेत्राचे आधुनिकीकरण व भांडवली बाजारपेठेत प्रवेश मिळण्याला वाव अशा दोन कल्पना या मागे होत्या.. या मार्गाने लघुद्योगांसाठी राखून ठेवलेल्या सवलती आता मोठे उद्योगही लाटू शकतील.

अर्थपुरवठा करणाऱ्या संस्थांना आणि सर्वसाधारण समाजाला काही प्रमाणात समभाग विकून सार्वजनिक उद्योगांचे स्वरूप बदलण्याचाही संकेत दिलेला आहे. अर्थात त्याचा फायदा केवळ मक्तेदार भांडवलदारच घेऊ शकतील. अशा उद्योगांत त्यांचे भांडवल गुंतवणुकीचे प्रमाण कमी असले तरी मक्तेदारी भांडवलदार या उद्योगांचे परिणामकारक नियंत्रण करू शकतात. मोठमोठ्या उद्योगांमध्ये प्रत्यक्षात खाजगी भांडवल केवळ १०%च असते. व उरलेले ९०% भांडवल हे सार्वजनिक निधीतूनच येते. देय रकमेतील बाकी (B.o.P.) आणि परकीय कर्जाबाबतचा कर्जबाजारीपणा या संदर्भातील प्रतिकूल परिस्थितीत असलेले भारत हे राज्य आहे. अशा स्थितीत देशांतर्गत तंत्रज्ञानाला प्रोत्साहन न देता, परकीय तंत्रज्ञानाची बेलगाम आयात करण्याची चिन्हे दिसत आहेत. परिणामी जे उत्पादन देशात होऊ शकते त्या उत्पादनाच्याही वस्तूंची आयात करण्याचा हव्यास वाढत जाईल.

जमेवरील बंधने दूर केल्यामुळे मक्तेदारी उद्योगांच्या व्यापाराचे नियंत्रण करणाऱ्या आयोगाद्वारे (M.R.T.P*) नियंत्रण करणे तर अधिकच कठिण होणार आहे.

कार्यक्षमता हाच एकमेव निकष नाही.

हे खरे आहे की आगामी अर्थनीतीत उद्योगातील अक्षमता कायम रहाणे हिताचे नाही व जोपर्यंत उद्योगधंद्याची भरभराट होत नाही तर तोवर मजुरांचे कल्याण होणार नाही. पण त्याचबरोबर हेही करे आहे की भारतात केवळ कार्यक्षमता हाच एकमेव निकष लावता येणार नाही तर रोजगाराची क्षेत्रे व्यापक करण्याशीही कार्यक्षमतेचा मेळ राखला पाहिजे.

---

* परिशिष्ट १ पहा.

(मुक्त व्यापाराच्या प्रणालींना बांधून घेण्यास त्यांचा पुरस्कार करणारे पश्चिमी देशही तयार नसतात कारण शासकीय नीती ही राजकीय, सामाजिक, आर्थिक व लष्करी (संरक्षणविषयक) धारणांच्या मिश्रणावर आधारलेली असते. कार्यक्षमता पराकोटीला नेण्यापेक्षा राष्ट्रीय सुरक्षा व अंतर्गत सुव्यवस्था हाच कोणत्याही शासनाचा जिव्हाळ्याचा विषय असतो हे पश्चिमी देशांच्या नीतीच्या संदर्भात मागे स्पष्ट केले आहेच.)

पश्चिमी तंत्रविज्ञानाच्या आयातीचे परिणाम

पश्चिमी तंत्रविज्ञानाच्या आयातीमुळे या तंत्रविज्ञानाच्या वापरासाठी कामगारांचे पुनर्शिक्षण आवश्यक आहेच. पण अशाप्रकारच्या पुनर्शिक्षित कामगारांना त्याच उद्योगात पुन्हा नियुक्त करता येईल असे म्हणणे मात्र दिशाभूल करणारे आहे. कारण या नव्या तंत्रविज्ञानाचे पुनर्शिक्षण केवळ उच्चशिक्षित कामगारांनाच देण्यात येणार आहे व त्यांची संख्या साधारणत: अत्यल्पच असते. नव्या तंत्रविज्ञानातील अद्यावत कौशल्यामुळे पुनर्शिक्षण न देता येणाऱ्यांची संख्या फार मोठी असेल आणि ते रोजगारीतून बाहेर फेकले जाणार आहेत. त्यांच्यासाठी नवी रोजगारक्षेत्रे उघडावी लागतील. खरे पाहता तंत्रविज्ञानातील बदल आणि आधुनिकीकरण यांच्या किंमतीचा बोजा कामगारांवर पडता कामा नये.

पण भारतासारख्या विकसनशील देशाच्या दृष्टीने नव्या पश्चिमी तंत्रविज्ञानाच्या संदर्भात अधिक मूलभूत महत्त्वाचा मुद्दा उपस्थित होतो.

एखाद्या समाजाने विकासाची कोणती अवस्था गाठली आहे? त्या समाजातील मूलभूत व्यवस्थेची अवस्था कोणत्या प्रकारची आहे? अस्तित्वात असलेली सामाजिक व आर्थिक रचना कशाप्रकारची आहे आणि मुख्यत: त्याच्या गरजा काय आहेत? हे सारे प्रश्न नव्या तंत्रविज्ञानाच्या उपयोजनाच्या दृष्टीने अतिशय मूलभूत महत्त्वाचे सामाजिक व आर्थिक पर्यावरण यांची सिद्धता एखाद्या देशात झालेली नसताना, नव्या तंत्रविज्ञानाचे उपयोजना निरुपयोगी ठरते. त्यामुळे कोणत्याही स्थितीतील समाजासाठी एखादे नवे तंत्रविज्ञान अथवा जुन्या व्यवस्थेतील नवे फेरफार, विकसित देशांमधील उपयोजनाइतक्याच प्रमाणात उपयोगी ठरू शकतील असे म्हटले तर केवळ भाबडा, भोळसट मनुष्यच त्यावर विश्वास ठेवेल.

विकासाच्या पश्चिमी नमुन्यालाच निरपवाद वैश्विक प्रतिष्ठा देणाऱ्या पश्चिमी अहंकारातून मेक्सिकोमधील विकासाचे कसे धिंडवडे निघाले त्याचे विदारक दर्शन मागे* उद्धृत केलेल्या इव्हॅन इलिचच्या शब्दांतून घडते.

म्हणूनच अविकसित देशांत आधुनिक तंत्रविज्ञानाचे उपयोजन विशिष्ट आर्थिक,

---

* पहा-हिंदू दिशावेध. पृ. ३५.

सामाजिक रचनेमध्येच उपयुक्त ठरू शकते. तशी आर्थिक, सामाजिक रचना ज्या समाजात नसेल त्या समाजाच्या भिन्न आर्थिक रचनेमध्ये या तंत्रविज्ञानाचे उपयोजन केले तर त्या समाजाच्या आर्थिक, सामाजिक जीवनात आणि त्यातील वर्तमान परस्परसंबंधांत, जाणवण्याएवढा उत्पात होऊ शकतो. आवश्यक त्या आनुषंगिक तरतुदी समांतरतेने केल्याशिवाय कोणत्याही नव्या तंत्रविज्ञानाचे उपयोजन एखाद्या नव्या क्षेत्रात उपयोगी ठरू शकत नाही.

साधारणत: असे अनुभवाला येते की परकीय प्रगत तंत्रविज्ञानावर आधारलेले उद्योग हे स्वत:चे वेगळे क्षेत्र विकसनशील देशांत निर्माण करतात. अशाप्रकारे आयात केलेले परकीय तंत्रविज्ञान परकीय प्रगत देशांमधील समपातळीवरील तंत्रक्षेत्रातील सामग्रीवर व सेवांवर अवलंबून रहाते व त्यामुळे तंत्रविज्ञानाबरोबरच सामग्री व सेवाही आयात कराव्या लागतात. त्याबरोबरच विकसनशील देशांत निम्नतर आर्थिक पातळीवर काम करणारे व मर्यादित क्रयशक्तीमुळे उच्च-तंत्रवैज्ञानिक उत्पादने विकत घेऊ न शकणारे अनेक दुय्यम आनुषंगिक उद्योग आजुबाजूच्या आर्थिक क्षेत्रात असतात. पण अशा कोणत्याही स्थानिक उद्योगाच्या विकासाला या आयात केलेल्या उद्योगाचा काहीही उपयोग होत नसतो. विकसनशील देशांत अशारीतीने सिध्द झालेले परकीय प्रगत तंत्रविज्ञानाचे क्षेत्र स्वाभाविकच परकीय अतिप्रगत तंत्रक्षेत्राशीच सलग्न रहाते व स्थानिक मर्यादित क्षेत्रापासून अलग पडते. त्यामुळे आपापल्या प्रगत देशातील अतिप्रगत तंत्रक्षेत्राशी असलेली निरंतर संलग्नता आणि दुसऱ्या बाजूने विकसनशील देशातील राष्ट्रीय अर्थकारणापासून घेतलेली फारकत, यांमुळे ही परकीय प्रगत तंत्रविज्ञानाची जणू बेटेच निर्माण होतात व ती स्थानिक मर्यादित तंत्राधारित अर्थनीतीने वेढलेली असतात. अशी ही बेटे साहजिकच समस्या निर्माण करतात. ही तंत्रविज्ञानविषयक परकीय संलग्नता ही परकीय आर्थिक साम्राज्यवादाला जन्म देते असे अनुभवांती लक्षात येते.

बाद झालेल्या तंत्रविज्ञानाची आयात

त्यातही तंत्रविज्ञान बाद होत रहाणे ही तर प्रगत देशांतील कायमची वस्तुस्थिती आहे आणि असे बाद झालेले तंत्रविज्ञान व उत्पादनप्रक्रिया फेकून देण्यासाठी अविकसित देशांएवढी चांगली उकिरड्याची जागा त्यांना अन्यत्र कुठे मिळणार? परिणामत: तंत्रविषयक संलग्नता ही बहुधा अविकसित देशांतील त्यातल्या त्यात प्रगत क्षेत्र आणि प्रगत देशांतील पुढच्या टप्प्यातील प्रगतीमुळे आता तंत्रदृष्ट्या बाद झालेले क्षेत्र यांमध्ये निर्माण होते.

भारतातील पर्यावरणविषयक परिस्थिती

आणि याप्रमाणे उकिरड्यावर फेकून दिल्याप्रमाणे, विकसनशील देशांत टाकून

दिलेल्या, पश्चिमेकडील कालबाह्य तंत्रविज्ञानामुळे निर्माण होणाऱ्या पर्यावरणसंतुलनाच्या मर्यादा तर भारतासारख्या देशात केव्हाच पायदळी तुडविल्या जातात. अमेरिकेतसुद्धा जेथे १८९० सालीच केलेला प्रदूषणावर निर्बंध घालणारा कायदा, पुढे आलेल्या भौतिक उपभोक्तावादाच्या लाटेत वाहून गेला, तेथे भारतात पश्चिमी तंत्रविज्ञानावर आधारित विकासनमुन्याच्या आंधळ्या अनुसरणातून असा कोणताही प्रदूषणनिर्बंधक कायदा निरर्थक ठरला तर त्यात काहीच नवल नाही. उदाहरणार्थ, आपल्या ताळेबंदात पर्यावरणात्मक वार्षिक परीक्षणाचा समावेश करणारी दुरुस्ती कंपनी कायद्यामध्ये करावी असा प्रस्ताव आहे. अशा प्रस्तावाचे भवितव्य काय असू शकते? जर त्याची खरोखरच अंमलबजावणी झाली तर सर्व उद्योगांना पर्यावरणात्मक कायद्यांचे आपल्याकडून झालेले उल्लंघन व त्यावर आपण केलेले प्रतिबंधात्मक उपाय यांचा उल्लेख आपल्या ताळेबंदात करावा लागेत. राज्यस्तरीय प्रदूषण - प्रतिबंधक खात्याकडून पुढच्या चौकशीचा अथवा कारवाईचा आदेश जारी होईल. पण चुकार उद्योग आपले वार्षिक ताळेबंद ज्याप्रमाणे सोयीस्कररीतीने जमवून घेतात त्याचप्रमाणे पर्यावरणपरीक्षणाचे सोयीचे अहवाल सहज सिद्ध करू शकतात. औद्योगिक व्यवस्थापनातील पर्यावरण कक्षांवर अधिकार असलेले पर्यावरण - अधिकारी कायद्याने नेमणे हा उपायही यशस्वी होऊ शकणार नाही. अशा अधिकाऱ्यांशी पटवापटवी कशी करावयाची असते हे उद्योगपतींना बरोबर माहित असते. हे चांगलेच आहे की प्रस्तावित पर्यावरण - न्यायाधिकरणांच्या निकालाविरुद्ध केवळ सर्वोच्च न्यायालयाकडेच दाद मागता येईल. पण तरीही अशी न्यायाधिकरणे किती कठोरपणे स्वत:चे काम पार पाडतील यावरच त्यांचा प्रभाव अवलंबून राहील.

सध्यातरी राज्यस्तरीय अधिकाऱ्यांकडून प्रमाणपत्र घेणे हा केवळ एक उपचार झाला आहे. प्रदूषण - प्रतिबंधक यंत्रणा आपल्या कारखान्यात बसविली जाईल येवढे आश्वासन उद्योगपतीने देणे पुरेसे आहे. तो प्रत्यक्षात: तशी यंत्रणा बसवितो की नाही, अथवा तिचा उपयोग करतो की नाही हे क्वचितच तपासले जातो. परिणामत: त्यांच्या उद्योगविषयक प्रस्तावित कराराचे औद्योगिक परवान्यात रूपांतर करण्यापूर्वी ज्यांना पर्यावरणात्मक प्रमाणपत्रांची गरज असते अशा उद्योगांची निश्चिती करणारी सूची बनविणारे कोणतेही औद्योगिक धोरण हा एक चेष्टेचा विषय बनतो.

असा कायदा होणे ही अर्थातच चांगलीच गोष्ट होती की धातुजन्य पदार्थ बनविणाऱ्या, धातुशुद्धी करणाऱ्या व धातूंचे औष्णिक विभक्तीकरण करणाऱ्या वा विद्युत्शक्तीच्या साहाय्याने पदार्थांना मुलामा देणाऱ्या कोणत्याही - खाजगी, सार्वजनिक अथवा लघुउद्योग - क्षेत्रातील उद्योगाला, पर्यावरणात्मक तरतुदींची परिपूर्ती केल्याबद्दल योग्य अधिकाऱ्याकडून (राज्य प्रदूषण - प्रतिबंधक मंडळ) मान्यता मिळाल्याविषयी राज्य औद्योगिक संचालकांचे पुरेसे समाधान केल्याशिवाय परवाना मिळणार नाही. त्याचप्रमाणे सार्वजनिक गुंतवणूक मंडळापुढे येणाऱ्या २० कोटींहून अधिक भांडवली उलाढालीच्या

कोणत्याही प्रकल्पाला, राज्य मंडळाशिवाय केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाकडूनही हिरवा कंदिल दाखविला जाणे आवश्यक आहे. उद्योगांच्या जागांविषयीही शासनाने काही पर्यावरणविषयक मार्गदर्शक तत्त्वे मांडली आहेत. क्रीडांगणे व राष्ट्रीय उद्यानांसारखी स्थळे ही पर्यावरणाच्यादृष्टीने संवेदनशील स्थळे म्हणून टाळली पाहिजेत असे त्यांत अधोरेखित केले आहे. स्वत:ची अतिसक्षम प्रदूषण-प्रतिबंधक यंत्रणा असली तरी प्रदूषण निर्माण करणारे उद्योग व अशी स्थळे यांच्यांत कमीत कमी २५ कि. मी. अंतर असले पाहिजे. त्याचप्रमाणे अशा तीव्र प्रदूषणकारी उद्योगांची जागा निश्चित करताना केवळ त्या उद्योगाची प्रदूषणाची अंगभूत शक्यताच नव्हे तर सभोवतालच्या भागांवरील त्या उद्योगांच्या आनुषंगिक पर्यावरणात्मक परिणामांचाही विचार केला पाहिजे याही गोष्टीवर भर दिला गेला आहे. उदा. आसाममधील नुमालीघर येथील प्रकल्पाबाबत असे दिसते की जरी नुमालीघर हे काझीरंगा अभयारण्यापासून दूर असले तरी त्या प्रकल्पामुळे काझीरंगाजवळून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावरील वाहनांची वाहतूक अचानक बेसुमार वाढून वाहनांकडून होणाऱ्या प्रदूषणाचाच राष्ट्रीय उद्यानातील वनसंपत्तीवर घातक परिणाम होणे शक्य आहे.

तेव्हा कायद्यांचे पालन जोवर होत असते तोवर ठीकच आहे.

समस्या अंमलबजावणीच्या पातळीवर

पण मुळात खरी समस्या आहे ती अंमलबजावणीच्या पातळीवरच.

पहिली समस्या आहे शासनाच्या हेतुशुद्धतेची, कृतिप्रवणतेची ! सूक्ष्म, तपशीलवार अशा छाननीच्या प्रक्रियेमुळे मंजुरीचा कालावधी अतिरिक्तपणे लांबणे अटळ असते. त्यामुळे मुळातील अंदाजी खर्च वाढत जाण्याची शक्यता असते. या समस्येला तोंड देण्याची शासनाची तयारी आहे, की केवळ औद्योगीकरणाच्या विकासाला प्रोत्साहन देण्याच्या भरात पर्यावरणाच्या अटी शिथिल करण्याकडे शासनाचा कल आहे ? उदा. उद्योगाच्या जागेला मान्यता देणाऱ्या समितीच्या (Site Appraisal Committee) शिफारशी अनेकदा फेटाळल्या जातात. टेहरी धरणाबाबत, डहाणूच्या ५०० मे. वॅ. च्या औष्णिक विद्युत्केंद्राबाबत अथवा ठाणे येथील वायुविभाजनाच्या ३ लक्ष एम्. टी. प्रकल्पाबाबत समितीच्या शिफारशी डावलल्या गेल्या.

दुसरी समस्या अशी की कायद्यांमधील अनेक कच्च्या दुव्यांचा फायदा संबंधित गटांकडून घेतला जातो. राज्याराज्यांमध्ये औद्योगिक विकासासंबंधी स्पर्धा असू शकते. आणि १० लाखांहून अधिक लोकसंख्येच्या शहरांच्या औद्योगिक पुनरुज्जीवनाकरिता स्थलविषयक धोरण लवचिक करण्याची कायद्यामध्ये जी तरतूद आहे, ती अशावेळी आयतीच हाताशी येते. कोणत्या शहराला औद्योगिक पुनरुज्जीवनाची गरज आहे हे कोण ठरविणार ? औद्योगिक विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी उद्योगांच्या स्थलविषयांचे निकष शिथिल करण्याची पूर्वीच तयारी दाखविणारे महाराष्ट्र शासन उद्या मुंबईलासुद्धा

औद्योगिक पुनरुज्जीवनाची गरज आहे असे जाहीर करू शकेल! आणि आपल्या मूळ निर्मितिक्षमतेपेक्षा ३०० %नी अधिक क्षमता वाढवून मर्यादेबाहेर वाढ करणाऱ्या उद्योगांचे काय ? अशा प्रकारच्या अनेक पळवाटा या कायद्यांमध्ये आहेत.

तिसरी समस्या अशी की उद्योगपती हे 'बेकायदेशीर चुकारपणाला' 'कायदेशीर पळवाटीचे' रूप देण्याच्या कलेत तरबेज असतात. त्यातही असे दिसते की शासन हे पर्यावरणात्मक मार्गदर्शक तत्त्वांच्या अटींचे अडथळे निर्माण करून, उत्पादन सुरू करण्यापूर्वीच ते अडथळे दूर करण्याची जबाबदारी उद्योगपतींवर न टाकता, केवळ पर्यावरणविषयक मार्गदर्शक आदेश देऊन ते पाळण्याची जबाबदारी उद्योगपतींवर सोपवून मोकळे होते अशीही शक्यता असते. असे झाले तर ती भयानक आपत्तीच ठरण्याची शक्यता आहे. कारण आमच्या उद्योगपतींना त्यांच्या केवळ नफ्यातच स्वारस्य आहे. पर्यावरणात्मक कायद्याची त्यांना अजिबात दिक्कत नसते.

मुळात, अस्तित्वात असलेल्या कायद्यातील तरतुदीही पुरेशा नाहीत, ही चौथी समस्या आहे. वस्तुत: कायदेशीर तरतुदींची गरज असलेली अनेक प्रकारची परिस्थिती कायद्याच्या दृष्टिकोणातून हाताळण्याची कायदेशीर तरतूदच नसते.

आपले ग्रामीण विभाग तर यादृष्टीने महत्त्वाचे आहेत. पर्यावरणात्मक सावधानतेच्या दृष्टीने ग्रामीण विभागाच्या बाबतीत नेहेमीच पक्षपात केला जातो.

पश्चिमेचे अनुकरण करणाऱ्या आमच्या नियोजनकारांनी कानपूर, मुंबई, कलकत्ता, दिल्ली, मद्रास अशा शहरांमधील पर्यावरणात्मक प्रदूषणाची तत्परतेने दखल घेतली आणि त्याच्या कारणांकडे काहीसे अपुरे का होईना, लक्ष दिले. तसेच कायदेशीर तरतुदींसकट प्रतिबंधात्मक व उपायात्मक तरतुदी केल्या. भोपाळ, चेर्नोबिल यासारख्या घटनांनी सर्वसाधारण समाजाचेही या सहसा दुर्लक्षित रहाणाऱ्या विषयाकडे लक्ष वेधले. पण ही नवी आस्थाही केवळ शहरांपुरतीच मर्यादित राहिली.

ग्रामीण, तसेच नद्या - वने - पहाडांच्या परिसरातील प्रदूषणाचा परिणाम तर अजून लक्षातही घेतला जात नाही. अविवेकी, बेछूट जंगलतोडीमुळे जमिनीची धूप, हंगामी पावसाची अनिश्चितता व भूगर्भातील पाण्याच्या साठ्यामधील घट असे परिणाम घडून आले आहेत. ग्रामीण गरीब जनतेच्या दैनंदिन घरगुती गरजा या प्राणिज व प्राणिजसंबद्ध उत्पादनांतून भागविल्या जातात. अन्नाव्यतिरिक्त सरपण, (जळाऊ लाकूड, शेण्या, शेतातील तणे इ.), कडबा, खते, (सेन्द्रिय खनिजे, वन्य गवत), बांधकामाची सामग्री (खांब, बांबू, पाने, गवत) आणि इतर मूलभूत साहित्य, हे सर्व वनस्पतिजन्य आणि प्राणिज पदार्थ असतात. भारतीतल ५० % जळणाचा वापर हा स्वयंपाकासाठी होतो आणि त्यापैकी ९०% जळाऊ साहित्य हे वनस्पतिजन्य वा प्राणिज असेत. (१५ दशलक्ष रुपयांचे जळाऊ लाकूड तर एकट्या दिल्लीत लागते.) पर्यावरणात्मक असंतुलन हे ग्रामीण जीवनातील पारंपरिक हस्तकला, घरबांधणी, वाहतुक आणि सर्वसाधारण जीवनशैली यांच्यावर घातक परिणाम घडविणारे आहे. भारतात संपूर्ण

पृथ्वीच्या भूभागाच्या २.४५%भूभाग आहे. पण त्यावर एकूण जगातील १५% गुरेढोरे, ५२% म्हशी व १५% मेंढे व माणसे यांना गुजराण करावी लागते.(हे सर्व उल्लेख १९९२ सालचे आहेत)

उद्योगपतींचा, स्वस्त अशा प्राणिज कच्च्या मालाचा शोध, टाकाऊ पदार्थांची विल्हेवाट लावण्याची स्वस्त पद्धती आणि केवळ आर्थिक लाभासाठी कोणत्याही प्रदूषणाला जणू संवेदनशून्य प्रोत्साहन देण्याची राजकारण्यांची प्रवृत्ती यामुळे मुळातच अपुऱ्या असलेल्या संबंधित कायद्यांचे पुरते विडंबन चालले आहे.

याच वृत्तीतून मूळचे पारंपरिक पीक खच्ची केले जात आहे आणि व्यापारी दृष्टीने अधिक किफायतशीर अशी पिके घेतली जात आहेत (ओक वृक्षांच्या जागी पाईन वृक्षांची जंगले, साल वृक्षांच्या जागी सागाचे वृक्ष, सर्वसाधारण पावसाळी निपजीच्या जागी निलगिरीची लागवड वा सर्वसाधारण उष्ण कटिबंधातील जंगलांऐवजी पाम तेल वृक्षांची लागवड)

पर्यावरणात्मक भूभागाचा विध्वंस अथवा रूपांतर यांची सामाजिक किंमत फार मोठी आहे. चराऊ कुरणांच्या विध्वंसामुळे भटक्या मेंढपाळांच्या जवळजवळ २०० जनजातींवर काय परिणाम होईल? हा आकडा अनेक दशलक्षांत जातो. आमच्या नद्या (आणि समुद्रही) औद्योगिक टाकाऊ मालाचे उकिरडे झाल्यामुळे जलप्रदूषणाबरोबरच हजारो मच्छीमारांचे उपजीविकेचे साधनही हिरावून घेतले गेले आहे. भांडवली पुरवठा करणाऱ्यांचे हित साधण्यासाठी आमच्या राज्यकर्त्यांनी व नियोजनकारांनी पर्यावरणाकडे हेतुत: दुर्लक्ष करण्याचा गुन्हा केलेला आहे.

पर्यावरणवाद्यांच्या दबावामुळे जरी सामाजिक वनीकरणाचे काही कार्यक्रम हाती घेण्यात आले आहेत तरी एकूण वनीकरणाची गरज लक्षात घेता हे प्रयत्न अपुरे आहेत. दुसरे असे की हे प्रयत्न बऱ्याच प्रमाणात दिखाऊपणाचे आणि सवंग लोकप्रियतेचे आहेत. त्यांत सहभागी होणाऱ्यांना त्याच्या अंमलबजावणीविषयी प्रामाणिक इच्छाही नसते. सामाजिक वनीकरणाच्या आमच्या योजना त्यांचा हेतू सिद्ध करण्याच्या दृष्टीने अपयशीच ठरल्या आहेत. वस्तुत: जळाऊ लाकूड, कडबा, कामचलाऊ इमारती लाकूड आणि किरकोळ वनजन्य पदार्थांचे उत्पादन होऊन त्यापासून ग्रामीण जनतेच्या मूलभूत प्राणिज उत्पादनाच्या गरजा भागतील अशी अपेक्षा होती. नियोजन मंडळाच्या 'प्रकल्प मूल्यमापन' यंत्रणेने अलिकडेच केलेल्या एका अभ्यासावरून दिसून येते की या योजनांचा प्रमुख, महत्त्वाचा घटक असलेल्या शेतीच्या लागवडीचा फायदा हा केवळ बड्या शेतकऱ्यांनाच झाला आहे. एकूण जवळजवळ अर्धेअधिक लाभधारक हे केवळ दोन राज्यांतील आहेत. प्रत्येकाला ५०० ते १००० पर्यंत रोपटी मिळाली, यावरूनच त्यांच्या ताब्यात असलेल्या जमिनीच्या प्रमाणाची कल्पना येते. त्याआधी असे सांगण्यात आले होते की हरियाना व गुजरात या राज्यांत, प्रत्येक १० लाभधारकांपैकी ६ जणांकडे २ हजार हेक्टरपेक्षा अधिक जमीन होती. केवळ प. बंगालमध्येच

नव्या शेतीचा फायदा गरीब शेतकऱ्यांना झाला. बडे लाभधारक रेयॉन आणि तत्सम, अन्य उद्योगांना कच्चामाल म्हणून पुरविल्या जाणाऱ्या व झटपट वाढणाऱ्या निलगिरीसारख्या वनस्पतीच्या लागवडीवरच भर देतात. शिवाय सामाजिक वनीकरणाच्या या योजना योग्य अशा जातीच्या उत्पादनाकडे लक्ष देत नाहीत. उदा. त्या जळाऊ लाकडाच्या गरजेचे तुणतुणे वाजवत रहातात व चराऊ कडब्याकडे दुर्लक्ष करतात. वस्तुत: गुजरात, राजस्थान यांसारख्या प्रदेशांत लागोपाठ येणाऱ्या दुष्काळी हंगामामुळे चराऊ कडब्याचे पराकोटीचे दुर्भिक्ष असते आणि ही समस्या उत्तरोत्तर तीव्र होत आहे. कारण जमिनीच्या मोठमोठ्या पट्ट्यांचे पडीक जमिनीत रूपांतर होत चालले आहे.

यासंबंधातील अलिकडील जागृती

आधुनिक भारतात पर्यावरणासंबंधीची जागरुकता अलिकडेच निर्माण होऊ लागली आहे. चिपको आंदोलन, सायलेंट व्हॅली मूव्हमेंट अशांसारखी, समाजाच्या सतर्कतेची निकोप लक्षणें दिसत आहेत. पण तरीही दुर्दैवाने विकासवादी आणि पर्यावरणवादी यांच्यातील संघर्ष भडकू पहात आहे.

परिणामत: वनीकरणाच्या समस्येबाबतही एकमत होऊ शकत नाही आणि जंगलाच्या ८% पर्यंत झालेल्या खच्चीकरणामुळे आपल्या लक्षावधी वनवासींचे जीवन अतिशय दयनीय करून टाकले आहे. वस्तुत: वनीकरणामुळे हवेतील सार्द्रता कायम ठेवली जाते, हवेचे शुद्धीकरण होते, जमिनीची धूप टळते आणि जैविक पर्यावरणाचे संतुलन होते. वनवासींना वन्य उत्पदनांचा लाभ मिळणे आणि आजुबाजूच्या खेड्यांतील लोकांना लाकुडफाटा आणि इतर दैनंदिन गरजेच्या गोष्टी मिळणे असे अनेक लाभ मिळू शकतात. पण या उपक्रमालाही विरोध होत आहे. (सध्या ३३% जमिनीवर वनीकरण करण्याची भाषा आहे.)

भारतासारख्या अविकसित देशात पश्चिमी विकासकल्पना राबवण्याचा जो जबरदस्त हव्यास दिसतो त्यातून पश्चिमी तंत्रविज्ञान आयात करण्यात येते व त्यामुळे विकासाच्या सर्व अंगांमध्ये विशेषत: एकूणच सामाजिक, आर्थिक जीवनात कशी व्यस्तता येते हे या सर्व संदर्भांवरून स्पष्ट होते.

पश्चिमी नमुन्याची पश्चिमेतही असफलता

पण या सर्वांपेक्षाही महत्त्वाची गोष्ट लक्षात येते ती वेगळीच ! मागे अनेक असामान्य पश्चिमी मान्यवरांच्या बौद्धिक कारागिरीतून विकसित झालेला पश्चिमी नमुना व तदानुषंगिक व्यवस्था यांचा उल्लेख केलेला आहे. पण हा नमुना व त्यातून निर्माण झालेल्या व्यवस्था या विकसित देशांचे बहुवांछित उद्दिष्ट प्राप्त करून घेण्यात त्यांना तरी साहाय्यकारी ठरल्या आहेत की नाही अशी शंका यावी अशी परिस्थिती दिसते.

आज पश्चिमेमध्येच या विकास नमुन्याबद्दल वाढती संशयात्म भावना आहे.

अमेरिकेसारख्या देशातच ही व्यवस्था अपयशी ठरल्याची चिन्हे दिसत आहेत. अमेरिकेची सुमारे १२० शतकोटी डॉलर्सची तूट भरून काढण्यासाठी अमेरिका टोकियोतील जपानी गुंतवणुकदारांवर अवलंबून आहे (हा उल्लेख १९९२ सालचा आहे.) हे आपल्या देशातील बऱ्याच जणांना माहित नसेल. अमेरिकेच्या आर्थिक सामर्थ्याच्या ऱ्हासाच्या १९६० सालापासूनच सुरू झालेल्या गतिमान प्रक्रियेबद्दल पूर्वी उल्लेख आलेला आहे व अमेरिकेचे आर्थिक वर्चस्व पुढील शतकाच्या आरंभीच संपेल हे लिंडरसारख्या विचारवंताने वर्तविलेले अनुमानही मागे पाहिले आहे.

पश्चिमी विचारातील मर्यादा पृष्ठभागावर

याचे कारण, पश्चिमी विचारातील अंगभूत मर्यादा आता पृष्ठभागावर येऊ लागल्या आहेत. मूलतः इहवादी असल्यामुळे पाश्चिमात्यांना भौतिक व अभौतिक या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत व केवळ ऐहिक बाजूवर भर दिल्याने व्यक्तीच्या व समाजाच्या जीवनात असंतुलन होते हे समजू शकले नाहीं.

त्यामुळे पश्चिमी चिंतन हे नेहेमी 'हे किंवा ते' (either - or - ism) अशा परस्परव्यावर्तक विचारांवर आधारलेले असेच राहिले आहे. हिंदू जीवनदृष्टीप्रमाणे ते, 'हे आणि ते' (as - well - as - ism) अशा समावेशक, संतुलित धारणेवर ते उभे नाही.

त्यामुळे हे साहजिकच आहे की पाश्चिमात्यांच्या सर्व चलनवलनाचा व विनियमाचा केन्द्रबिंदू विकास हाच राहिला तरी त्यांची दृष्टी एकांगी व धूसर असल्यामुळे विकासाच्या कल्पनेची परिणती फार मोठ्या असंतुलनात झाली आहे.

पश्चिमी विचारवंतांची साशंकता

त्यादृष्टीने काही विचारवंतांनी व्यक्त केलेली मते चिंतनीय आहेत. जे. हिक्स या नोबेल विजेत्याने अशी कबुली दिली आहे की 'भविष्यातील वेध घेणाऱ्या गुणधर्माचा पश्चिमेतील आर्थिक चिंतनात अभाव आहे व त्यामुळे अशा भविष्यवेत्या विशेषांचा अभ्यास करण्यास आपण असमर्थ आहोत.' सॅम्युआलसन हा या विचाराशी सहमत आहे. त्याच्यामते अमेरिकी अर्थशास्त्रज्ञ हे 'ठेवलेले अर्थशास्त्रज्ञ' (शासनाचे आश्रयार्थी) आहेत. वर्तमान आर्थिक चिंतनातील अगतिकता ही डॅनियल बेल यांनी संपादित केलेल्या, *Crisis in Economic Theory* या ग्रंथात व्यक्त झाली आहे. त्याचप्रमाणे मध्यमवर्गीय अर्थशास्त्रातील अनुल्लंघनीय अधुपणाही स्पष्ट झाला आहे.

The Fiscal Revolution in America या पुस्तकाचा लेखक हर्बर्ट स्टेन याच्या म्हणण्याप्रमाणे –

'प्रदीर्घ काळ घोळल्यानंतर आणि उपलब्ध सर्व चाचण्यांमधून गेल्यानंतरच

अर्थशास्त्रातील प्रमेयांना विश्वासार्हता प्राप्त होऊ शकते.'

(Ideas in economics deserve confidence only after they have been chewed over a long time and been exposed to whatever tests may be available)

स्टिफन ओ झमानी (Stefan o Zamagni) याने म्हटले आहे –

'अर्थशास्त्रज्ञ आपले अंदाज बांधू शकतील असा स्वाभाविक अर्थाने शास्त्रीय असलेला कोणताही नियम अर्थशास्त्रात सिद्ध केलेला नसतो. त्यामुळे स्पष्टीकरण देणे वा अंदाज बांधणे यासाठी आपल्याला केवळ अनुभवजन्य वा ऐतिहासिक अशा स्थूल, सर्वसाधारण प्रमेयांतून व्यक्त होणाऱ्या प्रवृत्ती अथवा नमुने यांचा वापर करावा लागतो आणि अशांना सार्वत्रिक, निरपवाद सत्यताही नसते आणि ते ऐहिक आणि स्थानिक मर्यादांनी बांधलेलेही असते.'

(Since no scientific law, in the natural scientific sense, has been established in economics on which economists can base predictions, ...what are used to explain or to predict are tendencies or patterns expressed in empirical or historical generalisations of less than universal validity, restricted by local and temporal limits.)

The Wealth of Nation या ग्रंथाने भांडवलवादाच्या भरभराटीच्या जाणिवेचे नवे पर्व दाखविले होते आणि आता, याच भांडवलवादाचा अलिकडच्या काळातील बिनीचा तारणहार जॉन मेनार्ड केन्स याला असे म्हणावेसे वाटत आहे –

'(पहिल्या) महायुद्धानंतर आपण ज्याच्या कह्यात गेलो तो उतरत्या कळेचा आंतरराष्ट्रीय पण व्यक्तिवादी भांडवलवाद यशस्वी झालेला नाही. तो बुद्धिवंत नाही, न्याय्यही नाही आणि तो अपेक्षित फळही देत नाही. थोडक्यात म्हणजे आम्हाला तो अप्रिय आहे आणि आता आम्ही त्याचा तिरस्कार करू लागलो आहोत.'

(The decadent international but individualist capitalism in the hands of which we found ourselves after the [first world] war is not a success. It is not intelligent, it is not just, it is not virtuous and it does not deliver the goods. In short, we dislike it and we are beginning to despise it)

वॉशिंग्टनचा अर्थशास्त्रज्ञ या नात्याने आपल्या ५० वर्षांच्या कारकीर्दीतील दोन महत्त्वाचे धडे हर्बर्ट स्टेन याने *Washington Bed-Time Stories* या आपल्या अलिकडच्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत दिले आहे. –

१) अर्थशास्त्रज्ञांना फारसे काही माहित नसते.

२) अर्थनीती ठरविणाऱ्या राजकारण्यांसकट इतर लोकांना अर्थशास्त्रज्ञांपेक्षाही कमी जाण असते.

भांडवलवादी अर्थशास्त्राच्या सध्याच्या दुरवस्थेबद्दल केवढे हे विषण्ण भाष्य !

अशा सर्व परिस्थितीमुळेच, राज्यशास्त्र नावाचे काही शास्त्र असेलच तर तेही अर्थशास्त्रज्ञांना काही मार्गदर्शन करू शकते याबद्दल आपल्याला खात्री देता येत नाही.

म्हणूनच *Wall Street Journel* ने शताब्दीप्रसंगी प्रश्न केला आहे– 'इ.स. २००५ साली अमेरिकेची भावी पिढी तिच्या वडिलधाऱ्यांपेक्षा सुस्थितीत असेल का?'

आणि पुढे म्हटले आहे.

'अगदी कालपरवापर्यंत असा प्रश्न विचारणे बाष्फळपणाचे वाटले असते. भवितव्याच्या आश्वासनावरील श्रद्धा ही अमेरिकी व्यक्तिमत्त्वाला, लोकशाहीसाठी मूलभूत असलेल्या बिल ऑफ राइट्स येवढीच मूलभूत वाटत आली आहे. पण आज ती श्रद्धाच कसाला लागली आहे.'

(Will America's children be better off in 2005 than their parents are now?'

...Not long ago, just to ask that question would have been heresy. Faith in the promise of the future is as fundamental to the American charachter as the Bill of Rights is to its democracy. But now that faith is being tested.)

याप्रमाणे भांडवली व्यवस्था व पश्चिमी प्रणाली यांच्या मर्यादांबद्दलचे पश्चिमी विचारवंतांचेच अलिकडचे चिंतन पाहिल्यावर लक्षात येते की हाताशी सर्वोत्तम बुद्धिमत्ता असूनही भांडवलवाद हा हरणारी लढाईच लढत आहे, हे या बुद्धिवंतांनाही जाणवले आहे.

त्यामुळेच आंतरराष्ट्रीय आर्थिक साम्राज्याचा पश्चिमी सत्तांचा दावा म्हणजे खरे पाहता भांडवलवादी अर्थव्यवस्थेची अस्तित्वासाठी चाललेली अगतिक, केविलवाणी धडपड आहे आणि शेवटी त्याची तार्किक परिणती तिसऱ्या जगाच्या विलयामध्ये आणि सरतेशेवटी संपूर्ण मानवजातीच्या विध्वंसामध्ये होणार आहे. पण या व्यवस्थेतील आंतरिक आत्मविसंगती तिला इतक्या टोकापर्यंत जाऊ देणार नाहीत. त्यापूर्वीच तिचा विनाश झालेला असेल. अगदी भांडवलवादाच्या पक्षपाती अशा आत्यंतिक आशावादी अंदाजाप्रमाणेसुद्धा ही व्यवस्था दोन दशकांपेक्षा अधिक टिकणार नाही.

ज्ञानशक्तीच्या मर्यादांचीही जाणीव

पण येवढेच नाही. या अशा दारुण भवितव्याचे कारण म्हणजे गेल्या काही दशकांमधील आंतरराष्ट्रीय वर्चस्वाच्या, आर्थिक साम्राज्याची पकड दृढ करण्याच्या प्रयत्नांमध्ये ज्या गृहीतकांचा पश्चिमी देशांनी आधार घेतला त्या गृहीतकांबद्दलही आज साशंकता निर्माण झाली आहे. पश्चिमी विचारवंतांचा याही बाबतीत होत

असलेला भ्रमनिरास आपल्याला विचार करायला लावणारा आहे.

आपण पूर्वी हे सविस्तरपणे पाहिले आहे की दुसऱ्या औद्योगिक क्रांतीनंतरच्या काळात आपले आर्थिक साम्राज्य स्थिर करण्याचा व विकसनशील, दक्षिणी राष्ट्रांवरील आपली पकड घट्ट करण्याचा प्रयत्न पश्चिमी राष्ट्रांनी केला, तो त्यांच्या ज्ञानशक्तीच्या जोरावर! आणि ही ज्ञानशक्ती आज तरी आव्हानाच्या पलीकडे आहे. पण या ज्ञानशक्तीच्या जोरावर विकसित केलेल्या अत्यंत प्रगत अशा उच्च - तंत्रवैज्ञानिक माध्यमाच्या मर्यादा आता पश्चिमेतही जाणवू लागल्या आहेत हे आता लक्षात येते आहे.

दुसऱ्या औद्योगिक क्रांतीनंतरच्या काळात आधुनिक तंत्रविज्ञानामुळे ज्ञानवंत वर्गाला म्हणजेच शास्त्रज्ञ व तंत्रविशारद यांना कळीचे स्थान प्राप्त झाले आहे. आतापर्यंत औद्योगिक समाजात तंत्रज्ञ आणि अर्धकुशल कामगार यांना हे महत्त्वाचे स्थान होते. अशा औद्योगिक समाजात आतापर्यंत 'आर्थिकदृष्ट्या आहेरे व नाहीरे' असे दोन वर्ग होते. आताच्या या दुसऱ्या औद्योगिक क्रांतीनंतरच्या समाजात 'ज्ञानदृष्ट्या आहेरे व नाहीरे' वर्ग निर्माण झालेले दिसतात. शिक्षण अथवा ज्ञानोद्योग हा तंत्रविज्ञानाच्या दृष्टीने प्रगत अशा देशांतील एकच एक सर्वात मोठा उद्योग ठरला आहे. अशा तंत्रकारागिरांत संगणक, दूरचित्रवाणी, स्वयंचलित वाहने, जहाजबांधणी, विमानउद्योग इ. साठी संगणन - रेखांकन करणारे आणि नमुने तयार करणारे व दुरुस्ती करणारे मोडतात.

या नव्या औद्योगिक समाजाचा एक महत्त्वाचा विशेष म्हणजे पूर्वीप्रमाणे उद्योजक, व्यापारी अथवा औद्योगिक अधिकारी यांना महत्त्व रहाणार नाही. तर शास्त्रज्ञ, गणितज्ञ, अर्थविशारद, समाजशास्त्रज्ञ व संगणकाद्वारा नवीन बौद्धिक तंत्रविज्ञान राबवणारे असेच लोक प्रमुख असतील.

अशाप्रकारे तंत्रवैज्ञानिक क्रांतीमुळे समाजरचनेतील विविध वर्गाचे स्वरूप व त्यांचे नाते कसे बदलते आहे हे अमेरिकेच्या उदाहरणावरून स्पष्ट होते. आज अमेरिकेत शारीरश्रमाची कामे करणाऱ्या अथवा निळ्या गळपट्टीच्या कामगारांचे प्रमाण एकूण कामगार संख्येच्या १/३ असे आहे. (युरोपीय औद्योगिक समाजात ते १/२असे आहे) आणि संगणकाच्या वापराचे प्रमाण बेलगाम वाढले तर इ.स. २००० पर्यंत अशा कामगारांची संख्या दरवर्षी ५ लाखांनी घटेल व त्यावेळी ते एकूण श्रमशक्तीच्या १०% पर्यंत खाली आलेले असेल. जे उत्पादन करायला अमेरिकेत १ कामगार पुरतो, त्यालाच ब्रिटनमध्ये आज साधारणत: अडीच कामगार लागतात. काही एका चमत्काराने समजा ब्रिटनने अमेरिकेची सध्याची क्षमता गाठली तर ब्रिटनमधील उत्पादक कामगारांची संख्या एकदम २०% नी कमी होईल.

अशाप्रकारे प्रत्येक नव्या शोधाचा समाजजीवनावर, समाजरचनेवर परिणाम होतच असतो. उदा. जर प्रजननशास्त्रावर नव्या तंत्रविज्ञानाचे पूर्ण नियंत्रण प्रस्थापित झाले

तर समाजातील प्रत्येक व्यक्तीवर तुमचे नियंत्रण प्रस्थापित होईल. अशा स्थितीत समाजातील मूल्यश्रेणी कोणती असेल ? जर मूल परीक्षानलिकेतच जन्म घेणार असेल आणि अपत्यसंभवासाठी पतिपत्नींना एकत्र असे फारसे कर्तव्य उरलेच नसेल तर मग त्यांच्या परस्परसंबंधांचे स्वरूप काय असेल? आणि कुटुंबसंस्थेचे भवितव्य काय ? त्याचप्रमाणे प्रजननशास्त्राने दावा केला आहे की सुमारे इ.स. २०४० पर्यंत पाहिजे त्या गुणधर्माचा माणूस जन्माला घालण्याची शक्यता निर्माण होईल[६]: समजा तसे प्रत्यक्षात झालेच तर याची खात्री देता येईल का की हे प्रजननशास्त्र केवळ भगवान बुद्ध, प्रभू येशू अथवा म. गांधीच निर्माण करील आणि अटिल्ला, चंगीजखान किंवा स्टॅलिन निर्माण करणारच नाही ? नोबेल पुरस्काराच्या अथवा व्यक्तिगत प्राविण्याच्या मोहात पडून मानवी कल्याणाबाबत बेपर्वा असलेला शास्त्रज्ञ कदाचित दुनियेतील यच्चयावत जीवनाला व मानववंशाला घातक ठरणारा आणि विनाशाचा जणू शिल्पकारच असा फ्रँकेस्टिनही[७] निर्माण करील. शास्त्रावर प्रभुत्व असणे हीच केवळ जगत्कल्याणाची, मानवतावादी कदर असण्याची कोणत्याही प्रकारे ग्वाही ठरू शकत नाही.

तेव्हा ज्ञानशक्ती हे नेहमीच दुधारी शस्त्र असते, ही ज्ञानशक्तीची अंगभूत मर्यादा आहे. सुसंस्कृत अर्जुनाच्या हातातील अत्यंत अमोघ असे पशुपतास्त्र हा मानवजातीला अजिबात धोका नव्हता पण तुलनेने कमी प्रभावी असलेल्या ब्रह्मास्त्राने अश्वत्थाम्याने मात्र वंश-उच्छेद केला. नागासाकी आणि हिरोशिमानंतर विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या बेलगाम आणि दिशाहीन आक्रमाच्या इष्टतेबद्दल मानवतावादी शास्त्रज्ञांमध्ये वाढती साशंकता आहे.

भौतिक विकास संकल्पनेच्या अनुषंगाने तंत्रविज्ञानाचे उपयोजन करताना नीती-अनीतीचा विचार बाजूला ठेवल्यानेच या ज्ञानशक्तीच्या मर्यादा जाणवू लागल्या आहेत.

आधुनिक तंत्रविज्ञान व पर्यावरण

अर्थशास्त्र व आनुषंगिक विकाससंकल्पना यांची नैतिकतेपासून फारकत करूनच या नवीन तंत्रविज्ञानाचा अवलंब केला जात असल्यामुळे पर्यावरणात्मक समस्याही जटील बनल्या आहेत.

आधुनिक पश्चिमी विकासनमुन्याच्या हव्यासामुळे निर्माण झालेल्या आपल्या देशातील पर्यावरणविषयक एकूण वातावरणाचा व मानसिकतेचा काही संदर्भ पूर्वीच येऊन गेला आहे.

आधुनिक कार्टेसिअन[८] 'प्रणालीने माणसाला निसर्गाविरुद्ध उभे केले. जणू काही मानव हा निसर्गाचा भागच नव्हे. आता निसर्गसंपत्ती मर्यादित व मानवी इच्छा अमर्याद आहेत आणि ही प्रणाली माणसाच्या सदैव वाढत जाणाऱ्या भुकांच्या तृप्तीसाठी निसर्गाच्या निर्घृण विध्वंसाला मोकळे रान देते. परिणामतः नैसर्गिक संपत्तीची काळजी

वाटावी असा विलय होत राहिला आहे आणि पर्यावरणात्मक रचनेमध्ये गंभीर उत्पात घडवून सचेतनाच्या सर्व नमुन्यांचे जीवन उत्तरोत्तर अधिकाधिक धोक्यात आणण्यात येत आहे.

सर्वसाधारणपणे हे मान्य झाले आहे की औद्योगीकरणाने जमीन, पाणी, हवा ही सर्व नैसर्गिक संपत्ती प्रदूषित केलेली आहे आणि निसर्गाचे संयत दोहन करण्याऐवजी निसर्गावर अत्याचार केलेले आहेत. कारण आधुनिक पद्धती ही पुनर्नूतनीकरण होऊ न शकणाऱ्या कच्च्या मालाचा व ऊर्जास्रोताचा अनिर्बंध खर्च करते आणि त्यातून हवा व पाणी यांचे प्रदूषण होते.

साधारणत: जैविक परिघातील समाजाच्या प्राणवायूच्या गरजेपेक्षा तंत्रवैज्ञानिक परिघातील औद्योगिक समाजाची प्राणवायूची गरज १५ पटींनी अधिक असते. पण जगातील उत्तरेतील १/५ भागातील (प्राधान्याने तंत्रवैज्ञानिक परिघातील विकसित देशांमधील) माणशी प्रदूषणाचे प्रमाण उर्वरित ४/५ भागातील माणशी प्रमाणाच्या ५० पट आहे आणि अविकसित राष्ट्रांच्या पूर्ण औद्योगीकरणाने जगातील प्रदूषणाचे प्रमाण अशा तऱ्हेने वाढेल की एकूण लोकसंख्येचा फार मोठा भाग जगाच्या पाठीवरून पुसला जाईल.

कारण पुन्हा वापरता येऊ शकणाऱ्या ऊर्जास्रोताचा व कच्च्या मालाचा उत्तरोत्तर वाढता वापर हा या आधुनिक उत्पादनव्यवस्थेत बसतच नाही. स्थानिक जनतेतील तंत्रविषयक आणि व्यवस्थापनात्मक कौशल्यांचा वापर करून, स्थानिक गरजा भागविणारे, त्या त्या परिसरातील वैशिष्ट्याला अनुलक्षून असे विशेष तंत्रविज्ञान विकसित करण्याच्या ऊर्मीवर ही आधुनिक पद्धती विरजण घालते.

त्यामुळे विकसनशील देश जर विकसित देशांच्या पातळीला आले तर जगातील काही कळीचे धातू व खनिजे, कोळसा, तेल व नैसर्गिक वायू यांचे साठे पुढील १०० वर्षांत पूर्णपणे संपतील. अर्थात काही दिवस डोंगरातून व समुद्रातून उपलब्ध होणाऱ्या युरेनियमवर भागू शकेल.

कच्च्या मालाच्या नि:शेषाच्या या शक्यतेमुळे तंत्रविज्ञानाच्या क्षमतेवर स्वाभाविक बंधने येतील.

जरी अमेरिकेने १८९० मध्येच या समस्येची दखल घेणारा कायदा पारित केला असला तरी वाढत्या उपभोक्तावादाच्या लाटेमध्ये ही प्रारंभीची जाणीव केव्हाच वाहून गेली आहे याचा उल्लेख मागे केला आहेच.

उच्च-तांत्रिकी औद्योगीकरणाच्या प्रदीर्घ अनुभवांतून आता काही पश्चिमी विचारवंतांनी निष्कर्ष काढायला प्रारंभ केला आहे की पश्चिमी तंत्रविज्ञान हे पर्यावरण विघातक आणि सामाजिकदृष्ट्या विघटनकारी आहे. ते तसे आहे, कारण त्याचे एकच एक साध्य आहे, ते म्हणजे औद्योगीकरण!

केवळ भूमी, पाणी, हवा यांच्या प्रदूषणाशिवाय आवाज आणि किरणोत्सर्ग यांचे

पर्यावरणात्मक प्रदूषणही सतत वाढतच आहे.

व्हिएन्नामधील Atomic Energy Agency च्या १९८८ च्या वार्षिक आढाव्यावरून आणि आण्विक सुरक्षाविषयक निरीक्षणावरून असे लक्षात येते की ५००० पेक्षा जास्त आण्विक प्रतिबंधक यंत्रणा, आण्विक शक्तीसंदर्भातील अनेकविध आणि पुष्कळच प्रमाणातील समाधानकारक सामाजिक सुरक्षा व्यवस्था, हे सर्व गाठी असूनसुद्धा, 'आण्विकशक्ती अतिशय धोकादायक आहे' ही मानवी समाजातील काळजी व्यापक प्रमाणात कायमच आहे.

विकसित देशांची दादागिरी

पण तरीही अजून विकसित देश व त्यांचे नेतृत्व आपल्या चुकांपासून काही शिकावयाच्या मनस्थितीत नाहीत, हे रिओ येथील पर्यावरणविषयक परिषदेत पुरेसे स्पष्ट झाले आहे. पर्यावरणातील संतुलन राखण्यासाठी सहकार्य करण्याची त्यांची तयारी नाही आणि ते केवळ स्वत:च्या देशांतील प्रदूषणाचे ढीग अविकसित राष्ट्रांच्या परसदारी उभे करण्याची शक्यता आहे, ही आधीची भीती खरीच होती हे या परिषदेत त्यांनी घेतलेल्या भूमिकेवरून सिद्धच झाले आहे. या परिषदेत विकसित देशांच्या आजवरच्या पापांची किंमत ही 'स्वत:च्या आस्तित्वाचा पूर्ण लय होण्याचा धोका पत्करूनही विकसनशील देशांनी चुकवावी', अशी आदेशवजा सूचना आत्यंतिक बेपर्वा अशा निलाजरेपणाने अमेरिकेने त्यांना केली.

सर्व जगाच्याच विनाशाची भीती

पण ही त्यांची नीती जागतिक पर्यावरणात्मक विनाश फार काळ थांबवू शकणार नाही आणि या विनाशात उत्तरी विकसित राष्ट्रेही बळी जाणार आहेत. हे एकात्म जग आहे आणि विपरीतता कुठेही असली तरी आज ना उद्या सर्वच ठिकाणच्या स्वास्थ्य-समृद्धीचा घास ती घेणारच!

पश्चिमी तंत्रविज्ञानाचा पुनर्विचार

म्हणूनच अत्याधुनिक तंत्रविज्ञानावर आधारलेल्या पश्चिमी विकाससंकल्पनेचाही पुनर्विचार तेथील शास्त्रज्ञ व विचारवंत यांनी मुळातूनच सुरू केला आहे.

खास पश्चिमी विकासनमुन्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या तथाकथित विकसित राष्ट्रांचे तरी भवितव्य काय आहे, हे या विचारवंतांच्या या संबंधीच्या भाष्यांवरून ध्यानात येते.

कोणत्याही प्रकारचे सामाजिक निर्देशक, विज्ञान व तंत्रविज्ञान यांच्यावरील सामाजिक अंकुश किंवा भविष्याचे लांबपल्ल्याचे असे मानचित्र या सर्वांच्या अभावामुळे हे देश त्यांनाही अज्ञात असलेल्या गंतव्याकडे सुसाट वेगाने जात आहेत. एक प्रख्यात विचारवंत म्हणतो -

'परिवर्तन हे खरे तर जीवनच आहे. (पण विज्ञान व तंत्रविज्ञान यांच्या अविवेकी उपयोजनामुळे) होणारा भयकारी, दिशाहीन, बेलगाम बदल हा जीवनाचा शत्रूच ठरेल. कारण तो माणसाच्या केवळ शारीरिक बचावासाठी वापरता येणाऱ्या प्रतिकारशक्तीवरच नव्हे तर त्याच्या निर्णय प्रक्रियेवरही आघात करीत आहे.'

(...Change is life itself; but change rampant, change unguided, change unrestrained, accelereted change, overwhelming not man's physical defences but his decisional processes - such change is the enemy of life.')

राल्फ लॅप या अमेरिकी शास्त्रज्ञाची अशा मोठ्या वेगवान प्रगतीबद्दलची प्रतिक्रियाही मोठी लक्षात घेण्यासारखी आहे.

'विज्ञान आपल्याला कुठे घेऊन जाणार आहे हे हयात असलेल्या सर्वात कुशाग्र बुद्धिमत्तेच्या कोणाही शास्त्रज्ञालासुद्धा माहीत नाही. अत्यंत गतिमानतेने मार्गक्रमण करणाऱ्या अशा एखाद्या आगगाडीत आपण सर्वजण बसलेले आहोत आणि तिला अज्ञात गंतव्याकडे घेऊन जाणाऱ्या असंख्य कळा आहेत. चालकाच्या स्थानावर एकही शास्त्रज्ञ नाही आणि नियंत्रणाच्या कळांवर बहुधा राक्षसांचे हात आहेत. बहुतेक समाज डब्यांमध्ये, मागे बघत बसलेला आहे.'

(No one, not even the most brilliant scientist alive today, really knows where science is taking us. We are aboard a train which is gathering speed and racing down the track on which there are an unknown number of switches leading to unknown destination. No single scientist is in the engine cab. There may be demons at the switches. Most of society is in the cupboards looking backwards.)

दुसऱ्या एका शास्त्रज्ञाच्या मते केवळ प्रगतीचा प्रकार आणि आवाकाच नव्हे तर प्रगतीचा वेग आणि प्रमाणही महत्त्वाचे आहे. कारण प्रगतीच्या वेगाशी व प्रमाणाशी मानवजातीला जर संगती राखता आली नाही तर त्या वेगामुळे मानवजातीची दमछाक होईल. या नव्या आव्हानांना तोंड कसे देणार ?

आणि मिचिगन विद्यापीठातील जैविक-विज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. लोरो ऑगस्टीन यांनी आपल्या *Let Us Play God* या पुस्तकात म्हटले आहे.

'शास्त्र हे बेबंध, अनावर गतीने पुढे जात आहे, पण त्याद्वारा नव्याने प्राप्त झालेल्या शक्ती हाताळण्याची आमची क्षमता बहुतेक वेळा त्या गतीशी संगती राखू शकत नाही. विज्ञान आणि तंत्रविज्ञानाच्या अनेक क्षेत्रांतील प्रगती ही वाढत्या प्रमाणात आमच्यासमोर कर्तव्यविषयक व नैतिक दुविधा उभ्या करीत आहे आणि केवळ वस्तुगत सत्याच्या आधारावर त्यातून मार्ग काढता येत नसतो.'

(Science marches on, fast and furious. But all too often our

ability to handle our new-found powers does not keep pace. Increasingly the advance being made in many areas of science and technology pose ethical and moral dilemmas which cannot be solved by facts alone.)

या पश्चिमी देशांना दूरवरच्या दिशा व काल यांच्यावरील, नव्या तंत्रविज्ञानाच्या थेट वा अप्रत्यक्ष परिणामांचा काही अंदाज आला आहे का? काही प्रमाणात तो येऊ लागला आहे. या नव्या तंत्रविज्ञानाच्या मर्यादा आणि ऋणविशेष यांची प्रगत देशांना जाणीवच नाही असे नाही. उदा. १९७१ मध्ये Supersonic Transport या ध्वनिगतिपार वेग असलेल्या विमानसेवांच्या उड्डाणांवर अमेरिकी काँग्रेसने बंदी घातली होती. तंत्रविज्ञानातील प्रगतीला विधिमंडळाने प्रतिबंध केल्याची ही पहिलीच ऐतिहासिक घटना होती.

पाश्चिमात्यांनाही जाणवले आहे की ज्याप्रमाणे केवळ लेखणी ही कविता लिहू शकत नाही वा क्रिकेटचा चेंडू स्वत: कोणाला बाद करू शकत नाही, त्याचप्रमाणे त्याच्या त्याच्यावर सोपवले तर संगणकही काही स्वत: प्रश्न सोडवू शकत नाही. संगणक हे साधन आहे. तो हरकाम्या नाही, तो केवळ विक्षिप्तही नाही तर मज्जारहित आहे. संगणक हा निसर्गाचा नवा नियम शोधून काढू शकत नाही. तो त्या नियमाचा वापर करू शकतो. उपयोजन करणाऱ्या संयोजकाच्या चांगले-वाईटपणावरच संगणकाचा बरे-वाईटपणा अवलंबून आहे. जागतिक बाजारपेठेतील १९ ऑक्टो. १९८७ चा समभागासंबंधीचा गोंधळ हा संगणकाच्या अशा वापरामुळेच झाला. किंमती कमी झाल्याबरोबर संगणकाने समभागांची विक्री केली. त्यामुळे किंमती आणखी खाली आल्या. समभाग विकले जात होते म्हणून किंमती खाली येत राहिल्या व किंमत खाली येत राहिल्या म्हणून संगणक समभाग विकत राहिला.

तेव्हा 'आव्हानाच्या पलीकडील ज्ञानशक्ती,' हा स्वत:चे आर्थिक वर्चस्व निर्माण करण्याचा पश्चिमी देशांचा जो मुख्य आधार त्याच्याच (ज्ञानशक्तीच्या) मर्यादा तिकडे जाणवू लागल्या आहेत हे त्या विचारवंतांच्या चिंतनावरून लक्षात येते.

आपल्याला २१ व्या शतकाकडे घेऊन जाणाऱ्या आश्चर्यकारक बदलांचा, मागील २५ वर्षांपेक्षा जास्त कालावधीवर अभ्यास करण्याचा प्रयत्न करताना ऑल्विन टॉफ्लरने त्रिखंडात्मक ग्रंथ निर्माण केला आहे. *Future Shock* (प्रसिद्धी १९७० मधील) हा ग्रंथ, एकूणच होत असलेल्या बदलांचे, परिवर्तनप्रक्रियेचे समाज व संस्था यांच्यावर काय परिणाम होत आहेत त्यांचे निरीक्षण करणारा पहिला ग्रंथ होय. *The Third Wave* हा ग्रंथ परिवर्तनाच्या दिशेवर लक्ष केंद्रित करणारा, आपल्याला हे बदल कुठे घेऊन जाणार आहेत याचा वेध घेणारा ग्रंथ आहे आणि *Power Shift* हा तिसरा ग्रंथ, येऊ पाहणाऱ्या बदलांचे नियमन करणाऱ्या शक्तीबद्दलचा, हे बदल कोण व कसे घडवून आणील हे सांगणारा ग्रंथ आहे.

आपल्या *Future Shock* या ग्रंथात टॉफ्लरने तंत्रविज्ञानावरील सामाजिक नियंत्रणाची

बाजू मांडली आहे. नियोजनाचा विचार करताना सामाजिक गमके महत्त्वाची मानले पाहिजेत. म्हणूनच 'तंत्रविज्ञानाची प्रक्रिया कशी आहे?' म्हणजेच अपेक्षित गोष्ट सिद्ध कशी करावयाची (Technical knowhow) हा प्रश्न व त्याचे उत्तर गौण ठरते. त्याऐवजी 'कोणते हेतू पाठपुरावा करण्यायोग्य आहेत' हे सांगू शकणाऱ्या 'नेमके कोणते तंत्रज्ञान?' (Technical know what) या प्रश्नाचे उत्तर प्राथमिक महत्त्वाचे मानले पाहिजे. त्या दृष्टीने तंत्रवैज्ञानिकांच्या कार्याच्या हेतूचे दिग्दर्शन-मार्गदर्शन करण्यासाठी व तंत्रज्ञानावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि त्यासंदर्भातील सार्वजनिक अधिकाऱ्यांच्या गैरवर्तनाची चिकित्सा करण्यासाठी 'तंत्रवैज्ञानिक लवाद' (technological ombudsman) संस्था अस्तित्वात आली पाहिजे, असा त्याचा आग्रह आहे. अर्थातच ही संस्था, मानवतावादी दृष्टी असलेल्या सुसंस्कृत व्यक्तींमधून गठित व्हावी. कारण, त्याच्या मते राजकारणी, शासनकर्ते, तंत्रविशारद आणि शास्त्रज्ञ हे सारे ऱ्हस्वदृष्टी असतात. तात्कालिक उपयोगाच्या गोष्टींचा अवलंब करण्याची त्यांची वृत्ती असते. दूरवरच्या भविष्यावर आणि प्रदीर्घ परिसरावर होणाऱ्या दूरगामी परिणामांचा विचार करावयाला त्यांना क्षणभरही उसंत नसते. पण त्यामुळे शेवटी मानवजातीलाच त्याचे भोग भोगावे लागतील. टॉफ्लर आवर्जून म्हणतो की आमचे शास्त्रज्ञ व तंत्रज्ञ हे केवळ शास्त्रज्ञ व तंत्रज्ञ नसावेत. त्यांना माणूसही बनविले पाहिजे.

त्याच्या मते शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ यांच्या वर्तमान नियोजनात तीन प्रकारचे दोष आहेत. १) या नियोजनाचा सर्व भर अर्थकेंद्रित आहे. २) ते ऱ्हस्वदृष्टी आहे. ३) कोणत्या प्रकारच्या भविष्याची आकांक्षा जनमानसात आहे याचा विचार न करताच ते केलेले असल्यामुळे ते लोकशाहीविरोधी आहे आणि म्हणूनच दूरवरच्या काळावर व व्यापक परिसरावर होणाऱ्या तंत्रविज्ञानाच्या परिणामांचा आधीच अंदाज घ्यावा या मताचा त्याने पुरस्कार केला आहे.

ऑल्विन टॉफ्लरने विचारपूर्वक काढलेले एकूण सार असे -

'आपण अशा काळात जगत आहोत की सर्व जग बांधून ठेवणाऱ्या सत्तेची चौकटच विघटित होत आहे आणि मूलत:च भिन्न अशा प्रकारच्या सत्तेचा आकृतिबंध आकार घेत आहे आणि मानवी समाजाच्या प्रत्येक पातळीवर हे घडत आहे. सत्ता ही केवळ सामूहिक जीवनाच्या शिखरावरच बदलते आहे असे नाही. ज्यावेळी जागतिक सत्तेची रचना विघटित होत आहे त्यावेळीच व्यवसाय व दैनंदिन जीवन यांच्यांमधील जुन्या अधिकारांना गेलेला तडाही क्षणोक्षणी रुंदावत आहे. भूकंपाआधी उचलल्या जाणाऱ्या व चुरडल्या जाणाऱ्या भूगर्भातील प्रस्तरांच्या थरांप्रमाणे (Tectonic)[९] सत्तेच्या संबंधांच्या होणाऱ्या व्यापक पुनर्रचनेतून मानवी इतिहासातील एक अभूतपूर्व घटना जन्माला येईल. ती म्हणजे सत्तेच्या मूळ स्वरूपातच होणारी क्रांती! सत्तेचे हे स्थित्यंतर म्हणजे केवळ सत्तेचे स्थानांतर नव्हे. हा बदल प्रत्यक्ष सत्तेच्या स्वरूपातच परिवर्तन घडवून आणतो.'

('We live at a moment when the entire structure of power that held world together is now disintegrating. A radically different structure of power is taking form. And this is happening at every level of human society. Power is not just shifting at the pinnacle of corporate life... This crackup of old-type authority and power in business and daily life is accelerating at the very moment when the globle power structures are disintegrating as well....'

'...Out of this massive restructuring of power relationships like the shifting and grinding of tectonic plates in advance of an earthquake, will come one of the rarest events in human history, a revolution in the very nature of power.

'A powershift does not merely transfer power. It transforms it.)

सोव्हिएट सत्तेच्या पतनानंतर टॉफ्लरने म्हटले आहे -

'मंदगतीने आणि काहीशा नाट्यहीनतेने जगातील दुसऱ्या महासत्तेचासुद्धा तुलनात्मक ऱ्हास झाला.'

(Slower and less dramatically, the world's other power also went into relative decline.)

अमेरिकेच्या वैश्विक सत्तेच्या लयाबद्दल इतके लिहिले गेले आहे की त्याची येथे पुनरुक्ती करण्याची गरज नाही.

आणि जपानबद्दल ?

'प्रचंड वाढीचा कालखंड, तेलाच्या समस्येचा धक्का, वायदेबाजारातील आपत्ती आणि येनची मूल्यवृद्धी या सर्व अवस्थांमधून जपान तारला गेला, कारण बँक ऑफ जपान आणि अर्थमंत्रालय या जपानी आर्थिक सत्तेच्या विराट जहाजांची मार्गदर्शक हुकमत जपानवर होती. पण आज आर्थिक व्यवस्था डळमळीत करणाऱ्या खवळलेल्या बाजारी शक्तींपुढे ही विराट जहाजेही हतबल ठरत आहेत.'

(Even those dreadnoughts of Japanese fiscal power, the Bank of Japan and the Ministry of Finance, whose controls guided Japan through the high growth period, the oil-shock, the stock market crash and the Yen rise, now find themselves impotent against the turbulent market forces destablilising the economy.')

आणि पश्चिम युरोप ?

'याहीपेक्षा लक्षणीय असे सत्तापालट पश्चिमी युरोपचा चेहरामोहरा बदलून टाकत आहेत. पश्चिमी युरोपीय राष्ट्रे एकीकडे बॉन अथवा बर्लिन आणि दुसरीकडे युरोपीय महासंघाचे केंद्र ब्रुसेल्स यांच्या कात्रीत सापडली आहेत. याही ठिकाणी सत्ता तिच्या

प्रस्थापित केंद्रापासून द्रुतगतीने दूर सरकत आहे.'

(Still more striking shifts of power are changing the face of Western Europe... The nations of Western Europe thus are caught between Bonn or Berlin on one side, and Brussels [the European Community bace] on the other. Here too, power is shifting rapidly away from its established centres.)

आणि जणू स्वत:च्या अभ्यासपूर्ण निरीक्षणाचा सारांश म्हणून टॉफ्लर म्हणतो -

'आणि तरीही संपूर्ण जगाला वेढून राहणारी सत्तेची व्यवस्था एकदमच अशाप्रकारे विखरून गेली आहे असे क्वचितच होते. त्याहीपेक्षा, सत्तेच्या खेळाचे नियमच बदलून गेले आहेत आणि सत्तेच्या प्रत्यक्ष स्वरूपातच एकदम क्रांती झाली आहे असेही मानवी इतिहासात क्वचितच घडते.'

(Yet only rarely does an entire globe-girdling system of power fly apart in this fashion. It is even rarer moment in history when all the rules of the power-game change at once and the very nature of power is revolutionised.)

साहजिकच दिसते की पश्चिमी विकासनमुना हा विकसित देशांनाही स्थिरता आणि सुरक्षितता देण्यामध्ये मोठ्या दयनीयतेने अपयशी ठरला आहे. त्यांचा विकास हा त्यांना विषवत आत्मघातकी फ्रँकेन्स्टाइन ठरला आहे.

तंत्रविज्ञानाच्या स्वयंशासिततेवर अशीच घणाघाती टीका करणाऱ्यांत अग्रेसर असा विचारवंत म्हणजे ल्युइस मम्फोर्ड हा आहे. यादृष्टीने त्याचे विशेषकरून दोन महत्त्वाचे ग्रंथ उल्लेखनीय आहेत. *The Myth of the Machine, Techniques, and Human Development* आणि *The Pentagon of Power.*

दुसरा एक मानवी-वर्तनवादी शास्त्रज्ञ बी. एफ्. स्किनर आपल्या *Beyond Freedom and Dignity* या ग्रंथात म्हणतो.

'आपल्याला आता नवीन तंत्रविज्ञान हवे आहे. मानवी वर्तनविषयक तंत्रविज्ञान! तूर्तास आपल्याजवळ असे काहीच नाही.'

(We need a new technology now, technology of human behaviour. Presently we have none.)

विज्ञान व तंत्रविज्ञान हे शुद्ध वरदान नव्हे.

तेव्हा विज्ञान व तंत्रविज्ञान यांमधील नेत्रदीपक प्रगती हे एक शुद्ध वरदान आहे असे नक्कीच म्हणता येत नाही याची पश्चिमेला वाढती तीव्र जाणीव होऊ लागली आहे. भावी पिढीच्या भवितव्याबद्दलची पूर्ण बेफिकिरी अथवा पर्यावरणात्मक घटकांबद्दलची अनास्था यामुळे होणारा निसर्गावरील अत्याचार हे आताच एक मोठे

संकट ठरले आहे. सुसंगत अशा सांस्कृतिक उन्नतीवाचून होणारी तंत्रवैज्ञानिक प्रगती ही मानवजातीच्या पूर्ण उच्छेदाकडे नेणारी प्रक्रिया आहे. डॉ. शूमाकर यांनी तर पश्चिमी तंत्रविज्ञानाबाबत असे म्हटले आहे की -

'तंत्रविज्ञानाच्या द्वारा सर्व नवे प्रश्न सुटले तरी विफलता, अव्यवस्था आणि भ्रष्टाचार यांची स्थिती कायमच राहील.'

(If all the new problems were solved by technological fixes, the state of futility, disorder and corruption would remain.)

तरीही वर्चस्ववादी धोरण

असे सगळे असूनही अत्याधुनिक तंत्रविज्ञानावर आधारलेल्या आणि विशेषत: अविकसित देशांच्या दृष्टीने घातक असलेल्या विकासनमुन्याच्या जोरावर पश्चिमी राष्ट्रे स्वत:चे तेच वर्चस्ववादी धोरण राबवून विकसनशील देशांचे शोषण करीतच आहेत. याचे कारण एका बाजूला विचारवंत, तत्त्ववेत्ते, शास्त्रज्ञ आणि दुसऱ्या बाजूला राज्यकर्ते व भांडवलदार यांच्या धोरणातील परस्परविरोध! इहवादी, चंगळवादी जीवनदृष्टीच्या प्रभावामुळे राज्यकर्ते व भांडवलदार यांची अशुभ युती झाली आहे व त्यांनी नीतीशी फारकत असलेल्या स्वत:च्या आर्थिक धोरणांनी केवळ विकसनशील देशांचेच नव्हे तर अन्य पश्चिमी देशांचेही शोषण करण्याचा प्रयत्न चालविला आहे, याचा अमेरिकेच्या संदर्भातील उल्लेख मागे येऊन गेला आहे. या त्यांच्या कूटनीतीमुळे विकसनशील देशांचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व धोक्यात आले आहे.

विकसनशील देशांतील नवी जाणीव

विकसनशील देशांना आता जाणवू लागली आहे की अतीव स्पर्धात्मक जागतिक बाजारामध्ये बहुराष्ट्रीय उद्योगसमूहांची स्वत:ची अशी रणनीती आहे आणि निर्घृण अशा जागतिक स्पर्धेमुळे त्यांनी अवलंबिलेल्या रणनीतीच्या परिणामांपुढे विकसनशील देशांची अर्थनीती आता अभेद्य राहू शकत नाही. केवळ रोजगाराच्या दृष्टीनेच नव्हे तर स्थानीय उद्योग आणि सेवा यांच्या नियोजनाच्या दृष्टीनेही बहुतेक वेळा हे परिणाम अवांछनीय व अस्वीकरणीय असतात. बहुराष्ट्रीय उद्योग समूह, नीतीच्या परिणामांविषयी बेफिकिर राहून 'कोणतीही किंमत देऊन विकास' असे जे धोरण अवलंबितात, त्या धोरणाच्या सवंग भूमिकेपासून आपल्याला सावध राहिले पाहिजे. कारण प्रबल, प्रगल्भ अर्थव्यवस्थेत कोणत्याही वादळावर स्वार होण्याचे सामर्थ्य असते; पण विकसनशील अर्थव्यवस्थांच्या बाबतीत मात्र एखाद्या क्षुल्लक अडचणीनेही निर्वाणीची वेळ येण्याची शक्यता असते.

या आधीच, नव्या ज्ञानशक्तीच्या जोरावर निर्माण झालेल्या पश्चिमी राष्ट्राच्या आर्थिक वर्चस्वाचा जाच दक्षिणी विकसनशील देशांना दिवसेंदिवस अधिकच काचू

लागला होता. त्यामुळे फार पूर्वीच १९७३ मध्येच ही तिसऱ्या जगातील राष्ट्रे एकत्र आली आणि त्यांनी नवी व अधिक न्याय्य अशी जागतिक आर्थिक व्यवस्था आणण्याच्या दृष्टीने वाटाघाटींची मागणी केली.

पण १९८१ च्या ऑक्टोबरमध्ये प्रमुख उत्तरी विकसित राष्ट्रांनी कँकन (मेक्सिको) परिषदेत, आंतरराष्ट्रीय आर्थिक रचनेमधील कोणत्याही रचनात्मक बदलाला नकार दिला आणि आता युरुग्वे येथील वाटाघाटींच्या फेरीत आर्थिक दृष्टीने दक्षिण विरुद्ध उत्तर असा संघर्ष तीव्र झाला. आपली आर्थिक पकड बळकट राखण्याच्या साम्राज्यवादी देशांच्या प्रारंभीच्या प्रयत्नांमुळेच अलिप्ततावादी चळवळीतील दक्षिणी गौरेतर देश आणि उत्तरेकडील गोरी राष्ट्रे यांच्यांत पुढे एक प्रकारची रस्सीखेच चालू आहे.

दक्षिणांतर्गत सहकार्याची कल्पना

म्हणूनच उत्तरी गोऱ्या राष्ट्रांची ही कूटनीती थोपविण्याच्या दृष्टीने दक्षिणांतर्गत विकसनशील देशांमधील सहकार्याचा विचार सुरू झाला. काही दक्षिणी देशांचा गतिमान विकास, काही प्रमुख विकसित देशांत चालू राहिलेली मंदी आणि काही आनुषंगिक पूरक घटक यांच्या जाणिवेमुळे या शतकाच्या ८ व्या दशकात दक्षिणांतर्गत सहकार्याच्या कल्पनेला गती मिळाली. 'केंद्र-परिघ' या आर. प्रेलिश (R. Prelisch) यांच्या आर्थिक प्रणालीने या दक्षिणी देशांच्या परस्पर सहकार्याच्या कल्पनेला तात्त्विक समर्थन दिले. आर. प्रेलिश हे अर्जेंटिनात जन्माला आलेले अर्थशास्त्रज्ञ होते. अर्थव्यवस्थेच्या केंद्रस्थानीच्या व परिघाच्या परिसराच्या आर्थिक रचनेतील फरक हा त्यांच्या विश्लेषणाचा गाभा होता. त्यांच्या सैद्धांतिक सूचनांद्वारा विकसनशील देशांच्या गरजांची समज येण्याच्या दृष्टीने त्यांनी एक अंतर्दृष्टी दिली. ते विकसनशील देशांमधील सहकार्याला केवळ कळकळीने पाठिंबा देणारेच होते असे नाही तर अशा सहकार्याचे प्रत्यक्ष प्रवर्तकही होते.

दक्षिणांतर्गत सहकार्याचा इतिहास

दक्षिणांतर्गत सहकार्याला प्रोत्साहन देणारी एक महत्त्वाची संस्था म्हणजे जिनीवा येथील 'साउथ सेंटर'! १९८७ मध्ये मलेशियाचे पंतप्रधान महाथीर महंमद यांच्या पुढाकाराने 'साउथ कमिशन'ची विधिवत स्थापना झाली व तांझानियाचे भूतपूर्व अध्यक्ष ज्यूलियस के. न्येरेरे यांनी या साउथ कमिशनचे अध्यक्षपद भूषविण्यास मान्यता दिल्याचे महाथीर महंमद यांनी घोषित केले. जगाच्या विविध भागांमध्ये या आयोगाने 'दक्षिणी देशांमधील परस्पर सहकार्य' या विषयावर अनेक परिषदा व परिसंवाद आयोजित केले. २७ जुलै १९८७ या दिवशी दार-ए-सलाम या ठिकाणी जे. के. न्येरेरे यांनी मंडळाचे घटक सदस्य जाहीर केले आणि डॉ. मनमोहनसिंग यांची सरचिटणीस म्हणून नेमणूक केली. या आयोगाचा अहवाल दार-ए-सलाम

येथेच मे १९९० मध्ये प्रसिद्ध झाला.

*Facing the challenge*या साउथ कमिशनच्या प्रकाशनात आयोगाच्या अहवालाला मिळालेला विविध दक्षिणी देशांतील २८ मान्यवर व्यक्तींचा प्रतिसाद सादर केलेला आहे. या अहवालाने राष्ट्रीय विकासाच्या बाबींचा एकत्र विचार करून, मानव जातीचा तिसरा हिस्सा असलेल्या अशा साडेतीनशे कोटी लोकसंख्या असलेल्या लोकांशी संबंधित समस्यांचे एकमेकांत गुंतलेले स्वरूप स्पष्ट केले आणि दक्षिणी देशांमधील सहकार्याची शक्यता विचारात घेतली आहे.

विकसनशील देशातील वर्तमान दुरावस्था

या सर्व देशांमधील विकासाची अत्यंत तीव्र अशी निर्वाणाची अवस्था; माणशी मिळकत आणि जीवनमानाचे निकष यांची भयानक गळचेपी; अस्थिरता निर्माण करणारे आणि अंगभूततेनेच विस्फोटक असलेले सामाजिक-आर्थिक ताण; विकसित राष्ट्रांकडून अवलंबिली जाणारी आक्रसती धोरणे आणि भांडवलाचा मध्येच आटणारा पुरवठा, आंतरराष्ट्रीय आर्थिक संस्थांकडून लादल्या गेलेल्या जुळवाजुळवीच्या धोरणांमुळे आर्थिक पुरवठ्याचे वाढते दडपण; वस्तू आणि सेवा यांचे मुख्य उत्पादक म्हणून केवळ विनिमयात्मक उपक्रमांचा जागतिक व्यापारासाठी होणारा वाढता विस्तार; आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेतील अंदाजांची वाढती अशक्यता, अस्थिरता, विशेषत: व्याजाचे व विनिमयाचे दर यांतील चढउतार, भांडवली बाजारातील वाढती अनिश्चितता; कर्जबाजारीपणातील अतिरिक्त वाढ आणि कर्जव्यवहारापायीच (व्याज इ.) सर्व उत्पन्नाचा व्यय, गरीबांच्या जीवनमानाच्या जपणुकीपेक्षाही कर्जफेडीला मिळालेले महत्त्व; व्यापाराच्या बिघडत जाणाऱ्या अटींमुळे भांडवलाला लागणारी गळती; शेतीपेक्षा उद्योगधंद्यांना मिळालेले महत्त्व, जमीन सुधारणांची सदोष अंमलबजावणी; सामग्री, ऊर्जा, श्रमशक्तिप्रवण प्रक्रिया आणि उत्पादन यांच्याकडून ज्ञानप्रवण प्रक्रिया आणि उत्पादन यांच्याकडे गेलेला भर, त्याचप्रमाणे शेती व उद्योग यांच्याऐवजी सेवांवर दिला गेलेला भर; व्यापार, वित्त अर्थपुरवठा आणि तंत्रविज्ञान यांचे ओघ निर्णित करणारी आंतरराष्ट्रीय व्यवस्था, विकसित देशांचे वर्चस्ववादी धोरण, बाह्य घटनांमुळे निर्माण झालेल्या अडचणींची रचनात्मक जुळवाजुळव लादणारा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या धोरणांचा देकार; अशा अनेकानेक घटनांचे हे सारे देश बळी आहेत.

युनिडोने (UNIDO *) केलेला पुरस्कार

दक्षिणी देशांतील या निर्वाणीच्या दुरवस्थेमुळेच दक्षिणांतर्गत सहकार्याची संकल्पना १९८५ च्या युनिडोच्या अहवालात प्रभावीपणे व्यक्त झाली आहे.

---

* परिशिष्ट १ पहा.

'प्राप्त तथ्यांच्या विश्लेषणातून सध्याच्या औद्योगिक वाढीच्या संदर्भातील निर्वाणीचे जागतिक स्वरूप लक्षात येते. मंदावलेल्या गतीचा फटका उत्तर व दक्षिण दोघांनाही बसला आहे. उत्तर-दक्षिण परस्पर प्रक्रियेतून वाढीची गती कुंठित झाली आहे. काही प्रमाणात विकसित बाजारी अर्थव्यवस्थांनी चलवाढ रोखण्यासाठी मंदी व कामगारकपात यांचे धोरण अवलंबिले आहे. त्यामुळे १९६३ ते ७९ या काळात व्यापारातील भावात्मक परतावा आणि जागतिक औद्योगिक आर्थिक व्यवस्थेतील परिणामस्वरूप गुंतवणूक यांची अदलाबदल झाली. उत्तर-दक्षिण परस्परावलंब हे १९८० पर्यंत नकारात्मक रीतीनेच राबविले गेले आणि त्याचा परिणाम कर्जसमस्येमधील खळबळीच्या रूपात उत्तर व दक्षिण यांच्यामध्ये जाणवत आहे.'

(The factual analysis brings out the globle nature of recent crisis in industrial growth. The slow-down has hit both the North and the South; the growth momentum has been broken by North-South interaction. To some extent, the developed market economies chose the policy of recession and retrenchment in order to bring inflation down. This has led to a reversal of the positive feed back in the trade and out put growth of the world industrial economy in the period 1963-79. North-south interdependence has worked in a negative position since 1980 and the impact is being felt in the ripples of the debt crisis in the South as well as in the North.)

अहवालात पुढे म्हटले आहे -

'तरीसुद्धा जर दक्षिणेला उत्तरेकडे विस्तार करण्याची शक्यता नसेल तर आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारात सुधारणा नसेल तर दक्षिणेला वाढत्या आत्मनिर्भरतेचा मार्ग चोखाळता येईल का? दक्षिणांतर्गत सहकार्य हे आरुसला घोषणेमध्ये जन्माला आले व पुढे नेण्यात आले ते लागोसच्या कृतियोजनेत व कॅरॅकस येथील कार्यवाहीच्या कार्यक्रमांमध्ये! एकमेकांबरोबरील व्यापार व सहकार्य यांचा विस्तार करून दक्षिणेला आपले औद्योगीकरणाचे प्रयत्न चालू ठेवता येईल. दक्षिणांतर्गत व्यापाराच्या अंगभूत क्षमतेच्या काळजीपूर्वक व तपशीलाने केलेल्या विश्लेषणावरून हे दिसून येते की दक्षिणी प्रदेशांमध्ये व्यापारवृद्धीसाठी कितीतरी संधी आहे. अशा संधी काही पायाभूत उत्पादने बनविणाऱ्या हलक्या उद्योगांमध्ये आहेत, त्याचप्रमाणे विशेषत: भांडवली मालाच्या उद्योगांच्या क्षेत्रातही अशा संधी उपलब्ध आहेत.'

(If, however, there is neither the prospect of expansion in the North nor of international financial reform, can the South take the path of greater self-relience? South - South Co-operation has its origins in the Arusla Declaration and has been futhered in Lagos Plan of Action

and the Caracas Programme of Action. By expanding trade and co-operation with each other, the South can continue its efforts at industrialisation. A careful and detailed analysis of potential for intra-South trade, reveal that there are number of opportunities for increasing trade between South regions. Such opportunities are there particularly in the field of capital goods industries as well as in basic products in light industries.)

या संबंधातील विविध प्रकाशने

दक्षिणी देशांतील सहकार्याच्या या संकल्पनेच्या व व्यवस्थेच्या संदर्भात चालू असलेले चिंतन अनेक प्रकाशनांमधून व्यक्त झालेले आहे.

'North-South and South-South' या दक्षिणांतर्गत सहकार्य या विषयावरील एका महत्त्वाच्या लिखाणात फ्रँसिस स्ट्यूअर्ड यांनी स्पष्ट केले आहे की, उत्तर-दक्षिण संबंधातील खेळाचे नियम व त्यांचा अन्वय हे उत्तरेतील नीतीनिर्धारिकांनी, जवळपास केवळ उत्तरी हितसंबंधांचा संदर्भ समोर ठेवूनच तयार केलेले आहेत.

मार्च १९८२ मध्ये जमेका येथे योजलेल्या जी-७७* या विकसनशील देशांच्या गटाच्या तज्ञांच्या बैठकीत सादर केलेले ८ निबंध *'The Jamaica Papers'* या नावाने ड्रागोस्लाव अॅव्हरमॉविक (Dragoslav Avrmovic) या प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञाच्या संपादनाखाली ब्रिटनमध्ये १९८३ मध्ये प्रसिद्ध झालेल्या संग्रहात समाविष्ट झाले आहेत.

उत्तरी राष्ट्रांची नीती लक्षात घेऊनच, *The Jamaica Papers* मध्ये डॉ. सलाह-अल्-शेखली (Dr. Salah- Al-Shaikhly) यांनी सुचविले आहे की, 'विकसनशील देशांनी स्वत:ची सामग्री वापरण्याचा प्रयत्न करावा आणि विकासासाठी व आर्थिक पुरवठ्यासाठी नव्या संस्था आणि पद्धती पुढे आणाव्यात.'

त्या दृष्टीने जमेका येथील जी-७७ राष्ट्रांच्या बैठकीतून, विकसनशील देशांसाठी एक बँक सुरू करण्यातील व्यवहार्यतेच्या दृष्टीने तांत्रिक अभ्यास करण्याची एक अभिनव शिफारस पुढे आली होती.

विकसनशील देशांना तोंड द्याव्या लागणाऱ्या परिस्थितीत या शतकाच्या ९ व्या दशकात लक्षणीय बदल झाला आहे. या व्यापकरीतीने जाणवणाऱ्या काळजीच्या पार्श्वभूमीवर १९८९ मध्ये प्रस्थापित झालेल्या, 'राष्ट्रकुलातील तज्ञांचा गट' (A Commonwealth Group of Experts) या गटाने विकसनशील देशांच्या वाढीवर परिणाम घडविणाऱ्या ९ व्या दशकातील प्रमुख बदलांच्या सूत्रांचा सखोल अभ्यास

---

* परिशिष्ट १ पहा.

केला. 'जगातील विकसनशील देशांचा फार मोठा भाग जेव्हा ९ व्या दशकाच्या वारशाच्या ओझ्याखाली होता, जेव्हा आर्थिक वाढीमध्ये बाह्य कर्जबाजारीपणा हा मोठा अडथळा असल्याचे ध्यानात आले आणि आधीच्या दशकामधील आशांना वाढत्या दारिद्र्यामुळे तडे गेले अशाच वेळी हे सारे बदल घडून आले आहेत.'

(या गटाचा अहवाल १९९१ मध्ये राष्ट्रकुल सचिवालयाने प्रसिद्ध केला.)

Challenges to South-South Co-operation या जिनिवाच्या प्रकाशनात जगाच्या विविध भागांतील २४ लेखकांनी, विकसनशील देशांतील आर्थिक व तंत्रवैज्ञानिक सहकार्याच्या, विशेषकरून संयुक्त गुंतवणुकीच्या आणि आर्थिक पुरवठ्याच्या मुद्यांकडे लक्ष देऊन सैद्धांतिक समर्थनाचे व व्यावहारिक पैलूंचे चिकित्सक परीक्षण केले आहे. ब्लेड (युगोस्लाव्हिया) येथे नोव्हेंबर १९८१ मध्ये योजलेल्या याच विषयावरील आंतरराष्ट्रीय कार्यशाळेत संमत झालेल्या जवळपास ३० शिफारशी देऊन या पुस्तकाचा समारोप केलेला आहे.

रिचर्स अँड इन्फर्मेशन सिस्टिम (RIS) हे अलिप्ततावादी व विकसनशील देशांसाठी नवी दिल्ली येथे असलेले एक व्यासपीठ आहे. विकसनशील देशांना त्यांच्या विकासप्रक्रियेत त्यांच्या आस्थेच्या विविध आंतरराष्ट्रीय आर्थिक विषयांवरील पृथक्करणात्मक तपशीलवार माहितीचा पुरवठा हे व्यासपीठ करीत असते. इतर काही गोष्टींबरोबरच या देशांच्या सामूहिक फायद्यासाठी त्यांच्यांतील संशोधनात्मक क्षमतांमध्ये सुसूत्रता निर्माण करून ती टिकवणारी व्यवस्था प्रस्थापित करणे व त्यांना प्रोत्साहन देणे या बाबींचाही या व्यासपीठाच्या उद्दिष्टांमध्ये समावेश आहे.

२६ सप्टेंबर १९८५ या दिवशी RIS ने योजलेल्या, 'New Perspectives in North-South and South-South Co-operation' या विषयावरील परिचर्चेचा तपशील, *South-South Economic Co-operation* या ग्रंथात प्रसिद्ध झाला आहे. त्याच्या प्रस्तावनेत आंतरराष्ट्रीय विचारवंत, RIS चे संचालक डॉ. व्ही. आर. पंचमुखी यांनी म्हटले आहे -

'दक्षिणांतर्गत सहकार्य ही काही आता नवलाईची गोष्ट राहिलेली नाही. विशेषत: अलिप्ततावादी चळवळीच्या (NAM *) जन्मानंतर आणि जी-७७ या विकसनशील देशांच्या गटाच्या स्थापनेनंतर Caracas Programme of Action म्हणून मे १९८१ मध्ये संमत झालेल्या कार्यक्रमांच्या अनुषंगाने दक्षिणी देशांमधील सहकार्याच्या विषयात विविध दिशांनी लक्षणीय प्रगती झाली आहे.'

(South-South Co-operation is no more a novel concept. Considerable progress had already been made in various directions in the area of South-South Co-operation particularly after the inception of Non-Aligned

---

* परिशिष्ट १ पहा.

Movement and the Group of 77 culminating into the Caracas Programme of Action adopted in May, 1981).

याशिवाय RIS च्या अंतर्गतही अनेक माध्यमांद्वारा या विषयावर काही निबंध प्रसिद्ध झाले आहेत. ते असे -

*South-south Economic Co-operation : Some Issues in the Fields of Trade and Finance*by UNCTAD* Secretariat; *Industrial Co-operation among Developing Countries and the Rold of UNIDO*by S. Nanjundar; *An Evolution of a Preferential Trade Arrangement in the ESCAP Region*by I. N. Mukherjee; *The Asian Clearing Union : Towards Regional Monetary Co-opearation*by B. K. Madan;

South-South Co-operation in South, South-East and East Asia : A Perspective या जून १९९२ मध्ये प्रसिद्ध झालेल्या ग्रंथात डॉ. व्ही. आर. पंचमुखींनी हे सहकार्य वाढविण्याच्या दृष्टीने तीन घटकांच्या विश्लेषणाच्या आवश्यकतेवर भर दिला आहे.

१) आनुषंगिक पूरकतेची अंगभूत क्षमता असलेली क्षेत्रे निश्चित करणे.

२) या अंगभूत क्षमतेचा वापर करण्याच्या आड येणारी बंधने निश्चित करणे.

३) अशी बंधने दूर करून सहकार्याच्या अंगभूत क्षमतांचा वापर उपयुक्त ठरेल अशा धोरणात्मक शिफारशी आणि इतर साहाय्यक उपाय तयार करणे.

Challenges to South-South Co-operation : Part 1 and 2 या, हँस सिंगर, नीलांबर हॅली व रामेश्वर टंडन यांनी संपादित केलेल्या ग्रंथात दक्षिणी देशांतर्गत सहकार्याच्या खालील पैलूंच्या संबंधातील संशोधन एकत्र आले आहे.

१) उत्तर-दक्षिण व दक्षिण-दक्षिण सहकार्य.

२) अशा सहकार्यासाठी जास्तीत जास्त चांगली व्यापारी धोरणे.

३) दक्षिणांतर्गत व्यापारातील आनुषंगिक पूरक घटकांचा विकास.

४) आफ्रिकेतील सहारा परिसरांतर्गत आर्थिक बाबतीतील प्रादेशिकता.

५) निर्यातलक्ष्यी वाढ आणि लिमा येथे निश्चित केलेले लक्ष्य.

६) युनिडो (UNIDO), इसीडीसी (ECDE),* सार्क (SAARC) *

मान्यवर अशा ५० पेक्षा अधिक अभ्यासकांनी या प्रस्तुत दोन खंडांमध्ये स्वत:चे लिखाण समाविष्ट केले आहे.

दक्षिणांतर्गत सहकार्याच्या संदर्भातील वर उल्लेखिलेल्या सर्व प्रकाशित साहित्यातील चिंतनावरून, दक्षिणी देशांतील सहकार्याची पूर्वी कधीही नव्हती इतकी निकड निर्माण झाल्याचे लक्षात येते.

---

* परिशिष्ट १ पहा.

अप्रगत देशांचे सार्वभौमत्व धोक्यात

ही निकड पश्चिमी विकसित राष्ट्रांची कूटनीती थोपविण्याच्या उद्देशाने जाणवू लागली हे पूर्वी स्पष्ट केले आहेच. आपला आर्थिक वर्चस्वाचा हेतू साध्य करण्यासाठी पश्चिमी गोरी राष्ट्रे - विशेषत: अमेरिका, गॅट व जागतिक व्यापार मंडळ या माध्यमांतून विकसनशील देशांच्या सार्वभौमत्वाचा गळा घोटायला कशी निघाली आहे हे पूर्वीच सविस्तरपणे पाहिले आहे. या विकसनशील देशांतील देशभक्तांना स्वत:च्या देशाच्या भवितव्याला घातक अशा आंतरराष्ट्रीय आर्थिक घडामोडींबद्दल अंधारात ठेवून हे केले जात आहे. शिवाय या सर्व देशांतील देशभक्त जर पुढील वायद्यांच्या या धनादेशाच्या बदल्यात स्वत:च्या देशाचे सार्वभौमत्व गहाण टाकायला तयार असतील तर आजवर अपूर्व अशा आर्थिक समृद्धीचा लाभ त्यांच्या देशांना होईल अशाप्रकारची भुलावण निर्माण केली जात आहे. परकीय भांडवलाची अपेक्षा अशी आहे की या भूलभुलैय्यामुळे या देशांतील जनतेला आपल्या राष्ट्रीय सार्वभौमत्वाचे मोल ते विसरायला लावेल.

पण बहुराष्ट्रीय उद्योगांचा भ्रम

सुदैवाने याठिकाणी बहुराष्ट्रीय उद्योगांचा अंदाज हा खूपच भ्रामक ठरला आहे. सार्वभौमत्वाच्या संकल्पनेचे अंगभूत सामर्थ्य त्यांनी लक्षात घेतलेले दिसत नाही. एच. एफ्. चोएन (H.F.Choen) यांनी आपल्या *Recent Theories of Sovereignty* या ग्रंथात घोषित केले आहे. -'सार्वभौमत्व हा शब्द जरी लयाला गेला तरी सावैभौमत्वाचे सत्त्व कायमच राहणार आहे.'

(...even if the word sovereignty disappeares, the subtance of sovereignty will remain)

मागे पश्चिमीकरणाच्या संदर्भात हाच मुद्दा पाहिला आहे. जरी पश्चिमेत काही चांगले असले तरी, प्रभू येशू म्हणतो त्याप्रमाणे, आम्ही स्वर्गाचे राज्यही आत्म्याचे मोल देऊन विकत घेणार का आणि राष्ट्रीय सार्वभौमत्व हाच तर तो राष्ट्राचा आत्मा असतो.

सार्वभौमत्वाचा गाभा

आज राष्ट्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रत्येक मानवी समूहाला स्वातंत्र्य व सार्वभौमत्व यांचा अधिकार आहे. आपण तर लहानमोठ्या सर्वच जीवांचे व्यक्तित्व व अस्मिता ओळखतो व त्यांचा आदरही करतो. तेच मानवी समूहांबद्दलही लागू आहे. सार्वभौमत्वाचा गाभा म्हणजे स्वत:च्या राष्ट्रजीवनाच्या संदर्भातील सर्व घडामोडींबाबत निर्णय घेण्याचा पूर्ण अधिकार! डॉ. शामप्रसाद मुखर्जी, पं. दीनदयाळ उपाध्याय इ. नी प्रत्येक राष्ट्राच्या परराष्ट्रनीतीचे उद्दिष्ट हे, 'जागतिक कल्याण आणि

मानवी सौख्य यांच्या कक्षेतील राष्ट्रीय हितसंबंधांची जपणूक व पाठपुरावा', असे म्हटले आहे. जोसेफ फ्रँकेलच्या मते, 'राष्ट्रीय हितसंबंध हा परराष्ट्रीय धोरणाचा कळीचा मुद्दा आहे.'

आणि राष्ट्रीय हितसंबंध म्हणजे काय? सी. ओ. लैरेहे (C. O. Lerehe) आणि ए. ए. सैद (A. A. Said) यांच्या म्हणण्याप्रमाणे राष्ट्रीय हितसंबंध म्हणजे -

'राज्य, राष्ट्र आणि शासन या सर्वांकडून पाठपुरावा होत असलेले दूरगामी आणि निरंतर अस्तित्वात असणारे असे सर्वसाधारण साध्य.'

(...the general long term .and continuing purpose which the state, the nation and the government, all see themselves as serving.)

व्ही. व्ही. डाइक (V. V. Dyke) याच्या मते -

'राष्ट्रीय हितसंबंध म्हणजे त्या त्या राष्ट्राचा हितसंबंध! हा राष्ट्रीय हितसंबंध विविध राष्ट्रांकडून परस्परांच्या संदर्भात साध्य करण्याचा व जपण्याचा प्रयत्न होत असतो.'

(National interest is that which states seek to protect or achive in relation to each other.)

पण सार्वभौमत्वाशिवाय राजकीय स्वातंत्र्य ही कल्पनाच निरर्थक आहे आणि सार्वभौमत्वाशिवाय राष्ट्रीय हितसंबंधाचे रक्षणही अशक्य आहे. स्वतःच्या सर्व विनिमयांबाबत व घडामोडींबाबत निर्णय घेण्याचे पूर्ण अधिकार व स्वातंत्र्य प्रत्येक राष्ट्राला असले पाहिजे.

अशा सार्वभौमत्वाचा बळी मागणाऱ्या पश्चिमी विकसित राष्ट्रांच्या व त्यांनी निर्माण केलेल्या अर्थ व व्यापार यांच्या संघटनांच्या पूर्वोल्लेखित कूटनीतीची वाढती जाणीव विकसनशील देशांमध्ये दिसून येत आहे.

सार्वभौमत्व व आत्मनिर्भरता म्हणजेच स्वदेशी

त्यामुळेच सार्वभौमत्वाच्या जपणुकीसाठी आत्मनिर्भरता अटळ आहे याची दक्षिणी देशांना जाणीव होऊ लागली आहे आणि याच राष्ट्रीय सार्वभौमत्वाची व आत्मनिर्भरतेची जपणूक व जोपासना करण्याच्या राष्ट्रीय इच्छाशक्तीचे प्रात्यक्षिक म्हणजे आपल्या देशातील स्वदेशीची चळवळ!

केवळ आर्थिक संदर्भ नाही

त्यामुळेच बहुधा केवळ आर्थिक संदर्भातच पाहिला जाणारा स्वदेशीचा भाव वस्तुतः सर्वांगीण राष्ट्रीय पुनर्निर्माणाच्या संदर्भातील एक महत्त्वाचा मुद्दा ठरतो. स्वदेशीची चळवळ ही केवळ वस्तू आणि सेवा यांच्या संबंधातील बाब आहे हा समज चुकीचा आहे हेही लक्षात येते. तो तर आनुषंगिक भाग आहे. मूलतः स्वदेशी ही भावना राष्ट्रीय आत्मनिर्भरता, सार्वभौमत्व आणि समान पातळीवरील आंतरराष्ट्रीय

सहकार्य अशा काही निर्धारांशी जोडलेली आहे.

स्वदेशी भावनेची सार्वत्रिकता

म्हणूनच सर्वच राष्ट्रांच्या सार्वभौमत्वाच्या, आत्मसन्मानाच्या जाणिवेतून व आत्मनिर्भरतेच्या संकल्पातून ही भावना व्यक्त होताना दिसते. या स्वदेशी वृत्तीमुळेच 'मर्सिडीज बेंज' ही जर्मन बनावटीची आरामगाडी व्यक्तिगत उपयोगासाठी घेण्यापासून स्वत:च्या राष्ट्रप्रमुख राणीला ब्रिटिश जनता रोखू शकली.' हलक्या विणीची व्हिएटनामी कापडाची, ठिगळे लावलेली विजार आपण का वापरत आहात?' असे भारत प्रवासात, भारतीय वार्ताहराने विचारल्यावर डॉ. हो चि मिन्ह यांनी स्मित हास्य करून उत्तर दिले, 'माझ्या देशाला इतपतच परवडते.' अमेरिकेने तिची कॅलिफोर्नियातील संत्री जपानी बाजारात जबरदस्तीने उतरवल्यानंतर जपानी गिऱ्हाइकांनी एकही संत्रे विकत न घेऊन अमेरिकेची जबरदस्ती हास्यास्पद ठरविली.

मायकेल जॅक्सनचा कार्यक्रम म्हणजे आपल्या देशावरील सांस्कृतिक आक्रमण आहे, असे कारण सांगून जेव्हा चीन व कोरिया यांच्या शासनाने त्याच्या प्रवेशावर बंदी घातली, तेव्हा त्यांनी स्वदेशीचीच वृत्ती दाखविली. या त्यांच्या कृतीवरून लक्षात येते की, 'स्वदेशी हा केवळ आर्थिक मामला नाही तर राष्ट्रीय जीवनाच्या सर्व अंगांना कवेत घेणारी ती एक व्यापक तत्त्वप्रणाली आहे.'

या दृष्टीने पाहता स्वदेशीला आज सर्वत्रच गती आली आहे हे लक्षात येते. अमेरिकेतसुद्धा स्वदेशीचा भाव, 'अमेरिकी बना, अमेरिकी वस्तू खरेदी करा' (Be American, Buy American!') या लोकप्रिय घोषणेमध्ये आणि (व्यापारविषयक) संरक्षिततेच्या अधिकृत धोरणामध्ये प्रतिबिंबित होतो. काही पश्चिमी देशही होईल तेवढा हा मार्ग चोखाळण्याचा प्रयत्न करीत आहेत.

देशभक्ती म्हणजे एकाकीवाद नव्हे.

वस्तुत: स्वदेशी हा राष्ट्रभक्तीचा व्यवहार्य असा बाह्य अविष्कार आहे असे म्हणताना हे मागेच पुरेसे स्पष्ट केलेले आहे की देशभक्ती म्हणजे एकाकीवाद नव्हे. विशेषत: आमची परंपरा ज्या नावाने उभी आहे त्या एकात्म मानववादी जीवनसरणीप्रमाणे, आंतरराष्ट्रवाद म्हणजे मानवी जाणिवेच्या पातळीवर होणारे राष्ट्रवादाच्या भावनेचे पुढल्या टप्प्याचे विकसन होय.

म्हणून या देशातील राष्ट्रभक्त हे आंतरराष्ट्रवादाविरुद्ध नाहीत. प्रत्येक देशाच्या आत्मसन्मानाची बूज राखून समान भूमिकेवर आंतरराष्ट्रीय सहकार्य होत असेल तर राष्ट्रभक्तांच्या स्वदेशीच्या मागे असलेला आत्मनिर्भरतेचा आग्रह हा आंतरराष्ट्रीय सहकार्यात बसत नाही असे म्हणता येणार नाही. जागतिकीकरणाची वकिली करणाऱ्यांशी स्वदेशीवाल्यांचा मतभेद आहे तो अधिक मूलभूत अशा वेगळ्याच मुद्याबाबत आहे.

पश्चिमी नमुना हाच वैश्विक नमुना हे अमान्य.

पश्चिमी नमुना हाच सर्व जगातील लोकांनी अनुसरण्यायोग्य असा विकास आणि प्रगती यांचा वैश्विक नमुना आहे हे मत मान्य करायला स्वदेशीवाले तयार नाहीत. मागे पश्चिमीकरणाच्या अनुषंगाने या प्रमेयाची काही चर्चा आलेली आहेच. सांस्कृतिक देवाणघेवाणीला स्वदेशीवाल्यांचा विरोध नाही; पण प्रत्येक समाजाची पृथगात्म संस्कृती आहे व विकास आणि प्रगतीचा प्रत्येक देशासाठी आवश्यक असा आकृतिबंध हा त्या त्या देशाच्या सांस्कृतिक सत्त्वाशी सुसंगत असला पाहिजे यावर त्यांचा भर आहे. पूर्वी हे पाहिलेच आहे की आधुनिकीकरण हे राष्ट्रीय संस्कृतीच्या सत्त्वाशी सुसंगत असणे आवश्यक आहे. त्यामुळे जागतिकीकरणाच्या नावाखाली पश्चिमेच्या भल्यासाठी जगातील विभिन्न संस्कृतींवर व राष्ट्रीय अस्मितांवर वरवंटा फिरविण्यास स्वदेशीवाल्यांचा विरोध आहे.

कारण आधुनिक पश्चिमी तंत्रविज्ञान व अर्थव्यवस्था यांचा चंचूप्रवेश म्हणजे एका पूर्णतः नव्या संस्कृतीचे या देशामध्ये केले जाणारे कलम होय आणि ते युरोपेतर संस्कृतीच्या स्वरूपाशी पूर्ण विसंगत आहे हाच मतभेदाचा मुद्दा आहे.

आणि या पश्चिमी नमुन्याच्या संदर्भात पश्चिमी राष्ट्रांमध्येही कशा प्रकारची संशयात्म धारणा निर्माण झाली आहे, याचाही उल्लेख पूर्वी येऊन गेला आहेच.

स्वतःच्या दुखण्यांवर मात करण्याचा पश्चिमी प्रयत्न

हे खरे आहे की पश्चिमी विकास संकल्पनेच्या अनुसरणातून निर्माण झालेल्या जीवनातील सर्व आधिव्याधींवर मात करण्याचा प्रयत्न पश्चिमी देशांनी चालविलेला आहे. भांडवलवाद स्वतःच्या नित्य-नवीन दुखण्यांवर नवे नवे उपाय शोधण्याचा प्रयत्न करीत आहे. मागे यासंबंधी काही उल्लेख आले आहेत.

हेही खरे आहे की हृदयरोग, रक्तदाब, कर्करोग इ. सारखे आधुनिक भांडवली संस्कृतीच्या परिणामांतून उद्भवणारे दीर्घजीवी, चिवट असे रोग, तीव्र मनोमालिन्य, दुभंग मनोवस्था आणि अन्य मानसिक व्यस्तता, आत्महत्त्या; विध्वंसक गुन्हे, अपघात, व्यसनाधीनता आणि मादक द्रव्य सेवनाची गुलामी यांचे वाढते प्रमाण; ऊर्जा आणि कोळसा, पेट्रोल, नैसर्गिक वायू, धातुसंपत्ती, वनराई, मत्स्योत्पादन क्षेत्रे, प्राणवायु, ओझोन इ. नैसर्गिक संपत्तीचा वाढता लय; केवळ मानवावरच नव्हे तर वनस्पती, प्राणिसृष्टी, पर्यावरणात्मक व्यवस्था आणि पृथ्वीवरील हवामान इ. वर परिणाम घडवून संपूर्ण पृथ्वीला वेढून राहणारे प्रदूषणात्मक असे एक धूसर आवरण निर्माण करणारा नैसर्गिक पर्यावरणाचा घातक ऱ्हास; चलनवाढीचे वाढते प्रमाण, व्यापक बेरोजगारी आणि संपत्तीची असमान विभागणी; दररोज एक दशलक्ष डॉलर्सहून अधिक खर्ची घालणारे अण्वस्त्रांचे ढीग; (हा उल्लेख १९८३ सालचा आहे.) अशा प्रकारच्या, समाजाला संत्रस्त करणाऱ्या असंख्य दुखण्यांची पश्चिमी समाजांनी दखल घेतली

आहे.

पण प्राधान्याने इहवादी दृष्टिकोण असल्यामुळे या संदर्भात योजलेले उपायही भौतिक स्वरूपाचेच राहिले आहेत.

विविधांगी निर्वाणीची वाढती जाणीव

त्यामुळे गेल्या दोन दशकांच्या प्रारंभी आपले आरोग्य आणि उपजीविका, आपल्या पर्यावरणाची गुणात्मक पातळी आणि आपले सामाजिक नातेसंबंध, आपली अर्थव्यवस्था, तंत्रविज्ञान आणि राजकारण अशा आपल्या जीवनाच्या सर्वांगांना भिडणाऱ्या घटकांच्या बहुआयामी अशा निर्वाणीच्या गंभीर व गुंतागुंतीच्या विश्वव्यापी स्थितीमध्ये आपण आलो आहोत अशी पश्चिमी बुद्धिवंतांमध्ये एक वाढती जाणीव दिसत आहे, असे लक्षात येते.

ही निर्वाणीची अवस्था बौद्धिक, नैतिक, आध्यात्मिक मितीची आहे आणि ही निर्वाणी ही ज्ञात मानवी इतिहासाच्या कालखंडात आजवर कधीही न गाठलेल्या प्रमाणाची व निकडीची अशी अवस्था आहे. या भूलोकावरील सर्व जीवन व मानववंश यांच्या पूर्ण विलयाच्या धोक्याची खरीखुरी भीती पहिल्या प्रथमच आपल्यासमोर ठाकली आहे.

डान्टीवर त्याचप्रमाणे आधुनिक समाजावर उत्कृष्ट भाष्य करणाऱ्या डोरोथी सेयर्स या लेखिकेने म्हटले आहे -

'... (डान्टीच्या *Divine Comedy* मधील)... नरकाचे[१०] चित्रण हे पापी आणि भ्रष्ट अवस्थेतील मानवी समाजाचे चित्र आहे हे सर्वच जण लगेचच मान्य करतील आणि समाज हा वाईट मार्गाने जात आहे आणि परिपूर्णतेच्या दिशेने निश्चितच विकसित होत नाही याबद्दल आज आपली पूर्ण खात्री पटली आहे. त्यामुळेच भ्रष्टाचाराच्या गर्तेपर्यंत पोचणाऱ्या वेगवेगळ्या अवस्था चटकन ओळखू येतात. विफलता, जिवंत श्रद्धेचा अभाव, शिथिल नैतिक वर्तनाकडे झुकाव; उपभोगाची हाव, आर्थिक बेजबाबदारपणा; बेबंध अपप्रवृत्ती, स्वत:चेच खरे करणारा आणि दुराग्रही व्यक्तिवाद; हिंसाचार, वंध्यत्व; स्वत:सकट एकूणच सर्व जीवनाबद्दल व मालमत्तेबद्दल सन्मानाचा अभाव; लैंगिक शोषण, जाहिरात व प्रचार यांच्याद्वारा होणारे भाषेचे विकृतीकरण; धर्माचे बाजारी स्वरूप, खुळचट समजुतींचा प्रादुर्भाव व सामूहिक उन्मादाने माणसांचे मने भारून टाकणे; लाचखाऊपणा आणि सार्वजनिक व्यवहारातील सूत्रे (पडद्यामागून) हलविणे, दांभिकपणा, लौकिक बाबींमधील अप्रामाणिकपणा, बौद्धिक सचोटीचा अभाव; (वर्गावर्गातील, राष्ट्राराष्ट्रातील) विसंवाद भडकविणे आणि त्यातून होईल तितका स्वार्थ साधणे; विनिमय-संवादाच्या सर्व माध्यमांत अप्रामाणिकपणा असणे अथवा ती उध्वस्तच करून टाकणे, नीचतम व विकृत सामूहिक भावनांचा गैरफायदा घेणे; नातेसंबंध, (स्वत:चा) देश, निवडलेला मित्र अथवा शपथेवर स्वीकारलेली

निष्ठा या मूलभूत तत्त्वांबद्दलही विश्वासघात करणे, अशा समाजाला थंडपणे मृत्यूकडे घेऊन जाणाऱ्या आणि सर्व सुसंस्कृत नातेसंबंधांचा विलय घडवून आणणाऱ्या, सहज ओळखू येतील अशा अवस्था आहेत.

(...That the *Inferno* is the picture of a human society in a state of sin and corruption, everybody will readily agree. And since we are today fairly well convinced that society is in a bad way and not necessarily evolving in the direction of perfectibility, we find it easy enough to recognise the various stages by which the deep of corruption is reached. Futility, lack of living faith, the drift into loose morality; greedy consumption, financial irresponsibility and uncontrolled bad temper, a self-opinionated and obstinate individualism, violence, sterility; and lack of reverence for life and propriety including one's own; the exploitation of sex; the debacing of language by advertisement and propaganda; the commercialising of religion, the pandering of superstition and the conditioning of people's minds by mass-hysteria and 'spell-binding' of all kinds; venality and string-pulling in public affairs; hypocrisy, dishonesty in material things, intellectual dishonesty; the fomenting of discord (class against class, nation aginst nation) for what one can get out of it; falsification and destruction of all the means of communication; the exploitation of the lowest and the stupidest mass-emotions, treachery even to the fundamentals of kinship, country, the chosen friend, and the sworn allegiance; these are all-too-recognisable stages that lead to the cold death of society and the extinguishing of all civilised relations.)

एक मान्यवर आधुनिक विचारवंत काप्रा याच्या म्हणण्याप्रमाणे पाश्चिमात्यांनी अंत:प्रेरणेच्या सुजाणतेऐवजी विवेकनिष्ठ ज्ञान, धर्मऐवजी विज्ञान, सहकार्यऐवजी स्पर्धा, निसर्गसंपत्तीच्या जपणुकीऐवजी तिचे शोषण, याच सर्व बाबींना झुकते माप दिले. आमचे विचार व भावना, आमची मूल्ये व धारणा, आमच्या राजकीय व सामाजिक चौकटी यांचे असंतुलन या सर्वांच्या मुळाशी असलेला एकूणच सांस्कृतिक असमतोल हेच आमच्या आजच्या सांस्कृतिक निर्वाणीच्या अवस्थेचे नेमके कारण आहे.

त्याच्या मते आजची ही निर्वाणीची अवस्था म्हणजे इंद्रियनिष्ठ संस्कृतीपासून होणाऱ्या संक्रमणाची अवस्था आहे. व्यक्ती म्हणून, समाज म्हणून आणि या भूतलावरील पर्यावरणात्मक व्यवस्था म्हणूनही आपण एका वळणावर पोचत आहोत.

या वळणावर, अशा स्थितीतील गोंधळलेल्या मानवतेला पश्चिमी नमुना उपयोगी

ठरू शकेल का ?

या विद्वान लेखकाने म्हटले आहे -

'आपल्याला जर कशाची गरज असेल तर ती नवीन नमुना, सत्याचे नवीन दर्शन, आपल्या विचारांत, संवेदनेत आणि मूल्यांमध्ये मूलभूत बदल हवा आहे.'

(What we need, then, is a new paradigm, a new vision of reality, a fundamental change in our thought, perceptions and values.)

मानवी इतिहासातील या अभूतपूर्व निर्वाणीच्या अवस्थेची सोडवणूक करण्याच्या दृष्टीने पश्चिमी नमुना हा अगदीच अपुरा आहे, असाच याचा अर्थ होत नाही का ?

पश्चिमी नमुना भारतीय उद्दिष्टांशी न जुळणारा

पश्चिमी विकासनमुन्याच्या दारुण अपयशाच्या या प्रदीर्घ चर्चेतून साहजिकपणेच लक्षात येते की पर्यावरणात्मक हानी पोचविणारा, सामाजिक नाती व फुरसतीचा वेळ यावर प्रतिकूल परिणाम घडविणारा, कौटुंबिक भोजनांना काट देणारा, कौटुंबिक संवाद व शेजारधर्म यांना जागा नसलेला, जाहिरात व्यवसायाच्या वाढीमुळे चंगळवादाला प्रवृत्त करणारा, पारंपरिक व्यापारकेंद्राची जागा बाजाराच्या हमरस्त्यांना देणारा आणि व्यापारी दूरचित्रवाणीचा झपाट्याने प्रसार करणारा प्रगतीचा नमुना हा योगी अरविंदांनी सांगितलेल्या उद्दिष्टांशी कुठेही जुळत नाही.

जागतिक शांततेसाठी वैश्विक अर्थव्यवस्था आवश्यक

त्यामुळे अशा सर्व जागतिक दृश्याच्या पार्श्वभूमीवर आदर्श अशा वैश्विक व्यवस्थेच्या आपल्या चौकटीतील 'जागतिक शांततेसाठी वैश्विक अर्थव्यवस्था' - कप्प्याकप्प्याच्या विचारातून नव्हे अथवा संकीर्णही नव्हे तर जीवनाच्या एकात्म दृष्टिकोनावर आधारलेली व्यवस्था - मनासमोर साकार करणे ही वास्तवाभिमुख कृती ठरेल.

भारताच्या इतिहासदत्त जबाबदारीची जाणीव

म्हणूनच साम्यवादाच्या विलयानंतर आणि भांडवलवादाला घरघर लागलेली असताना सदहेतूने प्रेरित झालेले हिंदू राष्ट्रभक्त पुढे येणे अतिशय स्वाभाविक होते आणि आपल्या सांस्कृतिक सत्त्वाशी सुसंगत आणि सनातन धर्मावर अधिष्ठित असा विकासाचा एकमेव पर्याय जगाला देण्याची आपली इतिहासदत्त जबाबदारी आपल्या देशाने पार पाडावी असा संकल्प त्यांच्या मनांत उत्कटतेने उभा राहणेही स्वाभाविक होते. ही गोष्ट सयुक्तिकच होती. कारण आज जगाला एकमेव पर्याय केवळ सनातन धर्मच देऊ शकतो.

तिसऱ्या पर्यायाचा शोध - अन्य प्रयत्न

पण याप्रमाणे हिंदू विचारवंतांनी मांडलेले, हिंदू जीवनदृष्टीतून येणारे विकाससंकल्पनेचे

व त्या अनुषंगाने अर्थविचाराचे युगानुकूल स्वरूप, तसेच आर्थिक नीती व प्रत्यक्ष कार्यवाहीची योजना यांच्याकडे वळण्यापूर्वी जागतिक परिसरातील तिसऱ्या पर्यायाच्या शोधाच्या, अशाच प्रकारच्या प्रयत्नांची स्थिती पाहणे आवश्यक आहे.

पश्चिमी विचारव्यूहातील विकाससंकल्पनेच्या आधारभूत सूत्रांच्या उत्तरोत्तर वाढत चाललेल्या असफलतेतून पश्चिमी नेतृत्व जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात पराभूत होताना दिसत आहे. परिणामत: अशा विचारव्यूहावर आधारित सामाजिक व्यवस्थाही कोसळत आहेत. भांडवलवादाप्रमाणेच पश्चिमेमध्ये समाजवादही कुठे आणि कोणत्याप्रकारे यशस्वी झाला आहे स्पष्ट करणे हे आधीपासूनच कठीण होते. सी. इ. एम्. जोडने म्हटल्याप्रमाणे समाजवादाच्या टोपीने स्वत:चा आकार गमावला होता. कारण प्रत्येकजण ती डोक्याला घालत होता.

पश्चिमी संसदीय लोकशाहीच्या आणि कामगार संघटनांच्या जन्मभूमीतही समाजवादाची समाजमनावरील मोहिनी व पकड दूर झाली आहे. मिसेस थॅचर यांच्या विजयामुळे हे स्पष्ट होते. *

शिवाय शास्त्रीय समाजवादी विचारवंतांच्या मते तिसऱ्या जगातील देशांच्या बाबतीत समाजवाद अप्रस्तुतच ठरतो. कारण आर्थिक समृद्धी ही समाजवादाची अत्यावश्यक पूर्वअट आहे. *The German Ideology* मध्ये मार्क्सने म्हटले आहे की, 'उत्पादक शक्तींचा भरपूर विकास हे (समाजवादासाठी) आवश्यक प्रमेय आहे.' आणि तरीही अमेरिकेसारख्या सर्वोच्च आर्थिक समृद्धी असलेल्या देशात सर्व समाजवाद्यांची आज* संख्या १० हजारांवरही नाही.

अधिक चांगला पर्याय म्हणून पुढे आलेला साम्यवादही विदारकपणे पराभूत झाला आहे.* मार्क्सचे काही अंदाज खरे ठरले नाहीत म्हणून हे विधान केलेले नाही. अशा अंदाजाबद्दलची चूक किंवा अचूकपणा हा एखाद्या प्रणालीची सार्थकता ठरविणारा एकमेव निकष ठरू शकत नाही, ह्या अँटोनिओ ग्रॅम्स्की जॉर्जी ल्यूकाक् आणि माओ झे डाँग यांच्या मतांशी आम्ही सहमत आहोत. अर्थात ही मते आम्ही वस्तुस्थितीच्या आधारावर पडताळून पाहिली आहेत. १९४८ मध्ये युगोस्लाव्हियाचा झालेला निषेध, रशियाच्या लष्करी सत्तेचे पूर्व जर्मनी (१९५३), हंगेरी (१९५६), झेकोस्लोव्हाकिया (१९६८) आणि अफगणिस्तान (१९७९) या देशांमधील प्रदर्शन, युरो-कम्युनिझमच्या पॉलिट, गोलान, तॉग्लिअट्टी, लोंगो, बर्लिंगर, कॅरिलो इ. नेत्यांचे जागतिक परिस्थितीबद्दलचे नवे भान, एककेंद्री साम्यवादाच्या स्वप्नाचा अंत, सत्ताधारी साम्यवादी पक्षांचे मार्क्सच्या मूलभूत सिद्धांतांपासून विचलित होणे, कोसलर, जिलास, रॉय, डेब्रे आणि इतर आदर्शवाद्यांची मार्क्सवादाशी फारकत, पोलंड व इतर पूर्व युरोपीय देशांमधील कामगारांची बंडे, स्पॅनिश व इटालियन साम्यवादी नेत्यांची स्वत:च्या

---

* हे सर्व मूळ पुस्तकातील, १९८३ साली नमूद केलेले उल्लेख आहेत.

भ्रमनिरासाबद्दलची जाहीर विधाने आणि नववामवाद्यांचा अनिश्चित असा प्रतिक्रियावादी उठाव - या सर्व साम्यवादाच्या ऱ्हासाबद्दलच्या नि:शंक खुणा होत्या. अर्थात जे घर बांधायला १५० वर्षे लागली ते स्वत:च्याच ओझ्याखाली मोडून पडण्यास आणखी काही काल लागणार * स्वाभाविक आहे. (होते).

असे सर्व जागतिक चित्र असल्यामुळे जग नव्या नेतृत्वाच्या शोधात आहे आणि त्यासाठी नव्या विकासनमुन्याचा शोध चालू झाला आहे. याबाबतीतील जागतिक वातावरण स्पष्ट होण्याच्या दृष्टीने या शोधाच्या इतिहासातील काही नोंदी पाहणे आवश्यक आहे. अर्थातच प्राधान्याने भौतिकवादीच दृष्टी असल्यामुळे या शोधातही खास करून आर्थिक व्यवस्थेचाच शोध जारी आहे हे दिसून येते.

नव-वामवाद

युरोपात उदयाला आलेल्या नव-वामवादाचा उल्लेख या संदर्भात महत्त्वाचा ठरतो. साम्यवाद कोसळला, परंतु त्याच्या प्रत्यक्ष ऱ्हासाच्या प्रारंभापूर्वीच मार्क्सवाद्यांपैकी एका गटाला त्याचे भावी पतन दिसू लागले होते. तरीही पण त्यांच्या दृष्टीने ते संपूर्ण डाव्या प्रणालीचे अपयश नव्हते. त्यांनी त्यांच्या आशा हर्बर्ट मर्कूज, सार्त्र, फ्रांझ फॅनन, चे गेव्हारा, आर. डी. लिंग अशांच्या नव-वामवादावर केंद्रित केल्या होत्या. या नव्या विचारव्यूहाने मार्क्सवादाला काही नव्या मिती प्राप्त करून दिल्या आणि तो अधिक अद्यावत करण्याचा प्रयत्न केला. पण तरीही साम्यवादाला फार तग धरणे कठीण होते. विशेषत: तिसऱ्या जगातील देशांच्या दृष्टीने तर त्याला तत्काल लाभ देणारी अशी कोणतीही सार्थता नव्हती. केवळ काही प्रमाणातच या नव-वामवाद्यांना, मार्क्सवाद्यांच्या वर्गरचनेची पुनर्व्याख्या करून स्वत:ला क्रांतिकारी प्रतिष्ठा प्राप्त करून घेता आली. फॅननच्या म्हणण्याप्रमाणे तर नव्या परिस्थितीत तिसऱ्या जगातील समाज हे अत्यंत दुर्दैवी, तिरस्कृत ठरले आहेत. हळुहळू इतर देशांच्या दृष्टीनेही साम्यवादी प्रणालीची उपयुक्तता संपुष्टात आली.

युगोस्लाव्हियातील प्रयोग

त्यानंतर युगोस्लाव्हियाचा अतिशय अभिनव प्रयोग झालेला आहे. त्यात दोन्ही प्रकारच्या मक्तेदारीतून – खाजगी आणि शासकीय – मार्ग काढण्याचा प्रयत्न होता. संलग्न कामगारविषयक कायदा (Associated Labour Act) हे, हा हेतू साध्य करण्याचे अतिशय प्रभावी माध्यम ठरले. युगोस्लाव अर्थनीतीचा तत्त्ववेत्ता एड्वर्ड कार्डिज याने अतिशय समर्थतेने या प्रयोगामागील सर्वसाधारण तत्त्वप्रणालीची मांडणी केली आहे. पण हा अभिनव प्रयोग काही बाह्य घटकांमुळे फसला. मार्शल टिटो

---

* हा ही उल्लेख मूळ पुस्तकातील, १९८३ चा आहे.

हा देशातील विविध वांशिक गटांमध्ये भावनात्मक एकात्मता निर्माण करू शकला नाही. परिणामत: युगोस्लाव राष्ट्रवाद जन्मालाच येऊ शकला नाही. विनोदाने असे म्हटले जात असे की मार्शल टिटो हा जगातील एकमेव युगोस्लाव राष्ट्रवादी होता. त्याच्या निधनानंतर या देशाच्या विघटनाची प्रक्रिया सुरू झाली.

स्वाभाविकपणेच त्याच्या देशाने त्याचा प्रयोग इतिहासाच्या कचरापेटीत टाकला आणि हे सर्वबाह्य घटकांमुळे! हे आवर्जून सांगितले पाहिजे की टिटोच्या या नमुन्याचे हिंदू सामाजिक - आर्थिक व्यवस्थांशी बऱ्याच बाबतीत साम्य होते.

अशाच प्रकारच्या आणखी दोन प्रयत्नांचा ओझरता उल्लेख पूर्वी 'दिशावेध प्रारूपात' आलेला आहे. त्यातील ख्रिस्ती विचारधारेतून आलेल्या प्रयत्नाचाही परिचय त्याच्या यशापयशाच्या दृष्टीने करून घेण्यासारखा आहे.

ख्रिस्ती धर्मपीठाचे प्रयत्न

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या साम्यवादाच्या नेत्रदीपक आक्रमामुळे व्हॅटिकन सत्ता अस्वस्थ झाली आणि साम्यवादाच्या आव्हानाचा मुकाबला त्याच्याच रणक्षेत्रावर करण्याचे तिने ठरविले. १९५१ मध्ये पवित्र धर्मगुरू १२ वे सेंट पायस यांनी घोषणा केली -

'कामगार अथवा सामाजिक समस्या यांच्याकडे दुर्लक्ष केल्याचा अथवा त्यांची योग्य ती दखल न घेतल्याचा आरोप कोणीही धर्मपीठावर करू शकणार नाही.

आमचे ज्येष्ठ पूर्वज १३ वे लिओ यांनी ६० वर्षांपूर्वीच स्वत:च्या पत्राने (Encyclical-' Rerum Novaram')[११] कामगारांच्या हातात जणू त्यांच्या हक्कांचा जाहीरनामाच (Magna Charta)[१२] दिला. तेव्हापासून या दोन मुद्यांइतकी दुसऱ्या कोणत्याच बाबींबद्दल ख्रिस्ती धर्मपीठाची व्यग्रता दिसत नाही.'

(No one can accuse the Church of having disregarded the workers or the social question or not having given them and it their due consideration.

...Few questions have occupied the Church so much as these two from the day when, sixty years ago, our great predecessor Leo XIII, with his encyclical 'Rerum Novarum' put into the hands of the workers the Magna Charta of their rights.)

१८९१ मध्ये प्रसृत केलेल्या या पत्रात १३ वे लिओ यांनी भांडवलदार व कामगार यांच्यातील परस्परसंबद्ध हक्क आणि परस्परसापेक्ष कर्तव्ये घोषित केली आहेत. ४० वर्षांनंतर त्यांचे वारस ११ वे पोप पायस यांनी आपल्या घोषणापत्रात (Quadro gesimo Anno) जाहीर केले की कामगारांचे पहिले आणि लगतचे धर्मसुधारक स्वत: कामगारच असतील.

१९२० साली ख्रिस्ती कामगार संघटनांच्या महासंघाची (Inter-national

Federation of Chirstian Trade Unions - 'IFCTV' आता WCL म्हणून ओळखला जाणारा) स्थापन झाली. १९५२ मध्ये बेल्जममध्ये जोसेफ कार्डिन याने ख्रिस्ती युवक कामगार चळवळ (Young Christian Workers' Movement) सुरू केली.

१८८९ मध्येच १३ व्या लिओंनी सेंट जोसेफ हा कामगारांचा आदर्श म्हणून समाजापुढे ठेवला. विशेष मार्गदर्शक म्हणून सेंट जोसेफचे अनुकरण करण्याचा आदेश पुढे १५ वे बेनिडिक्ट यांनी दिला. त्यानंतर १२ वे पायस यांनी पाखंडी साम्यवादाच्या विरोधातील संघर्षातील आश्रयदाता म्हणून नाझारेथच्या या कामगाराची - सेंट जोसेफची - भूमिका खालील शब्दांत व्यक्त केली.

'ख्रिस्ताच्या राज्यात ख्रिस्ताच्या शांततेचे आगमन गतीने व्हावे म्हणून सेंट जोसेफ या तिच्या बलाढ्य संरक्षकाच्या नावाने आम्ही जागतिक साम्यवादाविरुद्ध धर्मपीठाची व्यापक मोहीम उभी करीत आहोत.'

(To hasten the advent of the 'peace of Christ in the kingdom of Christ' so ardently desired by all, we place the vast campaign of the Church against world communism under the standard of St. Joseph, her mighty protector.)

१ मे १९५५ रोजी पोपने सेंट जोसेफच्या नावाने मेजवानीची प्रथा सुरू करून मे दिनाचे ख्रिस्तीकरण केले.

अशा रीतीने आजवर तात्त्विक दृष्ट्या सर्वसाधारणपणे डाव्यांनी व विशेषकरून साम्यवाद्यांनी ज्या रणभूमीवर मक्तेदारी निर्माण केली होती, त्याच क्षेत्रात १२ व्या पायसने ख्रिस्ती शक्तीचे संघटन करण्यात यश मिळविले असे दिसून येते.

अर्थातच लवकरच हे ध्यानात आले की अशी मर्यादित क्षेत्रातील कारवाई प्रशंसनीय असली तरी पुढे ठेवलेल्या उद्दिष्टांच्या सफलतेच्या दृष्टीने पुरेशी नव्हती. 'ख्रिस्ती विज्ञान' आणि 'ख्रिस्ती कला' यांच्या विकासातील स्वत:च्या अनुभवांवरून हिंमत धरून ख्रिस्ती धर्मपीठाने 'ख्रिस्ती अर्थशास्त्र' विकसित करण्याचे कार्यही हाती घेतले. 'The 30000 Words Vatican Encyclical' या २ मे १९९१ च्या धर्मपीठाच्या परिपत्रकात, भांडवलवाद व साम्यवाद या दोन्ही व्यवस्थांची व्यर्थता स्पष्ट करण्यात आली.

आज पद्धतशीरपणे ख्रिस्ती अर्थनीती विकसित करण्याचा प्रयत्न निश्चयाने जारी आहे, पण त्यामुळे अत्यावश्यक असा 'तिसरा पर्याय' सादर केला जाईल की नाही याबद्दल खात्री नाही. कारण केनेथ बोल्डिंगच्या मते धर्मप्रणीत आर्थिक अपेक्षांचा पाया हा भांडवलशाहीतील आर्थिक जीवनातील मागण्यांपेक्षा वेगळाच असणार. ख्रिस्ती अर्थवेत्तेही आजवर एका विशिष्ट पठडीत वाढलेले आहेत. त्यांची मने आजवर भूतकाळातील अनेक दशके एका विशिष्ट पद्धतीने नियंत्रित झाली आहेत. भांडवलवाद आणि उपभोक्तावाद यांच्या संदर्भातील त्यांच्या जाणिवेतील सर्व बाबी जोपर्यंत पुसून

टाकण्यास ते तयार होणार नाहीत, तोपर्यंत ते या दिशेने पुढची मजल गाठू शकणार नाहीत. शिवाय त्यांनी हे लक्षात घ्यावे की मॅक्स वेबरने 'भांडवलशाही म्हणजे ख्रिस्ती धर्माची परिपूर्ती होय' असा गौरव केला आहे आणि टॉने (Tawney) याने आपल्या *'Religion and Rise of Capitalism'* या ग्रंथात स्पष्ट केले आहे की ख्रिस्ती धर्म आणि भांडवलवादाचा उदय यांच्यांतील संबंध सयुक्तिकपणे स्पष्ट करता येतात.

सर्वसाधारणपणे हे लक्षात येते की पोपच्या वर उल्लेखिलेल्या परिपत्रकाने, 'ख्रिस्ती अर्थनीतीच्या संभाव्य आराखड्याने सध्याच्या भांडवलवादी विचारप्रणालीपासून पुरेशी फारकत घेतलेली दिसत नाही', हे काही विशिष्ट वर्तुळातील लोकांना जाणवले आहे.

दि. ५ जुलै १९९२ या दिवशी मुंबईत झालेल्या एका आंतरशाखीय परिचर्चेत, पोप जॉन पॉल यांनी प्रसृत केलेल्या Centimus Annus या परिपत्रकावर चर्चा झाली. तिच्यात सहभाग घेणाऱ्यांनी असे मत व्यक्त केले की ते परिपत्रक भांडवलवादापुढे मान तुकवणारे, साम्यवादावर, मुख्यत: त्याच्या नास्तिकपणाबद्दल कठोर टीका करणारे होते. लोकसंख्येला आळा घालण्याच्या प्रश्नावर ते केवळ छानछान भाषा करणारे पण लोकमत त्या बाजूने वळविण्याच्या उद्दिष्याचा पाठपुरावा न करणारे असे होते. त्याचप्रमाणे गॅट करार आणि उत्तर दक्षिण संवाद अशा विषयांच्या बाबतीत मुत्सद्देगिरीचे आणि प्रतिगामी असे निवेदन त्यात होते. Rerum Novaram हे परिपत्रक अथवा 'कामगारांचा जाहिरनामा' यांची शताब्दी साजरी करण्यासाठी प्रसृत केलेले हे परिपत्रक यादृष्टीने फार पुढे गेलेलेच नाही. जरी या परिपत्रकाने या विषयांवरील ख्रिस्ती चिंतनावर थोडा अधिक प्रकाश टाकला असला तरीही त्यातील विवेचनाला निश्चित टोक आलेले नाही. या परिचर्चेत भाग घेणाऱ्या विचारवंतांचा नेमका प्रश्न होता - 'पोपने, 'भांडवलवादाच्या 'सुधारित आवृत्ती'ची अपेक्षा करण्याऐवजी, शासनाचा कमीत कमी हस्तक्षेप असलेला 'सुधारित समाजवाद आपण अधिक पसंत करतो' असे का म्हटले नाही?' फादर अग्विअर (Fr. Aguiar) या *Examinar* या नियतकालिकाच्या संपादकाच्या मते पोप हे जगातील व्यापक अमानुषीकरणाबद्दल काही बोलत नाहीत आणि त्यांचे परिपत्रक साम्यवादाला पर्यायी अशा प्रकारचा कोणताही नमुना सादर करीत नाही.

ख्रिस्तीधर्म हा प्रभू येशूपासून सुरू झाला. अर्थातच येशूने स्वत: धर्मपीठाची स्थापना केली नाही ही सुज्ञपणाची गोष्ट होती. त्याने त्याच्या प्रसिद्ध १० आज्ञा दिल्या ही वस्तुस्थिती असली तरीही तो विधिदाता नव्हता. हे खरे आहे की करविषयक अराजक व करवसुली करणाऱ्यांचा भ्रष्टाचार या संदर्भात बायबलमध्ये उल्लेख आहे; पण करमुक्त समाजाकडे जाण्याचा कोणताही संकेत त्यात नाही. या वस्तुस्थितीमुळे त्याच्या अनुयायांना या विशिष्ट उद्दिष्टांच्या दृष्टीने बरीच अडचण झाली आहे.

तरी 'ख्रिस्ती अर्थशास्त्र' विकसित करण्याचा प्रयत्न केव्हापासून जारी आहे हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

हे ख्रिस्ती अर्थशास्त्रज्ञ अंतिमत: किती प्रमाणात यशस्वी होतील हे अनिश्चित आहे. पण, 'मी वचनपूर्तीसाठी आलो आहे, विनाशासाठी नव्हे' या ख्रिस्ती वचनात प्रतिबिंबत झालेल्या खऱ्या ख्रिस्ती सत्त्वाने जर ते प्रेरित झालेले असतील तर त्यांचे हे सारे वैचारिक प्रयास हिंदू अर्थशास्त्राला पूरकच ठरतील.

इस्लामी अर्थवेत्त्यांचे प्रयत्न

प्रेषित महंमद हा मात्र केवळ धर्मसंस्थापक नव्हता तर विधिदाताही होता. त्यामुळे पर्यायी सामाजिक-आर्थिक व्यवस्था विकसित करण्याच्या या प्रयत्नांच्या संदर्भात इस्लामच्या अनुयायांना ख्रिस्ती धर्मीयांपेक्षा निश्चितच अधिक अनुकूलता आहे हे सर्वसाधारणपणे लक्षात घेतले जात नाही.

त्या दृष्टीने मुस्लिम विचारवंत-अभ्यास गेली कित्येक दशके इस्लामी अर्थशास्त्र विकसित करण्याच्या उद्योगात व्यग्र आहेत. व्याजरहित अर्थव्यवस्था ही या व्यवस्थेची विशेषता आहे. या विषयाच्या संदर्भात कोणतेही निर्णयरूप भाष्य करण्यापूर्वी विविध इस्लामी देशांमध्ये असलेल्या वित्तीय संस्थांच्या प्रत्यक्ष व्यवहारांचा शोध घेतला पाहिजे आणि नव्याने विकसित होणाऱ्या या इस्लामी अर्थशास्त्रावरील समग्र वाङ्मयाचा सखोल अभ्यास केला पाहिजे. त्यातील काही ठळक ग्रंथ असे -

१) *Banking without Interest*हा डॉ. नेजातुल्ला सिद्दीकी यांचा ग्रंथ.

२) *Some Administrative Aspects of the Collection and Distribution of Zakat and Distributive Effects of the Introduction of Zakat into Modern Economics*हा राकिबझ झमान यांचा ग्रंथ.

३) ७ ते १२ ऑक्टोबर १९७८ या काळात मक्केला, *'International Monetary and Fiscal Economics'*या विषयावर योजलेल्या परिचर्चेत सादर केलेल्या निवडक निबंधांचा मोहम्मद अरिफ यांनी संपादित केलेला, *Monetary and Fiscal Economics in Islam* हा ग्रंथ.

४) जेद्दाच्या किंग अब्दुल अझीझ विद्यापीठाची Islamic Economics या विषयावरील नियतकालिके.

५) इस्लामाबाद येथे जानेवारी १९८१ मध्ये योजलेल्या परिचर्चेची टिपणे व सादर केलेले निबंध यांचा डॉ. झियाउद्दिन अहमद, डॉ. मुनवर इक्बाल व डॉ. फातिम खान यांनी संपादित केलेला *Money and Banking in Islam and Fiscal Policy and Resource Allocation in Islam*हा ग्रंथ.

जाता जाता, अतिशयोक्ती न करता असे म्हणता येईल की इस्लामाबाद, जेद्दा, लिस्टर या ठिकाणी संशोधन करणाऱ्या इस्लामी अभ्यासकांनी डॉ. बोकरे यांच्या

The Hindu Economics या ग्रंथातील व्याजरहित अर्थव्यवस्थेबद्दलच्या दृष्टिकोणाचा चिकित्सक अभ्यास केला तर तो त्यांना फायद्याचा ठरेल.

(व्याजरहित कर्जपुरवठ्याचा पुरस्कार जर्मन अर्थशास्त्रज्ञ सिल्विया गेसेल आणि डेमंट यांसारखे काही ख्रिस्ती अर्थशास्त्रज्ञ यांनीही केलेला आहे हे येथे लक्षात घेणे आवश्यक आहे.)

इस्लामी अर्थशास्त्रज्ञांचे हे प्रयत्न प्रशंसनीय आहेत. कारण या प्रयत्नांतून ते यशास्थितिवादी मूलतत्त्ववाद आणि वर्तमान आर्थिक चित्रातील प्रगमनशीलता यांच्यातील दरी भरून काढण्याचा प्रयत्न करीत आहेत. तरीही त्यांचे कार्य काहीसे अडचणीचे होत आहे. कारण एका बाजूला त्यांच्यावर जागतिक मुस्लिम समाजासाठी (Ummah) एक समग्र जागतिक दृष्टिकोण (Weltanschauung)[१३] देण्याची जबाबदारी आहे; पण दुसऱ्या बाजूला इस्लामेतर बहुसंख्याक समाज असलेल्या देशांमध्ये राहणाऱ्या मुस्लिमांच्या अस्तित्वासाठी व्यूहरचना निर्माण करावी लागत आहे. दि. १४ जुलै १९९० रोजी लंडनला योजलेल्या ऑल ब्रिटन मुस्लिम कॉन्फरन्सच्या निमित्ताने मुस्लिम इन्स्टिट्यूट ऑफ ग्रेट ब्रिटन या संस्थेने The Muslim Manifasto - A Strategy for Survival हा जाहिरनामा प्रसृत केला. इस्लामेतर बहुसंख्याक समाजातील मुस्लिमांच्या अस्तित्वासाठी जबाबदारी पार पाडण्याच्या दृष्टीने केलेला हा पहिला संघटित प्रयत्न केला.

पण या इस्लामी अर्थवेत्त्यापुढे दुसरीही एक अडचण असते. मुस्लिम देशांतील सत्ताधीश हे अशा प्रकारच्या वैचारिक प्रकल्पांना आर्थिक मदत द्यावयाला तयार असतात. परंतु अशा विचारमंथनातून निघालेल्या निष्कर्षांचा पाठपुरावा करण्यास मात्र ते तयार नसतात. ते पश्चिमी आर्थिक व्यवस्थेलाच भुललेले असतात. उदा. इस्लामी अर्थव्यवस्थेत वायदेबाजाराला स्थान नाही. कारण आर्थिक क्षेत्रात मक्तेदारी निर्माण करणारी ही संस्था आहे; पण कोणीही मुस्लिम राज्यकर्ता, वायदेबाजार आणि अन्य मक्तेदारी संस्थांचा त्याग करणार नाही. त्यांची या संदर्भातील स्थिती दुभंग मनाची असते.

तरीही जवळपास २०० इस्लामी अर्थतज्ञ, विचारवंत, अभ्यासक यांची जिद्द आणि आदर्शवाद हा सत्याची आस असलेल्या सर्वांनाच प्रशंसनीय वाटेल. कारण आधुनिक आर्थिक संघर्ष व निर्वाणी यांना समाधानकारक उत्तर देण्यामध्ये पश्चिमी आर्थिक प्रणाली अयशस्वी झाल्यामुळेच हे इस्लामी अर्थतज्ञ इस्लामी उपाय शोधण्याचा प्रयत्न करीत आहेत.

असो! एक गोष्ट नक्की आहे. स्वत:च्या सांस्कृतिक सत्त्वाच्या अनुषंगाने जे कोणी आर्थिक रचनेचा पश्चिमेतर नमुना शोधण्याबाबत वा विकसित करण्याबाबत ठाम असतील, त्यांच्याजवळ शैक्षिक बुद्धिमत्ता असणे तर आवश्यक आहेच. शिवाय हे घोषित करण्याचे नीतिधैर्य असणेही आवश्यक आहे की -

१) (प्राथमिक स्वरूपातील) साम्यवादी समाज व गुलामी, नंतर भांडवलवाद आणि मग सरतेशेवटी अंतिम साम्यवाद म्हणजे, साम्यवादी समाजनिर्मिती अशा अवस्थांचे अनुमान, हे नेहमी आर्थिक उत्क्रांतीच्या विविध अवस्था म्हणून केले जाते. भौतिक विरोधविकासवादाचा उल्लेखही मानवी इतिहासातील समान सार्वत्रिक बाब म्हणून केला जातो; पण खरे म्हणजे या साऱ्या गोष्टींना युरोपीय इतिहासाबाहेर कुठेही आस्तित्व नाही. युरोपबाहेरील समाजांमध्ये उत्क्रांतीच्या या अवस्था कधीही दिसलेल्या नाहीत.' महम्मद कुतुब.

(The different stages of economic evolution infer communist society and slavery, capitalism and then the final communism, that is, final communist society. When it is the dialetical materialism described as a common phenomenon in the history of mankind, really it has no existence whatsoever outside the European history. These stages were never passed through by any people outside Europe.)

२) 'पश्चिमी नमुना हा विकास व प्रगतीचा वैश्विक नमुना नाही.' - क्लॉड अल्वारिस.

(The western paradigm is not the universal model of progress and development.)

या दोन्ही प्रयत्नांतील अंगभूत मर्यादा

ख्रिस्ती अर्थवेत्त्यांच्या मनावरील भांडवलवादी व उपभोक्तावादी प्रणालीच्या प्रभावामुळे निर्माण होणाऱ्या मर्यादांचा उल्लेख, त्यांचा तिसरा पर्याय शोधण्याच्या प्रयत्नांच्या संदर्भात पूर्वी केला आहे. इस्लामी अर्थतज्ञांच्या प्रयासांमध्येही मुस्लिम बहुल (मुस्लिम सत्तांच्या अंकित) समाज व मुस्लिमेतर बहुसंख्य समाजातील मुस्लिम समाज या दोन्ही प्रकारच्या मुस्लिम समाजांसाठी एकाच प्रकारचा जागतिक दृष्टिकोण देण्यातील असमर्थता व मुस्लिम सत्ताधीशांना असलेले पश्चिमी उपभोक्तावादाचे आकर्षण अशा काही मर्यादांचाही उल्लेख केला आहे.

हिंदूंची विकाससंकल्पना व आर्थिक चिंतन

या पार्श्वभूमीवर हिंदू जीवनदृष्टीतून येणारी विकाससंकल्पना व आनुषंगिक आर्थिक चिंतन पाहणे योग्य ठरेल. अर्थातच या जीवनदृष्टीचा युगानुकूल अन्वय व प्रत्यक्ष व्यवहार्य कार्यवाही यांचाही विचार करणे आवश्यक आहे.

पण हे सारे चिंतन समजावून घेण्यासाठी प्रथम भविष्यविरोधी व चुकीच्या धारणा मनातून पुसून काढणे आवश्यक आहे.

चर्चेसाठी धर्म हाच संदर्भबिंदू

अशा प्रकारच्या कोणत्याही अर्थपूर्ण चर्चेसाठी आपल्या संस्कृतीत 'धर्म' हाच संदर्भबिंदू मानला आहे हे 'दिशावेध प्रारूपा'त उल्लेखिले आहे. त्यादृष्टीने प्रथम हे लक्षात घेतले पाहिजे की सध्या दिली जात असलेली कोणत्यातरी एकाच एका प्रादेशिक नमुन्याच्या (उदा. पश्चिमी नमुन्याच्या) वैश्विकतेची ग्वाही ही आपल्या धर्मसंकल्पनेत बसत नाही किंवा जागतिकीकरण या नावाखाली खपविली जाणारी कोणत्यातरी एकाच शक्तीच्या (उदा. अमेरिकेच्या) वर्चस्ववादी असंतुलित प्रभावाखालील सर्व जगाच्या एकतेची संकल्पना हीही आपल्या 'धर्म' या संकल्पनेच्या आत्म्याशी विसंगत आहे.

तंत्रसंस्कृतीच्या प्रणालींची विविधता आणि तंत्रविज्ञान, विज्ञान आणि संस्कृती यांच्या संदर्भातील सापेक्षता ही भौतिक जीवनातील निर्विवाद अशी भौतिक सत्ये आहेत; पण मानवी घडामोडींना मात्र 'धर्मा'शिवाय अन्य कोणताही निरपेक्ष संदर्भ असू शकत नाही.

प्राथमिकता

त्यामुळे भूतकाळाच्या संपूर्ण, एकात्म व संतुलित ज्ञानासाठी, युरोप हा केंद्रबिंदू मानून मांडल्या गेलेल्या व प्रमाणिततेचा अभाव असलेल्या प्रचलित इतिहास प्रणालींचा आवर्जून त्याग केला पाहिजे व संपूर्ण जगाचे चित्रपटल घेऊन केल्या जाणाऱ्या इतिहासाच्या शोधाचे नवे पर्व सुरू केले पाहिजे.

त्यासाठी सध्याच्या युरोपीयीकरणाऐवजी इतिहासकारांच्या व्यवधानाचे वैश्विकीकरण करणाऱ्या नव्या आराखड्याची, नव्या संदर्भ चौकटीची व नव्या मूल्यश्रेणीची आवश्यकता आहे.

दारिद्र्य, दुर्भिक्ष, भयगंड, अमानुषीकरण स्वत:विषयीचाच परकेपणाचा भाव यापासून पूर्ण मुक्त असलेले आणि प्रत्येकाला मिळणाऱ्या वैश्विक न्यायावर आधारलेले असे, मानवजातीचे उज्जवल भविष्य साकार करण्याचा आपला संकल्प आहे. त्यादृष्टीने आवश्यक त्या व्यूहरचनेची जडणघडण करण्यासाठी भूतकाळाबद्दलच्या जागतिक वस्तुस्थितीचा योग्य परिचय जसा अत्यावश्यक होता, त्याचप्रमाणे आपल्या देशाच्या भूतकाळाबद्दलचे योग्य भानही आवश्यक आहे.

प्राचीन संदर्भांचा नमुन्यादाखल उल्लेख

आणि म्हणूनच प्राचीन काळी अस्तित्वात व प्रचारात असलेल्या अर्थनीतीचे व आर्थिक व्यवस्थेचे काही उपलब्ध संदर्भ प्रारंभी पाहणे उपयुक्त ठरेल यापूर्वी हिंदू जीवनदृष्टीच्या संदर्भात आपण हिंदू समाजातील समाजधारणेची व समाजपरिवर्तनाची पद्धती पाहिली आहे. धर्म (समाजधारणेची मूलभूत सूत्रे व सामाजिक नीतिमत्ता)

हाच आपला संदर्भनिकष आहे आणि जी युगानुकूल बदलती अशी सामाजिक, आर्थिक रचना व व्यवस्था लावायची ती धर्माच्याच शाश्वत, वैश्विक सिद्धांताच्या सूत्रांप्रमाणेच लावायची ही हिंदूंची परिवर्तनपद्धती राहिली आहे.

त्यामुळे प्राचीन काळी आर्थिक क्षेत्रातही विशिष्ट अर्थशास्त्रीय प्रणालीचे सिद्धांतन व मग तिचा अवलंब असा क्रम नव्हता. त्यामुळेच विशिष्ट प्रणालीशी कर्मठ बांधिलकी असणेही अपेक्षित नव्हते.

प्रणालींचे सिद्धांतन व त्यांचा अवलंब या प्रक्रियेतील मर्यादांची सविस्तर चर्चा पूर्वी * येऊन गेली आहे.

या पारंपरिक धारणेच्या प्रात्यक्षिकाचे, आपल्या इतिहासावरून लक्षात येणारे संदर्भ हे या अर्थाने हिंदू विचारवंतांच्या व समाजशास्त्रज्ञांच्या प्रगमनशीलतेचे पुरावेच आहेत. तसेच समाजधारणा व रचना यांतील त्यांच्या वास्तववादी प्रयोगशीलतेचेही ते द्योतक आहेत.

असे लक्षात येते की अतिदूरच्या भूतकाळातील आमचे ऋषी जीवनाच्या विविध क्षेत्रांबद्दल सजग होते. प्राथमिक अवस्थेतील साम्यवादापासून ते प्राचीन भारतातील गुलामीपर्यंत, सर्व प्रकारांचा धांडोळा घेणाऱ्या एका विख्यात डाव्या विचारवंताच्या प्रयासातूनही त्याला हेच दिसून आले.

प्राचीनांची विचारप्रक्रिया ही निरंतर बदलणाऱ्या सामाजिक-आर्थिक अवस्थांशी गती राखणारी अशी प्रगमनशील होती. अर्थातच अशा प्रकारचा आर्थिक क्षेत्राचा युगानुकूल विचार शाश्वत वैश्विक सूत्रांच्या प्रकाशातच प्रत्यक्षात केला जात असे.

यासंबंधीचे वाङ्मय विविध धर्मशास्त्रांमध्ये व परकीय प्रवाशांच्या नोंदींमध्ये विखुरलेले आहे. समकालीन समाजव्यवस्था लक्षात घेऊन आमच्या शास्त्रवेत्त्यांनी वेळोवेळी प्रत्येक पैलूचा कसा तपशीलवार विचार केलेला होता हे त्यावरून दिसून येते.

म. म. डॉ. पां. वा. काणे यांच्या, 'धर्मशास्त्राचा इतिहास' या ग्रंथाच्या प्रकाशनानंतर या विषयावरील संपूर्ण साहित्य उपलब्ध झाले आहे. अर्थातच ते वेगवेगळ्या खंडांत विखुरलेले असणे स्वाभाविक होते[१४]. प्राचीन भारतीय वाङ्मयातील स्मृतिग्रंथ हे प्राधान्याने सामाजिक, आर्थिक, समाजशास्त्रीय स्वरूपाचे आहेत हे आज घ्यावे तसे ध्यानात घेतले जात नाही. म. म. काण्यांच्या म्हणण्याप्रमाणे अशा प्रकारच्या एकूण सुमारे १०० स्मृती होत्या. त्या स्मृतींचे प्रमुख संहिताकार १८ होते. मेधातिथी, विज्ञानेश्वर वा जीमूतवाहन अशा काही भाष्यकारांचाही त्यांनी उल्लेख केला आहे.

या ग्रंथकारांपैकी अतिशय महत्त्वाचा ग्रंथकार, 'अर्थशास्त्र'कार कौटिल्य हा भारतीय परंपरेप्रमाणे प्रारंभी शुक्र, बृहस्पती आणि इतर पूर्वसुरींना अभिवादन करतो. प्राचीन शास्त्रवेत्त्यांनी रचलेल्या जवळ जवळ सर्व अर्थशास्त्रांचा सूत्ररूप अर्क म्हणजेच आपला

---

* पहा - संदर्भ चौकट - हिंदू जीवनदृष्टी. पृ. ५२.

हा ग्रंथ आहे असे त्याने म्हटले आहे. प्रत्यक्ष ग्रंथात पूर्वसुरींचा कौटिल्याने जवळ जवळ ११४ वेळा उल्लेख केला आहे. अर्थात बऱ्याचदा त्यांच्याशी असलेला मतभेद व्यक्त करण्यासाठीच हा उल्लेख येतो. याचाच अर्थ कौटिल्यापूर्वीच कितीतरी काळापासून अर्थशास्त्र ही ज्ञानशाखा सुनिश्चितपणे विकसित झालेली होती आणि तिचे शास्त्रीय संहितीकरणही झालेले होते. त्याचप्रमाणे हे सर्व वाङ्मय विशेष निर्देशग्रंथ म्हणून अभ्यासक्रमातही समाविष्ट झाले होते.

अर्थात कौटिल्याच्याही पूर्वी जे बृहत्साहित्य निर्माण झाले होते ते आज उपलब्ध नाही. कौटिल्याचा अलौकिक ग्रंथही सुदैवाने आर. शामाशास्त्री यांनी १९०८ मध्ये केलेल्या पूर्ण हस्तलिखिताच्या शोधामुळे व प्रकाशनामुळे विस्मृतीच्या पडद्याआडून बाहेर आला.

आमच्या ऋषींच्या मते अर्थशास्त्र हे जीवनाचा फार व्यापक पट कवेत घेणारे असे शास्त्र होते आणि त्यांनी त्याच्या सर्व मितींची दखल घेतली होती. स्वायत्त राजसत्तेची प्राप्ती आणि ती जतन करण्यासंबंधीच्या ज्ञानाची शाखा अशी कौटिल्यानेही अर्थशास्त्राची व्याख्या केली आहे. व्यापक अर्थाने राज्यप्रशासनाच्या कलेचा समावेश असलेले असे ते शास्त्र मानले गेले आहे.

कौटिल्याच्या अर्थशास्त्रातील केवळ विषयांचा सूचीही अर्थशास्त्राच्या आधुनिक शिक्षकांना चकित करील अशी आहे.

हिंदू उद्योगसंघातील मालक-मजूर अशा नात्याचा पूर्ण अभाव हा कौटिल्याच्या विवेचनातील एक वैशिष्ट्यपूर्ण पैलू होता. त्यामुळे त्याचे स्वरूप वा उद्योगसंघातील सदस्यांचे अंतर्गत संबंध हे तांत्रिक अर्थाने औद्योगिक नव्हते. कौटिल्याने नमूद केल्याप्रमाणे या संघांचे एकूण उत्पन्न हे पूर्वी ठरलेल्या अटींप्रमाणे सर्व सदस्यांना वाटले जात असे किंवा तशा पूर्वनिर्णित अटी नसतील तर सर्व सदस्यांना सारख्या प्रमाणात वाटले जात असे. हे संघ स्वयंशासित स्वरूपाचे होते. त्यांच्या त्यांच्या घटनेप्रमाणे अंतर्गत वादाचे मुद्दे सदस्य स्वत:च निकालात काढीत असत. समूहबाह्य अशा कोणत्याही व्यक्तीस वा यंत्रणेस, हे काम करण्याचा अधिकार नसे. केवळ अध्यक्ष व सदस्य यांच्यांतील वादाची वेळ सोडली तर या संदर्भात अंतर्गत व्यवस्थापनात शासनाच्या हस्तक्षेपालाही कोणताही वाव नसे. (बृहस्पति १०/८, १७/९, १८, १९, २०).

हिंदू अर्थशास्त्राने स्वयंरोजगार आणि वेतननिष्ठ रोजगार यांची योग्य दखल घेऊन या संकल्पनांचे सिद्धान्तनही केलेले होते. वेतननिष्ठ रोजगाराच्या कल्पनेत मालक-मजूर संबंध हे सुयोग्यरीतीने नियंत्रित केलेले होते. वेतनाचे प्रकार, उक्त्या कामाच्या वेतनाचे दर, कालावधीला धरून वेतनाचे दर, वेतनश्रेणी, न्याय्य वेतन, वेतन विवरण, वेतनाचे नोंदणीपुस्तक, वर्गीकरणात्मक वेतन, भविष्य निर्वाह भत्त्याचे सूत्र, निवृत्तिवेतन आणि कौटुंबिक भत्ता, सर्वसाधारण सानुग्रह अनुदान, विशेष अनुदान, रजेचे नियम,

पगारी वार्षिक रजा, आजारीपणाच्या तरतुदी, धन्यांचे प्रकार, सेवकांच्या श्रेणी, सेवेमधील नातेवाईकांचा अग्रक्रम, सेवकांशी मानसिकतेच्या दृष्टीने होणारा व्यवहार, औद्योगिक वादांचे निराकरण अशा सर्व बाबींचा विचार शुक्रनीतीने केलेला आहे. उदा. सानुग्रह अनुदानाबद्दल शुक्रनीती सांगते की प्रत्येक सेवकाला वर्षाला त्याच्या उत्पन्नाच्या एक अष्टमांश सानुग्रह अनुदान देण्यात यावे. तो अधिक कुशलतेने काम करीत असेल तर त्या विशिष्ट कामाबद्दल उक्त्या कामाच्या मिळकतीच्या एक अष्टमांश हा त्याच्या अधिक क्षमतेचा मोबदला म्हणून त्याला द्यावा. शुक्राने केलेल्या तरतुदी या, पूर्ण रोजगाराच्या (हिंदू) अर्थनीतीमध्ये वेतन कमावणाऱ्यांसाठी म्हणून, गृहीत धरलेल्या तरतुदी होत्या.

कौटिल्याच्या अर्थशास्त्राच्या ४ थ्या अधिकरणाच्या दुसऱ्या प्रकरणात व्यापाऱ्यांच्या अवांछनीय व्यवहारापासून ग्राहकाला संरक्षण देणाऱ्या काही कायदेशीर तरतुदी आल्या आहेत. कौटिल्याप्रमाणेच मेधातिथी, विज्ञानेश्वर वा जीमूतवाहन इ.नीही कमी अधिक प्रमाणात का होईना, ग्राहकाचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी जागरुकता दाखविली आहे. मनुस्मृति ९ वा अध्याय, याज्ञवल्क्यस्मृति २ रा अध्याय, नारद स्मृति ९ वा अध्याय या साऱ्यांमधील उल्लेखांवरूनही व्यापारातील गैरव्यवहारांपासून ग्राहकाला संरक्षण देण्याच्या कायदेशीर तरतुदी आलेल्या आहेत.

कौटिल्याच्या मताप्रमाणे, विधवा, अपंग मुली, महिला साधक, गणिकांच्या वृद्ध माता, राजाच्या वृद्ध सेविका आणि देवळांमधून काढून टाकलेल्या सेविका यांपैकी कोणीही विनाव्यवसाय वा विनावृत्ती राहता कामा नये. त्याने आदेश दिला आहे की अशांना वस्त्रोद्योग; लोकरीचे धागे, वाखाचे धागे वा कापसाचे सूत काढणे अशी कामे द्यावीत. (कौटिल्य-२/२३/४१/२) पतीच्या अनुपस्थितीमुळे अगतिक होऊन घर सोडू न शकणाऱ्या स्त्रिया, शारीरिक दृष्ट्या अपंग मुली व उपजीविकेच्या तरतुदीची गरज असलेल्या स्त्रिया यांना, वस्त्रोद्योगाच्या अधिकाऱ्याने त्यांच्या घरी काम दिले पाहिजे. (कौटिल्य-२/२३/४१/१२) दिवंगत नोकरांची मुले, वृद्ध, अज्ञानी, मतिमंद, व्याधिग्रस्त, कंगाल आणि गर्भवती स्त्रिया हे सर्व वर्ग, शासनाकडून आर्थिक मदत मिळण्यायोग्य समजावेत. (कौटिल्य-५/३/९१/२९/३१). अनाथ व अपंग यांच्याकडे लक्ष देण्याची आज्ञा महाभारतकारही राजाला देतात. (सभापर्व-१२४).

मौर्यकाळात नागरी मंडळांच्या अखत्यारीतील कारखान्यांमध्ये अतिशय उत्तम दर्जाचे साहित्य वापरले जात असे आणि नगरपालिकांकडून नोकरांना वाजवी वेतन मिळत असे. याच काळात शासकीय खर्चाने खाणींची खोदाई व कारखान्यांमध्ये कामे करण्याची पद्धती अस्तित्वात आली. अलिकडच्या काळात विजयानगरच्या अधिपत्याखालील कारखान्यात ५०० कामगार सोन्याच्या व चांदीच्या तंतूवर काम करीत असल्याची नोंद मिळते. अर्थातच अशा उद्योगांच्या संदर्भात शासनाची भूमिका ही आश्रयदात्याची असे.

सार्वजनिक पत पुरवठा व करव्यवस्था यासंबंधी प्राचीन शास्त्रांमध्ये दिलेली सूत्रे आजही उपयोगी पडण्यासारखी आहेत. शासनासाठी काम करणाऱ्या कामगारांकडून करवसुली केली जात नसे हे शीतलप्रसाद मिश्र यांनी आपल्या *Labour Problems in Ancient and Medieval India* या ग्रंथात स्पष्ट केले आहे. कराच्याऐवजी शासनासाठी म्हणून अतिरिक्त काम करण्याची पद्धती होती. वेतन न घेता एका दिवसाचे शासकीय काम करण्याचा आदेश, वसिष्ठांनी, कारागिरांना दिला आहे. (वसिष्ठ स्मृति प्र. १९/१/४९०). गौतमाने तोच नियम कारागीर, मजूर, नाविक आणि रथकार यांच्यासाठीही सांगितला आहे. (गौतम स्मृती-१०/३९७).

या ग्रंथरूप संदर्भांप्रमाणेच परकीय प्रवाशांनी करून ठेवलेल्या नोंदीवरून एखाद्या विशिष्ट कालखंडातील समाजाच्या आर्थिक व्यवहारासंबंधीची परिस्थिती व शासनाची भूमिका याही लक्षात येतात. ह्यू एन् त्सँगने (इ.स.चे ७ वे शतक) म्हटले आहे की शासन उदार होते व लोकांकडून सक्तीचे काम घेत नसे. मर्यादित वेतनावर काम करून घेतले जात असे. शासकीय नोकरांना जमीन मिळत असे व कामगारांना वेतन मिळत असे. मेगॅस्थिनिसच्या (इ.स. पूर्व ४ थे शतक) नोंदीवरून असे दिसते की कारागिरांच्या व कामगारांच्या सुरक्षेला अग्रक्रम दिला जात असे. त्यांना करातून माफी असे. आपत्तीच्या काळात शासकीय अनुदान त्यांना मिळत असे व शासकीय खर्चाने अनेक सुविधांचा उपभोग ते घेत असत. कारागिराच्या एखाद्या अवयवाला इजा पोचविणाऱ्या मालकाला मृत्युदंडाची शिक्षा असे. अल् बरूनीनेही (इ. स. च्या ११ व्या शतकाचा पूर्वार्ध) सुरक्षेच्या खास व्यवस्थेचा आणि अपघातापासून नोकरांच्या संरक्षणाच्या व्यवस्थेचा उल्लेख केला आहे. ह्यू एन् त्सँगच्या उल्लेखावरून असेही दिसून येते की त्याच्या प्रवासकाळात शासनाने आणि वैश्य वर्गाने अनाथालये, कंगाल, विधवा, अपत्यहीन व्यक्ती व इतर असहाय्य नागरिक यांच्यासाठी सुसज्ज असे दवाखाने स्थापन केले होते.

एकूण प्राचीन अर्थनीतीसंबंधीच्या या सर्व उल्लेखांवरून हे दिसून येते की मानवी व्यक्तिमत्त्वाचा स्वाभाविक विकास कुंठित करणारे किंवा व्यक्तिगत स्वातंत्र्याची गळचेपी करणारे केन्द्रीकरण प्राचीन काळी नव्हते.

वर आलेले सर्व संदर्भ अर्थातच केवळ प्राचीन आर्थिक चिंतनाची व्यापकता व दिशा स्पष्ट करण्याच्या दृष्टीने काही तुरळक नमुने म्हणूनच दिलेले आहेत.

अशा प्रकारच्या प्राचीन संदर्भांवरून लक्षात येते की शाश्वत वैश्विकसूत्रांच्या प्रकाशात युगानुकूल सामाजिक-आर्थिक व्यवस्था निर्माण करण्याचा परिवर्तनवादी प्रयोग भारतामध्ये प्रत्यक्षात अनेक शतके जारी होती.

आजही युगधर्माचा अवलंब आवश्यक

आधुनिक जगात तिसरा पर्याय सिद्ध करण्याचा जेव्हा आपण आज दावा करतो

तेव्हाही आज युगधर्माचा अवलंब करणे आपल्याला आवश्यक आहे हे लक्षात येते. त्यासाठी हिंदू जीवनदृष्टीतील जीवनाविषयीचा एकात्म दृष्टिकोण लक्षात घेतला पाहिजे. व्यक्तिमात्रापासून समाज, सृष्टी, परमेष्ठी यांच्या पातळींवरून विश्वात्मकतेपर्यंत मानवी जाणिवेचे उन्नयन करण्याची प्रेरणा व संधी देणाऱ्या विकसनमुन्याचे भान ठेवणे आवश्यक आहे. तसेच तदानुषंगिक सामाजिक-आर्थिक व्यवस्थांद्वारा ऐहिक मूल्यांच्या सुयोग्य संतुलनाकडेही ध्यान द्यावे लागेल. अशा सर्व मूलभूत वैश्विक सूत्रांची जाणीव यासाठी जरूर आहे. निर्णयशक्ती असलेले मानवी मन हे अधिक मूलभूत असल्याने मानसिक परिवर्तनाशिवाय भौतिक परिवर्तन होऊ शकत नाही हेही लक्षात घेतले पाहिजे. हिंदू जीवनदृष्टीचा या संदर्भातील आलेख याच दृष्टीने पूर्वी मांडलेला आहे.

त्यामुळे आर्थिक चिंतनाच्या अनुषंगाने हिंदू ध्येय, हिंदू दृष्टिकोण आणि हिंदूंची जीवनाच्या आदर्शाची कल्पना मी पुन्हा मांडू लागलो तर मी वाट सोडून तत्त्वज्ञानाच्या प्रांतात शिरलो असे होईल. म्हणून या ठिकाणी केवळ उल्लेखमात्र संदर्भ पुरेसा आहे.

म्हणून युगानुकूल आर्थिक रचनेचा विचार करताना आपल्या संस्कृतीच्या प्रकाशात, आपल्या विकासाच्या व प्रगतीच्या आदर्शांचे संकल्पन उभे केले पाहिजे असे मी ठामपणे म्हणतो. मागे स्पष्ट केल्याप्रमाणे आपण पश्चिमी नमुन्याचा सखोल अभ्यास करावा, त्यापासून जो लाभ घेणे शक्य आहे तो घ्यावा. पण आपल्या भवितव्याचा आदर्श म्हणून त्याचा स्वीकार करू नये. काही जणांना ही भूमिका अगदीच पारलौकिक नाही तरी केवळ शैक्षिक वाटेल आणि भावविवश नाही तरी भावनात्मक वाटेल. ज्यांना नेहमीच सुरक्षित प्रवासाचीच सवय असेल त्यांना ही कृती अंधारात उडी घेण्यासारखी, दिशाहीन समुद्रभ्रमणासारखी अथवा न मळलेल्या वाटेवर मार्गक्रमण करण्यासारखी अविवेकी वाटेल; पण वस्तुतः तसे काहीच नाही. आपल्यासमोर आपल्या स्वतःच्या सांस्कृतिक वारशाबरोबर आणि समृद्ध ऐतिहासिक अनुभवाबरोबरच जपान व माओचा चीन अशाप्रकारच्या काही गौरेतर राष्ट्रांचीही उदाहरणे आहेत. पश्चिमी तंत्रविज्ञानाला सामोरे जात असताना जपानने विवेकाने निवड करून आपली सांस्कृतिक परंपरा कायम ठेवली हे आपण पाहतो आणि प्रत्यक्ष मार्क्सवादाचेही 'चिनीकरण' करण्याचे श्रेय असणाऱ्या माओमध्ये 'आधुनिकीकरण म्हणजे पश्चिमीकरण नव्हे', हे घोषित करण्याची धृष्टता होती.

आधुनिक हिंदू चिंतनाचे संदर्भ

अर्थात यापूर्वीही हिंदू जीवनदृष्टीवर आधारलेल्या अर्थविचारातील विविध पैलूंवर आजवर अनेक आधुनिक विद्वान तज्ञांनी आपल्या शैक्षिक शैलीत विपुल माहिती वाचकांना उपलब्ध करून दिलेली आहे. ज्ञानवंत व्यासंगी म्हणून अशा सर्व तज्ञांचा

अधिकार निर्विवाद आहे. स्वत:च्या अधिकारानेच ते या क्षेत्रातील महानतेवर दावा मांडू शकतात. त्यांची आर्थिक चिंतनातील भरही मोलाची आहे. त्यापैकी काही प्रमुख लेखकांचे काही ग्रंथ याप्रमाणे -

के. टी. शहा यांचा *Ancient Foundations of Economics in India* हा ग्रंथ, के. व्ही. रामस्वामी अय्यंगार यांचा Aspects of Ancient Economic Thought हा ग्रंथ, रामकृष्ण मिशनने प्रसिद्ध केलेला, *Cultural Heritage of India* या मालिकेतील दुसरा खंड (पृ. ४५१-४६४ आणि पृ. ६५५-६७७), के. जी. गोखले यांचा *Indian Thought Through Ages'* (पृ. ४९-७५) के. एम्. मुन्शी आणि आर. आर. दिवाकर यांचा *Hindu Civilization,* आळतेकर यांचा *State Government In Ancient India,* जयस्वाल यांचा *Hindu Polity,* घोषाल यांचा *Hindu Revenue System,* मुखर्जी यांचा *Local Government In Ancient India,* हे सर्व ग्रंथ आणि ए. एन्. बोस, ए. के. मैती आणि एस्. के. मैत्र यांचे लिखाण!

या सर्व ग्रंथांमधील संशोधन-लेखनातून हे लक्षात येते की आधुनिक अर्थशास्त्रातील अनेक प्रमेयांचे उगम, मानव्याचा अतिप्राचीन ग्रंथ जो 'ऋग्वेद' त्यामध्ये सापडतात. के. टी. शहा यांनी आपल्या *Ancient Foundations of Economics In India* या ग्रंथात या दृष्टीने मांडलेले विचार हे लक्षणीय आहेत.

'अर्थशास्त्र हे मानवाच्या दैनंदिन जीवनाशी व त्याच्या सुखप्राप्तीच्या प्रयासांशी निगडीत असलेले असे सामाजिक शास्त्र आहे. पूर्व नियोजित लक्ष्याच्या दिशेने केलेल्या सामूहिक कृती, त्यासाठी आवश्यक ते संघटन आणि संस्थाजीवन असल्याशिवाय दैनंदिन जीवनातील हे प्रयास शक्य होत नसतात आणि आमच्या प्राचीन महाकाव्यसंबद्ध युगाच्या अथवा वैदिक प्रारंभाच्या अतीत अशा क्षितिजाच्या संधिप्रकाशात कदाचित नसेलही, पण जवळपास ज्ञात इतिहासाच्या दिनारंभीच, आमच्या द्रष्ट्यांनी व ऋषीमुनींनी ही मूलभूत तथ्ये लक्षात घेतली होती हे प्राचीन संस्कृतीचे वैशिष्ट्यपूर्ण वैभव आहे.

पण संशोधनाच्या द्वारा आपल्या भूतकाळात पुन्हा अवगाहन करून त्यातील तथ्यांची ओळख करून घेण्याचे आणि त्याची पुनर्रचना करण्याचे आधुनिक काळातील प्रयास हे केवळ पोकळ आत्मसंतुष्टतेने अथवा आमच्या पूर्वजांबद्दलच्या निष्फळ अशा प्रौढीतून प्रेरित झालेले नाहीत. उलट ते सर्व स्वीकृत आदर्श आहेत. शिवाय आज कार्यान्वित असलेल्या अशा अनेक सामाजिक-आर्थिक संस्थांची मुळे ही हजारो वर्षांपूर्वीच्या अधिष्ठानामध्ये सापडू शकतात आणि कदाचित त्यावरच्या इमल्याचा कमकुवतपणा आज आम्हाला जाणवत असेल, काही प्रमाणात विकास आणि वृद्धी यांच्या सर्व पैलूंच्या पाठपुराव्यामध्ये अडचण निर्माण करणारा काही गुंताही आज जाणवत असेल आणि कदाचित आपल्याला आज तोंड द्याव्या लागणाऱ्या एखाद्या समस्येच्या निरासाचा मार्ग प्राचीन अधिष्ठानाच्या संशोधनातून आम्हाला सापडू शकत नसेल. पण तरीही त्याचे एकच कारण आहे. मध्यंतरीच्या अनेक शतकांमध्ये इतक्या

अनावश्यक, विसंगत अथवा पचू न शकणाऱ्या परकीय गोष्टींचे ढीग त्या मूळ अधिष्ठानावर येऊन पडले आहेत की त्यामुळे प्राचीन सूत्रांचा अर्थ व हेतू समजणे कठिण झाले आहे. आजच्या या समस्यांचे स्वरूप समाधानकारकरीत्या स्पष्ट करू शकतील आणि त्याचबरोबर अतिदूरच्या भूतकाळातील भारतांतर्गत स्वकीय साम्राज्यांमध्ये अशा समस्यांना कसे तोंड दिले गेले हे सांगू शकतील असे पूर्वसंदर्भ त्या अधिष्ठानातून मिळणे अशक्यच आहे.'

(Economics is a social science, concerning man in his everyday life and pursuits, which would be impossible without association, organisation concerted action to pre-determined ends. And it is the peculiar richness of India's ancient civilisation that her seers and sages had recognised these basic facts, almost in the dawn of our recorded history, even if not in the twilight of one epic age or the lost horizons of our Vedic beginnings.

Modern attempts at rediscovery of our past and its reconstruction are not actuated merely in a vain sense of self-complacency or fruitless pride of glorious ancestry. They are rather accepted ideals and working institutions of a socio-economic character can be traced to their foundations thousands of years ago. And if today we perceive any weakening of the superstructure, if today we perceive any complexity through which it is difficult to pursue all the ramifications of growth or development, if today we fail to find a solution to the problems that face us for the moment by research into our ancient foundations, it is because, in the intervening centuries, so much of superfluous, uncongenial or undigested alien material has been overlaid on those foundations, that it becomes impossible even to understand the meaning or purpose and to perceive the roots which could furnish some satisfactory explanation of the nature of these problems and the way they were dealt with in those remote days of India's native empires.)

या चिंतनाचा स्वीकार अशक्यच होता

पण उपरोल्लेखित सर्व नामांकित ग्रंथकारांनी अशा कालखंडात लिहिले आहे की ज्यावेळी पश्चिमी मानसात स्वत:च्या तत्त्वप्रणालीबद्दल सैद्धान्तिक दृढता होती. प्रत्येक पश्चिमी प्रणालीचे पुरस्कर्ते दृढ धारणांनी व समर्पित भावनेने स्वत:च्या श्रद्धांविषयांचा पाठपुरावा करीत होते आणि त्यांच्या मनात केवळ आपल्याच शास्त्रीय

प्रणालीच्या अंतिम विजयाच्या अटळतेबद्दल प्रगाढ अंधविश्वास होता. पश्चिमी प्रभावाखालील आपल्याही विचारवंतांना त्यामुळेच अशा संशोधनाची व पूर्वसंदर्भांची दखल घेण्याची कधी आवश्यकता वाटली नाही.

पण या सर्वापेक्षा निराशाजनक बाब म्हणजे आपल्या समाजातील लोकांची स्वहिताबद्दलची व आत्मसन्मानाबद्दलची अनास्था!

आजचे बदललेले जागतिक वातावरण

पश्चिमेकडे पश्चिमी नमुन्याबद्दलच्या भ्रमनिरासाची प्रक्रिया ही ऑक्टोबर १९८७ च्या भांडवलवादी गटातील उत्पातामुळे आणि साम्यवादी जगातील पारदर्शित्वाच्या युगाच्या प्रारंभामुळे सुरू झाली आणि 'प्रामाणिक साशंकतेमध्येच खऱ्या अर्थाने अधिक सश्रद्धता असते,' हे सूत्र दोन्ही गटांमधील अत्यंत कडव्या अनुयायांनाही हळुहळू प्रतीत होऊ लागले.

हिंदू राष्ट्रवाद्यांचे प्रारंभापासूनच इशारे

पण आपल्याकडे त्याहीपूर्वीच-स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या पहिल्या दशकातच - हिंदू राष्ट्रवाद्यांनी परकीय आर्थिक साम्राज्यवादाच्या धोक्याचा इशारा समाजाला द्यावयाला सुरुवात केली होती आणि त्याचबरोबर सनातन धर्माच्या प्रकाशात, आधुनिक काळाच्या आव्हानांना तोंड देणाऱ्या नव्या आर्थिक रचना, विकसित करण्याचा प्रयत्न, आर्थिक क्षेत्रात काम करणाऱ्या राष्ट्रवादी संघटनांनी चालू केला होता. रा. स्व. संघाच्या स्वयंसेवकांनी चालविलेल्या अनेक संघटना, परकीय आर्थिक साम्राज्यवादाच्या या भस्मासुराशी सामना करण्यासाठी सर्व राष्ट्रवाद्यांना संघटित प्रयत्नांची हाक देत आल्या आहेत. कर्जसापळा (debt-trap) म्हणजे मृत्युसापळा (death-trap) आहे, आपण आर्थिकदृष्ट्या गुलाम होत आहोत आणि आपल्या राष्ट्रीय अर्थनीतीबद्दलचे आपले, पुढील महत्त्वाचे निर्णय हे दिल्लीतून नव्हे तर परकीय (पश्चिमी) राष्ट्रांच्या राजधान्यांतून घेतले जातील अशा प्रकारचे स्पष्ट इशारे या संघटना आज मागील दशकाहूनही अधिक काळापासून देत आल्या आहेत.

अशा संघटनांमधील भारतीय मजदूर संघ ही राष्ट्रवादी कामगार संघटना १९५५ पासूनच या देशात आर्थिक क्षेत्रात सैद्धान्तिक व संघटनात्मक पातळीवर कार्यरत आहे. पश्चिमी भौतिक विकासनमुन्यातील असफलतेची खात्री पटून भा. म. संघाने दोन विचारसंच सिद्ध केले आहेत. भा. म. संघाच्या संघटनात्मक चिंतनाची कल्पना यावी म्हणून हे राष्ट्रवादी संच विचारात घेता येतील.

संच १

अतिरिक्त श्रममूल्याचे व्यवस्थापन व उपयोजन तीन घटकांकडून वेगवेगळ्या प्रकारे

होते.

१) भांडवलवादी रचनेच्या अंतर्गत ते मालकाकडून होते. (मालक हा केवळ स्वत:लाच जबाबदार असतो. अन्य कोणालाही तो बांधलेला नसतो.)

२) साम्यवादी रचनेमध्ये ते राज्यशासनाकडून होते. (हे शासन केवळ राज्यकर्त्या पक्षालाच (गटाला) जबाबदार असते.)

३) भारतीय रचनेत ते प्रत्यक्ष कामगारांकडून होते (हे कामगार राष्ट्रालाच जबाबदार असतात.)

संच २

मालकी हक्कांच्या अनेक रचना शेजारी शेजारी असणारी भावी औद्योगिक रचना ही अतिशय गुंतागुंतीची राहणार आहे. पण तरीही (हिंदू अर्थनीतीप्रमाणे) उद्योग विकसित करताना अधिक भर अशा उद्योगावर दिला पाहिजे, जो -

- सामान्यांकडून अर्थपुरवठा होणारा,
- कामगारांची मालकी असलेला,
- वित्तसंस्थांकडून लक्ष दिला जाणारा,
- तंत्रवैज्ञानिकांकडून विकेन्द्रित झालेला,
- तज्ञांची सेवा उपलब्ध असलेला,
- नियोजनकारांकडून सुसूत्रीकरण झालेला,
- संसदेकडून अनुशासित झालेला,
- राज्यशासनाकडून साहाय्य मिळणारा,
- (उत्पादनाच्या दृष्टीने) उपभोक्त्यांकडून उपयोगात आणला जाणारा,
- आणि धर्माने नियंत्रित केला गेलेला, अशा प्रकारचा असेल.

श्री गुरुजींचे मार्गदर्शन

पुढे १९७२ मध्ये ठाणे येथील बैठकीत श्री गुरुजींनी आर्थिक समस्यांबाबत जो मूलभूत हिंदू दृष्टिकोण स्पष्ट केला, त्यावरूनही आपल्या मार्गदर्शनासाठी अशा प्रकारच्या युगानुकूल आर्थिक चिंतनाचे व रचनेचे स्पष्ट संकेत आपल्याला मिळू शकतात. त्यांतील काही ठळक सूत्रांवरून हे लक्षात येते की हिंदू जीवनदृष्टीप्रमाणे आर्थिक नीतीचा व रचनेचा विचार हा जीवनाच्या समग्र, एकात्म अशा संकल्पनेच्या, समाजमनातील दृढ धारणेतूनच विकसित होऊ शकतो. त्यांच्या प्रकट चिंतनातून स्वाभाविकपणे खालील महत्त्वाची सूत्रे आपल्या हाती येतात -

त्यातील अतिशय महत्त्वाची गोष्ट म्हणजे -

१) व्यक्ती आणि समष्टी यांच्या नात्याबद्दलचा आपला दृष्टिकोण हा संघर्षाचा नव्हे तर सुमेळ व परस्परसहकार्यावर आधारलेला राहत आला आहे. एका पक्षाचा

सत्त्व सर्व व्यक्तींमधून भरून राहिले आहे या धारणेवर तो आधारलेला आहे. आणि त्यामुळे समाजपुरुषाचे एक सचेतन अंग यादृष्टीनेच व्यक्तीकडे पाहिले जाते.

२) त्यामुळेच या राष्ट्रपुरुषाशी पूर्ण एकात्मता साधणारे संस्कार हेच कोणत्याही सामाजिक-आर्थिक रचनेची वास्तव, मूलभूत चौकट सिद्ध करतात.

३) म्हणूनच, जर प्रत्येक नागरिक-व्यक्तीचे मन त्यादृष्टीने घडविले गेले नाही तर समाजरचनेच्या वरच्या इमल्यामधील बदल हे निरुपयोगी ठरतात. कारण कोणतीही व्यवस्था ही, शेवटी कार्यान्वित करणाऱ्या माणसांमुळेच चांगल्या रीतीने वा सदोषतेने राबविली जात असते.

४) आणि त्यामुळेच परमेश्वराचेच एक रूप असलेल्या समाजाची सेवा करण्याच्या उद्दिष्टानेच, सर्वोत्तम नैतिकतेच्या आधारावर, भौतिक संपत्ती प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. त्या संपत्तीतील कमीत कमी हिस्सा स्वत:साठी उपयोगात आणला पाहिजे. सेवा करण्याच्या सुयोग्य स्थितीत स्वत:ला राखण्यासाठी आवश्यक तेवढ्याच संपत्तीचा भाग स्वत:साठी आपण ठेवला पाहिजे. त्यापेक्षा अधिक प्रमाणावर हक्क सांगणे वा त्याचा उपभोग घेणे ही एकादृष्टीने समाजाची चोरीच आहे.

५) याप्रमाणे पाहता आपण समाजाचे केवळ विश्वस्त आहोत आणि जेव्हा आपण खरे विश्वस्त होतो, तेव्हाच आपण समाजाची सर्वोत्तम सेवा करू शकतो.

६) परिणामत: व्यक्तिगत धनसंग्रहावर काही विशिष्ट प्रमाणाचे बंधन-मर्यादा असली पाहिजे आणि दुसऱ्याच्या श्रमशक्तीचे शोषण स्वत:च्या फायद्यासाठी करण्याचा कोणालाही अधिकार नाही.

७) जेव्हा लाखो लोक उपाशी असतात तेव्हा संपत्तीची ओंगळ, भपकेबाज उधळमाधळ करणे हे पाप आहे. सर्व प्रकारच्या उपभोगावरच काही विवेकी बंधन असणे आवश्यक आहे. 'उपभोक्तावाद' हा हिंदू संस्कृतीच्या सत्त्वाशी सुसंगत नाही.

भौतिक जगतातील विकासासाठी सयुक्तिक अशी मानवी मनाची जडणघडण आवश्यक आहे आणि आत्मगत क्रांतीतूनच बाह्य जगतातील वस्तुगत क्रांती होऊ शकते, ही पूर्वाल्लेखित अशी हिंदू जीवनदृष्टीची धारणाच या सर्व सूत्रांतून व्यक्त होते. या सूत्रांत श्रीगुरुजींची स्पष्ट केलेली अर्थनीतीबद्दलची व्यक्तिमनातील समाजनिष्ठ मानसिकता लक्षात घेतली तर त्यांनी प्रत्यक्ष अर्थव्यवहाराच्या सूत्रांचे जे दिग्दर्शन केले आहे, त्याचा अन्वय लागू शकतो. त्यां अनुषंगाने -

१) प्रत्येक नागरिकाच्या मूलभूत गरजा भागविणाऱ्या सुविधा उपलब्ध असणे महत्त्वाचे आहे.

२) त्या दृष्टीनेच अधिकाधिक उत्पादन आणि न्याय्य असे वितरण हे आपले ध्येयवाक्य असले पाहिजे आणि राष्ट्रीय आत्मनिर्भरता हे आपले नजिकचे उद्दिष्ट असले पाहिजे.

३) म्हणून बेरोजगारी वॅं अत्यल्प रोजगारी यांचा प्रश्न युद्धपातळीवर हाताळला

पाहिजे.

४) भांडवलप्रवण उद्योगांऐवजी श्रमशक्तिप्रवण उद्योगावर भर दिला पाहिजे.

५) त्याचबरोबर श्रमशक्ती हा प्रत्येक उद्योगातील भांडवलाचा घटक आहे हे लक्षात घेतले पाहिजे. प्रत्येक कामगाराच्या श्रमशक्तीचे मूल्य भागभांडवलाच्या अनुषंगाने मोजले पाहिजे आणि स्वत:ची श्रमशक्ती ही भागभांडवल म्हणून जमा करणारे भागधारक अशी प्रतिष्ठा कामगारांना मिळाली पाहिजे.

६) त्यामुळेच श्रमशक्तीचे अतिरिक्त मूल्य ही राष्ट्राची संपत्ती ठरते.

७) पण त्याचबरोबर रोजगारवृद्धी व कामातील तत्पर क्षमता यांची सांधेजोड आवश्यक आहे.

८) औद्योगीकरण अनिवार्य असले तरी ते पश्चिमेचे आंधळे अनुकरण असण्याचे कारण नाही. निसर्गाचे दोहन आवश्यक आहे, निसर्गाचा घात नव्हे. पर्यावरणाचे घटक, निसर्गाचे संतुलन आणि भावी पिढ्यांच्या गरजा, या कधीही नजरेआड होता कामा नयेत. शिक्षण, पर्यावरण, अर्थशास्त्र व कर्तव्यसंकेत यांचा एकात्म विचार आवश्यक आहे.

९) आमच्या तंत्रवैज्ञानिकांनी आपल्या कारागिरांच्या फायद्यासाठी आपल्या पारंपरिक उत्पादनतंत्रात काही व्यवहार्य बदल करणे आवश्यक आहे; पण त्यामुळे बेरोजगारीत वाढ, व्यवस्थापनात्मक आणि तांत्रिक कौशल्यांचा अपव्यय आणि पूर्वापार प्रचलित असलेली उत्पादनसाधने पूर्णत: मोडीत निघणे; या सर्वांचा धोका निर्माण होऊ देता काम नये. आमच्या तंत्रवैज्ञानिकांनी विद्युत ऊर्जेच्या साहाय्याने आपले स्वत:चे देशी तंत्रविज्ञान विकसित केले पाहिजे. या तंत्रविज्ञानाच्या अवलंबातून उत्पादनप्रक्रियेच्या विकेन्द्रीकरणावर भर देऊन कारखान्याऐवजी घर हेच उत्पादनकेन्द्र बनविले पाहिजे.

१०) उपभोक्त्याचे हितसंबंध हा वस्तुत: राष्ट्रीय हितसंबंधाच्या जवळात जवळ असणारा आर्थिक समान घटक आहे. सर्व औद्योगिक नातेसंबंधात समाज हा तिसरा पण अधिक महत्त्वाचा असा घटक आहे. 'सामूहिक सौदेबाजी'ची सध्याची पश्चिमी कल्पना ही या दृष्टिकोणाशी विसंगतच आहे. त्यामुळेच या संकल्पनेऐवजी 'राष्ट्रीय बांधीलकी' अशा प्रकारच्या काहीतरी संज्ञेचा प्रयोग केला पाहिजे. ही बांधिलकी अर्थातच मालक आणि नोकर/मजूर या दोघांचीही राष्ट्राशी असलेली बांधिलकी होय.

११) औद्योगिक मालकीच्या प्रकारांमध्ये कोणत्याही प्रकारे ठोकळेबाजपणा असू नये. खाजगी मालकी, शासनाची मालकी, संयुक्त मालकी (खाजगी व शासकीय मिळून), सहकारी संस्थांची मालकी, स्थानिक स्वराज्य संस्थांची मालकी, स्वयंरोजगार, मालकीचे लोकशाहीकरण असे मालकीचे अनेक प्रकार संभवतात. राष्ट्रीय-आर्थिक व्यवस्थेची गरज आणि त्या त्या उद्योगाची वैशिष्ट्ये लक्षात घेऊनच मालकीचा प्रकार ठरविणे आवश्यक आहे.

१२) अर्थातच 'धर्म'संकल्पनेच्या मूलभूत सूत्रांशी सुसंगत अशी कोणत्याही प्रकारची सामाजिक-आर्थिक रचना आपण विकसित करू शकतो.

या पार्श्वभूमीवर पूर्वीच्या या सर्व प्रयत्नांइतकाच महत्त्वाचा परंतु त्याहून अधिक समग्र व समयोचित असा प्रयत्न म्हणजे अलिकडील काळात प्रसिद्ध झालेला डॉ. बोकरे यांचा *The Hindu Economics* हा ग्रंथ होय. मागे स्वदेशी भावनेच्या सर्व क्षेत्रांत होत असलेल्या आविष्काराच्या संदर्भात त्याचा ओझरता उल्लेख केलेला आहे. एका अर्थाने आपल्या देशातील युगानुकूल हिंदू आर्थिक चिंतनाच्या प्रक्रियेतील मैलाचा दगड ठरावा असा हा ग्रंथ आहे!

आर्थिक जीवनाच्या विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या हिंदू राष्ट्रवाद्यांनी आपापल्या क्षेत्रात हिंदू विचारप्रणालीचा अन्वय लावण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थातच त्यांच्या प्रयत्नांचे स्वरूप स्वत:च्या विशिष्ट कार्यक्षेत्राच्या मर्यादेमुळे क्षेत्रीय असे असणे स्वाभाविकच होते. आतापर्यंत हिंदू अर्थशास्त्राची मूलतत्त्वे व सिद्धांत शोधून आर्थिक विचार प्रक्रियेचे आणि आर्थिक चलनवलनाचे एक व्यापक चित्र निर्माण करण्याचा समग्र व साकल्याचा प्रयत्न झालेला नव्हता. त्या दिशेने झालेला हा पहिलाच प्रयत्न आहे. या विषयावरील पूर्वीच्या काही ग्रंथांप्रमाणे संस्कृत संहितांचे केवळ भाषांतर असेही त्याचे स्वरूप नाही आणि या उपक्रमात डॉ. बोकऱ्यांनी पश्चिमी देशांमध्ये विकसित झालेली संशोधन पद्धतीच अवलंबिली आहे. त्यांचे युक्तिवादही आधुनिक अर्थशास्त्रीय संचितावरच आधारलेले आहेत. रॉबिन्सनच्या वर्गीकरणाप्रमाणे हिंदू अर्थव्यवस्था ही भावात्मक सिद्धान्तनाचा परिपाक आहे हा त्यांचा निष्कर्ष प्रोत्साहक आहे. आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण भाग म्हणजे आतापर्यंत कर वगळण्याच्या हिंदू संकेताचे विवरण कोणीही केले नव्हते. आतापर्यंत प्राचीन कालनिश्चिती केवळ मोगल खंडापर्यंतच केलेली होती. डॉ. बोकरे ख्रिस्ती युगापूर्वीच्या प्राचीन भारताचीही दखल घेतात, एवढेच नाही तर मार्क्सवादी प्रणालीच्या पुष्टीसाठी वैदिक वाङ्मयाचा चुकीचा अन्वय लावणाऱ्या *Indian Economic Thought* या जोसेफ स्पेंग्लरच्या ग्रंथासारख्या प्रयत्नांनाही शह देतात.

परंपरेची जाणीव

तेव्हा अनेक अर्थांनी हा ग्रंथ अग्रदूत ठरावा असाच आहे. अर्थातच लेखक सच्च्या वैज्ञानिक वृत्तीचा असल्याने या विषयावरील हा शेवटचा शब्द आहे असा त्याचा दावा नाही. हिंदू संस्कृतीच्या परंपरेचे मर्म मनात भिनले असल्याने आपण कोणत्या तरी नवीन प्रणालीचे जनक आहोत, अथवा कोणत्यातरी नवीन विचारप्रकल्पाचे संस्थापक आहोत अशीही त्याची शेखी नाही. या विशिष्ट क्षेत्रात अग्रदूत असूनसुद्धा

एवं परंपराप्राप्तं इमं राजर्षयो विदुः।

(ही परंपरा विद्वान राजर्षींपासून प्राप्त झाली.)

असे म्हणण्यातच ते समाधान मानतात.

मागे नमुन्यादाखल उल्लेख केलेल्या प्राचीन अर्थशास्त्रीय साहित्यातील अवगाहन हे वस्तुतः आमचे देशभक्तीचेच कर्तव्य आहे. या विषयावरील उपलब्ध प्राचीन साहित्य केवळ एकत्र केले तरीही अनेक खंडात्मक असा दस्तऐवज तयार होईल. त्या दृष्टीने उपयुक्त माहितीच्या अथांग सागरात अवगाहन करण्याचे श्रेय खचितच डॉ. बोकरे यांचे आहे. अर्थातच विस्तारभयास्तव व प्रबंधाच्या प्रमेयाच्या मांडणीतील प्रमाणबद्धतेच्या आवश्यकतेच्या जाणिवेमुळे, आधुनिक मानस गर्भाला साजेशा अशाच केवळ सयुक्तिक संदर्भांनी मर्यादित अशा मोजक्या गोष्टींची त्यांना निवड करावी लागली आहे.

पश्चिमीवादाच्या हस्तिदंती मनोऱ्याविषयी मनात प्रेम नसल्यामुळे डॉ. बोकरे भारतीय वास्तवाशी थेट जवळीक साधतात. ते या मातीतून जन्माला आलेले, या भूमीचेच आहेत.

पण वर्तमानाचेंही भान

पण हे लक्षात येते की लेखकाचे मन हे आमच्या सांस्कृतिक सत्त्वाशी मेळ राखून असले तरीही त्याला वर्तमान वास्तवातील निर्वाणीच्या परिस्थितीचेही भान आहे. त्या दृष्टीने ही गोष्ट नमूद केली पाहिजे की या ग्रंथात समाविष्ट झालेल्या एका मूलभूत मुद्यावर सार्वजनिक परिचर्चा याआधीच सुरू झाली आहे.

प्रत्येक उत्पादनाचे-औद्योगिक वा कृषिजन्य-निर्मितिमूल्य घोषित करण्याविषयीची मागणी, आर्थिक क्षेत्रात काम करणाऱ्या राष्ट्रवादी संघटनांनी, डॉ. बोकऱ्यांच्या सूचनेनुसार पुढे मांडली आहे. शासनाने -

१) उद्योगांचे निर्मितिमूल्य-विवरण अहवाल प्रसिद्ध करावेत.

२) निर्मितिमूल्य व किंमतीविषयक धोरण ठरविणाऱ्या संस्थेच्या (Bureau of Industrial Costs and Prices) अहवालाच्या प्रती मिळविल्या पाहिजेत.

३) जॉइंट स्टॉक कंपन्या, सहकारी संस्था व सार्वजनिक क्षेत्रातील शासनांकित उद्योग यांनी निर्मिति-मूल्यासंबंधीचा तपशील वार्षिक अहवालात व त्यांच्या ताळेबंदात प्रकाशित केला पाहिजे असे बंधन घातले पाहिजे. अर्थात निर्यात करावयाच्या सर्व वस्तूंचे निर्मितिमूल्य सर्व देशांनी घोषित करावे ही मागणी सध्यातरी कदाचित अवास्तव, कल्पनारम्य वाटेल.

पण हे तर निरपवाद सत्य आहे की परकीय व्यापाराची रिकार्डोची प्रणाली व हेक्शर-ओलिन यांची प्रणाली यांमधील विवरणामध्ये मतभिन्नता असली तरीही या दोन्ही प्रणाली निर्मितिमूल्याच्या सूत्रावरच आधारित आहेत. हिंदूंचे मूल्य-निश्चितीकरणाचे पारंपरिक सूत्र मात्र निर्मितिमूल्य, उपभोग्यता व उपलब्धता यांवर आधारित होते. या संदर्भात डॉ. बोकऱ्यांनी डॉ. आंबेडकर, पिगू, पॅटिनकिन

व लर्नर यांच्या मतांचाही संदर्भ घेतला आहे. यावरूनच हे लक्षात येते की लेखकाचे वर्तमानाचे भान सजग आहे.

पश्चिमी प्रभावापासून मुक्त

सुदैवाने डॉ. बोकरे पश्चिमी प्रभावापासून मुक्त आहेत. आधुनिकीकरणासाठी पश्चिमीकरण त्यांना आवश्यक वाटत नाही. पश्चिमी नमुना हाच विकासाचा व प्रगतीचा वैश्विक नमुना आहे या मताशी ते बिलकुल सहमत नाहीत. भारतासारख्या समृद्ध सांस्कृतिक वारसा असलेल्या प्राचीन देशाने स्वत:चे अंतिम गंतव्य स्पष्ट करण्यासाठी पश्चिमी संज्ञांचा वापर करावा ही नामुष्कीची गोष्ट आहे.

आधुनिक वैज्ञानिक पद्धतीचे विश्लेषण

पण डॉ. बोकरे यांचा प्रबंध वेगळ्या कारणानेही वैशिष्ट्यपूर्ण ठरतो. वर्तमान आधुनिक संदर्भात हिंदू विचार मांडण्यात नेहमीच एक अडचण उभी असे. खरे तर ती मोठी चमत्कारिक विरोधाभासाचीच परिस्थिती होती. हिंदू ग्रंथांबाबत अधिकारी व्यक्तींना पश्चिमी विचारांचा पुरेसा परिचय नसे आणि जे पश्चिमी विचारात तज्ञ होते, ते हिंदू धर्मग्रंथांबाबत फारच अज्ञानी असत.

वस्तुस्थिती अशी होती की जे जे हिंदू, त्या संबंधीचा तुच्छेतेचा भाव मनात असल्यामुळे या पश्चिमी शास्त्रसंपन्न तथाकथित बुद्धिवंतांनी संस्कृत भाषेचा अभ्यास करण्याची तसदी कधीच घेतली नाही, मग तिच्यातील 'आर्ष' रूपांची तर गोष्टच सोडा! संस्कृत संहितांबद्दल जे काही ज्ञान त्यांना झाले होते ते केवळ विशेषकरून युरोपीय अभ्यासकांनी केलेल्या त्यांच्या भाषांतरावरून! आणि या युरोपीय अभ्यासकांना संस्कृत भाषेचे रूप आणि सत्त्व हे त्यांच्या स्वत:च्या परकीयत्वामुळे पुरते समजलेलेच नव्हते. त्यांच्या दृष्टीने वैदिक वाङ्मयातील 'आर्ष' भाषा ही तर ग्रीक व हिब्रूइतकीच दुर्बोध होती. अभिजात संस्कृत वाङ्मयाबद्दलची त्यांची धारणा अगदीच जुजबी व अनुचित होती. रामायण, महाभारत, मनुस्मृति आणि अर्थशास्त्र यांची त्यांनी पौराणिक ग्रंथ म्हणून संभावना केली होती. त्यामुळे त्यांच्यांतील जे अधिक 'शहाणे' होते, त्यांना अनेक सर्गांच्या व सात कांडांच्या रामायणाचा, १८ पर्वांच्या महाभारताचा, १२ प्रकरणांच्या मनुस्मृतीचा व १५० प्रकरणे व आणि १५ अधिकरणांच्या 'अर्थशास्त्रा'चा अभ्यास करणे म्हणजे वेळ आणि श्रम यांचा प्रचंड अपव्यय वाटत होता. मग पुढे विविध स्मृतींचे कर्ते आणि कौटिल्याचे पूर्वसुरी यांचे त्यांनी नावही घेतले नाही, यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही.

या त्यांच्या पूर्वग्रहांमुळे आधुनिक अर्थशास्त्रातील अनेक प्रमेयांचे उगम, मानव्याचा सर्वात प्राचीन ग्रंथ जो ऋग्वेद त्यामध्ये सापडू शकतात असा संशयसुद्धा त्यांना येणे शक्य नव्हते.

डॉ. बोकरे यांच्याबाबतची परिस्थिती वेगळी आहे. मुळात ते अनेक दशके अत्यंत कडवे साम्यवादी होते. स्वत:च्या पक्षाच्या प्रचारासाठी त्यांनी आपल्या शिकविण्याच्या वर्गाचे रूपांतर, पक्षासाठी कार्यकर्ते भरती करण्याच्या कार्यशाळेत केलेले होते. अर्थशास्त्राचे विद्वान प्राध्यापक म्हणून एकाच वेळी अभिजात व नव-अभिजात अर्थशास्त्रामध्ये त्यांचा अधिकार होताच आणि पश्चिमी अर्थशास्त्राच्या, ॲडम स्मिथपासून ते रिकार्डो, माल्थस आणि सॅम्युअलसनपर्यंतच्या सर्व प्रवर्तकांशी त्यांची जवळीक होती.

आमच्या ऋषीमुनींनी म्हटले आहे की कडव्या पोथीनिष्ठेचा अभाव हे प्रामाणिक बुद्धिनिष्ठेचे फलित आहे. 'बुद्धे फलं अनाग्रह:।' अशाच प्रकारच्या बौद्धिक सचोटीमुळे डॉ. बोकरे यांना इस्लाम व ख्रिस्ती पंथ यांच्या समग्र वाङ्मयाचा, त्याचप्रमाणे गांधीवादी अर्थशास्त्राचा आणि शेवटी हिंदू अर्थशास्त्राचा यादृष्टीने अत्यंत सखोल अभ्यास करण्याची प्रेरणा मिळाली. गांधीवादावरील अधिकारी व्यक्ती यादृष्टीने त्यांना मान्यता आहे आणि त्यांचा *Economic Theory of Sarvodaya* हा ग्रंथ या विषयावरील प्रमाणग्रंथ मानला जातो.

आयुष्यभराच्या तपश्चर्येचे फलित

हिंदू अर्थशास्त्राचा अभ्यास सुरू केल्यावर वैदिक अर्थशास्त्रात, आधुनिक अर्थशास्त्रातील अनेक आर्थिक प्रमेये रद्दबातल करू शकणारी आर्थिक विकासाची दिशा पाहून त्यांची विचारशक्ती रोमांचित झाली होती. हिंदू अर्थशास्त्राचा उलगडा करण्याचे काम हाती घेण्याच्या व्रताचा त्यांचा निर्धार म्हणजे आयुष्यभर वैज्ञानिक विचारवंत म्हणून केलेल्या तपश्चर्येचे पर्यवसानरूप असे एक प्रगल्भ फलित आहे. एका अर्थाने असे निरपवादपणे म्हणता येईल की *The Hindu Economics* हा ग्रंथ लिहिण्यासाठी डॉ. बोकरे यांनी सदुसष्ट वर्षे घेतली आणि तरीही त्यांच्या या दिशेच्या प्रदीर्घ प्रवासातील हे केवळ पहिलेच पाऊल आहे. त्यांची खात्री झाली आहे की कुराण, बायबल आणि गांधीवादी अर्थशास्त्र यांमधील सर्व उदात्त बाबींची परिपूर्ती हिंदू अर्थशास्त्राने केलेली आहे. त्यामुळेच ज्याप्रमाणे १९८४ मध्येच त्यांनी साम्यवादाच्या विलयाचे भविष्य वर्तविले होते. त्याचप्रमाणे त्यांनी १९९२ मध्ये, 'हिंदू अर्थशास्त्र हे भविष्यकाळाचे अर्थशास्त्र आहे' अशी घोषणा केली आहे.

धर्मानॉमिक्स (Dharmanomics) च्या पूर्वसंकेताची प्रसादचिन्हे

यादृष्टीने आजच्या क्षणाची एक तातडीची गरज या पुस्तकाने पूर्ण केली आहे हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य आहे. हिंदू अर्थशास्त्रावरील पूर्वोल्लेखित ग्रंथ हे साम्यवाद व भांडवलवाद यांच्या भरभराटीच्या काळात लिहिले गेल्याने त्यांची दखल घेण्याच्या मन:स्थितीत कोणी नव्हते, याचा मागे उल्लेख केला आहे. पण आज जग विकासविषयक

तत्त्वप्रणालीच्या संदर्भात एका हताश पोकळीचा अनुभव घेत असताना या निर्वाणीच्या पार्श्वभूमीवर हा ग्रंथ अवतीर्ण झाला आणि ही पोकळी भरून काढण्याचा दावा तो मोठ्या धिटाईने करीत आहे, त्याचबरोबर अंतिमतः जो 'केवल' मार्ग ठरणार आहे अशा तिसऱ्या मार्गाचा निर्देश करीत आहे. त्यादृष्टीने हा ग्रंथ म्हणजे डॉ. पी. आर. ब्रह्मानंद यांनी ज्याचे Dharmanomics असे सयुक्तिक वर्णन कसे आहे त्याच्याच पूर्वसंकेताचे प्रसादचिन्ह आहे. या संपूर्ण ग्रंथाच्या समग्र विवेचनातून व्यक्त होणाऱ्या विचारव्यूहाची प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे थोडक्यात मांडता येतील.

पश्चिमी व हिंदू असे दोन पूर्णतः भिन्न नमुने आहेत आणि त्यांची मूल्यव्यवस्था संस्थात्मकरचना व संदर्भनिकष हेही सर्व वेगवेगळे आहे.

पश्चिमी	हिंदू
- कप्प्याकप्प्यांची विचारप्रक्रिया	एकात्म विचारप्रक्रिया
- मानव म्हणजे केवळ भौतिक आस्तित्व	मानव म्हणजे शारीरिक, मानसिक, बौद्धिक, आध्यात्मिक आस्तित्व
- अर्थकामाची गुलामी	पुरुषार्थ चतुष्ट्याकडे गती
- आत्मकेंद्रित व्यक्तींचे मंडळ म्हणजे समाज	समाज म्हणजे व्यक्तींशी अवयव अवयवी संबंधाने सिद्ध होणारी घटना
- स्वतःच्या आनंदाचा हव्यास	सर्वेपि सुखिनः सन्तु।
- लोभीपणा	अपरिग्रह
- उपभोक्तावाद	संयत उपभोग
- लाभलक्ष्यी	सेवालक्ष्यी
- शोषण	अंत्योदय
- इतरांच्या कर्तव्याबद्दल सतर्क असलेली हक्कप्रवणता	इतरांच्या हक्काबद्दल संवेदनशील असलेली कर्तव्यतत्परता
- कृत्रिम टंचाई	उत्पादनाची विपुलता
- वाढत्या किंमतीची अर्थनीती	घटत्या किंमतीची अर्थरचना
- विविध माध्यमातून *व्यक्त होणारा मक्तेदारी भांडवलवाद	सट्टेबाज बाजारव्यवस्थेविना होणारी मुक्त स्पर्धा

---

* उदा. बौद्धिक संपदा अधिकार, बोध चिन्हे, ग्रंथ निर्मिति-प्रकाशनावरील स्वामित्व, व्यापारी नावे, परवाने, नियतांक, संरक्षक जकात, उत्पादक संघ, व्यापार संघ, समुचय विक्रय संघ, नियंत्रक समवाय अथवा आंतरउद्योग संचालक मंडळ, आंतरउद्योग गुंतवणूक इ.

- वेतन रोजगाराभोवती गुंफलेली प्रणाली	स्वयंरोजगाराभोवती गुंफलेली आर्थिक प्रणाली
- कामगारांची सतत वाढणारी फौज	सतत वाढणारा 'विश्वकर्मा' विभाग (स्वयंरोजगाराचा विभाग)
- विषमतेची वाढती दरी	न्याय्य व समताधिष्ठित व्यवस्थेकडे वाटचाल
- निसर्गावरील अत्याचार	निसर्गाचे दोहन
- व्यक्ती, समाज व निसर्ग यांच्यातील निरंतर संघर्ष	व्यक्ती-समाज-निसर्ग यांच्यातील संपूर्ण सुमेळ.

दोन संपूर्ण भिन्न नमुने- प्रत्येक समाजाने स्वत:चा नमुना निवडावा. पूर्णत: स्वीकार वा पूर्णत: नकार या तत्त्वावर !

प्रस्तुत ग्रंथातील विचारव्यूहाची वर उल्लेखिलेली तुलनात्मक सूत्रे पाहिली की लक्षात येते की आतापर्यंत वेगवेगळ्या संदर्भात व्यक्त झालेली एकात्म मानव दर्शनातील पं. दीनदयाळ उपाध्यायांच्या आर्थिक चिंतनाची सूत्रे व आधी स्पष्ट केलेले श्री. गुरुजींचे आर्थिक नीतीविषयीचे संकेत यांच्याशी सुसंगत असाच विचार डॉ. बोकरे यांनी, 'हिंदू अर्थशास्त्र' म्हणून मांडला आहे.

पूर्वी दिलेल्या वर्तमान जागतिक आर्थिक व्यवस्थेतील अधिक उण्या वास्तवाच्या चित्रणावरून व वर दिलेल्या तुलनात्मक नमुन्यांवरून हे दिसून येते की विकासाची एकांगी भौतिक कल्पना, तंत्रविज्ञानाचे अविवेकी उपयोजन आणि पर्यावरणात्मक बेपर्वाई यामुळेच मानवजात धोक्यात आली आहे. त्यामुळेच पश्चिमेकडील समाजहितैषी व खऱ्या अर्थाने मानवतावादी विचारवंत फेरविचार करू लागले आहेत आणि भारतातील प्रामाणिक विचारवंतांनाही वर्तमान विकास नमुन्याचा घातकपणा जाणवू लागला आहे हे आपण पूर्वी पाहिले आहे.

तथाकथित पुरोगाम्यांचा हटवादी धारणा.

असे असूनही आमच्या तथाकथित पुरोगामी विचारवंतांच्या डोक्यात मात्र पश्चिमी विकासनमुना हाच वैश्विक नमुना आहे ही धारणा अजूनही घट्ट रुतून बसली आहे आणि ते हिंदू विकाससंकल्पना, हिंदू अर्थशास्त्र, स्वदेशी आंदोलन या सर्वांची संभावना त्याच पश्चिमाळलेल्या मनस्थितीत करीत असतात.

पश्चिमीवादाची भुरळ

त्याचबरोबर हे खरे आहे की भारतात असे काही लोक आहेत की जे परकीय प्रभावामुळे निर्माण झालेल्या संक्रमणात्मक व संशयात्मक वातावरणात पाश्चिमात्यांइतके नाही तरी अधिकांशाने भौतिकवादी बनले आहेत व त्यामुळे ते यापैकी कोणत्याच

गोष्टींवर विश्वास ठेवत नाहीत. शिवाय पश्चिमी गोऱ्या समाजांच्या वैभवशाली स्वरूपाच्या आकर्षणामुळे आमच्या समाजाच्या मनात न्यूनगंडाची भावना निर्माण करण्यात मेकॉलेच्या वारसदार अशा आमच्या विद्वानांचा वाटा आजही फार मोठा आहे. त्यामुळे आजच्या परिस्थितीबद्दल सामान्य माणूस हा निराश, नाउमेद झाला आहे. कारण त्याला वाटते की आमची एकूण लायकीच कमी असून सध्याची परिस्थिती ही आमच्या अंगभूत उणिवांचा परिपाक आहे.

आणि आमचे विचारवंत पश्चिमीवादाला कसे भुलले आहेत हे आपल्याला माहीत आहे. 'पश्चिमी' ते सर्व योग्य, 'हिंदू' ते सर्व कमी प्रतीचे असे त्यांचे मानस बनले आहे. त्यांच्या दृष्टीने शेक्सपियर हा ब्रिटनचा कालिदास नव्हे, नेपोलियन हा युरोपचा समुद्रगुप्त नव्हे तर सरदार पटेल भारताचे बिस्मार्क आहेत. गीता हा थोर ग्रंथ असलाच पाहिजे कारण इमर्सन तसे म्हणतो. शाक्त व तंत्र हे तितकेसे निंद्य नाहीत कारण सर जॉन वुड्रोफ त्यांचा पुरस्कार करीत आहेत. कोण्या पश्चिमी मान्यवराने त्यांना मान्यता दिल्याशिवाय नरेंद्र आणि रवींद्र हे आम्हाला मान्य कसे होतील? गोऱ्या माणसाचे इतरांवरील वर्चस्व हे त्याच्या सांस्कृतिक प्रभुत्वाचेच लक्षण असले पाहिजे. चिनी विस्तारवादाविरुद्ध भक्कम तटबंदी म्हणून सात शतके उभे असलेले दक्षिण-पूर्व आशियातील शैलेंद्राचे साम्राज्य अथवा गुप्त घराण्याच्या अंमलाखालील हिंदूंचे सुवर्णयुग यांची यशोगाथा कोण गात आहे? या सर्व गोष्टी म्हणजे निव्वळ बाजारगप्पा आहेत. भाकडकथा आहेत. हिंदू नव्हेत, तर युरोपीय लोक प्रथम अमेरिकी किनाऱ्याला पोचले. प्राचीन काळातील हिंदूंच्या वैज्ञानिक प्रगतीची बडबड म्हणजे शुद्ध बाष्कळपणा आहे. विज्ञान हे उरल पर्वताच्या पूर्वेला भरभराटीला येईलच कसे? युरोपीय विद्येच्या पुनरुज्जीवन पर्वाच्या प्रारंभापर्यंत सर्व इतिहासच ठप्प झालेला होता. संस्कृत ही मृतभाषा आहे. लॅटीनच सर्व ज्ञानाचा मूलस्रोत आहे. भारतातील मूळ रहिवासी अशा आर्यवंशासंबंधीच्या पश्चिमी प्रणाली केवळ अनुमित असल्या तरी त्यांच्या खरेपणाबद्दल कोणीही आव्हान देऊ शकत नाही, कारण त्या पश्चिमी अभ्यासकांनी घोषित केल्या आहेत. कौटिल्याशी मॅकियावेलीशी तुलना तुम्ही कशी करू शकता? वा पश्चिमी घटनातज्ञांशी हिंदू कायद्याच्या प्रवर्तकांची कशी तुलना करू शकता? पतंजलीने दाखविलेली अंतर्दृष्टी फ्राइड, युंग आणि ॲडलर यांच्या सामूहिक शहाणपणापेक्षाही श्रेष्ठ होती असा दावा मांडणे हे कल्पनारम्यतेचे लक्षण आहे. एक समाजवैज्ञानिक म्हणून समर्थ रामदास हे हॉब्ज, लॉक, डेकार्ट, लिबनिट्झ आणि स्पिनोझा यांसारख्या समकालीन विचारवंतांपेक्षा फार पुढे होते अशी कल्पना करणेच अशक्य आहे.

सर्व रोगांवर पश्चिमच इलाज करू शकते (या समजातून) आमचे बुद्धिवंत आपल्या राजकीय, सामाजिक वा आर्थिक समस्यांच्या सोडवणुकीसाठी पश्चिम प्रणालींची मदत घेण्यासाठी धावतात. त्यांना स्वत:च्या संस्कृतीपासून शिकण्यासारखे काहीच

दिसत नाही. स्वत:च्या बुद्धीच्या तीक्ष्णतेवर ते भरवसा ठेवू शकत नाहीत. कोणा पश्चिमी मान्यवराने मान्य केलेली नसेल अशी कोणतीच प्रणाली ही बरोबर असूच शकत नाही. (असा त्यांचा ठाम ग्रह असतो). एखाद्या पश्चिमी प्रणालीने त्यांचा भ्रमनिरास झाला असेल तर ते स्वत:ची बुद्धी वापरण्याऐवजी आधारासाठी दुसऱ्या प्रणालीच्या शोधात धावतात. ॲडॅम स्मिथ, रिकार्डो, माल्थस, मिल, मार्क्स हे आता कालबाह्य झाले आहेत हे ते मान्य करतील. ए. मार्शल, विकेल, गुन्नर मिर्डाल, केन्स यांच्या सार्थतेबद्दल ते साशंक असतील; पण ते स्वत:च्या राष्ट्रीय गरजांच्या संदर्भात स्वतंत्र विचार करण्याचे मात्र अडमुठेपणाने नाकारतील. त्याऐवजी प्रा. रोस्टोने मांडलेल्या आर्थिक प्रगतीच्या पाच अवस्थांबद्दल त्यांना आंपलेपणा वाटेल आणि त्याने सांगितलेल्या 'सामूहिक उपभोगाच्या उच्चांकाच्या' पाचव्या अवस्थेपर्यंत नेणारी चौथी 'परिपूर्णतेसाठी करावयाच्या प्रयत्नांची' अवस्था गाठण्यासाठी आम्ही तिसऱ्या 'उड्डाणा'च्या अवस्थेपर्यंत आलो आहोत का याचीच चर्चा करण्यात गुंतून पडतील.

ही त्यांची प्रवृत्ती म्हणजे त्यांच्या 'पश्चिमीकरण म्हणजे आधुनिकीकरण' या गृहीतकृत्याचा स्वाभाविक परिणाम आहे.

डॉ. बोकऱ्यांच्या ग्रंथावरील प्रतिक्रिया

या वृत्तीमुळेच डॉ. बोकरे यांच्या ग्रंथातील हिंदू आर्थिक चिंतनाबद्दलचे विवेचन पाहून प्रस्थापिताश्रित (ठेवलेल्या) आणि विशेषत: डाव्या विचारवंतांना आश्चर्याचा कटू आवंढा गिळावा लागेल. कारण पूर्वाश्रमीचा एक मार्क्सवादी ठाशीवपणे मांडतो आहे की अर्थशास्त्रातील पहिला ग्रंथ भारतातच लिहिला गेला होता आणि जागतिक वाङ्मयामध्ये अर्थशास्त्राची व्याख्यादेखील भारतातच प्रथम केली गेली होती.

ही गोष्ट डॉ. बोकरे यांनी जे. के. गालब्रेथ यांच्यासारख्याच्या नजरेला आणून दिली आणि पश्चिमी अर्थशास्त्रज्ञांना प्राचीन भारतातील अर्थविषयक साहित्याचा परिचय करून देण्याची गरज आहे ही सूचना केली तेव्हा ही गोष्ट त्यांना भावली. काळाच्या ओघात डॉ. बोकऱ्यांना हे समजून येईल की स्वत:च्या बुद्धीची स्वायत्तता गमावण्यात आनंद मानणाऱ्या आणि अजूनही काही आधुनिक भ्रमांच्या प्रभावाखाली असणाऱ्या एतद्देशीय तथाकथित विचारवंतांना एखादे सत्य पटवून देण्यापेक्षा ते पश्चिमी विचारवंतांना पटवून देते सोपे आहे.

अर्थशास्त्रज्ञ या दृष्टीने आमचे हे आधुनिक तथाकथित अर्थशास्त्रज्ञ हे, आमच्या देशाच्या संपत्तीच्या लुटीची (Drain Theory) मीमांसा प्रथमच मांडणारे दादाभाई नौरोजी किंवा आपल्या देशातील महसूल, औद्योगीकरण, पतपेढ्या, करपद्धती आणि सार्वजनिक अर्थपुरवठा या साऱ्यांबद्दल ब्रिटिश साम्राज्यवादी अर्थनीतीवर प्रखर टीका करणारे न्या. मू. रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, रमेशचंद्र दत्त आदींचे वाजवी वारसदार

म्हणून, नक्कीच गणले जाणार नाहीत. त्यांना प्राचीन भारतातील 'अर्थचिंतक' म्हणजेच अर्थशास्त्राचे अध्यापक ही संज्ञाही माहीत नाही.

हिंदू राष्ट्रवाद्यांबद्दलची तुच्छता

ज्यावेळी हिंदू राष्ट्रवादी १९५५ साली आर्थिक क्षेत्रात उतरले, त्यावेळी ताबडतोब गिल्ला झाला की ही मंडळी अर्थशास्त्राबद्दल पूर्ण अनभिज्ञ आहेत. या आधुनिक विचारवंतांच्या मते ही गोष्ट जणू स्वयंसिद्धच होती. हिंदू राष्ट्रवादी अनभिज्ञ असले पाहिजेत, कारण ते 'हिंदू' आहेत. याव्यतिरिक्त काही असूच शकत नाही. राष्ट्रवाद्यांचे म्हणणे आणि कृती यांचा अत्यंत तुच्छतेने उपहास करण्यात आला. हे तर खरेच की राष्ट्रवादी या क्षेत्रात नव्याने उतरत होते; पण देशातील सर्व बुद्धिमत्तेचा मक्ता त्यांच्या विरोधकांना कोणी दिला हे मात्र कोडेच आहे. आयात केलेल्या बुद्धिमत्तेच्या या दलालांची बुद्धिमत्ता नव्हेच तर केवळ उद्धटपणा हीच महत्त्वाची जमेची बाजू होती.

कोण हा विश्वकर्मा ?

भारतीय मजदूर संघाने जेव्हा पारंपरिक विश्वकर्मा दिवस हाच 'राष्ट्रीय श्रमजीवी दिवस' म्हणून मानण्याचे घोषित केले तेव्हा डाव्या विचारसरणीच्या लोकांना धक्का बसला. कोण हा विश्वकर्मा ? भारताच्या जराजर्जर भूतकालातून त्याचे नेमके याचवेळी उत्खनन करण्यामागे कोणता हेतू आहे असे ते विचारू लागले. पुढे तर ते भारतीय अर्थविज्ञानातील 'विश्वकर्मा' क्षेत्राच्या कल्पनेने स्तिमितच झाले. पश्चिमी साहित्यात अशा प्रकारची धूसर, प्रतिगामी संज्ञा त्यांना आढळली नव्हती. केवळ सार्वजनिक क्षेत्र व खाजगी क्षेत्र अशी दोनच क्षेत्रे मानणाऱ्या पश्चिमी अर्थव्यवस्थेमध्ये अशा प्रकारचे स्वयंरोजगाराचे लोकायत क्षेत्र मानले गेलेच नव्हते. पाश्चिमात्यांजवळ स्वयंरोजगाराची कल्पना स्पष्ट करणारी कोणतीही रेखीव प्रणाली नव्हती. राष्ट्रीय उत्पन्नाच्या अंदाजामध्ये स्वयंरोजगाराचा घटक गृहीत धरलेला असूनसुद्धा पाश्चिमात्यांच्या विश्लेषणात्मक अर्थनीतीमध्ये वेतनरोजगार हा एकच पर्याय प्रकार उपलब्ध आहे. त्यामुळे विश्वकर्मा क्षेत्राच्या अस्तित्वाला कोणतेही समर्थन नाही आणि त्यामुळे हे क्षेत्र 'नाही रे' च्या क्षेत्रात मिळून जाईल असे त्यांनी ठामपणे सांगितले पण जेव्हा सोव्हिएट युनियनने पुढे गृहोद्योग (कुटिरोद्योग) कायदा केला आणि साम्यवादी चीन व हंगेरी यांनीही या स्वयंरोजगाराच्या क्षेत्राला कायदेशीर अधिष्ठान दिले तेव्हा भारतातील या पश्चिमाळलेल्या डाव्या अर्थतज्ञांचा केवढा मुखभंग झाला असेल याची केवळ कल्पनाच करता येईल.

अद्‌भुतरम्य बाष्कळपणा ?

जेव्हा भारतीय मजदूर संघाने भारताला प्रदीर्घ व वैशिष्ट्यपूर्ण अशी आर्थिक चिंतनाची परंपरा आहे असा दावा केला तेव्हा डाव्यांनी त्याची अद्‌भुतरम्य बाष्कळपणा अशी संभावना केली. कौटिल्याने अर्थशास्त्रात पूर्वसुरींच्या प्रदीर्घ अभ्यासपरंपरेचा केलेला उल्लेख आणि भारतीय मजदूर संघाने भारतीय सामाजिक आर्थिक रचनांचा केलेला पुरस्कार, पश्चिमी जीवनसरणीचे हे शिष्योत्तम तुच्छतापूर्वक कुचेष्टेने ऐकत होते. मागे उल्लेखिलेले हिंदू उद्योगसंघाचे उदाहरण त्यांच्यादृष्टीने कल्पनारम्यच होते. त्यातही शासकीय हस्तक्षेपाच्या पूर्ण अभावाबद्दल डाव्यांचा शेरा होता– 'असंभाव्य नंदनवन !'

स्वाभाविकपणेच भारतीय मजदूर संघाची उद्योगधंद्यांच्या श्रमप्रवणतेची (labourisation) कल्पना ही त्यांच्या पढिक आकलनाच्या पलीकडची होती. हिंदू अर्थशास्त्राने वेतननिष्ठ रोजगारकल्पनेत मालक - मजूर यांचे सुयोग्यरीतीने नियंत्रित केलेले संबंध या विचारवंतांना अशक्य वाटले. पश्चिमेच्या औद्योगिकतेच्या परिघाबाहेर आणि विशेषत: औद्योगिक क्रांतीच्या आक्रमापुढे ही गोष्ट कठीण होती असे त्यांनी आव्हान दिले. भारतीय मजदूर संघाने प्रतिवादासाठी पूर्वी उल्लेखिलेल्या 'शुक्रनीती'मधील अनेक नियंत्रक तरतुदी प्रसिद्ध केल्या.

अक्कलहुशारीने केलेला बनाव

त्यावर प्रतिक्रिया कोणती ?

'अतिशय हुशारीने केलेला हा बनाव आहे. आधुनिक काळाच्या संदर्भात भारतीय मजदूर संघाच्या कार्यकर्त्यांनी या सर्व तरतुदी मराठीत वा हिंदीत लिहिल्या असतील, त्यानंतर डॉ. वर्णेकरांसारख्याकडून संस्कृतामधील संहितेप्रमाणे त्या रचून घेतल्या असतील आणि कदाचित प्रत्यक्षात कधी जन्मालाच न आलेल्या शुक्राचार्यांच्या नावावर खपविल्या असतील. कालविपर्यासाचा हा एक अतिशय प्रशंसनीय व्यापार ठरावा.'

अशाप्रकारची प्रतिक्रिया स्वाभाविक होती. केवळ वेतनाधिष्ठित रोजगाराचा विचार करणाऱ्या पश्चिमी अर्थशास्त्रीय प्रणालींच्या कक्षेत परिपूर्ण रोजगाराच्या स्थितीची कल्पनाही अशक्य होती. त्यामुळेच पश्चिमी पार्श्वभूमीवर गठित केलेले औद्योगिक संबंधांबद्दलचे नियम हे शुक्र वा अन्य हिंदू संविधानकाराच्या नियमाच्या तुलनेत गुणात्मकतेच्या दृष्टीने कुठेही बरोबरीचे असूच शकत नाहीत.

पुरोगामी विचारवंतांचे बेपर्वा अज्ञान

आमच्या ऋषिमुनींच्या पारलौकिक दृष्टीची या स्वयंमन्य आधुनिक विचारवंतांना काहीशी भावात्मक आणि साक्षात माहिती होती. त्यामुळे बाजार आवारे, वजने,

परिमाणे, गुणवत्तेच्या कसोटीखालील माल, विक्रेता - ग्राहक नाते, व्यापारातील अवांछनीय व्यवहार अशा विषयांमध्ये या ऋषींनी काही रस घ्यावा अशी मुळात या विचारवंतांची अपेक्षाच नव्हती. त्यामुळे कौटिल्याच्या अर्थशास्त्रातील ४ थ्या अधिकरणाच्या २ऱ्या प्रकरणात आलेल्या, ग्राहकाला संरक्षण देण्याच्या तरतुदी ध्यानात घेण्याच्या मनस्थितीत ते नव्हते. एवढेच काय, पण साधारणपणे सुध्दा कौटिल्याच्या अर्थशास्त्रावरील स्पेंगलरचे भाष्य अथवा मनूवरील वेन्डीचे भाष्य यांचीही पुरेशा गांभीर्यने दखल घेण्याची त्यांची तयारी नव्हती. 'स्मृति' म्हणजे उपचार - विधी, कर्मकांड यांनी भरलेले कालबाह्य ग्रंथ अशीच त्यांची धारणा होती. स्मृतींचे स्वरूप प्राधान्याने समाजशास्त्रीय आहे हे त्यांना उमलेच नव्हते. मनुस्मृति, याज्ञवल्क्यस्मृति, नारदस्मृति यांमधील पूर्वोल्लेखित अशा व्यापारातील गैरव्यहारांपासून ग्राहकाला संरक्षण देण्याच्या कायदेशीर तरतुदींमुळे या विचारवंतांच्या पूर्वग्रहदूषित कल्पनांना चांगलाच धक्का बसला. यांना हे माहितच नव्हते की पश्चिमी अभिजात अर्थनीतीची घोषणा ही 'ग्राहकांनो खबरदार' ही होती तर वैदिक अर्थनीतीमध्ये, 'विक्रेत्यांनो खबरदार' अशी घोषणा होती. त्याचप्रमाणे, सतत भाववाढीच्या आर्थिक संस्कृतीशीच परिचित असलेल्या या विचारवंतांना घटत्या भावांच्या आर्थिक रचनेतील किंमतविषयक धोरणाचे पुरेसे आकलनही कठिण होते.

खरे तर किंमतवषियक धोरण पश्चिमेत प्राचीन काळी अस्तित्वातच नव्हते. कारण वेतन आणि व्याज यांचा आर्थिक घटक म्हणून पूर्वी पूर्ण अभाव होता.

Economics in Perspectives या ग्रंथात जे. के. गालब्रेथ यांनी असे मत व्यक्त केले आहे की, 'वेतन आणि व्याज यांच्या प्राचीन जगतातील अभावामुळे, कोणत्याही आधुनिक अर्थाने, 'किंमतविषयक धोरण' असे काही असणे शक्यच नव्हते. कोणत्या ना कोणत्याप्रकारे किंमती या उत्पादनमूल्यावर ठरविल्या जात आणि गुलामांवर ताबा असलेल्या घरांमध्ये, 'उत्पादन मूल्य' ही संकल्पना दृश्य स्वरूपात कधीच कार्यरत नसे'. विषयाच्या स्पष्टतेसाठी हे लक्षात घेतले पाहिजे की गालब्रेथने उल्लेखिलेले पश्चिमी जग हे अथेन्सपासून न्यूयॉर्कपर्यंतच सीमित होते, तर हिंदूंचे जग मात्र या सागरापासून त्या सागरापर्यंत संपूर्ण, पृथ्वीचे एकसंध राष्ट्राच्या स्वरूपात पसरले होते. 'पृथिव्यै समुद्र पर्यताया एक राष्ट्र' !

जाता जाता तुलनेसाठी हेही लक्षात घेणे आवश्यक आहे की ग्रीक आणि ख्रिश्चन तत्त्वज्ञ आर्थिक विषयाच्या केवळ नैतिक बाजूचाच विचार करीत असत. 'किंमती ठरविणारे घटक कोणते याचा त्यांनी विचारच केला नाही. किंमती या न्याय्य व वाजवी आहेत की नाहीत? का त्या पापमूलक, अनैतिक आहेत?' येवढ्याच मुद्याबाबत त्यांना स्वारस्य होते. सेंट थॉमस अक्विनस व मार्टिन ल्यूथर यांनी व्याजाचाही नैतिक दृष्टिकोणातून विचार केला आहे.

या आपल्या पश्चिमाळलेल्या विचारवंतांना विचारले की हिंदू अर्थशास्त्र हे उपयोजित

अर्थशास्त्र होऊ शकते का? तर त्यांचे तात्काळ उत्तर येईल, 'अशक्य'! कारण त्यांच्या मते जे पश्चिमी प्रणालींना धरून नाही आणि पश्चिमी पद्धतीचा अवलंब करीत नाही ते आधुनिक जगात पूर्णत: अव्यवहार्य आहे.

पण ही त्यांची धारणा केवळ आर्थिक क्षेत्राबद्दल असते असे नाही हे आपण पूर्वीही पाहिले आहे.

जेव्हा श्रीमती इंदिरा गांधींनी स्टॉकहोम येथील १९७२ च्या जागतिक पर्यावरण परिषदेसमोर सांगितले की अथर्ववेदात पर्यावरणात्मक प्रदूषणाचे प्रतिबंधक उपाय सांगितले आहेत तेव्हा या डाव्या विद्वानांचा उद्वेग उफाळून आला. अशा प्रकारे स्वत:शीच अनोळखी झालेला हा तथाकथित बुद्धिवंतांचा वर्ग कोडगा बनलेला असतो.

पण अशांच्या बौद्धिक औद्धत्याला सर्वात असह्य टोला बसला तो तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात! तो टोला *The Universe of Vedanta* या ग्रंथामुळे प्रसिद्ध झालेले कॉ. बा. नी. देशपांडे यांनी आणि या ग्रंथाला प्रस्तावना लिहिणारे कॉ. डांगे यांनी दिला.

अवकाश आणि काल यांची सापेक्षता आणि कालाची वस्तुमानता यासंबंधीच्या प्रणाली वैदिक तत्त्वज्ञांना केवळ ज्ञातच होत्या असे नाही तर आइन्स्टिनने आधुनिक भौतिकात सिद्ध केल्याप्रमाणेच त्यांनी त्या वैज्ञानिक पातळीवर सिद्धही केल्या होत्या आणि तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातही वैदिक दृष्टिकोण हा केवळ आधुनिक शास्त्रीय प्रणालींच्या ऐतिहासिक उपलब्धी समजून घेण्यापुरता वैज्ञानिक नव्हता तर कार्ल मार्क्सच्या नावाने गेल्या शतकात प्रचलित झालेल्या तर्कशुद्ध भौतिकवादाच्या अतिशय शास्त्रशुद्ध व परिपूर्ण सिद्धांतावर तो आधारलेला होता, हे कॉ. बा. नी. देशपांडे यांनी निर्णायकरीतीने सिद्ध केले आहे. ऋग्वेदातील 'नासदीय सूक्त' म्हणजे जगाच्या इतिहासाच्या अतिप्राचीन नोंदणीतील केवळ तत्त्वज्ञानाचाच नव्हे तर तर्कशुद्ध भौतिकवादाचाही मुळारंभ ठरतो हे कॉ. डांगे यांनी नि:संदिग्धपणे जाहीर केले.

पण जे जे 'भारतीय' त्या संबंधीच्या आत्मतुष्ट अज्ञानामध्ये मशगुल असलेल्या डाव्या विचारवंतांनी या प्रबंधाकडे त्याच्या योग्यतेच्या मानाने लक्षच दिले नाही. त्यात उपस्थित केलेल्या मुद्यांवर आवश्यक अशाप्रकारची परिचर्चाही झाली नाही. त्यावर पुरेसे विचारमंथनही झालेले नाही. पश्चिमी जगातून आयात केलेले तथाकथित पुरोगामी संकेत पाळून त्यांनी या विचारवंतांची 'काफर' किंवा 'पुनरुज्जीवनवादी' म्हणून संभावना केली आणि मामला तेथेच संपला. त्यामुळेच त्यांचेच आचार्य पं. नेहरू यांनी, विज्ञान आणि अध्यात्म यांचे मिलन घडवून आणण्याचे जे आवाहन केले, त्याचा मखलाशी आत्मवंचनेने विषाक्त झालेल्या या तथाकथित पुरोगाम्यांच्या मनावर साधा ओरखडाही उठू शकला नाही, त्यात आश्चर्य नाही. शास्त्र आणि अध्यात्म हे परस्पर विरोधी आहे व सर्व विज्ञान हे केवळ पश्चिमी कर्तृत्व आहे

अशी त्यांची दृढ धारणा होती.

त्यामुळेच, 'भास्कराचार्यांचे गुरुत्वाकर्षणाचा सिध्दांन्त न्यूटनच्या कितीतरी शतके आधीच लावला होता; गॅलिलिओ आणि कोपरनिकस यांच्या कितीतरी पूर्वी ५ व्या शतकातच आर्यभट्टाने, 'पृथ्वी सूर्याभोवती फिरत असल्याची' कल्पना मांडली होती; गणितातील शून्याची संकल्पना आणि दशमान पद्धती यांचे मूळ हिंदुस्थानात आहे; लस टोचणे आणि प्लॅस्टिक शस्त्रक्रिया या गोष्टी जग भारतापासून शिकले; धातुशास्त्र आणि रसायनशास्त्र यांतील भारतीय तंत्रविज्ञान हे अगदी १९ व्या शतकापर्यंत पश्चिमी देशांपेक्षा फारच मोठे श्रेष्ठ होते' ; या साऱ्या प्रस्थापित गोष्टी मान्य करण्याची त्यांची मानसिकता नव्हती.

सांस्कृतिक वारशाचाच आधार हे केव्हा कळणार ?

पण या सर्व परकीय इहवादी प्रभावाखालील पश्चिमाळलेल्या पुरोगामी विचारवंतांना हे समजत नाही का, की आपल्या सांस्कृतिक वारशाव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्या गोष्टींच्या साहाय्याने भारत सध्याच्या दुरवस्थेपासून स्वत:ला वाचवू शकेल ? पश्चिमी इहवाद्यांनी मानवी मनाच्या व्यापाराचे महत्त्व लक्षातच न घेतल्याने त्यांना, भूतकाळाबद्दलचा वाजवी अभिमान हा भविष्याबद्दलच्या सयुक्तिक आकांक्षा कशा निर्माण करतो आणि अशाप्रकारे भूतकाळाचा गौरव करण्याच्या प्रयत्नांमध्येच भविष्यातील वैभवाची बीजे कशी रुजलेली असतात, हे त्यांना समजू शकलेले नाही. या संदर्भात आपल्या *Studies in A Dying Culture* या ग्रंथात ख्रिस्टोफर कॉड्वेल यांनी मांडलेले मत लक्षणीय आहे.

'प्राचीन अभिजात वाङ्मयाकडे परत वळण्यामुळे, प्राचीन विद्येच्या पुनरुज्जीवनाच्या स्थितिवादी उच्चमध्यमवर्गीय पर्वावर प्रभाव पाडला. रोमच्या इतिहासामुळेच नेपोलियन आणि क्रांती प्रभावित झाली. आदिम मानवाच्या, निर्लेप (संस्कृतीच्या पुटांनी न डागाळलेल्या) स्थितीकडे जाण्याचे ध्येय १८ व्या शतकातील क्रांतिकारकांनी आपल्यासमोर ठेवले होते आणि तरीही अशा सर्व माणसांना अशावेळी नवमानवाचे ताण त्यांच्या अंत:करणात जाणवत असतात....(या नवमानवाला) वाटत असते की भूतकाळ वाचविण्यासाठी अथवा पुन्हा प्रस्थापित करण्यासाठीच आपला जन्म आहे आणि हे जेव्हा घडते तेव्हाच भविष्य अस्तित्वात आल्याचे स्पष्ट होते. आदिम ख्रिस्तीवादाकडे वळणारा सुधारकच उच्चमध्यमवर्गीय प्रॉटेस्टंट प्रणालीला जन्म देतो.'

(The return to the classics dominated the bourgeois Renaissance. Rome influenced Napolean and the Revolution. The return to the natural uncorrupted man was the ideal of eighteenth century revolutionists. Yet, it is the new man whose tension men feel in their minds and hearts at such times.... He may think, it is the past he is born to save or re-establish

on earth, and only when it is done, is it seen that the future has come into being. The reformer returning to primitive Christianity brings bourgeois Protestantism into being.)

या सगळ्या पार्श्वभूमीवर विचार करता हे लक्षात येते की आतापर्यंत हिंदू चिंतनातील ज्या गोष्टी आपण पाहिल्या, ज्या नोंदी उल्लेखिल्या त्यांच्या आधारे आपल्याला पुढे विचार करणे क्रमप्राप्त आहे. अर्थातच 'दिशावेध' प्रारूपात व नंतरही हिंदू जीवनदृष्टीच्या संदर्भात आवश्यक तेथे सूचित केल्याप्रमाणे या पारंपरिक जीवनदृष्टीच्या आधारावर, वर्तमान वास्तव व आवश्यकता लक्षात घेऊन आणि भविष्यातील आकांक्षांचा वेध घेतच आज युगानुकूल असाच, व्यवहार्य क्रमविकासाचा नमुना सिद्ध करणे आवश्यक आहे.

समुचित तंत्रविज्ञानाबद्दलच्या न्यूनगंडाचा त्याग

म्हणून प्रारंभी पश्चिमी भौतिक नुमन्याच्या अंतर्गत, कळीचा पैलू ठरलेल्या तंत्रविज्ञानाचा मुद्दा हाच विचारात घेणे उचित ठरेल.

एकूणच या विषयातील जाणवणारी प्राथमिकता म्हणजे भारताने स्वत:चा न्यूनगंड टाकला पाहिजे. इतर दक्षिणी विकसनशील देशांशी परस्पर सहकार्याची बांधिलकी मानली पाहिजे म्हणजे त्याचे त्यालाच लक्षात येईल की उत्तरी देश त्याच्याबाबतीत समजतात त्यापेक्षा कितीतरी अधिक तो सक्षम आहे. छोट्या बायफ्राचे उदाहरण आपल्यालाही प्रेरणादायी ठरावे. मानवी व भौतिक संपत्तीची कोणतीही पातळी असली तरी आपण निश्चितच स्वत:ची औद्योगिक रणनीती ठरवू शकतो आणि आपला औद्योगिक आराखडा बनवू शकतो. कार्यक्षमतेची रोजगाराशी सांगड घालून व 'सर्वसामान्य जनतेद्वारा उत्पादन' हे ध्येय ठेवून आपण शक्य तेवढे डॉ. शूमाकर यांचे 'मध्यम' स्वरूपाचे वा समुचित तंत्रविज्ञानाचे धोरण अवलंबू शकतो. (जाता जाता हे लक्षात घेतले पाहिजे की डॉ. शूमाकर यांनी आपली आर्थिक चिंतन प्रणाली रचण्यापूर्वी जर भारतातील ग्रामीण भागातील प्रचलित व्यवस्थांचे व्यापक निरीक्षण केले असते तर त्यांनी आपल्या चिंतनप्रणालीला बौद्ध (पौर्वात्य) अर्थशास्त्र न म्हणता दुसरे (हिंदू) नाव दिले असते, असे म्हणण्याला जागा आहे. कारण बौध्द आणि हिंदू चिंतन यांत मूलत: काहीच फरक नाही. डॉ. जे. के. मेहतांच्या (याच विचारसरणीतून आलेल्या) 'गरजहीनते'च्या प्रणालीवर 'धम्मपदा'चा जेवढा प्रभाव आहे तेवढाच 'ईशावास्योनिषदा'चाही आहे.) या तंत्रविज्ञानाच्या क्षेत्रात नवागतच असल्याने आपण प्रारंभापासूनच पर्यावरण, अर्थनीती आणि नैतिक कर्तव्यसंकेत या संदर्भात एकात्म दृष्टिकोण अवलंबू शकतो. वस्तुत: आपल्याकडे वैज्ञानिक प्रतिभा, सामग्रीस्रोत आहेत, मनुष्यबळ आहे. असे असूनही केवळ आत्मविश्वासाच्या अभावामुळे आपण इतरांच्या मागे पडलो आहोत. दुसऱ्या महायुद्धात उद्ध्वस्त झालेले जर्मनी,

जपान हे देश पुढे येऊन आजवरच्या महासत्तांशी स्पर्धा करीत आहेत. मनुष्यबळ आणि भूभाग यांच्या दृष्टीने अगदीच छोटा असलेला, नुकताच निर्माण झालेला इस्त्राइल हा देश जगाच्या कौतुकाचा विषय बनला आहे. पण न्यूनगंडाच्या भावनेने आपल्या सामान्य नागरिकाला मात्र, महान राष्ट्र बनण्याची आपली लायकीच नाही असे वाटत आहे.

आत्मविश्वासाच्या अभावाचा परिणाम

अशाप्रकारचे आत्मविश्वासपूर्ण वातावरण नसल्यानेच,आज अमेरिकेत जाऊन स्थायिक होणाऱ्या, विविध 'भारतीय तंत्रवैज्ञानिक उच्चतम शिक्षण संस्थामधील' (I.I.T.s) बुद्धिवंत पदवीधरांचे हानिकारक निर्यातीचे प्रमाण, विविध ज्ञानशाखांप्रमाणे कमीअधिक पण सरसकट सुमारे ४० ते ६० टक्के असल्याचे शासनाचे नुकतेच (हा १९९२ सालचा उल्लेख आहे.) मान्य केले आहे. अधिकृत रीतीने ही गोष्ट कबूल करण्याची ही पहिलीच वेळ आहे. I.I.T.s या संस्था जणू काही प्राध्यान्याने अमेरिकी बाजारासाठीच हे पदवीधर तयार करीत असतात आणि बऱ्याचदा आपल्याच पदवीधरांनी परदेशांत विकसित केलेले तंत्रविज्ञान आपण आयात करीत असतो. वस्तुतः मोठा वैज्ञानिक समाज म्हणून जगात आपला तिसरा क्रमांक आहे. पण या कुशाग्र बुद्धीच्या तंत्रवैज्ञानिकांना जर योग्य प्रेरणा मिळाली तर या देशातच हे कार्य ते यशस्वीपणाने करू शकतात. त्यासाठी आपल्या तंत्रविशारदांना आपल्याच देशात आधुनिक तंत्रविज्ञान विकसित करण्याची, त्याचे उपयोजन करण्याची व ते आपल्या व्यवहारात सामावून टाकण्याची संधी मिळेल, अशारीतीने देशातील परिस्थितीत बदल करणे आवश्यक आहे. भारताजवळ स्वतःचा असा, 'तंत्रवैज्ञानिक संशोधन आणि विकास' यांचा पाया असणे आवश्यक आहे.

प्राथमिकतेच्या बाबी

पण त्यासाठीच प्राथमिक गोष्टींची गरज आहे.

१) संपूर्ण जगातील औद्योगिक तंत्रविज्ञानाचा कसून अभ्यास करून ते आत्मसात करणे आवश्यक आहे.

२) स्थानीय परिस्थितीशी मेळ राखू शकतील अशा, परकीय तंत्रविज्ञानातील काही बाबी निश्चित करून त्यांचा आपल्या देशात अवलंब सुरू करणे आवश्यक आहे.

३) आधुनिक, त्याचबरोबर पारंपरिक देशी तंत्रविज्ञानाबाबत संशोधन जारी केले पाहिजे. पारंपरिक तंत्रविज्ञानातील कोणत्या भागांचे आधुनिक परिस्थितीशी समायोजन करता येईल आणि त्यामुळेच कोणत्या क्षेत्रात भारतीय तंत्रविज्ञान विकसित करण्याची निकड आहे याबाबतची छाननीही करणे आवश्यक आहे.

४) म्हणजे मग पश्चिमी तंत्रविज्ञानातील कोणत्या भागांचा अवलंब करावयाचा, कोणत्या भागांचे योग्य समायोजन करावयाचे, कोणते पूर्णत: नाकारवयाचे याबद्दलचे नीतिनिर्धारण करणारे तंत्रवैज्ञानिक राष्ट्रीय धोरण निर्णित करता येईल.

५) उत्पादनप्रक्रिया विकेन्द्रीकरणाकडे नेईल अशी काळजी घेणारे, आपल्या सामाजिक - सांस्कृतिक व्यवस्थांशी जुळते असणारे देशी तंत्रविज्ञान विकसित करणे आवश्यक आहे. त्यामुळे श्री गुरुजींनी म्हटल्याप्रमाणे, वीज आणि अणुऊर्जा यांच्या साहाय्याने एखाद्या कारखान्याच्याऐवजी, उत्पादनकेन्द्र म्हणून रहात्या घराचेच रूपांतर करण्याची क्षमता अजमावता येईल.

६) आपल्या देशातील ग्रामीण विभागासाठी स्थानिक पातळीवर उपलब्ध सामग्रीच्या व कौशल्याच्या आधारे देशी तंत्रविज्ञान विकसित करण्याचा पुरस्कार करणे आवश्यक आहे. उदा. हे खरे आहे की संरक्षणाच्या आणि अन्य अवजड उद्योगांच्या गरजा केवळ विशिष्ट प्रकारचे पोलाद निर्माण करणाऱ्या कारखान्यांना पुऱ्या कराव्या लागतील. पण ग्रामीण उद्योगांच्या गरजांना ग्रामीण लोहारांच्या भट्ट्या पुऱ्या पडू शकतील. कारण नांगरांचे फाळ अथवा बैलगाडीच्या चाकांच्या लोखंडी धावा इ. ना सर्वसाधारण स्थानिक प्रक्रियेने उपलब्ध होणारे लोखंड चालू शकते.

७) ग्रामीण कारागीर व हरहुन्नरी यांच्या फायद्यासाठी पारंपरिक उत्पादनतंत्रात काही समुचित पण सहज अवगत करता येण्याजोगत्या सुधारणा अमलात आणणे आवश्यक आहे. अर्थात श्री गुरुजींच्या इशाऱ्याप्रमाणे,

अ) बेरोजगारीचा, ब) उपलब्ध व्यवस्थापनकौशल्य व तंत्रकौशल्य वाया जाण्याचा, आणि क) पारंपरिक उत्पादनसाधने निरुपयोगी ठरण्याचा, धोका टाळून हे करणे आवश्यक आहे. (अर्थात काही प्रमाणात हे होणे अटळ आहे हे गृहीत धरावे लागेल.)

आणि हे सर्व करीत असताना भारतातील नियोजनमंडळ आणि अन्य विभाग यांच्या अखत्यारीत असलेल्या अनेक केन्द्रांतून चालणाऱ्या संशोधनकार्यात सुसूत्रीकरण आवश्यक आहे. त्यामुळे अकारण होणारी पुनरावृत्ती टळून कार्यक्षमतेमध्ये वाढ होईल.

याचदृष्टीने निसर्ग विघातक नव्हे तर निसर्गाचे जतन करणारे असे तंत्रविज्ञान विकसित केले पाहिजे. इहवादाच्या आहारी गेल्यामुळे निर्माण होणाऱ्या पश्चिमी विकासकल्पनेच्या हव्यासातून निसर्गाचा निर्घृण उच्छेद करणारी, आपल्या देशातील शासनाची व उद्योगपतींची मानसिकता आणि धोरणे यांचा पर्यावरणाच्या संदर्भातील सविस्तर उल्लेख मागे येऊन गेलेला आहे. त्यावरून हे लक्षात येते की भारतासारख्या विस्तीर्ण आणि विपुल व दाट लोकसंख्येच्या देशात पर्यावरणसंबंधातील केवळ व्यापक लोकशिक्षण हाच एक कृतिशील मानसिकता निर्माण करण्याचा परिणामकारक मार्ग आहे. केवळ कायदे करण्याने फारसे काही साधणार नाही.

त्याचप्रमाणे वस्तुत: बऱ्याच काळापासून निकड असूनही मागे पडलेली समग्र

पर्यावरणात्मक धोरणाची अंमलबजावणी त्वरित आवश्यक आहे. भारत विकसनशील देश असल्यामुळेच केवळ ही गोष्ट दूरच्या भविष्यापर्यंत पुढे ढकलू शकेल व केवळ वेळोवेळीच्या तात्कालिक दृष्टीवर आधारलेल्या ठिगळवजा थातुरमातूर प्रयोगांनी आपण पर्यावरणाच्या समस्येचा परिणामकारक मुकाबला करू शकू असे मानणे सर्वस्वी चूक आहे. (युनेपच्या [UNEP*] अलिकडील दस्तऐवजातही, या प्रश्नाची हाताळणी करण्याच्या जुजबी पद्धतीवर कठोर टीका केलेली आहे)

पारंपरिक तत्त्वज्ञानाकडेच वळावे लागेल

आणि सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे समाजाची वर उल्लेखिलेली पर्यावरणानुकूल मानसिकता तयार करण्यासाठी आपल्याला आपल्या पारंपरिक तत्त्वज्ञानाकडेच वळावे लागेल. आणि भूमाता, हवा, पाणी आणि वनस्पती व प्राणिसृष्टी ही सर्व नैसर्गिक संपत्ती ही पवित्र आहे असाच संस्कार समाजाला द्यावा लागेल. आज अशाप्रकारचे तत्त्वज्ञान ही संपूर्ण जगाचीच २१ व्या शतकाची गरज आहे.

अन्क्टाडची लक्ष्ये उपयुक्त

यादृष्टीने तंत्रविज्ञानाच्या वापरासाठी विकसनशील देशांपुढे अन्क्टाडने ठेवलेली खालील सर्वसामान्य धोरणविषयक लक्ष्ये आपल्यालाही उपयोगी पडतील.

१) मूलभूत गरजा भागविण्यासाठी उपयुक्त असलेल्या अशा तंत्रविज्ञानाच्या व्यापक स्वीकारासाठी व त्याच्या लाभात वाटेकरी होण्यासाठी हमी देणारी सामाजिक - आर्थिक व औद्योगिक चौकट निर्माण करणे.

२) तंत्रविषयक ज्ञाननिर्मितीसाठी भौतिक, मानवी व पर्यावरणात्मक सामग्रीचा समुचित उपयोग करू शकणाऱ्या परकीय व देशी तंत्रविज्ञानाच्या उपयोजनासाठी देशांतर्गत क्षमता निर्माण करणे.

३) किफायतशीर सौद्याच्या क्षमतेतून तंत्रविज्ञानाच्या आयातीवर नियंत्रण ठेवणे. त्या सौद्यात अत्यंत अनुकूल अटी पदरात पाडून घेण्याची क्षमता प्राप्त करून घेणे आणि देशी तंत्रविज्ञानाच्या विकासाशी, ही परकीय तंत्रविज्ञानाची आयात जुळवून घेणे.

४) तंत्रविज्ञानाच्या निवडीत व उपयोजनात समाजाचा सहभाग निर्माण करणाऱ्या यंत्रणेचा विकास करणे.

आत्मविश्वासपूर्ण आत्मनिर्भरतेच्या आवश्यकतेवर भर

अन्क्टाडने पुढे मांडलेल्या प्रस्तुत लक्ष्यांमधून दक्षिणी देशांच्या आत्मविश्वासपूर्ण आत्मनिर्भरतेच्या आवश्यकतेचा बोध होतो. समान पातळीवरील दक्षिणी देशांच्या

---

* परिशिष्ट १ पहा.

सहकार्याचा अवलंब भारताच्या दृष्टीनेही महत्त्वाचा आहेच. या संदर्भातील आपल्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा दस्तऐवज म्हणजे न्येरेरेंच्या अध्यक्षतेखाली गठित झालेल्या 'साउथ कमिशन' या आयोगाचे सरचिटणीस डॉ. मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखाली मे १९९० मध्ये, दार-ए-सलाम येथे प्रसिद्ध झालेला अहवाल ! आयोगाची दक्षिणांतर्गत सहकार्याच्या विचाराची दिशा काय होती, याची कल्पना येण्यासाठी या अहवालातील काही मोजके परिच्छेद पुरेसे आहेत

'केवळ स्वत:च्याच लाभाच्या दृष्टीने संपूर्ण जागतिक व्यवस्थेची पुनर्मांडणी करण्याच्या उत्तरेतील प्रबल राष्ट्रांच्या खेळीला दक्षिणेने स्वत:च्या व मानवतेच्या हितासाठी निर्धारपूर्वक विरोध केला पाहिजे. (लोकसंख्येच्यादृष्टीने) मानवतेचा अधिकांश सामावलेल्या दक्षिणेने जगातील सर्व लोकांच्या आकांक्षांची पूर्ती करण्यासाठी अधिक न्याय्य व स्थिर अशा व्यवस्थेची बांधणी करण्याच्या प्रक्रियेमध्ये आपली योग्य भूमिका बजावली पाहिजे.'

(For its own sake and for the sake of humanity, the south has to be resolute in resisting the present moves by the dominant countries of the North to redesign the system to their own advantage. Containing the great-majority of humankind, the South must play its rightful role in the process of fashioning a more equitable and stable system to serve the aspirations of all people.)

या उद्दिष्टाच्या दृष्टीने विकसनशील देशांनी –

१) दक्षिणेच्या सामूहिक सामग्रीचा वाढता फायदा घेऊन जास्तीत जास्त तुल्यबळ शक्ती प्राप्त करून घेतली पाहिजे.

२) नवी आंतरराष्ट्रीय व्यवस्था, तिची मूलभूत उद्दिष्टे, तिच्या व्यवस्थापनाची पद्धती आणि तिला आवश्यक असलेल्या संस्था या सर्व गोष्टींबाबत सर्व हितसंबंधियांच्या सहभागातून जागतिक सर्वाभिप्राय - सर्वसहमती घडवून आणण्यावर भर दिला पाहिजे आणि अशा अनेक बाजू असलेल्या लोकशाहीप्रक्रियेला गती देण्याचा आग्रह धरला पाहिजे.

३) आणि या प्रक्रियेमध्ये पुढाकाराची भूमिका निभावण्यासाठी सुस्पष्ट प्रस्ताव मांडताना एका आवाजात बोलले पाहिजे. जगातील लोकांच्या, विशेषत: तरुणांच्या कल्पनाशक्तीला इपाटून टाकणारे असे हे प्रस्ताव असावेत आणि दक्षिणेने संकुचिततेच्या वर उठून संपूर्ण जग हे एक मानवी कुटुंब आहे अशी दृष्टी ठेवली पाहिजे.'

'स्वत:च्या साऱ्या सुप्त शक्ती उपयोगात आणताना दक्षिणेने प्रथम हे निश्चित केले पाहिजे की तिच्या आर्थिक व्यवस्था या अंत:चेतनेतून अधिकाधिक सक्रिय बनतील आणि त्यांची वाढ हा केवळ उत्तरी देशांच्या वाढीतून उद्भवलेला आनुषांगिक परिणाम नसेल. दक्षिणेने उत्तरेच्या बाजारपेठांतील आपली उपस्थिती वाढवली पाहिजे.

त्यासाठी तिला बाजारामध्ये अधिक वाव मिळणे आणि स्वत:च्या देशात संरक्षण मिळणे आवश्यक आहे. आज विशेषत: केवळ निर्यातीच्या दृष्टीनेच ज्या उत्पादनांमध्ये दक्षिणी देशांना स्वारस्य आहे अशाच उत्पादनांपुरते अशाप्रकारचे संरक्षण अवलंबिले जाते. परंतु उत्तरेत उदयाला येणाऱ्या विकासनमुन्यावरून हे स्पष्ट होते की दक्षिणेच्या अर्थव्यवस्थेची गाडी, तिच्यातील प्रवाशांचे म्हणजेच दक्षिणी समाजांचे समाधान होईल अशारीतीने उत्तरी इंजिन ओढू शकणार नाही. ही स्वयंचलनाची शक्ती ही जास्तीत जास्त प्रमाणात दक्षिणेच्या अर्थव्यवस्थेतच निर्माण झाली पाहिजे. दक्षिणेच्या अंगभूत क्षमतेच्या त्या दृष्टीने अद्यापही पुरेसा शोध घेतला गेलेला नाही आणि दक्षिणेच्या वाढीसाठी, तिच्या अंगभूत क्षमतेची ऊर्जा पुरेशा प्रमाणात न वापरल्यामुळेच दक्षिणेतील पराकोटीचे दारिद्र्य, विशेषत: शेतीची निकृष्ट दर्जाची उत्पादकता या गोष्टी दिसून येतात. लहान लहान जमीनधारकांची उत्पादकता व मिळकत वाढविण्यावर लक्ष केन्द्रित करून राखलेले ग्रामीण विकासाचे सातत्य हे वाढ व समानता यांच्या पुरस्काराचे एक प्रभावी साधन आहे.

'दक्षिणेच्या अर्थव्यवस्थेच्या संदर्भात विकासाचे पर्याय अधिक विस्तृत करण्याच्या दृष्टीने दक्षिणांतर्गत सहकार्य हे एक प्रभावी साधन होऊ शकते व एकूण दक्षिणेचा एकत्र विचार करता या कामी तिच्याजवळ असलेली पुरेशी बाजारपेठ, तंत्रविज्ञान व अर्थपुरवठ्याचे मार्ग हे घटक साहाय्यभूत होऊ शकतात.'

'दक्षिणी देशांमधील सहकार्याचा प्रखर भाव हा स्वायत्त, आत्मनिर्भर विकासाच्या दक्षिणी रणनीतीचा एक महत्त्वाचा भाग बनला पाहिजे. उत्तरी इंजिन जरी कमी वेगावर राहिले तरी दक्षिणेने मात्र वाढीची शीघ्रगती सातत्याने कायम राखणाच्या दृष्टीने आपली क्षमता वाढविली पाहिजे.'

(With this as the objective, the devloping countries must:

1) acquire the maximum countervailing power through increased exploitation of the South's collective resources.

2) press for the setting in motion a multilateral, democratic process with the participation of all major interests, to arrive at a globle consensus on the new internatinal system, its basic goals, how it should be managed, and the institutions it requires.

3) speak with a united voice in making clear proposals, so as to play a leading role in this process. The proposals should aim at capturing the imagination of the world's people and especially of the young, they should rise above parochialism to articulate a vision of the world as one human family.

'....In mobilising all its latent power, the South has first to ensure

that its economics are self - fueling to the maximum extent possible and that their growth is not simply a by - product of the growth in the North. The South needs to expand its presence in the Northern markets, for which purpose it needs improved access to markets and the roll-back of protectionism, which is now often directed specially at products of considerable interests to the South in terms of exports. But the emerging development patterns of the North clearly suggtest that the Northern locomotive economies will not pull the train of the Southern economies at a pace that will satisfy its passengers-the people of the South. The locomotive power has to be generated to the maximum extent possible within the economies of the South themselves. The acute poverty of the South, particularly the low productivity of the Southern agricultural, is a pointer to the unexplored potential that exists within the South itself to fuel its growth processes. Sustained rural development, focussed sharply on raising the productivity and incomes of small landholders, can be a powerful instrument for pormotion of growth and equity.'

'...The South as a whole has sufficient markets, technology and financial resources to make South - South cooperation an effective means for widening the development options for its economies. Intensified South - South cooperation has to become an important part of Southern strategies for autonomous, self - reliant development. The South must build its capacity to sustain a fast pace of growth even if the Northern engine is in low gear.)

भारताच्या दृष्टीने युगानुकूल विकासनमुन्याच्या विचाराला साहाय्यक होणारी अशी अनेक सूत्र या अहवालातून मिळू शकतात.

इ.सी.डी.सी. वरील १९९२ च्या अहवालात अन्क्टाडच्या स्थायी समितीने म्हटले आहे –

'सर्वसाधारणपणे पश्चिमी आशिया सोडून अन्य दक्षिणी देशांमधील अंतर्गत व्यापार हा ९ व्या दशकाच्या उत्तरार्धात वाढला आहे. दक्षिणी देशांमधील परस्पर व्यापारामधील, दक्षिणी देशांच्या अंतर्गत व्यापाराचा वाटा १९८० मधील ४८% टक्क्यांपासून १९८६ मध्ये ५७% पर्यंत वाढला आणि १९९१ मध्ये ७१% पर्यंत गेला. हे आकडे व्यापाराचे निश्चितपणे पुढे जाणारे प्रादेशीकरण दाखवतात.'

(South-South trade in general, trade within regions except in the West Asia has been increasing in the latter half of 1980s. The share of intra-national trade in the total South-South trade rose from 48% in

1980 to 57% in 1986 and to 71% in 1991. This showed a steady regionalisation of South-South trade during this period.)

त्याचबरोबर अन्क्टाडच्या सचिवालयाने हेही दाखवून दिले आहे की १९८० मधील काही घातक पिछेहाटीनंतर दक्षिणांतर्गत व्यापार आता पूर्वस्थितीला येण्याची चिन्हे दिसंत आहे.

दक्षिणांतर्गत सहकार्याची व्यापक मिती

वस्तुत: आताच उल्लेख केल्याप्रमाणे दक्षिणांतर्गत सहकार्याची डावपेचात्मक गरज केवळ अंतर्गत विकासासाठीच आहे असे नाही तर जागतिक परस्परावलंबनाची न्याय्य व्यवस्था प्रस्थापित करण्यासाठीही आहे. उत्तरी देशांनाही उपेक्षा करता येणार नाही असे सामूहिक वजन व तुल्यबल शक्ती या विकसनशील देशांना प्राप्त होण्यासाठी, दक्षिणी देशांमधील असे सहकार्यच उपयोगी पडेल. जागतिक आर्थिक रचनेच्या व्यवस्थापनात या विकसनशील देशांना काही परिणामकारक आवाज प्राप्त व्हावा अशी अपेक्षा असेल तर दक्षिणी देशांमधील ऐक्य, उद्दिष्टांच्या पाठपुराव्याचा निर्धार आणि धोरणात्मक लवचिकपणा यांच्या पाठबळावर प्राप्त होणारे हे सामूहिक वजनच आवश्यक आहे.

थोडीफार प्रगती

पूर्वी दिलेल्या या विषयावरील लिखाणाच्या संदर्भावरून व आताच्या चर्चेवरून हे दिसून येते की दक्षिणी देशांमधील सहकार्याची पूर्वी कधी नव्हती इतकी निकड निर्माण झाली आहे व त्यादृष्टीने झालेल्या प्रगतीचे थोडेफार परिणामही दिसू लागले आहेत.

हेही खरे आहे की मे १९८१ मध्ये कॅराकस येथे मान्य केली गेलेली अन्न, ऊर्जा, व्यापार, अर्थपुरवठा, कच्चा माल, उद्योग, तंत्रविज्ञान व तांत्रिक सहकार्य या क्षेत्रांच्या संदर्भातील विकसनशील देशांमधील सहकार्याची व्यापक कृतियोजना म्हणजे या दिशेने गाठलेला एक महत्त्वाचा टप्पा आहे असा गौरव, नवी दिल्लीतील सल्लामसलतीत भाग घेणाऱ्यांनी केला होता. हे ठीकच होते. तरीही त्यांना हेही जाणवले की, विकसनशील देशांतील विशेषकरून व्यवसाय, वाणिज्य, उद्योग, यांतील अग्रणी, तसेच शास्त्रज्ञ, बुद्धिवंत, लेखक व पत्रकार अशा काही वर्गांतील मंडळींचा वारंवार व व्यापक संपर्क अशा सहकार्यासाठी आवश्यक आहे. पण अशाप्रकारचा सहकार्यपूर्ण संपर्क प्रत्यक्षात आकाराला आला नाही.

मुख्य अडचण - दक्षिणी नेतृत्वाच्या इच्छाशक्तीचा अभाव

एका अर्थाने असे म्हणता येईल की विचारवंतांनी मांडलेल्या दक्षिणी देशांतील

सहकार्याच्या प्रक्रियेचे प्रत्यंतर विकसनशील देशांच्या प्रत्यक्ष व्यवहारात मात्र यावे तसे येत नाही.

त्यामुळे अन्क्टाडच्या अहवालात दक्षिणांतर्गत व्यापाराचे पाऊल पुढे पडत आहे असे म्हटले असले तरीही १९९१ मधील एकूण जागतिक व्यापाराच्या केवळ ७.२% असाच हा व्यापार राहिला व त्यामुळेच तो एकूण व्यापारी जगतातील सर्वात दुबळा दुवा समजला जातो.

वस्तुत: युरोपीय राष्ट्रसमूहातील परस्पर आर्थिक सहकार्यामुळे संबंधित देशांच्या राजकीय व आर्थिक रचनांमध्ये भक्कम उभ्या असलेल्या स्वयंचलित रणनीतीचे महत्त्व, निदान (दक्षिणी देशांतील) सहकार्याच्या प्रयत्नांचे नेतृत्व करणाऱ्यांना तरी दिसून आले आहे. पण दक्षिणेमध्ये आतापर्यंत अशा सहकार्याचे सर्व प्रयत्न हे निश्चित स्वरूपाच्या धोरणांच्या फायद्याशिवायच सुरू आहेत.

खरे पाहता दूरगामी सहकार्याच्या क्षेत्रांची काटेकोर निश्चिती करून, नजिकच्या व कालांतराच्या कार्यक्रमांची कार्यवाही करण्याचे टप्पेही मांडणारे धोरण अवलंबिणे आवश्यक होते. पण अशाप्रकारच्या धोरणांना किंमत देण्यात आली नाही. परिणामत: दक्षिणांतर्गत सहकार्य पुढे नेण्यासाठी टाकलेल्या पावलांमध्ये पुष्कळ प्रयास केले गेले आणि अनेक योजना व उपक्रम आखले गेले तरीही प्रत्यक्ष व्यवहारात मात्र फारच मर्यादित परिणाम झालेले दिसून येतात.

साऊथ कमिशनच्या अहवालातही म्हटले आहे -

'दक्षिणांतर्गत सहकार्यामधील एक महत्त्वाची उणीव म्हणजे दुर्बल संघटना आणि देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय पातळीवरील संस्थात्मक तांत्रिक पाठबळाचा अभाव होय.'... 'दक्षिणेतील सहकार्याचे प्रयत्न हे कोणत्याही व्यवहार्य व परिणामकारक अशा मार्गदर्शक धोरणांशिवायच चालू आहेत.'.... 'केवळ जुजबी स्वरूपात आणि जमेल त्याप्रमाणातच त्याचा पाठपुरावा होत आहे.'

(One of the short-comings of South-South cooperation has been weak organisation and lack of institutionalised technical support, both at the international level and within most countries'.... 'The efforts at cooperation in the South have functioned without any viable and effective startegy to guide them.' '...pursuied in a haphazard, catch-as-catch-can manner.')

दक्षिणांतर्गत व्यापाराच्या या फारशा उत्साहवर्धक नसलेल्या चित्राला या बाबतीतील विकसनशील देशांतील बांधिलकीचा अभावच कारणीभूत आहे असा दोष अन्क्टाडच्या बैठकीत बांगला देशाचे सय्यद जमालुद्दिन यांनी दिला होता.

त्यामुळेच जिनिवातील वाटाघाटीच्या वेळी तिसऱ्या जगातील नेतृत्व विखुरलेलेच राहिले. वस्तुत: काही मान्यवर व्यक्तींनी आणि अशासकीय स्वयंसेवी संघटनांनी

काही मुद्यांच्या प्रतिकूल परिणामांबद्दल आणि प्रभावांबद्दल धोक्याचा इशारा दिला होता आणि काही शासने, त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांशी सहमतही होती. तरीही दुर्दैवाने या नेत्यांनी ते मुद्दे वाटाघाटीच्यावेळी परिणामकारकरीतीने पुढे मांडलेच नाहीत.

'काही अपवाद वगळता विविध प्रादेशिक व उपप्रादेशिक योजना अपेक्षांना उतरलेल्या नाहीत व त्यांची उद्दिष्टेही अपुरीच राहिली आहेत.' अशी अलग अलग निवेदने दक्षिणेतील एकेकट्या देशाने वा काही देशांच्या प्रादेशिक गटांनी काहीसा भर देऊन पुढे केली. पण गॅट कराराच्या संभाव्य प्रतिकूल परिमाणांबद्दल चर्चा करण्यासाठी एकतरी बैठक भरविणे आवश्यक आहे असे नाम अथवा जी-७७ अशा तिसऱ्या जगातील नेत्यांच्या कोणत्याही गटबंधनाला वाटलेच नाही. व्यक्तिगत वा सामूहिकरीत्या गॅट कराराचे लगेचचे अथवा दूरगामी परिणाम समजून घेण्याचा कोणताही प्रयत्न तिसऱ्या जगातील नेत्यांनी केला नाही. त्याऐवजी त्यांनी त्यांच्या समाजांचा उलट असा समज करून देणे पसंत केले की आपला समाज या करार प्रक्रियेचा एक सहभागी घटक आहेच.

वस्तुतः ब्रिटनमध्ये १९८३ मध्ये प्रसिद्ध झालेल्या पूर्वोल्लेखित *The Jamaica Papers* या संग्रहाच्या पुरस्कारात डॉ. सलाह - अल् - शेखली यांनी इशारा दिला होता.

'स्वतःच्या प्रश्नांबरोबरच विकसनशील देशांचे प्रश्नही औद्योगिक देश सोडवतील अशा आशेने वाट पहात बसणे ही विकसनशील देशांच्या दृष्टीने सर्वात घातक गोष्ट आहे. जर उत्तरी देश पुढाकार घेण्याच्या मनस्थितीत नसतील तर दक्षिणी देशांनी पुढाकार घेण्यात अडचण असण्याचे काहीच कारण नाही.'

(...The most dangerous thing they [Southern countries] could do now would be to wait for the industrial countries to solve their own problems and hopefully those of the developing world. If the North is in no mood at present to take the initiative, there is no reason why the South should not do so.)

डिसेंबर १९९३ च्या पहिल्या आठवड्यात जेव्हा युरुग्वे वाटाघाटाची फेरी संपत आली तेव्हा दक्षिणी देशांच्या नेतृत्वाच्या धोरणातील चूक उघड झाली आणि केवळ युरोपीय संघ व अमेरिका हेच या प्रक्रियेतील प्रमुख घटक होते हे स्पष्ट झाले.

दक्षिणी देशांना आलेली जाग

त्यामुळे दक्षिणी देशांना आता जाणीव झाली आहे की जागतिक व्यापार संघटना ही जी-७ राष्ट्रांच्या व बहुराष्ट्रीय उद्योगसमूहांच्याच अंकित राहील. ही संघटना म्हणजे आता विविध राष्ट्रांच्या सार्वभौमत्वावर व युनोच्या आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेसारख्या (I.L.O.*) संघटनांच्या वाजवी अधिकाराच्या क्षेत्रांवरही आक्रमण करण्याचे जणू हक्कच

---

* परिशिष्ट १ पहा.

प्राप्त झालेले जगाचे महाशासन बनणार आहे.

आणि जर गोऱ्या राष्ट्रांच्या युरुग्वे येथील डावपेचांचा पाठपुरावा झाला तर एक तर दक्षिणी राष्ट्रांचे पूर्ण शोषण आणि जवळ जवळ त्यांचा लय तरी होईल किंवा उत्तर - दक्षिण संघर्षांचे पर्यवसान दक्षिणी देशांच्या बंडखोरीत तरी होईल.

पण या परिस्थितीचे खरे कारण, ब्रिजेंद्रनाथ बॅनर्जी यांनी आपल्या *Caracas To New Delhi* या पुस्तकात स्पष्ट केल्याप्रमाणे, विकसनशील देशांतील नेतृत्वाच्या इच्छाशक्तीचा अभाव हेच आहे.

अर्थात भारताच्या दृष्टीने विचार करता, अन्कटाडने पुढे ठेवलेल्या उपरोल्लेखित लक्ष्यांच्या साधनेसाठी अनुकूल अशी सामाजिक, आर्थिक चौकट व त्याद्वारा समाजाचा व्यापक सहभाग हा महत्त्वाचा मुद्दा ठरतो पण तो प्रत्यक्षात येण्यासाठी समाजाला पश्चिमी जीवनमूल्यांचा त्याग करावा लागेल आणि –

१) समाजात अशा प्रकारचे मानसिक, सांस्कृतिक वातावरण निर्माण करावे लागेल की ज्यामुळे सामाजिक प्रतिष्ठा व व्यक्तिगत संपन्नता यांच्यातील प्रमाण व्यस्त राहील*.

२) त्याच बरोबर वेतनातील फरक व प्रतिष्ठेतील भेद यांच्या संबंधीची सुसूत्र व्यवस्था विकसित करावी लागेल. म्हणजे समानता आणि व्यक्तिविकासासाठी प्रोत्साहन यांचा मेळ निश्चित बसेल. नाहीतर वस्तुस्थितीत अशी आहे की जर जीवनमूल्ये केवळ आर्थिक व भौतिक असली तर व्यक्तीची सर्वोच्च विकासाची प्रेरणा व संपत्तीचे न्याय्य वितरण यांचा एकमेकांशी काही ताळमेळ नसतो.

हिंदू चिंतनातील सजग लक्ष्ये

हिंदू चिंतनातून येणाऱ्या विकास संकल्पनेत या सर्व गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे. कोणत्याही उणिवेची अडचण दूर करून चूक दुरुस्त करायला कधीही उशीर झालेला नसतो. जरी पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले असले तरीही तिसऱ्या जगातील देशांमधील समाजांच्या इच्छाशक्तीचे उत्थान करणे हे देशभक्तांनी अंगीकारावे असे एक सुयोग्य ध्येयव्रत आहे.

त्यासाठीच स्वदेशीचे जागरण

याच अनुषंगाने मागे उल्लेखिलेल्या स्वदेशीचा भाव समाजात उत्कट क्रियाशीलतेने जागा करणे ही बाब हिंदू विकास नमुन्याच्या प्रत्यक्षीकरणाच्या दृष्टीने अत्यावश्यक ठरते. स्वदेशी भावनेचा आज जगात सर्वत्रच कसा प्रत्यय येत आहे आणि ही भावना केवळ आर्थिक विषयाशी संबंधित कशी नाही हे पूर्वी सोदाहरण पाहिले आहे. भारताच्या दृष्टीने स्वदेशी या संज्ञेलाही आगळे महत्त्व आहे. याठिकाणी ही

---

* पहा - हिंदू दिशावेध. पृ. २५

केवळ आर्थिक चळवळ नाहीच तर राजकीय स्वातंत्र्याच्या घोषणेचे ते सार आहे. पण खरे तर आर्थिक विकासाच्या उद्दिष्टापुरती व राजकीय स्वातंत्र्यापुरतीही मर्यादित चळवळ नाही, तर राष्ट्रीय मानसाच्या सर्व पैलंचा समावेश करणारी अशी ती आध्यात्मिक चळवळ आहे. ११ जून १९०८ च्या 'वंदेमातरम्' मध्ये योगी अरविंदांनी हेच स्पष्ट केले आहे.

भारतीय किसान संघाच्या 'भारतीय कृषि - अर्थविषयक संशोधन संस्थेचे' संचालक श्री. दयाकृष्ण यांच्या *Swadeshi View On Globalisation* या स्वदेशी जागरण मंचाने प्रसिद्ध केलेल्या ग्रंथात त्यांनी, 'एका अर्थाने लष्करी शस्त्रांऐवजी आर्थिक शस्त्राने लढल्या जाणाऱ्या तिसऱ्या महायुद्धाचा' उल्लेख केला आहे आणि स्वदेशीचे आंदोलन म्हणजे या तिसऱ्या महायुद्धाचा एक अविभाज्य भाग असलेले दुसरे स्वातंत्र्ययुध्द आहे असे मानून या स्वातंत्र्यायुद्धामागील तार्किक भूमिका त्यांनी स्पष्ट केली आहे. आतापर्यंत सविस्तरपणे पाहिलेल्या पश्चिमी व विशेषत: अमेरिकी आर्थिक साम्राज्यवादी ऑक्टोपसच्या घातक पार्श्वभूमीवर श्री. दयाकृष्णांनी केलेला दुसऱ्या स्वातंत्र्ययुद्धाचा उल्लेख सार्थ ठरतो. कारण स्वदेशी म्हणजे सार्वभौमत्व व आत्मनिर्भरता यांचे जतन करणाऱ्या राष्ट्रीय इच्छाशक्तीचे व्यवहार्य असे प्रात्यक्षिकच आहे. सुधारणावादाच्या उठलेल्या मोहमयी लाटेमध्ये वाहून गेलेले देशही आता स्वत:च्या धोरणात्मक रणनीतीचा पुनर्विचार करू लागले आहेत. विशेषत: जागतिकीकरणाच्या या भूलभुलय्यामध्ये कार्यकुशलता, उत्पादकता यांच्या बरोबरच रोजगारीचे उद्दिष्टही समांतरतेने ठेवले पाहिजे आणि आजच्या तथाकथित सुधारणवादाच्या अतिव्यापक परिघातही हे साधले जात नाही. म्हणून सार्वभौम शासनाच्या स्वदेशहितैषी हस्तक्षेपाच्या उपायांनीच ते साधले जाणार आहे.

त्यांच्या त्यांच्या राजनैतिक समाजाच्या अस्तित्वासाठीच हा दिशाबदल आवश्यक ठरत आहे. कारण जागतिकीकरण आणि खाजगीकरण हे एकत्र मिळून राष्ट्रीय सार्वभौमत्वाला अतिशय घातक असे जीवघेणे रसायन तयार होते.

त्याच दृष्टीने स्वदेशी भाव समाजात जागृत करण्याचे विराट प्रयत्न हे युगानुकूल विकासयोजनेतील एक महत्त्वाचे पाऊल आहे आणि राष्ट्रीय पुनर्निर्माणाच्या कार्यात सर्व समाज खऱ्या अर्थाने सहभागी होईल तेव्हाच हे होऊ शकते. *Principles of Economic Planning* या ग्रंथात डब्ल्यू. आर्थर ल्युईस यांनी म्हटले आहे.

'जर लोक स्वत:हून राष्ट्रवादी असले, त्यांना स्वत:च्या मागासलेपणाची जाणीव असली आणि प्रगतीची ईर्षा असेल तर ते स्वखुषीने अपार कष्ट घ्यायला तयार असतात, अनेक प्रमादांकडे दुर्लक्ष करतात आणि स्वत:च्या देशाच्या पुनर्निर्माणाच्या कार्यात स्वत:ला उत्साहाने झोकून देतात. लोकांचा उत्साह हा नियोजनातील वंगण आणि प्रगतीसाठी ऊर्जा-तेल ठरू शकतो. जवळपास सर्व गोष्टी साध्य करणारी ती शक्ती ठरू शकते.'

(If the people on their side are nationalistic, conscious of their backwardness, and anxious to progress, they willingly bear great hardships and tolerate many mistakes and they throw themselves with enthusiasm into a job of regenerating their country. Popular enthusiasm is both-lubricating oil of planning and petrol of economic development, a force that almost makes all things possible.)

सुदैवाने समग्र मानवी जीवनाचा एकात्म विचार करणाऱ्या हिंदू जीवनदृष्टीला अभिप्रेत असलेल्या जीवनाच्या विकासाच्या तिसऱ्या - खरे म्हणजे एकमेव - पर्यायाच्या संकेताची काही प्रसादचिन्हे आपल्या देशात व आंतरराष्ट्रीय क्षेत्रातही उमटू लागली आहेत ही प्रोत्साहक बाब आहे.

काही मोजक्याच घटनांचा उल्लेख पुरेसा ठरेल.

पश्चिमी विचारातील परिवर्तनाचे अनेक संदर्भ आतापर्यंतच्या विवेचनातील त्या त्या विषयाच्या अनुषंगाने येऊन गेले आहेत. प्रत्यक्ष व्यवहारातील अनुभवांच्या दट्ट्यामुळे पाश्चिमात्यांनाही हळूहळू त्यांच्या संकीर्ण विचारपद्धतीची सवय सोडावी लागत आहे. पश्चिमेतील एक विचारप्रवाह असे मानतो की (मानवाचे) समग्र कल्याण हे दोन भागांत विभागलेले आहे. एक - आर्थिक, दुसरा - अर्थेतर! प्रा. पिगू यांनी आर्थिक कल्याण म्हणजे पैशाच्या मापदंडाशी प्रत्यक्षाप्रत्यक्षरीतीने जोडलेला सामाजिक कल्याणाचा भाग मानला आहे. अर्थेतर कल्याण मात्र पैशाच्या मोजमापात मोजला न जाणारा असा सामाजिक कल्याणाचा भाग आहे.

अर्थेतर सामाजिक घटकाचे महत्त्व कधीही कमी लेखता येणार नाही. उदा. एल्. टी. हॉबहाऊस यांनी सामाजिक घटकांबद्दल म्हटले आहे.

'समग्र सामाजिक घटक बाजूला काढा आणि मग आपल्यापुढे उद्ध्वस्ततेतून वाचलेला व ज्ञान प्राप्त झालेला पण कंदमुळे, वन्य फळे आणि कीटक यांच्यावर जगणारा उघडा नागडा रॉबिन्सन क्रूसो उभा रहातो.'

(Take away the whole social factor and we have got Robinson Crusou, with his salvage from wreck and his acquired knowledge, but the naked savage living on roots, berries and vermins.)

त्यामुळेच मानवी कल्याणाचा विचार करताना अर्थेतर भौतिक घटकांकडे दुर्लक्ष करता येणार नाही. उदा. देशाचे भौगोलिक स्थान, हवामान, नद्या, पर्वत, नैसर्गिक बंदरे, जमीन, पाणी, अरण्ये, खनिज द्रव्ये, शिवाय शेतीविषयक अंगभूत क्षमता, अन्य देशातील सर्वसाधारण विकास, याबरोबरच शांतता व सुरक्षितता इ. घटक! तेव्हा पैशाने मोजले न जाणारे अर्थेतर घटकही मानवी कल्याणाच्या बाबतीत महत्त्वाचे ठरतात.

पण इतकेच नाही!

Open Secrets of Economic Growth या ग्रंथात डेव्हिड मॅकॉर्ड राइट याने म्हटले आहे.

'आर्थिक प्रगतीसाठी कारणीभूत होणारे मूलभूत घटक हे अर्थेतर वा अभौतिक स्वरूपाचेच असतात. खरे तर आत्माच शरीराची जडणघडण करतो.'

(The fundamental factors making for economic growth are non-economic and non-materialistic in character. It is the spirit itself that builds the body.)

या संदर्भात खरे तर फार पूर्वीच, १५ ऑक्टोबर १८९५ ला, *Der Sozialistiche Akademiker* मध्ये प्रसिद्ध झालेल्या एंजल्सच्या एका पत्रातील उल्लेख लक्षणीय आहे.

'इतिहासाच्या इहवादी दृष्टिकोणाप्रमाणे इतिहासात अंतिमत: जर काही निर्णायक असेल तर ते प्रत्यक्ष जीवनाचे निर्माण आणि पुनर्निर्माण होय. यापेक्षा अधिक वेगळे असे मी किंवा मार्क्सने काहीही निश्चित म्हटलेले नाही. पण आर्थिक घटक हाच एकमेव घटक आहे असे प्रस्तुत विधानाचा अर्थ घेऊन जर कोणी विपर्यास करू पाहील तर ते एक निरर्थक, धूसर व बाष्कळ असे विधान ठरेल.

आर्थिक परिस्थिती हा पाया आहे. पण वरील इमल्याचे अनेक घटक - उदा. वर्गकलहाची राजकीय रूपे आणि त्यांचे परिणाम, घटना व कायद्याची रचना, आणि सहभागी होणाऱ्या सर्व माणसांच्या डोक्यात उठणारे या साऱ्यांबद्दलचे क्रियाप्रतिक्रियांचे संघर्ष; राजकीय, कायदेविषयक, तत्त्वज्ञानात्मक प्रणाली, त्यांचे धर्मविषयक दृष्टिकोण, हे सर्व ऐतिहासिक संघर्षाच्या घटनाक्रमावर प्रभाव टाकतात व अनेक प्रसंगी त्यांचे स्वरूपही निर्णित करतात.'

(According to the materialist view of history, what is in the last instance decisive in history is the production and reproduction of actual life. More than this, neither Marx nor I have ever asserted. But when anyone distorts this, so as to read that the economic factor is the sole element, he converts the statement into a meaningless, abstract, absured phrase. The economic condition is the basis, but the various elements of the super structure -- the political forms of the class-contests and their results; the constitution-the legal forms; and also all the reflexes of these actual contests in the brains of the participants, the political, legal, philosophical theories, their religious views- all these exert an influnce on the developments of the historic struggles, and in many instances determine their forms.)

बर्नार्ड शॉने *Road to Freedom* मध्ये म्हटले आहे.

'जर कधी समाजवाद अवतीर्ण झालाच तर, अर्थेतर घटकांचे मोल लक्षात

घेऊन त्यांचा जाणीवपूर्वक पाठपुरावा केला तरच समाजवाद लाभदायक ठरण्याची शक्यता आहे.'

(If socialism ever comes, it is only likely to prove beneficent if non-economic goods are valued and consciously pursued.)

पाश्चिमात्यांच्या हळुहळू हे लक्षात येऊ लागले आहे की उत्कृष्ट संविधान ही चांगले नागरिक निर्माण होण्याची नेहमीच हमी देऊ शकत नाही. आर्थिक प्रगतीत सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक संस्थांची महत्त्वाची भूमिका असते. ही मूलभूत वास्तवता पश्चिमी इहवादी शास्त्रज्ञही ध्यानात घेतील अशी वाढती चिन्हे पश्चिमेत दिसू लागती आहेत. उदा. डॉ. लोंब्रोसोपासून सुरू झालेल्या, पाश्चिमात्यांच्या गुन्हेगारीविषयक शास्त्रात झालेला लक्षणीय बदल हा त्याचेच द्योतक आहे. 'जशास तसे शासन' या उपायापासून दंडात्मक, प्रतिबंधात्मक, सुधारणात्मक अशा उपायांची योजना येथपर्यंतच्या अवस्थांमधून 'सामाजिक बळी' या कल्पनेपर्यंत आणि गुन्हेगारीच्या अन्य अनेक घटक-कारणांच्या प्रणालीपर्यंत या शास्त्राने खूपच लांबचा पल्ला गाठला आहे. पण डेव्हिड अब्राहमसन याचा सिद्धान्त सर्वात विचारप्रवर्तक ठरला आहे. त्याचे सूत्र असे -

सामाजिक पर्यावरण आणि व्यक्तिगत प्रवृत्ती यांना मिळून, धार्मिक व नैतिक पोषणाने ज्या प्रमाणात छेद जाईल त्या प्रमाणात गुन्हा घडतोक्त[१५] याचाच अर्थ धार्मिक व नैतिक वातावरणातील संगोपनाने, सामाजिक पर्यावरण व व्यक्तीची प्रवृत्ती ज्या प्रमाणात नियंत्रित करता येईल त्या प्रमाणात गुन्ह्यांना आळा बसू शकतो.

पश्चिमी समाजशास्त्रज्ञ 'संस्कार' या हिंदू संज्ञेबद्दल व तिच्यामागील संकल्पनेबद्दल अनभिज्ञ आहेत पण तरीही निश्चितपणे ते त्याच दिशेने जात आहेत.

Men Have Forgotten God मध्ये तर ॲलेक्झांडर सोल्हेनित्सिनने (Alexander Solzhenitsyn) नि:संदिग्ध शब्दांत म्हटले आहे की ऐहिक विकासाच्या पाठपुराव्या ऐवजी आध्यात्मिक विकास हेच अर्थशास्त्राचे उद्दिष्ट असले पाहिजे.

१९७९ नंतर चीनमध्येसुध्दा या जाणिवेचा उदय झाला. ऐहिक प्रगतीची मोहिम कायम ठेवून पण कोणत्याही इहवादी तत्त्वज्ञानाचा अंगीकार न करता चीनच्या नेत्यांनी एका आध्यात्मिक संस्कृतीच्या युगाचा शुभारंभ करण्याचा संकल्प केला. जेव्हा लोकांकडून आध्यात्मिक मूल्यांचा आदर व अवलंब होत नाही त्यावेळी असा समाज कोणत्याही प्रकारे राष्ट्रीय चारित्र्य, चारित्र्याची एकात्मता, स्वयंअनुशासन आणि कर्तव्य तप्तरता हे गुण लोकांमध्ये बाणवू शकत नाही असे त्याच्या अनुभवाला आले.

प्राधान्याने पश्चिमी विचारसरणीच्या प्रभावाखाली अखंड वैज्ञानिक व तंत्रवैज्ञानिक प्रगतीचा ध्यास घेतलेल्या पं. नेहरूंनी, मृत्यूपूर्वी अगदी दोनच दिवस [१६] श्री. श्रीमन्नारायण यांच्या पुस्तकाला लिहिलेल्या पुरस्कारात मानवी व्यक्तिमत्त्वाच्या विकासाच्या उद्दिष्टाच्या दृष्टीने धर्मसंकल्पनेचे महत्त्व अधोरेखित केलेले दिसते, हे लक्षणीय आहे. ते म्हणतात –

'....शेती आणि उद्योगधंदे या दोन्हींमध्ये अत्याधुनिक तंत्रप्रगतीच्या साहाय्याने

आपले उत्पादन वाढवून आपला फायदा होणे ही आज भारतात आपल्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची बाब आहे. पण हे करीत असता आपण हे विसरता कामा नये की (आपल्या प्रगतीचे) मूलभूत उद्दिष्ट मात्र मानवी व्यक्तिमत्त्वाचा दर्जा व त्यात अंतर्भूत असलेली धर्म ही संकल्पना हे आहे.'

(...In India, it is important for us to profit by modern technical processes and increase our production, both in agriculture and industry. But in doing so, we must not forget that the essential objective to be aimed at is the quality of the individual and the concept of *Dharma* underlying it.)

तंत्रवैज्ञानिक लवाद संस्थेचे गठण

पश्चिमी तंत्रविज्ञानाच्या मर्यादा पश्चिमेकडील विचारवंतांना कशा जाणवू लागल्या आहेत आणि तंत्रविज्ञानावरील सामाजिक नियंत्रणाची आवश्यकता ते कशी मांडू लागले आहेत, याची सविस्तर चर्चा पूर्वी आलेली आहे. त्याच अनुषंगाने ऑल्विन टॉफ्लरसारख्याने पुढे मांडलेल्या तंत्रवैज्ञानिक लवादाची कल्पनाही पूर्वीच्या विवेचनात येऊन गेलेली आहे. तंत्रवैज्ञानिक लवादासंबंधीचा हा आवाज आज क्षीण असेल. पण इतिहासाची साक्ष आहे की प्रत्येक विवेकी आवाज प्रारंभिक अवस्थेत असाच क्षीण होता. परंतु त्या आवाजाचा दिशावेध अचूक असल्याने आणि बहुतेकांच्या दृष्टीने असंभाव्य वाटणारे पण काही थोड्यांनीच द्रष्टेपणाने पाहिलेले असे अनुकूल घटक जमून आल्यामुळे काळाच्या ओघात त्या आवाजाला बुलंद गतिमानता प्राप्त झाली. त्यामुळेच सर्वसाधारण नैतिक जागृतीमुळेच केवळ नव्हे तर पर्यावरणात्मक, लोकसंख्याविषयक, विकासजन्य, नियोजनात्मक, सांस्कृतिक अशा अनेक प्रस्तुत घटकांच्या अदम्य रेट्यामुळे ही तंत्रवैज्ञानिक लवाद संस्थेबद्दलची मागणी नाकारणे उत्तरोत्तर अवघड होत जाणार आहे.

आंतरराष्ट्रीय पातळीवरील उत्पातवजा घातक अशा अनेक प्रक्रियांची गतिमानता आणि परिणामत: त्यातून उद्भवणारी दु:खे पहाता अशाप्रकारच्या तंत्रवैज्ञानिक लवाद संस्थेचे गठण ही नजिकच्या भविष्यातील एक प्रस्थापित घटना असेल आणि एक नवीन पर्व सुरू करणारे असे आधुनिक जगाच्या इतिहासातील ते एक महत्त्वाचे वळण ठरेल.

आपल्या देशातील नवे पर्व

आधुनिक तंत्रविज्ञानाच्या विरोधातील एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे ते पर्यावरणविघातक आहे आणि विघटनकारी आहे, हा होय. त्यादृष्टीने पूर्वी उल्लेखिलेल्या, आपल्या देशातील स्वदेशी आंदोलनाचा प्रयत्न हा हिंदू विकाससंकल्पना राबविण्याच्या प्रक्रियेतील

एक महत्त्वाचा टप्पा ठरतो. आमच्या देशातील स्वदेशी आंदोलनाचे उद्घाटन म्हणजे आम्ही स्वदेशी प्रबोधनपर्वाच्या (Renaissance)उंबरठ्यावर उभे आहेत याची खूणच आहे.

म्हणून गुणात्मकतेनेच भिन्न असलेल्या आमच्या स्वदेशी प्रबोधनपर्वाचा आमच्या राष्ट्रीय जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये आविष्कार व्हावा ही अपेक्षा काही प्रमाणात निश्चितच फलद्रूप होऊ लागली आहे.

आपल्या देशात क्लॉड अल्वारिस, धरमपाल, श्रीनिवास आणि इतर काही संशोधक - विचारवंतांनी पारंपरिक भारतीय तंत्रविज्ञानाच्या विशेष गुणवत्तेवर प्रकाश टाकला आहे आणि भारत हा तंत्रविज्ञानामध्ये मागासलेला देश होता या पश्चिमी प्रचाराचा यशस्वी मुकाबला केला आहे. उलट त्यांच्या निष्कर्षांवरून, नजिकच्याच भूतकाळातील, पश्चिमी देशांचा तंत्रविज्ञानविषयक मागासलेपणाही सिद्ध होतो.

एतद्देशीय तंत्रविज्ञान विकसित करण्यात आज अनेक गट कार्यरत आहेत त्यामध्येच क्लॉड अल्वारिस आणि धरमपाल यांनी 'स्वदेशी तंत्रवैज्ञानिक चळवळ' सुरू करण्याचे निकराचे प्रयत्न चालविले आहेत. अर्थात त्यांनी तिला अशाप्रकारचे नाव अद्याप दिलेले नाही. क्लॉड अल्वारिस यांची अशी दृढ धारणा आहे की प्रत्येक संस्कृतीचा स्वत:चा असा प्रगतीचा एक आदर्शवजा नमुना असतो आणि तंत्रवैज्ञानिक विकास हा अशा आदर्शाला व आराखड्याला सुसंगत असावा.

आपल्या 'स्वदेशी सायन्स चळवळी'ची कुचेष्टा करणाऱ्यांना कदाचित हे माहित नसेल की, सी. व्ही, रामन यांनी जरी, 'विज्ञान, विज्ञान, आणखी आणखी विज्ञान', अशाप्रकारचा पुरस्कार केलेला होता तरी त्यांचाही, भारतीय परंपरेच्या विकासावर आणि भारतीय विज्ञानाला पश्चिमी विज्ञानाच्या कुबड्यांपासून मुक्त करण्यावर भर होता.

संस्कृतीपासून आधुनिक विज्ञानाची फारकत करण्याच्या, परकीयांच्या प्रेरणेने होणाऱ्या प्रयत्नांना, काही श्रेष्ठ वैज्ञानिकांचा विरोध आहे, ही मोठी उमेद निर्माण करणारी गोष्ट आहे. अणुशक्ति आयोगाचे नियोजित अध्यक्ष राजा रामण्णा यांनी, 'विज्ञान आणि आध्यात्मिकता यांच्या संश्लेषणाची भाषा करणे म्हणजे केवळ झापडबंद परिवर्तनविरोध आणि पुनरुज्जीवनवाद (revivalism) होय' या मतातील पोकळपणा नुकताच (हा उल्लेख १९८३ सालचा आहे.) उघड केला आहे. त्याचप्रमाणे २४ जून १९८३ रोजी त्रिवेन्द्रम (आता तिरुअनंतपुरम्) येथे काही संस्थांच्या सहकार्याने 'भारतीय विचार केन्द्र' या संस्थेने योजलेल्या परिचर्चेत बंगलोरच्या 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स'चे के. आय. वासू यांनी स्वत:च्या निबंधात स्वदेशी विज्ञानासंबंधी महत्त्वाची कल्पना मांडली व त्यांनी सुरू केलेल्या 'स्वदेशी विज्ञान चळवळी' मागील तत्त्वज्ञान स्पष्ट केले. निबंधाच्या शेवटच्या परिच्छेदात त्यांनी म्हटले आहे.

'या उपक्रमात वैज्ञानिक संशोधन, विकास आणि शिक्षण यांच्यासंबंधीच्या राष्ट्रीय

अग्रक्रमांचा पुनर्विचार करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी राष्ट्रीय वैज्ञानिक व तंत्रवैज्ञानिक नीतिनिर्धारणाची आणि वैज्ञानिक व तंत्रवैज्ञानिक कार्यवाहीच्या योजना तयार करण्याची आवश्यकता आहे. अशा नीतीचे व योजनेचे अत्यावश्यक तत्त्व म्हणजे या दोन्ही गोष्टी खऱ्या अर्थाने, भावात्मकतेने स्वदेशी असतील व कार्यवाहीतही स्वदेशीच असतील. केवळ अशाच स्वदेशी विज्ञान चळवळीने आपले राष्ट्रीयत्व सफल होईल, आपले ग्रामीण जीवनाचे सत्त्व सुरक्षित राहील, आपली संस्कृती जतन केली जाईल आणि संपूर्ण विश्वाचीही सेवा घडेल.'

(...In this venture, there is an urgent need to reorient the national priorities in scientific, research, development and education. This calls for a national science and technology policy and national science and technology plan. The essential element of such a policy and plan would be truly *Swadeshi* in spirit and fully *Swadeshi* in execution. Only such a *Swadeshi Science Movement* can make our nationhood fulfilled, our ruralism protected, our culture preserved and the whole world served.)

अशाच प्रकारे व्यवस्थापनाच्या क्षेत्रात कलकत्त्याच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटचे एस्. के चक्रवर्ती यांनी कामाची गुणवत्ता आणि क्रियाशील जीवन यांच्या संदर्भात स्वदेशी दृष्टिकोण विकसित केला आहे आणि क्रियाशील जीवनाची गुणवत्ता वाढविण्याच्या प्रयत्नातील फार मोठा भाग हा कामगारांच्या आंतरजीवनातील सुधारणेतून साधला जाणार आहे, या गोष्टींवर त्यांनी भर दिला आहे. काम म्हणजे काय ? काम कशासाठी करावयाचे ? काम कसे करावयाचे ? अशा छोट्या पण कळीच्या प्रश्नांच्या उकलीची सूत्रे त्यांनी स्वदेशी परंपरेच्या आधारे दिली आहेत.

'यज्ञ' या संकल्पनेच्या सर्व अभिप्रेत अर्थाच्या अनुषंगाने काम हा एक यज्ञच आहे अशीच कोणत्याही कामाविषयीची धारणा असल्याशिवाय संघटनात्मक दृष्ट्या, राष्ट्रीय दृष्ट्या वा आंतरराष्ट्रीय दृष्ट्या कोणत्याही प्रकारे लोकसंग्रह हा शक्यच नाही अशी त्यांची धारणा आहे. त्यांनी म्हटले आहे –

'कामाच्या निगराणीसाठी करावयाच्या त्यागाइतका उदात्त अन्य कोणताही संदर्भबिंदू कामासंबंधीच्या बांधिलकीसाठी असूच शकत नाही. मग ती निगराणी कुटुंबाच्या द्वारा असो, संघटनेच्या द्वारा असो अथवा राष्ट्राच्याद्वारा असो वा त्याच्याही पुढे जाणारी असो.'

(There can be no more superordinate reference point for work commitment than sacrifice for work maintenance-through the family, the organisation, the nation and so on.)

पश्चिमी व्यवस्थापनशास्त्रात या शतकाच्या चवथ्या दशकातील मानवी नाते संबंधाची प्रणाली, सहाव्या दशकातील सामाजिक-तांत्रिक प्रणाली, वा सातव्या दशकातील

कार्यवृद्धी व कार्यसमृध्दीची प्रणाली अशा अनेक प्रणाली विकसित झाल्या आहेत. या सर्व प्रणाली व त्यांच्यापासून निर्माण झालेली छोटी सूत्रे या साऱ्यांपेक्षाही, व्यवस्थापनशास्त्रातील भारतीय दृष्टिकोण व एकूणच या संबंधातील भारतीय धारणा या निश्चितच श्रेष्ठ आहेत, हे त्यांनी निर्णायक रीतीने सिद्ध केले आहे.

पश्चिमी भाषिक साम्राज्यवादालाही मोठा शह बसला आहे. संस्कृत ही मृतभाषा आहे, अशा तऱ्हेने हिणविण्याचे प्रयत्न फोल ठरले आहेत. उलट संगणकासाठी इतर कोणत्याही भाषेपेक्षा ती अधिक उपयुक्त आहे हे आता मानले जाऊ लागले आहे. पाकिस्तानलासुद्धा पाणिनीपासून आपला वारसा सांगण्यात धन्यता वाटू लागली आहे. संस्कृतच्या महत्त्वाला सर्वोच्च न्यायालयानेही नुकतीच मान्यता दिली आहे.

स्वदेशी जागरण मंचाचे राष्ट्रीय निमंत्रक डॉ. एम् जी. बोकरे यांचा स्वदेशी अर्थशास्त्राचे युगानुकूल स्वरूप मांडणारा पूर्वोल्लेखित *The Hindu Economics* हा ग्रंथ हाही याच प्रकारचा समयोचित प्रयत्न आहे.

थोडक्यात असे म्हणता येईल की राष्ट्रीय जीवनाच्या बहुतेक सर्व क्षेत्रांत स्वदेशी भावनेचा उद्‌भव आता जाणवू लागला आहे.

आंतरराष्ट्रीय घटनांचे साहाय्य

सुदैवाने आतंरराष्ट्रीय क्षेत्रातील अनेक घडामोंडीमुळे आपल्या देशातील जनजागरणाला अप्रत्यक्ष मदत झाली आहे. त्यादृष्टीने पूर्वी उल्लेखिलेला मलेशियाच्या महाथीर महमद यांनी घेतलेला 'साउथ कमिशन'च्या गठणातील पुढाकार, (डॉ. मनमोहनसिंग हे आयोगाचे सहकार्यवाह होते आणि दक्षिणांतर्गत सहकार्याची निकड स्पष्ट करणारा अहवाल हा या दृष्टीने एक महत्त्वाचा दस्तऐवज आहे हेही पूर्वी स्पष्ट केले आहे.) फिलिपिन्सच्या मार्कोसने उभ्या केलेल्या राष्ट्रीय कर्जापैकी केवळ देशाच्या विकासासाठी खर्च करण्यात आलेल्या हिश्शाच्या परत फेडीलाच देश जबाबदार आहे, मार्कोसने स्वत:च्या व स्वत:च्या बगलबच्चांच्या ऐषारामासाठी खर्च केलेला त्यातील हिस्सा लाभधारकांकडून वसूल करण्यात यावा अशा प्रकारचा फिलिपिनी राष्ट्रवाद्यांनी उठविलेला सौम्य पण सुजाण आवाज, उत्तर कोरियाने अण्वस्त्र वाटाघाटीबद्दल घेतलेली कणखर भूमिका, अमेरिकेच्या दबावतंत्राबद्दलची चीन व जपानची बदलती भूमिका, काही इस्लामी देशांमधील मूलतत्त्ववाद निपटून काढण्यात अमेरिकेला आलेले अपयश, त्यांना विश्वासात न घेता त्यांच्या शासनाने केलेल्या (परकीय) करारावरुद्ध फ्रेंच शेतकऱ्यांनी केलेले आंदोलन आणि या प्रश्नावर इतर युरोपीय देशांतील शेतकऱ्यांनी त्याला दिलेली सहानुभूतीची साथ, उत्तर अमेरिकेतील तीनही देशांमध्ये नाफ्टाबद्दल उठलेली तीव्र प्रतिक्रिया, मेक्सिकन शेतकऱ्यांचा सशस्त्र उठाव, अमेरिकी कामगारांची आंदोलने, (राष्ट्रविरोधी) करारावर सह्या करणाऱ्या राज्यकर्त्या पक्षाचा कॅनडातील निवडणुकीत जनतेने केलेला धुव्वा, कारगीलच्या कार्यपद्धतीच्या विरोधात अमेरिकेतील

१२ पर्यावरणवादी व मानवतावादी संघटनांनी केलेली निदर्शने, भारत - पाक संबंधातील, स्वत:च्याच सरकारच्या धोरणावर टीका करणारे, अमेरिकेतील मानवाधिकार निरीक्षण समितीच्या अहवालातील शेरे, याच मुद्यावर सत्ताधीश डेमोक्रॅटिक पक्षाच्या कॉंग्रेस सदस्याने अमेरिकन शासनावर केलेली टीका, या अशा प्रकारच्या विविध घटना आहेत. आणि आपल्या देशातील भविष्यातील घडामोडींची अचूक दिशा दाखविण्याला त्या मदत करतात. कदाचित सामान्य नागरिकाला त्यांचे महत्त्व लगेच जाणवेल असे नाही.

योगी अरविंदांनी म्हटल्याप्रमाणे भारतीय प्रबोधनपर्व हे युरोपीय प्रबोधनपेक्षा गुणात्मकतेनेच भिन्न आहे. ते केवळ या देशालाच नव्हे तर, अखिल मानव्याला व संपूर्ण विश्वालाच लाभदायक होईल.

तेव्हा स्वदेशीचे आंदोलन सध्या जरी कदाचित भौतिक वस्तू आणि राष्ट्रीय सार्वभौमत्व यांच्याशीच संलग्न असल्याचे दिसत असले तरी त्याचे पर्यवसान मात्र नव्या प्रकारच्या जागतिक नेतृत्वाच्या उदयात होणार आहे हे निश्चित !

पर्यावरणवादी संस्थांचे कार्य

आधुनिक तंत्रविज्ञान पर्यावरणविघातक आहे हा त्याच्या विरोधातील एक महत्त्वाचा मुद्दा आपण पाहिला आहे. पश्चिमी तंत्रवैज्ञानिक प्रगतीच्या संदर्भातील हा पर्यावरणाचा प्रश्न कसा जटिल झाला आहे व या संबंधातील आपल्या पापाची किंमत मोजण्याची जबाबदारी पश्चिमी राष्ट्रे विकसनशील राष्ट्रांवर कशी लादत आहेत याची चर्चा पूर्वी येऊन गेली आहे. आधुनिक पर्यावरणशास्त्राच्या दृष्टीने विचार करता, पूर्वी येऊन गेलेला एक उल्लेख पुन्हा लक्षात घेण्यासारखा आहे. १९७२ मध्ये श्री. इंदिरा गांधी यांनी स्टॉकहोमच्या जागतिक पर्यावरण परिषदेसमोर जेव्हा स्पष्ट केले की आमच्या अथर्ववेदात पर्यावरणात्मक प्रदूषणाच्या प्रतिबंधात्मक चर्चा केलेली आहे, तेव्हा भारतातील समाजहितेषी अशा सर्वांनाच सुखद धक्का बसला.

आज पश्चिमी विचारातील बदलाच्या प्रभावाने का होईना आधुनिक भारतात या संबंधीची जागरुकता अगदी अलिकडेच निर्माण होऊ लागली आहे. या संदर्भात चिपको आंदोलने, सायलेंट व्हॅली मूव्हमेंट इ. घटना म्हणजे समाजाच्या यासंबंधीच्या सतर्कतेची निकोप लक्षणे आहेत.

पश्चिमी जीवनमूल्यांच्या वैशिष्ट्यांच्या संदर्भात मानवपेशीकेंद्री व ईश्वरविरोधी मानववतावादाचा सविस्तर उल्लेख पूर्वी आलेला आहे.

एस्.पी.सी.ए, बी.डब्ल्यू.सी* अशांसारख्या काही संस्थांना यासंबंधीचे प्रतिबंधात्मक कायदे करवून घेण्यात विविध देशांमध्ये काही प्रमाणात यश मिळाले आहे. पण

---

* परिशिष्ट १ पहा.

तरीही पश्चिमी इहवादी मनावर आवश्यक तो प्रभाव टाकण्यामध्ये त्या पुरेशा यशस्वी झालेल्या नाहीत. कारण मानवतावादाचे पश्चिमेतील विविध प्रकार हे अजूनही 'मानवकेंद्रवादाच्या' वर उठू शकलेले नाहीत. शिबी [१७]राजाचा मानवतावाद हा पश्चिमी मानवतावादापेक्षा गुणात्मकतेनेच भिन्न आहे.

पण वर उल्लेखिलेल्या संस्था मात्र, सौंदर्यांच्या, मोहकतेच्या व कलेच्या नावाखाली मुक्या प्राण्यांचा अनावश्यक छळ व हिंसा यांच्या विरोधात जनजाणीव निर्माण करण्याचा व ती प्रभावी करण्याचा प्रशंसनीय प्रयत्न करीत आहेत. त्याचप्रमाणे प्राण्यांच्या संदर्भातील सर्व प्रकारची अमानुषता थांबवणे, अशा क्रूरतेतून सिद्ध होणाऱ्या उत्पादनांना, संशोधनाद्वारा परिणामकारक पर्याय विकसित करणे, प्राण्यांवर चाचण्या घेऊन तयार केलेल्या अथवा प्राणिज घटकद्रव्ये असलेल्या उत्पादनांना पर्यायी अशी उत्पादने उपलब्ध करून देऊन त्यांच्या वापराला प्रोत्साहन देणे, याही बाबतीत या संस्था सक्रिय आहेत. शिवाय सर्व प्रकारचे प्राणिविरोधी प्रचलित वा नियोजित व्यवहार रोखणे व त्याविरूद्ध तत्पर अशी सुधारणाप्रवण कृती करणे हेही या संस्थांचे कार्य आहे. सर्व प्राण्यांचा जीवनावर समान हक्क आहे आणि माणसाप्रमाणेच अस्तित्वाचा समान हक्क घेऊन ते जन्माला आलेले आहेत, या प्रकारे पश्चिमेच्या सदसद्विवेक बुद्धीला आवाहन करण्याचा या संस्था प्रयत्न करीत आहेत. माणसाने आपले ज्ञान हे सर्व प्राण्यांच्या कल्याणासाठी उपयोगात आणणे हे त्याचे कर्तव्य आहे. शेक्सपीयरच्या शब्दांत सांगायचे झाले तर –

'अतिमानवी शक्ती प्राप्त होणे हे उत्तमच, पण त्या शक्तीचा राक्षसी उपयोग करणे मात्र जुलमीपणाचे आहे.'

(O, it is excellant to have a giant's strength.
But it is tyrannous to use it like a giant.)

(Measure for Measure, Act 11. Scene 2)

भारतामध्ये आतापर्यंत ब्री. डब्ल्यू.सी.ने काही बाबतीत थोडेफार यश मिळविले आहे. १) जन्मल्यापासून ४८ तासांच्या आता काराकूल मेंढीची अतिशय केसाळ मऊ कातडी सोलून काढण्याला प्रतिबंध करणे. २) यातनामय प्रयोगांसाठी माकडाची निर्यात करण्यावर बंदी घालणे. ३) बेडकांचे उर्वीरित शरीर तसेच तडफडत ठेवून अतिशय रानटीपणाने तोडलेल्या तंगड्यांची निर्यात करण्यावर बंदी घालणे. ४) अजून आईच्या दुधाविना दुसऱ्या कोणत्याच खाद्याची सवय नसलेल्या, केवळ दोन आठवडे वय असतानाच हत्या केलेल्या वासराची, दुधाच्या घनीभवनाच्या प्रक्रियेसाठी आयात करण्यावर बंदी घालणे, अशा काही बाबतीत ही संस्था शासनाकडून प्रतिबंध निर्माण करण्यात यशस्वी झाली आहे. अनेकांचे या प्रश्नावर डोळे उघडवणारे प्रबोधन करून त्यांना केसाळ कातड्याच्या प्रवासी थैल्या, कातडी कुडती, हस्तिदंती, रेशमी वस्तू, प्राणिज सुगंधी द्रव्ये आणि अशा अनेक छानछोकीच्या, प्रतिष्ठेच्या वस्तूंचा वापर

स्वखुशीने सोडायला प्रवृत्त केले आहे. बराच गवगवा झालेले बी. डब्ल्यू. सीचे यश म्हणजे एका प्रधानमंत्र्याची* केसाळ टोपी त्याला काढायला लावणे! डब्ल्यू.पी.ए** हा कायदा १९७२ मध्ये पारित झाला. १९७५ मध्ये घरियालांची संख्या वाढविण्याची मोहिम हाती घेण्यात आली. घरियालांच्या नियंत्रित प्रजननाचा ओरिसामधील तिवरेपारा येथील प्रयोग जगातील अशाप्रकारचा पहिलाच प्रयोग होय.

हिंदू विकासनमुन्याच्या प्रात्यक्षिकाचा विसार

एका दृष्टीने हिंदू जीवनदृष्टीला अभिप्रेत असलेल्या - मानवपेशीकेंद्री नव्हे - तर एकात्म मानवतावादाचेच प्रात्यक्षिक भारतातील व आंतरराष्ट्रीय जगतातील उपरोल्लेखित काही घटनाक्रमांतून पहावयास मिळू लागले आहेत.

याप्रमाणे आमच्या परंपरेने विकसित केलेल्या राष्ट्रीय सत्त्वाच्या, चैतन्यतत्त्वाच्या आधारे व्यवहार्य विकासनमुना सिद्ध होऊ शकतो हे जीवनाच्या विविध क्षेत्रांतील वरील काही मोजक्या पैलूंच्या विवेचनावरून स्पष्ट व्हावे. पूर्वी उल्लेखिलेल्या हिंदूच्या समाज परिवर्तनाच्या प्रक्रियेप्रमाणेच हा नमुना, शाश्वत, वैश्विक, सूत्रांच्या प्रकाशात, वर्तमान वास्तवाची सम्यक जाणीव राखून व आमच्या इतिहासदत्त वैश्विक जबाबदारीच्या संदर्भातील भविष्यकालीन राष्ट्रीय आकांक्षांचा वेध घेत सिद्ध होऊ शकतो. यालाच हिंदू जीवनदृष्टीत, युगधर्माचा अवलंब व त्याचे युगानुकूल उपयोजन म्हटले आहे.

वैश्विक कल्याणासाठी हिंदू जीवनदर्शनाचाच आधार

हिंदूच्या अशाप्रकारच्या वैश्विक जबाबदारीत अभिप्रेत असलेल्या खऱ्या जागतिकीकरणाच्या हिंदू विचाराच्या - म्हणजेच मानवी जाणिवेच्या - विकासाशिवाय आंतरराष्ट्रीय आर्थिक क्षेत्रातही खऱ्या अर्थाचा मुक्त व्यापार, तुटपुंज्या सामग्रीचा अधिकाधिक उपयोग करून अमर्याद मानवी भुकांशी तिचे योग्य समायोजन, निसर्गाला कायमचा घातक न ठरणारा व पर्यावरणाची समस्या निर्माण न करणारा विकास, लोकसंख्येच्या विस्फोटाच्या समस्येची योग्य व्यवस्था, आज वेगवेगळ्या देशांनी आपापल्या संरक्षणासाठी केलेल्या प्रचंड अंदाजपत्रकी तरतुदी त्यांच्या विकासाच्या योजनांकडे वळविणे, स्वत:च्या विशेष उत्पादनात वाढ करण्यासाठी प्रत्येक देशाला प्रोत्साहन देणे, वैज्ञानिक व तंत्रवैज्ञानिक लवादसंस्थेची प्रस्थापना, आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी टोळ्यांच्या कारवाया खच्ची करणे आणि जागतिक शांतता, सुमेळ आणि समृद्धी निर्माण करणे या सर्व गोष्टींची खात्री देता येणार नाही हे निश्चित आहे!

त्यादृष्टीने खरे म्हणजे आधुनिक बनायचे की नाही हा आजच्या मानवतेपुढे मुख्य

---

* हा उल्लेख माजी पंतप्रधान विश्वनाथ प्रतापसिंग यांच्याबद्दलचा आहे.

** परिशिष्ट १ पहा.

वा वाजवी प्रश्न नाहीच! आधुनिकीकरण हे केवळ साधन आहे, साध्य नाही. जीवनाचे अंतिम लक्ष्य काय आहे? संपूर्ण, सघन, अखंड आणि चिरंतन असा आनंद हेच धर्माच्या दृष्टीने जीवनाचे ध्येय आहे. ज्या प्रमाणात आजची आधुनिकीकरणाची प्रक्रिया या जीवितहेतूला साहाय्यकारी होईल त्याप्रमाणात ते स्वीकारार्ह आहे. पण हे सर्वोच्च लक्ष्य जर आधुनिकीकरणाच्या साधनीभूततेतून गाठायचे असेल तर आतापर्यंत मांडलेल्या, केवळ हिंदू जीवनदृष्टीवर आधारित अशा एकमेव आधुनिक वैश्विक पर्यायाचा पाठपुरावा झाला पाहिजे.

राष्ट्रीय प्रकल्पाचा संकल्प

आपला देश श्रेष्ठतम करण्यासाठी आवश्यक असे सर्व घटक दैवी वरदानाने आपल्याजवळ आहेत. मानवी, बौद्धिक, सामग्रीबाबत आपण जगातील कोणत्याही समाजांपेक्षा कमी नाही. कमतरता कशाची असेल तर ती राष्ट्रीय इच्छाशक्तीची - अंगभूत गुणवत्तेची नव्हे तर, लक्षात ठेवा, एकता आणि इच्छाशक्ती यांची कमतरता आहे.

म्हणूनच अशा विकासोन्मुख राष्ट्रीय इच्छाशक्तीचे जागरण व उत्थान हाच प्राथमिक महत्त्वाचा प्रकल्प ठरतो.

□ □ □ □

संदर्भ टीपा

१. गोऱ्या माणसाचे ओझे (White Man's burden) वसाहतीतील एतद्देशीय समाजाच्या मनात न्यूनगंड निर्माण करण्याच्या उद्देशाने वसाहतवादी ब्रिटिश सत्ताधीशांनी बनविलेली प्रणाली - गोऱ्या माणसावर वसाहती प्रजेच्या उद्धाराचे ओझे परमेश्वरानेच टाकले असा मतलबी दावा या प्रणालीने मांडला. कट्टर साम्राज्यवादी कवी रुडयार्ड किपलिंग याने पुढे १८९९ मध्ये ही प्रणाली, स्वत:च्या कवितेत, White man's burden या शब्दसंहतीत बांधली.

२. कम्यून (Commune) स्थानिक हितसंबंध जपण्यासाठी गठित केलेले व शासनापेक्षा दुय्यम अधिकार असलेले मंडळ - ऐतिहासिक दृष्ट्या, फ्रेंच राज्यक्रांतीत पॅरिस येथे आस्तित्वात आलेले १७८९ मधील क्रांतिकारी मंडळ - पॅरिस कम्यून. पुन्हा पुढे १८७१ मध्ये प्रत्येक शहर व जिल्हा यांच्या स्वतंत्र, स्वायत्त कारभाराच्या तत्त्वासाठी राष्ट्रीय सरकारविरुद्ध उठाव करणारे पॅरिसच्या समाजवादी मंडळाचे-कम्यूनचे शासन-हे शासन १८ मार्च ते २७ मे १८७१ एवढ्या काळात अस्तित्वात होते. (या व्यवस्थेत अभिप्रेत असलेली विकेंद्रीकरणाची कल्पना साम्यवादात नाही, हा मूळ पुस्तकातील उल्लेखाचा अर्थ.)

३. मध्यम मार्ग - डॉ. शूमाकर यांनी सांगितलेले बौद्ध विचारातील मध्यम स्वरूपाचे तंत्रविज्ञान (Intermediary technology), यालाच पुढे त्यांनी समुचित तंत्रविज्ञान (Appropriate technology) असा शब्द वापरला. या संदर्भात पुढे आणखी काही चर्चा आली आहे.

४. पश्चिमी आर्थिक चिंतनाच्या अनुषंगाने *'Third Way'*मधील मूळ लिखाणात आलेल्या विविध आर्थिक प्रणाली, विकासनमुने, आर्थिक धोरणे, विविध आलेख इ. चे उल्लेख -

Growth models of P. C. Mahalnobis, Harrod and Domer, Keynes and H. W. Singer, Pasinetti, Joan Robinson, Fei Ranis, Swan, Michael Solow, Arthur Lewis, Feldman.

Balanced Growth Strategy of Prof. Nurkse and W. A. Lewis.

Unbalanced Growth Strategy of Hirschman.

'Back Wash Effect', and 'Spread Effect', Forward Linkage and 'Backward Linkage' Growth Propulsion of Gunner Myrdal.

Theory of Big Push by MIT Group and Rosenstein Rodan.

Theory of Critical Minimum Effort by Harvey and Leibenstein.

Fei Ranis model or Lewis model with unlimited suplies of labour.

Keynesian model with the 'saving-investment-income' generation process. Indifference Curve of J. R. Hicks, Utility Curve of Neumann - Morgenstein. Revealed Preference theorem of Samuleson.

याशिवाय खालील विद्वानांचा त्यांच्या अधिकाराच्या विषयांसह आलेला उल्लेख - Leontief model of Input-Outtput table; Market theories of Joan Robinson; Micro-Economics of Ragnor; Expenditure-Tax Theory of Nicholes Kaldor; Trade cycle Theories of Mitchel and J. R. Hicks; General Equilibrium Analysis of Debrau; Public Finance theory of Rechard A. Musgrave; Agricultural Economics of Daniel Thorner.

५. याच संदर्भातील १९९५-९६ ची काही घटकांची आकडेवारी (Observer Statistical Hand-Book-India 1998 मधून घेतलेली)

Total liabilities of Central Government Rs. 605642 Crs. out of which Domestic Debt - Rs. 303359 Crs ; Ratio of internal debt to G. D. P. 50.4 p.c.; External debt. Rs. 148387 Crs; Annual Growth rate of G. N. P. 14.8 p.c.

६. 'डॉली' या मेंढीची प्रयोगशालेत निर्मिती केली गेल्यानंतर (cloning) हे प्रगत प्रजननशास्त्र मानवनिर्मितीसाठी वापरण्याच्या शास्त्रज्ञांच्या प्रवृत्तीवर मोठे वादंग सध्या माजले आहे. एकाच उल्लेखावरून मतभेदाची दरी व तीव्रता यांची कल्पना यावी. शिकागो येथील शास्त्रज्ञ जी. रिचर्ड सीड याने दि. ७ जाने. १९९८ ला घोषित केले की प्रतिवर्षी ५०० बालके कृत्रिम पद्धतीने (cloning) निर्माण करण्याचा त्याचा निश्चय आहे. अमेरिकेत परवानगी मिळाली नाही तर जगात कुठेही, परवानगी मिळेल तेथे हा प्रयोग करण्याची त्याची आकांक्षा आहे.

परंतु एडिंबर्गच्या ज्या 'रोझलिन इन्स्टिट्यूट'मध्ये डॉलीची निर्मिती झाली, तेथील उपसंचालक डॉ. हॅरी ग्रिफिन यांनी रिचर्ड सीडचा प्रयत्न हा पूर्णतः अनैतिक आहे असा आक्षेप घेतला आहे व मनुष्य निर्मितीबाबत असले प्रयोग करू नयेत असे म्हटले आहे. एक आदर्श वंश निर्माण होण्याऐवजी अशा प्रयत्नात मृत बालके जन्माला येणे, बालमृत्यु, कर्करोगाचा उद्‌भव आणि अकाली वार्धक्य अशाप्रकारचे अनेक धोके संभवतात. कारण हे शास्त्र अजून प्रयोगावस्थेतच आहे, मेंढ्यांनासुद्धा त्यापासून धोका आहेच असे त्यांनी म्हटले आहे.

७. फ्रँकेन्स्टिन - मेरी शेलीच्या १८१८ मधील याच नावाच्या कादंबरीतील नायक - ही व्यक्ती माणसासारखाच एक सजीव प्राणी निर्माण करते. पण त्यामुळे या फ्रँकेन्स्टिनचीच छळवणूक व घात होतो. हे अहेतुकतेने होते; पण एक वाक्यप्रचारात्मक

संज्ञा म्हणून निर्मात्याचा विनाश घडवून आणणारी व्यक्ती अशा अर्थाने अपसमजातून हा शब्द वापरला जाऊ लागला.

८. कार्टेसिअन - फ्रेंच तत्त्वज्ञ रेने डेकार्ट (Rene Descartes 1596-1659) - त्याचा तर्कवादावर असलेला भर - विशेषत: भौतिक वास्तवाच्या यांत्रिकी अन्वयाच्या त्याच्या प्रणालीमुळे पश्चिमी विचारव्यूहावर दूरगामी परिणाम झाले.

९. टेक्टॉनिक (Tectonic) भूगर्भशास्त्रातील पारिभाषिक संज्ञा - भूकंपासारख्या उत्पाताच्या वेळी पृथ्वीच्या पोटातील विविध थरांची उलथापालथ करणाऱ्या प्रचंड शक्तींना उद्देशून वापरला जाणारा शब्द.

टेक्टॉनिक प्लेटस् - अशा शक्तींनी नव्याने निर्माण केलेले थर - या ठिकाणी सत्तेमध्ये उलथापालथ घडवून आणणाऱ्या स्थित्यंतरांची कल्पना स्पष्ट करण्यासाठी आलंकारिक अर्थाने हा अन्वर्थक शब्द वापरला आहे.

१०. इन्फर्नो (Inferno) इटालियन कवी डान्टी (Dante Alighieri) याच्या Divine Comedy या प्रसिद्ध महाकाव्याचा पहिला भाग - इन्फर्नो हे नरकाचे चित्रण आहे.

११. एन्सायक्लिकल्स (Encyclicals) - विशिष्ट निमित्ताने विशिष्ट विषयावर पोपकडून ख्रिस्ती अधिकार श्रेणीतील सर्वांना पाठविली जाणारी परिपत्रके - रेरम नोव्हेरम (Rerum Novarum) क्वाड्रोजेसिमो अॅनो (Quadrogesimo Anno), कॉंटेसिमस अॅनस (Contesimus Annus) इ. अशा परिपत्रकांची शीर्षके आहेत.

१२. मॅग्ना चार्टा / कार्टा (Magna Charta / Carta) इंग्लंडमधील लोकांनी इ. स. १२१५ मध्ये राजा जॉन याला सादर केलेले व मान्य करवून घेतलेले मागणीपत्र हेच इंग्लंडच्या राजकीय व व्यक्तिगत स्वातंत्र्याचा पाया बनले. त्यामुळे अशा कोणत्याही मागणीपत्राचा उल्लेख आता आलंकारिकतेने सामान्यनामासारखा केला जातो.

१३. वेल्टॅनशाउंग Weltanschaunng - जर्मन संज्ञा - विशेषकरून मानव व विश्व यांच्या संबंधांचा बोध करून देऊन इतिहास व संस्कृती यांचा अन्वय लावणारा एखाद्या वंशाचा वा समाजाचा एकूण जीवनविषयक अथवा सर्वसमावेशक जागतिक दृष्टिकोण हा अर्थ व्यक्त करणारी संज्ञा.

१४. धर्मशास्त्राच्या इतिहासामधील नोंदी. *Consumer - A Sovereign without Sovereighty* या नावाने - 'ग्राहक पंचायती'च्या उपयोगासाठी लिहिलेल्या पुस्तिकेतील परिशिष्ट १८ मध्ये हे सर्व उल्लेख एकत्र आलेले आहेत.

१५. अब्राहमसनचा सिद्धांत. डेव्हिड अब्राहमसन यांचे सूत्र

$C = (S+T) / R$

C = गुन्हा (Crime), S = सामाजिक पर्यावरण (Social Environment), T = व्यक्तिगत प्रवृत्ती (Personal Traits), R = प्रतिबंध (Resistance) धार्मिक व

नैतिक संगोपनाच्या फलितामुळे होणारा (The outcome of moral religious upbringing)

सामाजिक पर्यावरण व व्यक्तिगत प्रवृत्ती यांना, ज्या प्रमाणात धार्मिक व नैतिक पोषणामुळे प्रतिबंध होतो, त्याप्रमाणात गुन्ह्याची शक्यता कमी होते, असा या सूत्राचा अन्वय.

१६. पं. नेहरूंनी श्री. श्रीमन्नारायण यांच्या पुस्तकाला हा पुरस्कार (Foreward) दि. २५ मे १९६४ रोजी (मृत्यूच्या आधी दोन दिवस) डेहराडूनच्या शासकीय विश्रामधामातून (Circuit House) पाठविला होता.

१७. आपल्या परंपरेतील राजाचा उल्लेख - ससाण्याच्या तावडीतून सुटलेले कबुतर राजाच्या आश्रयाला आले तेव्हा ससाण्याने स्वत:चे खाद्य म्हणून त्याची मागणी केली. तेव्हा कबुतराचाही जीव वाचावा व ससाण्याचीही उपासमार होऊ नये, म्हणून शिबी राजाने कबुतराच्या वजनाचे मांस स्वत:च्या शरीरातून काढून दिले. असा संदर्भ - हिंदू जीवनदृष्टीतील मानवतावाद हा केवळ मानवपेशीकेंद्रीत नाही तर मानवतेवर जीवपेशींचीही काळजी घेणारा आहे, हे सांगण्यासाठी येथे शिबी राजाचा उल्लेख आला आहे.

□ □ □ □

देशी संविधानात्मक व्यवस्थेकडे

मूळ पुस्तकातील,प्राधान्याने
खालील भागांवरून या विषयाचे संकलन केलेले आहे.

Part 1

1) The Hindu Concept of World Order.

Part 2

1) Towards Indigenous Legal System
(दि. ७ सप्टेंबर १९९२ रोजी नवी दिल्ली येथे अ.भा. अधिवक्ता
परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी केलेले भाषण)

2) With No Comments...
(दि. ४ जून १९९४ रोजी भोपाळ येथे अ.भा. अधिवक्ता
परिषदेसमोर वाचलेले प्रारूप)

3) Our Constitution.
(१९९२ च्या उत्तरार्धात झालेल्या बुद्धिवंताच्या
परिचर्चेला आधारभूत असलेले प्रारूप)

4) Old Wine in New Bottle
(१९९२ च्या उत्तरार्धात झालेल्या बुद्धिवंताच्या
परिचर्चेला आधारभूत असलेले प्रारूप)

5) State as Instrument
(१९९२ च्या उत्तरार्धात झालेल्या बुद्धिवंताच्या
परिचर्चेला आधारभूत असलेले प्रारूप)

Part 3

1) Parties Based On Economic Ideologies...

देशी संविधानात्मक व्यवस्थेकडे

प्राप्त वर्तमानात संविधान हे विकासाचे माध्यम

मागील भागापर्यंत आपण विकास संकल्पना व तिच्या अनुषंगाने आर्थिक नीती व व्यवस्था यांचा विचार केला. सध्याच्या सामाजिक, राजकीय, शासकीय पर्यावरणात अशी सर्व व्यवस्था राबविण्याची जबाबदारी राज्यशासनाकडेच असते व तूर्त तरी ती तशीच रहाणार हे अटळ आहे. आणि अशा राज्यशासनाच्या निर्मितीची, कर्तव्यप्रवण क्रियाशीलतेची, आणि विकाससंकल्पना व तज्जन्य आर्थिक नीतीच्या परिणामकारक फलदायी राबवणुकीसाठी विविध यंत्रणा निर्माण करण्याची जबाबदारी त्या त्या देशाच्या संविधानात्मक व्यवस्थेच्या अनुषंगाने सिद्ध होत असते. या संविधानाप्रमाणेच, विविध यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी कायदे करणारी व्यवस्था, या यंत्रणेच्या द्वारा कार्यवाही करणारी शासनव्यवस्था व तिच्या व एकूण समाजाच्या व्यवहाराच्या योग्यायोग्यतेचा निवाडा करणारी न्यायपालिका अशी तिहेरी व्यवस्था निर्माण होत असते.

विकाससंकल्पनेप्रमाणेच स्वतंत्र भारताच्या या सर्व संविधानात्मक व्यवस्थेच्या काही पर्यायी नमुन्याचाही आपल्या सांस्कृतिक सत्त्वाच्या आधारावर पुनर्विचार करणे आवश्यक आहे. आणि त्यातून राजकीय संरचनेच्या दृष्टीनेही त्याला तिसरा पर्याय देण्याची आवश्यकता आहे. आज मात्र स्वतंत्र भारताच्या संविधानात्मक संकल्पनेवर व रचनेवर पश्चिमी नीतीचा व आकृतिबंधाचा जबरदस्त प्रभाव आहे. आजच्या आमच्या बहुतांश सामाजिक, आर्थिक, राजकीय व उर्वरित सांस्कृतिक समस्यांची मुळे याही वस्तुस्थितीत आहेत. म्हणून प्रथम प्रत्यक्ष वर्तमान वास्तवाचा विचार आवश्यक ठरतो. परंपरेचे भान आणि वर्तमानाचे असे संदर्भ याच्यातूनच राजकीय संरचनेच्या दृष्टीनेही जगाला तिसरा पर्याय देण्याची जबाबदारी पार पाडणे भारताला आवश्यक आहे.

त्यादृष्टीने आपण आज अशा एका काळात विचार करीत आहोत की ज्यावेळी देशाच्या भवितव्यासंबंधी आस्था असलेले सर्वजण वर्तमान न्यायव्यवस्थेच्या उपयुक्ततेबद्दल उत्तरोत्तर अधिकाधिक संशयात्म बनत चालले आहेत. त्यांच्या मनात

अतिशय गंभीर प्रश्न आहे की 'योग्य तेच माझे असेल की माझे ते योग्य म्हणणार ?'

भारतीय संविधान निर्मितीची पार्श्वभूमी

या परिस्थितीची योग्य कारणमीमांसा करणे व त्यातून पुढील काळासाठी मार्गदर्शक सूत्रे मिळविणे यासाठी न्यायव्यवस्था, कायदा या क्षेत्रातील आधारभूत दस्तऐवज जे भारतीय संविधान, त्याच्या सिद्धतेची पार्श्वभूमी, त्याचे फलित व परिणाम आणि त्याच्या उपयोजनातील राजकीय, शासकीय व अन्य मर्यादा यांचा विचार करावा लागतो...

कायदा न्यायक्षेत्रातील समूहासाठी संविधान हा सर्वात महत्त्वाचा दस्तऐवज आहे. संविधान म्हणजे ---

'कायद्याच्या रूपाने आणि कायद्याच्याच द्वारा रचलेली राजकीय समाजाची चौकट ! कायद्यानेच या चौकटीत असणाऱ्या कायमस्वरूपी संस्था प्रस्थापित केलेल्या असतात.'

(Constitution is a frame of political society organised through and by law, that is to say, one in which law has established permanent institutions with recognised functions and definite rights.)

पण अशाप्रकारच्या एखाद्या राजकीय समाजाच्या जीवनातील इतक्या महत्त्वाच्या दस्तऐवजाची स्वतंत्र भारताच्या संदर्भातील निर्मिती कशी झाली हे पाहिल्याशिवाय सध्याच्या संशयात्म मानसिकतेचे विश्लेषण होऊ शकणार नाही. त्यासाठी भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या पार्श्वभूमीचीही दखल घेणे आवश्यक आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळची परिस्थिती

भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्यावेळी, सत्तांतराच्या आगेमागे काय परिस्थिती होती ?

ले. जनरल सर फ्रॅन्सिस टकर हे पूर्वविभागाचे सेनापती होते. त्यांनी आपल्या *Memory Serves* या पुस्तकात म्हटले आहे....

'शेवटी आमच्या लक्षात आले की ही सैनिकी जबाबदारी (भारताला अंकित ठेवण्याची) ही आमच्या कंगाल झालेल्या देशाच्या औद्योगिक गरजांना सहन होऊ शकेल त्यापेक्षा जास्त आहे. भारत सोडण्याचे व त्यातूनही तात्काळ सोडण्याचे हे एक प्रबल कारण होते.'

(ultimately we found that this garrison commitment was more than the industrial needs of our impoverished country could stand. That was another strong reason for our leaving India and leaving it quickly.)

सर स्टॅफोर्ड क्रिप्स या भारतमंत्र्याने ब्रिटिश संसदेला सांगितले की भारतावरचा ताबा कायम ठेवण्यासाठी....

'भारतमंत्र्याच्या कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या संख्येत वाढ आणि ब्रिटिश सैन्याला

लक्षणीय बळ देणे' या गोष्टी करणे आवश्यक होते.'

(An expanded personnel in the Secretary of States' Services and a considerable reinforcement of British troops would have been required.)

१९४५ च्या सप्टेंबर महिन्यात, भारतीय औद्योगिक क्षेत्राचे नेते जी.डी. बिर्ला व जे.आर्.डी. टाटा यांच्या नेतृत्वाखालील मंडळाने अधिकृत औद्योगिक मोहिमेच्या अंतर्गत, सहकार्याच्या वातावरणाचा अंदाज घेण्यासाठी इंग्लंड व अमेरिकेला भेट दिली. या अधिकृत भेटीमुळे....

'भारत-इंग्लंड सहकार्याच्या नव्या पर्वाचा प्रारंभ झाला. कारण या औद्योगिक मंडळाला ब्रिटिश उद्योगांची भारतातील औद्योगिक विकासाबद्दल बदललेली धारणा जाणवली आणि केवळ भारतीय औद्योगीकरणाच्या अनिवार्यतेबद्दलच नव्हे तर अनेक बाबतीत - भारताच्या राजकीय आकांक्षांबाबतही - मोठ्या ब्रिटिश उद्योगांनी मिळतीजुळती भूमिका घेतलेली दिसली.'

(.....[This] ... opened a new chapter of Indo-British Cooperation, for the Mission found a definite change in the attitude of British industries towards Indian industrial development and large British industries had not merely reconciled themselves to the inevitability of industrialisation of India, but in many cases seemed to be in accord with India's political aspirations.)

(Eastern Economist - 29 June, 1945)

गुन्नर मिर्डाल, त्याच्या *Asian Drama* या प्रसिद्ध पुस्तकात म्हणतो....

'ब्रिटिशांनी गांधीजींच्या अहिंसेच्या धोरणाबद्दल कृतज्ञ रहावे याला चांगलेच कारण आहे.... स्वातंत्र्यानंतर पूर्वीच्या देशांशी असलेले जवळचे संबंध जतन केले गेले आणि काही बाबतीत तर अधिक दृढ केले गेले.... हे लक्षात घेतले पाहिजे की दक्षिण आशियातील देशांमध्ये आज असलेली आर्थिक व सामाजिक परिस्थिती ही वसाहतवादी सत्तेच्या व्यवस्थेच्या विघटनापूर्वी असलेल्या परिस्थितीपेक्षा फारशी वेगळी नाही.'

(...The British has good reason to be grateful for Gandhi's policy of non-violence .... After independence the close relations with the former ... countries were preserved and in some respects intensified... It should be remembered that economic and social conditions of South Asian countries today are not very different from those existing before disintigration of colonial power system)

स्वातंत्र्यानंतर जुन्या व्यवस्था कायमच !

१९३५च्या भारतसरकारच्या कायद्यान्वये लॉर्ड माउंटबॅटन हा स्वतंत्र भारताचा पहिला गव्हर्नर जनरल झाला आणि पं. नेहरू हे पहिले पंतप्रधान झाले.

१५ ऑगस्ट १९४७ नंतर दोन वर्षेपर्यंत भारतीय सैन्य हे जनरल बौचर (General Boucher) या ब्रिटिश सेनापतीच्याच सर्वोच्च अधिकाराखाली होते व आपली संरक्षणसेवांची प्रशिक्षण व्यवस्थाही अजूनही ब्रिटिशांच्याच हाती होती.

स्वतंत्र भारताच्या पहिल्या शासनाने वरच्या व खालच्या पातळीवरील वेतन श्रेणीतील फरक कायम ठेवून पूर्वीची संपूर्ण शासकीय व्यवस्था कायम ठेवली. वसाहतवादी सत्तेने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सुरू केलेल्या व विकसित केलेल्या, संसदीय प्रक्रियेपासून ते कनिष्ट नोकरवर्गाचे गोपनीय दप्तर ठेवण्याच्या प्रथेपर्यंत सर्व शासकीय सवयी व प्रक्रिया आजपर्यंत तशाच कायम राहिल्या आहेत.

क्रांतीच्या केवळ घोषणा

हे आवर्जून लक्षात घेण्यासारखे आहे की १९३३ मध्ये पंडित नेहरूंनी म्हटले होते ----

'जर एखाद्या स्वकीय शासनाने परकीय शासनाची जागा घेतली आणि त्याचे स्वार्थी हितसंबंध मात्र कायम ठेवले तर ती स्वातंत्र्याची नुसती छायासुद्धा म्हणता येणार नाही.'

(If any indigenous government took the place of the foreign government and kept all the vested interests intact, this would not even be a shadow of freedom)

आणि जरी त्यांनी आत्मचरित्रात असेही म्हटले होते की -----

'एका गोष्टीबाबत माझी खात्री झाली आहे की जोपर्यंत ब्रिटिशप्रणीत भारतीय शासकीय सनदी नोकरशाहीच्या सेवांबद्दलची मानसिकता आमच्या शासकीय व्यवस्थेत आणि सार्वजनिक सेवांमध्ये कायम असेल तोपर्यंत भारतामध्ये कोणतीही नवी व्यवस्था उभी करता येणार नाही. म्हणून नव्या व्यवस्थेसंबंधी आपण खरे काम सुरू करण्यापूर्वी या आणि इतर सेवा या लयाला गेल्या पाहिजेत हे मला अतीव आवश्यक वाटते. ही तर कल्पनेच्या पलीकडची गोष्ट आहे की त्यांना आजच हास्यास्पद अतिरिक्ततेने मिळणारे वेतन आणि भत्ते त्यांना पुढेही मिळत रहावेत.'

(Of one thing I am quite sure, that no new order can be built in India so long as the spirit of the I.C.S. pervades administration and our public services. Therefore, it seems to me quite essential that the I.C.S. and similar Services must disappear completely before we can start real work on a new order. It is inconceivable that they will get

the absurdly high salaries and allowances that are paid to them today.)

[Autobiography.]

तरीही मूलत: काहीही बदललेले नव्हते. जुन्या शासनाचे सर्व आधार, जुनी सामाजिक - आर्थिक व्यवस्था, पोलिस, न्यायव्यवस्था, सैन्य आणि शिक्षण पूर्वीप्रमाणेच सर्व चालू राहिले. उलट स्वातंत्र्यपूर्व काळात वर उद्धृत केल्याप्रमाणे मत व्यक्त करणाऱ्या त्याच पंडित नेहरूंनी एप्रिल १९४८ मध्ये घटना समितीत मात्र कोणताही मूलभूत बदल करण्याबाबतची आपली नाखुषी व्यक्त केली.

'प्रचलित रचनेला फारसा धक्का लागणार नाही याबद्दल, पुढील कोणतीही पावले टाकणाऱ्याने काळजी घेतली पाहिजे. आणखी मोडतोड करावी इतका मी धाडसी व शूर नाही.'

(One has to be careful of the steps one takes so as not to injure the existing structure too much--- I am not brave, gallent enough to go about destroying any more.)

क्रांतिकारक घोषणा असून सुद्धा प्रगमनशीलता नव्हे, तर हा केवळ सावधपणा होता.

त्याचप्रमाणे ब्रिटिश राष्ट्रकुलात रहाण्याचा निर्णय घेण्यात आला. १७ फेब्रुवारी १९४८ ला पंडित नेहरूंनी घोषित केले---

'आर्थिक रचनेमध्ये कोणताही आकस्मिक बदल करण्यात येणार नाही. शक्य होईल तितके आज असलेल्या उद्योगांचे राष्ट्रीयीकरण केले जाणार नाही.'

(There will not be any sudden change in the economic structure. As far as possible, there will be no nationalisation of the existing industries.)

६ एप्रिल १९४८ रोजी प्रसिद्ध झालेल्या आर्थिक धोरणाबद्दलच्या प्रस्तावात म्हटले आहे की शस्त्रास्त्रांचे कारखाने, रेल्वे, विद्युतनिर्मिती आणि अणुशक्तिनिर्मिती यांच्याशिवाय इतर औद्योगिक क्षेत्र हे सर्वसाधारण खाजगी उद्योगांना मोकळे ठेवण्यात येईल.

आर्थिक धोरणाच्या प्रस्तावाबरोबर प्रसिद्ध करण्यात आलेल्या स्पष्टीकरणात्मक टिपणात म्हटले होते -

'भारतीय उद्योग क्षेत्रामध्ये परकीय भांडवलाला आणि उपक्रमांना पूर्ण वाव देण्याची प्रस्तावात कल्पना आहे. त्याचप्रमाणे राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने या गोष्टी नियंत्रित करण्याचीही कल्पना आहे.'

(The Resolution contemplates full freedom for foreign capital and enterprise in Indian industry while at the same time assuring that it should be regulated in the national interest.)

घटनेच्या मसुदा समितीचे एक सदस्य श्री. अल्लादी कृष्णस्वामी अय्यर यांनी म्हटले आहे.

'आपण क्रांतीनंतर नवीन घटनेचा प्रारंभ करीत नाही आहोत. इतकी वर्षे कार्यरत असलेली प्रचलित शासकीय रचना नव्या चौकटीत पूर्ण दुर्लक्षित करता येणार नाही.'

(We are not starting a Constitution anew after a revolution. The existing administrative structure which has been worked so long, cannot be altogether ignored in the new frame-work.)

आमच्या नेत्यांची बौद्धिक गुलामगिरी

खरे म्हणजे प्रचलित व्यवस्थेपासून म्हणण्यासारखी फारकत घेण्याची या नेत्यांची मन:स्थितीच नव्हती.

नक्षलवादी नेते श्री. नागी रेड्डी यांच्या, या संदर्भातील या विधानाशी आपल्याला सहमत व्हावेच लागते...

'बाह्य स्वरूपातील राजकीय हुकमतीतील बदलाशिवाय आमच्या सामाजिक रचनेमध्ये वा आर्थिक व्यवस्थेमध्ये मूलत: काहीही बदल झालेला नाही.'

(Whatever the outward changes in political control, nothing essential has changed either in our social set up or in our economic organisation.)

स्वतंत्र भारताच्या पहिल्या शासनाने आधीची शासकीय व्यवस्था, शासकीय सवयी आणि शासकीय पद्धती कायम ठेवल्या. त्याचप्रमाणे वसाहतवादी कायदेव्यवस्था पुढे ओढली गेली आणि न्यायपद्धतीही राखली गेली.

त्यातही ब्रिटनमध्ये ही व्यवस्था बदलत्या सामाजिक पर्यावरणानुसार कालसंगत करण्याचा प्रयत्न झाला. पण आमच्या राज्यकर्त्यांनी मात्र वसाहतवादी सत्तेशी असलेल्या पूर्वापारच्या कर्मठ निष्ठेमुळे या परिवर्तनाची दखल न घेता स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी अस्तित्वात असलेली परिस्थितीच कायम ठेवली. उदाहरणच पहायचे तर आपल्या न्यायालयातील खटल्याचे पहाता येईल.

आपली प्राचीन पारंपरिक पद्धती ही शोध घेणारी पद्धती होती. न्यायाचा हेतू ती पूर्णपणे सफल करीत असे. ब्रिटिशपद्धती ही दोषारोप करणारी आहे. या संदर्भात ब्रिटिश पद्धतीचे एक भाष्यकार लॉर्ड डेनिंग यांनी म्हटले आहे की---

'आपल्या देशात (ब्रिटनमध्ये) विकसित केलेल्या न्यायालयीन खटल्याच्या पद्धतीत न्यायाधीश संबंधित बाजूंनी उभ्या केलेल्या मुद्द्यांच्या आधारे न्याय देण्यास बसलेला असतो. पण आमच्या समजुतीप्रमाणे काही परकीय देशांत घडते, त्याप्रमाणे न्यायाधीश सर्वसाधारण समाजातर्फे स्वत: शोध किंवा परीक्षा (त्या मुद्द्यांची) करीत नाही.'

प्रचलित ब्रिटिश न्यायव्यवस्था स्पष्ट करून लॉर्ड डेनिंग यांनी म्हटले आहे की-

'आपल्या कायद्यात हे इतके भक्कमपणे प्रस्थापित झालेले आहे की तथ्यावर

प्रकाश टाकू शकेल अशा एखाद्या साक्षीदाराला दिवाणी दाव्याच्या सुनावणीमध्ये स्वतः न्यायाधीश बोलावू शकत नाही. संबंधित बाजूंनी सादर केलेल्या साक्षीदारांवरच त्याला समाधान मानावे लागते. त्याचप्रमाणे केवळ वकिलालाच साक्षीदाराची तपासणी करता येते. न्यायाधीशाला ती जबाबदारी घेता येत नाही. अन्यथा या किंवा त्या बाजूला तो अनुकूल असल्यासारखे ते दिसेल. पुढे आलेल्या पुराव्याकडे नीट लक्ष देणे; आणि एखादा दुर्लक्षित अथवा संदिग्ध मुद्दा असेल तर तो स्पष्ट करण्यापुरतेच साक्षीदारांना प्रश्न विचारणे; वकिल हे कायद्याच्या चौकटीतच औचित्याला धरून वागत आहेत हे पहाणे; पुनरुक्तीला पायबंद घालणे व गैरलागू गोष्टी वगळणे; वकिल मांडीत असलेला मुद्दा व त्याचे महत्त्व आपल्याला योग्यप्रकारे समजले आहे याची खात्री करून घेण्यासाठी मध्येच सुजाण हस्तक्षेप करणे; आणि सरतेशेवटी सत्य नेमके कोठे आहे हे मनाशी नक्की करणे; येवढेच न्यायाधीशाचे या सर्व सुनावणीत काम असते. तो याच्यापलीकडे गेला तर त्याने न्यायाधीशाचे वस्त्रे उतरवली आणि वकिलाचा डगला चढवला असे होते आणि हा बदल त्याला मुळीच शोभेनासा असतो.'

(So firmly is all this established in our law that the judge is not allowed in a civil dispute to call a witness who, he thinks, might throw some light on the facts. He must rest content with the witnesses called by the parties ---- so also it is for the advocates, each in his turn, to examine the witnesses and not for the judge to take on himself lest by so doing he appears to favour one side or the other. The judge's part in all this is to hearken to the evidence, only himself asking questions to witnesses when it is necessary to clear up any point that has been overlooked or left obscure; to see that advocates behave themselves seemly and keep to the rules laid down by law; to exclude irrelavancies and discoueage repetition; to make sure by wise intervention that he follows the points that the advocates are making and can assess their worth; and at the end to make up his mind where the truth lies. If he goes beyond this, he drops the mantle of judge and assumes the robe of an advocate - and the change does not become him well.)

प्रत्येक न्यायासनाला साक्षीदारांवर अवलंबून रहावे लागते आणि साक्षीदारांनी आपले पुरावे भय न बाळगता द्यावेत हे न्यायप्रस्थापनेसाठी आवश्यक असते. (भारतातील) सध्याच्या परिस्थितीत राजकारणी आणि गुन्हेगार यांची अशुभ युती असल्याने धनदांडग्यांच्या शक्तीपुढे निर्भयतेने व मोकळेपणाने बोलू शकतील अशा प्रकारचे विश्वसनीय साक्षीदार मिळणे व्यवहार्य आहे का ?

लॉर्ड डेनिंगच्या मते आणखी एका बाबतीत ब्रिटिश न्यायव्यवस्था अपुरी आहे. त्याच्या म्हणण्याप्रमाणे -

'प्रमाणभूत तत्त्वे खालावलेली नाहीत पण तरीही त्यांत आज फरक पडलेला आहे. सार्वजनिक क्षेत्रातील व्यक्ती आज पूर्वीपेक्षा अधिक टीकेचे लक्ष्य बनू लागल्या आहेत. आणि म्हणून आपल्याबद्दलच्या लोकापवादाला जागा मिळू नये ग़ासाठी पूर्वीपेक्षा त्यांना अधिक दक्ष रहावे लागते. कारण तसे राहिले नाही तर त्यांना पुराव्यामध्ये उघड झालेल्या गोष्टींच्या वाढत्या धोक्याला तोंड द्यावे लागते. प्रतिष्ठित लोकांसंबंधीचे लोकापवाद ही आज एक बाजारी विकाऊ वस्तू झाली आहे. खरी, खोटी, प्रत्यक्ष वा कपोलकल्पित कशीही ती विकली जाते. जितका लोकापवाद मोठा तितकी त्याची किंमत अधिक! त्यातही पुष्टीसाठी पत्रे वा छायाचित्रे - काल्पनिक वा खरी - असली म्हणजे तर मग विचारूच नका! बऱ्याचदा अशोभनीय वर्तणुकीतील भागीदार असल्याची बतावणी करीत विक्रेते स्वत:च त्याचा फायदा उठविण्याचा प्रयत्न करतात. मध्यस्थ हे सदैव तत्परतेने विक्रीला मदत करून जास्तीत जास्त किंमतीची निश्चिती करतात. ही सारी कथा सांगता सांगताही सुधारली जाते. वृत्तपत्रांना सादर केली जाते. अशा प्रकारच्या वस्तूच्या विनिमयात काही थोडेच लोक गुंतलेले असतात. ते अशा प्रकारच्या कथा विकत घ्यावयास अहमहमिकेने पुढे येतात. दुसरा ती प्रथम बळकावेल असे प्रत्येकाला भय असते. ती किफायतशीर होईल या आशेने ते ती खरेदी करतात. काहीवेळा तिचा त्यांना उपयोग नसतो. ती तद्दन खोटी असते. पण कधीकधी ती विश्वसनीयही असते. अब्रुनुकसानीच्या संदर्भातील कायदा आणि न्यायालयाच्या अवमानासंबंधीचा नियम यामुळे या प्रकारांना परिणामकारक पायबंद बसतो. त्यामुळे त्यांना शक्य, तेवढाच भाग ते प्रसिद्ध करतात. पण जे प्रसिद्धीला योग्य नाही असा बराचसा भाग रहातोच आणि हा अप्रकाशित भाग तोंडी घोळविला जात सर्वदूर पसरतो. फ्लीट स्ट्रीटपुरता तो सीमित रहात नाही, तर तो वेस्टमिन्स्टरपर्यंत पोचतो. ब्रिटिश खाडीही ओलांडतो. अटलांटिक ओलांडूनही तो पार जातो आणि परत येतो तेव्हा तो अधिकच फुगून आलेला असतो. पण मुळातील खरेदीशिवाय हे प्रकरण याप्रमाणे सुरू झालेच नसते. अशाप्रकारचे दूषणीय परिणाम पाहिल्यानंतर एक गोष्ट नक्की स्पष्ट होते की अशाप्रकारे लोकापवादाची केवळ मोबदल्यासाठी आयात-निर्यात करणे काहीतरी करून थांबवलेच पाहिजे.'

(There has been no lowering of standards. But there is difference today. Public men are more vulnerable than they were; and it behoves them, even more than ever, to give no cause for scandal. For if they do, they have to reckon with a growing hazard which has been disclosed in the evidence I have heard. Scandalous information about well-known people has become a marketable commodity. True or false, actual or

invented, it can be sold. The greater the scandal, the higher the price it commands. If supported by photographs or letters, real or imaginary, all the better. Often enough, the sellers profess to have themselves as participants in the discreditable conduct which they seek to exploit. Intermediaries move in, ready to assist the sale and ensure the highest prices. The story improves with the telling. It is offered to the newspapers. There are only a few of them who deal in this commodity. They vie with one another to buy it. Each is affraid, the other will get it first. So they buy it on chance that it will turn out profitable. Some times it is no use to them. It is palpably false. At other times it is credible. But even so, they dare not publish the whole of the information. The law of libel and the rules of contempt of court exert an effective restraint. They publish what they can, but there remains a substantial part which is not fit for publication. Thus the unpublished part goes round by word of mouth. It does not stop in Fleet Street. It goes to Westminster. It crosses the channel, even the Atlantic and back again, swelling all the time. Yet without the original purchase, it might never have got started on its way.... When such deplorable consequences are seen ..... the one thing that is clear is that something should be done to stop the trafficking in scandal for reward.)

Freedom Under Law या ग्रंथात तीस वर्षांपूर्वी लॉर्ड डेनिंग यांनी आणखी एका पैलूला स्पर्श केला आहे.

'व्यक्तिगत स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्यासाठी असलेली आपली पद्धती ही अतिशय कार्यक्षम आहे. पण सत्तेचा गैरवापर थांबविण्यासाठी असलेली पद्धती तितकी कार्यक्षम नाही. ज्याप्रमाणे खाणीतून कोळसा काढायला 'कुदळ व फावडे' ही आता फारशी उपयोगाची राहिलेली नाहीत, त्याचप्रमाणे वरच्या न्यायालयातून खालच्या न्यायालयाकडे, दाव्याच्या सुनावणीच्या तपशीलाची पुन्हा चिकित्सा व्हावी अशी केलेली विनंती; वरच्या न्यायालयाने विशिष्ट कर्तव्य पार पाडण्यासाठी केलेली आज्ञा अथवा त्या प्रकरणी केलेली कृती या गोष्टी नव्या युगात स्वातंत्र्य कोरून काढण्यास उपयोगी नाहीत. घटनात्मकदृष्ट्या महत्त्वाच्या अशा तीनशे वर्षांपूर्वी घडून आलेल्या बदलांसारख्याच बदलांना आपल्याला आपल्या काळात तोंड द्यावयाचे आहे. अशा आव्हानांना आपण पुरे पडतो हे सिद्ध करू या!'

(Our procedure for securing our personal freedom is efficient, but our procedure for preventing the abuse of power is not. Just as

pick and shovel is no longer suitable for the winning of coal, so also the procedure of mandamus, certiorari, and action on the case, are not suitable for the winning of freedom in the new age - We have in our time to deal with changes which are of equal constitutional significance as those which took place 300 years ago. Let us prove ourselves equal to the challenges.)

पण पुन्हा स्वातंत्र्य आणि सुरक्षितता यांतील संतुलन राखण्यासंबंधी त्यांनी म्हटले आहे.

'आपण ज्या समाजगटात रहातो, त्यातील 'शांतता आणि सुव्यवस्था' यांच्या रूपाने अस्तित्वात असलेल्या सामाजिक सुरक्षेशी स्वातंत्र्याचा मेळ असला पाहिजे. एखाद्या न्यायी माणसावर जर एखादा खुनी वा चोर आघात करू शकत असेल तर अशा माणसाच्या स्वातंत्र्याला काही अर्थ नाही. प्रत्येक समाजाजवळ लुटारूंपासून स्वत:चे संरक्षण करण्याची साधने असली पाहिजेत. कायदे मोडणाऱ्यांना शोधणे, अटक करणे वा तुरुंगात टाकणे यासंबंधीचे अधिकार त्याच्याजवळ असणे आवश्यक आहे. जोपर्यंत हे अधिकार योग्य रीतीने राबवले जात आहेत तोवर ते स्वातंत्र्याचे रक्षणकर्ते असतात. या अधिकारांचा दुरुपयोग होऊ शकतो आणि असा दुरुपयोग झाला तर मात्र यांच्यासारखा जुलुम दुसरा कोठलाच नाही.'

(It [i.e. freedom] must be matched, of course, with social security, by which I mean, the peace and good order of the community in which we live. The freedom of the just man is worth little to him if he can be preyed upon by the murderer or the thief. Every society must have means to protect itself from marauders. It must have powers to search, to arrest and to imprison those who break the laws. So long as those powers are properly exercised, they are the safeguards of freedom. But powers may be abused, and if those powers are abused, there is no tyranny like them.)

पण ब्रिटिश व्यवस्थेची कालसंगत परिवर्तनक्षमता

ही तीन दशकांपूर्वीची ब्रिटनची स्थिती होती. भारतात अशाचप्रकारची स्थिती आज आहे. पण ब्रिटिशांच्या व आमच्या नेतृत्वाच्या धारणेतील फरक लक्षात घ्या. तीस वर्षांपूर्वीचा ब्रिटिश कायदा आणि आजचा कायदा यांच्यांत या मुद्यांमध्ये लक्षणीय फरक आहे. आव्हान स्वीकारून पूर्वीच्या निर्णयांपासून फारकत घेतली गेली आहे. पूर्वीपासून मान्यता असलेले प्रस्ताव उधळून दिलेले आहेत. 'हुसकावून लावण्याची' कलमेच काढून टाकली गेली आहेत. आणि एखाद्या कलमाचा केवळ शाब्दिक

अन्वय लावण्याची पद्धती हद्दपार झाली आहे. आणि हे सर्व कायद्याच्या समर्थनासाठी; कार्यकारी अधिकाऱ्यांकडून होणाऱ्या सत्तेच्या गैरवापराला आळा घालण्यासाठी! आपल्या देशात मात्र हे साधण्यात आपल्याला अपयश आले आहे. आपण अजूनही वसाहतीच्या न्यायव्यवस्थेतील बाधक घटकांचा वारसा पुढे चालविला आहे.

*The Discipline Of Law*या लॉर्ड डेनिंग यांच्या ग्रंथातील सूत्र असे की-

'१९ व्या शतकातील न्यायाधीशांनी तयार केलेली न्यायतत्त्वे त्या काळातील सामाजिक परिस्थितीत कितीही उपयुक्त असली तरी ती २० व्या शतकातील सामाजिक गरजा आणि सामाजिक मत यांना साजेशी नाहीत. ती आजच्या मताला आणि गरजांना उपयोगी अशाप्रकारच्या नव्या घडणीमध्ये साकार केली पाहिजेत.'

(The principles of law laid down by the judges in the 19th century, however, suited to social conditions of that time - are not suited to the social necessities and social opinion of the 20th century. They should be moulded and shaped to meet the needs and opinion of today.)

घटस्फोट, मिळकतीचे वादग्रस्त हक्क आणि मुलांचा ताबा; परित्यक्त पत्नीचा समभाग आणि माहेरच्या घरातील तिचा वाटा; सावकाराला कदाचित नंतर न्याय मिळेल अशी शक्यता लक्षात घेऊन संबंधित मिळकत राखून ठेवण्यासाठी मिळकत ताब्यात घेऊन ठेवणे; पारंपरिक काटेकोर साच्यात कागदपत्रे तयार करण्याऐवजी अर्थान्वयनाच्या योजनेच्या पद्धतीप्रमाणे ती तयार करणे; सार्वजनिक अधिकाऱ्यांविरुद्ध त्यांच्या त्यांच्या विहित कर्तव्यांच्या संदर्भात, सर्वांच्या फायद्यासाठी सामान्य नागरिकालाही कायद्याची अंमलबजावणी करता यावी अशाप्रकारच्या त्याच्या अधिकृत स्थानाबद्दलची कायद्याची भूमिका; स्वत:च्याच एखाद्या सदस्याविरुद्ध अथवा बाहेरच्या कुणाविरुद्ध म्हणजेच सर्वसाधारण समाजाविरुद्ध होणाऱ्या, स्वयंसेवी संघटनांच्या अधिकाराच्या गैरवापराला वा दुरुपयोगाला पायबंद घालण्याचे उपाय, कायद्याचे काटेकोर नियम आणि २०व्या शतकातील सामाजिक गरजा यांच्यातील दरी कमी करण्याचा प्रयत्न; निष्काळजीपणा हा स्वतंत्र आणि प्रबळ प्रमाद आहे असा कायदा करणे आणि परिणामत: व्यावसायिक व्यक्ती आणि सार्वजनिक क्षेत्रातील अधिकारी यांच्या जबाबदारीची कक्षा वाढविणे; पूर्वदाखल्याबद्दलच्या तत्त्वाचा लवचिकपणा - अशा अनेक गोष्टींबाबत ब्रिटिश कायद्याने काळाशी संगती राखण्याचा प्रयत्न कसा केला आहे हे लॉर्ड डेनिंग यांनी स्पष्ट केले आहे.

आपले नेते आंधळे अनुयायी व कच्चे शिष्य

या सर्व तपशीलावरून ब्रिटिश न्याय-व्यवस्थेचा आंतरिक जोम आणि सावध प्रगमनशीलता यांचा प्रत्यय येतो. वस्तुस्थितीतील सत्य हे आहे की भारताच्या भवितव्याची सूत्रे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ज्यांच्या हाती आली ते आपले नेते हे वसाहतवादी बौद्धिक

धन्यांचे आंधळे अनुयायी आहेतच पण सर्वसाधारणपणे कच्चे शिष्यही आहेत. काही थोडे आदर्शवादी न्यायाधीश सोडले तर बाकी सारे साधारणत: यथास्थितिवादीच आहेत. पुढे सरकलेच तर केवळ जनमताच्या दडपणाखालीच आणि बदलले तर केवळ संधिसाधूपणानेच! वसाहतवादाच्या मानसिक आघातातून अजून ते सावरले नाहीत. भारतीय व्यवस्थांचा सखोल अभ्यास करण्याची आमच्या नेत्यांनी तसदी घेतली नाहीच. पण सर्वात वाईट गोष्ट म्हणजे त्यांनी ब्रिटिश आणि त्यांच्या व्यवस्था यांचेही खरे सत्त्व आत्मसात करण्याचा प्रयत्न केला नाही आणि दोन्ही प्रकारच्या व्यवस्थांमधील जे सर्वोत्तम तेच त्यांनी गमावले.

घटनानिर्मितीतही परभृततेचा प्रभाव

आणि मग स्वाभाविकच या न्याय आणि कायदाव्यवस्थेला आधारभूत असा संविधानात्मक दस्तऐवज म्हणजे भारतीय घटना, ही निर्माण करतानाही याच परभृतेचा प्रभाव आपल्या घटनाकारांवर होता. या संदर्भातील सर्व इतिहास पाहिला तर हे लक्षात येते.

प्रत्यक्ष घटना समितीच्या प्रस्थापनेपूर्वी १९२२ मध्ये काहीसा असाच प्रयत्न करण्याचे महात्मा गांधी आणि ॲनी बेझंट यांच्या मनात होते. १९३६ च्या फैजपूर काँग्रेसनेही याच प्रकारची कल्पना व्यक्त केली होती. १४ सप्टेंबर १९३९ रोजी काँग्रेसने असा ठरावच पारित केला. पुन्हा एकदा १९ नोव्हेंबर १९३९ ला गांधीजींनी याच अर्थाचे पत्रक काढले. मे १९४३ मध्ये स्वराज्यपक्षाने घटनासमितीची स्थापना करण्याच्या इष्टतेचा उच्चार केला होता. सत्तांतरापूर्वी श्री. मानवेंद्रनाथ रॉय आणि त्यांचा गट यांनीही अशीच मागणी केली होती.

घटनासमिती प्रातिनिधिक नाही

पण प्रत्यक्ष प्रस्थापित घटनासमितीचे स्वरूप मात्र लोकांचे पुरेसे आणि वास्तव प्रतिनिधित्व करणारे नव्हते. वस्तुत: देशासाठी घटनेची निर्मिती करण्यासाठी प्रौढ मतदानाच्या द्वारा निवडल्या जाणाऱ्या घटनासमितीची प्रस्थापना करण्याची मंत्रिमंडळ समितीची कल्पना होती. पण अशा मार्गामुळे, न परवडणारा विलंब होईल हे लक्षात घेऊन नुकत्याच निवडलेल्या प्रांतीय विधानसभा याच निवड करणारे घटक मानावयाचे त्यांनी ठरविले. सर्वसाधारणपणाने दहा लाखांना एक असे, प्रत्येक प्रांताला लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व दिले गेले. अशा प्रकारे ठरलेल्या जागा, या प्रमुख जमातींमध्ये त्यांच्या त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात विभागून दिल्या. प्रत्येक प्रांताच्या विधानसभेत त्या त्या जमातीच्या सदस्यांच्या द्वारा निवड करून निर्णित केलेल्या जागांच्या निवडणुकीचे सूत्र बनविण्यात आले. मुख्यत: लक्षात घेतलेल्या जमाती म्हणजे १) सर्वसाधारण, २) मुस्लिम ३) शिख या होत्या. सर्वसाधारण गटात मुस्लिम व शिख यांच्या

व्यतिरिक्त म्हणजे हिंदू समाजातील सर्व जमातींचा समावेश होता.

घटना समितीच्या एकूण सदस्यांची संख्या ३८९ होती. त्यापैकी ९३ सदस्य भारतीय संस्थांमधून निवडलेले प्रतिनिधी होते. २०५ सदस्य काँग्रेसच्या मतांवर निवडलेले होते. ३० सदस्य बाहेरचे सदस्य होते व त्यात डॉ. एस् राधाकृष्णन्, डॉ. अल्लादी कृष्णस्वामी अय्यर, पं. हृदयनाथ कुंझरू, श्री. एन. गोपालस्वामी अय्यंगार इ. महनीय व्यक्ती होत्या.

श्री. बी.एन. राव या घटनाविषयक सल्लागाराने तयार केलेला आराखडा ही पुढील चर्चेसाठी पायाभूत चौकट होती. मसुदा समितीतील दोन सदस्य श्री. के.एम. मुन्शी व श्री. टी.टी. कृष्णमाचारी हे काँग्रेसचे सदस्य होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. अल्लादी कृष्णस्वामी अय्यर, श्री. एन. माधवराव व श्री. डी.पी. खैतान, हे स्वतंत्र सदस्य होते. श्री. महंमद सादुल्ला हे मुस्लीम लीगचे होते. डॉ. आंबेडकर हे मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून निवडले गेले आणि घटना समितीतील चर्चेमधून या घटनेचे अंतिम रूप सिद्ध करण्यामध्ये त्यांनी फार मोठी क्षमता व कौशल्य दाखविले.

मुस्लिम लीग जरी हंगामी सरकारात सहभागी झाली होती तरी घटनासमितीत भाग घेण्यास तिने नकार दिला.

फाळणीनंतर घटनासमितीच्या सदस्य संख्येत बदल झाला. १९४७ च्या भारतीय स्वातंत्र्याच्या कायद्याच्या ८ व्या कलमानुसार भारत व पाकिस्तान या स्वायत्त वसाहतींच्या घटना समित्यांवर केवळ घटना बनविण्याची जबाबदारी राहिली नाही तर संघराज्याच्या विधिमंडळाचेही कार्य त्यांच्याकडे आले. भारतीय घटनासमितीची संख्या ३१८ वर आली. त्यातील ८९, भारतीय संस्थानांचे प्रतिनिधी होते. श्री. बी.एन. राव यांनी तयार केलेल्या आराखड्याची छाननी करून घटनासमितीने आधीच केलेल्या निर्णयाची कार्यवाही करणे व घटनेचा मसुदा व प्रत्यक्ष संहिता ही मसुदासमितीच्या सुधारणांसह घटनासमितीला सादर करणे असे सर्व काम मसुदासमितीकडे आले.

प्रत्यक्ष आराखड्याच्या निर्मितीचा तपशील

१३ डिसेंबर १९४६ रोजी अविभक्त भारताच्या घटनासमिती समोर पं. नेहरूंनी उद्दिष्टांचा जो प्रस्ताव मांडला तोच काही बदलांसह भारतीय घटनेच्या उपोद्घाताचा पाया मानला गेला. (१९७६ मध्ये 'पंथनिरपेक्ष आणि समाजवादी' या दोन शब्दांची उपोद्घातात भर घालण्यात आली.)

९ डिसेंबर १९४६ ला नवी दिल्ली येथे घटनासमितीचे पहिले सत्र घेण्यात आले. २९ ऑगस्ट १९४७ रोजी सात सदस्यांची मसुदा समिती नेमण्यात आली. जाने. १९४८ मध्ये प्रस्तावित घटनेचा आराखडा प्रसिद्ध करण्यात आला. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटना मान्य करण्यात आली. घटनेमध्ये ८ भाग व ३९५ कलमे

आहेत.

घटनेसंबंधीची चर्चा जवळजवळ ३ वर्षे चालली होती व खर्च जवळपास रु. ६३९६७२९ इतका झाला. एकूण घटनासमितीची ११ चर्चासत्रें झाली. २ वर्षे ११ महिने १८ दिवस इतका काळ कामकाज चालले. प्रत्यक्ष घटना २६ जानेवारी १९५० पासून अमलात आली.

जून १९५१ मध्ये पहिली घटना दुरुस्ती करण्यात आली.

घटनासमितीच्या गठनाविषयीचे असमाधान

घटनासमितीच्या गठनाची व कार्यवाहीची ही सारी प्रक्रिया पाहिल्यानंतर हे लक्षात येते की ती पुरेशी प्रातिनिधिक नव्हतीच आणि काँग्रेसचे म्हणजेच एका राजकीय पक्षाचे वर्चस्व तिच्यावर होते.

वस्तुतः डॉ. आंबेडकरांनी या बाबतीत हे स्पष्ट केले होते की .....

'घटनासमिती बनविताना घटना समितीचा कोणताही पक्षपाती हेतू नव्हता. उत्तम आणि कार्यवाहीत आणता येईल अशी घटना निर्माण करण्याशिवाय तिला कोणत्याही स्वार्थी हेतूचा पाठपुरावा करावयाचा नव्हता. घटनेच्या कलमांचा विचार करताना एखाद्या विशिष्ट साधनाची प्राप्ती करून घेण्यावर डोळा नव्हता. भावी संसद जर घटनासमिती म्हणून सिद्ध झाली तर तिचे सदस्य केवळ पक्षपाती म्हणून काम करतील. त्यांच्या मार्गातील अडथळे ठरणाऱ्या घटनेच्या काही कलमांमुळे, ज्या पक्षीय तरतुदी मान्य करून घेणे त्यांना एरवी शक्य झाले नसते, अशा तरतुदी घटनादुरुस्तीच्या द्वारा प्राप्त करून घेणाऱ्या पक्षपात्यांप्रमाणेच हे सदस्य काम करतील. संसदेमध्ये स्वतःच्या हितसंबंधांचा पाठपुरावा होत असतो, तर घटनासमितीत असा कोणताही प्रकार नसतो. हाच घटनासमिती आणि भावी संसद यांच्यामधील फरक आहे.'

(The Constituent Assembly in making a Constitution has no partisan motive. Beyond securing a good and workable Constitution, it has no axe to grind In considering the articles of the Constitution, it has not an eye on getting through a particular measure. The future parliament, if it met as a Constitutent Assembly, and its members will be acting as partisans seeking to carry amendments to the Constitution to facilitate the passing of party measures which they have failed to get through Parliament by reasons of some articles of Constitution which have acted as an obstacle in their way. Parliament will have an axe to grind while the Constituent Assembly has none. That is the difference between the Constituent Assembly and the future Parliament.)

पं. नेहरूंनी मात्र हे मान्य केले होते की ——

'काही काँग्रेस पुढाऱ्यांनी मात्र घटना समितीची कल्पना स्वीकारली तरीही ती खूपच शिथिल करण्याचा प्रयत्न केला. आणि सर्वपक्षीय परिषदेच्या जुन्या साच्याच्या वळणावरच ती नेण्याचा प्रयत्न केला.'

(Some of the Congress leaders, while accepting the idea of the Constituent Assembly have tried to tone it down and made it not very unlike a large All Parties Conference after the old model.)

घटनासमितीचे कार्य चालू असतानाच जयप्रकाश नारायण यांनी घटनासमितीच्या प्रातिनिधिकतेबद्दल आक्षेप घेतला होता ———

'..... सध्याची प्रस्तावित घटना भारतीय लोकांच्या वतीने बोलण्याचा दावा करते. 'आम्ही भारतीय लोक पवित्रपणे ठराव करीत आहोत ------इ. इ.' असे या प्रस्तावित घटनेच्या प्रारंभीचे शब्द आहेत. पण सध्याच्या घटनासमितीला भारतीय लोकांच्या वतीने बोलण्याचा हक्क आहे असा दावा प्रामाणिकपणे कोण करू शकेल ? केवळ १२ टक्के लोकांचेच ती प्रतिनिधित्व करीत होती.

हे सर्वज्ञातच आहे की घटनासमिती ही प्रांतांच्या आणि संस्थानांच्या प्रतिनिधींद्वारा गठित झाली आहे. प्रांतांचे प्रतिनिधी हे प्रौढ मतदानातून थेट निवडले न जाता प्रांतांच्या विधानसभांकडून निवडले गेले आहेत आणि या विधानसभाही पुन्हा १९३५ च्या कायद्याप्रमाणे केवळ १५ टक्के लोकांकडूनच निवडल्या गेल्या आहेत. याचाच अर्थ प्रांतांमधील ८५% लोकांना घटनासमितीत प्रतिनिधित्व मिळालेले नव्हते.

विधानसभा प्रतिनिधींना विधानसभेत निवडून येताना मिळालेला कौल हा, मतदारांचे प्रतिनिधी म्हणून त्यांना घटनासमितीत आपले प्रतिनिधी पाठविण्यासाठी मिळालेला कौल नव्हता हे लक्षात घेतले म्हणजे घटनासमितीतील प्रांतिक प्रतिनिधी हे खऱ्या अर्थाने प्रतिनिधीच नव्हते हे पुरते उघड होते. संस्थानांच्या ८९ प्रतिनिधींपैकी २८ जण संस्थानिकांचे प्रतिनिधी आहेत. आणि ४१ निवडलेले प्रतिनिधी होते. संस्थानिकांच्या उमेदवारांना तर लोकांच्या वतीने बोलण्याचा हक्कच नाही हे तर स्पष्टच आहे.

संस्थानांमध्ये खऱ्या अर्थाच्या प्रातिनिधिक संस्थाच नसल्यामुळे ४१ प्रतिनिधींचे प्रातिनिधिक स्वरूपसुद्धा किती नकली आहे याची कल्पना करता येते. ४१ पैकी एकही प्रतिनिधी संबंधित जनतेकडून थेट निवडून आलेला नव्हता आणि बहुतेक सर्वचजण काँग्रेसश्रेष्ठींनी नियुक्त केलेले प्रतिनिधी होते. कारण 'अ. भा. संस्थानी प्रजापरिषदेवर' काँग्रेसचेच वर्चस्व होते.

याप्रमाणे सध्याची घटनासमिती ही पूर्णतः अप्रातिनिधिक संस्था आहे. आणि न्याय्य व वास्तव असे जे जे अस्तित्वात असू शकते त्यासाठी तरी ती रद्द झालीच पाहिजे. संस्थानी व प्रांतीय अशा सर्व लोकांनी प्रौढ मतदानाच्या द्वारा निवडलेल्या नवीन घटनासमितीकडेच भारतीय संविधानाचा अंतिम आराखडा संमत करण्याची जबाबदारी दिली पाहिजे.' -

(The present draft constitution seeks to speak in the name of the Indian people. 'We, the people of India having solemnly resolved etc., etc,' are the opening words of the draft constitution. But who can honestly claim that the present Constituent Assembly has any right to speak in the name of the Indian people ? It was surely not elected by the people. It represented only 12% of the people.

The Constituent Assembly, as is well known, is made up of the representatives of the provinces and the states. The representatives of the provinces were elected not directly by the adult population but indirectly by the provincial assemblies, which in turn were elected under the Act of 1935 by no more than 15% of the people. This means that 85% of the people in the provinces have no representation whatever in the Constituent Assembly.

The unrepresentative character of the provincial representatives in the Constituent Assembly is further exposed when it is recalled that the members of the provincial assemblies had no mandate whatever to send their representatives to any such body. The unrepresentative character of the representatives from the States becomes still more apparent. Out of a total of 89 members from the States, 28 are the nominees of the rulers and 41 elected. Clearly, the nominees of the rulers have no right to speak in the name of the people.

Of the 41 elected, it can be imagined how unrepresentative they must be in the absence of true representative institutions in the States. None of the 41 was directly elected by the people concerned; and most of them were merely nominees of the Congress bosses who dominate the All India States People's Conference.

The present Constituent Assembly thus is an utterly unrepresentative body; and in the name of all, that is just and fair, it must go. A new assembly elected on adult franchise by the entire people - of the provinces as well as the States - must be called to pass the final draft of India's constitution.)

प्राधान्याने ब्रिटिश संविधानावर अवलंबून

आपल्या नेत्यांच्या परभृततेचा उल्लेख मागे केला आहे. त्यातही त्यांनी पश्चिमेचे

अनुकरण करताना इतर देशांच्या घटनांचा पुरेसा अभ्यास केलेला नाही. उदा. स्कँडीनेव्हीयन व लॅटीन अमेरिकन देशांच्या अनुभवांतून काही पृथगात्म विशेष स्पष्ट होतात. पण त्यांच्याकडे आपल्या देशातील विचारवंतांनी फारच कमी लक्ष दिले आहे. आपले नेते प्राधान्याने ब्रिटिश संविधानावरच अवलंबून राहिले.

पश्चिमी देशांच्या संविधनांबद्दलचे काही भ्रम

आपल्या देशात पश्चिमी देशांच्या घटनांच्या पावित्र्याबद्दल – त्यांच्या अद्वितीय स्थानाबद्दल, त्यांच्या नेकीच्या अवलंबाबद्दल, तसेच धर्मनिरपेक्षतेसारख्या एखाद्या तत्त्वाच्या संदर्भातील घटनात्मक वातावरणाबद्दल बरेचसे भ्रम निर्माण झाले आहेत. आपल्या संविधानाचे विश्लेषण करायला प्रारंभ करण्यापूर्वी आपल्या या विश्लेषणाच्या प्रयत्नांवर परिणाम घडवू शकतील व समाजमनातील असे अनेक भ्रम, गैरसमज दूर करू शकतील अशा, इतर देशांच्या घटनांच्या काही वैशिष्ट्यांची दखल घेणे श्रेयस्कर ठरेल.

घटनांच्या तुलनात्मक अभ्यासातील एकांगीपणा

घटना या विषयावरील वाङ्मयाची संतुलित वाढ झालेली नाही. घटनापंडित ही गोष्ट मान्य करतात. अगदी अलिकडच्या काळापर्यंत राजनीतिज्ञांमध्ये, मोठ्या, महत्त्वाच्या देशांच्या शासनांवरच लक्ष केंद्रित करण्याची प्रवृत्ती दिसून येत होती आणि लहान देशांच्या शासनाकडे दुर्लक्ष केले जात असे. युरोपीय शासनांना महत्त्व दिले जात असे. खरे म्हणजे आफ्रिका आणि आशियातील राष्ट्रवादाच्या उदयामुळे आणि परिणामत: नवी शासने निर्माण झाल्यामुळे दूरगामी महत्त्वाचे परिणाम घडविणाऱ्या घडामोडी प्रत्येक खंडामध्ये घडत आहेत. युरोप हा राजकीय अग्रदूत असेल पण अयुरोपीय देशही जगाच्या पटलावर जोरात पुढे येत आहेत आणि राजकीय प्रयोगशीलतेच्या नव्या सीमा प्रस्थापित करीत आहेत. अमेरिका, आशिया व आफ्रिका या खंडांमधील शासने प्रस्थापित करण्यामध्ये युरोपीय नमुन्यांचा जबरदस्त प्रभाव असला तरी या प्रदेशांमधील स्थानिक परिस्थितीच्या दडपणामुळे त्या नमुन्यांमध्ये काही बदल झालेले आहेत आणि ते तपासून पहाण्यालायक आहेत.

शासनांबद्दल तुलनात्मकतेने लिहिताना एक प्राथमिक नमुना पुढे ठेवणे आणि सर्व शासने कशीतरी त्यात बसविण्याचा प्रयत्न करणे अशी एक प्रवृत्तीही दिसून येते.

तरीही हे खरेच आहे की तुलनात्मक शासनांचा अभ्यास करणाऱ्यांना ब्रिटनच्या राजकीय अनुभवातून पुष्कळ काही मिळू शकते. कारण पश्चिमी लोकतांत्रिक संस्थांचा प्रारंभ तेथूनच झाला. आणि इतर देशांतील शासनांवर व्यापक प्रभाव टाकणाऱ्या घडामोडीही तेथे झाल्या.

ब्रिटिश संसद ही संसदांची जननी आहे आणि पूर्वी ग्रेट ब्रिटनच्या अंकित असलेल्या प्रत्येक देशात तिची प्रजा दिसून येते.

संविधान संकल्पना

प्रारंभी म्हटलेच आहे की संविधान म्हणजे 'कायद्याच्या रूपाने आणि कायद्याच्याच द्वारा रचलेली राजकीय समाजाची चौकट आणि तिच्यात कायद्यानेच कायम स्वरूपी प्रस्थापित केलेल्या संस्था असतात.'

या कायद्याचे तीन प्रकार असू शकतात.

१) कायद्याच्या प्रक्रियेने हात लावता येणार नाहीत अशा प्रकारच्या सामाजिक सवयींच्या प्रथांची जुडी;

२) संहितेच्या स्वरूपात शब्दबद्ध न केलेला पण सुविहितपणे प्रस्थापित झालेल्या न्यायालयांच्याद्वारा पूर्णत: अमलात आणला जाणारा औपचारिक कायदा – इंग्लंडमध्ये यालाच विशिष्ट प्रकारचा सामान्य कायदा म्हणतात.

३) लिखित कायदा – संविधान, विधिमंडळातून विधेयकाच्या द्वारा पारित झालेला – संविधान हे लिखित वा अलिखित स्वरूपात असू शकते. अथवा अंशत: लिखित, अंशत: अलिखित असेही असू शकते. ब्रिटिश संविधान म्हणता येईल असा कोणताही लिखित दस्तऐवज आजवर अस्तित्वात नाही.

राज्यांच्या प्रकारानुसार सार्वभौमत्वाचे स्वरुप

आधुनिक राज्यांच्या रचनेत सार्वभौमत्व या संकल्पनेला महत्त्व आहे. अंतर्गत सार्वभौमत्व म्हणजे एखाद्या व्यक्तीचे अथवा व्यक्तींच्या संस्थेचे राज्यातील अन्य व्यक्ती वा संस्थांवरील स्वत:च्या प्रभावक्षेत्रामधील निरपवाद वर्चस्व होय. बाह्य सार्वभौमत्व म्हणजे इतर सर्व राज्यांच्या संदर्भात एका राज्याचे परिपूर्ण एकक म्हणून निरपवाद प्रभुत्व होय. ग्रेट ब्रिटनमध्ये कायदेशीर सार्वभौमत्व संसदेतील राणीकडे आहे. आणि राजकीय सार्वभौमत्व मतदारांकडे असते. राज्यांचे प्रकार हे सार्वभौमत्वाचे स्वरूप आणि व्याप्ती यावर ठरतात. संघराज्यामध्ये राज्ये ही दुय्यम सार्वभौम घटक असतात. एकात्म राज्य रचनेचे सार म्हणजे सार्वभौमत्व हे अविभाजित असते. एकात्म राज्य म्हणजे –

१) मध्यवर्ती संसदेचे वर्चस्व २) दुय्यम दर्जाच्या सार्वभौम सत्तेचा पूर्ण अभाव.

एकात्म राज्यामध्ये एकाच केंद्रीय सत्तेच्या सर्वोच्च घटनात्मक अधिकाराचा अवलंब दिसतो तर संघराज्य म्हणजे राष्ट्रीय एकात्मता व सत्ता आणि राज्यांच्या अधिकारांचे सातत्य यांचा समन्वय साधण्याचा हेतू असलेली योजना आहे.

प. जर्मनी, स्वित्झर्लंड, कॅनडा, मेक्सिको, ब्राझिल, अर्जेंटिना, व्हेनिजुएला या देशांच्या घटना संघराज्यीय प्रकारच्या आहेत. ब्रिटन, फ्रान्स, नॉर्वे, स्वीडन, जपान

यांची सरकारे आणि बहुतांश लॅटिन अमेरिकी देशांची सरकारे ही एकात्म प्रकारात मोडतात.

कॅनडामध्ये, विशिष्ट आणि सुनिश्चित अधिकार प्रांतांना दिलेले आहेत व उरलेले अधिकार संघराज्याच्या शासनाकडे सोपवलेले आहेत. ऑस्ट्रेलियामध्ये अवशिष्ट अधिकार राज्यांकडे आहेत आणि संघराज्य शासनाकडे गणनांकित सत्ता असतात. ऑस्ट्रेलियामध्ये राज्यांचे राज्यपाल हे संघराज्य सरकारची दखल न घेता थेट राजाकडून नेमले जातात आणि राज्यांच्या विधिमंडळाने संमत केलेल्या कायद्यामध्ये ढवळाढवळ करण्याचे अधिकार संघराज्य शासनाला नसतात. कॅनडामध्ये प्रांतांच्या घटना १८६७ ते १९८१ पर्यंतच्या घटनात्मक कायद्यांनी सिद्ध झाल्या आहेत आणि त्यांच्यातील कोणत्याही बदलासाठी घटनादुरुस्तीची आवश्यकता असते. ऑस्ट्रेलियात प्रत्येक राज्याची स्वतंत्र घटना आहे आणि ते तिच्यात बदल करू शकते. तरीही विशेषत: दुसऱ्या महायुद्धानंतर राज्यांचे अधिकार कमी करून संघराज्यीय अधिकार वाढविण्याची वाढती प्रवृत्ती दिसून येते. रॉस अँडरसन यांनी *'Essays* मध्ये म्हटले आहे.

'ऑस्ट्रेलियन संघराज्याचा गेल्या ५० वर्षांचा इतिहास म्हणजे राज्यांच्या अधिकारांच्या संदर्भात हळुहळू वाढत गेलेल्या केंद्रीय शासनाच्या सत्तेचा इतिहास आहे आणि त्यामुळेच आजचा हा राक्षस म्हणजे १९०१ मधील लहान बालकच होय हे क्वचितच ओळखता येईल.'

(The history of fifty years of Australian Federation has been a history of the gradual growth of the Commonwealth relative to the power of the States, until the giant of today is scarely recognisable as the child of 1901)

ऑस्ट्रेलियाच्या १९०० च्या संघराज्यीय घटनेबद्दल असे एक मत होते की बहुसंख्य मतदारांच्या ऐवजी बहुसंख्य उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांकडूनच ऑस्ट्रेलियाचे शासन होत आहे.

कायद्याच्या गुणवत्तेच्या निकषावर नव्हे तर लिखित घटनेच्या तो विरोधी आहे या मुद्यावर तो कायदा रद्द केला जात असे. प्रत्येक राष्ट्रीय आणीबाणीमुळे घटनात्मक बेड्यांनी ऑस्ट्रेलियाचे हात बांधले जात होते आणि परिणामत: अकर्मण्यता आणि गंभीर विलंब यामुळे संसदीय व्यवस्थेचीच चेष्टा होत होती. जवळजवळ सारखेच अधिकार असलेल्या सात संसदा, तेरा विधिमंडळे, सहाशे सदस्य आणि सत्तर मंत्री याशिवाय देशबाह्य स्वतंत्र प्रतिनिधित्व व स्वतंत्र सेवा या साऱ्यांमुळे कोणत्याही प्रकारची सार्वभौम एकात्मता प्रस्थापित होऊ शकली नाही.

सी. एफ्. स्ट्रॉंग यांनी *Modern Political Constitution* या ग्रंथात कॅनडा आणि ऑस्ट्रेलिया यांच्या घटनांमधील रोकडेपणाने स्पष्ट केलेला फरक पुष्कळ काही शिकवणारा आहे.

१) ऑस्ट्रेलियाची घटना संघराज्य सत्तेचे अधिकार सुनिश्चित करते आणि अवशिष्ट अधिकार राज्यांकडे सुपूर्त करते. तर कॅनडाची घटना प्रांतांचे अधिकार नक्की करते व उर्वरित अधिकार संघराज्यसत्तेकडे देते.

२) ऑस्ट्रेलियात संघराज्याच्या हस्तक्षेपावाचून राज्यपाल नेमले जातात तर कॅनडात प्रांतांच्या सैनिकी राज्यपालांच्या नेमणुकांची जबाबदारी स्वायत्त केंद्रीय शासनाकडे असते.

३) ऑस्ट्रेलियात केंद्रीय संयुक्त शासनाला राज्यांच्या कायद्यांमध्ये ढवळाढवळ करण्याचा अधिकार नाही तर कॅनडामध्ये स्वायत्त केंद्रीय शासनाला राज्यांच्या कायद्यावर नकाराधिकार असतो.

४) ऑस्ट्रेलियात कायद्याचा अन्वय लावणारे सर्वोच्च न्यायालय असते तर कॅनडातील सर्वोच्च न्यायालयाला अशा प्रकारचा अधिकार थोड्याच प्रमाणात असतो.

५) ऑस्ट्रेलियाच्या लोकसभेची निवड राज्यांमधील सम संख्येच्या सदस्यांकडून होत असते तर कॅनडात लोकसभेचे सदस्य स्वायत्त केंद्रीय शासनाकडून तहहयात नेमले जातात.

सर्वसाधारणपणे ऑस्ट्रेलियाचे संयुक्त शासन हे कॅनडाच्या स्वायत्त केंद्रीय सत्तेपेक्षा अधिक संघराज्यस्वरूप आहे. कॅनडाचे शासन ऑस्ट्रेलियाच्या शासनापेक्षा एकात्म शासनाच्या पुष्कळ जवळ येते. कॅनडाच्या संघराज्यापेक्षा ऑस्ट्रेलियाचे संघराज्य अमेरिकी संयुक्त संस्थानांच्या संघराज्याशी पुष्कळच प्रमाणात समरूप आहे.

दक्षिण आफ्रिका हे एकात्म राज्य आहे व काही बाबतीत त्याचा मुखवटा हा संघराज्यीय राजकीय रचनेप्रमाणे आहे. प्रत्यक्षत: संघराज्यीय विशेष हे केवळ वरवरचे साम्य आहे.

फ्रान्स हा एकात्म संविधानाचा एक वस्तुपाठ आहे.

अमेरिकी संयुक्त संस्थानांची घटना हा जगातील संघराज्यीय घटनेचा निकष मानला जातो. संघराज्यीय असे तीन अनिवार्य विशेष हे त्या संविधानातून स्पष्ट होतात. ते म्हणजे – घटनेचे सर्वोच्च स्थान, अधिकारांचे वितरण आणि संघराज्यीय न्यायव्यवस्थेचा अधिकार! फिलाडेल्फिया येथे १७८७ मध्ये एका परिषदेत सध्याची घटना आखली गेली व १७८९ मध्ये ती तेरा राज्यांमध्ये अंमलात आणली गेली. ही घटना दुहेरी विभागणी करते. पहिल्या विभागणीत ती शासनाची तीन अंगे – विधिमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायव्यवस्था ही अलग करते. दुसरीत ती संघराज्य आणि राज्ये यांच्या सत्तांच्या अधिकारांची अशी वाटणी करते की संघराज्याच्या सत्तेला सामूहिक लाभासाठी अत्यावश्यक नसलेले सर्व अधिकार घटक राज्यांना बहाल केले जातात.

लिंकन हा एकात्म राज्य कल्पनेच्या तत्त्वासाठी झगडला. अलिकडच्या काळात मात्र संघराज्यीय अधिकारांचे वाढते दृढीकरण होत आहे.

घटनेचे स्थान

जगात कुठेही समांतरता नसलेले अशा प्रकारचे महत्त्वाचे स्थान इंग्लंडमध्ये त्याच्या घटनेला दिले गेले आहे. कॅनडा, नॉर्वे, स्वीडन या देशांमध्ये घटनांना कमी महत्त्व आहे. अर्थातच तेथेही त्या अग्रभागी आहेतच. फ्रान्स व जर्मनी या देशांत घटनांना महत्त्व नाही असे नाही. पण त्यांना इंग्लंड, अमेरिका व स्कँडिनेव्हियन देशांमध्ये असलेले महत्त्वाचे स्थान मात्र कधीच प्राप्त होऊ शकले नाही. जर्मनीत लोकतांत्रिक शासनपद्धतीच्या अनुभवाचा तुलनेने अभाव आहे हे कारण असू शकेल. फ्रान्सच्या राष्ट्रीय स्वभावातच असे काहीतरी आहे की ज्यामुळे घटनेचे महत्त्व मर्यादित रहाते. जपानच्या राष्ट्रीय स्वभावामुळेही, इंग्लंड, अमेरिकेत दिसतो त्यापेक्षा घटनेचा कमी प्रभाव दिसतो. लॅटिन अमेरिकी देशांत मूलभूत कायदा म्हणून घटना या कमी बंधनकारक असतात. घटना या संकल्पनेचे मूलभूत स्वरूप व हेतू याबद्दलच पुरेसे ज्ञान तेथे नाही. तरीही युरुग्वेने तुलनेने घटनात्मकतेमध्ये पुष्कळच प्रगती केलेली आहे.

तुलनात्मक शासनासंबंधीच्या पाठ्यपुस्तकांमध्ये सर्वसाधारणपणे २१ लॅटिन अमेरिकी सरकारांच्या परामर्शाचा अनुल्लेख असणे ही काही अपवादात्मक बाब नाही. त्यापैकी एकही शासन एखाद्या संपूर्ण गटाच्या नमुन्यामध्ये बसू शकत नाही. सर्वांचा लॅटिन अमेरिकी देश म्हणून उल्लेख होतो. जरी अटलांटिकच्या बाजूच्या देशांमध्ये हा लॅटिन धागा अधिक प्रमाणात दिसतो आणि ब्राझिलची भाषा पोर्तुगीजवर आधारलेली व इतर देशांच्या इंडियनेतर भाषा स्पॅनिशपासून निघालेल्या असल्या तरी सर्व देश वैशिष्ट्यांनी लॅटिन समजले जातात.

असा निष्कर्ष सयुक्तिकपणे काढता येतो की सर्वच नाही तरी बहुतेक लॅटिन अमेरिकी राज्यांच्या घटनांना इंग्लंडच्या घटनेला असलेल्या स्थानापेक्षा अत्यंत भिन्न असे स्थान आहे. इंग्लिश माणसाला घटना म्हणजे राज्याचे साक्षात अधिष्ठानच आहे. कारण देशाचा मूलभूत कायदा म्हणून तिला महत्त्वाचे स्थान आहे. अमेरिकेतही घटना म्हणजे उच्चतर कायदा आहे. युरोपीय लॅटिन देशांमध्ये घटना या उल्लेखनीय कार्य करू शकतात पण तेवढ्याच प्रमाणात त्या शासनावर बंधन घालू शकत नाहीत. अनेक लॅटिन अमेरिकी देशांत त्यांना अगदीच कमी मान आहे. ज्या ठिकाणी लोकमत नावाची चीजच फारशी अस्तित्वात नाही अशा मागासलेल्या लॅटिन अमेरिकी देशांत, घटना म्हणजे केवळ एक संकेत म्हणून दाखवलेला, वरून लादलेला कृत्रिम प्रकार असतो आणि त्यामुळे लोकांच्या दृष्टीने तो अर्थहीनच असतो. एखाद्या जबरदस्त नेत्याने निर्वाणीच्या प्रसंगी घटना धाब्यावर बसवून सत्ता ताब्यात घेणे ही गोष्ट लॅटिन अमेरिकी देशांत नेहेमीचीच आहे.

इंग्लंडच्या घटनेचे विशेष

इंग्लंडच्या घटनेच्या कायद्यात चार प्रमुख घटक आहेत. पहिला घटक म्हणजे

काही ऐतिहासिक दस्तऐवज आहेत. कधीकधी त्यांचा मैलांचे दगड असा उल्लेख होतो. मॅग्नाचार्टा, पिटिशन ऑफ राइट्स आणि बिल ऑफ राइट्स हे त्यांपैकी काही! दुसरा घटक म्हणजे राज्याचे अधिकार वाढविणारे किंवा कमी करणारे, नागरी हक्काची हमी देणारे, मतदानाच्या हक्काचे नियमन करणारे, स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती करणारे, न्यायालयांच्या व शासकीय यंत्रणेच्या स्थापनेची तरतूद करणारे असे संसदीय कायदे – यांची उदाहरणे – १६७९ चा हेबियस कॉर्पस ॲक्ट, १७०१ चा ॲक्ट ऑफ सेटलमेंट (आणि १९३६ च्या ॲब्डिकेशन ॲक्टने सुधारलेली आवृत्ती), १८३२, १८६७ आणि १८८४ मधील रिफॉर्म्स ॲक्ट्स, १८३५ च्या म्युनि. कॉर्पोरेशन ॲक्ट १८७३–७४ चे ज्युडिकेचर ॲक्ट्स, १९११ व १९४९ मधील पार्लमेंट ॲक्ट्स, १९३१ चे स्टॅट्यूट ऑफ वेस्टमिन्स्टर, १९३७ चा मिनिस्टर ऑफ क्राउन ॲक्ट. तिसरा घटक म्हणजे संविधानांचे आणि मागणीपत्रांचे अर्थ व मर्यादा निश्चित करणारे न्यायालयांचे निर्णय आणि चवथा घटक म्हणजे सर्व साधारण कायद्याची अगणित तत्त्वे आणि नियम! ही तत्त्वे आणि नियम हे केवळ अवलंबांच्या आधारावर वाढत गेले. क्वचित त्यांना न्यायालयाच्या निर्णयाचे पाठबळ मिळाले. पण ते संसदेने कधीच पारित केलेले नसतात. काही शासनांतर्गत आणि कायद्याच्या व्यवस्था यांमधील मूलभूत अंगांचा त्यांत समावेश असतो आणि त्यांना कायदा म्हणून पूर्णतः मान्यता मिळालेली असते. उदा. राजाचे विशेषाधिकार हे पूर्णतः अशा सर्वसाधारण कायद्यावर अधिष्ठित असतात. त्यातील पहिले तीन घटक लिखित स्वरूपात उपलब्ध आहेत. सर्वसाधारण कायद्याचे नियम – सार्वजनिक किंवा खाजगी – मात्र पद्धतशीरपणे कधीच लिहून काढलेले नाहीत, तर ते व्यापक प्रमाणात, काही अहवालांमध्ये, कायद्यांच्या मतांमध्ये आणि न्यायालयीन निवाड्यांत दिसून येतात. घटनेच्या ज्या भागाला 'संकेत' म्हटले जाते. तो कायद्याचा भाग नाही व न्यायालयाकडून तो अंमलात आणता येत नाही. त्यामध्ये काही महत्त्वाच्या सार्वजनिक अधिकाऱ्यांच्या प्रत्यक्ष दैनंदिन व्यवहारांचेसुद्धा नियमन करणाऱ्या परंपरा, प्रघात आणि चालीरीतींचा फार मोठ्या प्रमाणात समावेश असतो. पण त्यांचा संविधानांच्या लिखाणात अथवा कायद्याच्या कोणत्याही विधानात प्रत्यय येत नाही कारण ते जरी घटनेचे अंश असले तरी कायद्याचे स्वरूप मात्र त्यांना प्राप्त झालेले नसते.

काही घटनातज्ञांच्या मते मतदारांचा सर्वोच्च अधिकार हाही केवळ संकेतच आहे. न्यायालये केवळ संसदेचे सार्वभौमत्व लक्षात घेतात. कारण संसद हीच कायद्याच्या दृष्टीने सार्वभौम आहे. लोक केवळ राजकीयदृष्ट्या सार्वभौम असतात. इंग्लंड ही संकेतांची एक खास भूमी आहे. कायद्याच्या प्रत्यक्ष नियमांपेक्षा प्रघात आणि उपयोजन यांच्याकडे लक्ष दिल्याशिवाय कोणालाही या देशातील शासनाचे मर्म कळणार नाही.

महत्त्वाच्या आधुनिक राज्यांपैकी केवळ दोनच राज्यांमध्ये घटना दुरुस्तीच्या काही विशिष्ट प्रक्रिया अस्तित्वात नाहीत. ही राज्ये म्हणजे ग्रेट ब्रिटन आणि न्यूझीलंड!

त्यांच्या घटना खऱ्या अर्थाने लवचिक आहेत. अर्थात ब्रिटिश अधिसत्तेखालील गोरे स्वायत्त राज्य न्यूझीलंड याची घटना लवचिक असली तरी तेथेही १९५६ च्या निवडणूक विषयक कायद्याने घटनेची काही कलमे लोकप्रतितिधींच्या ७५ टक्के संख्येच्या बहुमताशिवाय अथवा सार्वमताशिवाय रद्द करता येत नाहीत.

मॉरिटॅनियाच्या शासनाने २० वर्षांच्या एकपक्षीय राजवटीनंतर बहुपक्षीयता स्वीकारणारा आणि नवीन घटनेचा मसुदा तयार करण्याच्या मुद्द्यावर सार्वमत घेण्याच्या तरतुदीचा त्यात समावेश करणारा कायदा अमलात आणला. हा कायदा परदेशांशी संबंध ठेवण्याबाबत व त्यांच्याकडून मदत घेण्याबाबत मात्र बंदी घालतो.

थेट व प्रातिनिधिक लोकशाही

थेट स्वरूपाची लोकशाही व प्रातिनिधिक स्वरूप असलेली लोकशाही यांतील दरी मिटविण्यासाठी सार्वमत (Plebiscit), एखाद्या मुद्यावर लोकमत अजमावणे (Referendum) कायदे करण्यातील जनतेचा पुढाकार (Initiative), संसद सदस्यांना परत बोलावणे (Recall), अशा काही उपायांची योजना केलेली आहे. (एखाद्या विशिष्ट मुद्यावर लोकमताचा कौल घेण्याऐवजी सर्वसाधारण मत घेण्याकडे आजकाल विशेष कल दिसतो.)* सर्वसाधारण मत घेण्याचा प्रकार ऑस्ट्रेलिया, डेन्मार्क, आयर्लंड, फ्रान्स, इटली, स्वित्झर्लंड, न्यूझीलंड या देशांमध्ये आणि अमेरिकेच्या काही संस्थानांमध्ये घटनादुरुस्तीसाठी वापरला जातो.

जनतेचा कायदे करण्याचा पुढाकार हा काही वेळा सर्वसाधारण लोकमत घेण्याबरोबर वापरला जातो. स्वित्झर्लंडमध्ये सर्वसाधारण लोकमत अजमावणे आणि लोकांचा कायदे करण्याचा पुढाकार दोन्ही दिसून येतात. अमेरिकेत 'लोकांचा पुढाकार' हा 'सर्वसाधारण मता' इतका सवंग नाही. 'सदस्याला परत बोलावण्याचा अधिकार' अलिकडेच अमेरिकेतील काही संस्थांनांमध्ये अंमलात आलेला आहे. सर्वसाधारण मत आणि जनतेचा पुढाकार याप्रमाणेच सदस्याला परत बोलावण्याचा हक्क अमेरिकेतील पश्चिमी राज्यांपुरताच मर्यादित झाला आहे. तो इतरत्र प्रचलित नाही. स्विस व्यवस्था मात्र पुष्कळशी त्याच्या जवळ येणारी आहे.

या नमुन्यांवरून आपल्या घटनेत घेतलेली तुरळक तत्त्वे

अशा प्रकारच्या तौलनिक अभ्यासामुळे, इतर देशांच्या घटनांच्या नमुन्यांवरून काही तुरळक तत्त्वे आपल्या घटनेत समाविष्ट झाली आहेत, हे लक्षात येते.

आयर्लंड आणि स्पेनच्या उदाहरणांवरून आपल्या घटनेत देशाच्या शासनासाठी

---

* अनेकवेळा Plebiscite व Referendum हे उपाय एकमेकांना पर्यायी स्वरूपात व सरमिसळीने वापरले जातात.

मूलभूत असलेली काही तत्त्वे क्रमाने दिली आहेत. त्यांना शासकीय धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे म्हणतात व घटनेच्या चौथ्या भागात ती समाविष्ट करण्यात आली आहेत. ती न्यायालयाकडून अमलात आणता येत नाहीत.

पश्चिम जर्मनीचे फेडरल रिपब्लिक व फ्रान्सचे चौथे रिपब्लिक यांच्या घटनांप्रमाणेच भारतीय घटना केवळ राजकीयच नव्हे तर सामाजिक, आर्थिक हक्कही तपशीलाने मांडते.

आयरिश घटनेत मूलभूत हक्कांवर एक आणि शासकीय धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांवर एक, अशा तऱ्हेची अलग प्रकरणे आहेत.

अर्थात जरी काही तरतुदींचा आधार याप्रमाणे अमेरिका, फ्रान्स, आयर्लंड, इटली, जर्मनी, स्पेन इ. देशांच्या घटनांमधून घेतलेला असला तरी भारतीय संविधान हे पूर्वी म्हटल्याप्रमाणे प्राधान्याने ब्रिटिश नमुन्यावर आधारलेले आहे. त्यातही भारतीय संविधानाची सर्वात महत्त्वाची आधारभूत सामग्री म्हणजे १९३५ चा भारत सरकारचा कायदा ही होती.

ब्रिटिश व्यवस्थेचे सत्त्व व जोम घेतले नाही !

पण मागे एके ठिकाणी म्हटल्याप्रमाणे आमच्या नेतृत्वाने ब्रिटिश आणि त्यांची व्यवस्था यांचे सत्त्व मात्र आत्मसात केले नाही. त्यामुळे ब्रिटिश व्यवस्थेचा जोम व कालानुरूप बदलण्याची सावध प्रगमनशीलता मात्र आमच्या घटना निर्मितीतही नव्हती आणि प्रत्यक्ष कार्यवाहीतही नाही.

ब्रिटिश राजकीय संविधानात्मक सत्त्वाचा विकासक्रम –

बऱ्याचदा आमच्या देशातील बुद्धिवादी व उच्चभ्रू मंडळी काहीशा भाबडेपणाने, 'वेस्टमिन्स्टर नमुना' आपल्या देशात यशस्वी का होत नाहीत असे विचारतात. ते ब्रिटन व भारत या दोन देशांमधील ऐतिहासिक विकासक्रमातील फरक ध्यानात घेत नाहीत. त्या दृष्टीने इंग्लंडच्या इतिहासाचा काही तपशील लक्षात घेणे आवश्यक आहे.

पार्लमेंट ही संज्ञा इंग्लंडमध्ये १३ व्या शतकात अस्तित्वात आली, परंतु संस्था म्हणून ११ व्या शतकातील पहिल्या हेन्रीने निर्माण केलेल्या राजाच्या सल्लागार मंडळापासूनच तिचा प्रारंभ झाला. प्रभावी सरंजामदार आणि चर्चमधील मान्यवर यांच्या प्रतिनिधींचा त्यात समावेश होता.

इ. स. १२१५ मध्ये जॉन राजाने, मागे उल्लेखलेल्या मॅग्ना चार्टावर सही केली आणि त्यानुसार राजाच्या सल्लागार मंडळात आणखी काही घटकांचा समावेश झाला.

सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की सामाजिक उत्क्रांतीच्या प्रक्रियेत जसेजसे

नवीन सामाजिक–आर्थिक वर्ग उदयाला आले तसतशी त्यांनी मागणी करून राजाच्या मंडळात प्रतिनिधित्व मिळवले.

पण एकदा अशा प्रकारचे राजाच्या मंडळात स्थान मिळाल्यानंतर मात्र हे संघर्ष करणारे गट आत्मसंतुष्ट बनले. त्यामुळे लोकशाहीसाठी चाललेला पुढील लढा जरी सोडून दिला गेला नाही तरी मंदावला. जवळजवळ चार शतके हीच परिस्थिती होती. संसदही प्रभावी नव्हती. राजा हाच संसदेपेक्षा श्रेष्ठ आणि प्रभुत्वशाली होता. संसदेला केवळ सल्ला देण्याचा अधिकार होता.

संसदेचे राजावरील प्रभुत्व हे अंतिमत: आणि निश्चित स्वरूपात १६८८ च्या देदिप्यमान क्रांतीनंतरच प्रस्थापित झाले.

नुकताच इंग्लंडमधील कायद्याच्या विकासाचा तपशील दिलेला आहे. त्यावरून हे स्पष्ट होते की लोकशाहीच्या दृष्टीने १८३२ च्या कायद्याने इंग्लंडने फार मोठी झेप घेतली. त्यामुळे प्रौढ मतदानाची व्याप्ती वाढविली गेली. विशिष्ट किंमतीच्या वरील घर ज्यांच्या ताब्यात मालकी हक्काने वा भाडेपट्टीने होते अशांना मतदानाचा हक्क प्राप्त झाला. पण हे लक्षणीय आहे की या मोठ्या झेपेनंतरही मतदानाचा हक्क प्राप्त झालेल्यांची संख्या एकूण लोकसंख्येच्या दहा टक्केच होती.

त्यानंतर त्या काळात नव्याने उदयाला येणाऱ्या प्रभावी वर्गांना प्रतिनिधित्व देणारे कायदे पारित झाले. १८६७, १८८८, १९१८, व १९२८–२९ चे कायदे या वर्गात मोडतात.

अंतिमत: १९२८–२९ च्या कायद्याने सर्व नागरिकांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला. १९२८ च्या कायद्यात पारंपरिक मालमत्तेचा आधार नाकारला गेला व सार्वत्रिक प्रौढ मतदानाचे तत्त्व अवलंबिले गेले. याप्रमाणे पहाता १८३२ पासून १९२८–२९ पर्यंतच्या रिफॉर्म्स ॲक्ट्समुळे ग्रेट ब्रिटनमधील लोकशाही ही आजच्या अवस्थेपर्यंत आली आहे हे लक्षात येते.

१८६९ च्या म्युनि. कॉर्पोरेशन ॲक्टच्या दुरुस्तीप्रमाणे स्त्रियांना स्थानिक संस्थांच्या निवडणुकीत मतदानाचा अधिकार मिळाला. त्यानंतर काही विशिष्ट लायकीच्या ३० वर्षीय महिलांनाच १९१८ च्या कायद्याने संसदीय निवडणुकीत मतदानाचा अधिकार मिळाला. १९२८ च्या कायद्याने मात्र महिलांना पुरुषांपेक्षा गौणस्थान देणाऱ्या सर्व तरतुदी रद्द करण्यात आल्या व पुरुषांच्या बरोबरीने मतदानाचा सार्वत्रिक हक्क प्राप्त झाला.

याप्रमाणे लोकशाहीचा प्रवास इंग्लंडमध्ये जरी १२१५ मध्ये सुरू झाला असला तरीही महिलांना पुरुषांबरोबर मतदानामध्ये स्थान व सार्वत्रिक प्रौढ मतदान हे अधिकार मात्र इ. स. १९२९ मध्ये प्राप्त झाले. सतत सात शतके समाजातील विविध घटकांनी लोकशाहीसाठी केलेल्या प्रदीर्घ संघर्षाचे हे फलित होते. सध्याच्या संसदीय लोकशाहीसाठी योग्य असे ब्रिटिश मानस या प्रदीर्घ संघर्षाने घडविले आहे. एका दृष्टीने हे व्यावहारिक

असे राजकीय प्रशिक्षणच होते.

भारतामध्ये या व्यवस्थेचे सदोष कलम

भारतामध्ये मात्र १९२० नंतर माँटेग्यू– चेम्सफोर्ड सुधारणांनुसार ब्रिटिश नमुन्याची संसदीय व्यवस्था सुरू झाली. या नवीन व्यवस्थेखाली द्विदल लोकशाही प्रस्थापित झाली. त्यावेळी देशाची एकूण लोकसंख्या २४ कोटी होती. या नव्या व्यवस्थेप्रमाणे राज्यांच्या विधानसभांसाठी मतदानाचा हक्क मिळालेल्यांची संख्या १७००० च्या आसपास होती आणि केंद्रीय संसदेसाठी मतदानाचा हक्क मिळालेल्यांची संख्या १७००० धरून ९,९०००० एवढी होती. १९२० ची ही स्थिती होती.

१९५० मध्ये भारतीय संविधानाच्या मान्यतेनंतर प्रौढ मतदानाचा हक्क देण्यात आला आणि कोट्यावधी नागरिकांना हा हक्क मिळाला. स्त्रियांनाही संविधानाच्या अवलंबाच्या प्रारंभापासूनच सार्वत्रिकतेने मतदानाचा हक्क प्राप्त झाला.

या दुहेरी आलेखावरून लक्षात येते की निरक्षरतेचे आणि दारिद्र्याचे फार मोठे प्रमाण असलेल्या आपल्या बहुविध समाजाचा ऐतिहासिक विकासक्रम हा ब्रिटनपेक्षा पूर्णतः भिन्न आहे. आणि त्यामुळे वेस्टमिन्स्टर नमुना या देशाला सुसंगत होऊ शकत नाही हे आपले बुद्धिवंत पूर्णतः विसरतात.

इंग्लंडमध्ये राजकीय संघर्षातून मिळालेल्या राजकीय प्रशिक्षणामुळे समाजाचे लोकतांत्रिक मानस घडत जाऊन लोकाशाहीचा क्रमशः विकास झाला, तर भारतामध्ये आवश्यक ते सुसंगत लोकतांत्रिक पर्यावरण विकसित न होताच लोकशाहीचे कलम केले गेले आणि हेच इंग्लंड आणि भारत यांच्या यशपयाचे कारण आहे.

ब्रिटिश व्यवस्थेशी उपरोधिक साम्य

गंमत म्हणजे एका बाबतीत आपण ब्रिटिश व्यवस्थेच्या जवळपास येण्याचा दावा करू शकतो. ती गोष्ट म्हणजे मंत्र्याची तयारी! *Government Of England* या ग्रंथात लोने (Low) म्हटले आहे –

'शासकीय कोषविभागात दुय्यम दर्जाची कारकुनाची नोकरी मिळविण्यासाठी कोणाही तरुणाला अंकगणिताची परीक्षा द्यावी लागते. पण कोषागाराचा अध्यक्ष मात्र एखादा मध्यवयीन व्यवहारी माणूस असू शकतो. तो इटन किंवा ऑक्सफर्डला शिकलेले जुजबी अंक विसरलेला असतो. आणि जेव्हा दशमानात काढलेले कोषव्यवस्थेचे हिशेब त्याच्यापुढे येतात तेव्हा भाबडेपणाने 'या छोट्या टिंबांचा अर्थ काय?' हे जाणून घेण्यास तो उत्सुक असतो. एखाद्या तरुणाने युद्धातील युक्त्याप्रयुक्त्यांची आणि सैनिकी इतिहासाची ओळख दाखविली नाही तर त्याला कॅप्टनच्या हुद्यावर बढती नाकारली जाते. पण शांततापिय माणूस मात्र युद्धमंत्री असू शकतो. त्याला सर्व सैनिकी बाबी अप्रिय असतात आणि या सर्व गोष्टींची माहिती घेण्यापासून तो चिकाटीने

दूर रहात असतो.'

(A youth must pass an examination in arithmetic before he can hold a second- class clerkship in the Treasury, but a Chanceller of the Exchequer may be middle aged man of the world, who has forgotten what little he ever learnt about figures at Eton or Oxford, and is innocently anxious to know the meaning of 'those little dots' when first confronted with Treasury accounts worked out in decimals. A young officer will be refused his promotion to captain's rank if he cannot show some acquaintance with tactics and military history; but the Minister of War may be a man of peace ---- who regards all soldiering with dislike, and sedulously abstains from getting to know anything about it.)

लोकशाहीचा स्वच्छ कारभार - एक गैरसमज

आपल्या देशात असे सर्वसाधारण मत आहे की प्रगत पश्चिमी देशांत लोकशाही व्यवस्था प्रस्थापित झाल्या दिवसापासून अतिशय स्वच्छ असा शासकीय व्यवहार होता. अनेक महत्त्वाच्या देशांत असे काहीही नव्हते. अमेरिकेत 'लुटीची व्यवस्था' होती. नवीन पक्ष सत्तेवर आला की मंत्र्यांच्या शासकीय वर्गासहित पूर्वीच्या शासनाने नेमलेले सर्व नोकर तो काढून टाकीत असे. आणि ज्यांनी नवीन पक्ष सत्तेवर आणण्यास मदत केली अशांच्या द्वारा त्या जागा भरल्या जात असत. खरे म्हणजे अमेरिकेत अनेक वर्षांपर्यंत म्हणण्यासारखी कायमची शासकीय व्यवस्था नव्हतीच. नंतर त्यांचे त्यांनाच जाणवले की ही परिस्थिती लोकशाहीला पोषक नाही. त्यांनी ही 'लुटीची पद्धती' रद्द केली. इंग्लंडमध्ये शासकीय व्यवस्था राजकीय उलाढालींपासून पूर्ण निर्लेप, नि:पक्षपाती रहावी म्हणून त्यांनी 'राजकीय पदे' आणि 'नागरी पदे' अशी विभागणी केली आहे. नागरी सेवाव्यवस्था ही कायमची असते. ती वेळोवेळी निवडून येणाऱ्या सर्व पक्षांची सेवा करते आणि त्यामुळे मंत्र्यांच्या हस्तक्षेपावाचून प्रशासनाला आपले काम पार पाडता येते.

पश्चिमी देशांतील धर्मनिरपेक्षता - आणखी एक भ्रम

सर्वसाधारण आपल्याकडे असे गृहीत धरले जाते की समृद्ध पश्चिमी देशांत धर्मनिरपेक्षतावाद हे प्रभावी तत्त्व आहे. पण या गृहीतकालाही प्रत्यक्ष वस्तुस्थितीचा आधार नाही. *'Freedom Of Conscience In The U.S.S.R.'* या ग्रंथाच्या पाचव्या प्रकरणात लेखक ए. बर्मिन्कॉव्हने म्हटले आहे की -

'प्रतिगाम्यांनी आताच्या स्वातंत्र्याचे तत्त्व, धर्म व शासन आणि धर्म व शिक्षण यांच्या फारकतीचे तत्त्व, अशी तत्त्वे घोषित केली. पण हे प्रत्यक्षात आलेले नाही.

सत्ता हस्तगत केल्यानंतर प्रतिगाम्यांनी धर्माला मदतच केली. कितीतरी भांडवलवादी देशांमध्ये आजही धर्मसंस्थेची शासनाशी फारकत आहे आणि तीं सोयीस्कररीतीने ढाल म्हणून वापरली जाते. नास्तिकता वाढत जाते आणि वेगवेगळे धर्मही असहिष्णू बनू लागतात तेव्हा शोषणाला अनुकूल अशा तडजोडी घडवून आणण्यासाठी धर्मसंस्थेचा उपयोग केला जातो. अनेक भांडवली देशांत धर्मसंस्था हीच वस्तुतः प्रसंगी शासनाचेही कायदेशीर अंग बनली आहे. धर्मसंस्थेला शासन आर्थिक मदत करते आणि प्रबळ वर्गाच्या हितसंबंधासाठी त्याचा वापर करते.'

(Bourgeois have declared the principles of freedom of soul, the seperation of the Church from the state, and of the Church from education; but this has not been put into practice. Having captured power, they (Bourgeois) supported the Church in their fight against atheism to save religion from atheism. Several capitalistic countries, even today, seperate the Church from the state and use it as a shield. As atheism grows and different religions grow more intolerant, the Church is being used to secure compromises favourable to the exploiter class. In many capitalistic countries, the Church is a real and on occasions a legal organ of the state. The states help the Church financially and use the Church in the interest of the dominant classes.)

बहुतेक भांडवलवादी देशांमध्ये घटना एका विशिष्ट धर्माला मुभा देते आणि इतरांना प्रतिबंध करते. हे निवडलेल्या धर्माच्या लाभासाठी केले जाते. उदा. खालील बाबी पहा - डेन्मार्क, नॉर्वे, स्वीडन या देशांमध्ये इव्हँजेलिकल ल्यूथरियन चर्च हा शासनाचा धर्म आहे. इंग्लंडमध्ये चर्च ऑफ इंग्लंड ही अधिकृत धर्मसंस्था आहे. स्पेनमध्ये रोमन कॅथॉलिक हा प्रस्थापित धर्म आहे. युरोप आणि लॅटिन अमेरिकेच्या १४ देशांमध्ये स्पष्ट स्वरूपात रोमन कॅथॉलिक चर्चच्या बाजूने तरतूद केलेली आहे. मध्यपूर्वेतील व दक्षिणपूर्वेतील आशिया व आफ्रिका या खंडांमधील १७ देशांमध्ये इस्लामला कायद्यानेच विशेष स्थान बहाल केले आहे.... ज्यावेळी विशिष्ट धर्म हा शासनाचा धर्म मानला जातो तेव्हा इतर धर्म व पंथ दुय्यम ठरतात. कमी अधिक फरकाने जगात हीच परिस्थिती आज सर्वत्र आढळून येते. मग आत्म्याच्या स्वातंत्र्याचा अर्थ काय? २० देशांमध्ये मान्यता प्राप्त अशा धर्मसंस्थेच्या सदस्यालाच राज्यप्रमुख होण्याचा अधिकार असतो. अर्जेंटिना, लायबेरिया, आणि इराण या देशांमध्ये अशाप्रकारची पात्रता शासकीय नोकरीसाठीसुद्धा आवश्यक मानली जाते.

अमेरिकेत जरी औपचारिकतेने आत्म्याच्या स्वातंत्र्याची व धर्मसंस्थेची शासनापासून फारकत असल्याची घोषणा असली तरीही शासकीय संस्थांमधील अनेक कार्यक्रम धार्मिक परंपरेनुसार साजरे केले जातात. अमेरिकी काँग्रेसचे सत्र ख्रिश्चन प्रार्थनेने

सुरू होते. केवळ शासकीय अधिकाऱ्यांनाच नव्हे तर राष्ट्राध्यक्षांनासुद्धा त्यांच्या या शासकीय पदावर आरूढ होताना धार्मिक शपथ घ्यावी लागते. ४२ देशांच्या घटनांमध्ये देवाला उद्देशून प्रार्थना आहे. आयरिश घटनेच्या प्रास्तविकात म्हटले आहे -

'पवित्र त्रिमूर्तींच्या नावाने ..... प्रभू येशू ख्रिस्ताच्या संदर्भातील आमची कर्तव्ये लक्षात घेऊन आम्ही आयर्लंडचे लोक नम्रपणे.....'

(In the name of the most Holy Trinity - we the people of Ireland humbly acknowledging.... our obligations to our Lord Jesus Christ.....)

अनेक देशांमध्ये नास्तिकाने दिलेला पुरावा न्यायालये ग्राह्य मानत नाहीत. नास्तिकांना शासकीय सेवांमध्ये प्रवेश मिळत नाही. देलावेर (Delaware) राज्याच्या घटनेप्रमाणे सार्वजनिक प्रार्थनांना उपस्थित रहाणे सर्व नागरिकांना सक्तीचे आहे. भांडवलवादी देशांमध्ये आत्म्याचे स्वातंत्र्य हे केवळ उपासनेच्या पद्धतीबाबत मर्यादित आहे. पण बऱ्याच देशांत हे स्वातंत्र्यही देण्यात येत नाही. नॉर्वेच्या घटनेप्रमाणे सर्व नागरिकांनी आपल्या मुलांचे शिक्षण इव्हँजेलिकल ल्यूथरियन चर्चच्या तत्त्वाप्रमाणे देणे सक्तीचे आहे. प. जर्मनीमध्ये धर्मसंस्थेच्या द्वारा कितीतरी शाळा व शिक्षणसंस्था चालविल्या जातात. ग्रीक कायद्याप्रमाणे प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील शिक्षण हे ग्रीक राष्ट्रवादाशी आणि ग्रीक संस्कृतीशी सुसंगत असावे लागते. इस्त्राइलमध्ये धार्मिक शिक्षणासाठी शासकीय समिती आहे. आणि जेहोवाइझमला शासकीय धर्माचे स्थान देण्यात आले आहे.

राजकीय प्रवृत्ती आणि सत्ताधारी वर्गाचा आधार यामुळे ब्रिटनमध्ये प्रॉटेस्टंट हे आयरिश कॅथॉलिकांवर हल्ले करतात. त्याच पद्धतीने कॅथॉलिक स्पेनमध्ये प्रॉटेस्टंटांचा छळ झाला. ते कोणत्याही शासनात नोकरी मिळवू शकले नाहीत. आणि शाळांमध्ये शिकविण्यालाही त्यांना परवानगी नव्हती. शासकीय सेवांमध्ये वरच्या पदांवर त्यांना बढती मिळू शकत नव्हती.

लोकशाही व्यवस्थेचा मर्यादांच्या जाणिवेचा अभाव

ज्याप्रमाणे घटनेचे महत्त्व, धर्मनिरपेक्षता इ. संबंधातील पश्चिमी देशांतील वातावरणाबद्दल भारतीय समाजात गैरसमज आहेत त्याचप्रमाणे लोकशाही मूल्ये, लोकतांत्रिक शासनपद्धती यांच्या मर्यादांची असावी तेवढी जाणीव आपल्याकडे नाही.

लोकशाहीची व्याख्या अनेक विचारवंतांनी विविध शब्दांमध्ये केलेली आहे. अर्थात अब्राहम लिंकनने केलेली व्याख्या सर्वात लोकप्रिय ठरली आहे. (लोकांचे, लोकांसाठी, लोकांनीच चालविलेले शासन). पण लोकशाही ही एक जीवनपद्धती आहे. विवेकी अनुभवजन्यता, व्यक्तीवर भर, शासनाचे साधनरूपत्व, स्वयंप्रेरणा, कायद्यामागील कायदा, साधनांची उदात्तता, चर्चा व सहमती, एकाच सत्तेच्या सातत्याचा

अभाव व सर्व मानवी संबंधांतील मूलभूत समता अशा सर्व गोष्टींचा तिच्यात समावेश आहे.

लोकशाहीच्या अभ्यासासाठी डॉ. आंबेडकरांनी अपार कष्ट घेतले. संविधानात्मक कायद्यावर त्यांचा फार मोठा अधिकार होता. पण ते पश्चिमेचे आंधळे अनुयायी नव्हते. त्यांच्या मनाची दिशा त्यांच्या एका ठाम विधानावरून दिसून येते. त्यांनी त्यात स्पष्ट केले आहे की - स्वातंत्र्य, समता व बंधुता ही तत्त्वे त्यांनी फ्रेंच राज्यक्रांतीवरून नव्हे तर त्यांचा गुरू भगवान बुद्ध याच्यापासून घेतली.

त्यांनी लोकशाहीची केलेली व्याख्या अशी -

'समाजाच्या सामाजिक, आर्थिक जीवनातील क्रांतिकारक बदल रक्तपाताशिवाय घडवून आणणारा शासनाचा प्रकार आणि पद्धती म्हणजे लोकशाही.'

(a form and a method of Government whereby revolutionary changes in the economic and social life of the people are brought about without any blood-shed.)

त्यांच्या मते, लोकतांत्रिक जीवनपद्धतीची संकल्पना ही आदर्श समाजाशिवाय कधीही सिद्ध होऊ शकणार नाही. आदर्श समाज हा गतिमान असला पाहिजे आणि एका भागातील बदलांची कल्पना अन्य भागांना देण्यासाठी अनेक वाहिन्यांनी तो परिपूर्ण असला पाहिजे. आदर्श समाजात अनेक हितसंबंधांमध्ये जाणीवपूर्वक विनिमय आणि परस्पर सहभाग असला पाहिजे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे समाजात सामाजिक झिरपण आवश्यक आहे.

राजकीय लोकशाही ही चार प्रमेयांवर आधारलेली असते. १) व्यक्ती हेच अंतिम साध्य आहे. २) हिरावून घेता येणार नाहीत असे काही अधिकार व्यक्तीला असले पाहिजेत व त्यांची घटनेने हमी दिलेली असली पाहिजे. ३) व्यक्तीला कोणत्याही खास लाभासाठी तिच्या कोणत्याही घटनात्मक हक्काचा त्याग करण्याची पूर्वअट असणार नाही. ४) इतरांचे शासन करण्यासाठी कोणत्याही खाजगी व्यक्तींना सरकार अधिकार बहाल करणार नाही.

लोकशाही ही केवळ शासनपद्धती नाही तर तो सामाजिक रचनेचाही प्रकार आहे. लोकशाहीची तांत्रिक चौकट ही फारच कमी किंमतीची गोष्ट आहे. आणि सामाजिक लोकशाही नसेल तर ती एक विसंगत गोष्टच ठरेल.

मनाची विशिष्ट प्रवृत्ती - सहचरी माणसांबद्दलची आदराची व समतेची भावना - आणि दृढ अशा सामाजिक बंधनातून मुक्त अशी समाजरचना अशा दोन गोष्टींचा सामाजिक लोकशाहीत समावेश आहे.

लोकशाही समाजात प्रत्येक नागरिकाला स्वस्थतेचे व संस्कृतीचे आश्वासन असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सर्वांसाठी समान कायदा असला पाहिजे.

पण हे सारे म्हणजे लोकशाहीचे संकल्पनात्मक, सैद्धांतिक रूप होय. त्यामुळे

लोकांचा असाही समज आहे की लोकशाही या संज्ञेला एक कायमचा दृढ असा निश्चित अर्थ आहे. वस्तुस्थिती तशी नाही, कालाप्रमाणे व वातावरणाप्रमाणे त्यात बदल होत जातो. युरोपमध्ये लोकशाही ही आपल्याला प्रथम ग्रीक नगर-राज्यांमध्ये दिसून येते. मात्र अथेन्सच्या लोकशाहीत अर्धअधिक लोक गुलाम होते. केवळ अर्धेच स्वतंत्र होते आणि गुलामांना शासनात कोणतेही स्थान नव्हते.

इंग्लंडमध्ये १६८८ च्या राज्यक्रांतीपूर्वी प्रचलित असलेली लोकशाही ही क्रांतीनंतर प्रस्थापित झालेल्या लोकशाहीपेक्षा भिन्न होती. १६८८ ते १८३२ या कालातील ब्रिटिश लोकशाही ही, १८३२ चा पहिला सुधारणेचा कायदा संमत झाल्यानंतर विकसित झालेल्या लोकशाहीच्या समान नव्हती. लोकशाही, तिचा प्रकार व आशय हा बदलत रहातो.

लोकशाहीच्या हेतूतही बदल

लोकशाहीच्या हेतूतही परिवर्तन होते. प्राचीन इंग्लिश लोकशाहीचा हेतू काय होता? तर राजाला लगाम घालणे, त्याचे विशेष अधिकार अमलात आणण्यामध्ये त्याला प्रतिबंध करणे हा होतो. अर्थातच ट्यूडर हुकुमशहांविरुद्ध ती प्रतिक्रिया होती. आज लोकशाहीचा हेतू हा एकाधिकारशहा राजाला लगाम घालणे हा नाही तर लोकांचे कल्याण साधणे हा आहे.

याप्रमाणे पहाता आपल्या लक्षात येईल की सार्वत्रिकतेने मान्य होईल अशी 'लोकशाही' संज्ञेची व्याख्या नाही. मागे पाहिल्याप्रमाणे लोकशाहीची व्याख्या अनेक लोकांनी, राज्यशास्त्रज्ञांनी विविध प्रकारे केली आहे.

लोकशाही यशस्वी करण्यासाठी आवश्यक अशी कोणत्या प्रकारची पूर्वस्थिती असावी याबद्दल त्यांच्या त्यांच्या मताप्रमाणे आपल्याला भरीव कल्पना देणारे कोणतेही ठाम तत्त्व, लोकशाहीबद्दल लिहिणाऱ्या लेखकांच्या लिखाणात नाही. लोकतांत्रिक शासने कार्यरत होती अशा, जगाच्या वेगवेगळ्या भागांत लोकशाही कशी वृद्धींगत झाली वा मंदावली हे इतिहासाचे सखोल अवगाहन करूनच आपल्याला समजते.

लोकतंत्राविरुद्ध तीव्र प्रतिक्रिया

त्यामुळेच लोकतंत्राविरुद्ध अनेक विचारवंतांनी टीका केलेली आहेच. गंमत म्हणजे ज्या ब्रिटनच्या राजकीय अनुभवांचा मागे उल्लेख केला आहे आणि पश्चिमी लोकतांत्रिक संस्था आणि संसद यांची जननी म्हणून जी ब्रिटिश संसद गौरवली जाते तिच्याबद्दलच महात्मा गांधींनी अत्यंत कठोर मत व्यक्त केले आहे. 'हिंद स्वराज्य' मध्ये गांधीजींनी म्हटले आहे की-

'संसदेने वाया घालविलेला पैसा आणि वेळ हे जर काही चांगल्या व्यक्तींकडे सुपूर्त केले असते तर इंग्लंडला आज अधिक उच्चतम स्थान प्राप्त झाले असते.

संसद हे राष्ट्राचे एक महागडे खेळणे आहे.

इंग्लंडची आजची स्थिती दयनीय आहे. भारतावर अशी वेळ कधीही येऊ नये अशी माझी देवाजवळ प्रार्थना आहे. जिला संसदांची जननी म्हणण्यात येते ती एक वांझ महिला आणि वारांगना आहे. या संज्ञा कठोर वाटतील पण त्या वस्तुस्थितीला चपखल लागू होतात.... (कारण) बाह्य दडपणाशिवाय ती काहीही करू शकत नाही. ती वारांगनेप्रमाणे आहे कारण वेळोवेळी बदलणाऱ्या मंत्र्यांचा तिच्यावर ताबा असतो.'

(If today money and time wasted by the parliament were entrusted to a few good men, the English nation would be occupying today a much higher platform. Parliament is simply a costly toy of the nation.

The condition of England at present is pitiable. I pray to God that India may never be in that plight. That which you consider to be the Mother of Parliaments, is like a sterile woman and a prostitute. Both these are harsh terms, but exactly fit in this case---- without outside pressure, it can do nothing. It is like a prostitute because it is under the control of ministers who change from time to time.)

आणि ब्रिटनमधीलच चर्चिलसारख्या नेत्याच्या मते लोकशाही म्हणजे अत्यंत निकृष्ट अशा शासनप्रकारांपैकी त्यांतल्या त्यांत उत्कृष्ट प्रकार होय.

प्रा. पुणतांबेकर म्हणत असत-

'लोकशाहीत उमेदवारी करणारा शिखरावर असतो आणि अविकसित तळाशी असतो. अप्रगल्भ हा मध्यभागी असतो तर प्रगल्भ मात्र बाहेरच असतो.'

(In democracy, amateur is at the top, premature at the bottom, immature in the middle, and the mature out.)

प्रातिनिधिक लोकशाही आज तरी अटळ

प्रातिनिधिक लोकशाही आणि थेट प्रत्यक्ष लोकशाही यांच्यातील दरीचा मागे उल्लेख आला आहे. भारतासारख्या देशात थेट स्वरूपाची प्रत्यक्ष लोकशाही ही शक्य होईल का याची शंका आहे. अशी प्रत्यक्ष लोकशाही केवळ प्राचीन ग्रीस मधील स्पार्टा व अथेन्स यासारखी नगर-राज्ये आणि भारतातील लिच्छवी जनपद या राज्यांमध्ये शक्य होती. प्रत्यक्ष लोकशाहीत, प्रत्येक नागरिकाचा राज्याच्या निर्णय प्रक्रियेत प्रत्यक्ष सहभाग अपेक्षित असतो. ग्रीसमध्ये सर्व नागरिक बाजाराच्या जागी जमून, राज्याच्या समस्येची चर्चा करीत आणि निर्णय करण्यासाठी हात वर करून मतदान करीत. अशा बाजाराच्या जागी सामावू शकणार नाही अशा कोणत्याही समाजाच्या बाबतीत हे व्यवहार्य नाही. आणि म्हणून आपण पुढचा त्यातला त्यात

उत्तम असा प्रातिनिधिक लोकशाही शासनाचा प्रकार अवलंबितो.

प्रातिनिधिक पद्धतीच्या मर्यादा

प्रातिनिधिक शासनाच्या प्रकारात लोकांना असे वाटत असते की तेच स्वत:चे शासन चालवित आहेत. हे मर्यादित अर्थानेच खरे असते. कारण जरी त्यांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींचे ते शासन असले तरी प्रत्येक प्रसंगी निरपवादपणे मतदारांच्या वा बहुसंख्य मतदारांच्या आदेशाप्रमाणे वा इच्छेप्रमाणे हे प्रतिनिधी निर्णय घेतील याची कोणतीही हमी नसते. निवडणुकीच्या वेळी काही विषय उपस्थित केले जातात. पण पुढील पाच वर्षांत संसदेसमोर वा विधिमंडळासमोर चर्चेला येणारे एवढेच विषय नसतात. असे कितीतरी विषय मध्येच उद्‌भवतात की ज्याबद्दल प्रतिनिधींना मतदारांचा कौल नसतो.

प्रत्येक नागरिकाचा निर्णय प्रक्रियेतील सहभाग शक्य होण्यासाठी मताला टाकल्या जाणाऱ्या प्रत्येक नव्या विधेयकाच्या वा ठरावाच्यावेळी निर्वाचित प्रतिनिधींनी मतदारांशी संपर्क करणे, बहुसंख्यांच्या मतांचा अंदाज घेणे आणि त्याप्रमाणे संसदेत वा विधानसभेत मतदान करणे आवश्यक असते.

पण हे कधीही घडत नाही. उलट निवडून आल्यानंतर प्रतिनिधींना त्यांच्या त्यांच्या पक्षाच्या आदेशाप्रमाणे वागावे लागते आणि या पक्षादेशामध्ये त्यांच्या त्यांच्या मतदारसंघातील मतदारांच्या इच्छेची दखल घेतलेली असते याची कोणतीही हमी नाही. बऱ्याचवेळा पक्षादेश हा बहुमताच्या विरोधातच असतो. 'गोहत्या बंदी आंदोलना'ला गोहत्या बंदी करवून घेण्यात आलेले अपयश हे त्याचे उदाहरण आहे. याप्रमाणे बऱ्याचदा कोणत्याही एका मतदार संघातील बहुसंख्य लोकांच्या इच्छा आणि पक्षश्रेष्ठींचा आदेश यांच्यात फरक असतो.

याप्रमाणे आतापर्यंतच्या सर्व चर्चेवरून हे स्पष्ट होते की जगातील सर्वच देशांसाठी घटना म्हणजे अत्यंत पवित्र अथवा मूलभूत सार्वजनिक दस्तऐवज असतो, असा आपल्या देशातील अनेक जणांचा समज वस्तुस्थितीवर आधारलेला नाही.

त्याचप्रमाणे पश्चिमी संसदीय लोकशाहीचा नमुना हाच एकमेव उत्तम असा शासनाचा प्रकार आहे असेही समजणे चुकीचे आहे. आणि जरी प्रत्येक देश त्यात आपापल्या पद्धतीने वेळोवेळी आपल्या राष्ट्रीय पर्यावरणाच्या गरजेप्रमाणे बदल करीत आला आहे, तरीही एकूणच हा प्रातिनिधिक शासनाचा प्रकार अपुरा व सदोष आहे.

या सर्व वस्तुस्थितीमुळेच लोकशाही, धर्मनिरपेक्षता, प्रातिनिधिक शासन इ. पश्चिमी संकल्पनांच्या मर्यादा पाहिल्यानंतर राजकीय पक्ष व राज्य या संसदीय लोकशाहीच्या कार्यवाहीच्या दोन माध्यमांबद्दलच्या मर्यादांचा परामर्श घेणे उपयुक्त ठरेल. पश्चिमी विचारवंतांनीही याही बाबतीत वास्तववादी चिंतन करून या कल्पनांमधील मर्यादा दाखवल्या आहेत.

नागरिकांच्या सहभागाच्या आड येणारा घटक - राजकीय पक्ष

प्रत्यक्ष लोकशाही आणि प्रातिनिधिक स्वरूपाचे शासन यांतील दरी कमी करण्याच्या पश्चिमी लोकतांत्रिक व्यवस्थांमध्ये अवलंबलेल्या उपायांचा मागे उल्लेख आला आहेच.

पण ही दरी पूर्णतः बुजविता येणार नाही. आणि म्हणून काही थोर विचारवंतांनी म्हटले आहे की प्रातिनिधिक शासनांमध्ये प्रत्येक नागरिकाच्या निर्णय प्रक्रियेतील प्रत्यक्ष सहभागाच्या आड येणारा मुख्य अडथळा म्हणजे राजकीय पक्ष ही संस्था होय. राजकीय पक्ष हे जनता आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील भिंत म्हणूनच उभे असतात. ज्या राजकीय पक्षाच्या आदेशात जनतेच्या इच्छेचा समावेश नसतो तो पक्ष प्रत्यक्ष लोकशाहीला अडथळा असतो आणि सर्वसाधारणपणे निर्वाचित लोकप्रतिनिधी त्यांच्या मतदारसंघातील बहुसंख्यांच्या इच्छेचे प्रतिनिधित्व करीत नसल्यामुळे, जर मतदार अल्पशिक्षित असतील, स्वतःच्या जबाबदारीबद्दल सतर्क नसतील तर हे लोकप्रतिनिधी मोठा खोडसाळपणा करू शकतात. लोकशाहीचे सामर्थ्य प्राथमिकदृष्ट्या लोकतांत्रिक संस्थांमध्ये नव्हे तर लोकांच्या लोकतांत्रिक जाणिवांमध्ये असते. जर लोकांमध्ये विवेक नसेल तर चतुर राजकारणी मते मिळविण्याचे चलाख कारस्थान करू शकतात. सत्तेवर आल्यावर राजकीय पक्ष आपला पाया वाढवून सत्ता कायम राखण्याचे डावपेच आखू शकतात. या त्यांच्या ओंगळ खेळामध्ये अशिक्षित व उदासीन मतदार त्यांना अजाणता मदत करीत असतात.

हे लक्षात घेणे अर्थपूर्ण आहे की रॉबेसपिरी (Robespieree) हा फ्रेंच राज्यक्रांतीनंतरचा फ्रांसचा पहिला नेता म्हणाला होता की प्रातिनिधिक प्रकाराच्या शासनामध्ये जर सर्व निर्वाचित लोकप्रतिनिधी ठरवतील तर ज्यांनी त्यांना निवडून दिले त्या मतदारांविरुद्ध ते सर्व एकत्र येऊन कटकारस्थान करू शकतील.

नेमके हेच भारतामध्ये आणीबाणीच्या काळात घडले. दुसरे उदाहरण मतपेटीच्या द्वाराच सत्तेवर आलेल्या हिटलरचे आहे.

प्रचलित राजकीय पद्धतीला मर्यादा पडण्याचे एक महत्त्वाचे कारण येथे प्रथम लक्षात घेणे उपयुक्त ठरेल. ब्रिटनच्या वेस्टमिन्स्टर पक्षीय राजकारणावर आधारलेली संसदीय पद्धती आपण स्वीकारलेली आहे. ब्रिटनमध्ये राजकीय पक्ष तत्त्वप्रणालीवर आधारलेले आहेत असे म्हटले जाते. पण जरा सखोलपणे पाहिले तर असे लक्षात येईल की 'तत्त्वप्रणालीवर आधारलेले' याचा प्रत्यक्ष व्यवहारातील अर्थ हा की ते पक्ष 'आर्थिक तत्त्वप्रणाली'वर आधारलेले आहेत. जर्मनी, फ्रांस, इटली या सारख्या अन्य पश्चिमी युरोपीय देशांबाबतही हीच स्थिती आहे. या देशांमधील समाजजीवन बहुविध नाही. प्राधान्याने ते एकजिनसी आहे. विविधता मुख्यतः आर्थिक क्षेत्रातच आहे आणि म्हणूनच राजकीय पक्षांबाबतही डावे, उजवे, मध्यममार्गी अशी भाषा प्रचलित आहे. इतरही क्षेत्रांत लोकांमध्ये काही मतभेद असू शकतात. परंतु ते इतके मूलभूत व काटेकोर नसतात. त्यामुळे ते मतभेद राजकीय पक्ष व राजकीय

सत्तेच्या कार्यकक्षेच्या बाहेर मिटवता येतात. अशा मतभेदांच्या उलगड्यासाठी समाजात इतर अनेक संस्था व यंत्रणा कार्यरत असतात.

अमेरिका बहुविधता असलेला देश आहे व त्यामुळेच तेथील राजकीय पक्ष आर्थिक प्रणालींवर आधारलेले नाहीत. त्यांची डावे, उजवे, मध्यममार्गी अशी वर्गवारी होऊ शकत नाही. त्यांचे राजकीय पक्ष म्हणजे केवळ निवडणूक यंत्रणाच असतात आणि निवडणुकीच्या पूर्वसंध्येला ते केवळ आपल्या संभाव्य सत्तेच्या कार्यकालातील धोरणे व कार्यक्रम जाहीर करतात व लोकांना त्या आधारे मतदान करण्याचे आवाहन करतात. त्या देशातील बहुविधतेमुळे समाजजीवनातील अनेक क्षेत्रांमध्ये अनेक प्रकारचे मतभेद निर्माण होतात. पण तेथेही मतभेदांचा निरास राजकीय पक्षांकडून व्हावा अशी अपेक्षा नसते त्यासाठी तेथेही विविध संस्थात्मक यंत्रणा अस्तित्वात आहेत.

पश्चिम युरोपीय देशांमधील समाजजीवन जरी अशा बहुविधतेने भरलेले नसले तरीही राजकीय पक्षांकडून केवळ आर्थिक क्षेत्रासंबंधीच्याच अपेक्षा असल्याने आर्थिक क्षेत्राच्या बाहेरील समस्यांचे निवारण राजकीय पक्षांनी करावे अशी त्या समाजांची अपेक्षाही नसते. परिणामतः राजकीय पक्षांचा वेस्टमिन्स्टरसारखा नमुना हा त्यांच्या राष्ट्रजीवनाच्या गरजा भागविण्यासाठी पुरेसा ठरतो.

आपल्याकडे मात्र मोठी अपवादात्मक परिस्थिती आहे. आपला समाज अमेरिकेप्रमाणेच बहुविधता असलेला समाज आहे. पण या दोन समाजांमध्ये मूलभूत फरक आहे. राष्ट्रनिर्मितीपासूनच्या वयाची वर्षे जमेला घेतली तर लक्षात येते की अमेरिका हे राष्ट्र अजून बाल्यावस्थेतच आहे आणि अमेरिकेच्या समाजजीवनातील बहुविधतेत एकात्मतेचा अंगभूत असा कोणताच धागा नाही. आपले राष्ट्र हे प्राचीनतम राष्ट्र आहे व आपल्या देशात विविधतेतही एकात्मतेचे सूत्र आहे. पण आपल्या देशातील मतभेद हे मूलभूत व तीव्र असतात आणि राजकीय पक्षांकडून त्यांचा निरास व्हावा हीही अपेक्षा असते. अशाप्रकारच्या, वेळोवेळी उद्भवणाऱ्या अनेक प्रश्नांच्या निरासासाठी आपल्याकडे आज मात्र केवळ वेस्टमिन्स्टर नमुन्याचे राजकीय पक्ष आहेत. पण असे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने हा नमुना पुरा पडू शकत नाही. त्यामुळे ज्या ब्रिटनकडून आपण ही राजकीय पक्षाची संकल्पना उसनी घेतली आहे त्या ब्रिटनमध्ये गृहीत धरलेल्या सर्वसाधारण राजकीय पक्षाच्या कार्यकक्षेविषयीच्या अपेक्षांपेक्षा अनेकवेळा आपल्या अपेक्षा खूपच उंचावलेल्या असतात.

आपल्या देशातील बहुविधतेमुळे व राजकीय पक्षांविषयीच्या अतिरिक्त अपेक्षांमुळे अनेकवेळा अतिशय विपरीत परिस्थिती निर्माण करणारे प्रसंग उद्भवतात. उदा. सार्वजनिक क्षेत्राचे प्रमाण वाढविण्याबद्दल व्यापक परिचर्चा होऊ शकते. शंभरएक माणसांचा एखादा गट असू शकेल की सार्वजनिक क्षेत्राचे प्रमाण वाढवावे असे त्यांचे मत आहे. पण म्हणून बेळगाव महाराष्ट्रातच ठेवण्याबाबत मात्र याच शंभर लोकांचे मत एकच असले पाहिजे असे नाही. त्याचप्रमाणे या गटाचे रामजन्मभूमीबाबत

एकमत असेलच अशी खात्री देता येणार नाही. म्हणजेच वेगवेगळ्या प्रश्नांबाबत वेगवेगळे असे गटबंधन संभवते.

काही वर्षांपूर्वी श्री. ओमप्रकाश त्यागींनी, सक्तीने अथवा फसवणुकीने धर्मांतर रोखणारे विधेयक मांडले होते. पण भारतीय जनता पक्षाच्या निर्मितीनंतर नेमके त्याच्याविरुद्ध असे विधेयक श्री. राम जेठमलानी यांनी मांडले. काही लोकांना हे किंवा ते विधेयक मान्य नसणार आणि म्हणून ही विधेयके मागे का घेऊ नयेत अशी चर्चाही उद्‌भवली होती. अथवा श्री. त्यागी किंवा श्री. जेठमलानी यांच्यापैकी ज्या कोणाचे विधेयक पक्षाच्या धोरणाशी सुसंगत नसेल त्यांना आपले विधेयक मागे घ्यायला भाग पाडावे की नाही? पक्षाचे अनुशासन तर अनिवार्य आहे आणि पक्षाच्या धोरणाचे अनुसरण तर आवश्यक आहे! पण त्याचबरोबर जर श्री. जेठमलानी यांची धर्मांतराविषयी काही विशिष्ट भूमिका असेल तर त्यांना तसे मत धारण करण्याचा अधिकार नसावा की काय? आणि लोकशाहीमध्ये त्यांना ते मत व्यक्त करण्याचा अधिकार नसावा की काय? ते एक राजकीय नेते, एका राजकीय पक्षाचे सदस्य आहेत. स्वत:चे या विषयावरील मत परिणामकारकरीतीने व्यक्त करण्यासाठी त्यांना सध्याच्या व्यवस्थेत स्वत:च्या राजकीय पक्षाच्या व्यासपीठाव्यतिरिक्त इतर कोणते व्यासपीठ उपलब्ध आहे? आणि त्यांच्या पक्षाचे मत जर काही वेगळे असेल तर अशा विषयावरील ठाम वेगळे मत असलेल्या अशा सदस्याला गप्प बसवावे का, असे अनेक प्रश्न निर्माण होतात.

प्रारंभी आपले नेते या परिस्थितीतून निर्माण होणारे प्रश्न उघडपणे लक्षात घेण्यास आणि त्यांचा निरास करण्यास बिचकत असत. पण कालांतराने परिस्थितीच्या दट्ट्यामुळे त्यांना ते करणे भाग पडले.

वेस्टमिन्स्टर नमुन्याची पक्षपद्धती ही समाजाचे सर्व प्रकारचे प्रश्न सोडवू शकत नाही हे आपल्याकडे घ्यावे तसे लक्षात घेतले जात नाही. पण ज्या ब्रिटनकडून आपण ही पक्षपद्धती उचलली तेथे तरी ही पद्धती कितपत समर्थतेने कार्यरत आहे?

ब्रिटनमध्ये तरी ही पद्धती कितपत यशस्वी आहे?

रॅम्से मूर यांनी ब्रिटिश सार्वजनिक जीवनातील राजकीय पक्षाच्या स्थानाबद्दल फारसे अनुकूल भाष्य केलेले नाही.

'पक्षीय नेतृत्वामुळे पंतप्रधानाला अपरिमित अधिकार प्राप्त होत असतात. पक्षातील सदस्यत्वाच्या समानतेमुळे मंत्रिमंडळाला उद्दिष्टांची आणि चारित्र्याची एकात्मता प्राप्त होत असते. कनिष्ट सभागृहात अस्तित्वात असलेल्या संघटित अशा पक्षाच्या समर्थनामुळे मंत्रिमंडळाला स्वत:चे कार्य पार पाडण्यास साहाय्य होते आणि (जेव्हा पक्षाला बहुमत असते तेव्हा) संपूर्ण शासकीय व्यवहारावर पूर्ण हुकुमशाही अधिकार बहाल केले जातात. अशी अमर्याद सत्ता राबविण्याऱ्यांच्या मनात सारखी भीती असते

की एखादी गंभीर चूक आपल्या हातून झाली तर देशातील अंतर्गत राजकारणात पक्ष दुबळा होईल आणि पुढील निवडणुकीत तो सत्ताभ्रष्ट होईल. राज्यकर्त्यांच्या मनात सतत असलेल्या या भीतीमुळेच केवळ या हुकुमशाही सत्तेला लगाम बसतो वा ती नियंत्रित केली जाते.'

(It is the leadership of a party that gives to the Prime Minister his enormous power; it is common membership of a party that gives unity of character and aims to a cabinet; it is the existence of an organised supporting party in the House of Commons that enables the cabinet to carry on its work, and [when the party has a majority] endows it with complete dictatorship over the whole range of government; and this dictatorship is only limited or qualified by the fear of those who wield it lest any grave blunder may weaken the party in the country, and bring downfall at the next election.)

ॲलेक्झांडर सोल्हेनित्सिनने राजकीय पक्ष या संस्थेची आणखी एक मर्यादा स्पष्ट केली आहे----

'ज्या समाजात राजकीय पक्ष सक्रिय असतात तो समाज नैतिक श्रेणीत कधीच वर चढत नाही. आजच्या जगात, अंधुकपणे दिसणाऱ्या उद्दिष्टांकडे आपण साशंकतेने वाटचाल करीत असताना द्विपक्षीय अथवा अनेक पक्षीय पद्धतीच्यावर आपण उठूच शकत नाही का असा प्रश्न पडतो. राष्ट्रीय विकासासाठी पक्षातीत अथवा खऱ्या अर्थाने अपक्षीय असे मार्ग नाहीतच का ?

अनेक पक्षीय संसदीय पद्धती काही पश्चिम युरोपीय देशांमध्ये आज अनेक शतके अस्तित्वात आहे. पण ती अतिशय धोकेदायक आहे. कदाचित कोणतेही नैतिक अधिष्ठान नसलेल्या पक्षीय संघर्षामध्ये आजच्या महासत्ता भेलकांडत राहिल्यामुळे, अलिकडच्या काही दशकांमध्ये या पद्धतीचे मरणान्तक असे दोष अधिक स्पष्ट झाले असावेत. पश्चिमी लोकसत्ताके आज राजकीय निर्वाणीच्या आणि आध्यात्मिक संभ्रमाच्या अवस्थेत आहेत.'

(A society in which political parties are active, never rises in the moral scale. In the world today, while we doubtfully advance towards dimly glimpsed goal, can we not, we wonder, rise above the two party or multi party system ? Are there no extra party or strictly 'non-party' paths of national development ?

The multi-party parliamentary system has already existed for centuries in some Western European countries. But it is dangerous; perhaps mortal defects have become more and more obvious in recent decades, when

super powers are rocked by party struggles with no ethical basis. The Western democracies today are in a state of political crisis and spiritual confusion.)

डॉ. पिटिरिम ए. सोरोकिन यांनीही पक्ष या संकल्पनेतील मर्यादा स्पष्ट केल्या आहेत.

'सध्याच्या काळात राजकीय पक्ष म्हणजे सत्ता व लूट यांच्या अघोरी तृष्णेने भारलेल्या प्रबळ लढाऊ यंत्रणा आहेत. मतदारांची मते आणि इच्छा अजमावणारे या नात्याने, राज्यशासने आणि मतदार यांच्यातील मध्यस्थ, अशी भूमिका त्यांनी स्वत:कडे घेतली आहे. पक्षांनी उमेदवारी दिलेल्या उमेदवारांव्यतिरिक्त उमेदवारांना मते देण्याची शक्यता नसते. त्यामुळे आपल्याला पाहिजे त्या उमेदवाराला मुक्तपणे निवडून देण्याचा लोकांचा अधिकार या पक्षांनीच हिरावून घेतला आहे व निवडणुकांबाबत त्यांनी मक्तेदारी निर्माण केली आहे. पक्षश्रेष्ठींचे अथवा पक्षीय नेतृत्वाच्या चौकडीचे स्वार्थी हितसंबंध पोसणारे फार मोठ्या प्रमाणावरील एक साधन अशी नागरिकांची स्थिती त्यांनी करून टाकली आहे. विविध युक्त्याप्रयुक्त्या आणि संशयास्पद प्रकारांनी त्यांनी निवडणुकीच्या विहित मार्गाने प्रस्थापित होणाऱ्या लोकशाही शासनाची मूलभूत तत्त्वेच भ्रष्ट करून टाकली आहेत. आणि वस्तुत: त्यांच्याकडून अपेक्षित असलेली मुत्सद्याची भूमिका, ही केवळ राजकारण्यांच्या, लुबाडणूक आणि लूट यांच्या हव्यासाच्या क्षुद्र पातळीवर त्यांनी आणून ठेवली आहे. अशांसारख्या अनेक मार्गांनी त्यांनी नागरिकांचे बहुतेक सर्व स्वातंत्र्य हिरावून घेतले आहे. आणि संघर्ष आणि शत्रुत्व निर्माण करणारी केंद्रे, असेच स्वत:चे स्थान बनविले आहे. ज्याठिकाणी एकपक्षीय हुकूमशाही असते तेथे तर या व्यवस्थेचे एरव्ही सुप्त असणारे घातक परिणाम फारच ठळठळितपणे दिसतात. पण, द्विपक्षीय वा बहुपक्षीय पद्धतीमध्येही काही कमी प्रमाणात का होईना हे घातक परिणाम दिसून येतात. प्रचलित राजकीय पक्षांचे लोकशाहीवरील आणि नागरिकांच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक व नैतिक जीवनावरील वर उल्लेखिलेले आणि इतरही घातक परिणाम हे अराजकवादी प्रणालीच्या आणि फ्रेंच पद्धतीच्या[१] कार्यकारी मंडळाच्या प्रणालीच्या तसेच अन्य मूलगामी क्रांतीच्या प्रणालीच्या प्रणेत्यांनीच केवळ दाखवून दिलेले आहेत असे नाही तर एम्. ऑस्ट्रोगॉर्स्की (M. Ostrogorsky), जे. ब्राइस (J. Bryce), जी. मॉस्का (G. Mosca), आर्. मिचेल (R. Michel) आणि सी. इ. मेरियम (C.E. Merriam) यांच्यासारख्या अत्यंत नि:पक्षपाती रूढिप्रिय विचारवंतांनीही दाखवून दिले आहेत'.

(At present, political parties are predominantly militant machines animated by the lust for power and booty. As intermediaries between the voters and the state governments, they have usurped the role of agencies for ascertaining the opinions and wishes of the electorate. They

have monopolised elections, depriving the citizens of the possibility of freely choosing whom they wish, since there is no possibility of voting for candidates not nominated by the parties. To a considerable extent they have converted the citizenry into a mere instrument for serving the selfish interests of the bosses or party caucus. Through various tricks and other dubious practices they have corrupted the basic principle of elective democracy, degrading the functions of the statesmanship to the sordid quest of politicians for spoils or booty. In these and many other ways they have robbed the citizens of much of their freedom and have become one of the chief foci for generating forces of strife and enmity. In countries with a single dictatorial party, the insidious effects of the system are all too evident. To a lesser degree the same evil effects are appearent also in countries with a two party or multi party system. The foregoing and many other disastrous effects of contemporary political parties on democracy and the political, social, economic and moral life of the citizens have been amply demonstrated not only by ideological anarchists, syndicalists and other radical theorisers but by the most impartial conservative investigators, such as, M. Ostrogorsky, J. Bryce, G. Mosca, R. Michel, and C.E. Merriam.)

आपल्याकडे स्वातंत्र्यप्राप्ती पूर्वी बऱ्याच आधी 'मॉंट-फोर्ड' सुधारणांच्या चर्चेच्या काळाच्या आगेमागे राजाजींनी हे स्पष्ट केले होते की ही बहुमत-अल्पमतावर आधारलेली लोकशाही शासनपद्धती भ्रष्टाचार वाढवेल.

आपल्या देशात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर प्रचलित पक्षपद्धतीमुळे लोकशाहीची कशी विटंबना झालेली आहे यावरचे विदारक भाष्य श्रेष्ठ गांधीवादी, लोकनायक जयप्रकाश नारायण यांनी केले आहे.

'कुरतडून नाश करणाऱ्या व भ्रष्ट करणाऱ्या सत्तासंघर्षाचा अंगभूतच गुणधर्म असणाऱ्या पक्षपद्धतीचे रूप मला उत्तरोत्तर अधिकाधिक अस्वस्थ करीत होते. पैसा, संघटन आणि प्रसारसाधने यांचे पाठबळ असलेले पक्ष लोकांवर कसे लादले जातात; लोकांचे राज्य म्हणजे प्रत्यक्षात पक्षाचे राज्यच कसे बनते आणि पक्षाचे राज्य म्हणजेही एखाद्या चौकडीचे वा कंपूचे राज्य कसे बनते; लोकशाही म्हणजे केवळ मत टाकणे येवढाच अर्थ कसा उरला आहे; प्रभावी पक्षांनी ठरविलेल्या उमेदवारांमधूनच केवळ व्यवहारात नागरिकांना निवड करावी लागत असल्यामुळे त्यांचा हा मताचा अधिकार कसा सीमित झाला आहे; आणि मतदारांसमोर ठेवलेले प्रश्न सर्व साधारणपणे त्यांना न उमगणारे असल्यामुळे हा मर्यादित मताधिकारही कसा भ्रामकच असतो

हे सारे सारे मी पाहिले आहे. मी पाहिलेली पक्षपद्धती, लोकांचे सामर्थ्य आणि स्वयंप्रेरणा विकसित होऊन त्यांना स्वत:च्या व्यवहारांचे संचालन करता यावे व अशाप्रकारे स्वयंशासन प्रस्थापित करण्याला मदत व्हावी या दृष्टीने, कार्यरत नव्हतीच. उलट मी पाहिलेली पक्षपद्धती ही लोकांना नामर्द, दुबळे बनविणारी होती. केवळ स्वत:साठी सत्ता काबीज करून लोकांवर त्यांच्याच संमतीचे का होईना पण राज्य करण्यामध्येच काय ते या पक्षांना स्वारस्य होते. मला तर वाटले की पक्षपद्धती लोकांना शेळ्यामेंढ्यांच्या पातळीवर आणण्याचा प्रयत्न करीत होती. आणि लोकांच्या सार्वभौमत्वाचे एकच लक्षण म्हणजे ठराविक काळाने स्वत:च्या कल्याणाकडे लक्ष देणारा मेंढपाळ निवडून देणे हे होते. माझ्या दृष्टीने तरी, ज्यासाठी मी झगडलो आणि या देशातील लोक झगडले ते हे स्वराज्य, स्वातंत्र्य खासच नव्हते.

पक्षपद्धतीच्या दोषांमधून आणि अपयशातून मार्ग काढण्यासाठी काही काळ मी स्पर्धात्मक पक्षपद्धतीच्या जागी सहकारी पक्षपद्धतीची कल्पना मनात घोळवत होतो. पण मला जाणवले की एकतर अशा राजकीय प्रयोगासाठी योग्य ते वातावरण नाही आणि दुसरे, हा प्रयोग प्राप्त सत्तासंघर्षाच्या चौकटीत आणि संसदीय लोकशाही पद्धतीत, अत्यंत मर्यादित काळाच्या व मर्यादित हेतूच्या पलीकडे यशस्वी होऊ शकणार नाही.

तरीही माझा अजूनही विश्वास मात्र आहे की आवश्यक मानसिक वातावरण असेल तर असा राजकीय प्रयोग अजूनही करता येईल. त्यासाठी संसदीय लोकशाहीपेक्षा आणखी कशाची तरी संदर्भ चौकट असावी लागेल. पण काही असले तरी माझा पक्षपद्धतीबद्दलचा भ्रमनिरास काही चांगले पर्याय शोधण्यासाठी मला प्रवृत्त करीत राहिला. गांधीजींच्या, लोकांच्या स्वयंशासनाबाबतच्या पक्षरहित विधायक - रचनात्मक दृष्टिकोणामुळे एका आशादायी मार्गाच्या शोधाची संधी प्राप्त झाल्यासारखी वाटली.'

(The party system with the corroding and corrupting struggle for power inherent in it, disturbed me more and more. I saw how parties backed by finance, organisation and the means of propaganda could impose themselves on the people; how people's rule in effect became party rule; how party rule in turn became the rule of caucus or coterie; how democracy was reduced to mere casting of votes; how even this right of votes was restricted severely by the system of powerful parties setting up their candidates from whom alone, for all practical purposes, the voters had to make their choice; how even this limited choice was made unreal by the fact that the issues posed before the electorate were by and large incomprehensible to it.

The party system as I saw it, was emasculating the people. It did

not function so as to develop their strength and initiative nor to help them establish their self-rule and to manage their affiars themselves. All that the parties were concerned with was to capture power for themselves so as to rule over the people, no doubt, with their consent. The party system, so it appeared to me, was seeking to reduce the people to position of sheep whose only function of sovereignty would be to choose periodically shephards who would look after their welfare. This to me did not spell freedom, the Swaraj, for which I had fought and for which the people of this country fought.

As a way out of the faults and failures of the party system, I toyed for some time with the idea of a co-operative, rather than a competitive, system of parties. I realised, however, that in the first place, the experiment could not succeed within the given framework of struggle for power and the system of parliamentary democracy, except for limited purposes and limited periods. I still believe, however, that given the psychological climate for it, such a political experiment might yet be made. But for that the frame of reference will have to be changed from parliamentary democracy to something different. Be that as it may, my disenchantment with the party system kept on urging me to seek a better substitute for it. Gandhiji's non-partisan constructive approach towards people's self-rule seemed to offer one hopeful line of exploration.)

'राज्य' संकल्पनेच्या मर्यादा

पक्ष हे राजसत्ता प्रस्थापित करण्याचे, शासनाच्या गठनाचे माध्यम असले तर राज्य हे राजसत्तेच्या, शासनाच्या प्रत्यक्ष आविष्काराचे, व्यवहाराचे, विनियमयाचे माध्यम आहे. आधुनिक राजकीय संरचनेत 'राज्य' या संकल्पनेच्या मर्यादाही ठळठळीतपणे स्पष्ट होतात.

राज्य ही एक एखाद्या प्रचंड प्रस्तराप्रमाणे वाढलेली व लोकांकडून पूर्ण आज्ञांकिततेची अपेक्षा करणारी यंत्रणा बनली आहे. नागरिकाच्या प्रत्येक जीवनांगावर ताबा मिळविण्याचा प्रयत्न करणारी संस्था असे तिचे स्वरूप आहे. या संदर्भात दोन महनीय विचारवंतांनी 'राज्याच्या' कार्याबद्दल मांडलेली मते पहाणे उद्‌बोधक ठरेल.

डॉ. पिटिरिम सोरोकिनने मत व्यक्त केले आहे ---

'.... पण भूतकाळातील चांगली राज्ये आणि विशेषत: वर्तमानातील राज्ये ही सर्व संस्थांमध्ये अधिक स्वार्थी, दुष्ट आणि मॅकियावेलीने[२] 'पुरस्कारिलेल्या राज्य

कल्पनेसारखी धूर्त व विधिनिषेधशून्य असतात. राज्य हे अत्यंत परिणामकारक असे सत्तायंत्र असल्यामुळे सर्वप्रथम स्वत:च्या हितसंबंधांना विरोध करणाऱ्या सर्व गटांशी संरक्षक आणि आक्रमक अशा दोन्ही प्रकारचे युद्ध आरंभण्यासाठीच जणू त्यांची निर्मिती झालेली असते. सार्वभौम सत्तायंत्र असल्याने सत्तेचा अनुभव घेण्याच्या हव्यासामध्ये ते कधीच मागे नसते. त्यामुळेच केवळ स्वत:च्या अस्तित्वाच्या समर्थनार्थ उघडे नागडे सत्तावादी राजकारण ते टाळू शकत नाही. स्वाभाविकच त्याची धोरणे, याच कारणाने सामान्य व्यक्तीला लागू असलेल्या नैतिक प्रमाणांपासून मुक्त असतात. बऱ्याचदा गुलामी अथवा दास्य प्रस्थापित करणारे असे अत्यंत अन्याय्य व नैतिकतेच्या दृष्टीने न टिकणारे असे कायदे त्याने केलेले असतात व ते कायदे मोडणाऱ्या सर्वांचे दमन करण्यासाठी हाताशी सैन्य, आणि नाविकदल, पोलिसदल, फाशीची सजा, आणि गोळीबाराची पथके, तुरुंग आणि छळछावण्या अशा सर्व साधनांमुळे ती एक अत्यंत जुलमी यंत्रणा ठरते आणि मग ती अटळपणाने बेपर्वा, क्रूर, जुलमी आणि दुष्ट आणि कधीकधी भ्रष्टही होते. हजारो, कधीकधी लक्षावधी लोकांना ठार करण्याचे वा त्यांना, दुसऱ्यांना ठार करण्याचे आदेश देणारे असे हे सत्तायंत्र आहे. नि:स्वार्थ बुद्धीच्या, अन्याय्य कायद्याला विरोध करून तो मोडणाऱ्या संतप्रवृत्तीच्या हुतात्म्यांसकट सर्वांना बंदिवासात टाकणारे, फाशीवर चढवणारे असे हे सत्तायंत्र आहे. तिच्या सार्वभौमत्वामुळे व सत्तेमुळे प्रशंसनीय ठरलेली, क्वचित गौरवली गेलेली अशी राजसत्ता अप्रतिहतपणे रक्तपिपासू व अमानुष असा अंतर्गत आणि बाह्य संघर्ष निर्माण करीत असते. सर्व सामाजिक संस्थांमध्ये अधिक लढाऊ व सत्तामद चढलेली अशी ही एक संस्था आहे. सार्वभौम राज्ये, विशेषत: मोठाली साम्राज्ये व त्यांची शासने यांनी यादवी युद्धांत व आंतरराष्ट्रीय युद्धांत इतर कोणत्याही सामाजिक संस्थेपेक्षा अधिक माणसे मारली आहेत. जोपर्यंत मॅक्रियावेलीने पुरस्कारलेल्या नमुन्याची अत्यंत दुष्ट, धूर्त, सत्तामद चढलेली अशी सार्वभौम राज्ये राहतील - अगदी त्याच प्रकारचे एक जागतिक राज्य राहिले तरी - तोपर्यंत निरंतर शांतता कधी शक्य होणार नाही.'

(But even the good states of the past, and especially those of the present, are among the most egoistic, cynical and Machiavellian of all institutions. Being the power machine par excellence, the State is designed first of all for defensive and offensive warfare with all the groups whose interests conflict with its own. Being a sovereign power machine, it cannot fail to experience the lust of power. For the same reason its policies cannot avoid the naked power politics of the *raison d'etat,* unrestrained by any of the ethical norms obligatory for private conduct. As coercive apparatus [having at its disposal the army and navy, the police force, gallows, firing squads, prisons and concentration camps] in relation to

all who violate its official laws which are often unjust and ethically untenable [like the laws establishing slavery and serfdom or decreeing mass extermination of its opponents] the state inevitably becomes callous, cruel, tyrannical and cynical and now and then corrupt. Ordering thousands or even millions to kill or to be killed, imprisoning or executing all kinds of violaters [including saintly martyrs and altruistic opponents of its unjust laws], eulogized and perhaps glorified in its sovereignty and power, the state has been the most militant and power-drunk of all the social institutions incessantly generating internal and international conflicts in their bloodiest and most inhuman forms. The sovereign states, especially the big empires and their governments, have probably slain more people, in their international and civil wars, than any other social institution. As long as cynical, Machiavellian, power-drunk sovereign states remain, even a single world state of the same cynical type, no durable peace is possible.)

*The Inadequacy of The State Idea*या ग्रंथात आदरणीय श्री. अरविंदांनी म्हटले आहे -----

'शेवटी ही राज्य कल्पना आहे तरी काय? जिच्यापुढे व्यक्तीला समर्पण करावे लागतेच अशी संघटित जमातीची ही कल्पना काय आहे? तत्त्वत: सर्वांच्या हितासाठी व्यक्तीला दुय्यम स्थान देणे ही येथे अपेक्षा असते. पण व्यवहारात मात्र सामूहिक अशा राजकीय, सैनिकी, आर्थिक अहंकारासमोर व्यक्तीला गौणत्व देणे असेच तिचे स्वरूप आहे. वस्तुत: संपूर्ण समाजाचे प्रतिनिधित्व करणे ज्यांच्याकडून अपेक्षित आहे अशा लहान मोठ्या संख्येच्या सत्ताधारी गटाने ठरविलेल्या आणि व्यक्तींच्या फार मोठ्या समुदायावर लादलेल्या, काही सामूहिक उद्दिष्टांची आणि आकांक्षांची परिपूर्ती करण्याचा प्रयत्न, हा सामूहिक अहंकार करीत असतो.....

.....दोन्हीपैकी कोणत्याही प्रकारे पाहिले तरी हा सत्ताधारी वर्ग वा सत्ताधारी संस्था ही राष्ट्राचे सर्वोत्तम मन अथवा उदात्ततम हेतू अथवा उच्चतम अंत:प्रवृत्ती यांचे प्रतिनिधित्व करते याची हमी नाही.....

.....अशाप्रकारे कोणतीच गोष्ट जगाच्या कुठल्याही भागातील आधुनिक राजकारणी माणसाबद्दल आज ठामपणे मांडता येणार नाही. असा कोणताही राजकारणी माणूस समाजाच्या आत्म्याचे अथवा त्याच्या आकांक्षांचे प्रतिनिधित्व करीत नाही. त्याच्यामध्ये असलेला सर्वसामान्य क्षुद्रपणा, स्वार्थीपणा, अहंकार, आत्मवंचना या गोष्टीच सर्वसाधारणपणे अधिक प्रमाणात तो प्रदर्शित करतो. या गोष्टी पुरेशा व्यक्त करतानाच तो मानसिक क्षमतेचा अभाव, नैतिक सांकेतिकता, भीरुता आणि दांभिकपणा याही

गोष्टी प्रदर्शित करतो. अनेकदा महान समस्या त्याच्यापुढे निर्णयासाठी येतात पण तो मात्र आवश्यक त्या महानतेने त्यांना सामोरा जात नाही.

तरीही अशाच मनांकडून सर्वांचे हित निश्चित करावे लागते. अशाच हातांमध्ये ते सोपवावे लागते. स्वत:ला राज्य म्हणवणाऱ्या या यंत्रणेकडेच व्यक्तीला आपल्या सर्व क्रियाकर्तव्यांबाबतची हुकमत सोपवावी लागते. खरे पहाता मोठ्यातले मोठे असे सर्वांचे हित साधले जाते असे कोणत्याही प्रकारे होतच नाही, तर खऱ्या अर्थाने प्रगती म्हणता येईल असे फारच थोडे या सर्व संघटित घोटाळ्यांमध्ये आणि अशुभाच्या प्रभावामध्ये साधले जाते आणि तेवढे तरी साधले जाते याचेही कारण शेवटी निसर्ग हा सर्व अडथळ्यांमधून पुढे जातच असतो आणि माणसाच्या मनोवृत्ती अपूर्ण असूनही स्वत:च्या साधनांनी स्वत:चा हेतू निसर्ग साध्य करून घेतच असतो.

संघटित राज्य हे राष्ट्राचे सर्वोत्तम मनही नसते वा समाजाच्या सामूहिक ऊर्जेचा तो साठाही नसतो. वर्तमानाच्या दृष्टीने सर्वोत्तम आणि भविष्यासाठी विकसनशील ठरू शकणाऱ्या अशा महत्त्वाच्या अल्पसंख्येच्या विचारशील मनाला आणि क्रियाशील ऊर्जेला राज्याच्या संघटित कृतीतून वगळले जाते अथवा तिला अवाजवी रीतीने हतबल केले जाते.

समाजात अंगभूत असे जे सर्वात्तम गुणविशेष असू शकतात त्यापेक्षा कितीतरी निकृष्ट, दर्जाचा असा 'सामूहिक अहंकार' असे या 'राज्य' या घटिताचे स्वरूप आहे.

पण राज्य ही अशी एक अपार शक्ती असलेली वस्तू आहे की जिला अंतर्गत विधिनिषेध वा बाह्य बंधनांमुळे बाधा येत नाही. तिला आत्मा नाही, असलाच तर अगदी प्राथमिक स्वरूपाचा ! ती एक सैनिकी, राजकीय शक्ती आहे. ती बौद्धिक आणि नैतिक वस्तू असेलच तर ती अत्यंत अल्प प्रमाणातील व अविकसित स्वरूपातील आहे आणि दुर्दैवाने, अशा स्वत:च्या अविकसित बुद्धीचा ती जर वापर करीत असेलच तर तो केवळ कपोलकल्पित गोष्टी, घोषवाक्ये व अलिकडच्या काळात राज्यविषयक तत्त्वप्रणाली यांच्या साह्याने स्वत:ची आधीच कुपोषित असलेली सदसद्विवेकबुद्धी बोथट करण्यासाठीच करते.

संघटित राज्य यंत्रणेचे हे प्रभुत्व आणि सर्वंकष कृती हे मानवी प्रगतीचे सर्वोत्तम साधन आहे, हा राज्य कल्पनेचा दुसरा दावाही अतिशयोक्त आणि कपोलकल्पित आहे. मनुष्य हा समाजात रहातो. व्यक्तिगतरीत्या आणि सामूहिक रीतीने स्वत:चा विकास करण्यासाठी त्याला समाजाची गरज असते. पण राज्यप्रणीत कृती ही व्यक्तीचा परिपूर्ण विकास साधण्यासाठी त्याचप्रमाणे समूहाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी खरोखरच सर्वात समर्थ असते का? हे खरे नाही. समूहामध्ये व्यक्तीच्या सहकारी कृतीला सर्व आवश्यक त्या सुविधा पुरविणे आणि एरव्ही तिच्या कार्यामध्ये व्यत्यय आणणाऱ्या उणिवा व अडथळे दूर करणे येवढेच केवळ राज्यसंस्थेला शक्य आहे. इतकेच

फक्त सत्य आहे. येथेच राज्याची खरी उपयुक्तता संपते. मानवी सहकार्याच्या अंगभूत शक्यतांची दखल न घेणे हा इंग्लिश व्यक्तिवादाचा उणेपणा होता आणि राज्याच्या कठोर हुकमतीसाठी सबब म्हणून सहकारी कृतीच्या उपयुक्ततेचे रूपांतर करणे हा ट्युटॉनिक[३] सामूहिकतेच्या कल्पनेचा अधुपणा होता.

..... कारण राज्य हा सेंद्रिय जीव नाही तर ती यंत्रणा आहे आणि ती कौशल्य, अभिरुची, ऋजुता अथवा अंत:प्रेरणा नसलेल्या एखाद्या यंत्राप्रमाणेच कार्य करीत असते. ती काही घडविण्याचा प्रयत्न करते. या उलट या जगातील मानवतेचे उद्दिष्ट मात्र वृद्धींगत होणे आणि निर्माण करणे हे आहे.

.... राज्य हे नेहमीच समरूपतेकडे झुकते कारण समरूपता त्याला सहज साध्य असते आणि नैसर्गिक विविधता ही त्याच्या मूलत: यांत्रिक स्वरूपात बसत नाही. पण समरुपता हा मृत्यू आहे. जीवन नव्हे !'

(What, after all, is this 'State' idea of organised community to which the individual has to be immolated ? Theoretically, it is the subordination of the individual to the good of all, that is demanded; practically, it is his subordination to a collective egoism, political, military, economic, which seeks to satisfy certain collective aims and ambitions shaped and imposed on the great mass of the individuals by a smaller or larger number of ruling persons who are supposed in some way to represent the community.....

.... In either case there is no guarantee that this ruling class or ruling body represents the best mind of the nation or its noblest aims or its highest instincts.....

.....Nothing of the kind can be asserted of the modern politician in any part of the world; he does not represent the soul of a people or its aspirations. What he does usually represent is, above all, the average pettiness, selfishness, egoism, self-deception that is about him and these he represents well enough as well as a great deal of mental incompetence and moral conventionality, timidity, and pretence. Great issues often come to him for decisions, but he does not deal with them greatly.

Yet it is by such minds that the good of all has to be decided, to such hands that it has to be entrusted, to such an agency calling itself the State that the individual is being more and more called upon to give up governance of his activities. As a matter of fact, it is in no way largest good of all that is thus secured, but a great deal of organised

blundering and evil with a certain amount of good which makes for real progress, because nature moves forward, always in the midst of all stumblings and secures her aims in the end more often in spite of man's imperfect mentality than by its means.

The organised State is neither the best mind of the nation nor is it even the sum of the communal energies. It leaves out of its organised action and supresses or unduly depresses the working force and thinking mind of important minorities, often of those which represent that which is best in the present and that which is developing for the future. It is a collective egoism much inferior to the best of which the community is capable.

But the State is an entity, which with the greatest amount of power, is the least hampered by internal scruples or external checks. It has no soul or only a rudimentary one. It is a military, political and economic force; but it is only in slight and undeveloped degree, if at all, an intellectual and ethical being. And unfortunately the chief use it makes of its undeveloped intellect is to blunt by fictions, catchwords and recently by State philosophies, its ill-developed ethical conscience.

The second claim of the State idea that this supremacy and universal activity of the organised State machine is the best means of human progress, is also an exaggeration and a fiction. Man lives by the community; he needs it to develop himself individually as well as collectively. But is it true that a State-governed action is the most capable of developing the individual perfectly as well as of serving the common ends of the community ? It is not true. What is true is that it is capable of providing the co-operative action of the individuals in the community with all necessary conveniences and of removing from it disabilities and obstacles which would otherwise interfere with its working. Here the real utility of the State ceases. The non-recognition of the possibilities of human co-operation was the weakness of English individualism; the turning of a utility for co-operative action into an excuse for rigid control by the State is the weakness of the Teutonic idea of collectivism.....

..... For the State is not an organism; it is a machinary, and it works like a machine, without tact, taste, or intuition. It tries to manufacture,

but what humanity is here to do, is to grow and create.....

..... The State tends always to uniformity, because uniformity is easy to it and natural variation is impossible to its essentially mechanical nature; but uniformity is death - not life.)

गैरसमजांचा निरास व्हावा

वर सविस्तरपणे चर्चिलेल्या घटनात्मक आणि तद्जन्य कायद्याच्या व्यवस्थेतील विविध अंगांमधील पश्चिमी संकल्पनांच्या मर्यादा लक्षात घेतल्या तर सर्वसाधारण भारतीय मनांत त्यांच्याविषयी असलेल्या गैरवाज़वी समजांचा निरास होईल व त्यांतील अनेक संदर्भांविरून योग्य त्या धारणा निर्माण होतील. मग हे लक्षात येईल की नुकत्याच स्वतंत्र झालेल्या भारतासाठी, अनेकविध अंगभूत मर्यादा असलेल्या पश्चिमी विचारव्यूहाच्या प्रभावातून निर्माण केलेली भारतीय घटना ही स्वाभाविकपणेच आपल्या प्राचीन समाजाच्या परंपरेची जाण नसलेली, वर्तमान वास्तवाचे भान नसलेली, आणि भविष्यातील राष्ट्रीय आकांक्षा साकार करण्याच्या दृष्टीने निरुपयोगी ठरलेली अशीच होती. आपल्या नेत्यांनी विविध देशांच्या घटनांच्या नमुन्यांचा वापर करण्याच्या दृष्टीने विवेक दाखविला नाही. आपली घटना म्हणजे इतर काही देशांकडून घेतलेल्या शोभेच्या गोष्टींसह वेस्टमिन्स्टर नमुन्याचीच नक्कल आहे. पण त्याहीपेक्षा अनिष्ट गोष्ट म्हणजे घटनेच्या प्रश्नासंबंधी – राज्यरचना, प्रतिनिधित्व, न्यायव्यवस्था, प्रशासन इ. संबंधी – आपला स्वतःचा असा काही परंपराभूत दृष्टिकोण आहे हेच आपण पूर्णपणे विसरलो.

संविधानात भारतीय सत्त्व व प्रतिभा यांचे प्रतिबिंब नाही

प्रा. श्रीनिवासन यांच्या मते, घटना समितीतील सर्व चर्चेवरून, घटनेच्या पायाभूत चौकटीमध्ये भारतीय सांस्कृतिक अनुभवसंचिताचे सत्त्व व प्रतिभा यांचे प्रतिबिंब उमटलेले नाही याबद्दलची अनेक सदस्यांच्या मनातील निराशा आणि खंत व्यक्त होते. एका सदस्याने उद्वेगाने म्हटले की –

'पॅरिस येथे नुकतेच, युनोच्या सर्वसाधारण सभेला संबोधित करताना श्रीमती विजयालक्ष्मी पंडित यांनी मोठ्या आत्मप्रौढीने म्हटले की भारतामध्ये आम्ही स्वातंत्र्य, समता, व बंधुता यांची घोषणा फ्रान्सकडून उसनी आणली. आम्ही इंग्लंडकडून हे घेतले आणि अमेरिकेकडून ते घेतले. पण आम्हाला ज्याचा गर्व आहे त्या आमच्या प्रदीर्घ आणि बहुरंगी अशा इतिहासापासून, आमच्या स्वतःच्या राजकीय आणि ऐतिहासिक भूतकाळाकडून आम्ही काय घेतले हे मात्र त्यांनी सांगितले नाही.'

(The other day Shrimati Vijayalakshmi, while addressing the United Nations General Assembly in Paris observed with pride that we in India

have borrowed from France their slogan of liberty, equality and fratenity; we have taken this from England and that from America; but she did not say what we have borrowed from our political and historic past, from our long and chequered history of which we are so proud.....)

आमचे बुद्धिमंत हे अँग्लो–सॅक्सन संस्थांना इतके सरावले आहेत की त्यांना त्या बाहेरचे जग दिसतच नाही.

'इंडियन पोलिटिकल सायन्स असोसिएशन' चे अध्यक्ष प्रा. बी. आर. शर्मा यांनी १९५३ मध्ये त्यांच्या अध्यक्षीय भाषणात म्हटले आहे –

'भारताने पश्चिमेचा सहप्रवासी होण्याचा मार्ग निवडला आहे आणि त्याला आपल्या निरीश्वरवादी धर्मनिरपेक्षतेचा आणि संसदीय लोकशाहीच्या लवाजम्याचा गर्व आहे ..... (पण) नवी घटना सत्याच्या तत्त्वाने अनुप्राणित झालेली नाही ही फार दु:खाची बाब आहे.'

(India has chosen to be camp follower of the West and is taking pride in its godless secularism and the paraphernalia of parliamentary democracy ---- It is a matter of great sorrow that the new constitution does not breathe the principles of truth----)

भारतीय सामाजिक – राजकीय व्यवस्थांबद्दल अज्ञान वा अविश्वास

पण मुख्य समस्या ही होती की आमच्या घटनेच्या रचनाकारांपैकी बहुतेकजण भारतीय सामाजिक आणि राजकीय व्यवस्थात्मक चौकटीबाबत अज्ञानी तरी होते अथवा त्यांना तिच्याबद्दल श्रद्धा तरी नव्हती. आमच्या घटनेच्या एका शिल्पकाराने तर हे घोषित केले की –

'खेडेगाव म्हणजे काय, तर कूपमंडुकताच ! ती अज्ञानाची, संकुचित वृत्तीची आणि जातीयतेची गुहाच नव्हे काय? प्रस्तावित घटनेने खेडे हा घटक त्याज्य मानला आणि व्यक्ती हा घटक मूलभूत मानला याचा मला आनंद आहे.'

(What is the village but a sink of localism, a den of ignorance, narrow - mindedness and communalism ? I am glad that the Draft Constitution has discarded the village and adopted the individual as its unit.)

त्यामुळेच हे आश्चर्य नाही की अशा प्रकारच्या परभृत मनांना गांधीजींच्या ग्रामराज्य संकल्पनेचा अंतर्भाव घटनेत करण्याचे विस्मरण झाले.

आणि जेव्हा डिसेंबर १९४७ मध्ये गांधीजींच्या नजरेला आणून देण्यात आले की प्रस्तावित घटनेमध्ये ग्रामपंचायती आणि विकेंद्रीकरण यांचा उल्लेखही नाही तेव्हा गांधींनी जाहीर केले की ही नक्कीच चुकवाचुकवी आहे आणि जर स्वातंत्र्यामध्ये लोकांचा आवाज ऐकला जाणे आवश्यक असेल तर ताबडतोब याबाबत कृती

केली पाहिजे असा इशारा दिला. पंचायतींना जेवढे अधिकार अधिक तेवढे लोकांच्या अधिक हिताचे होईल.

शेवटी एक नवीन कलम प्रस्तावित घटनेमध्ये घालण्यात आले की राज्यशासन ग्राम पंचायत प्रस्थापित करण्यासाठी पावले उचलील. या तरतुदीला शेवटी, 'घटनेतील शासकीय मार्गदर्शक तत्त्वे' या विभागात जागा मिळाली. हा विभाग म्हणजे अतिसामान्य प्रमेयांची एक जुडीच आहे व तिच्याकडे गंभीरपणे कोणीच पहात नाही.

हे निरपवाद सत्य आहे की घटनेमध्ये भारतीय मानस – भारतीय परंपरा, प्रवृत्ती आणि संस्कृती प्रतिबिंबित झालेली नाही. या भूमीचा तो उन्मेष नव्हता, केवळ बाहेरून केलेले कलम होते.

या संदर्भात श्री. कोटेश्वर राव या घटना–तज्ञाचे प्रदीर्घ भाष्य विचार करायला लावणारे आहे. –

'आपली घटना ही भारतीयही नाही वा गांधीवादीही नाही, ती लोकांची घटनाच नाही. ती अकारण गुंतागुंतीची व संभ्रम निर्माण करणारी आहे. आणि तिच्या अनेकविध तरतुदी राष्ट्राचे मानस आणि लोकांची प्रतिभा व्यक्त करण्याच्या दृष्टीने अगदीच निरुपयोगी आहेत. ती जुनाट कालबाह्य ठरली आहे. घटना निर्मितीसाठी आवश्यक सामग्री ही या भूमीतून आलेली नाही. आपल्या प्राचीन सुजाणतेतून कोणतीही प्रेरणा घेतलेली नाही. सामान्य माणसाच्या गरजा आणि आकांक्षा केवळ शब्दबंबाळ सवंगतेने आणि पोकळ प्रमेयांनी भरलेल्या आहेत आणि त्या साकार होण्याच्या दृष्टीने कोणतीही यंत्रणा निर्माण केलेली नाही. घटनेच्या जडणघडणीमध्ये समाजाचा सहभाग नव्हता. आमच्याकडील परिस्थितीचा संदर्भ न घेता, राजकीय, आर्थिक व सामाजिक विचारप्रणालीसंबंधीच्या सर्व पश्चिमी कल्पना आयात केल्या गेल्या आहेत. अग्रक्रमाच्या जाणिवेचा येथे अभाव दिसतो. घटनेच्या अनेक भागांच्या पुनर्मांडणीची, पुष्कळ भाग वगळण्याची, आणि अनेक नव्या तरतुदींचा समावेश करण्याची आवश्यकता आहे. म्हणून अशी निकडीची वेळ आली आहे की आपण परिस्थितीचा वास्तवतेने आढावा घ्यावा व आहे त्या घटनेच्या जागी एतद्देशीय, समाजवादी, खऱ्या अर्थाने लोकाशाहीवादी घटनेची प्रस्थापना करून धीटपणे आहे ती घटना समूळ रद्द करावी.'

(Our constitution is neither Indian nor Gandhian. It is not the people's constitution. It is unduly perplexed, confusing and inconsistent to reflect the nation's ethos and the people's genius in its provisions. It has become outmoded. The raw material for making the constitution is not drawn from the native soil. The inspiration is not taken from the ancient wisdom. The needs and the aspirations of the common man are couched only in rhetorical platitudes and propositions without creating any machinery for realisation. There was no people' participation in framing the

constitution. The western concepts of political, economic, and social idealogies are imported, without relevance to the indigenous conditions. It lacks a proper sense of priorities. It needs revision in many parts, deletions of many portions and incorporation of many new provisions. Hence it is high time to take stock of things realistically and boldly repeal the constitution, lock stock and barrel, by replacing it by the native socialistic, genuinely democratic constitution.)

लोकनायक जयप्रकाश नारायणांचे तर असे मत होते की –

'लोकांच्या उदासीनतेचा फायदा घेऊन राज्यकर्त्यांनी आराखडा बनविला आहे. तो अत्यंत असमाधानकारक दस्तऐवज आहे. हा दस्तऐवज आपल्या राष्ट्रीय जीवनाचा पाया ठरला तर ती एक अतिशय दुर्दैवी बाब ठरेल. ही प्रस्तावित घटना लोकांच्या स्वातंत्र्याची हमी देऊ शकणार नाही. आहे त्या स्वरूपातील घटना म्हणजे परिवर्तनविरोधी शक्तींना संरक्षण आणि लोकशाहीला अडथळा ठरेल. भारताच्या पूर्ण स्वातंत्र्यासाठी आणि लोकशाहीतील वाटचालीसाठी प्रस्तावित घटनेमध्ये फार मोठा बदल केला पाहिजे.

पण ज्या रीतीने घटनासमितीचे गठण झाले त्यावरून ही समिती घटनेच्या प्रस्तावित आराखड्यात काही फार क्रांतिकारक बदल करेल अशी सुतराम शक्यता नाही. केवळ संस्थानी जनतेसकट देशातील सर्व जनतेने निवडून दिलेली नवी पुनर्रचित घटनासमितीच हे करू शकेल. आणि कदाचित त्याचवेळी सर्वसामान्य जनताही घटनेच्या निर्मितिप्रक्रियेत परिणामकारक रस घेऊ शकेल.'

(--- taking advantage of the people's indifference, the rulers of the country have got a draft constitution prepared; that is a most unsatisfactory document. It would be a tragedy for India if this document became the foundation of our national life. This draft constitution would neigther guarantee the freedom of the people nor make social change possible. The constitution in its present form would be a bulwark of conservatism and a powerful hindrance to full democracy.

The draft constitution must be radically changed if India is to march towards full freedom and democracy. There is little chance, however, that the Constituent Assembly, as it is constituted today, will make any drastic change in the Draft Constitution. Only a new Constituent Assembly, freshly and directly elected by the whole people including the people of the states, can do so. Only then perhaps would the people begin to take genuine interest in constitution making.)

अशा प्रकारची परिस्थिती असूनही स्वातंत्र्यानंतरच्या आमच्या नेतृत्वाचा दावा होता की आपण परंपरेचे योग्य भान ठेवले आहे. म्हणूनच –

'जरी प्राचीन व्यवस्था (न्यायव्यवस्था) स्वाभाविकपणे विकसित होऊ दिली असती तरी आज आपण अवलंबित आहोत त्यापेक्षा काही वेगळे स्वरूप तिने धारण केले असते असे नाही.'

(Had the system (of law) been allowed to develop normally, it would have assumed a form not different from the one we follow today.)

अशा प्रकारचे चुकीचे विधान भारतीय विधि आयोगाच्या (Indian Law Commission) १४व्या अहवालात अगदी ठामपणाने केलेले आढळते.

ते विधान भारतीय व्यवस्थेच्या प्रत्यक्ष ज्ञानातून आलेले नसून केवळ अज्ञानाच्या बळावर ते केलेले होते. आधुनिक भारतीय कायदा हा मूलस्त्रोताच्या दृष्टीने आणि दृष्टिकोणाच्या अनुषंगाने निरपवादपणे भारतीय आहे असे म्हणण्याची त्या काळात टूम होती. पण ते चूक होते. अशा विधानांनी राज्यकर्त्यांचा राजकीय हितसंबंध साधला जात होता. पण हे विधान वस्तुस्थितीला धरून नव्हते.

संविधानाच्या अपुरेपणाची प्रारंभापासूनच जाणीव

खरे म्हणजे प्रारंभापासूनच हे स्पष्ट होते की, आहे त्या स्वरूपातही संविधान हे अपुरे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय घटनेचे प्रमुख शिल्पकार म्हणणे हे तर योग्यच आहे. पण हे लक्षणीय आहे की स्वतः डॉ. बाबासाहेबसुद्धा त्यांच्या हरक्युलससारख्या या प्रचंड परिश्रमाच्या अंतिम फलिताबद्दल समाधानी नव्हते. ही घटना त्यांचा दृष्टिकोण पूर्णतः व अचूकपणे व्यक्त करते असे नाही. नंतरच्या काळात त्यांनी तक्रार केली की प्रस्तावित घटना, ही संपूर्णतः त्यांच्या इच्छेप्रमाणे नव्हती पण त्यांना लोकशाही तत्त्वाप्रमाणे घटनासमितीतील अनेक घटकांच्या दृष्टिकोणांना घटनेत जागा द्यावी लागली होती. स्वतःच्या मतांशी विसंगत वा क्वचित विरुद्ध दृष्टिकोणांचा समावेशही त्यांना करावा लागला होता. अनेक वेळा तडजोडीचे सूत्रही निर्माण करावे लागले होते.

ही घटना मान्य करावयाच्या जराच आधी घटनासमितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी म्हटले होते की –

'आपल्या घटनेतील काही तरतुदी या किंवा त्या दृष्टीने काहीजणांना आक्षेपार्ह वाटतात. आपण हे मान्यच केले पाहिजे की देशातील परिस्थितीतील आणि एकूणच लोकांमधील अंगभूत दोषांचाच तो परिणाम आहे.'

(Our constitution has provisions in it which appear to some to be objectionable from one point or another. We must admit that the defects are inherent in the situation in the country and people at large.)

आपल्या घटनेतील प्रतिनिधित्वाच्या तरतुदीतील उणिवेबद्दलही त्यांनी प्रतिकूल मत व्यक्त केले आहे. त्यांच्या मते विधानसभेच्या सदस्यांसाठी काही गुणवत्ता असण्याची आवश्यकता होती. ते म्हणतात–

'हे मोठे चमत्कारिक आहे की कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या वा त्या कामात मदत करणाऱ्या लोकांजवळ फार मोठी गुणवत्ता असण्याचा आग्रह आपण धरतो पण प्रत्यक्ष तो कायदा करणाऱ्यांबद्दल मात्र केवळ निवडून येण्याव्यतिरिक्त कोणत्याही गुणवत्तेची अपेक्षा आपण ठेवत नाही. कायदा करणाऱ्यांजवळ वस्तुतः बौद्धिक क्षमता, त्याहीपेक्षा वस्तुस्थितीचे संतुलित निरीक्षण करण्याची कुवत, स्वतंत्र बुद्धीने वागणे आणि जीवनातील मूलभूत गोष्टींशी प्रामाणिक रहाण्यासाठी चारित्र्यसंपन्नता असणे आवश्यक आहे. माणसाच्या नैतिकतेचे मोजमाप करण्याचे साधन निर्माण करणे ही गोष्ट शक्य नाही आणि जोवर हे शक्य नाही तोवर आपली घटना सदोषच रहाणार.'

(It is anamolous that we should insist upon high qualifications for those who administer or help in administering the law, but none for those who make it, except that they are elected. A law - giver requires intellectual equipment, even more than that, the capacity to take a balanced view of things, to act independently and above all to be true to those fundamental things of life, to have character. It is not possible to devise any yard-stick for measuring the moral qualities of man. And so long as that is not possible, our constitution will remain defective.)

आपली घटना भारतीय भाषेत न लिहिल्याबद्दलही ते नाराज होते. दोन्ही बाबतीतील अडचणी या, –

'राजकीय स्वरूपाच्या आणि अनुल्लंघनीय ठरल्या – तरीही त्याबद्दलची व्यथा ही काही कमी जाचणारी ठरत नाही.'

(--political and proved insurmountable. But that does not make the regret any the less poignant.)

इतरही अनेक त्रुटी घटनेमध्ये असल्या तरी प्राधान्याने तीन प्रकारच्या मुद्यांबाबत घटनेतील त्रुटी ठळठळीतपणे जाणवतात.

१) अल्पसंख्यवादाच्या अनुषंगाने झालेला विचार

२) मानवी हक्क विषयक विचार

३) पददलितांच्या हक्करक्षणाबाबतच्या घटनेतील तरतुदी

या तीनही विषयांच्या अनुषंगाने भारतीय सामाजिक स्थितीकडे पाहिले तर काय दिसते ?

टी. के. ऊमेन (T. K. Oommen) यांनी स्पष्ट केल्याप्रमाणे भारतीय संदर्भातील

सामाजिक पर्यावरण हे –

१) जुन्या सामाजिक व्यवस्थेतील टिकून राहिलेली मूल्ये.

२) नव्याने उत्क्रांत होणाऱ्या समाजाची प्राप्तव्य मूल्ये.

३) दोन्हीतील विसंगती अथवा विजोडता.

४) परिवर्तनाचे अथवा व्यवस्था स्थिर करण्याचे माध्यम असलेला कायदा,

या घटकांच्या द्वारा निर्माण झालेले आहे.

(The social milieu in the Indian context is constituted by (a) the persistent values of the old social order (b) the aspired values of the evolving new society, (c) the incongruity or mismatch between these two, and (d) law as a system-stabilising and/or change-promoting instrument in society.)

या परिस्थितीमुळे संविधानात प्रत्यक्षात समाविष्ट नसलेल्या अशा संकल्पनांच्या अनुषंगानेही राजकीय हितसंबंधांमुळे आग्रह धरले जातात व त्यामुळे घटनेतील तरतुदींचाही विपर्यास केला जातो.

अल्पसंख्यवाद

अशाच प्रकारची मर्यादा अल्पसंख्यांच्या हक्कांसंबंधीच्या आग्रहातून उत्पन्न झालेल्या 'अल्पसंख्यवादाच्या' निर्मितीमध्ये दिसून येते.

वस्तुतः डॉ. आंबेडकरांनी निर्देशिले आहे की 'अल्पसंख्य' या शब्दाचा अर्थ संकुचित होण्याची शक्यता असल्याने आणि संस्कृती, भाषा, लिपी यांच्या व्यापक संदर्भातील संरक्षण देण्याचा मूळ हेतू असल्याने घटना परिषदेच्या मसुदा समितीने 'अल्पसंख्य' हा शब्द गाळून टाकला आणि त्या ऐवजी 'नागरिकांचा कोणताही एखादा विभाग' अशा प्रकारचा वाक्प्रयोग केला.

न्य. हिदायतुल्लांनी म्हटले आहे की -

'.....या कलमात वा इतरत्र कोठेही 'अल्पसंख्य' या संज्ञेची व्याख्या आलेली नाही----- घटनाकारांना याची जाणीव होती की अल्पसंख्यांची व्यापक व्याख्या करणे ही कठीण गोष्ट आहे.'

(The words 'Minority' has not been defined in this Article or elsewhere in the Constitution.... the framers of the Constitution were aware that a comprehensive definition of 'minorities' was difficult to frame.)

पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लगेच दि. २७ ऑगस्ट १९४७ रोजी घटना परिषदेने अल्पसंख्यांसंबंधीच्या मार्गदर्शक समितीचा अहवाल विचारार्थ घेतला. त्यावेळी बी. पोकर या सदस्याने पुढील दुरुस्ती सुचविली.

'मार्गदर्शक समितीच्या अल्पसंख्य, मूलभूत हक्क इ. विषयीच्या अहवालांचा विचार

केल्यानंतर घटनापरिषदेची ही सभा असा प्रस्ताव ठेवते आहे की केंद्रीय आणि प्रांतिक विधिमंडळाच्या सर्व निवडणुका मुसलमानांच्या दृष्टीने विभक्त मतदारसंघाच्या द्वारा घेतल्या जाव्यात.'

(That on consideration of the report of the Advisory Committee on Minorities, Fundamental Rights, etc., this meeting of the Constituent Assembly resolves that all elections to the Central or Provincial Legislatures should, as far as Muslims are concerned be held on the basis of seperate electorates.)

सुदैवाने ही दुरुस्ती फेटाळली गेली.

दुसऱ्या दिवशी म्हणजे २८ ऑगस्ट रोजी मार्गदर्शक समितीचे अध्यक्ष सरदार वल्लभभाई पटेल म्हणाले -

'-----म्हणून या ठरावावर कोणतेही भाष्य करण्याची मला इच्छा नव्हती. मला असे वाटते की, आपण आपल्या मनाची योग्य पारख करणे जरूर आहे. म्हणजे आपण नेमके कुठे उभे आहोत हे आपल्याला समजेल. भारताच्या विभाजनात जिची परिणती झाली ती त्यावेळी अवलंबिलेली प्रक्रिया जर पुन्हा अवलंबायची असेल तर मग मी म्हणेन, ज्यांना तोच प्रकार हवा असेल त्यांना या देशात जागा नाही. - त्यांनी पाकिस्तानात जावे.'

(Therefore, I would not have liked to say anything on this motion. I think it is better that we know our minds so that we understand where we stand. If the process that was adopted, and which resulted in the partition of the country, is to be repeated then I say, 'those who want that kind of thing, have a place in Pakistan, not here.'

नंतर मात्र अल्पसंख्य जमातींकडून या हक्कांचा बिनदिक्कत दुरुपयोग करण्यात आला. त्यामुळे अल्पसंख्यांचे हक्क हा तेव्हा कडोविकडीच्या वादविवादाचा विषय झाला आणि जरी आदर्शवादी मानवतावादी लोक प्रामाणिकपणे समाजाच्या सर्वच घटकांमधील पददलितांच्या दयनीय स्थितीबद्दल सतर्क असले आणि ह्या दृष्टीने विचार करीत असताना पददलितांच्या मतदानाच्या सामर्थ्याचा घटक त्यांच्या मनात नसला तरी व्यवहारकुशल राजकारणी मात्र मजबूत मतपेटी असलेल्या अल्पसंख्य समाजाचे अचानक तारणहार बनले आहेत. त्यामुळेच अल्पसंख्यवादाचा कर्करोग उद्भवला आहे.

अल्पसंख्य जमातींकडून घेतल्या जाणाऱ्या गैरफायद्यासंबंधी न्यायालयांनीही वेळोवेळी इशारा दिला आहे.

अल्पसंख्यांच्या शिक्षणाबद्दल न्या. बेग आणि न्या. द्विवेदी यांनी असे म्हटले आहे की -

'अल्पसंख्यांसाठी सर्व प्रकारची निरपवाद सूट घेण्याचा दावा करणे ही एक प्रकारची भ्रांती आहे.'

(It is illusion for a minority to claim absolute immunity.)

न्या. दास यांनी म्हटले आहे की -

'.....शिवाय कलम २९(१) अथवा कलम ३०(१) मध्ये उल्लेखिलेल्या गटांव्यतिरिक्त वा अल्पसंख्यांव्यतिरिक्त इतर अल्पसंख्य गटांपुरते कलम २९(२) मर्यादित ठेवावे असे आम्हाला वाटत नाही. कारण कोणत्याही अल्पसंख्य गटांत न मोडणाऱ्या नागरिकांनाही अशा इतर अल्पसंख्य गटांत मोडणाऱ्या नागरिकांइतक्याच संरक्षणाची तेवढीच जाणवणारी गरज आहे. त्यामुळे अल्पसंख्य गटांपुरताच हा हक्क मर्यादित करणे म्हणजे अशा गटांना दुहेरी संरक्षण देण्यासारखे होय आणि बहुसंख्यांनीही दिलेल्या करातून जमा होणाऱ्या पैशांतून चालविलेल्या त्यांच्याही काही विशेष संस्था नसतातच असे गृहीत धरणेही समर्थनीय नाही. अशा प्रकारच्या भेदभावासाठी आम्हाला कोणतेही सयुक्तिक कारण दिसत नाही.'

(.....Nor do we see any reason to limit Article 29(2) to the citizens belonging to a minority group other than the sections or the minorities referred to in Article 29(1) or Article 30(1), for the citizens who do not belong to any minority group may quite conceivably need this protection just as much as citizens of such other minority groups. To limit this right only to citizens belonging to minority groups will be to provide a double protection for such citizens and to hold that the citizens of the majority group have no special educational institutions for the maintenance of which they make contributions by way of taxes, is not justifiable. We see no cogent reason for such discrimination.)

आणखी एका प्रकरणी न्या. बेग यांनी म्हटले आहे -

'घटनेने अल्पसंख्यांच्या शिक्षणसंस्थांना दिलेल्या काही हक्कांवरच्या आक्रमणाविरुद्ध ढाल म्हणून आणि त्यांच्याविषयी भेदभाव होऊ नये यादृष्टीने मूलभूत हक्क म्हणून कलम ३१(१) हे घटनेत घातलेले आहे. मात्र हे कलम, त्याचे फायदे तर घ्यायचे पण घटनासिद्ध कर्तव्ये तर नाकारावयाची अशा पद्धतीने वापरले जाऊ नये. त्याचप्रमाणे इतरांपेक्षा अधिक सवलतीची या लाभदायक अशी असमर्थनीय भेदभावाची वागणूक अल्पसंख्य संस्थांना दिली जावी यासाठी एक हत्यार या रीतीनेही ते वापरले जाऊ नये.'

(Article 30(1) which was meant to serve as shield of minority educational institutions against the invasion of certain rights protected by it and declared fundamental so that they are not discriminated against,

cannot be converted by them into a weapon to exact unjustifiable, preferential or discriminatory treatment for minority institutions so as to obtain the benefits but to reject the obligations of statutory rights.)

डॉ. आंबेडकरांनी फार-पूर्वी १९३० सालीच म्हटले होते -

'हा देश जाती आणि पंथ यांनी विभागला आहे. आणि त्यामुळे अल्पसंख्यांच्या संरक्षणासाठी पुरेशा तरतुदी हा घटनेचा एक भाग झाल्याशिवाय हा समाज एकात्म, स्वयंशासित होऊ शकणार नाही, या म्हणण्याबद्दल कोणाचीही हरकत असण्याचे कारण नाही. पण अल्पसंख्यांनी हे लक्षात घेतले पाहिजे की आज जरी आपण पंथांमध्ये विभागलेले असलो आणि जातींमध्ये आक्रसलो असलो तरीही आपले ध्येय एकात्म भारत हे आहे. अल्पसंख्यांच्या कोणत्याही मागणीमुळे सहेतुकपणे वा अजाणता या ध्येयाचा बळी जाता कामा नये.'

(To say that this country is divided by castes and creeds, and that it cannot be one united self-governing community unless adequate safeguards for protection of minorities are made a part of constitution, is a position to which there can be no objection. But minorities must bear in mind that although we are today divided by sects, atomized by castes, our ideal is United India. No demand from minority should wittingly or unwittingly, sacrifice this ideal)

४ नोव्हेंबर १९४८ रोजी डॉ. आंबेडकरांनी घटना परिषदेत म्हटले आहे -

'या देशात अल्पसंख्यांनी व बहुसंख्यांनी दोघांनीही चुकीचे मार्ग चोखाळले आहेत. अल्पसंख्यांचे अस्तित्व नाकारणे ही बहुसंख्यांची चूक आहे आणि अल्पसंख्यत्व टिकवून ठेवणे ही अल्पसंख्यांचीही चूक आहे. या संदर्भात दुहेरी हेतू साध्य होईल, अशाप्रकारचा उपाय शोधला पाहिजे. मुळात अल्पसंख्यांचे अस्तित्व मान्य केले गेले पाहिजे. त्याच बरोबर त्याचे स्वरूप असे असले पाहिजे की बहुसंख्य आणि अल्पसंख्य हे एक दिवस एकमेकांत पूर्ण मिसळून जाणे शक्य होईल.'

(In this country both - the minorities and majorities - have followed a wrong path. It is wrong for majority to deny the existence of minorities, it is equally wrong for the minorities to perpetuate themselves. A solution must be found which will serve double purpose. It must recognise the existence of minorities to start with. It must also be such that it will enable majorities and minorities to merge some day into one.)

या संबंधीच्या घटनेतील तरतुदी हा हेतू पराभूत करणाऱ्या तर नाहीत ना? अल्पसंख्य व बहुसंख्य हे द्वंद्व नाहीसे होऊन समाज एकात्म होण्याची ही आदर्श अवस्था केव्हा सिद्ध होईल?

आपल्या देशातील अनेकांना आश्चर्य वाटेल की जागतिक संदर्भात हे साध्य करण्याच्या दृष्टीने अनेक पर्यायी व्यूहांची चर्चा लीग ऑफ नेशन्समध्ये पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर लगेचच झाली होती. त्याकाळी व्यक्त झालेली मते ही त्या काळाइतकीच आजही सयुक्तिक आणि कालसंबद्ध आहेत.

युद्धानंतर युरोपचा नकाशाच पुन्हा आखला गेला व त्यातून अल्पसंख्यांच्या हक्कांचा प्रश्न निर्माण झाला. लीग ऑफ नेशन्सने 'अल्पसंख्यांच्या तहांचे' सूत्र पुढे मांडले. सर ऑस्टिन चेंबरलेनने लीग ऑफ नेशन्सपुढील ९ डिसेंबर १९२५ च्या आपल्या भाषणात, 'ज्या राष्ट्रीय समाजात अल्पसंख्य रहात आहेत त्यामध्ये हळूहळू मिसळून जाण्याची त्यांची तयारी करण्यासाठी त्यांना आवश्यक ते संरक्षण आणि न्याय देणे हा या तहाचा हेतू आहे' हे स्पष्ट केले. हा कणखर आशावाद की केवळ भोळसटपणा होता? लीग ऑफ नेशन्सने अशाप्रकारच्या ज्या धोक्यात काही देशांना टाकले होते तो अतिशय ठसठशीतपणे पॉल फॉशील (Paul Fauchille) यांनी त्याच दिवशीच्या भाषणात स्पष्ट केला.

'हा उपाय बहुदा तितकासा निर्धोक नाही असे दिसते. कारण देशात रहाणाऱ्या सर्व रहिवाशांना समान वागणूक हे राजकीय व सामाजिक शांततेचे तत्त्व आहे. अशावेळी स्वतंत्र गट म्हणून अल्पसंख्यांच्या हक्कांना दिलेली मान्यता ही त्यांना आपली शक्ती वाढविण्यास प्रवृत्त करील व ज्या राज्याचे हे अल्पसंख्य अंग आहेत त्याच्यापासून विभक्त होण्याला त्यांना ती उद्युक्त करील. आणि स्वयंनिर्णयाच्या हक्कांच्या संदर्भात तर अशाप्रकारच्या अल्पसंख्यांच्या हक्कांना मान्यता देणे म्हणजे राज्यांच्या विघटनाचा धोका पत्करणे होय.'

(This is a solution which perhaps is not without certain dangers; for, if equality of treatment to all the inhabitants of a country, is an element of political and social peace, the recognition of rights belonging to minorities as seperate entities, by increasing their own strength, may provoke them to seperate themselves from the state of which they form a part, and in view of the right of peoples to dispose off themselves, the recognition of rights of these minorities runs a risk of leading to the distruption of states.)

हे दोन दृष्टिकोण होते. अभागी झेकोस्लोवाकियाचे अत्यंत दुर्दैवी नशीब पहाता सर ऑस्टिन चेंबरलेनचा आशावाद किती पोकळ होता आणि पॉल फॉशीलची भीती किती खरी होती हे सिद्ध होते. तत्त्वशून्य राजकीय संधिसाधूपणामुळे आमच्या राजकारण्यांनी शहामृगी वृत्ती पत्करली आहे आणि ते काहीही शिकले नाहीत वा चुकीचे काही विसरलेही नाहीत, हे भारतातील अल्पसंख्यवादाचे स्वरूप पहाता लक्षात येते. आणि म्हणून जागृत व प्रबुद्ध अशा लोकमताचे आवश्यक ते दडपण,

आजच्या भारताच्या, चेंबरलेनच्या प्रवृत्तीच्या सत्तापिपासू नेत्यांवर आणणे आवश्यक आहे.

मानवी हक्क संकल्पना

अल्पसंख्यावादाप्रमाणेच मानवी हक्कांच्या अनुषंगाने असलेल्या कायद्याच्या तरतुदींचाही आपल्या देशात कधी शासनाकडून दुरुपयोग होतो वा कधी त्यांची दखलच घेतली जात नाही.

'अल्पसंख्य आयोगा' ऐवजी 'मानवी हक्क आयोग' स्थापन करावा अशी सूचना पू.श्री. बाळासाहेब देवरस यांनी केल्यानंतर मानवी हक्कांच्या प्रश्नांकडे लोकमताचे लक्ष अधिक प्रमाणात वेधले जाऊ लागले. अल्पसंख्य आयोगाचे अध्यक्ष न्या. बेग यांनीही याचप्रकारे मत व्यक्त केले होते.

पूर्वग्रह नसलेल्या अनेक विचारवंतांनी असे मत मांडले आहे की सध्या मानवी हक्क संकल्पनेची दखल केवळ शासनाचा दहशतवाद आणि दडपशाही, पोलिसी अत्याचार, संवेदनशून्य न्यायखाते, हेबियस कॉर्पस कायद्याची परिणामशून्यता, निम-शासकीय यंत्रणांना दिलेले अमर्याद अधिकार, मानवी हक्क भंग करणारा, टाडा कायद्याचा दुरुपयोग आणि एकांतवासाची बेकायदेशीर शिक्षा अशाच बाबतीत घेतली जाते. शासनाकडून होणाऱ्या या मानवी हक्कांच्या उल्लंघनाची चौकशी करण्यासाठी 'मानवी हक्क आयोगा'ची स्थापना करावी अशी मागणी त्यांनी केली आहे. तुरुंगातील छळवादाचे बळी असे कैदी, पोलिसांच्या गुंडांशी झालेल्या झटापटीतील मृत्यू इ. बद्दलच्या सूचना त्यांनी केलेल्या आहेत. त्यांना असेही वाटते की मानवी हक्कांची संकल्पना मानवाच्या संदर्भात होणाऱ्या सर्व प्रकारच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक अन्यायाचा समावेश करण्याएवढी व्यापक केली पाहिजे. त्याचबरोबर त्यांना असेही वाटते की मानवी हक्कांच्या व्याख्येत माणसाचे अन्न, वस्त्र, रोजगार, आरोग्य इ. संबंधीचे हक्क आणि भाषणस्वातंत्र्य, आविष्कार स्वातंत्र्य इ. सारखे सामाजिक व राजकीय हक्क यांचाही समावेश झाला पाहिजे. त्यांनी 'शासकीय गोपनीयतेच्या' कायद्याच्या अविवेकी वापराबद्दलही टीका केली आहे.

व्यक्त झालेली मते काहीवेळा अतिरेकी असतात. बऱ्याचदा मानवी हक्कांसंबंधीची तरफदारी ही बेकायदेशीर व राष्ट्रविरोधी कारवायांवर पडदा टाकण्यासाठी खोडसाळपणेही केली जाते. तरीही राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने जॉन स्ट्युअर्ट मिलचे हे म्हणणे लक्षात घेणे आवश्यक आहे.

'कितीही हितकारी उद्देशांसाठीही का होईना पण लोकांना खुजे बनवून नमविले जाणारे एक हुकुमी साधन आपल्या हाती यावे असे जर शासनाला वाटत असेल तर त्याला असे आढळून येईल की कोणतीही भव्य कामे, अशा खुज्या माणसांकडून खऱ्या अर्थाने कधीही साध्य करून घेता येत नसतात.'

(A state which dwarfs its men in order that they may be more docile instruments in its hands even for the beneficial purposes will find that with small men no great thing can really be accomplished.)

आपल्या सुदैवाने परदेशांत असंलेल्या आपल्या काही मित्रांना मानवी हक्क चळवळीबद्दल संपूर्ण माहिती आहे. येवढेच नाही तर मानवी हक्क आयोगाच्या प्रत्यक्ष कार्यवाहीचाही अनुभव आहे.

भारतातील मुस्लिम समाज आपल्या हक्कांबद्दल आग्रहाने बोलत असतो. पण दक्षिणपूर्व आशिया व्यतिरिक्त बहुतेक सर्व मुस्लिम देशांमध्ये अतिशय बिकट अशा अंतर्गत मानवी समस्या आहेत. मानवी हक्कांच्या तरतुदीने लिंगविषयक भेदाचाही विचार केलेला नाही. या देशांतील शासने याबाबतीत कोणत्याही आंतरराष्ट्रीय यंत्रणांचा हस्तक्षेप सहन करीत नाहीत. ही त्यांची केवळ घरगुती बाब आहे असा त्यांचा दावा असतो.

बिगर-इस्लामी देशांमध्येसुद्धा मुस्लिम समाज हा त्याच्या स्त्रीवर्गाला हक्क बहाल करण्यास तयार नसतो.

मानवी हक्कांचे जागतिक घोषणापत्रक (The Universal Declaration Of Human Rights -) म्हणजे सर्व समाजांसाठी आणि राष्ट्रांसाठी पुढे ठेवलेली समान विहित उद्दिष्टे म्हणून मान्य झालेल्या तत्त्वांचे पत्रक आहे. हा कोणता तह नाही तर सर्व सुसंस्कृत शासनांना विश्वनिर्मात्याच्या परमेश्वरी संहितेचा अवलंब करण्याचा हा आदेश आहे. त्याचबरोबर संपूर्ण मानव जातीला जगभर मानवी हक्कांबद्दलचा आणि मूलभूत स्वातंत्र्याबद्दलचा आदर वाढविण्यासाठी केलेले आवाहन आहे.

भारतीय म्हणून आपल्याला निश्चितच वाटते की जोपर्यंत शक्य आहे तोपर्यंत हा सर्व मामला ठीकच आहे. पण यूनोचे विविध उपाय आणि संपूर्ण संस्थात्मक चौकट असूनसुद्धा, मानवी हक्कांची जपणूक, नागरी स्वायत्तता आणि मूलभूत स्वातंत्र्ये यांची खरी हमी ही सामान्य माणसाच्या सदसद्विवेकबुद्धीच्या पातळीवर आणि आंतरराष्ट्रीय नातेसंबंधांच्या निकोप पायावरील समाजासमाजातील संबंधांवरच अवलंबून आहे.

दुसऱ्याच्या हक्कांसंबंधीच्या जाणिवा जर प्रेम, कदर व आस्था यांच्यावर आधारलेल्या असतील तरच त्यात नैतिकता असू शकते, हे सर्व व्यक्तिगत आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील मानवी हक्कांविषयीच्या जाणिवेबद्दल जॉन क्लिनिग या मानवी हक्कासंबंधीच्या अधिकारी व्यक्तीने व्यक्त केलेले मत मागे * उद्धृत केलेले आहे. त्याप्रमाणे तेथेच, 'मानवी स्वभाव बदलल्याशिवाय संस्थात्मक बदल करणे निरुपयोगी आहे' अशा अर्थाचे प्रसिद्ध इतिहासकार विल् दुरांट यांचे विधान उद्धृत केलेले आहे.

दुर्दैवाने आपल्या देशात मानवी हक्क चळवळ ही डाव्यांच्या आणि काही बाबतीत

---

* पहा - हिंदू दिशावेध. पृ. २३-२४

अराष्ट्रीय घटकांच्या वर्चस्वाखाली आहे. ही परिस्थिती बदलली पाहिजे.

पददलितांचे हक्क रक्षण

डॉ. आंबेडकरांना, अल्पसंख्य, मानवी हक्क यांच्याप्रमाणेच पददलितांचे स्थान या विषयासंबंधीच्या समाजवास्तवातील पारंपरिक विसंगती आणि वर्तमानातील अनवस्था यांची सूक्ष्म जाणीव होती. यासंबंधात त्यांनी केलेले चिंतन व दिलेले सावधानतेचे इशारे हे लक्षणीय आहेत. त्यांच्या मते -

'या देशातील राजकीय सत्ता म्हणजे प्रदीर्घ काळापर्यंत काही थोड्यांची मक्तेदारी बनून राहिली आहे आणि बहुसंख्य लोक हे केवळ ओझीवाहू जनावरेच नव्हेत तर बळीचे बकरेही आहेत. -----पददलितांना वर्ग विग्रहाला वा वर्गयुद्धाला उद्युक्त होऊ देता कामा नये---- (अशी काळजी घेतली जाई) समाजातील वर्गरचना वा उत्पन्नाच्या श्रेणी या पवित्र वा अनुल्लंघनीय मानणे हे अत्यंत अवास्तव व लोकशाहीविरोधी होते. विवेकपूर्ण मानवीसंबंधांना घातक अशाप्रकारचे प्रभाव त्यामुळे गतिमान झाले. संपूर्ण समाजाचे म्हणून कोणत्याही प्रकारचे समान असे हितसंबंध राहिलेच नाहीत. वर्गरचनेमुळे निर्माण होणाऱ्या अलगतेमुळे, व्यावर्तकतेमुळे विशेषाधिकारी वर्गांमध्ये समाजविघातक, टोळक्याची विशेष लाभार्थी प्रवृत्ती निर्माण होते.'

(Political power in this country has too long been the monopoly of a few and the many are not only beasts of burden but also beasts of prey - the down-trodden classes must not be allowed to evolve into a class struggle or a class war--- The recognition of the class structure of society and the income structure of society as sacrosanct, was utterly undermocratic and unrealistic. It set in motion influences which were harmful to rational human relationships. There were no common interests. The isolation and exclusiveness following upon the class structure creates in the privileged classes, anti-social spirit of a gang.)

त्याचप्रमाणे घटनासमितीत १७ नोव्हें. १९४९ रोजी डॉ. आंबेडकरांनी म्हटले आहे -

'राजकीय लोकशाहीला पायाभूत अशी सामाजिक लोकशाही असल्याशिवाय राजकीय लोकशाही टिकू शकत नाही. सामाजिक लोकशाही म्हणजे काय? तर स्वातंत्र्य, समता बंधुता यांना जीवनमूल्ये म्हणून मान्यता देणारी ती जीवनपद्धती आहे. ही तीन तत्त्वे म्हणजे त्रिमूर्तीमधील अलगअलग घटक म्हणून बघितली जाऊ नयेत तर ती तत्त्वे त्रिमूर्तीची एकात्मता सिद्ध करतात. म्हणूनच कोणत्याही एका तत्त्वापासून दुसऱ्याचा विच्छेद म्हणजे लोकशाहीच्या प्रत्यक्ष हेतूचाच पराभव होय.

स्वातंत्र्य हे समतेपासून अलग करता येत नाही. आणि समतेची बंधुतेपासून फारकत करता येत नाही. त्याचप्रमाणे स्वातंत्र्य आणि समता हीही बंधुत्वापासून वेगळी करता येत नाहीत. समतेशिवाय स्वातंत्र्य हे अल्पसंख्यांचे बहुसंख्यांवर वर्चस्व प्रस्थापित करेल. स्वातंत्र्याशिवाय समता ही व्यक्तिगत प्रेरणेला बाधक ठरेल. आणि बंधुतेशिवाय स्वातंत्र्य आणि समता यांचाही स्वाभाविक अवलंब होऊ शकणार नाही.'

(Political democracy cannot last unless there lies at the base of it social democracy. What does social democracy mean ? It means a way of life which recognises liberty, equality and fraternity as principles of life. These principles of liberty, equality and fraternity are not to be treated as seperate items in a trinity. They form a union of trinity in the sense that to divorce one from the other is to defeat the very purpose of democracy. Liberty cannot be divorced from equality, equality cannot be divorced from liberty. Nor can liberty and equality be divorced from fraternity. Without equality, liberty would produce the supremacy of the few over the many. Equality without liberty would kill individual initiative. Without fraternity, liberty and equality could not become a natural course of things.)

असे होण्यातील धोका लक्षात घेऊनच त्यांनी २५ नोव्हेंबर १९४९ रोजी प्रस्तावित घटनेच्या तिसऱ्या वाचनाच्या वेळी झालेल्या चर्चेला उत्तर देताना सावधानतेचा इशारा दिला आहे.

'जानेवारी २६, १९५० रोजी आपण एका फार मोठ्या विसंगतींनी भरलेल्या जीवनात प्रवेश करणार आहोत. राजकीय दृष्ट्या आपल्यात समता असेल. पण सामाजिक जीवनात मात्र विषमता असेल. राजकीय व आर्थिक क्षेत्रांत आपण 'एक व्यक्ती - एक मत' आणि 'एक मत - एक मूल्य' या तत्त्वाला मान्यता देणार आहोत. पण सामाजिक व आर्थिक जीवनात मात्र आपल्या विशिष्ट सामाजिक व आर्थिक रचनेमुळे आपण 'एक व्यक्ती - एक मूल्य' हे तत्त्व नाकारत रहाणार आहोत. किती काळ आपण अशा विसंगतीने भरलेले जीवन जगत रहाणार आहोत ? किती दिवस आपण आपल्या सामाजिक व आर्थिक जीवनात समता नाकारत रहाणार आहोत ? आपण दीर्घकाळ ती नाकारत राहिलो तर आपल्याला आपली राजकीय लोकशाहीच धोक्यात येण्याची किंमत मोजावी लागेल. म्हणून शक्यतो लवकर आपण ही विसंगती काढून टाकली पाहिजे. अन्यथा या घटनासमितीने येवढी सायासपूर्वकतेने उभी केलेली ही राजकीय लोकशाहीची रचना, आजवर विषमतेचे बळी ठरलेल्या लोकांकडूनच उद्ध्वस्त केली जाईल.'

(On the 26th January, 1950, we are going to enter into a life

of contradictions. In politics, we will have equality, and in social and economic life, we will have inequality. In politics, we will be recognising the principle of 'one man and one vote', and 'one vote, one value'. In our social and economic life, we shall, by reason of our social and economic structure, continue to deny the principle of 'one man-one vote'. How long shall we continue to live this life of contradictions ? How long shall we continue to deny equality in our social and economic life ? If we continue to deny it for long, we will do so only by putting our political democracy in peril. We must remove this contradiction at the earliest possible moment, or else those who suffer from inequality, will blow up the structure of political democracy which this Assembly has so laboriously built up.)

कायद्याचा आधार !

डॉ. आंबेडकरांची खात्री होती की---

'----जर 'एक व्यक्ती-एक मूल्य' या लोकशाहीच्या तत्त्वाला जागावयाचे असेल तर समाजाच्या आर्थिक व्यवस्थेच्या रचनेच्या प्रकाराच्या विचाराची मांडणी करणे तितकेच आवश्यक आहे.'

(---it was equally essential to prescribe the shape and the form of economic structure of society, if democracy is to live upto its principle of 'one man-one value'.)

आणि याच दृष्टीने सामाजिक दृष्ट्या पददलितांना स्वत:च्या उन्नतीसाठी सक्षम बनविण्याच्या दृष्टीने आरक्षणाचे अतिशय अभूतपूर्व तत्त्व, आपल्या संविधानात समाविष्ट करण्यात आले आहे. समाजातील विषमस्पर्धेत, या कमकुवत असलेल्या समाजघटकाला योग्य न्याय मिळावा हीच या तरतुदीमागील भूमिका होती.

कायद्याचे फलित

Competing Equalities या आपल्या ग्रंथात गॅलँटरने म्हटले आहे -

'ऐतिहासिक कालापासूनच हक्कांपासून वंचित राहिलेल्या लोकसमुदायाला झुकते माप देणारी भारतीय पद्धती तिच्या व्याप्तीच्या व सीमेच्या दृष्टीने अपूर्वच आहे. जाणीवपूर्वक उभ्या केलेल्या, मौलिक गणल्या गेलेल्या आणि काटेकोरपणे स्पष्ट केलेल्या विषमतेच्या पार्श्वभूमीवर भारताने समता हे मूलभूत मूल्य म्हणून अंगीकारले आहे. पक्क्या झालेल्या स्पर्धात्मक अशा सामूहिक विषमतेच्या जाणिवेपोटीच या विषमतेची भरपाई करण्याचे भारताचे घटनात्मक धोरण सिद्ध झाले आहे. परिणामत:

मी ज्याला साकल्याने नुकसान भरपाईसाठी भेद करण्याचे धोरण म्हणतो, अशा अनेकविध कार्यक्रमांची रचना झाली आहे. कदाचित अपेक्षित तेवढ्या जोमाने व परिणामकारकरीतीने 'नुकसान भरपाईसाठी भेद करण्याचे' हे धोरण राबवले गेले नसेल. पण तळागाळातील समाजघटकांचे हक्क नाकारण्याची कोणत्याही राष्ट्रातील प्रवृत्ती जर लक्षात घेतली तर हे धोरण उल्लेखनीय आग्रहाने आणि उदारपणाने गेल्या ३० वर्षांवर राबवले गेलेले आहे असे म्हणणे मला योग्य वाटते.'

(Indian system of preferential treatment for historically disadvantaged sections of the population is unprecedented in scope and extent. India embraced equality as a cardinal value against background of elaborate, valued and clearly perceived inequalities. Her constitutional policies to off-set these, proceeded from an awareness of entrenched and emulative nature of group inequalities. The result has been an array of programmes that I call, collectively, a policy of compensatory discrimination. If one reflects on the propensity of nations to neglect the claims of those at the bottom, I think it fair to say that this policy of compensatory discrimination has been pursued with remarkable persistence and generousity, if not always with vigour and effectiveness for the past thirty years.)

तरीही कायद्याच्या उपयुक्ततेला मर्यादा

तरीही हे लक्षात घेतले पाहिजे की या व इतर प्रत्येक बाबतीत कायद्याच्या उपयुक्ततेला मर्यादा असतातच. डॉ. शिवरामय्या यांनी म्हटले आहे -

'घटनेच्या १६व्या कलमातील गुणात्मक आणि प्रमाणात्मक अशा समतेच्या संकल्पनांमध्ये संतुलन करायला जाताच काही समस्या निर्माण होतातच व त्या, या दोन्ही निकषांमधील अंगभूत विसंगतीमधून निर्माण होणाऱ्या समस्यांच्या व्यतिरिक्त अशा समस्या असतात. गुणवत्तेच्या तत्त्वावर आधारलेल्या समानसंधीचा हक्क हा व्यक्तीच्या दृष्टीने अनुकूल असतो. तर प्रमाणात्मक संरक्षणातून येणारे भेदभावाचे तत्त्व हे समूहाच्या दृष्टीने अनुकूल ठरते. पहिल्या प्रकारचा हक्क हा न्यायालयाने अंमलात आणावयाचा असतो तर दुसऱ्या प्रकारचा हक्क धोरणात्मक कायद्यावर व कार्यकारी घटकाने केलेल्या अंमलबजावणीवर अवलंबून असतो. पण या एकूणच हक्कांच्या अंमलबजावणीसाठी न्यायव्यवस्था आणि कार्यकारी घटक या राज्यशासनाच्या दोन अंगांवर कमी अधिक भर देण्यामुळे संघर्ष निर्माण होतात.'

(The balance between the meritorious and proportional concept of equality postulated in Article 16 brings in its wake certain problems,

quite apart form the inherent incongruence between them---- The right of equality of opportunity based on the meritorious concept exists in favour of the individual whereas protective discrimination exists in favour of collectivities. The former right is enforced by the courts, the latter is based on the policies of legislatures and their implementation by executives. Conflicts arise out of the varying degrees of emphasis placed on the rights by the judicial and executive organs of the State.)

पुढे ते म्हणतात -

'या अडचणी अधिक गुंतागुंतीच्या होतात कारण मूलभूत कायदाच विसंगतींनी भरलेला आहे. अशा मूलभूत हक्कांविषयीच्या भागातील समतेच्या तरतुदी याच मुळी राज्याच्या धोरणविषयक मार्गदर्शक तत्त्वांपासून भिन्न असतात.'

'अर्थातच या विसंगती काही अंशी साधनसामग्रीच्या कमतरतेमुळेच असतात. त्यामुळे गरिबांमधील कमतरता नाहीशा करून सक्षमतेच्या दृष्टीने त्यांच्यासाठी आवश्यक त्या तरतुदी करण्यामध्ये शासनाला अडचणी येतात व मग मार्गदर्शक तत्त्वे ही गरिबांना केवळ वाकुल्या दाखवित रहातात. काम करण्याचा स्वत:चा हक्क बजावण्याचा कोणताही मार्ग बेराजगारांना उपलब्ध नसतो अथवा कायदाविषयक मोफत मदत मिळण्याची तरतूद नसल्यामुळे कंगालांना न्याय मिळविण्याचा मार्ग रहात नाही.'

(The difficultics are further compounded, because the basic law, where the provisions of equality in the part on fundamental rights are at variance with those in the Directive Principles of State Policy, is itself riddled with contradictions. The contradictions are at least partly the result of scarcity of resources which prevents the State from matching the abolition of disabilities, with the erection of abilities without which the directive principles merely mock at the very poor. There is no way in which the jobless can secure their right to work or the destitute obtain justice in absence of provision for free legal aid.)

म्हणून हे लक्षात घेतले पाहिजे की या न इतर प्रत्येक बाबतीत कायद्याच्या उपयुक्ततेला मर्यादा आहेतच. *'Equality and Inequality - Theory and Practice'* या ग्रंथांचे संपादक आंद्रे ईटील (Andre Eteill) यांनी असे मत व्यक्त केले आहे की ---

'लोकशिक्षणातील कमतरतेची भरपाई कायदा करू शकत नाही. संस्थात्मक जीवनाची बांधणी करण्याच्या कामात भारतीय लोक किती निर्धाराने प्रगमनशील राहू शकतात यावर त्यांची, समतेचे आदर्श सिद्ध करण्यातील परिणामकारकता अवलंबून राहील.'

(The law cannot make up for deficiency of public education..... Whether Indians can make effective the ideals of equality or not, will depend upon the firmness with which they are able to apply themselves to the building of institutions.)

या संग्रहाच्या समीक्षेमध्ये श्री. श्यामलाल म्हणतात -

'या संग्रहाच्या सहभागी लेखकांनी भुलवणाऱ्या सवंगतेपासून सावध रहाण्याची काळजी घेतली आहे. वस्तुत: परिस्थिती फारच बिकट झालेली आहे. सर्व बाबींचा असा काही चमत्कारिक गुंता झालेला आहे की स्वत:ला गरिबांचे कैवारी समजणाऱ्यांच्या वल्गनांनाही तो सुटणार नाही. मग साध्यासुध्या उपायांनी सुटणे तर दुरापास्तच आहे. या संग्रहाच्या सहभागी लेखकांचा या उपक्रमामागील मूळ हेतू हाच आहे की ही गुंतागुंतीची वस्तुस्थिती स्पष्ट व्हावी. आपण जर करड्या नजरेने पाहिले तर, सवंग उदारमतवादी, गांधीवादी अथवा मार्क्सवादी उपायांनी उलगडू शकेल अशा वस्तुस्थितीपेक्षाही गुंतागुंतीचे असे हे वास्तव आपल्या सहज ध्यानात येईल.'

(They [i.e. the authors-contributors] are careful, however, to guard against seductive simplifications. The very purpose of their exercise is to show that things are far more tangled up, and therefore, far more impervious to simple remedies, than the rhetoric of those who cast themselves in the role of saviour of poor, will admit. The facts of the situation here, once we have a hard look at them, turn out to be far more discerning than stock liberal Gandhian or Marxist remedies make allowance for.)

न्यायालयांचा मर्यादित उपयोग

न्यायालयांचे याबाबत कितपत साहाय्य होईल ?

मार्क गॅलँटर यांचे उत्तर असे आहे -

'एका बाजूला तांत्रिक समता आणि दुसरीकडे विषमतेची खरीच भरपाई करणारा न्याय याविषयींच्या बांधिलकीच्या अटीतटीच्या दाव्यांमध्ये अतिशय नाजुक संतुलन राखून न्यायालये भीषण संघर्षाचा धोका टाळू शकतात. पण अशा धोरणांसाठी येणाऱ्या खर्चाची अडचण आणि विषमतेच्या प्रश्नाचा उलगडा करण्यामधील मर्यादेमुळे निर्माण होणारी परिणामशून्यतेची समस्या याबाबत मात्र न्यायालये फार काही करू शकत नाहीत.'

(Courts can avert the worst dangers by maintaining a precarious balance between competing commitments to formal equality and compensatory justice, but they may be less capable of addressing to

problems of costs and ineffectiveness that plague such policies.)

या प्रश्नांबाबत डॉ. आंबेडकरांनी म्हटले आहे की -

'प्रत्येक व्यक्तीला मूलभूत हक्कांची देणगी देण्याची कल्पना ही खरोखरच स्पृहणीय आहे. प्रश्न आहे तो, ती परिणामकारक कशी करावी हा आहे. प्रचलित दृष्टिकोण असा आहे की एकदा मूलभूत हक्कांचा कायदा केला की ते संरक्षिले जातातच. हे गृहीतक अर्थातच वस्तुस्थितीच्या आधारावर टिकणारे नाही.'

(The idea of making a gift of fundamental rights to every individual is no doubt very laudable. The question is how to make them effective? The prevalent view is that once rights are enacted in a law then they are safeguarded. This again is an unwarranted assumption.)

यासंबंधीच्या पूर्वोल्लिखित अवतरणात डॉ. आंबेडकरांनी हे स्पष्ट केले आहे की हक्क हे कायद्याने नव्हे तर समाजाच्या सामाजिक व नैतिक सदसद्विवेकबुद्धीमुळेच राखले जातात, हे अनुभवानेच सिद्ध झाले आहे.

डॉ. आंबेडकरांनी हे लक्षात घेतले होते की ग्रेट ब्रिटनची लोकशाही व्यवस्थेची रचना ही प्रत्यक्ष घटनेपेक्षाही ब्रिटिशांच्या घटनात्मक नीतिमत्तेवर अधिक निर्भर आहे. 'सामाजिक भावनेचा पाठिंबा असेल तर कोणतीच गोष्ट असफल होत नाही. पण या भावनेचा पाठिंबा नसेल तर मात्र कोणतीच गोष्ट यशस्वी होत नाही. इ.इ.' अशा अर्थाच्या अब्राहम लिंकनच्या पूर्वी उद्धृत केलेल्या वचनाशी डॉ. आंबेडकर सहमत होते. दुसऱ्या एका प्रसंगी त्यांनी म्हटले आहे -

'कायदे हे माणसाने माणसाकरिता केले आहेत. माणसाला कायद्याने निर्माण केलेले नाही तर माणसाने स्वत:च्या सुखासाठी कायदा निर्माण केला आहे.'

(Laws are made by man for man. Law has not created man, but man has created law for his own happiness.)

त्यांचे एक निकटचे सहकारी श्री. कुबेर म्हणतात -

'केवळ सक्तीने नव्हे तर लोकशिक्षणाने, माणसाच्या मनाला आणि समाजाच्या सत्त्वाला आवाहन करून कायद्याची अमलबजावणी व्हावी ही त्यांची (डॉ. आंबेडकरांची) कायद्याची संकल्पना होती.'

(In his [i.e. Dr. Ambedkar's] conception of law it is implied that law should be enforced not only by punishment but also by education, by an appeal to the mind of man and spirit of society.)

त्यामुळेच डॉ. आंबेडकांनीही म्हटले आहे -

'लोकांनी स्वत: त्यांच्या स्वत:साठीच म्हणून नोव्हें. १९४९ मध्ये दिलेली घटना समाधानकारकरीतीने राबविली गेली नाही तर भविष्यात आपल्याला केव्हातरी म्हणावे लागेल की घटना चुकीची नाही तर माणूस अधम आहे.'

(If the Constitution which was given by the people unto themselves in November, 1949, did not work satisfactorily, we would have to say at future time, not that the Constitution has failed, but the man is vile.)

पुढे डॉ. आंबेडकरांनी हेही स्पष्ट केले की त्यांच्या मनात अशा संभाव्यतेची जी धास्ती होती त्याप्रमाणे ही घटना जर पददलितांच्या हक्कांचे रक्षण करण्यात असफल झाली तर त्यांनी स्वत:च शब्दांकित केलेल्या या भारतीय घटनेची प्रत ते जाहीरपणे जाळून टाकतील.

तेव्हा खरी हमी ही समाजाच्या सामाजिक व नैतिक सदसद्विवेकबुद्धीत आहे. बहुधा त्यामुळेच नारद मुनींनी म्हटले आहे, 'नष्टे धर्मे मनुष्याणामव्यवहार: प्रवर्तते।' (जेव्हा लोक धर्माला निरोप देतात तेव्हा तंटे निर्माण होतात.)

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचे वास्तव

आज स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या गेल्या ४०-५० वर्षांमधील आपल्या देशातील राजकीय, सामाजिक, आर्थिक पर्यावरण पाहिले; राजकीय, सामाजिक, आर्थिक सहभागाच्या सर्व प्रकारच्या घटनात्मक तरतुदी उपलब्ध असूनसुद्धा सर्वसामान्य कमकुवत घटकांना राजकीय, सामाजिक, आर्थिक समानतेचा न्याय कसा नाकारला जातो आहे, हे लक्षात घेले म्हणजे या सर्व चर्चेची सार्थता जाणवते.

असंघटित समाज - घटकांना न्याय मिळण्याची अशक्यता

अशा परिस्थितीत जे लोक विध्वंसक दबाव गटांमध्ये संघटित होऊ शकत नाहीत अशांना कायद्याचे संरक्षण अथवा सामाजिक न्याय मिळण्याची शक्यताच नसते. शहाबानूसारख्या महिला, हुंडाबळी आणि इतर अत्याचारांचे बळी; वेश्यावृत्ती लादली गेलेल्या अभागी स्त्रिया; महिला कामगार, घरकामात असणाऱ्या गृहिणी, घटस्फोट घेतलेल्या व्यक्ती; तृतीयपंथी वर्ग; संवेदनशून्य मालकाकडे काम करणारी निरागस, अनाथ मुले, गुंडांकडून पळविली गेलेली, अवयव खच्ची केलेली व भीक मागण्यासाठी राबवली जाणारी मुले; घटस्फोटितांची अपत्ये; वनपरिसरातील आपल्या परंपरागत हक्कांपासून वंचित झालेले वनवासी; ठेकेदार, पर्यावरणाच्या रक्षणाची जबाबदारी असणारे व राजकारणी यांच्या संगनमताच्या कटाचे बळी असणारे आणि विकासाच्या नावाखालील मोठ्या धरणांसारख्या योजनांमुळे विस्थापित झालेले; पूर्वी गुन्हेगार गणल्या गेलेल्या विमुक्त आणि अर्धभटक्या जमाती; वेठबिगारी कामगार, पददलित व मागासवर्गीय; रोगांच्या साथी, भूकंप, दुष्काळ, आग, महापूर अशा नैसर्गिक आपत्तींनी अथवा दहशतवाद, दंगली, युद्धे, अपघात, हिंसा, घातपात वगैरे बाह्य घटकांनी पिडलेले लोक; कर्तव्य बजावत असताना मृत्यू पावलेल्या सैनिकी अधिकाऱ्यांची, पोलिसदल व इतर दले यांतील घटकांची कुटुंबे; ग्रामीण कारागीर

आणि हस्तकलाकार; लक्षवधी अशिक्षित बेरोजगार, अथवा अपुऱ्या रोजगाराच्या व्यक्ती, सुशिक्षित बेरोजगार, प्रगत तंत्रज्ञानामुळे बेकार झालेले कामगार; व्यवसायातील धोके (occupational hazards) आणि पर्यावरणाच्या कायद्याच्या उल्लंघनामुळे व्यवसायात निर्माण होणारे विकार यांचे बळी; बेघर व झोपडपट्टीवासी; भोळे अशिक्षित, उपभोक्ते; कंगाल, अपंग, मानसिकदृष्ट्या अधू, बालगुन्हेगार, वेडे, आंधळे, बहिरे - मुके, भिकारी, भयानक रोगपीडित; घुसखोरांपेक्षा वेगळे निर्वासित; तुरुंगाधिकाऱ्याच्या वासनेचे व छळवादात विकृत आनंद मानण्याच्या प्रवृत्तीचे बळी असलेले कैदी; अशा प्रकारच्या 'पृथ्वीतलावरल अभागी जीवांनाच' नेमकी संरक्षण आणि न्याय यांची गरज असते. आणि केवळ घटनेतील यासंबंधीच्या तरतुदींमधून या बाबी मिळू शकत नाही ही फार मोठी मर्यादा आहे.

घटनेच्या रक्षणकर्त्याच्या अध:पतनाचा परिणाम

म्हणूनच घटना परिषदेतील चर्चेच्या प्रारंभीच्या अवस्थेतच डॉ. सच्चितानंद सिन्हांनी सावधानतेचा इशारा दिला होता.

'घटनेचे एकमेव रक्षणकर्ते असलेल्या लोकांच्या अध:पतनामुळे, भ्रष्टतेमुळे वा निष्काळजीपणामुळे घटना ही एखाद्या तासातच नष्ट होऊ शकते. तुमच्या विचारासाठी मी हे म्हणत आहे की गणराज्याची निर्मिती ही लोकांच्या सत्त्वामुळे आणि नागरिकांच्या बुद्धीमुळे होते. जेव्हा ज्ञानी लोक हे सार्वजनिक मंडळातून हद्दपार होतात तेव्हा गणराज्ये कोलमडतात. हे ज्ञानी प्रामाणिक रहाण्याचे धाडस करतात आणि चारित्र्यभ्रष्ट लोक मात्र लोकांना खूष ठेवीत फसवित असतात आणि जणू यासाठीच ते बक्षिसही मिळवितात.'

(The Constitution may nevertheless perish in an hour by the folly or corruption or negligence of its only keepers; the people. Republics are created-these are words which I commend to you for your consideration-by the vitue of public spirit and intelligence of the citizens. They fall when wise are banished from the public councils. They dare to be hounest and the profligate are rewarded because they flatter the people in order to betray them.)

भारतीय संविधान हा धोका टाळण्यामध्ये यशस्वी झाले आहे का ?

स्वातंत्र्यानंतरच्या ४५ वर्षांनंतरसुद्धा (हा उल्लेख १९९२ सालचा आहे.) या परिस्थितीत बदल झालेला नाही. उलट घटनेच्याच आधारे सिद्ध झालेल्या सत्ता व्यूहामध्ये नवीन राज्यकर्त्यांचा शोषकवर्ग निर्माण झाला आहे आणि त्या दृष्टीने देश झपाट्याने अधोगतीला चालला आहे असे दिसते. सारख्याच प्रसंगाला तोंड देण्याची वेळ आल्यावर एका बाजूला श्री. षण्मुखम् चेट्टी व श्री. लालबहादुर शास्त्री आणि दुसऱ्या बाजूला डॉ.

मनमोहनसिंग व जाफर शरीफ यांचे वर्तन ही या संबंधातील अतिशय ठळक नमुनेदार उदाहरणे आहेत. या संदर्भात पं. नेहरूंनी १७ ऑगस्ट १९४८ व २६ नोव्हेंबर १९५६ या दिवशीं आपल्या अतिशय असामान्य व व्यक्तिगतरीत्या निर्दोष असणाऱ्या अनुक्रमे श्री. षण्मुखम् चेट्टी व श्री. लाल बहादुर शास्त्री या सहकाऱ्यांबद्दल घेतलेल्या भमिकेपासून आपण फारच दूर आलो आहोत.'या पूर्वीच्या मंत्र्यांचे अगदी उलट वर्तन व परंपरा डोळ्यांसमोर असूनसुद्धा आज आपापल्या अखत्यारीतील खात्यातील गैरव्यवहारांची जबाबदारी टाळण्याचीच (मंत्र्यांची) प्रवृत्ती वाढत्या प्रमाणात दिसून येत आहे. या प्रवृत्तीइतकी इतर कोणतीच गोष्ट घडून आलेल्या बदलाची निदर्शक नाही आणि राजकीय संस्कृतीमधील हा बदल एवढा असीम आहे की संसदीय लोकशाहीतील परवलीचा शब्द - 'उत्तरदायित्व', हा सत्ताधाऱ्याच्या राजकीय शब्दकोषातून जवळजवळ हद्दपारच झाला आहे. संसदेतील बहुसंख्येमुळेच आपल्याला नैतिक अधिकार प्राप्त होतो असे मानणाऱ्यांचा हा नवा पंथ आज दिसून येऊ लागला आहे'. असे मत श्री. एस्. एन्, मिश्रा यांनी व्यक्त केले आहे. आजवर काळाच्या निकषावर टिकलेली निकोप अशी पूर्वघटिते, परंपरा, संकेत, आणि परिमाणे ही सर्व अप्रस्तुत ठरली आहेत. विध्वंसक आंदोलनाच्या दबावाशिवाय (शासकीय) गोष्टी हलतच नाहीत.

'संघराज्य' हा शब्द घटनेत नाहीच

वर चर्चिलेल्या काही मुद्यांप्रमाणेच आणखी एका आनुषंगिक मुद्याबद्दलच्या समाजमनातील धारण दुरुस्त करणे आवश्यक आहे. सर्वसाधारणपणे भारतीय प्रजासत्ताकाचा उल्लेख करताना 'संघराज्य' असा त्याचा उल्लेख केला जातो. परंतु 'संघराज्य' या प्रचलित कल्पनेत भारतीय प्रजासत्ताकाची राजकीय व शासकीय घटनात्मक रचना बसविता येत नाही, हे लक्षात घेणे आवश्यक आहे.वस्तुत: 'संघराज्य' हा शब्द आपल्या घटनेमध्ये नाहीच. आहे तो 'एकात्म राज्य' असा शब्दप्रयोग!

या वस्तुस्थितीचे महत्त्व स्पष्ट करताना डॉ. आंबेडकर यांनी म्हटले आहे.

'मसुदा समिती हे स्पष्ट करू इच्छित होती की भारत हा संघराज्य (Federation) बनावा ही जरी कल्पना होती तरी ते संघराज्य म्हणजे विविध राज्यांच्या, 'संघराज्य' या रूपात एकत्र येण्याच्या करारामुळे अस्तित्वात आलेले राज्य नव्हते आणि अशा करारामुळे अस्तित्वात आलेले हे संघराज्य नसल्यामुळे कोणत्याही राज्याला त्यातून फुटून बाहेर पडण्याचा अधिकार नाही. हे संघराज्य हे एकात्म (Union) संघराज्य आहे. कारण ते विघटित होऊ शकत नाही. मसुदा समितीला असे वाटले की नंतर वादाला वा विविध पर्यायी कल्पनांना जागा मिळण्यापेक्षा प्रारंभीच हे स्पष्ट केलेले बरे!'

(The Drafting Committee wanted to make it clear that though

India was to be a federation, the federation was not the result of an agreement by the States to join in a federation, and that the federation not being the result of an agreement, no State has the right to secede from it. The federation is a Union because it is indestructible. The Drafting Committee thought that it was better to make it clear at the outset rather than to leave it to speculation or to dispute.)

प्रत्यक्ष संविधान तयार होत असताना श्री. गुरुजी व इतर अनेक विचारवंतांनी संघराज्य (Federation)कल्पनेला विरोध केला होता हे या ठिकाणी लक्षात घेतले पाहिजे.

या सर्व चर्चेतून, अनेक राष्ट्रभक्त, समाजहितैषी आणि पश्चिमी विचाराच्या प्रभावाखाली न गेलेल्या विचारवंतांच्या मनातील प्राप्त भारतीय संविधानबद्दल व कायदा - न्यायव्यस्थेबद्दलचे असमाधान स्पष्ट झालेले आहे.

आतापर्यंत आलेले सर्व संदर्भ व गेल्या ४० - ५० वर्षांतील आमच्या समाजातील प्रत्यक्ष अनुभव यावरून आपण अशा निष्कर्षाला येऊन पोचतो की कायद्याच्या व घटनेच्या सर्व पैलूंबाबत आमूलाग्र असा नव्याने विचार करणे आवश्यक आहे. कायदा, न्यायव्यवस्था, घटना, संस्थात्मक पाया आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे या साऱ्यांची परिणामस्वरूप असलेली, या साऱ्यांमध्ये गोवल्या गेलेल्या सर्व लोकांची मानसिकता ही सारी संपूर्णत: बदलली पाहिजे. वैश्विक नियमनाच्या प्रकाशात ही आगेकूच झाली पाहिजे. हा सर्व राष्ट्रीय पुनर्निर्माणाचा महत्त्वाचा अनिवार्य आणि एकात्म असा भाग आहे. यासाठी प्रचंड पूर्वतयारी आणि साधने आवश्यक आहेत. या दिशेने पहिले अटळ पाऊल म्हणजे नव्या सक्षम घटना समितीचे गठण! आपले राष्ट्रीय मानस आणि बाह्य जगातातील आधुनिक प्रवाह लक्षात घेऊन विलंब न करता नवीन घटनेचा आराखडा तयार करण्याची आवश्यकता आहे.

पूर्वपरंपरेकडेच वळावे लागेल

पण असा नवीन आराखडा बनवून राष्ट्राच्या पुनर्निर्माणातून जागतिक शांतता, सुमेळ व स्वास्थ्य निर्माण करण्याची आपली आकांक्षा साकार करावयाची तर आपल्याला पूर्वपरंपरेकडे वळावे लागेल.

स्वतंत्र भारताच्या सिद्ध झालेल्या व अवलंबिल्या जाणाऱ्या संविधानासंबंधी व्यक्त झालेल्या तीव्र असमाधानाच्या आतापर्यंत आलेल्या सर्व नोंदींमधून एक समान निष्कर्ष काढता येतो. वर्तमान घटना ही या प्राचीन राष्ट्राच्या राष्ट्रीय चैतन्यतत्त्वाची, सत्त्वाची (ethos) दखल न घेताच निर्माण झालेली घटना आहे.

आणि या वर्तमान वास्तवातून - जे आहे त्यातून - आपल्याला उद्या काय साधायचे आहे याबद्दलची धारणा निश्चित करावयाची असेल तर आपल्याला आपल्या प्राचीनतम परंपरेतूनच सूत्रे घ्यावी लागतील आणि आजच्या सर्व संभ्रमित व संत्रस्त

मानवतेला राजकीय संरचनेबाबतचाही तिसरा पर्याय देण्याची जबाबदारीही त्यामुळेच भारताला पार पाडता येईल.

'संदर्भ चौकट', या भागात हे स्पष्ट केले आहे की मानवी सौख्य आणि आत्म्याचे उन्नयन व मुक्ती यावर आधारलेले जगत्कल्याण (आत्मनो मोक्षार्थम्, जगत् हिताय च।) हे हिंदू जीवनदृष्टीने मानवी जीवनाचे ध्येय मानलेले आहे. त्यामुळेच आपल्या राजकीय संरचनेचे अंतिम ध्येय जागतिक शांतता, सुमेळ आणि सौख्य हेच आहे.

पण त्याचबरोबर जीवनाचा एकात्म व समग्र विचार हे हिंदू जीवनदृष्टीचे वैशिष्ट्य आतापर्यंतच्या अनेक उल्लेखांतून स्पष्ट झालेले आहे. त्यामुळेच एकूणच समाजाची धारणा, समाजाचे चलनवलन व त्याचे स्वास्थ्य व सुरक्षितता या सर्वांची जबाबदारी केवळ राजसत्तेसारख्या एखाद्याच जीवनांगावर असणे हिंदू जीवनदृष्टीत बसत नाही. राजसत्तेऐवजी लोकशक्तीच्या द्वाराच या सर्व गोष्टी संभाळल्या जाणे हे आपल्या संस्कृतीला अपेक्षित आहे.

त्याच दृष्टीने आपल्या प्राचीन परंपरेतील प्रत्यक्ष राजकीय व्यवस्थेचे काही मोजके संदर्भ आजही मार्गदर्शक ठरावेत असे आहेत व त्यांतून आपल्या सांस्कृतिक सत्त्वाचे व जीवनदृष्टीचे प्रात्यक्षिक कसे व्यक्त होते हेही लक्षात येऊ शकते.

प्राचीन राज्यव्यवस्थेचे मोजके संदर्भ

त्यादृष्टीने प्राचीन भारतातील राजसत्तेचे स्वरूप पाहिले तर ती निमित्तमात्रच होती हे लक्षात येते.

मुस्लिम आक्रमणापूर्वीची प्राचीन भारतातील राजसत्ता ही व्यक्तिगत हुकुमशाही वा निरंकुश एकाधिकारशाही या स्वरूपात कधीही अस्तित्वात नव्हती. राजेशाहीतील राजा हा धर्मरक्षक व दैवी सत्तेचा प्रतिनिधी मानला जाऊनसुद्धा आणि राजसिंहासनाला पावित्र्य व सर्वाधिकार दिले जाऊनसुद्धा प्राचीन भारतातील राजेशाहीचे पर्शियन राजेशाहीशी, रोमन साम्राज्यशाहीशी किंवा नंतरच्या काळातील युरोपातील एकाधिकारशाहीशीही कोणत्याही प्रकारचे साम्य नव्हते. ती पठाणी अथवा मोंगली सम्राटांच्या राज्यव्यवस्थेहूनही अतिशय भिन्न होती. वस्तुतः राजा हा मर्यादित सत्ता असलेला किंवा घटनात्मकदृष्ट्याच केवळ राजा असे. अर्थात संविधान राबविण्याची आणि राजाच्या अधिकारावर मर्यादा घालण्याची यंत्रणा मात्र युरोपीय इतिहासाला परिचित अशा यंत्रणेपेक्षाही भिन्न होती. आणि तिची सत्ता चालू रहाणे हे सुद्धा, मध्ययुगीन युरोपीय राजापेक्षाही अधिक प्रमाणात, समाजाच्या इच्छेवर व संमतीवर अवलंबून असे. राजापेक्षाही सार्वभौम असे स्थान धर्माला - समाजाच्या धार्मिक, नैतिक अशा जीवनाला होते. अशा धर्मात मनमानी ढवळाढवळ करण्याचा कोणत्याही भौतिक सत्तेला अधिकार नव्हता. केवळ धार्मिक उल्लंघनाचे, गंभीर गैरवर्तणुकीचे आणि संकेतभंगाचे प्रकार थोपविण्याची आणि धर्माच्या सुयोग्य पालनाकडे लक्ष

देण्याची जबाबदारी, धर्माचा रक्षक व सेवक म्हणून राजाकडे असे. व्यक्ती म्हणून त्याच्या जीवनावर व कृतीवर असलेली धर्मबंधने आणि त्याचा प्रदेश, सत्ता व कर्तव्य यासंबंधीची राजा म्हणून असलेली बंधने, त्याला स्वत:लाही काटेकोरपणे पाळावी लागत. सार्वभौम राजसत्ता ही अशाप्रकारे धर्मसत्तेच्या अंकित असणे ही केवळ सैद्धान्तिक बाब नव्हती तर तो प्रत्यक्ष व्यवहार होता. त्यामुळेच अन्य देशांच्या इतिहासात भरून राहिलेले रानटी क्रौर्य आणि जुलूम यांनाच काय पण एखाद्या हुकुमशाही लहरीला अथवा राजाच्या अतिरेकाला आणि दडपशाहीलाही सामान्यत: जागाच नसे. राजा जर धर्माच्या नैतिक राबवणुकीत कमी पडला तर राजाची आज्ञा पालन करण्यास प्रजा बांधलेली नाही हेही सांगून ठेवलेले होते. अन्यायी व जुलमी राजाला एखाद्या पिसळलेल्या कुत्र्याला मारावे तसे प्रजाननांनी मारावे असेही मनूने म्हटले आहे. निरंकुशता किंवा राजाचे बिनशर्त दैवी अधिकार अशाप्रकारची कोणतीही बाब भारतीय राजकीय व्यवस्थेच्या आकृतिबंधात बसत नव्हती.

राजेशाही हाच एकमेव शासनप्रकार नव्हता

आणि त्यातूनही हे लक्षात घेतले पाहिजे की राजेशाही हे एकमेव असे भारतीय सामाजिक - राजकीय व्यवस्थेचे अनिवार्य स्वरूप मानले गेले नव्हते. बदलत्या परिस्थितीत आवश्यक अशा हव्या तेवढ्या प्रकारच्या राज्यव्यवस्था मानवी प्रतिभेला निर्माण करता येतील यावर आमच्या पूर्वजांचा वैदिक काळापासूनच विश्वास होता आणि जेव्हा समाज व राजव्यवस्था हे दोन घटक समांतरतेने जोडलेले असत, अशा वैदिक काळात केल्या गेलेल्या एकूण १३ राज्य - प्रकारांच्या प्रयोगांत, 'बहुपाय्य स्वराज्य' हा प्रकार सर्वसाधारण परिस्थितीत सर्वोत्तम मानला गेला होता. प्राचीन भारतातील राजकीय समाजव्यवस्था ही सत्ता आणि समाजमूल्ये यांच्या उत्स्फूर्त व्यापारातून वाढत गेली. त्यामुळेच तिची वाढ, तिच्या सर्व रचना, संकेत व संस्था या, समाजातील अबोध तत्त्वांमधून मिळणाऱ्या प्रेरणा व विधायक शक्ती यांच्याद्वारा एका सेन्द्रिय विकासाच्या स्वरूपात सिद्ध होत असत. अशा विकासातून त्यामुळे अहेतुकतेनेच सामूहिक मानसिकता, प्रवृत्ती आणि सत्त्वस्थ व शारीर गरजा व्यक्त होत असत व म्हणूनच क्वचित आंतरिक प्रेरणांमुळे, क्वचित समाज - मन:प्रवृत्तीवर प्रभाव टाकणाऱ्या पर्यावरणाच्या दबावामुळे या विकासाची गती चालू रहात असे वा बदलत असे.

लोकजीवनाच्या सहजप्रवृत्तींमधून विकसित झालेली विविधता

आणि पुढील सामाजिक आत्मभानाच्या काळातही या सत्त्वस्थ संस्था वा त्यांची प्राथमिक स्वरूपाची मानसिक रूपे ही नाकारली गेली नाहीत तर अधिक विकसित स्वरूपात साकारली गेली. अर्थातच ही रूप म्हणजे कोणा राजकारण्यांची, विधायकांची अथवा सामाजिक - राजकीय विचारवंतांची कृती नसे तर भारतीय लोकजीवनाच्या

सहजप्रवृत्ती, आंतरिक प्रेरणा आणि सर्वसाधारण मानसिकता यांना सुसंगत अशी ती स्थिर, समर्थ व्यवस्था असे.

आमच्या पूर्वजांना काटेकोर समरूपतेची आवश्यकता कधीच जाणवली नाही. अशा सर्वप्रकारच्या लवचिकपणावर एकात्मतेचा ठसा उमटविण्यास समाजाचे समान चैतन्य आणि जीवनप्रेरणा या पुरेशा आहेत असे त्यांना वाटे आणि जरी विराट राज्ये वा साम्राज्ये विकसित झाली तरीही लहान राज्यांच्या विशेष संस्था या नव्या व्यवस्थेत सामावल्या जात असत. नव्या सामाजिक-राजकीय व्यवस्थेसाठी त्या कधीच समूळ नष्ट केल्या जात नसत वा दूर फेकल्या जात नसत. जे जे स्वाभाविक उत्क्रांतीत टिकू शकले नाही वा आवश्यक राहिले नाही ते स्वभावत:च दूर टाकले जाऊन निराधार ठरले. आणि नव्या परिस्थितीशी व पर्यावरणाशी जुळवून जे टिकू शकले तेच जगू शकले. भारतीय लोकजीवनाच्या प्रवृत्तींना आणि शारीर व सत्त्वस्थ अशा अस्तित्वसूत्रांना घनिष्ठतेने जे सुसंगत होते, त्याला विश्वात्मकता प्राप्त झाली आणि त्याला समाज आणि राज्यव्यवस्था यांच्या चिरसनातन आकृतिबंधामध्ये जागा मिळाली.

वरून कोणतीही गोष्ट लादली गेली नाही तर प्रत्येक गोष्ट तळातून वर स्वाभाविकपणेच उत्क्रांत होत गेली. त्यामुळेच प्राचीन व अर्वाचीन युरोपीय इतिहासातील विशेषाप्रमाणे भारतात केवळ बौध्दिक आदर्शवादी अशा राजकीय प्रगतीचे अथवा क्रांतीच्या प्रयोगांचे चिन्ह दिसत नाही. आज युरोपीय संस्कृतीत राज्यव्यवस्था ही नोकरशाहीयुक्त व औद्योगिक राज्याच्या रचनेत पर्यवसित झालेली दिसते आणि एका अवांछनीय, कृत्रिम, तांत्रिक व राक्षसी व्यवस्थेत तिचे रूपांतर झाल्याचा अनुभव आज तेथे येत आहे. अशाप्रकारचा कोणताही बौद्धिक आदर्शवाद वा क्रांतिकारकता येथे नसल्यामुळे भारतीय राज्यव्यवस्था अशा कृत्रिम रचनेकडे कधीही झुकलेली दिसत नाही.

धर्म - कल्पनेच्या विविध मिती

प्रत्येक व्यक्तीने स्वत:च्या आणि स्वजातीयाच्या स्वभावगत अशा योग्य नियमांचे आणि संकेतांचे म्हणजेच स्वधर्माचे पालन करणे आणि त्याचप्रमाणे एक सामूहिक सेन्द्रिय व्यक्तिमत्त्व असलेल्या समाजानेही त्याच प्रकारचे स्वधर्मपालन करणे, यातूनच विश्वातील सुयोग्य व्यवस्था सुस्थितीत राहू शकत असे. कुटुंब, टोळी, जात, वर्ग अशी किंवा सामाजिक, धार्मिक, औद्योगिक वा अन्य, गटबंधने, राष्ट्र, समाज, हे सारे सेन्द्रिय घटक आहेत व त्यांचे त्यांचे धर्म उत्क्रांत झालेले असतात आणि त्यांचे पालन ही त्यांच्या अस्तित्वाची, निकोप सातत्याची आणि विवेकी कृतीची पूर्वअट असते अशी प्राचीन धारणा होती. इतरांच्या संदर्भातील स्थान व नाते यावर आधारलेलाही धर्म असे. त्याचप्रमाणे परिसर, पर्यावरण, काल यांनी नियंत्रित असा युगधर्मही असे. शिवाय विश्वात्मक, उपासनानिष्ठ वा नैतिक असाही धर्म होता.

आणि हे सर्व नैसर्गिक धर्माच्या अनुषंगाने चालत असे व अशा स्वभावजन्य कृतीतून विधिसंहिता निर्माण होत असे. स्वयंनिर्णित व्यक्तीने व स्वयंनिर्णित समाजाने आपापल्या योग्य आणि मुक्त अशा नियमांप्रमाणे जीवन जगत रहाणे ही आदर्शवस्था आहे. राज्यशासनाला जात, धार्मिक गट, औद्योगिक समूह, गाव, शहर अथवा एखाद्या भागाची वा प्रांताची एकात्म पद्धती यांच्या मुक्त अशा विनिमयामध्ये ढवळाढवळ करण्याचे वा त्यावर बंधने घालण्याचे किंवा त्यांचे अधिकार काढून घेण्याचे काहीच कारण नसे. कारण समाजधर्माच्या विवेकी चलनवलनासाठी असा विनिमय अत्यावश्यकच असल्याने ही बाब स्वाभाविक अंगभूततेनेच समाजाकडून होत असे.

समूहात्मक स्वातंत्र्य व स्वयंनिर्णय यांचा व्यामिश्र व्यूह

परिणामत: भारतीय राज्यव्यवस्था ही एक समूहात्मक स्वातंत्र्य आणि स्वयंनिर्णय यांनी युक्त अशी अतिशय गुंतागुंतीची रचना होती. स्वत:च्या योग्य जीवनविनिमयाचे संचालन करणारा प्रत्येक समूहघटक इतरांपासून स्वत:च्या क्षेत्रीय मर्यादांमुळे अलग रहात असे, पण त्याबरोबरच एका सुपरिचित अशा नातेसूत्रातून संपूर्ण समाजाशी तो बांधलेलाही असे. सामाजिक अस्तित्वाच्या संदर्भातील अधिकार व कर्तव्ये यांच्या अनुषंगानेच तो इतरांशी बांधलेला असे. स्वत:च्या कायद्याच्या व नियमांच्या योग्य राबवणुकीतून स्वत:च्या योग्य मर्यादांचे तो भान ठेवत असे. याचबरोबर परस्पर अथवा समान हितसंबंधाच्या अनुषंगाने तो इतर समाजगटांशी विनिमय करून हितसंबंधाचे संहितीकरणही करत असे. राज्याच्या वा साम्राज्याच्या सर्वसाधारण राजसभांमध्ये त्याच्या त्याच्या प्रतिष्ठेप्रमाणे काहीना काही स्वरूपात तो प्रतिनिधित्वही करीत असे. सर्वोच्च व सर्वंकष राजशासन हे केवळ सर्व घटकांमधील सुसूत्रीकरणाचे, त्याचप्रमाणे सर्वसाधारण नियंत्रण व तत्परता यांचेही माध्यम असे आणि सर्वोच्च असली तरी राजसत्ता ही निरंकुश नसे. कारण तिचे अधिकार आणि सत्ता ही लोकेच्छेने व नीतीने मर्यादित झालेली असे आणि अंतर्गत व्यवस्थेमध्ये राजसत्तेला केवळ सामाजिक - राजकीय संरचनेतील इतर घटकांबरोबरचा एक सहभागी सदस्य येवढेच स्थान असे.

भारतीय राज्यव्यवस्थेचे हे केवळ तात्त्विक व सैद्धांन्तिक असे स्वरूप नव्हते तर प्रत्यक्ष व्यवहारातही गठित झालेले स्वरूप होते. समूहात्मक स्वातंत्र्य व स्वयंनिर्णय यांचा एक व्यामिश्र व्यूह! त्यामधील आवश्यक ती सत्ता, ही स्थान आणि प्रतिष्ठा यांनी सुसज्ज, अशी सर्वांचे सुसूत्रीकरण करणारी व्यक्तिरूपातील सर्वोच्च अधिसत्ता! पण तिची योग्य कर्तव्ये व हक्क यांपुरती मर्यादित असणारी, एकाच वेळी इतरांवर नियंत्रण ठेवणारी पण इतरांकडून नियंत्रित केली जाणारी अशी ही सत्ता! आणि सर्वांना सर्व जीवनव्यवहारांमध्ये सहभागीत्वाचे अधिकार देऊन स्वत: राजा, लोक आणि सर्व समूह घटक, सर्वांनी मिळून धर्माची निगा राखणे आणि धर्माचे जू

स्वीकारून त्याचे नियंत्रण पत्करणे ही या व्यवस्थेची संकल्पना होती.

राजकीय व्यवस्थेचे १३ प्रयोग

प्रत्यक्ष राजकीय रचनेचाच विचार केला तर आपल्या वैदिक ऋषींनी विविध प्रकारच्या अशा १३ राजकीय व्यवस्थांचे - राज्यकल्पनांचे - प्रयोग केलेले दिसतात. साम्राज्य, भोज्य, वैराज्य, पारमेष्ठ्य, राज्य, महाराज्य, आधिपत्य, समंतपर्यायी, जनराज्य, विप्रराज्य, समर्थराज्य, अधिराज्य व बहुपाय्य स्वराज्य या १३ प्रकारांपैकी शेवटचा बहुपाय्य स्वराज्य हा सर्वोत्कृष्ट प्रकार मानला गेला होता.

प्राचीन काळी सर्व प्रकारच्या शासनांचे प्रयोग भारतामध्ये झालेले आहेत. गणराज्यपद्धतीबद्दल भगवान बुद्धाने म्हटले आहे की जोपर्यंत गणतांत्रिक संस्थांची शुद्धता व जोश कायम असेल तोपर्यंत एखादी लहानशी सत्ताही मगधासारख्या सामर्थ्यसंपन्न व महत्त्वाकांक्षी राजेशाहीलाही अजिंक्य राहील.

आधुनिक काळतही समाजाच्या सहभागावर भर

आधुनिक काळात राष्ट्रीय पुनर्निर्माणाच्या संदर्भात म. गांधी, विनोबाजी, श्री. गुरुजी, पं. दीनदयाळ उपाध्याय अशा बहुतेक सर्व, भारतीय परंपरेतील विचारवंतांनी, तत्त्ववेत्त्यांनी राजकीय क्षेत्रासकट समाजाच्या सर्व चलनवलनातील संपूर्ण समाजाच्या सहभागावर भर दिलेला आहे. मानवेंद्रनाथ रॉय, जयप्रकाश नारायण असा पश्चिमी सामाजिक प्रणालींच्या अभ्यासकांनी व क्रियाशील नेत्यांनीही अशाच संकल्पना मांडलेल्या दिसतात. या सर्वांनीही लोकशक्तीच्या माध्यमाचाच आग्रहाने उल्लेख केला आहे. काही पश्चिमी विचारवंतांनीही लोकप्रतिनिधित्वाच्या अशाच प्रकारच्या कल्पना मांडलेल्या आहेत.

जे राष्ट्रभक्त भावी भारताच्या संस्थात्मक चौकटीच्या समस्येचा सतत गंभीरपणे विचार करीत असत त्यांपैकी मानवेंद्रनाथ रॉय यांनी बहुतेक सर्व देशांच्या घटनांचा अभ्यास केलेला होता. साम्यवाद आणि औपचारिक सांसदीयता या दोन्हींच्या मर्यादांची जाणीव असल्याने त्यांनी आपला क्रांतीचा कार्यक्रम हा स्वातंत्र्य, विवेक आणि सामाजिक संवाद या तत्त्वांवर आधारलेला होता आणि हे करताना समाजाच्या अशाप्रकारच्या पुनर्रचनेसाठी नागरिकांच्या शिक्षणावर अधिक भर दिला होता. जोपर्यंत लोकशिक्षणाचे कार्य पूर्ण होत नाही तोपर्यंत पश्चिमी सांसदीय पद्धती आपल्या देशात यशस्वी होऊ शकणार नाही असे त्यांचे मत होते. त्यांच्या विचारांत उपभोक्ते आणि उत्पादक यांच्या सहकार्यावर आधारलेल्या सामाजिक रचनेतील सहकारी अर्थव्यवस्था मांडलेली आहे व अशी व्यवस्था ही फायद्यासाठी नव्हे तर उपयोगासाठी उत्पादन, आणि मानवी गरजा लक्षात घेऊन वितरण या बाबींवर आधारण्याची कल्पना होती. या सहकारी अर्थव्यवस्थेत उत्पादनसाधने ही कामगारांच्या मालकीची

असणार होती. ही व्यवस्था, त्यांच्या मते, भांडवलशाही व्यवस्था व शासनाच्या मालकीची व्यवस्था या दोन्हीपेक्षा श्रेष्ठ होती. लोकांना परिणामकारक हक्कांपासून वंचित करणाऱ्या प्रातिनिधिक सत्तेची कल्पना या राजकीय रचनेतून वगळण्यात येणार होती व लोकशाहीच्या अगदी तळातील पायाभूत घटकांच्या रूपात असलेल्या लोकसमित्यांच्याद्वारा संपूर्ण प्रौढ लोकसंख्येच्या थेट सहभागावर ती आधारलेली असणार होती. स्वतंत्र भारताच्या घटनेच्या त्यांच्या आराखड्याप्रमाणे भारतीय राज्य लोकसमित्यांच्या देशव्यापी जाळ्याद्वारा संघटित केले जाणार होते आणि या समित्यांना कायदा करणे, प्रलंबित कायद्याच्या मसुद्यावर मत देणे, लोकप्रितिनिधींना परत बोलवणे आणि महत्त्वाच्या राष्ट्रीय प्रश्नांवर सार्वमत घेणे असे व्यापक अधिकार असणार होते. त्यांच्या २२ प्रबंधांमध्ये आणि जाहिरनाम्यात मांडलेल्या तत्त्वांवरून 'लोकशाहीच्या आदर्शाला पक्षीय राजकारण हे विसंगत आहे आणि त्याची सत्तावादी राजकारणामध्ये विकृती होते,' या निष्कर्षापर्यंत ते आले होते असे दिसते. या त्यांच्या कल्पनांची परिणती डिसेंबर १९४८ त त्यांच्या 'रॅडिकल डेमोक्रॅटिक पार्टी'च्या विसर्जनात आणि 'रॅडिकल ह्यूमॅनिस्ट मूव्हमेंट' या चळवळीच्या स्थापनेत झाली.

मागे प्रचलित राजकीय पक्ष पद्धतीच्या मर्यादा सांगताना डॉ. सोरोकिन यांनी स्पष्ट केलेले विचार उद्धृत केले आहेत. त्याच ठिकाणी ते पुढे म्हणतात –

'हे तर स्पष्टच आहे की राजकीय पक्ष हे शांततामय आणि सृजनशील समाजाची उद्दिष्टे साध्य करू शकत नाहीत. वर * उल्लेखलेल्या संशोधकांनी पुरस्कारलेल्या मार्गांनी त्यांच्यात आमूलाग्र बदल झाला पाहिजे.

प्रादेशिक जिल्ह्यांमधून प्रतिनिधी निवडून द्यावयाच्या निवडणूकप्रक्रियेचे विकेंद्रीकरण हा अग्रक्रमाचा भाग आहे. त्याच्या बरोबरच उद्योग, शेती, विज्ञान आणि धर्म इ. क्षेत्रांतून येणाऱ्या प्रतिनिधींची त्याला जोड देणे आवश्यक आहे. राज्यशासनाबाबत सुचवलेल्या अशा काही बदलांतून राजकीय पक्षाची निवडणूकविषयक मक्तेदारी अशक्य होईल. राजकीय पक्षांच्या अवास्तव प्रभावातून मुक्त होऊन अशा संयुक्त संस्थांनी आपापले उमेदवार निवडावेत. अशाप्रकारच्या विकेंद्रीकरणामुळे राजकीय पक्षांची मक्तेदारी ताकद कमी होईल. त्यांची एकाधिकारशाही संपुष्टात येईल व नागरिकांचे निवडणुकीसंदर्भातील स्वातंत्र्य बऱ्याच प्रमाणात त्यांना पुन्हा प्राप्त होईल.

राज्यशासनामध्येही प्रादेशिक तत्त्वावर निवडलेले नागरिकांचे प्रतिनिधी आणि शेती, औद्योगिक व्यवस्थापन व मजूर, धर्म, विज्ञान, ललितकला आणि अन्य व्यवसाय यांचे प्रतिनिधी यांच्या जुळणीचा समावेश असला पाहिजे. कामगार व व्यवस्थापन, शेती, विज्ञान, धर्म आणि अन्य व्यवसाय यांच्यांतून त्या त्या वर्गाने प्रादेशिकतेच्या निरपेक्ष अशा निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या पुरेशा प्रमाणामुळे प्रादेशिकतेमधील

---

* पृष्ठ २३० पहा.

निहित हितसंबंध क्षीण होतील आणि शासनाची कार्यक्षमता, नि:पक्षपातीपणा आणि नैतिकता उंचावून त्याची प्रतिष्ठाही वाढेल.'

(It is evident that such political parties cannot serve the purpose of a people and creative society. They need to be readically transformed along the lines recommended by the foregoing investigators. First, the changes suggested for the state organisation, particularly the decentralisation of the election of the reprsentatives from territorial districts and their supplementation by representatives of industry, agriculture, science, religion etc. would render the monopoly of elections by political parties impossible. The corporate bodies elect their representative themselves, without undue influence being exerted by political parties. This decentralisation would drastically limit the monopolistic power of the political parties, would reduce their autocracy and would restore to the citizens a portion of their electoral freedom.

The government of the states must consist of a combination of the elected representatives of the citizens of the electoral districts and those of agricultural, industrial management and labour, religion, science, the fine - arts and the professions. A sufficient proportion of representatives of labour, management, agriculture, science, religion and the professions, elected by their respective groups,independently of their territorial district would weaken the vested interests of a given territorial district and immeasruably heighten the competence, impartiality, morality and prestge of the government.)

डॉ. सोरोकिनची राज्यसंस्थेबद्दलची मते विचारात घेण्यासारखी आहेत.

'...म्हणून राजसंस्था ही आमूलाग्र नव्याने रचली पाहिजे. राज्याचे नागरिक आणि शासकीय अधिकारी अधिक कार्यक्षम आणि अधिक नि:स्वार्थी बनल्याशिवाय राज्याचे खरे उदात्त स्वरूप सिद्ध करणे शक्य होणार नाही. त्याचवेळी खऱ्या अर्थाने राज्य हे मानवतेचे स्वामी नव्हे तर सेवक बनेल. ही मूलभूत सुधारणा साधली तर इतर सर्व आवश्यक त्या सुधारणा तुलनेने सोप्या जातील. राज्याच्या अस्तित्वाच्या मॅकियावेलीने केलेल्या - धूर्त, उघड्या नागड्या समर्थनासारख्या अशा त्यांच्या समर्थनाच्या धोरणाचा त्याग केला पाहिजे.'

(Hence the institution of the state must be radically remodelled. A genuine ennoblement of the state will be possible only when the citizens and the officials become wiser, more competent, more altruistic. Only

then will the state be the true servent of humanity instead of its master. When this basic reform is achieved, all the other necessary improvements will be relatively easy. their cynical policy of the naked Machiavellian *raison d'etat* must be terminated.)

याही ठिकाणी डॉ. सोरोकिन यांनी, मागे उद्धृत केलेल्या, शासनातील प्रादेशिक प्रतिनिधित्व व संस्थात्मक व क्षेत्रात्मक प्रतिनिधित्व यांच्या संयुक्त योजनेचा उल्लेख केला आहे आणि पुढे म्हटले आहे की –

'एखाद्या नव्या विधेयकाविषयी जुन्या पद्धतीच्या सर्वसाधारण मतदानाच्या (Referendum)माध्यमातून अथवा पुरेशा तयारीनिशी घेतलेल्या निवडणुकीने नागरिकांच्या मतांची प्राथमिक निश्चिती केल्याशिवाय (राज्याने) असा कोणत्याही प्रकारचा महत्त्वाचा कायदा अथवा उपाय पारित करू नये. नागरिकांच्या बहुमताच्या विरोधात असलेले कोणतेही विधेयक संमत करण्याचा अधिकार विधिमंडळाला असता कामा नये. मग त्या विधेयकाच्या बाजूने (विधिमंडळात) कितीही मोठ्या प्रमाणात बहुमत असू दे! याप्रमाणे प्रत्यक्ष लोकशाही वा नागरी सभागृहाच्या पद्धतीची शासनव्यवस्था ही अनेक उणिवा असलेल्या अप्रत्यक्ष प्रतिनिधित्वाची जागा घेईल. सर्वसाधारण तत्त्व म्हणून राज्यशासनाने केवळ अशीच कामे पार पाडावीत की जी अशासकीय संस्थांकडून चांगल्या प्रकारे अथवा त्याच पद्धतीने पार पाडली जाणार नाहीत. या अर्थाने त्याचे क्षेत्र हे अवशिष्ट क्षेत्र असेल. इतर यंत्रणांकडून पुरविल्या न जाणाऱ्या गरजांची वा राज्यशासनाइतक्या चांगल्या रीतीने त्यांच्याकडून पुरविल्या न जाणाऱ्या गरजांची काळजी घेणे येवढेच त्याचे काम असावे.'

(It should not pass any important law or measure without a preliminary determination of the opinion of the citizen in the form of either the old fashioned referendum or adequaely organized polls. The legislative body would not be entitled to enact any legislation contrary to the majority vote of the citizens, no matter how large may be the majoirty vote of the legislature in favour of the measure. Thus direct democracy, or the town hall system of government, would be restored in lieu of indirect representation, with its many short-comings. As a general principle, the state government should discharge only those functions which cannot be administered well by non - state organizations [or are not so administered]. In this sense its field should be residual, taking care of the needs not satisfied by any other agencies or satisfied by them more poorly than they could be fulfilled by the state.)

येथे स्पष्ट केलेल्या मानवेंद्रनाथ रॉय व डॉ. सोरोकिन यांच्या राजकीय संरचनेच्या कल्पना

हिंदू जीवनदृष्टीतील संकल्पनेच्या जवळ येणाऱ्या आहेत. विविध स्तरांवरील विकेंद्रित रचना - व्यवस्था, अशा व्यवस्थांच्या माध्यमांतून कार्यरत असलेल्या संपूर्ण समाजाचे राज्यव्यवहारातील व शासकीय व्यवहारातील प्रत्यक्ष सहभागीत्व आणि अशा प्रत्यक्ष सहभागीत्वातून सिद्ध व व्यक्त होणारी लोकशक्ती व लोकाधार, या सर्व कल्पनांचे, हिंदू जीवनदृष्टीतील 'सत्तावादविरहित शासन' या संकल्पनेशी बऱ्याच प्रमाणावर साम्य जाणवते. पुढे आलेली श्री गुरुजींची 'व्यवसायात्मक कार्याच्या प्रतिनिधित्वाची' कल्पना अथवा योगी अरविंदांची 'हितसंबंधामधील स्वारस्याचे शासन' ही कल्पना, या कल्पनांशीही मा. ना. रॉय व डॉ. सोरोकिन यांनी मांडलेल्या कल्पनांचे लक्षणीय साम्य जाणवते.

धर्म हाच संदर्भ बिंदू

अशा प्रकारच्या सामाजिक रचनेच्या, राष्ट्रीय पुनर्निर्माणाच्या संदर्भातील कोणत्याही चर्चेसाठी सुयोग्य असा 'धर्म' हाच संदर्भ बिंदू असणे आवश्यक आहे ही भारतीय वैचारिक धारणा आहे.अलिकडच्या काळापर्यंत 'धर्म' या संकल्पनेच्या विवरणाची वा स्पष्टीकरणाची आवश्यकता आपल्या समाजातही असे. पण न्या. मू. रामा जॉइस यांच्या *Legal and Constitutional History of India'* या ग्रंथाच्या प्रकाशनानंतर परिस्थिती बदलली आहे.

त्यादृष्टीने पश्चिमेकडील सर्व विचारप्रवाह,. त्याचप्रमाणे एतद्देशीय सर्व विचारव्यूहांचा विकास, सामावून घेऊन आणि दुसऱ्या औद्योगिक क्रांतीनंतरच्या काळाची गरज लक्षात घेऊन, पं. दीनदयाळ उपाध्याय यांनी सिद्ध केलेला सनातन धर्माचाच आधुनिक आविष्कार म्हणता येईल असा 'एकात्म मानवतावाद' हाच आपल्या आधुनिक राष्ट्रीय पुनर्रचनेच्या बाबतीतील संदर्भबिंदू असू शकतो.

व्यवहारात: धर्म म्हणजे शाश्वत वैश्विक नियम आणि त्याच्या प्रकाशातील निरंतर बदलती अशी सामाजिक, आर्थिक व्यवस्था होय. उदाहरणार्थ नैतिकता हा वैश्विक नियम आहे पण विवाह संस्थेसारख्या संस्थात्मक व्यवस्था मात्र समाजाच्या घडामोडींमधील कालसंबद्ध बदलांप्रमाणे बदलणाऱ्या असतात.

धर्म हाच संदर्भ बिंदू मानून पू. गुरुजी आणि पं. दीनदयाळ उपाध्याय यांनी अनेक सूचना या संदर्भात केल्या आहेत. राष्ट्रीय पुनर्निर्माणाच्या भावी कार्याच्या संदर्भात त्या मार्गदर्शक ठरू शकतात.

मागील भागात श्री. गुरुजींनी १९७२ च्या ठाणे येथील बैठकीत आर्थिक नीतीच्या संदर्भात मांडलेल्या अनेक कल्पनांचा उल्लेख केलेला आहे.

संविधान, लोकप्रतिनिधित्व अशाही अनेक विषयांवर त्यांनी काही विचार मांडले आहेत. त्यांची ठाणे येथील भाषणे म्हणजे प्रकाशाचा निरंतर स्रोत आहे. या भाषणांच्या ओघात त्यांनी सामाजिक - आर्थिक, राजकीय - धार्मिक आणि अन्य साऱ्या

पुनर्रचनांसाठी हिंदुत्वाच्या सत्त्वस्थ चैतन्याच्या आणि मूलभूत सिद्धांतांच्या आधारावरील मार्गदर्शक तत्त्वांचे विवरण केले आहे.

पू. गुरुजींनी असे मत ठामपणे मांडले होते की प्राथमिक अशा निम्नतम घटकाच्या निवडणुका या एकमताने व्हाव्यात. जोपर्यंत एकमत होत नाही तोपर्यंत निवडणूक नाही. आपल्यासारख्या वेस्टमिन्स्टरच्या वातावरणातील लोकांना ही कल्पना भंपकपणाची वाटेल. पण हे लक्षात घेण्याजोगे आहे की प्रेषित महमदानेही काही वेळेला याच प्रकारची निवडणूक पद्धती सुचविली आहे. अशा निवडणुकीसाठी गुणवत्तेचा निकष कोणता असावा असे विचारले असता त्याने सांगितले, 'ज्याला अमीर होण्याची अजिबात इच्छा नाही अशाला अमीर म्हणून निवडावे.'

मागे वेस्टमिन्स्टर नमुन्याच्या पक्षपद्धतीच्या मर्यादांबद्दल चर्चा झाली आहे.आपल्या समाजाच्यादृष्टीने तर ही पक्षपद्धती अगदीच योग्य नाही असेही आपण पाहिले आहे. त्यावरून हेही स्पष्ट होते की वेगवेगळ्या विषयांसाठी वेगवेगळी व्यासपीठे आवश्यक आहेत आपला समाज हा बहुविध आहे.त्यामुळे विविध मते व्यक्त करणाऱ्या लोकांच्या आकांक्षांची पूर्ती करण्यासाठी वेगळ्या प्रकारच्या संस्थात्मक रचनेची आवश्यकता आहे. हे विविध विषय राजकीय पक्षाच्या एकाच छत्राखाली घेता येत नाहीत आणि म्हणून या हेतूने आपल्या परंपरेचे सत्त्व लक्षात घेऊन आपण वेगळ्या प्रकारची संस्थात्मक रचना विकसित केली पाहिजे. अशी रचना विकसित करण्यासाठी कोणती मार्गदर्शक तत्त्वे असावीत ?

सुदैवाने ठाणे येथील बैठकीत श्री. गुरुजींनी अशी मार्गदर्शक तत्त्वे सांगितली आहेत.

या संदर्भात श्री. गुरुजींनी सुचविलेली महत्त्वाची कल्पना ही व्यवसायात्मक कार्याच्या प्रतिनिधित्वाची आहे. उत्पादनाच्या आणि विनिमयाच्या नव्या तंत्रामुळे जवळजवळ ३००० पारंपरिक व्यवसाय हे कालबाह्य ठरले किंवा तोट्यात आले आणि नवे व्यवसाय अस्तित्वात आले. यामुळे पारंपरिक जातिव्यवस्थाही मोडकळीला आली. आधुनिक तंत्रज्ञानाच्या अप्रतिहत आक्रमामुळे याहूनही अधिक कुशल अशा व्यवसायांचा उद्भव होईल व त्यामुळे आंतरव्यावसायिक स्थित्यंतरे फार मोठ्या प्रमाणात होतील हे पू. गुरुजींनी ताडले होते. औद्योगिक अथवा व्यवसाय निहाय अशा गटांचे संघटन आणि दृढीकरण यांच्या प्रक्रियेचा पाठपुरावा करून या गटांना निर्वाचित संस्थांवर सुयोग्य प्रतिनिधित्व दिले गेले पाहिजे. व्यावसायिक संघटना, व्यापार विषयक संस्था, अभियांत्रिकी संस्था, भारतीय आयुर्विज्ञान संघटन, वस्तुनिहाय उपभोक्त्यांच्या संस्था, तंत्रज्ञांच्या संघटना वगैरेंची भूमिका याबाबत साहाय्यभूत होईल असे त्यांना वाटत होते. तरी अजूनही शेतकरी, व्यवस्थापक आणि तंत्रज्ञ यांचे गट, स्वयंरोजगाराचे कारागीर, शेतमजूर आणि वनमजूर इ. समाजातील बहुसंख्य लोक असंघटित आहेत. व्यवसायनिहाय प्रातिनिधिकतेचे तत्त्व यशस्वीपणे अमलात आणण्यासाठी त्यांच्या

व्यावसायिक संघटना बांधण्याच्या कामाला गती दिली पाहिजे असे त्यांचे मत होते.

(अशाच प्रकारची प्रतिनिधित्वाची कल्पना योगी अरविंदांनी 'हितसंबंधांमधील स्वारस्याचे शासन' [Government of interests] म्हणून सांगितली आहे)

आधुनिक जगातही व्यवहार्य

प्रांजलपणे हे मान्य केले पाहिजे की आम्ही जेव्हा ते सारे ऐकत होतो तेव्हा मी किंचित अस्वस्थच होतो. आमची श्री. गुरुजींच्या नेतृत्वावर, मार्गदर्शनावर आणि त्यांच्या मतांमधील तथ्यांवर अढळ श्रध्दा होती. त्याबाबत प्रश्नच नव्हता.

पण तरीही, त्यांच्या सर्व कल्पना, त्यांनी सामाजिक, आर्थिक आणि इतर रचनांबाबत हिंदू जीवनदृष्टीतून लावलेला अन्वय हे सारे दुसऱ्या औद्योगिक क्रांतीनंतरच्या युगात व्यवहार्य ठरू शकेल का या बाबत मी जरा सांशकच होतो.

पण हे सांगायला अतिशय आनंद वाटतो की या त्यांच्या ठाणे येथील व्याख्यानांनंतर ५ वर्षांनी मी जेव्हा युगोस्लव्हियाला भेट दिली तेव्हा मी सुखद आश्चर्यानि चकित झालो.

युगोस्लाव्हियाने अवलंबिलेली घटना, विकसित केलेली व्यवस्था ही श्री. गुरुजींनी ठाणे येथे सांगितलेल्या संकल्पनेच्या जवळ येणारी होती. –मी असे म्हणत नाही की त्या दोन्ही पूर्णत: समान होत्या. – पण त्यांच्यात लक्षणीय साम्य होते हे निश्चित!

आणि मी जेव्हा युगोस्लाव्ह प्रयोगाचा अभ्यास केला तेव्हा माझा साशंक डळमळता विश्वास पक्का झाला की श्री. गुरुजींनी प्रतिपादलेली प्रणाली व सुचविलेली रचनात्मक व्यवस्था या, आधुनिक जगातही व्यवहार्य ठरू शकतील.

मागे उल्लेखिल्याप्रमाणे काही अवांतर, बाह्य कारणांमुळे युगोस्लाव्हियातील हा प्रयोग खंडित झाला पण कधीच एकात्म राष्ट्र नसलेल्या व एकात्म होऊ न शकलेल्या युगोस्लाव्हियात हा प्रयोग राबवला गेला हीच स्पृहणीय गोष्ट आहे आणि श्री. गुरुजींनी मांडलेल्या संकल्पनेशी असलेल्या साम्यामुळे त्यातील अनेक पैलूंच्या अभ्यासाला प्रोत्साहन मिळाले पाहिजे. म्हणून कधीच एकात्म नसलेल्या युगोस्लाव्हियामध्ये हा प्रयोग फसला असला तरी त्याचे महत्त्व आपल्या दृष्टीने कमी ठरत नाही.

आतापर्यंत आलेल्या या विषयावरील विविध संदर्भांवरून हे स्पष्ट होते की आमचे सर्वांगीण राष्ट्रीय पुनर्निर्माण हे राजसत्तेच्या नव्हे तर लोकशक्तीच्या आधारावरच हिंदू जीवनदृष्टीला अभिप्रेत आहे.

श्री. गुरुजींच्या या संकल्पनांप्रमाणेच पं. दीनदयाळजींनी मांडलेली 'जनपद' ही कल्पनाही विकेंद्रित शासनाची हिंदुकल्पना म्हणून आजही प्रस्तुत ठरते. त्यांनी अशा शासनाचा प्रस्ताव पुढे मांडला की जे एककेंद्री असूनही त्याला कमीत कमी अधिकार असतील. जनपदांच्या द्वारा निम्नतम अशा घटकांपर्यंत व्यापक असे विकेंद्रीकरण

झालेले असेल. त्यांचे 'जनपद' म्हणजे स्थानीय वैशिष्ट्य असलेले क्षेत्र होय.

पं. दीनदयाळजींची दूरदृष्टी आता शंकेखोर विचारवंतांनाही भावू लागली आहे आणि अनेक आंदोलनानंतर, तेलंगण, विदर्भ, उत्तरखंड, बुंदेलखंड, वनांचल, गोरखालँड, नागालँड, मिझोराम हे प्रदेश पंडितजींनी मांडलेल्या 'जनपद' या कल्पनेत बसू शकतात, याची त्यांना जाणीव झाली.

'पं. दीनदयाळ शोध संस्थान'च्या नागपूर केंद्राने एप्रिल १९८८ मध्ये 'भारतीय राजकीय व्यवस्था' या विषयावर एक परिचर्चा आयोजित केली होती. आतापर्यंतच्या मागील सर्व चर्चेतून निष्पन्न होणारे निष्कर्ष तर त्यात प्रतिबिंबित झालेले आहेतच. पण पू. गुरुजी व पं. दीनदयाळजी यांच्या आताच वर स्पष्ट केलेल्या विचारसंकल्पनांचे संदर्भही त्या मुद्यांमध्ये आलेले आहेत. त्यावरून हिंदू राष्ट्राच्या पुनर्निर्माणाची दिशा व आशय स्पष्ट होण्यास मदत होईल. प्रस्तुत परिचर्चेतून बाहेर आलेले मुद्दे असे -

१) स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतात ब्रिटिशांनी त्यांच्या सर्वाधिपत्याखाली एका विपर्यस्त संसदीय व्यवस्थेचा अमल सुरू केला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरची आपली संसदीय व्यवस्थाही भारतीय मानसाला सुसंगत नाही.

२) भारतीय राजकीय व्यवस्था व भारताची घटना ही त्याच्या खोलवर रुजलेल्या परंपरेशी सुसंगत असणे आवश्यक आहे. 'धर्मराज्य' हा आदर्श असला पाहिजे. त्या 'धर्म' कल्पनेचा, पंथ (Religion) या कल्पनेशी गोंधळ करता कामा नये. धर्म म्हणजे समाजाची धारणा करणारा सर्वोच्च असा मानवी वर्तनाचा कायदा आणि त्याचे राजसंस्थेवरील नैतिक अधिकाराचे प्रभुत्व हे याठिकाणी धर्मराज्य या कल्पनेत अभिप्रेत आहे!

धर्म हा केवळ आर्थिक वा राजकीयच नव्हे तर सर्वच मानवी गरजांबद्दल तो एकात्म दृष्टिकोण बाळगतो. माणसामाणसाचे आणि माणूस व पर्यावरण यांचे परस्परावलंबित्व तो ध्यानात घेतो. व्यक्तीच्या, समष्टीच्या, राष्ट्राच्या आणि अखिल मानव्याच्या खऱ्या गरजांची परिपूर्ती करण्याचा त्याचा ध्यास असतो. म्हणून सर्वच पंथांना त्यांच्या त्यांच्या सामाजिक, नैतिक तत्त्वांप्रमाणेच त्याच्याबद्दल आत्मीयता वाटण्याची शक्यता आहे. 'धर्मराज्य' या संकल्पनेत सर्व पंथांना समान अशा नैतिक, कायदेविषयक तत्त्वांचा समावेश आहे, हे घटनेच्या प्रास्तविकात स्पष्ट केले जावे.

३) अशा या कल्पनांची व्याख्या जर पुरेशी स्पष्ट झाली तर त्यामुळे मानवाची सेवा ही ईश्वराच्या सेवेसारखीच मानली जाईल आणि त्यामुळे राजकारणाचे अध्यात्मीकरण होईल. त्यामुळे राजकारणावर नैतिकतेचे प्रभुत्व प्रस्थापित होईल.

४) प्रचलित लोकशाहीवादी, साम्यवादी आणि भांडवलवादी अशा विचारप्रणाली आधुनिक जगात लयास जाण्याच्या मार्गावर आहेत. आपल्याला धनाढ्य वर्गाची वर्गसत्ता अथवा कामगारांची वर्गसत्ता यांचा त्याग केला पाहिजे. आपले उद्दिष्ट सर्वांचे सर्वांगीण कल्याण हे असले पाहिजे.

५) टोकाचा इहवाद आणि व्यक्तिवाद ही पश्चिमी संस्कृतीची खूण आहे. त्यामुळे व्यक्तीच्या अथवा पक्षाच्या भौतिक हितसंबंधासाठी पश्चिमी संसदीय व्यवस्था ही कार्यान्वित केली जाते. जेव्हा अशी व्यवस्था आपल्या भूमीवर राबवली जाते, तेव्हा लोक आपले प्रतिनिधी मोठ्या प्रमाणावर जातिनिहाय वा पंथीय जातीय पायावर निवडून देण्याकडे प्रवृत्त होतात. याच्या उलट राष्ट्रीय पातळीवरच्या प्रमुखांना पालक म्हणून गणणाऱ्या शासनपद्धतीची निवड भारताने करावी. म्हणजेच राष्ट्रपालक, प्रांतपालक, ग्रामपालक अशा सर्वांची प्रौढ मतदानाच्याद्वारा थेट निवडणूक झाली पाहिजे. त्यांनी स्वत:चे सल्लागार नेमावेत. या पद्धतीमुळे सर्व पातळींवर काम करण्यासाठी उत्तम व्यक्ती लाभतील आणि समाजाचे परिवर्तन होईल. याला भारतीय पद्धतीची अध्यक्षीय पद्धती म्हणता येईल.

६) प्रादेशिक पातळींवर, व्यावसायिक प्रातिनिधिकतेवर आधारलेल्या, साधकबाधक विचार करणाऱ्या एककेंद्री वैधानिक समित्या असाव्यात. त्यामुळे सर्व खऱ्या हितसंबंधी गटांच्या प्रातिनिधिकतेची निश्चिती होईल. जातिविचाराला पायबंद बसून व्यवसायाधिष्ठित सामाजिक व्यवस्था निर्माण होईल. केवळ राष्ट्रीय पातळीवर दोन सभागृहे असावीत. एक प्रादेशिक तत्त्वावर आधारित प्रतिनिधित्व करणारे आणि दुसरे व्यवसायावर आधारित प्रतिनिधित्व करणारे !

७) राजकीय व आर्थिक विकेंद्रीकरण हा राजकीय व्यवस्थेचा कणा असला पाहिजे. भारतीय प्रतिभा विविधतेतील एकात्मतेचा ध्यास घेते. त्यामुळे विकेंद्रीकरण हा राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने काळजीचा मुद्दा असण्याचे कारण नाही. राज्ये आकाराने लहान असावीत आणि त्यांना प्रदेश किंवा प्रांत म्हणावे. हे प्रदेश आणि अन्य स्थानिक समित्या पुरेशा राजकीय आणि आर्थिक अधिकारांसह स्वायत्तपणे काम करणाऱ्या असाव्यात.

८) प्रतिपक्षी-परस्परविरोधी भूमिका घेणारी राजकीय पक्षपद्धती भारतीय प्रतिभेला विरोधी आहे. भारतीय परंपरा ही 'सत्य, संपूर्ण सत्य, सत्यावाचून अन्य काही नाही' अशा शोधाचा ध्यास घेणारी आहे. उलटपक्षी सत्याविषयी एकांगी दृष्टी बाळगणारी राजकीय पक्षांची प्रवृत्ती असते. त्यांची पक्षपाती भूमिका राष्ट्रहितविरोधी अशा त्यांच्या व्यक्तिगत अथवा गटनिहाय हितसंबंधासाठी कार्यरत असते. त्यामुळेच आपल्या येथे पक्षरहित लोकशाही असणे आवश्यक आहे.

९) विचारस्वातंत्र्य आणि आविष्कारस्वातंत्र्य, सहिष्णुता, बहुमताने निर्णय घेण्याऐवजी सर्वाभिप्रायाने निर्णय, अहिंसक मार्गाने परिवर्तन, विकेंद्रीकरण, विधिमंडळातील मताविष्कार नियंत्रित करणाऱ्या पक्षप्रतोदाच्या कल्पनेपेक्षा आणि शासकीय नोकरशाहीच्या वर्चस्व असलेल्या अर्थव्यवस्थेपेक्षा भिन्न अशा प्रकारची राजकीय व आर्थिक क्षेत्रांमधील स्वायत्तता हे सर्व भारतीय लोकशाहीचे सार आहे. गरज आहे ती या तत्त्वांभोवती सुसंगत अशी संस्थात्मक रचना करण्याची !

१०) परस्पर-समायोजन आणि सहकार्य हा अस्तित्वाचा मूलभूत नियम आहे. वर्गसहकार्य हा नियम असावा आणि वर्गसंघर्ष हा अपवाद ठरावा.

११) निम्नतर घटकांचे आर्थिक परावलंबन दूर झाले पाहिजे.

१२) स्थानिक पातळीवर लोकन्यायालयांची व्यवस्था आवश्यक आहे. न्यायविषयक अधिकाऱ्यांसाठी घटनेमध्ये मार्गदर्शक तत्त्वे दिली जावीत.

१३) राजकीय सत्ताधीशांसाठी आवश्यक अशा आचार संहितेचा समावेश घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये करावा. शिवाय ज्या ज्या ठिकाणी मार्गदर्शक तत्त्वांचा भंग होईल, अशा सर्व प्रकरणांमध्ये चौकशी करण्याचे वैधानिक अधिकार असलेली 'आचार्य कुले' अथवा 'जेष्ठांचे गट' प्रादेशिक रचनेच्या प्रत्येक पातळीवर असावेत अशी तरतूद केली पाहिजे.

१४) पश्चिमी प्रभावाखाली विघटित होऊ पाहणारी कुटुंब व्यवस्था जोपासली पाहिजे. भर 'समाज विरुद्ध व्यक्ती' यावर नव्हे तर 'समाजामधील व्यक्ती' यावर हवा.

१५) इंग्रजीच्या वर्चस्वाने लोकांचे सत्त्व फुलण्यावर बंधन आले आहे. इंग्रजीच्या जागी, बहुसंख्य लोकांना समजेल अशी भाषा प्रस्थापित केली पाहिजे. हिंदी हीच केवळ एकत्र जोडणारी भाषा असू शकते. वेगवेगळ्या भाषांमध्ये भाषांतर करण्याला फार व्यापक वाव निर्माण केला पाहिजे.

सत्तावादविरहित शासन

श्री. गुरुजी व पं. दीनदयाळ उपाध्याय यांच्या 'सत्तावादविरहित राजसत्तेच्या' कल्पनेत हिंदू समाजव्यवस्थेची ही पारंपरिक आदर्श संकल्पना अभिप्रेत होती. महर्षी अरविंदांनीही तिचे अतिशय मार्मिक विवरण केले आहे.

हिंदूंची विश्वराज्याची कल्पना

या दृष्टीने पाहता धार्मिक गट, वांशिक गट, आंतरराष्ट्रीय व्यापारी संघटना, पर्यावरणवादी चळवळी, मानवाधिकार संघटना, कल्याणकारी संस्था आणि सर्वसाधारण सुसंस्कृत समाजातील योग्य त्या यंत्रणा अशा साऱ्यांच्या प्रतिनिधींचा समावेश करून यूनोचे पुनर्गठण करणे हाच खरे म्हणजे प्रामाणिक जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला लक्षणीय मदत करणारा उपाय ठरला असता. त्याऐवजी काय पुढे आणले जात आहे तर अमेरिकी आर्थिक साम्राज्यवादाचे हत्यार असलेली जागतिक व्यापारी संघटना! (हे आवर्जून लक्षात घेतले पाहिजे की यूनोची पूर्वगामी जागतिक संघटना जी लीग ऑफ नेशन्स तिची अमेरिका सदस्यही नव्हती. या विशिष्ट परिस्थितीचा अभिप्रेत अर्थ, अभ्यास करण्याजोगा आहे.) म्हणून हिंदूंची विश्वराज्याची कल्पना मौलिक ठरते. 'आत्मनो मोक्षार्थम् जगत् हिताय च।' या हिंदूंच्या ध्येयसंकल्पनेत सर्व जगाच्या

हितालाही प्राधान्य आहेत. त्यामुळे सत्तावादविरहित शासनाची कल्पना ही आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत विकसित करावयाची होती, या प्रकारच्या मानसिकतेतूनच आमच्या ऋषींनी, 'पृथिव्यै समुद्रपर्यंताया एक राष्ट्र' अशा शब्दसंहितीतून 'एक विश्वराज्य' संकल्पिले होते; पण हे विश्वराज्य आजच्या एककेंद्री वर्चस्ववादी स्वरूपाचे नव्हते.

आधुनिक काळात अशाच तऱ्हेचा भव्य संकल्प पुढील शब्दांत बिपिनचंद्र पाल यांनी व्यक्त केला आहे -

'आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या जागी आंतरराष्ट्रीय सहकार्य प्रस्थापित करणे, सर्व आंतरराष्ट्रीय वादांच्या व मतभेदांच्या सोडवणुकीसाठी, घातक शस्त्रास्त्रांच्या कडव्या प्रयोगाऐवजी शांततापूर्ण सल्लामसलतीचा निश्चय करणे व नि:पक्षपाती आंतरराष्ट्रीय सर्वोच्च न्यायालयाद्वारा न्यायोचित तडजोड घडवून आणणे हे या प्राचीन भूमीचे व तिच्याशी संलग्न असलेल्या अशा आधुनिक युरोप, आशिया व अमेरिका यांच्यांतील देशांमधील लोकांचे महान जीवितकार्य ठरते. अशाच कार्याद्वारा मानवातील परमेश्वरी तत्त्वाचा साक्षात्कार घडवून आणणे, सर्वांच्या समान कल्याणप्रद प्रगतीसाठी जगातील सर्व राष्ट्रांचा एक समाज बनविणे व अशारीतीने शांततापूर्ण सहजीवन प्रस्थापित करून कविमनातील युगायुगांचे स्वप्न साकार करण्यास साहाय्यभूत होणे हाही या जीवितकार्याचाच एक भाग आहे.'

भारतीय राष्ट्रबांधणी करणाऱ्या प्रत्येकाने हे सतत नजरेसमोर ठेवले पाहिजे.'

(The great mission this ancient land and its composit people among the modern nations of Europe, Asia and America, is to replace existing international competition by international co-operation, to substitute the arbitrament of peaceful consultation and reasonable compromise through an impartial international Supreme Court, for the arbitrament of murderous arms, in the settlement of all international disputes and differences, thus to help forward the realisation of the poet's dream of millennium, when the nations of the world shall be as One People, living at peace with one another, working together for the furtherance of the common good and the revelation of God in man.

The Indian nation-builder must constantly keep this before him.)

आणि म्हणूनच जेव्हा पं. दीनदयाळ उपाध्यायांनी विश्वराज्याची कल्पना मनासमोर साकार केली, त्यावेळी विविध राष्ट्रीय संस्कृतींच्या विकसनातून, योगदानातून, त्याचप्रमाणे इहवादासह सर्व धर्मांच्या परिपूर्णतेतून समृद्ध बनलेल्या मानवधर्माच्या फुलोऱ्याची कल्पना केली होती व अशा फुलोऱ्यातूनच सत्तावादविरहित जागतिक केंद्रीय शासनाच्या उत्क्रांतीच्या संभाव्यतेचा त्यांनी आपल्या प्रज्ञाचक्षूंनी वेध घेतला होता.

जागतिक विचारसंपुटातील हिंदू विचाराची भर

अशी व्यवस्था अस्तित्वात येण्यासाठी श्री. गुरुजी म्हणतात. त्याप्रमाणे 'सर्वात्मकता' अथवा 'सर्वं खलु इदं ब्रह्म' हे वेदान्ती सत्य याची अनुभूती मानवतेला दिली पाहिजे. ज्या प्रमाणात हा साक्षात्कार होईल, त्या प्रमाणातच वैश्विक ऐक्य व मानवी कल्याण हे प्रत्यक्षात येईल अशी त्यांची धारणा होती आणि 'सर्व एकच आहे' म्हणताना, विविध राष्ट्रांच्या वैशिष्ट्यपूर्ण घटकांचा लय करून एकाच एका साच्यात सर्वांना बसविणे हे श्री गुरुजींना अभिप्रेत नव्हते. उलट स्वत:च्या अंगभूत वैशिष्ट्यांची जपणूक करूनही मानव्याच्या आंतरिक एकात्मतेच्या जाणिवेने एका कौटुंबिक भावनेने एकत्र येणारे विविध मानवी समूह त्यांनी कल्पिले होते. व्यक्तीच्या अथवा एखाद्या समूहाच्या विशेष गुणधर्माचा विनाश हा त्यांच्यातील परस्पर एकमेळाच्या अकृत्रिम सौंदर्याचीच हानी करील असे नाही तर त्यांच्या त्यांच्या आत्मविष्कारातील आनंदाचाही विलय करील. त्यामुळेच विविध आणि परस्पर-असंगत अशाही वैशिष्ट्यांमध्ये सुमेळ निर्माण करणे ही आमच्या संस्कृतीची जागतिक विचारसंपुटातील खास भर होती. श्री. गुरुजींनी म्हटले आहे -

'आमच्या संकल्पनेतील जागतिक शासन हे स्वयंशासित व स्वयंपूर्ण अशा राष्ट्रांच्या, समान सूत्रात बांधलेल्या संघराज्यात विकसित होईल. जागतिक ऐक्याचा भव्य असा हिंदुविचारच मानवी बंधुतेला आधारभूत असा बंध होऊ शकतो. या भूतलावरील लहानात लहान अशा प्रत्येक जीवनचैतन्याच्या वैशिष्ट्यालाही त्याच्या त्याच्या पूर्ण आणि मुक्त विकासाला बाब देऊन मानवतेच्या सौख्यासाठी पराकाष्टा करण्याची उदात्त ऊर्मी निर्माण करणारे आंतरात्म्याचे भान मानवी मनाला भारून टाकील, हाच तो हिंदुविचार आहे. जर काही वैश्विक ध्येयव्रत असेलच तर ते हेच एकमेव व्रत आहे.'

(The World State of our concept will envolve out of a federation of autonomous and self-contained nations under a common centre linking them all... it is the grand world-unifying thought of Hindus alone that can supply of abiding basis for human mind with the sublime urge to toil for the happiness of mankind, while opening out full and free scope for every small life- speciality on the face of the earth to grow to its full stature. Verily this is the one real practical world-mission, if ever there was one.)

पश्चिमी विचारवंतांना कळणे कठीण

वैश्विक व्यवस्थेसंबंधातील ही हिंदू कल्पना आहे. सर्व समाजातील हिंदुत्वाचा सांस्कृतिक भाव! त्याच्या अभावी हे जग लीग ऑफ नेशन्स अथवा यूनो या

प्रयोगांपुढे जाऊ शकणार नाही.

अर्थात पश्चिमेचा भौतिक, मानसिक, बौद्धिक आणि आध्यात्मिक विकासाचा इतिहास मूलतः भिन्न असल्यामुळे तिकडील सद्हेतूने प्रेरित झालेल्या पश्चिमी विचारवंतांनाही ही संकल्पना समजायला वेळच लागेल.

तिसऱ्या पर्यायासाठी मानवजातीचा आकांत

आज पश्चिमी विचारव्यूहांच्या दयनीय अपयशानंतर अंधारात चाचपडणाऱ्या जगाला नवे नेतृत्व देण्यासाठी नियतीने भारताला आवाहन केले आहे. 'तिसरा पर्याय' म्हणून उल्लेख होत असलेल्या पर्यायासाठी मानवजातीचा आकांत चाललेला आहे. वस्तुतः जो एकमेवच पर्याय आहे, असा तिसरा पर्याय देण्याची नैतिक व ईश्वरदत्त जबाबदारी भारतावर आहे. राष्ट्रीय पुनर्निर्माणाच्या ध्येयाशी समर्पित असलेला राष्ट्रभक्तांचा वर्गच* या कामाला लायक आहे. तो नवीन समग्र वैश्विक जीवनदृष्टिकोण (Weltanschaung) तयार करण्यामध्ये कळीची भूमिका बजावेल.

□ □ □ □

संदर्भ टीपा

१. सिंडिकॅलिस्ट (Syndicalist) - उद्योगाची मालकी व व्यवस्थापन, उत्पादनसाधनांवर ताबा, वितरणाचे हक्क या साऱ्यांच्या द्वारा शेवटी सर्व समाजाचे नियंत्रण करण्याचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवणाऱ्या कामगार संघटनेचे सदस्य - हा कामगार संघटनेचा प्रकार प्रथम फ्रांसमध्ये उदयाला आला.

२. मॅकियावेलीसारखे (Machiavellian) निकोली मॅकियावेली (Niccolo Machiavelli 1469-1527) फ्लोरेन्सचा मुत्सद्दी व लेखक, त्याच्या धूर्त, पाताळयंत्री, विधिनिषेधशून्य, संधीसाधू, विश्वासघातकी राजकारणामुळे प्रसिद्ध, त्याच्या राजव्यवहारासारखा कारभार म्हणजे 'मॅकियावेलीयन' हा सामान्य विशेषणात्मक शब्द रूढ झाला आहे.

३. ट्युटॉनिक (Teutonic) इ. स. पूर्व ४ थ्या शतकातील ट्यूटन या जर्मेनिक टोळीच्या विशिष्ट सामूहिक मानसिकतेच्या संदर्भातील उल्लेख.

---

* हा उल्लेख अ. भा. अधिवक्ता परिषदेच्या वकील कार्यकर्त्यांचा आहे.

तिसऱ्या पर्यायाचा अटळ वेध –

आतापर्यंत पाहिलेल्या विषयांवरून, हिंदू जीवनदृष्टीतून सिद्ध होऊ शकणाऱ्या, मानवी जीवनाच्या एकूण विकाससंकल्पनेच्या विविध पैलूंच्या संदर्भातील तिसऱ्या पर्यायाचा वेध आपल्याला संकलित करता येतो. अर्थात त्यासाठी प्राप्त वास्तव व काही मूलभूत धारणा या अधोरेखित करणे आवश्यक आहे.

विविध समस्या - कारण एकच !

'दिशावेध प्रारूपा'त मानव जातीला संत्रस्त करणाऱ्या, आपल्या देशातील व जागतिक यथार्थ वर्तमान चित्रातील असंख्य प्रश्नांच्या नोंदी झाल्या आहेत. आत्महत्येसारखे आत्यंतिक पर्यवसन होणाऱ्या अशा व्यक्तिगत मानसिक भंगलेपणापासून वैश्विक व्यवस्थेच्या समस्येपर्यंत प्रत्येक पातळीवर आपल्याला समस्याच समस्या दिसतात. काही प्रश्न प्रादेशिक पातळीवरील आहेत. उदा. मला केरळमधील 'मरुमकतायम्' किंवा मातृसत्ताक पद्धतीची आठवण येते. केरळापुरतीच वैशिष्ट्यपूर्ण असलेली ही अनेक शतकांची पद्धती, एकूण तेथील सामाजिक आर्थिक परिस्थितीवर काय काय परिणाम घडवित आली आहे? अशा प्रादेशिक प्रश्नांपासून ते राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळींपर्यंत अनेक प्रश्न आहेत. आपल्याकडे जाणवणाऱ्या अनेक प्रश्नांना जागतिक मितीही आहेत, हेही आपण जाणतो. उदा. पर्यावरण-असंतुलन आणि अण्वस्त्रांच्या प्रसारातून निर्माण झालेले प्रश्न! काही विशिष्ट देशांशी संलग्न असलेले प्रश्न आहेत. उदा. अमेरिकेतील निग्रोंचा प्रश्न, आपल्या देशात अजूनही अस्तित्वात असलेली अस्पृश्यता! पण हे असे अनंत प्रश्न म्हणजे एकाच निर्वाणीच्या समस्येची भिन्न भिन्न रूपे आहेत. पश्चिमेची संकीर्ण विचार करण्याची पद्धती हेच सर्व पातळींवरील अशा सर्व प्रकारच्या समस्यांच्या मुळाशी असलेले एकच एक गतिशास्त्र आहे हे एका विद्वान लेखकाचे मत पश्चिमी जीवनाच्या वैशिष्ट्यांच्या संदर्भात पूर्वी उल्लेखिलेले आहे. आपल्या दृष्टीने विचार केला तर राष्ट्रीय जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आपण अनेक विकारांनी जर्जर आहोत. प्रादेशिकवाद, भाषिकवाद,

जातिवाद, जातीयवाद, सांप्रदायिकता व अन्य फुटीरतावादी प्रवृत्ती यांचेही आपण बळी आहोत. पण बारकाईने चिकित्सा केली तर लक्षात येते की अशा सर्व प्रश्नांच्या मुळीशी एकच एक वस्तुस्थिती आहे. जीवनाचा समग्र एकात्म विचार करण्याच्या आपल्या स्वभावापासून, स्वधर्मापासून आपले स्खलन झाले आहे, हेच आपल्या दुखण्याचे मूळ कारण आहे. पण त्याच बरोबर हेही लक्षात घेतले पाहिजे की आपल्या स्वधर्मनिच एकेकाळी आपल्याला उच्चतम पातळीवर नेले होते.

त्या दृष्टीने आपण हेही लक्षात घेतले पाहिजे की आपल्या मूळ विचारप्रक्रियेचाच आधार आपल्याला घ्यावा लागेल. अनुमित गृहीतकांवर आधारलेल्या (Hypothetical), तात्त्विक, शैक्षिक अशा प्रणालींची प्रथम सिद्धता व नंतर तिच्यात सामाजिक वास्तव बसविण्याचा प्रयत्न ही पश्चिमी विचारपद्धती आहे आणि प्रथम समाजवास्तवातील तथ्यांचा वेध, आकलन व त्यावरून स्वाभाविकपणे विकसित होणारे निष्कर्षवजा सिद्धान्तन ही हिंदू विचारप्रक्रिया आहे. असा दोन्ही पद्धतींमधील फरक 'संदर्भ चौकट हिंदू जीवनदृष्टी' या भागात स्पष्ट केला आहे. त्यामुळे विचार करताना हिंदू विच्चारप्रक्रियेच्या अनुसरणातूनच विचार केला पाहिजे. त्यासाठी सामूहिक चिंतनही पाहिजे.

स्व - भाव व स्व - धर्म जागविणे अत्यावश्यक

म्हणूनच स्वभाव व स्वधर्माकडे पुन्हा वळले पाहिजे. श्री. गुरुजींनी एका ठिकाणी म्हटले आहे -

'आमच्या समाजाच्या आंतरिक एकात्मतेच्या आत्मतत्त्वाचे व त्याच्या जीवितहेतूचे पुनर्जागरण करणे हीच या युगाची सर्वोच्च साद आहे. बाकी सर्व गोष्टींची मग आपोआपच काळजी घेतली जाईल.'

(The supreme call for the time is to revive the spirit of inherent unity and the awareness of its life-purpose in our society. All other things will take care of themselves)

या आत्मतत्त्वाच्या जागरणातून होणारे राष्ट्रीय इच्छाशक्तीचे उत्थान हे केवळ राष्ट्रीय पुनर्निर्माणाचे कार्य सिद्ध करण्यासाठीच नव्हे तर श्री. गुरुजींनी आपल्यासमोर पाहिलेल्या हिंदू राष्ट्राच्या वैश्विक सफलतेसाठीही आवश्यक आहे: श्री. गुरुजींनी एका वक्तव्यातून हे स्पष्ट केले आहे की, 'सर्वं खलु इदं ब्रह्म' या वैदिक सत्याच्या अनुभूतीतूनच वैश्विक ऐक्य व मानवी कल्याण यांना बळ प्राप्त होईल. म्हणून हिंदू विचार प्रस्थापित करणे हेच या प्राचीन हिंदू समाजाचे विश्वव्रत आहे. पं. दीनदयाळ उपाध्यायांनी प्रतिपादिलेली पूर्वोल्लिखित सत्तावादविरहित केंद्रीय जागतिक शासनाची संकल्पनाही याच ध्येयव्रताचा भाग म्हणूनच आली आहे.

हीच जगत्कल्याणाची हिंदू संकल्पना योगी अरविंदांनी स्वत:च्या विचारात सविस्तरपणे स्पष्ट केली आहे. त्यासाठी एकूणच मानवी समाजाच्या 'सामूहिक अध्यात्मीकरणाची'

आवश्यकता प्रतिपादिली आहे. याच वैचारिक, दार्शनिक मानसिकतेमुळेच आमच्या प्राचीन ऋषींनी एक वैश्विक शासन मनासमोर साकार केले होते. 'पृथिव्यै समुद्रापर्यंताया एक राष्ट्र।'

अशा प्रकारच्या सत्तावादविरहित केंद्रीय जागतिक शासनाच्या कल्पनेतून सिद्ध होणारे मानवी समाजाचे खरे वैश्विकीकरण आणि आज प्रचलित असलेले प्रभुत्ववादी, वर्चस्ववादी जागतिकीकरण कधीही एकत्र जाणारे नाही.

संस्कारप्रक्रियेवर भर

या दृष्टीनेच पूर्वी उल्लेखिलेल्या १९७२ च्या ठाणे बैठकीत श्री. गुरुजींनी या प्राचीन राष्ट्रजीवनाशी पूर्ण एकात्म करणाऱ्या संस्कारातूनच खऱ्या अर्थाने सामाजिक-आर्थिक व्यवस्थेचा पायाभूत चौथरा सिद्ध होईल हा विचार मांडला होता व या संस्कारप्रक्रियेवर भर दिला होता.

यादृष्टीने सर्व हिंदू संस्कारांमध्ये 'यज्ञ-संस्कार' अतिशय महत्त्वाच्या संस्कारापैकी एक मानला जातो. 'यज्ञ' या संकल्पनेतील सार्थता स्वामी रामतीर्थांनी स्पष्ट केली आहे.

'चांगल्या गोष्टीसाठी आपण सर्वांनी हात एकत्र जोडणे हा इंद्रासाठी केलेला यज्ञ होय. आपली मस्तके जगत्कल्याणासाठी एकत्र आणणे हा बृहस्पतीसाठी केलेला यज्ञ होय. आपली अंत:करणे जुळविणे हा, अंत:करणाची देवता चंद्र, तिच्यासाठी केलेला यज्ञ आहे. थोडक्यात देवांसाठी केलेला यज्ञ म्हणजे सर्व हातांसाठी अथवा संपूर्ण राष्ट्रासाठी माझे हात देणे, माझे डोळे सर्वांच्या डोळ्यांना वा संपूर्ण समाजाला अर्पण करणे, माझे मन सामूहिक मनात विलीन करून टाकणे, माझे हितसंबंध देशाच्या हितसंबंधांत सन्मिलित करून टाकणे, सर्वजण जणू माझेच व्यक्तिमत्त्व आहे ही अनुभूती घेणे, दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाले तर, 'तत् त्वम् असि।' या सूत्राची प्रत्यक्ष जीवन व्यवहारात अनुभूती घेणे होय.'

(Putting our hands together for the good is sacrifice to Indra, putting our heads together for universal good is sacrifice to Bruhaspati, putting our hearts together is sacrifice to the Devata of hearts or Chandra. In short, sacrifice to the gods means offering my hands to All the hands or the whole nation, offering my eyes to All the eyes or entire community, offering my mind to All the minds, merging my interests in the interests of the country, feeling all as they were my own self; in other words, realising in practice, 'तत् त्वम् असि। That thou art.')

त्यामुळेच सामाजिक व आर्थिक व्यवस्थेच्या विचारातही मूल्यनिष्ठ अर्थनीती व मूल्यनिष्ठ विकाससंकल्पना निरपवादपणेच अशा संस्कारित मूल्यनिष्ठ समाजजीवनाचाच

एक अविभाज्य भाग असणे अटळ आहे. सुयोग्य शैक्षणिक व्यवस्थेच्या आधारावर उभ्या असलेल्या सयुक्तिक अशा सामूहिक जीवनाच्या संस्कारातूनच सामाजिक जीवन सिद्ध होत असते. गुंतवणुक आणि मिळणारा लाभ यात निश्चितच काही आंतरिक संबंध असतो. त्यादृष्टीने राष्ट्राला परम वैभव प्राप्त करून देणे हे जर आपले उद्दिष्ट आहे, तर त्या सर्वोच्च ध्येयाला प्रेरक अशा प्रकारचे संस्कार आणि शिक्षण ही अटळ गुंतवणूक आहे.

भौतिकवादाच्या मर्यादा

पण त्यासाठी पश्चिमी आर्थिक चिंतनातील विकासकल्पनेत लॉर्ड रॉबिन्सपासून सुरू झालेली व जे. बेन्थॅमच्या उपयुक्ततातावादाने भक्कम समर्थन प्राप्त झालेली, अर्थव्यवहार व नैतिकता यांची जी फारकत झाली आहे, तिचा आपल्याला प्रथम त्याग केला पाहिजे.

लोकनायक जयप्रकाश नारायण यांनी म्हटले आहे -

'एक तत्त्वज्ञानात्मक दृष्टिकोण म्हणून भौतिकवाद हा चांगुलपणासाठी, नैतिक वागणुकीसाठी, कोणतीही प्रेरणा देऊ शकत नाही.'

(Materialism as philosophical outlook could not provide any basis for ethical conduct any incentive for goodness)

मागे उद्धृत केलेल्या डॉ. शूमाकर यांच्या अवतरणातही त्यांनी हेच स्पष्ट केले आहे की, तंत्रवैज्ञानिक उपायांनी जरी जीवनातील सर्व प्रश्न सुटले असते तरी निष्फलता, व्यस्तता आणि भ्रष्टाचार यांची स्थिती कायमच राहिली असती.

पश्चिमी विचारव्यूह पराभूत

या विधानांचे सत्य मानव जातीला आधीच प्रतीत झाले आहे. प्रत्येक पश्चिमी विचारव्यूहाचे नेतृत्व पराभूत होत आहे. परिणामत: अशा विचारव्यूहांवर आधारित सामाजिक व्यवस्था कोलमडत आहेत. ड्रकरने म्हटलेले योग्यच आहेच की, ज्याप्रमाणे झाड शेंड्यापासून वठायला लागते, तसेच सामाजिक संस्थांचेही आहे.

नव्या नेतृत्वाची गरज

तेव्हा असे एखादे विराट वैश्विक ध्येयव्रत साकार करण्यासाठी एका नव्या सुयोग्य नेतृत्वाचीच मानवजातीला आवश्यकता असते. हिंदू समाजातील सामाजिक सुधारणांचे एक अग्रदूत श्री. सुब्रह्मण्यम् अय्यर यांनी फार पूर्वीच म्हटले आहे.

'मुत्सद्दी, कवी, शास्त्रज्ञ, यांत्रिक साधनांचे संशोधक हे सगळे विकासाला गती देतात हे खरे आहे. पण ते या विकासाला पायाभूत अशी प्रज्ज्वलन - ऊर्जा पुरवू शकत नाहीत. तर केवळ स्वत:च्या सत्चारित्र्याच्या शक्तीने, उदात्त कृतींनी आणि

प्रज्ज्वलित जीवनोत्साहने ज्या थोर व्यक्ती समाजाला आदर्श देतात, कु-रीती आणि असत्य दूर करतात, भ्रामक समजुतींचा उलगडा करतात, नवीन मार्गांचे उद्घाटन करून मानववंशाच्या विकासासाठी व उन्नतीसाठी नवे आदर्श प्रस्थापित करतात अशाच थोर व्यक्ती अशी प्रारंभिक प्रेरणा समाजाला देऊ शकतात.'

(Statsmen, poets, men of science, inventors of mechanical contrivances, all these coontribute to progress, but can not impart the initial moving force, which comes from those great men who, by the power of their lofty character and sublime deeds and burning enthusiasm impart idealism to masses of men, sweep away abuse and falsehood, sort out superstitions, open new paths and establish fresh ideals for the elevation and advancement of the human race.)

असे नेतृत्त्व नवीन जीवनमूल्ये, नवे दर्शन यांच्या आधारावरच उभे राहू शकते. आमच्या दर्शनाची घोषणाच आहे– 'सर्व खलु इदं ब्रह्म।' म्हणून आम्ही सनातन धर्माचाच आधुनिक आविष्कार असलेल्या 'एकात्म मानववादा'ची संकल्पना करू शकलो. अशा एकात्म मानव दर्शनाचे सत्त्व ज्यांनी आत्मसात केले आहे तेच मानवजातीला अत्यावश्यक असे नेतृत्व देऊ शकतील.

उलट आज असे जाणवते आहे की पश्चिमी इहवादी विकाससंकल्पनेचाच एक आक्रमक आविष्कार असलेल्या 'जागतिक व्यापारी संघटने'चा आराखडा हे दर्शवतो की जग हे जलद गतीने सुष्ट व दुष्ट प्रवृत्तींमधील शेवटच्या निर्णायक संघर्षाकडे (Armageddam*) झपाट्याने चालले आहे. अशावेळी धर्माचा अधर्मावरील विजय निश्चित करण्यासाठी जोसिआ गिल्बर्ट हॉलंड या कवीच्या शब्दांत परमेश्वराची प्रार्थना करू या.

'आम्हाला समर्थ मने, विशाल हृदये, प्रामाणिक श्रद्धा आणि कार्योत्सुक हात असणारी माणसे दे!'

खरे तर ही काळाचीच मागणी आहे.

ज्यांना पदाधिकाराची लालसा भ्रष्ट करणार नाही,
जी अधिकारपदाच्या लोभापोटी विकली जाणार नाहीत,
ज्यांच्याजवळ स्वत:ची मते व इच्छाशक्ती आहे, आत्मसन्मान आहे,
आणि जी कधीही असत्य बोलणार नाहीत
अशी माणसे आम्हाला दे!'

---

* जगाच्या अंती होणाऱ्या सुष्ट व दुष्ट प्रवृत्तींमधील अंतीम निर्णायक संघर्षाचे बायबलमधील भविष्यवाणीने सूचित केलेले चित्र.

(God give us men, The time demands
Strong minds, great hearts,
True faith and willing hands,
Men whom the lust of office does not kill,
Men whom the spiols of office cannot buy,
Men who possess opinions and a will,
Men who have honour,
Men who will not lie.)

पण केवळ नैतिक उपदेश अपुरा

अर्थात हे खरे आहे की आधुनिक माणसाला घाई झाली आहे. सनातन धर्माचेच आधुनिक रूप असलेल्या एकात्म मानववादाच्या विचारावर आधारित जीवनशैलीचा विचार करायला त्याला अजिबात फुरसत नाही. त्यामुळे केवळ 'सर्वे नः सुखिनः सन्तु।' इ., अपरिग्रह, संयत उपभोग, आणि 'शेवटच्या' माणसाचे कल्याण इत्यादींवरील उपदेशाने, 'स्वान्तः सुखाय' असलेले प्रचलित वेड, संग्रहाचा हव्यास, चंगळवाद आणि त्यासाठी शोषण या सर्वांचा निरास होईल असे गृहीत धरणे ही केवळ आत्मवंचना ठरेल. त्यामुळेच केवळ El Dorado सारख्या समृद्ध अशा अद्भुतरम्य आदर्श अवस्थेचे चित्रण करूनही भागणार नाही. आणि हे स्वाभाविकही आहे. प्रचलित व्यवस्थांची उपयोगिता संपलेली आहे आणि अशा स्थितीत त्या तशाच ओढत रहाण्यातून काही निष्पन्न तर होणार नाहीच पण प्रसंगी ते घातकही ठरेल असे जाणवल्याशिवाय जनमानस हे नवीन अथवा पर्यायी व्यवस्था स्वीकारायला सहसा तयार होत नाही. पण अशा प्रकारची जाणीव आधुनिक माणसाला, त्यातल्या त्यात पश्चिमी माणसाला कधी होईल का? सामान्य माणूस बहुधा आत्मसंतुष्ट व स्थितिवादी असतो. कदाचित अशासारख्याच समांतर परिस्थितीत मिल्टनचा देव* (स्खलनशील माणसाबद्दल) म्हणाला होता –

'जरी चांगुलपणामुळे नाही तरी निदान संकटामुळे तरी तो माझ्या अंतःकरणाकडे ओढला जाईल.'

(If not goodness, let calamity toss him unto my bosom)

पश्चिमी असफलता स्पष्ट करणे आवश्यक

त्यादृष्टीने आपल्या समाजाने हे लक्षात ठेवले पाहिजे की जे ध्येय पश्चिमेबाबत असफल झालेले आहे ते पूर्वेच्याबाबतही उपयुक्त ठरू शकत नाहीच. पश्चिमेला

---

* मिल्टनच्या *Paradise Lost* या प्रसिद्ध काव्यातील उल्लेख.

व्यक्तिस्वातंत्र्य आणि सामाजिक अनुशासन यांचे योग्य समायोजन करता आले आहे का ? इहवादी पश्चिमेत व्यक्तिस्वातंत्र्याचे स्वैराचारात अधःपतन होते आणि सामाजिक अनुशासनाचे बराकीकरण होते. वरवर पहाता दिसणाऱ्या विविधतेतील मूलभूत सेंद्रिय एकात्मता पश्चिमेला पहाता आली नाही कारण तिने एकात्मतेचे समीकरण चुकीने एकसारखेपणाशी लावले. पश्चिमेला हिंदूंच्या सामाजिक रचनेची गुणवत्ता जाणवूच शकत नाही. कारण आमच्या स्थिरतेचा तिने कुंठितता असा अर्थ केला व स्वतःचा साहसवाद म्हणजे मात्र प्रगमनशीलता मानली, सत्तावादविरहित शासनाची कल्पना तर तिच्या आकलनापलीकडीलच आहे. त्याचप्रमाणे राष्ट्रीय आत्मनिर्भरता ही आंतरराष्ट्रवादाबरोबर जाऊच शकत नाही असा तिचा ठाम समज आहे. त्यामुळेच पश्चिमेत राष्ट्रवादाचे विपर्यस्त रूपांतर शोषक साम्राज्यवादात झाले आणि आंतरराष्ट्रवादाची संभावना, स्वसमाजाशी बेइमानी अशी केली गेली.

वस्तुतः पश्चिमेचे सारे अजूनही प्रयोगावस्थेत आहे. ते काळाच्या कसोटीवर जोखले गेलेले नाही. या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करून आपण, इहवादी आणि सुखवादी नसल्या तरी उपभोक्तावादी, मानवपेशीकेंद्रीवादी (Homocentric) आणि निर्भेळ व्यक्तिवादी अशा प्रवृत्तींवर आधारलेल्या जीवनमूल्यांची भलावण करण्याची घाई केली. आज मात्र लक्षात येऊ लागले आहे की अमेरिकी जीवनातील कौटुंबिक व सामाजिक विघटन व व्यस्तता यांना नेमकी हीच जीवनमूल्ये कारणीभूत झाली आहेत. आज अमेरिकी राष्ट्र म्हणजे एक एकाकी, स्वतःलाच परक्या झालेल्या (self - alienated) अशा व्यक्तींची केवळ विराट गर्दी आहे. त्याच्या व्यवस्थांच्या सर्व प्रकारच्या ऱ्हासाची व अवनीतीची लक्षणे या समाजात दिसत आहे.

व्यावहारिक उत्तरेही आवश्यक

पश्चिमी विकासनमुन्याबद्दलच्या व त्यातून प्रस्थापित झालेल्या अर्थनीतीबद्दलच्या पश्चिमी विचारवंतांच्या भ्रमनिरासाचे आणि भवितव्याच्या चिंतेचे अनेक उल्लेख मागील विषयाच्या विवेचनात त्या त्या-संदर्भात येऊन गेले आहेत.आपले डोळे उघडण्याच्या दृष्टीने ते पुरेसे उद्‌बोधक आहेत. पण तरीही खरे म्हणजे पश्चिमी जीवनमूल्यांच्या साह्याने

१) कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्या, नफाभिमुखी व वाढत्या किंमतींनी नियंत्रित अशा आजच्या व्यवस्थेच्या जागी विपुल उत्पादन, मानवतावादी प्रेरणा आणि घटत्या किंमती यांची आर्थिक व्यवस्था कधी आणता येईल का ?

२) त्याचप्रमाणे वस्तू आणि सेवा यांची बाजारी किंमत नव्हे तर त्यांचा प्रत्यक्ष ऐवज यावरच राष्ट्रीय उत्पन्न निर्भर असते हे पाश्चिमात्यांना समजू शकेल का ? असे प्रश्न स्वाभाविकपणेच उभे रहातातच.

आणि एकूणच समग्र मानवी कल्याणाच्या दृष्टीने व्यवहारातः आपल्याही समाजापुढे

आज असे काही प्रश्न उभे आहेतच. उदा.

१) अनेक साधनांनी युक्त अशी मक्तेदारी भांडवलशाही आज अस्तित्वात आहे. त्याऐवजी तिची जागा नियंत्रित बाजारी अर्थव्यवस्थेचा अभाव असलेल्या मुक्त स्पर्धेला घेणे शक्य आहे का ?

२) वेतन, रोजगाराभोवती फिरणाऱ्या आर्थिक प्रणालींच्या जागी स्वयंरोजगारावर आधारलेली अर्थव्यवस्था आणणे शक्य आहे का ?

३) सतत वाढत जाणाऱ्या विषमतेचा निरास, न्यायीपणा व समता यांच्या दिशेने होणाऱ्या प्रयत्नांनी करणे शक्य आहे का ?

४) निसर्गाच्या दोहनाने निसर्गावरील अत्याचार रोखणे शक्य आहे का ?

५) व्यक्ती, समाज व निसर्ग यांच्यातील निरंतर संघर्षाच्या जागी त्यांच्यांमध्ये संपूर्ण संवाद प्रस्थापित करणे शक्य आहे का ?

तेव्हा आपल्याही समाजाने अतिशय डोळसपणाने या व्यावहारिक प्रश्नांची उत्तरे आपल्या मनालाच विचारली पाहिजेत.

हिंदू संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाबद्दल पश्चिमी विचारवंतांना विश्वास

या सर्व चर्चेच्या संदर्भात कोणी एखादा हिंदूंचे सांस्कृतिक श्रेष्ठत्व मान्य करतो की नाही हा प्रश्न गैरलागू आहे.पण सर्वांनी निरपवादपणे हे लक्षात घेतलेले आहे की हिंदू संस्कृतीमध्ये स्वत:चे असे वैशिष्ट्यपूर्ण घटक आहेत.

त्यादृष्टीने पाहिले तर इमर्सन, पॉल मार्टिन ड्युबोस्ट किंवा अर्नोल्ड टॉयन्बी यांसारख्या काही थोर विचारवंतांना पश्चिमी जगातील या निर्वाणीच्या अवस्थेची चाहूल आधीच लागली होती आणि त्यांनी जागतिक व्यवहारासाठी नवीन मार्गदर्शकाचा शोध जरी केलेला होता. जगद्गुरूची भूमिका घेऊ शकणाऱ्या देशाबद्दल या विचारवंतांमध्ये एकमत होते. उदाहरणार्थ अर्नोल्ड टॉयन्बीने म्हटले आहे.

'आपण सध्या अजूनही जगाच्या इतिहासाच्या संक्रमणात्मक पर्वात रहात आहोत. पण हे आधीच स्पष्ट होत चालले आहे की हे पर्व जर मानव जातीच्या आत्मघातात संपवायचे नसेल तर पश्चिमी आरंभ असलेल्या या पर्वाचा शेवट मात्र भारतीयच असला पाहिजे.

आजच्या या युगात पश्चिमी तंत्रज्ञानामुळे भौतिकदृष्ट्या जग जवळ आले आहे. पण पश्चिमी तंत्रकौशल्याने केवळ अंतर नष्ट केलेले नाही तर जगातील समाजांना उद्ध्वस्त करणाऱ्या शस्त्रांनी सज्जही केले आहे. आणि एकमेकांवर प्रेम करणे हे तर हे समाज असून शिकलेलेच नाहीत. अशा समाजांना शस्त्रसज्ज करून एकमेकांसमोर हाताच्या अंतरावर आणून ठेवले आहे. मानवी इतिहासातील अत्यंत धोक्याच्या क्षणी केवळ भारतीय मार्ग हाच मानवजातीच्या मुक्तीचा मार्ग आहे.'

'....तुमच्या भारतीय परंपरेच्या ठेव्यातील सर्वोत्तम आणि म्हणूनच उपयोगात

आणलाच पाहिजे असा वारसा असलेल्या या आदर्शाला भारत जर जागला नाही तर संपूर्ण मानव जातीच्या संदर्भात हा त्याचा करंटेपणा ठरेल. म्हणूनच भारतावर फार मोठी आध्यात्मिक जबाबदारी आहे.'

(Today we are still living in this transitional chapter of the world's history, but it is already becoming clear that a chapter which had a western beginning will have an Indian ending if it it not to end in the self-destruction of the human race. In the present age, the world has been united on the material plane by western technology. But this western skill has not only 'annihilated distance'; it has armed the peoples of the world with weapons of devastating power at a time when they have been brought to point-blank range of each other without yet having learnt to know and love each other. At this supremely dangerous moment in human histroy, the only way of salvation for mankind is an Indian way.'

'...If India were ever to fail to live upto this Indian ideal which is the finest, and therefore, the most exacting legacy in your Indian heritage, it would be a poor look-out for mankind as a whole. So a great spiritual resposibility rests on India.'

आज संपूर्ण मानवजातीला संत्रस्त करणाऱ्या सर्व प्रकारच्या समस्यांना भारताला तोंड द्यावे लागत आहे. पण विविधतेत एकत्व पहाण्याच्या त्याच्या अंगभूत प्रवृत्तीमुळे, जगातील सर्व देशांपैकी केवळ भारतामध्येच या समस्यांवर मात करण्याची क्षमता आहे. परिणामत: केवळ भारतच पिडलेल्या जगाला नवीन योग्य मार्ग दाखवू शकतो अशा प्रकारची अर्नोल्ड टॉयन्बी यांची दृढ धारणा आहे.

हिंदूंच्या सांस्कृतिक कल्पना पश्चिमेकडे पसरतील आणि त्यांच्या प्राचीन संस्कृतीचे सत्त्व जीवमानच राहील. भारताच्या आध्यात्मिक संस्कृतीतील अत्यंत उदात्त मूलभूत तत्त्वांची सर्व समाजाकडून होणारी वैश्विक पातळीवरील आग्रही मांडणी व सार्वत्रिक अवलंब यामुळेच जागतिक शांतता प्रस्थापित होईल हे नक्कीच! मग या सांस्कृतिक कल्पना विकसित करणाऱ्या हिंदुवंशाची अवस्था भविष्यात कशीही असो, असा सर जॉन वुड्रॉफ यांचा ठाम विश्वास आहे.

जगातील सर्व भागातील प्रबुद्ध मानवतावादी व्यक्तींना, मग तो हेन्री फोर्डचा नातू असो अथवा स्टॅलिनची कन्या असो - भारताला भेट देणे म्हणजे एक तीर्थयात्राच आहे असे वाटते. म्हणूनच मॅक्समूलरला म्हणावेसे वाटले –

'कोणत्या आकाशाखाली मानवी मनाने आपल्या सर्वोत्तम देणग्यांचा पूर्ण विकास केला आहे, जीवनाच्या प्रचंड समस्यांबद्दल पूर्ण चिंतन केले आहे, आणि प्लेटो

आणि कांट यांचा अभ्यास केलेल्यांनीही लक्षात घेतले पाहिजेत असे उपायही काही बाबतीत शोधले आहेत असे जर मला कोणी विचारले तर मी भारताकडे बोट दाखविन. मी जर स्वत:लाच प्रश्न केला की आपले जीवन अधिक परिपूर्ण, अधिक विश्वात्मक, खऱ्या अर्थाने मानवी बनण्यासाठी अत्यावश्यक असलेला, दुरुस्तीच्या उपायाचा बोध, आम्ही युरोपीय, कोणत्या वाङ्मयापासून घेऊ शकू तर मी पुन्हा भारताकडेच बोट दाखवेन.'

(If I were asked, under what sky human mind has most fully developed its choicest gifts, most fully pondered on the greater problems of life and has found the solutions of some of them, which deserve the attention of even those who have studied Plato and Kant, I should point to India. If I were to ask myself from what literature, we, in Europe, may draw corrective which is most wanted in order to make our life more perfect, more universal, in fact, truly more human, again I should point to India.)

द्रष्ट्या हिंदू विभूतींची युगवाणी

सुदैवाने आपल्या देशातील काही द्रष्ट्या विभूतींनी आणि राष्ट्रीय उत्थानाच्या विराट प्रयत्नात जीवनभर कार्यरत असलेल्या विचारवंतांनी या दिशावेधाचे संकेत समाजाला देण्याचा फार पूर्वीपासूनच प्रयत्न केलेला आहे. कारण त्यांच्या मनांत या देशाच्या उज्ज्वल भवितव्याबद्दल कधीच शंका नव्हती व नाही. ज्यावेळी संपूर्ण जग पश्चिमी साम्राज्यवादी वर्चस्वाच्या अंकित होते त्यावेळी, १८९३ त, पश्चिमी नमुना हा विकासाचा वैश्विक नमुना हे मान्य करायला स्वामी विवेकानंदांनी जागतिक व्यासपीठावर नकार दिला. स्वत:च्या पक्क्या धारणेतून निर्माण होणाऱ्या धैर्याचीच ती खूण होती. त्यांच्या स्वत:च्या देशातील पश्चिमाळलेल्या उच्चभ्रूंनाही त्यांची विधाने बाष्कळ वाटली होती. पण विवेकानंद एकाचवेळी भौतिक समृद्धी आणि आध्यात्मिक उन्नती साधण्याची खात्री देणाऱ्या धर्माचे समर्थ प्रवर्तक होते. त्यामुळेच इहवादातील अंतर्गत आत्मविसंगती स्वामीजी पाहू शकले आणि भौतिक बाजूवर अतिरिक्त भर देण्यातील हानिकारक परिणामांची कल्पनाही ते करू शकले.

उलट भौतिक आणि आध्यात्मिक यांच्यातील संतुलन आणि सुमेळ या हिंदू जीवनदृष्टीला अपेक्षित, अशाच एकात्म भूमिकेचा त्यांनी पुनरुच्चार केला. म्हणूनच ते 'इस्लामी शरिरातील हिंदू आत्मा' अथवा 'पश्चिमी वस्तुमान आणि भारतीय आत्मा यांचे संश्लेषण' अशाप्रकारची भाषा करू शकले.

आपल्या या आधुनिक द्रष्ट्याने म्हटले नव्हते का ?

'पूर्व आणि पश्चिम एकदिलाने उच्चतम आणि विशाल ध्येयासाठी एकत्र येऊ

शकतात. भौतिक वस्तुमानात आत्मा चैतन्य भरेल आणि वस्तुमान हे स्वत:च्या अंतरंगात आणि चराचरांतही लपलेले सत्य आत्म्यामध्ये अनुभवू शकेल.'

(East and west could be reconciled in the pursuit of the highest and largest ideal. Spirit embrace Matter and Matter find its own true reality and the hidden reality in all things in the Spirit ?)

आणि म्हणूनच येऊ घातलेल्या जागतिक निर्वाणीच्या अवस्थेचे स्वरूप स्वत:समोर स्पष्ट पहाणाऱ्या योगी अरविंदांनी हे आत्मविश्वासाने घोषित केले आहे –

'सर्व मानव जात ज्या समस्यांची उकल करण्यासाठी ठेचाळत प्रवास करीत आहे त्यांच्या सोडवणुकीचे नवे व निर्णायक वळण दिले तर केवळ भारतच देऊ शकेल. कारण त्यांच्या उकलीचे सूत्र भारताच्या प्राचीन ज्ञानातच आहे.'

(...She [India] can, if she will, give a new and decisive turn to the problems over which all mankind is labouring and stumbling, for the clue to their solutions is there in her ancient knowledge."

निराशेला कुठेही जागा नाही.

मागील भागात भविष्याच्या संकेतांच्या काही प्रसादचिन्हांचा शेवटी उल्लेख केला आहे. वर अनेक विचारवंतांच्या व द्रष्ट्या विभूतींच्या चिंतनातून आलेले विचार उद्धृत केलेले आहेत. या सर्व उल्लेखावरून ते स्पष्ट होते की स्वभावत:च पराभूत होणाऱ्या भौतिक उद्धटपणाचे तमोयुग संपून पूर्व - पश्चिमेच्या सर्व मानवतावाद्यांच्या अधीर प्रतीक्षेतील एका नव्या वैश्विक व्यवस्थेचा शुभारंभ जवळ आला आहे. प्रचलित अशा सर्व असुरी शक्तींनासुध्दा जागतिक इतिहासातील या नव्या प्रवाहाशी जुळवून घ्यावे लागेल ते त्यांच्या हृदयपालटामुळे नव्हे, तर त्यांच्यांमधील स्वाभाविक अंतर्गत विसंगतीच्या परिणतीमुळे ! त्यामुळेच निराशेला कुठेच जागा नाही.

ऱ्हस्वदृष्टी अशा, विनाशाच्या प्रेषितांशी चर्चा करीत असताना श्री गुरुजी टेनिसनच्या *The Play'* या छोट्या कवितेचे अवतरण देत असत.

'प्रथमांकी दु:खभऱ्या दुनियेचा रंगमंच
प्रवेशांतरातही भरुनि राही दु:ख तेच
धीर धरी रसिका पण नाट्यविश्वकर्मी हा
पंचमांकी उलगडील नाट्यादभुत अर्थ महा'

(Act First, this earth a stage so gloomed with woe
that you all but sicken at the shifted scenes,
And yet be patient, our Playwright may show
In some Fifth Act what this wild drama means.)

अमेरिकेत आयोजित केलेला 'वैश्विक दर्शन - २०००* हा कार्यक्रम म्हणजे या अंकाचा पहिला प्रवेश आहे. ह्या प्रवेशाने नव्या हिंदू सुवर्ण युगाब्दाचा शुभारंभ रेखांकित केला आहे. अर्थात हिंदू म्हणजे मानवीच - कारण हिंदू आणि मानवी या दोन्ही समानार्थी संज्ञाच आहेत.

म्हणून जगाने आजवरच्या इतिहासात निर्माण केलेल्या सर्वांत अलौकिक अशा मानवतावादी विभूतीच्या अमर शब्दांमध्ये शुभारंभाच्या या पवित्र पर्वात आपण सर्वांनी शपथ घेतली पाहिजे.

'कोणाबद्दलही आकस नाही, सर्वांबद्दल सद्भावना आणि परमेश्वराने प्रमाणित केलेल्या सुयोग्य गोष्टींबद्दलची दृढता मनात ठेवून'... 'न्याय्य आणि चिरस्थायी अशी आपापसातील आणि जगातील सर्व राष्ट्रांमधील शांतता प्रस्थापित करण्यासाठी शक्य ते सर्व करू.'

('...to do all which may achieve and cherish, a just, and a lasting peace, among ourselves, and with all nations,'.... '...with malice towards none; with charity for all; with firmness in the right, as God gives us to see the right.')

□ □ □ □

---

* शिकागो येथील जागतिक धर्मपरिषदेत स्वामी विवेकानंदांनी केलेल्या ऐतिहासिक भाषणाची शताब्दी करण्यासाठी योजलेल्या World Vision 2000 या ऑगस्ट १९९३ मधील कार्यक्रमाचा उल्लेख.

परम वैभवप्रत *

स्वत:च्या वैभवसंपन्न भूतकाळाबद्दल आत्मगौरवाची भावना असलेले हिंदू राष्ट्राचे निस्सीम भक्त हे लांब पल्ल्यापर्यंतच्या वैभवशाली भविष्याचे दर्शन घेऊ शकतात का ? मग ते पुनरुज्जीवनवादी ठरत नाहीत का ?

आपल्या *'Studies in a Dying Culture'* या ग्रंथात ख्रिस्टोफर कॉडवेल याने मांडलेले मत लक्षणीय आहे –

'प्राचीन अभिजात वाङ्मयाकडे परत वळण्यामुळे प्राचीन 'विद्येच्या पुनरुज्जीवनाच्या उच्चमध्यमवर्गीय स्थितिवादी पर्वावर' प्रभाव पडला. रोमच्या इतिहासामुळेच नेपोलिअन आणि क्रांती प्रभावित झाली. आदिम मानवाच्या संस्कृतीच्या पुटांनी न डागाळलेल्या स्थितीकडे जाण्याचे ध्येय १८ व्या शतकातील क्रांतिकारकांनी आपल्यासमोर ठेवले होते आणि तरीही अशा सर्व माणसांना अशावेळी नवमानवाचे ताण त्यांच्या अंत:करणात जाणवत असतात. ...(त्या नवमानवाला) वाटत असते की भूतकाळ वाचविण्यासाठी अथवा पुन्हा प्रस्थापित करण्यासाठीच आपला जन्म आहे आणि हे जेव्हा घडते तेव्हाच भविष्य अस्तित्वात आल्याचे स्पष्ट होते. आदिम ख्रिस्तीवादाकडे वळणारा सुधारकच उच्च मध्यमवर्गीय प्रॉटेस्टंट प्रणालीला जन्म देतो.'

(The return to the classics dominated the bourgecois Renaissance. Rome influenced Napoleon and the Revolution. The return to the natural uncorrupted man was the ideal of eighteenth century revolutionists. Yet, it is the new man whose tensions men feel in their minds and hearts at such times.....He may think, it is the past he is born to save or re-establish on earth and only when it is done, is it seen that the

---

* हा लेख Blitz या साप्ताहिकाच्या २९ जाने. १९९४ च्या अंकातून *Third Way* मध्ये घेंतला आहे. (यातील काही अवतरणे मागील भागांतील विवेचनात येऊन गेली आहेत.)

future has come into being. The reformer returning to primitive Christinaity brings boureois Protestanism into being.)

न्या. मा. गो. रानडे म्हणतात.

'समाजासारख्या जीवमान संघटनेमध्ये पुनरुज्जीवन शक्य नसते.' (म्हणजेच जुनी मूल्ये, जुना जमाना जसाच्या तसा आणणे शक्य नसते.)

(In a living organism, as society is, no revival is possible.)

भूतकाल नव्याने संक्रमित करून हे हिंदू राष्ट्र परमवैभवातप्रत नेणे ही हिंदू राष्ट्रवाद्यांची प्रतिज्ञा आहे.

डॉ. राधाकृष्णन यांनी अशाप्रकारचे प्राचीनाचे संक्रमण हे पुढीलप्रमाणे व्यवच्छेदकतेने स्पष्ट केले आहे.

'उत्कर्ष आणि अपकर्ष अशाप्रकारचे चक्र हिंदुत्वाच्या प्रदीर्घ इतिहासात दिसून येते आणि आज आपण हिंदुत्वाच्या पुनर्निर्माणक संक्रमण कालात आहोत. पुनर्निर्माणक संक्रमण हा शब्द, हा केवळ पुरातनाच्या पुनरुज्जीवनासाठी येथे वापरलेला नाही. नव्या जमान्यातील नव्या जीवनाला लागू व्हावीत अशा नव्या पद्धतीने शाश्वतत्त्वांचे पुनर्निर्माण होत असे. मध्ययुगीन व्यवस्थांचे तुकडेतुकडे करणाऱ्या सतराव्या शतकातील नव्या चैतन्याच्या विकासासारखा हा विकास आहे.'

(Hinduism has its periods of growth and decline and we are todya in the midst of Hindu renaissance. The word 'renaissance' is not used in teh sence of a mere revival of antiquity, the eternal principles are reborn to be applied to a new life in new ways. There is growth of a new spirit like the one which shattered the medieval order of the seventeeth century.)

हिंदू राष्ट्रवाद्यांना हे पक्के माहित आहे की भविष्यवेत्त्या शास्त्राशिवाय (Futurlogy) इतिहास हा केवळ निष्फळ आहे आणि इतिहासाचा आधार नसलेले भविष्यवेत्ते शास्त्र हे मुळे नसलेले शास्त्र ठरेल. त्यामुळेच आपल्या वारशामुळेच, प्रतिगामी न होताही सावध रहाण्यास आणि साहसवादी न होता प्रगमनशील रहाण्यास आपल्याला मदत होते.

पण एका मूलगामी विचारावर मात्र या ठिकाणी भर दिला पाहिजे. हिंदूंची परमवैभवाची कल्पना सम्यकरीतीने समजवून घेतली पाहिजे. सर्व इहवाद पश्चिमी देशांचे सर्वोच्च ध्येय हे महासत्तेचे स्थान प्राप्त करून घेणे हे आहे. पण भारतासारख्या प्रगल्भ सनातन राष्ट्राच्या दृष्टीने हे ध्येय पुरेसे गौरवपूर्ण असू शकते का ?

प्रत्यक्ष ऐन भरात असताना राजकीय सत्तेचे वैभव कितीही मोहक दिसत असले तरीही ते क्षणभंगुरच असते. उमरखय्यामने ह्या वस्तुस्थितीचे मोठ्या चित्रमयतेने वर्णन केले आहे –

'सतंतच्या वापराने पडझड झालेल्या या (जगाच्या) सराईमध्ये - दिवस आणि रात्र या दरवाज्यांमधून एका पाठोपाठ एक सुलतान स्वत:च्या सर्व भपकेबाज लवाजम्यासह येऊन तास दोन तासच राहिला आणि शेवटी आपल्या मार्गाला लागला.'

(See in this battered caravanserai
whose portals are alternate night and day
How Sultan after Sultan with his pomp
Abode his hour or two, and went his way)

बर्नार्ड शॉने आपल्या *Caesar and Cleopatra* या नाटकाला १९१२ मध्ये स्वगताच्या स्वरूपात प्रस्तावना लिहिली आहे. ती खास करून सत्तामदाने झिंगलेल्या ब्रिटिश प्रेक्षकांसाठी होती. प्राचीन इतिहासाची झलक दाखवून भविष्यवेत्त्याच्या भूमिकेतून त्याला या प्रेक्षकांना हे स्पष्ट करावयाचे होते की साम्राज्यांची सत्ता ही यावच्चंद्रदिवाकरौ अशी रहात नसते.

म्हणूनच एकदा प्राप्त झाले की महासत्तेच्या स्थानाबद्दलच्या मोहात मशगुल होऊन रहाणे हे बालिशपणाचे लक्षण आहे.

साम्राज्ये आणि महासत्ता किती अल्पजीवी असतात हे पहाणे मोठे उद्‌बोधक ठरेल. ११४१ वर्षे राहिलेल्या एका बेझांटिन साम्राज्याचा अपवाद सोडला तर बाकी सर्व साम्राज्यांचा प्रभाव हा विस्मयजनक वाटावा इतका अल्पजीवी ठरलेला आहे. आणि एकूण मानवी जीवनाच्या संपूर्ण ऐतिहासिक भूतकाळाच्या तुलनेने बेझांटिन साम्राज्याचा कालही खरे तर तोकडाच म्हणावा लागेल.

यादृष्टीने मोठ्ठमोठ्या साम्राज्यांचा काल बघता येईल.

१) इजिप्तचे साम्राज्यशाही युग (खिस्तपूर्व १५८० ते खिस्तपूर्व ११५०) ४३० वर्षे.

२) हमुरब्बीच्या अधिपत्याखालील बॅबिलोनियाचे साम्राज्य (खि.पू. १७९२ ते खि. पू. १७५०) - ४२ वर्षे.

३) नेबुशादनेझारच्या Nebuchadnezzar)अधिपत्याखाली नव - बॅबिलोनियन साम्राज्य (खि. पू. ६१२ ते ५३९) - ७३ वर्षे.

४) पार्शियाचे साम्राज्य (खि. पू. ५५० ते खि. पू. ४८६) - ६४ वर्षे.

५) इंका साम्राज्य (इ. स. १४३८ ते १५२५) - ८७ वर्षे.

६) हान साम्राज्य (खि.पू. २०६ ते इ. स. २२१) - ४२७ वर्षे.

७) ग्रीक साम्राज्य (खि.पू. ३३६ ते खि. पू. ३२३) - १३ वर्षे.

८) रोमन साम्राज्य (खि. पू. २७० ते इ.स. ४७६) - ७४६ वर्षे.

९) अरबी साम्राज्य (इ.स. ६३४ ते ७५५) - १२१ वर्षे.

१०) बेझांटिन साम्राज्य (इ.स. ३१२ ते १४५३) - ११४१ वर्षे.

११) पवित्र रोमन साम्राज्य (इ. स.८०० ते ८४३) - ४३ वर्षे.

१२) नेपोलिअनचे साम्राज्य (इ.स.१७९९ ते १८१५) - १६ वर्षे.
१३) ब्रिटिश साम्राज्य (इ.स. १८०२ ते १९४७) १४५ वर्षे.
१४) जर्मन साम्राज्य (इ.स. १९३९ ते १९४५) ६ वर्षे.
१५) रशियन साम्राज्य (इ.स. १९४५ ते १९८९) ४४ वर्षे.

आजचे अमेरिकी वर्चस्वही २०१० सालानंतर रहाणार नाही. म्हणजे त्याच्या वर्चस्वाचा कालही एकूण जेमतेम ६५ वर्षाचाच असेल.

मग महासत्तांच्या अशाप्रकारच्या अल्पजीवी स्थानाच्या जोडीला हिंदू राष्ट्रवाद्यांनी स्वत:समोर ठेवलेल्या राष्ट्राच्या 'परम वैभवाची' कल्पना समानतेने बसविणे बरोबर ठरेल का? आणि पुन्हा महासत्तांचे स्थानही नेमके कोणासाठी? कारण कालपर्यंत सर्वमान्य असलेल्या काही प्रमुख संकल्पनांनी अलिकडच्या काळात आपली कालनिष्ठ सार्थता व अस्सलपणा गमावला आहे.

उदा. आंतरराष्ट्रीय मूलतत्त्ववाद, राष्ट्रीय सीमांपलीकडे जाणारा दहशतवाद, आंतरराष्ट्रीय वित्तीय महामंडळे, अंमली पदार्थांची वा मादक औषधांची भूमिगत आंतरराष्ट्रीय साम्राज्ये, शिवाय पर्यावरण, मानवी अधिकार, नागरी स्वातंत्र्ये, पर्यटन, शस्त्रकपात, मजूरविषयक संबंध, इ. विषयांबाबतच्या संस्था आणि युरोपीय संघांसारखे प्रचलित वा संभाव्य असे ऊर्ध्वकेंद्री प्रादेशिक गटबंधन इ. अनेक घटकांनी आजवर एक पवित्र तत्त्व मानले गेलेले राष्ट्रीय सार्वभौमत्व हे उत्तरोत्तर क्षीण होऊ पहात आहे.

पश्चिमी प्रभावाखालील 'मानवधिकारांचे यूनोचे घोषणापत्र' हे दक्षिणी देशांतील समस्यांच्या दृष्टीने कुचकामी ठरत आहे. कारण तेथील समाज स्वत:च्या शासनाकडूनच होणाऱ्या मानवाधिकाराच्या उल्लंघनाचे बळी ठरत आहेत. त्यांचे विकास नमुने, त्यांची तंत्रज्ञानविषयक निवड, त्यांची शस्त्रास्त्रे व विकृती, या साऱ्यांच्या द्वारा तेथील शासनांनाच विध्वंसक दारिद्र्य, निसर्गाचा संहार आणि तंत्रज्ञानविषयक दहशतवाद पसरविण्याची संधी मिळत आहे. उपजीविकेची साधने, आरोग्य, शिक्षण आणि निवास यासंबंधीचे मूलभूत हक्क, पूर्णपणे दुर्लक्षित केले जात आहेत.

पश्चिमी प्रभावाखालील राष्ट्रसंघाने राष्ट्र आणि राज्य यांत गल्लत केली आहे. एकमेकांना लागून असलेल्या अनेक देशांमध्ये पसरलेल्या मूळ निवासी अशा भिन्न भिन्न भटक्या जमाती व वांशिक गट यांच्या अलग अलग अशा व्यक्तिमत्त्वांची दखल घेण्यात राष्ट्रसंघ कमी पडला आहे.

स्वाभाविकपणेच पश्चिमी नमुना हा विकासाचा व प्रगतीचा नमुना होऊ शकत नाही.

मग 'परम वैभवा'चे निश्चित स्वरूप काय असेल?

वेदांमधील शांतिमंत्र आणि संत ज्ञानेश्वरांचे पसायदान म्हणजे एकादृष्टीने हिंदू राष्ट्राच्या जाहिरनाम्याचेच काही आविष्कार आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तत्त्वज्ञान

स्पष्ट करणाऱ्या श्री. गुरुजींच्या विचारदर्शनात, हिंदू राष्ट्राच्या वैश्विक ध्येयव्रताचा उच्चार करणारा या द्रष्ट्या पुरुषाचा आवाज सहज ऐकू येतो. पू. गुरुजींचा असा विश्वास होता की ज्याप्रमाणात मानवजात 'सर्व एकच आहे' (सर्वं खलु इदं ब्रह्म।) हे वैदिक सत्य अनुभवू शकेल त्याचप्रमाणात 'जागतिक ऐक्य व मानवी कल्याण' हे सत्यसृष्टीत अवतीर्ण होऊ शकेल. त्यामध्ये त्यांना विविध राष्ट्रांच्या वैशिष्ट्यपूर्ण घटकद्रव्यांचा लय करून सर्वांना एकाच एका साच्यात बसविण्याची कल्पना अभिप्रेत नव्हती तर आपापल्या अलग अलग राष्ट्रीयतेची जपणूक करूनसुद्धा अखिल मानव्याच्या आंतरिक एकात्मतेच्या भानातून कौटुंबिक भावनेने एकत्र येणाऱ्या विविध समाजगटांची संकल्पना त्यांच्या मनात होती. स्वत:च्या अलग अलग प्रतिभावैशिष्ट्यांच्या द्वारा विकसित होताना आपापल्या भिन्न मार्गांनी एकाच अंतिम लक्ष्याकडे वाटचाल करणाऱ्या विभिन्न मानवी गटांची कल्पना त्यांना अभिप्रेत होती. आपापल्या वैशिष्ट्यपूर्ण गुणंधर्माचा - मग तो व्यक्तीचा असो वा एखाद्या समाजाचा असो - नाश हा केंवळ सुसंवादीपणातील अकृत्रिम सौंदर्याचाच नाश करेल असे नाही तर आत्मविष्कारातील त्याच्या आनंदाचाही लय करेल. अनेक विविधतापूर्ण गुणधर्मांतील सुमेळ साधणे हे आमच्या संस्कृतीचे वैश्विक वैचारिक संपुटातील वैशिष्ट्यपूर्ण योगदान आहे. श्री. गुरुजी म्हणतात.

'समान केंद्राच्या कक्षेखाली एकत्र गुंफलेल्या स्वयंशासित व स्वयंपूर्ण अशा राष्ट्रांच्या संचातून आपली जागतिक राज्याची संकल्पना विकसित होईल... या धरतीतलावरील लहानात लहान सचेतन घटकाच्या विशेषतेलाही तिच्या परिपूर्ण विकसनासाठी पूर्ण व मुक्त वाव देणारी आपली धारणा आहे. तसेच अखिल मानव्याच्या सौख्यासाठी झिजणारी उदात्त ऊर्मी निर्माण करणारी ही धारणा आहे. अशा धारणांनी मन भारून टाकणाऱ्या आंतरिक चैतन्याची जाणीव निर्माण करणारा हिंदुविचार हाच वैश्विक एकात्मतेला बळ देणारा एकमेव असा विचार आहे. जर काही एखादे वैश्विक - ध्येय म्हणून असलेच तर खरोखर ते हेच असू शकते.

(The 'World State of our concept' will evolve out of a federation of autonomous and self - contained nations under a common centre linking them all...it is the grand world - unifying thought of Hindus alone that can supply the abiding basis for human brotherhood, that knowledge of the inner spirit will charge the human mind with the sublime urge to toil for the happiness of mankind, while opening out full and free scope for every small life - speciality on the face of the earth to grow to its full stature. Verily, this is the one real practical world-mission,if ever there was one.)

ही विश्वव्रताची हिंदू संकल्पना योगी अरविंदांनी अतिशय समर्पक शब्दांत मांडली आहे

आणि तिच्या पुढची अवस्था ही 'सामूहिक अध्यात्मीकरण' या शब्दांत व्यक्त केली आहे.

पश्चिमेतील काही उन्नत व्यक्तिमत्त्वांचे विचारवंतही अशाच प्रकारे भविष्यविषयक हिंदू दर्शनाचा पुरस्कार करण्यास प्रवृत्त झाले आहेत. उदा. फ्रेंच पंडित पॉल मार्टिनी ड्युबॉस्टने (Paul Martini Dubost) घोषित केले आहे.

'जवळ जवळ दोन हजार वर्षांच्या कालखंडानंतर भारत हा पुन्हा जागतिक पटलावर आला आहे. भारत हा सर्वांसाठी आहे. भारतीय आत्म्याचे मधुगुंजन हे असे कर्णमधुर आहे की आपल्याला ते सतत हेलावून टाकत राहते.'

(After two thousand years, India is on the agenda. India belongs to everybody. The melody of the Indian soul is something which never ceases to move us)

अर्नोल्ड टॉयन्बीने म्हटले आहे...

'...पण हे आधीच स्पष्ट होत चालले आहे की हे पर्व जर मानवजातीच्या आत्मघातात संपवायचे नसेल तर पश्चिमी आरंभ असलेल्या या पर्वाचा शेवट मात्र भारतीयच असला पाहिजे.'...मानवी इतिहासातील या आत्यंतिक धोक्याच्या क्षणी केवळ भारतीय मार्ग हाच मानवजातीच्या मुक्तीचा एकमेव मार्ग आहे.'

'...तुमच्या भारतीय परंपरेच्या ठेव्यातील सर्वोत्तम आणि म्हणूनच उपयोगात आणालाच पाहिजे असा वारसा असलेल्या या आदर्शाला भारत जर जागला नाही तर संपूर्ण मानवजातीच्या संदर्भात हा त्याचा करंटेपणा ठरेल. म्हणूनच भारतावर फार मोठी आध्यत्मिक जबाबदारी आहे.'

(..it is already becoming clear that a chapter which has a western beginning will have to have an Indian ending if it is not to end in the self-destruction of the human race...At this supremely dangerous moment in human history. the only way of salvation for mankind is an Indian way.

...if India were ever to fail to live upto this Indian ideal which is the finest, and therfore, the most exacting, legacy in your Indian heritage, it would be a poor lookout for mankind as a whole. So a great spiritual responsibility rests on India.)

हे भारताचे गंतव्यस्थान आहे ... 'परम वैभव!' अल्पजीवी महसत्तेच्या स्थानाची प्राप्ती नव्हे तर नियतीनेच पूर्व नियोजित केलेले जगद्गुरुपद !

सनातन धर्म हा आपला निरपेक्ष संदर्भबिंदू, 'सर्व एकच आहे' हा आपला साक्षात्कार आणि शाश्वत, वैश्विक, अपरिवर्तनीय तत्त्वांच्या प्रकाशात नित्य विकसित होणाऱ्या सतत बदलत्या सामाजिक, आर्थिक व्यवस्था, या सर्वांमुळे, ही जगद्गुरूची

भूमिका निभावण्यासाठी भारत हाच विशेषकरून सक्षम आहे.

त्यांच्या त्यांच्या पूर्णतः विभिन्न मूल्यव्यवस्था, संस्थात्मक व्यवस्था आणि संदर्भ निकष यांच्यामुळे पूर्णतःच अलग असलेले असे, पश्चिमी व हिंदू असे दोन विकासनमुने आहेत.

इहवादी पश्चिमेला फ्रेंच राज्यक्रांतीचे घोषित ध्येय साध्य करता आलेले नाही. धर्माचे सत्त्व पूर्णतः आत्मसात केलेल्या डॉ. आंबेडकरांनी म्हटले आहे....

'हे तर निश्चितच आहे की माझे सामाजिक तत्त्वज्ञान तीन शब्दांत व्यक्त करता येते. स्वातंत्र्य, समता व बंधुता! पण असा भ्रम कोणाच्याही मनात असू नये की हे माझे तत्त्वज्ञान मी फ्रेंच राज्यक्रांतीतून उचलले आहे. माझ्या तत्त्वज्ञानाची मुळे राज्यशास्त्रात नव्हे तर धर्मामध्ये आहेत. भगवान बुद्ध या माझ्या गुरूपासून मला ती प्राप्त झाली आहेत.

'बुद्धाच्या तत्त्वज्ञानात स्वातंत्र्य आणि समता यांना निश्चितच स्थान आहे. पण त्याने हेही लक्षात घेतले आहे की अमर्याद स्वातंत्र्यामुळे समतेला धक्का पोचतो आणि टोकाच्या समतेमुळे स्वातंत्र्याला जागाच रहात नाही. म्हणून त्याने स्वातंत्र्य किंवा समतेच्या अशाप्रकारच्या अतिरेकाविरुद्ध सुरक्षिततेचा खरा उपाय म्हणून बंधुतेला सर्वाधिक महत्त्वाचे स्थान दिले आहे. बंधुत्व हे अखिल मानव्याच्या बंधुप्रेमाचे दुसरे नाव आहे आणि तेच धर्म या नावानेही ओळखले जाते. अशाप्रकारचे बंधुत्वच स्वातंत्र्य आणि समतेचे रक्षण करू शकते. हे बंधुत्व सामाजिक एकात्मता म्हणूनही गणले जाते. हे खरे तर मानव्यच होय, धर्मच होय!'

(Positively, my social philosophy may be said to be enshrined in three words; Liberty, Equality, Fraternity. Let no one, however, say that I have borrowed my philosophy from the French Revolution. I have not. My philosophy has roots in religion and not in political science. I have derived them from the teaching of my master, the Buddha.

In Buddha's philosophy, liberty and equality had place; but he added that unlimited liberty destroyed equality, and absolute equality left no room for liberty. He gave the highest place to fraternity as the only real safeguard against the denial of liberty or equality. Fraternity was another name for brotherhood of humanity, which was again, another name for Dharma. Only brotherhood can protect freedom and equality. This brotherhood is also called social oneness. It is humanity, it is Dharma.)

या पार्श्वभूमीवर गांधीजींचे पुढील म्हणणे सहज लक्षात येण्यासारखे आहे....

'हिंदुत्व म्हणजे सत्याचा अथक असा शोध आहे आणि आज जर ते क्षीण, अचेतन आणि प्रगतिहीन दिसत असले तर ते केवळ आपण थकलेले आहोत

म्हणून आणि आपला हा थकवा जाताक्षणीच हिंदुत्व हे पुन्हा आजवर अपूर्व अशा तेजाने या जगात उसळून येईल.'

(Hinduism is a relentless pursuit after Truth, and if today it has become moribund, inactive and irresponsive to growth, it is because we are fatigued, and as soon as the fatigue is over, Hinduism will burst forth upon the world with a brilliance perhaps unknown before.)

आणि तोच भारतासाठी पूर्वनियोजित केलेल्या अटळ भवितव्याच्या दिशेने होणाऱ्या आमच्या वाटचालीचा प्रारंभ ठरेल.

□ □ □

परिशिष्ट १

या सबंध लिखाणात आलेल्या काही पश्चिमी व इतर जागतिक संस्था, संघटना, योजना, करार इत्यादींच्या लघुरूपाचे थोडे स्पष्टीकरण.

१) GAAT - General Agreement on Trade and Traiff - गॅट करार-आंतरराष्ट्रीय व्यापार व आयातीवरील कर यासंबंधात सर्वसामान्य व्यवस्था निर्माण करण्यासाठी हा करार १ जाने. १९४८ रोजी अस्तित्वात आला. एकूण १०८ राष्ट्रे त्याची सदस्य आहेत.

२) Dunkel Draft - डंकेल प्रस्ताव - गॅटचे त्यावेळचे महासंचालक आर्थर डंकेल यांनी डिसें. १९९० मध्ये सादर केलेला प्रस्ताव.

३) WTO - World Trade Organisation - जागतिक व्यापार संघटना.

४) IMF - International Monetary Fund - आंतरराष्ट्रीय नाणे निधी.

५) जी-७ गट-इंग्लंड,फ्रांस, जर्मनी,अमेरिका,जपान इ. सात विकसित राष्ट्रांचा गट.

६) जी - ७७ गट - प्राधान्याने दक्षिणेतील व इतर अविकसित राष्ट्रांचा गट.

७) NAM - Non - Alignment Movement - भांडवलवादी व साम्यवादी अशा दोन्ही गटांमध्ये सामील न झालेल्या अलिप्ततावादी राष्ट्रांची चळवळ.

८) SAARC-South Asian Association for Regional Cooperation - प्रादेशिक सहकार्यासाठी निर्माण झालेली दक्षिण आशियातील देशांची संघटना.

९) UNCTAD - United Nations Conference for Trade and Development. व्यापार व विकास यासाठी स्थापन झालेली यूनोची संस्था.

१०) ECDC - Economic Cooperation among Developing Contries - विकसनशील देशांमधील आर्थिक सहकार्यासाठी स्थापन झालेली संस्था.

११) UNIDO-United Nations Industrial Development Organisation - औद्योगिक विकासासाठी निर्माण झालेली यूनोची संस्था.

१२) UNEP-United Nations Environment Plan- यूनोची पर्यावरणविषयक योजना.

१३) ILO - International Labour Organisation - आंतरराष्ट्रीय कामगार संघटना.

१४) SPCA - Society for Prevention of Cruelty to Animals - मुक्या प्राण्यांचा क्रूर छळ थांबविण्यासाठी अस्तित्वात आलेली संस्था.

१५) BWC - Beauty Without Cruelty - मुक्या प्राण्यांचे क्रूर शोषण न करता सौंदर्यप्रसाधने तयार करता येतात, या मताच्या प्रसारार्थ निर्माण झालेली संस्था.

१६) WPA - Wild-life Protection Act - वन्य पशूंच्या रक्षणाचा कायदा.

१७) TRIPS - Trade-Related Intellectual Property Rights - बौध्दिक संपदेच्या संदर्भातील व्यवहार-पेटंट्स इ.

१८) TRIMS - Trade-related aspects of Investment Measures- गुंतवणुकीच्या संदर्भातील व्यवहार.

१९) MRTP - The Monopolies and Restrictive Trade Practices

Commission - मक्तेदारी उद्योगांच्या व्यापारी व्यवहारांवर नियंत्रण ठेवणारा आयोग.

परिशिष्ट २

या पुस्तकातील एकूण विषयाच्या संकलनाच्या विशिष्ट सूत्रात बसविता न येण्यासारख्या काही मोजक्या अशा, त्या त्या लेखातील वा भाषणातील नैमित्तिक व अन्य काही उल्लेखांचे भाषांतर.

१) Global Economic System-A Hindu View - शिकागो येथील जागतिक धर्म परिषदेत स्वामी विवेकानंदानी दिलेल्या भाषणाची शताब्दी साजरी करण्यासाठी आयोजित केलेल्या World Vision 2000 या कार्यक्रमात दि. ६ व ८ ऑगस्ट १९९३ या दिवसांमध्ये दिलेल्या भाषणाचा शेवटचा भाग-

'मानवजातीच्या आद्य ऋषिमुनींच्या भूमीचे जणू सांस्कृतिक राजदूतच अशा स्वामी विवेकानंदांच्या ऐतिहासिक भाषणाच्या (इ.स.१८९३) शताब्दी सोहळ्याचे यजमानपद लिंकनच्या भूमीने भूषवावे ही घटना काही विशेष उदात्त आध्यात्मिक अर्थपूर्णतेशिवाय घडणारी घटना नव्हे.'

* * *

२) डॉ. बोकरे यांच्या *The Hindu Economics* या ग्रंथाला लिहिलेल्या Quo Vadis*

या प्रस्तावनेतील भाग- डॉ. बोकऱ्यांसंबंधीचा उल्लेख-

'हिंदू अर्थशास्त्र' हा ग्रंथ मनाची कवाडे बंद केलेल्या व्यक्तींसाठी नाही. भवभूतीप्रमाणेच या ग्रंथाचा कर्ता जाहीर करतो-तान् प्रति नैव यत्न:! (हा उपक्रम अशांसाठी नाहीच.)'

....'कुठे जाणार? गंतव्य कोणते? (Quo Vadis)?

भ्रमनिरास झालेल्या आणि गोंधळलेल्या मानवतेला २१ वे शतक उघडच योग्य प्रश्न विचारत आहे.

(हिंदू अर्थशास्त्र) हा पथदर्शक-अग्रेसर असा ग्रंथ हा या योग्य प्रश्नाला योग्य उत्तर देऊ इच्छितो-कुठल्याही औध्दत्यपूर्ण पोथीनिष्ठेने नव्हे, तर सत्याची प्रत्येक प्रामाणिक आस आणि प्रत्येक उत्कट शोधप्रयास यांच्यामागे निरपवादपणे असणाऱ्या विनम्रतेने!

हा प्रबंध वाचकांसमोर सादर करताना ग्रंथकार म्हणतो आहे-

आपरितोषाद् विदुषाम् न साधु मन्ये प्रयोगविज्ञानम्! (कालिदास)

(तज्ञांचे जोपर्यंत समाधान होत नाही तोपर्यंत हा माझा प्रयत्न मी प्रशंसनीय मानणार नाही.)

* * *

३) Towards An Indigenous Legal System - ७ सप्टे. १९९२ रोजी नवी दिल्ली येथे अ.भा. अधिवक्ता परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी केलेल्या भाषणातील भाग-

.....'अशाप्रकारे एकाच सभेत येवढया मोठया संख्येने अशाप्रकारच्या वकिलांची भेट होणे हा आजकाल दुर्मिळ सन्मान आहे. अशाप्रकारची सुवर्णसंधी प्राप्त करून दिल्याबद्दल मी या परिषदेच्या संयोजकांचा अतिशय आभारी आहे. मी सर्व प्रतिनिधींचे मन:पूर्वक स्वागत करतो. कारण अशांच्या या ठिकाणच्या उपस्थितीमुळे वकिली व्यवसायाबद्दलच्या व या सुप्रतिष्ठित व्यवसायाच्या बहुमोल अशा सहभागातून साकार होणाऱ्या देशाच्या उज्ज्वल

---

* कुठे जाणार ? गंतव्य कोणते ? या अर्थाची लॅटिन शब्दसंहती.

भवितव्याबद्दलच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.' ....

....'हा मेळावा म्हणजे सध्याच्या काळोख्या ढगाळ आकाशाला असलेली रूपेरी कड आहे. आपल्या व्यवसायाला व देशाला ग्रासून राहिलेल्या निकडीच्या प्रश्नांचा विचार करण्यासाठी बहुधा प्रथमच, मनात देशभक्तीचा संचार झालेले, जबाबदारीची जाणीव असलेले, बौध्दिक ऊर्जा असलेले वकील याठिकाणी एकत्र येत आहेत. ज्या ठिकाणी आपले नेतृत्व (leaders) अपयशी झाले त्या ठिकाणी आपले वकील (pleaders) यशस्वी व्हावेत अशी आशा निर्माण होणे ही मोठी प्रोत्साहक बाब आहे' .....

....'अशांना (असंघटित वर्गांना) योग्य तो आधार देण्यासाठी आवश्यक ते सर्व करावे ही, समाजाच्या नैतिक व सामाजिक सदसद्विवेकबुध्दीचे प्रतिनिधी म्हणून, अ. भा. अधिवक्तापरिषदेच्या कार्यकर्त्यांकडून अपेक्षा आहे.

* * *

४) With No Comments- हा ४ जून १९९४ रोजी भोपाळ येथे अ. भा. अधिवक्ता परिषदेसमोर वाचलेला निबंध म्हणजे ७ सप्टें. १९९२ रोजी नवी दिल्ली येथे परिषदेसमोर दिलेल्या भाषणात सुरू झालेल्या विचारप्रक्रियेचा पुढील भाग आहे अशा अर्थाचा उल्लेख या संदर्भात केलेला आहे. त्यामुळे *Third Way* मधील Towards An Indigenous Legal System या भागाचा शेवटचा परिच्छेद व With No Comments या भागाचा पहिला परिच्छेद एकच आहेत. त्याचे भाषांतर-

....'आतापर्यंत मांडलेल्या सत्यस्थितीच्या तपशीलावरून आपण अटळ निष्कर्षापर्यंत येऊन पोचतो की कायद्याच्या व घटनेच्या संदर्भात मुळातूनच पुनर्विचार नव्याने होणे आवश्यक आहे. कायदा, न्यायव्यवस्था, घटना, संस्थात्मक चौकट आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे या सर्व कायदाविषयक प्रक्रियेत सहभागी असलेल्यांची मानसिकता- हे सर्व पूर्णपणे बदलले पाहिजे. वैश्विक तत्त्वांच्या प्रकाशात पुढे मार्गक्रमणा केली पाहिजे. हा सर्व राष्ट्रीय पुनर्रचनेच्या प्रक्रियेतील महत्त्वाचा, अटळ व अविभाज्य भाग आहे. पश्चिमी विचारव्यूहाच्या दारूण अपयशानंतर अंधारात चाचपडणाऱ्या जगाला नवे नेतृत्व देण्याची साद नियतीने भारताला घातली आहे. मानवजात 'तिसऱ्या पर्याया'साठी आकांत करीत आहे. खरे म्हणजे एकमेव मार्गच ठरेल अशा प्रकारचा तिसरा पर्याय जगाला देण्याची नैतिक जबाबदारी भारतावर आहे. यासाठी प्रचंड पूर्वतयारी व साधने आवश्यक आहेत. या दिशेने पहिले अटळ पाऊल म्हणजे अतिशय सक्षम अशा नव्या घटनासमितीचे गठण होय. अशा घटनासमितीचे योग्य सदस्य म्हणून कोणाचे नाव घेता येईल? सत्तापिपासू राजकारण्यांचे? आपल्या पहिल्या घटनासमितीवर तर अशाच जमातीचे मोठ्या प्रमाणात वर्चस्व होते. आणि त्याचे परिणाम आपण भोगतोच आहोत. मग नैतिक दृष्टया व बुध्दिमत्तेच्या आवाक्याच्या दृष्टीने ही जबाबदारी घेण्यास कोण लायक आहेत? समाजातील इतर कोणत्याही वर्गापेक्षा राष्ट्रीय पुनर्रचनेच्या कार्यात समर्पित असलेला हा वकीलवर्गच याला सर्वात अधिक लायक आहे. एक नवा वैश्विक जीवन दृष्टिकोण (Weltanschauung) सादर करण्यामध्ये हा वर्ग महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. त्या दृष्टीने अ. भा. अधिवक्ता परिषद म्हणजे केवळ व्यावसायिक हितसंबंध जपणाऱ्यांची व साध्य करणाऱ्यांची संस्था नव्हे. पुनरुज्जीवित भारताच्या घटना समितीमध्ये बीजरूप भूमिका घेण्यासाठी अतिशय सक्षम व निश्चयात्मक धारणा असलेली अशी ही संस्था आहे.

* * *

५) स्वदेशी जागरण मंचाने १९९४ मध्ये प्रसिध्द केलेल्या, *Swadeshi View of Globalisation* या श्री. दयाकृष्ण यांच्या पुस्तकाला लिहिलेल्या Dharma Kshetre या प्रस्तावनेत आलेले लेखकाबद्दलचे उल्लेख-

....'या ग्रंथाचे लेखक शैक्षिक वर्तुळामध्ये चांगलेच मानले जातात. 'ऑर्गनायझर' आणि इतर अनेक साप्ताहिकांमध्ये ते प्रचलित आर्थिक प्रश्नांवर नियमितपणे लिहित असतात. ते भारतीय किसान संघाच्या भारतीय कृषि-अर्थविज्ञान संशोधन संस्थेचे संचालक आहेत. स्वदेशी जागरण मंचाचे ते राष्ट्रीय सहनिमंत्रक आहेत. रा. स्व. संघाचे स्वयंसेवक म्हणून, संघटनेचा जीवितहेतू सफल करण्यासाठी अनेक पातळ्यांवर जबाबदाऱ्या त्यांनी संभाळल्या आहेत. आपल्या मुद्याची सत्यता पडताळून पाहिल्याशिवाय ते एक अक्षरही लिहित नाहीत. *India's Planned Poverty* या त्यांच्या ग्रंथामुळे शासकीय वर्तुळात खळबळ माजली, परंतु त्यांचे निकर्ष खोडून काढण्यासारखे नव्हते. आर्थिक शस्त्रांनी लढल्या जाणाऱ्या तिसऱ्या महायुध्दाचाच एक भाग असलेल्या आपल्या दुसऱ्या स्वातंत्र्ययुध्दामागील कार्यकारणभाव ते प्रस्तुत ग्रंथात स्पष्ट करीत आहेत. या ग्रंथातील त्यांचे अनेक आग्रहपूर्ण निष्कर्षही, परकीय हितसंबंधियांच्या प्रचारामुळे वहावून जाण्याची हौस असलेल्या आपल्या बुध्दिवंतांना धक्कादायक वाटण्याची शक्यता आहे. पण त्यांच्या हेही लक्षात येईल की या प्रबंधाची विश्वसनीयता ही आक्षेपांच्या पलीकडची आहे.'....

* * *

६. त्रिवेंद्रम (तिरूअनंतपुरम) येथे ऑक्टो. १९८२ रोजी केलेल्या 'भारतीय विचार केंद्रा'च्या उद्घाटनाच्या भाषणातील उल्लेख-

....' आज भारतीय विचार केंद्राप्रमाणे अन्य केंद्रे नाहीत असे काही म्हणता येणार नाही. अशी अनेक केंद्रे आहेत. पण त्यांचा दृष्टिकोण वस्तुनिष्ठ नाही, हीच मुख्य अडचण आहे. त्यांचा दृष्टिकोण अनुमानावर आधारलेला असतो. विशेषत: आंतराष्ट्रीय जातीयवाद आणि आंतरराष्ट्रीय पंथवाद यांचे प्रतिनिधीही अशा प्रकारची केंद्रे चालवितात. पण त्यांना काढावयाचे निष्कर्ष त्यांच्या खिशांत अगोदरच तयार असतात आणि समोर आलेली तथ्ये या निष्कर्षांशी सुसंगत होतील अशारीतीने ते त्यांची फेरजुळणी करीत असतात. हा काही शास्त्रीय दृष्टिकोण नव्हे! तथ्ये ही निष्कर्षांशी जुळवून घ्यावयाची नसतात तर निष्कर्ष हे तथ्यांवरून स्वाभाविकपणे उलगडत जाणे आवश्यक असते. 'भारतीय विचार केंद्रा'मध्ये अशा प्रकारची विशेष गुणवत्ता असेल. अनुमानजन्य असा कोणताही दृष्टिकोण न बाळगता, सत्याचा शोध घेणे, तथ्यांचे संशोधन करणे व त्यावरून निष्कर्ष काढणे हे येथे केले जाईल. या ठिकाणी संकोच, पूर्वग्रह, विशिष्ट कल असणार नाही आणि पूर्वीच सिध्द झालेले निष्कर्षही असणार नाहीत. केवळ सत्यशोधनाचाच विचार येथे करणार आहोत'.....

....'सत्यशोधनाच्या व्यक्तिगत प्रयत्नांमध्ये सहकार्य घडवून आणून शोधप्रक्रियेच्या सामूहिक भावनेने सामूहिक शहाणपणाचा ध्यास घेतला पाहिजे. या दृष्टीने या विचार केंद्राची संकल्पना पुढे ठेवली आहे.'.....

'भारतीय विचार केंद्रा'ने समोर ठेवलेले हेतू समजून घेतलेल्या अशा सर्व बुध्दिवंतांना माझी विनंती आहे की 'भारतीय विचार केंद्र' हा आपला व्यक्तिगत प्रकल्प आहे असे मानून या संयुक्त विचारात आपली मौलिक भर घालावी. या ठिकाणी जमलेल्या बुध्दिवंतांना माझी ही विनम्र विनंती आहे. आणि मला अशी खात्री आहे की आपल्या सर्वांच्या

मन:पूर्वक सहकार्याने अत्यंत मर्यादित स्वरूपात सुरू होत असलेल्या या उपक्रमाचे थोड्याच काळात एका विराट प्रकल्पात रूपांतर होईल.

या आशेने व आपल्या सर्वांच्या अनुमतीने 'भारतीय विचार केंद्रा'चे उद्घाटन झाल्याचे मी जाहीर करतो.'

* * *

७. Then and Now (1893 : 1993) या भागातील काही उल्लेख-

.....'ज्या वेळी दृष्ट्या विवेकानंदांनी पश्चिमी नमुना हा विकास व प्रगतीचा वैश्विक नमुना आहे हे मान्य करण्यास नकार दिला तेव्हा प्रागतिक मेकॉलेवादी, एरव्ही विवेकी भासणाऱ्या या भारताच्या योद्ध्यासंताच्या दुर्बोध, गूढ मनोवृत्तीमुळे एकदम चक्रावून गेले. कारण त्यांच्या दृष्टीने 'आधुनिकीकरण म्हणजे पश्चिमीकरणच' होते. पश्चिमेतील डाव्यांना विवेकानंद स्थितिवादी वाटले आमि जेव्हा भारताच्या प्राचीन वैभवाबद्दल विवेकानंद बोलत तेव्हा पुरोगाम्यांनी त्यांच्यावर पुनरुज्जीवनवादी असल्याचा शिक्का मारला.

आणि हे सारे, जेव्हा प्रिन्स क्रोपोटकिन या तत्कालीन पश्चिमी क्रांतिकारी तत्त्वज्ञाच्या अतिशय निष्ठावान अनुयायी असलेल्या भगिनी निवेदितांनी या युरोपीय अराजकवाद्याची व भारतीय अध्यात्मवाद्याची प्रदीर्घ भेट घडवून आणली व त्या स्वत: मात्र विवेकानंदांच्या आजन्म शिष्या बनल्या, त्यावेळी!

त्यांना (पश्चिमात्यांना) स्वामीजी दोन कारणांनी समजू व भावू शकले नाहीत. एक म्हणजे तो काळ भौतिकवादाच्या प्रकर्षाचा काळ होता. त्यामुळे त्यातील अंतर्विरोध पाश्चिमात्यांना उमगणे शक्य नव्हते आणि दुसरे म्हणजे, त्यांच्या मनांत पुनरुज्जीवनवाद, सुधारणावाद, क्रांती व प्रबोधन यांच्या संबंधी अतिशयच धूसर, संदिग्ध कल्पना होत्या'.....

....'पू. गुरुजींच्या महानिर्वाणाच्या काहीच दिवस आधी दिल्लीचे एक ज्येष्ठ संघ प्रचारक श्री गुरुजींच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी त्यांना भेटायला आले होते. ते परत निघाले तेव्हा पू. गुरुजींनी त्यांना विचारले.

'तुम्ही वाचले आहे का की १९०५ मध्ये जेव्हा योगी अरविंद तुरुंगात होते त्यावेळी रोज रात्री स्वामी विवेकानंद त्यांना योग शिकविण्यासाठी येत असत. स्वत: अरविंदांनी तसे लिहिले आहे.'

प्रचारक म्हणाले, 'मी हे वाचलेले नाही'.

काही काल स्तब्धतेत गेल्यानंतर श्री गुरूजी म्हणाले,' हो! हे असेच असते! जेव्हा परमेश्वर काही विशिष्ट हेतूने कोणाला या जगात पाठवितो आणि ते कार्य जर त्याच्या हयातीत पूर्ण झाले नाही तर त्याला मोक्षाची अनुमती नसते. त्यामुळे 'अशरीरी' राहून त्याला स्वत:च्या अपूर्ण राहिलेल्या कामाला हातभार लावावाच लागतो. त्याची देखभाल करून मार्गदर्शन करावेच लागते. जोवर त्याची मुळची जबाबदारी पूर्ण होत नाही तोपर्यंत तो मोक्षाचा अधिकारी होऊ शकत नाही.

ते प्रचारक आश्चर्य करीत राहिले-'श्री गुरुजींनी, हे सांगत असताना कोणाकडे निर्देश केला होता? स्वामी विवेकानंदांकडे की स्वत:कडे ? की दोघांकडेही ?' या बाबत ते बुचकळ्यात पडले होते.

□ □ □

साम्यवादाचा विलय व भांडवलवादाची शीघ्र अशी अधोगामी गती सुरू झाल्यानंतर सारी मानवता 'तिसऱ्या पर्याया'साठी आकांत करीत आहे. मा. दत्तोपंत ठेंगडी यांच्या Third way या ग्रंथात हिंदू जीवनदृष्टीवर आधारलेले काही दिशादर्शन याच दृष्टीने आलेले आहे. अर्थात अशा पर्यायाचा समग्र पूर्णसिद्ध आराखडा मांडण्याची त्यांची भूमिका नाही. त्यातूनही मुळातच या ग्रंथातील विवेचन नैमित्तिक व संकीर्ण आहे. त्यामुळे त्याला केवळ हिंदू जीवनदृष्टीच्या 'कालोचित ठाम समर्थनीयतेचेच' स्वरूप असणे अटळ होते. एका अर्थाने हे सर्व विवेचन अपेक्षित 'तिसऱ्या पर्यायाकडे' - अंगुली निर्देशन करणारे आहे हे लक्षात येते आणि १९२५ सालीच समोर उभ्या राहिलेल्या ध्येयवादर्शनाची विविध अंगे साकार करण्यासाठी आवश्यक त्या विचारमंथनास बाध्य करणारी कालोचित तथ्ये या कालाजयी जीवनदृष्टीत आहेत याचे आत्मभान, 'तुझे आहे तुजपाशी' या जाणिवेपासून तुटलेल्या आपल्या समाजाला द्यावे हाच या विवेचनाचा हेतू आहे.

Third way मधील अशाच सर्व संकीर्ण व नैमित्तिक विवेचनाचे एकात्म रूप निर्माण करून ही आत्मचेतना मराठी वाचकांपर्यंत पोचविण्यासाठी, मराठी अनुसर्जनाचा हा रूपबंध...

मोरया
प्रकाशन